
# प्रेरणा

वार्षिकांक - २०१९-२०




## नूतन महाविद्यालय,
सेलू. जि. परभणी



महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सांगता समारोह प्रसंगी प्रमुख अतिथी ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर मार्गदर्शन करीत असताना.



महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सांगता समारोह प्रसंगी प्रमुख अतिथी स्वा. रा. ती. म. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ, उद्धव भोसले मनोगत व्यक्त करीत असताना.



महाविद्यालयाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा सांगता समारोह प्रसंगी प्रमुख अतिथी माजी कुलगुरू व ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले मार्गदर्शन करताना



सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त आजी कर्मचाऱ्यांच्या सत्कार समारोहाच्या प्रसंगी सुवर्णकल्प या सुवर्णमहोत्सवी उपक्रमाचा आढावा घेणाऱ्या स्मरणिकेचे प्रकाशन करीत असताना डॉ. सोमनाथ रोडे.



# अनंत वृत विशेष

# प्रेरणा

२०१९-२०

**नूतन महाविद्यालय, सेलू जि.परभणी**

वर्ष ५२ वे अंक ५२

# अनंत वृत्त विशेष

# प्रेरणा
## २०१९-२०


कार्यकारी संपादक
**डॉ. ए. सी. पत्की**
**डॉ. निर्मला पद्मावत**
**प्रा. मोहन ना. पाटील**

प्रकाशक
**प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी**

नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी
दूरभाष : (०२४५१) २२२००४, २२३०८०
email - principalnutan@rediffmail.com
website : www.nutanmahavidyalaya.com


**टीप :** या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व महाविद्यालय प्रशासन सहमत असेलच असे नाही.


विद्यार्थी संपादक मंडळ

**मराठी विभाग**
**अमोल बिडवे** / संपादक
**मंदाकिनी कैलास बिडवे** / सहसंपादक

**हिंदी विभाग**
**चंद्रकांत गणेशराव थोरात** / संपादक
**महादेव आसाराम राठोड** / सहसंपादक

**इंग्रजी विभाग**
**व्यंकटेश दिलीपराव दौड** / संपादक

अक्षर जुळवणी
**अब्दुल अतिख**

**मुखपृष्ठ**
**नयन बाराहाते**

**मुद्रक**
**सतीश कुलकर्णी**
मयूर प्रिंटर्स, कैलासनगर, नांदेड
mayur.ned@gmail.com



## अर्पण...

हैदराबाद मुक्तिसंग्रामातील सेनानी, धारदार लिखाण, सडेतोड विचारांच्या माध्यमातून स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात रोखठोक भूमिकेच्या माध्यमातून समाजजागृती करणारे, ध्येयवादी मराठी पत्रकारांतील अग्रणी असणारे, आपल्या ऋणानुबंधाच्या भावविश्वाला आजीवन जपणारे आणि आम्ही वैकुंठवासी, आलो याचि कारणासी, बोलिले जे ऋषी, साच भावे वर्ताया।। या संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या अभंगाला आजीवन सत्यात उतरविणारे कै. अनंतरावजी भालेराव यांच्या पुण्य स्मृतीस अर्पण......

# प्राचार्यांचे मनोगत

२०१९-२० चा प्रेरणाचा अंक आपल्या हाती देताना विशेष आनंद होत आहे.

'दै. मराठवाडा'चे झुंजार संपादक कै. अनंतराव भालेराव यांचा जन्मशताब्दी महोत्सव साजरा झाला. अनंतराव भालेराव हे स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या नूतन विद्यालयाचे मुख्याध्यापक होते. त्यांचे व नूतन संस्थेचे ऋणानुबंधाचे संबंध राहिलेले आहेत. 'दै.मराठवाडा'चे संपादक म्हणून त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय आहे. त्यांच्या लेखणीला धार होती. परखडपणा हा त्यांचा स्थायीभाव होता. 'दै.मराठवाडा'तील अग्रलेखांमुळे शासनकर्त्यांवर अंकुश होता. सेलू सोडल्यावर सुध्दा त्यांचे व नूतनचे तसेच सेलूतील अनेक कुंटुबीयांचे अत्यंत प्रेमाचे, स्नेहाचे व जिव्हाळ्याचे संबंध राहिले आहेत. सेलू या गावाचे वर्णन त्यांनी 'सामूहिक पुरुषार्थाचे गाव' असे केले आहे. त्यांनी 'दै.मराठवाडा'चे संपादक म्हणून केलेल्या कार्याचे स्मरण करुन वृत्तपत्रांच्या संपादकांनी, समाजाला दिलेल्या योगदानाची माहिती नव्या पिढीला व्हावी या हेतूने 'अनंत-वृत्त विशेषकां'चे नियोजन संपादक मंडळाने केले. महाविद्यालयीन अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रमांचे नियोजन करण्याचा महाविद्यालय प्रयत्न करते. श्री अनंतराव भालेराव यांनी 'दै. मराठवाडा'चे संपादक म्हणून केलेल्या कार्याचे स्मरण करुन विद्यार्थ्यांचे या उपक्रमामुळे लेखन कौशल्य वाढण्यास मदत होते.

या विशेषांकाचे 'अनंत-वृत्त विशेषांक' असे नामाभिधान करण्यामागे दोन गर्भितार्थ आहेत. एक तर आदरणीय कै. अनंतराव भालेराव (अण्णा) यांचे हे जन्मशताब्दी वर्षपूर्ती निमित्ताने अण्णांचे जीवनचरित्र नवपिढी समोर आणणे. दुसरा गर्भितार्थ म्हणजे अण्णांचे आजन्म कार्यक्षेत्र असणाऱ्या वृत्तविश्वाविषयी सर्वांना परिचित करून देणे. हे दोन्ही गर्भितार्थ या नामाभिधानाने साध्य होतात. म्हणून या विशेषांकाचे नामाभिधान 'अनंत-वृत्त विशेषांक' असे करण्यात आले आहे.

अनंतराव भालेराव यांचे सेलूशी असणारे ऋणानुबंध, त्यांचे माध्यमक्षेत्रातील कार्य व त्यांचे जन्म शताब्दीवर्ष या तिहेरी योगाच्या पार्श्वभूमीवर हा अंक प्रसिध्द करताना अनंतरावांच्या कार्यकर्तृत्वाचे स्मरण करणे हा आमच्या कर्तव्यपूर्तीचा एक भाग असे आम्ही समजतो.

हा वार्षिकांक तयार करण्यासाठी, संपादक मंडळ, मार्गदर्शक प्राध्यापक, अंकात अभ्यासपूर्ण लेख लिहिणाऱ्या विद्यार्थ्यांचे, अल्पावधीतच हा अंक सुंदर सजावटीने सुशोभित करणारे मयूर प्रिंटर्स अँड ॲडव्हर्टायझर्सचे प्रमुख श्री. सतीश कुलकर्णी, विशेषांकाच्या विषयास अनुसरून मनमोहक मुखपृष्ठ तयार करणारे श्री. नयन बाराहाते व अक्षर जुळवणी करणारे श्री. अब्दुल अतिख यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

या वार्षिकांकाच्या कल्पनेपासून ते पूर्तीपर्यंत विशेष मार्गदर्शन केल्याबद्दल संस्थापक प्राचार्य मा. श्री. द. रा. कुलकर्णी यांचे विशेष मन:पूर्वक आभार.

तसेच या विशेषांकाचे कामी विशेष सहकार्य केल्याबद्दल मा.श्री. निशिकांत भालेराव व मा.श्री. संजीव कुळकर्णी यांचे विशेष आभार !

**डॉ. शरद कुलकर्णी**
प्राचार्य

# अनंत भूत विशेष

# प्रेरणा
२०१९–२०

## मराठी विभाग

**अनुक्रमणिका**

अनंत-वृत्त विभाग -
१. **अनंतराव भालेराव यांचा परिचय**
२. **अनंतरावजींच्या संदर्भात संशोधित शोधप्रबंध**
३. **प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांची मुलाखत** – रोशनी शिवकुमार जोशी/ दिव्या विजय वाव्हळे
४. **संस्थापक प्राचार्य श्री.द.रा.कुलकर्णी यांची मुलाखत**–कार्तिक पाचलेगावंकर/नीरजकुमार मनोजकुमार वैष्णव
५. **श्री. निशिकांत भालेराव यांची मुलाखत** –अमोल बिडवे / मंदाकिनी कैलास बिडवे
६. **प्रा. प्रकाश कामतीकर यांची मुलाखत** –अयोध्या विनायकराव जोगदंड / निकिता अच्युतराव डंबाळे
७. **श्री. आसारामजी लोमटे यांची मुलाखत** – युवराजसिंह हनुमानराव नाईक / स्वप्निल शिवाजीराव मगर
८. **अण्णांची अत्तरकूपी : सेलू** – स्वप्निल शिवाजीराव मगर
९. **अनंतराव भालेराव व्यक्तित्व आणि कृतित्व** – मंदाकिनी कैलास बिडवे
१०.**अनंतदृष्टी** – अयोध्या विनायकराव जोगदंड


अनंतराव भालेराव यांचे निवडक अग्रलेख
१. **साच भावे वर्ताया**
२. **मृगाने बहार केली**
३. **मृत्यूच, पण मृत्यूला रडविणारा!**
४. **बोलके झाड**
५. **पुढच्या पेरण्यांची काळजी**

वृत्तविश्व विभाग
१. **मी वर्तमानपत्र** – ऋतुराज जीवन बोराडे
२. **भारतीय वृत्तपत्रांचा उदय** – सोनाली दत्ताराव तळणकर
३. **वर्तमानपत्राचे स्वरूप** – प्रियंका शाम रुपणर
४. **वर्तमानपत्रांचा इतिहास** – कोमल बालासाहेब बेंद्रे
५. **पत्रकारितेचे विविध प्रकार** – आदित्य आप्पासाहेब लहाने
६. **वृत्तपत्रविषयक कायदे** – विद्या विष्णुपंत कटारे
७. **वृत्तपत्राचा कप्तान** – जीवन शंकरराव लिपणे
८. **मला भावलेले संपादक** – वर्षा विठ्ठलराव गजमल
९. **महाराष्ट्राची आद्य स्त्री संपादक : तानुबाई बिरजे** – अंजली विजय वाव्हळे
१०.**वृत्तपत्रातील अग्रलेखाचे प्रकार व महत्त्व** – विकास खंडू मालसमिंदर
११.**आधुनिककाळात वृत्तपत्रांची भूमिका** – राधा बाबासाहेब होगे
१२.**संस्थानातील पहिले मराठी वृत्तपत्र : निजाम विजय** – गीता मुंजाभाऊ गोरे
१३.**मराठवाडा पत्राचे संस्थापक - संपादक : आ.कृ.वाघमारे** – दिव्या विजय वाव्हळे
१४.**अण्णांच्या शब्दांची कावड** – अनुजा परमेश्वर बोराडे
१५.**गांधी आमचा कोण लागतो? : अण्णांच्या परिप्रेक्ष्यातून** – शेख अफशाईम शेख मुनीर
१६.**संस्कृत भाषेतील वृत्तपत्र : सुधर्मा** – हर्षल पंडितराव पाटील
१७.**आजची समाजमाध्यमे आणि वृत्तपत्र....** – मानसी अनंत कुलकर्णी
१८.**कोरोनाच्या पावलांनी चीन महासत्तेकडे : वृत्तपत्रांच्या चष्म्यातून** – अमोल बिडवे
१९.**मुलाखत - श्री. जयचंद हिराचंद खोना** – महादेव नामदेव राऊत / राहूल रमेश डंबाळे
२०.**मुलाखत - श्री. राम दगडोबा सोनवणे** – किशोर परमानंद मेहता / कृष्णा परमानंद मेहता
२१.**प्रा. कामतीकरांविषयी** – प्रा. विश्वास वसेकर
२२.**लेखणी (कविता)** – प्रा. मोहन नारायणराव पाटील

# अनंत वृत्त विशेष

## प्रेरणा
२०१९–२०

## अनंत वृत्त विभाग



## आदरणीय कै. अनंतराव भालेराव यांचा परिचय

| | |
|---|---|
| नाव | अनंतराव भालेराव |
| वडिलांचे नाव | काशिनाथराव भालेराव |
| आईचे नाव | मनकर्णिकाबाई |
| जन्म | १४ नोव्हेंबर १९१९ |
| जन्मस्थळ | मु.पो. खंडाळा, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद |
| कार्यक्षेत्र | लेखक, संपादक, दै. मराठवाडा |
| विशेष कर्तृत्व | भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिक, हैदराबाद मुक्तीसंग्रामात कार्यकर्ते, सत्याग्रही, नेते. |
| पत्नीचे नाव | श्रीमती सुशीलाबाई भालेराव |
| सन्मान | फाय फाउंडेशनचा पुरस्कार, अत्रे प्रतिष्ठानचा पुरस्कार. |
| लिखित पुस्तके | १. आलो याचि कारणासी (लेखसंग्रह)<br>२. कावड (लेखसंग्रह)<br>३. पळस गेला कोकणा (प्रवास वर्णन)<br>४. पेटलेले दिवस (स्वातंत्र्यसंग्रामाच्या आठवणी)<br>५. मांदियाळी (व्यक्तिचित्रण)<br>६. समग्र अनंत भालेराव (दोन खंड), संपादक – पत्रकार निशिकांत भालेराव<br>७. हैदराबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा |
| अनंतराव भालेराव यांच्यावर लिहिलेली पुस्तके | अनंत भालेराव : काळ आणि कर्तृत्व (नरेंद्र चपळगांवकर) |
| देहावसान | २६ ऑक्टोबर १९९१ |



मराठवाड्यातील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद येथे कै. अनंतराव भालेराव यांच्यावरील प्रबंधांचा तपशील.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रबंधाचे शीर्षक | – | **श्री. अनंतराव भालेराव यांचे लेखन : एक चिकित्सक अभ्यास** |
| | संशोधक | – | **देशपांडे वृंदा विजय** |
| | मार्गदर्शक | – | मोहरीर एल. एन. |
| | विषय | – | मराठी |
| | वर्ष | – | २००८ |
| | विद्यापीठ | – | डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद. |
| २. | प्रबंधाचे शीर्षक | – | **कै. अनंतराव भालेराव यांच्या दै. मराठवाड्यातील अग्रलेख वाङ्मयाचा अभ्यास** |
| | संशोधक | – | **पाटील विजया केशवराव** |
| | मार्गदर्शक | – | देऊळगावकर चंद्रकांतराव |
| | विषय | – | मराठी |
| | वर्ष | – | १९९६ |
| | विद्यापीठ | – | डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद. |

३. प्रबंधाचे शीर्षक – **श्री अनंतराव भालेराव व्यक्ती व कार्य : एक चिकित्सक अभ्यास**

संशोधक – **तांदळे डी. आर.**

मार्गदर्शक – जोरगुलवार भूषणकुमार

विषय – राज्यशास्त्र

वर्ष – २००२

विद्यापीठ – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

४. प्रबंधाचे शीर्षक – **आणीबाणीतील दैनिक मराठवाडा वृत्तपत्राची भूमिका एक ऐतिहासिक अभ्यास**

संशोधक – **देवर्षी मुकुंद अरविंद**

मार्गदर्शक – देशमुख किरण

विषय – इतिहास

वर्ष – २०१०

विद्यापीठ – स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

५. प्रबंधाचे शीर्षक – **मराठवाड्याच्या विकासात दैनिक मराठवाडा वृत्तपत्राचे योगदान**

संशोधक – **इथापे सहदेव कारभारी**

मार्गदर्शक – देवर्षी मुकुंद अरविंद

विषय – इतिहास

वर्ष – संशोधन चालू

विद्यापीठ – डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ, औरंगाबाद.

# मुलाखत :
# प्राचार्य डॉ. शरद एस. कुलकर्णी

*मराठवाडा मुक्तिसंग्रामाचे अभ्यासक, उद्यमी व चिन्तनशील असणारे आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांची विद्यार्थ्यांनी घेतलेली मुलाखत*

**मुलाखदाता :-**
**प्राचार्य डॉ. शरद एस. कुलकर्णी**
**मुलाखतकार :-**
**१) रोशनी शिवकुमार जोशी,** बी.ए.प्र. वर्ष
**२) दिव्या विजय वाव्हळे,** बी.कॉम. द्वि. वर्ष

**प्र.१. हैदराबाद संस्थान कसे निर्माण झाले ?**

उत्तर– इंग्रजाचे राज्य स्थापन होण्यापूर्वी हिंदूस्थान देश अनेक राज्यात विभागलेला होता. वेगवेगळ्या मार्गाने इंग्रजांची सत्ता स्थापन झाली. तेव्हा हिंदुस्थानात लहान मोठी मिळून ६०१ अंकित राज्ये होती. त्यांना संस्थानाचा अर्थ प्राप्त झाला. या संस्थानाशी ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीने राजकीय संबंध प्रस्थापित केले. तरी इ.स. १८५७ पर्यंत ब्रिटिश साम्राज्य सरकारशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध आला नव्हता. इ.स. १८५७ च्या उठावानंतर मात्र इंग्रज बादशहाने कंपनीची सत्ता बरखास्त करून सर्व संस्थानवर अधिपत्य स्थापन केले. त्यात काश्मीर, हैदराबाद, म्हैसूर, ग्वाल्हेर,बडोदा, त्रावणकोर ही प्रमुख संस्थाने होती.

या संस्थानिकांची सत्ता आपल्या संस्थानापुरती तात्त्विक दृष्ट्या, निरंकुश असली तरी वास्तवात मात्र त्यांना इंग्रजाच्या अनुमतीखेरीज कोणताही महत्त्वाचा निर्णय घेता येत नव्हता. त्यांना त्यांच्या सार्वभौमत्वाला मुकावे लागले.

हिंदी संस्थानाच्या दर्जात फरक केला जात असे. त्यात हैदराबादचा निजाम आपली सत्ता अंतर्गत कारभारात व्यापक प्रमाणावर वापरू शकत असे.

राणीच्या जाहीरनाम्यानंतर ब्रिटीश सरकारने ताब्यातील इतर प्रदेश व संस्थाने समान मानण्यास प्रारंभ केला. संस्थानिकांचे संरक्षण करण्याची जबाबदारी इंग्रजांनी मान्य केली.

ब्रिटीश सत्तेचा प्रतिनिधी म्हणून प्रत्येक संस्थानात रेसिडेंट सदन असे. तो ब्रिटिशाच्या निर्णयाची अंमलबजावणी करीत असे. संस्थानिकांच्या सर्व हालचालींवर व व्यवहारावर त्याचे नियंत्रण असे.

हैदराबादच्या निजाम घराण्याचा संस्थापक आसफजाह हा एक कर्तृत्ववान सेनानी व मुत्सद्दी होता. सन १७१३ मध्ये दक्षिणेचा सुभेदार म्हणून त्यांची नेमणूक झाली आणि त्यांना निजाम उल् मुल्क हा किताब देण्यात आला. औरंगजेबाच्या मृत्यू नंतर मोगल साम्राज्यास उतरती कळा लागली. निजाम उल मुल्क यांनी या संधीचा फायदा घेतला आणि दिल्लीचे वर्चस्व झुगारुन देऊन दक्षिणेत आपली सत्ता प्रस्थापित करण्याचा डाव मांडला. त्याला विरोध करण्यासाठी दिल्ली दरबारने पाठविलेला हैदराबादचा मुबारक खान याचाही त्याने १७२४ मध्ये साखरखेर्डा येथे लढाईत पूर्ण पराभव केला व आपले स्वातंत्र्य जाहीर करुन वऱ्हाडचा कब्जा घेतला.

२९ ऑगस्ट १९११ रोजी मीर उस्मान अली खाँ याने त्यांचे वडील निजाम महबूब अलीखान यांच्या मृत्यूनंतर ७ वा व शेवटचा निजाम म्हणून

गादीवर आला.

**सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थिती –**

हैदराबाद संस्थानात ८८ हिंदू व १२मुस्लिम होते. जीवनाच्या सर्व क्षेत्रात मुस्लिमांचा प्रभाव होता. शिक्षणाच्या सर्व सोयी नव्हत्या. शिक्षण उर्दू भाषेतून घ्यावे लागे. रयतेला स्वातंत्र्य नव्हते.

हैद्राबादचा निजाम हा सर्वात मोठा संरजामदार होता. संस्थानात नागरी स्वातंत्र्य नव्हते. संघटना बांधता येत नव्हती. हैद्राबादच्या निजामाला स्वत:चे स्वतंत्र राज्य निर्माण करावयाचे होते.

संस्थानात औद्योगिकीकरण झालेले नव्हते. सर्वसामान्य जनता हालाखीच्या परिस्थितीत जीवन जगत होती.

**प्र.२. अनंतरावांनी पहिला सत्याग्रह केव्हा केला ?**

उत्तर– १९४८ पूर्वी मराठवाडा निजामाच्या कृपाछत्राखाली होता. मराठवाड्याचे ५ जिल्हे, आंध्राचे ८ व कर्नाटकचे ३ जिल्हे असे १६ जिल्ह्यांचे हैदराबाद संस्थान होते व निजाम मीर उस्मान अलीखाँ बहादूर राज्य करीत होता. संस्थानात कुठल्याही प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. १९३८ मध्ये संस्थानात स्टेट कॉंग्रेस स्थापन होण्यापूर्वीच सरकारने तिच्यावर बंदी आणली होती. त्यामुळे स्टेट कॉंग्रेसवरची बंदी उठवावी, नागरिकांना नागरी स्वातंत्र्य द्यावे, यासाठी हैदराबाद येथे गोविंदराव नानल यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या सत्याग्रहीच्या तुकडीने सत्याग्रह केला. मराठवाड्यात अशाप्रकारचे सत्याग्रह सुरु करावेत यासाठी गोविंदभाई श्रॉफ प्रयत्न करीत होते.

अनंतराव भालेराव यांचे वर्गमित्र अच्युतराव खोडवे यांच्याशी झालेल्या संवादातून अनंतराव वैजापूरच्या महादेवाच्या मंदिरापासून घोषणा देत बाजार चौकाकडे निघाले.

'वंदे मातरम्', 'स्टेट कॉंग्रेस की जय' असे म्हणत त्यांनी पत्रके वाचून दाखविली. पोलिसांनी त्यांना अटक केली. नोव्हेंबर १९३८ रोजी झालेल्या या गुन्ह्याबद्दल वैजापूर कोर्टात खटला चालला आणि त्याच महिन्याच्या २५ तारखेला दोन महिन्यांची सक्तमजुरी व शंभर रु. दंड अशी शिक्षा झाली. त्यांना दंड भरावयाचा नव्हता, त्यामुळे ३ महिने शिक्षा भोगून अनंतराव बाहेर आले. ते सत्याग्रह करणार हे घरी कोणालाच माहीत नव्हते. त्यांचे वडील नाराज झाले पण त्यांनी अनंतरावला तू सत्याग्रह केला आहेस, तर आता माफी मागू नकोस असा निरोप दिला.

**प्र.३. अनंतरावांनी वंदे मातरम् चळवळीमध्ये सहभाग घेतला होता का ?**

उत्तर – अनंतराव यांचे शासकीय महाविद्यालयात इंटरच्या दुसऱ्या वर्गात शिक्षण चालू होते. त्याचवेळी हैद्राबादला उस्मानिया विद्यापीठाच्या वसतिगृहामध्ये हिंदू विद्यार्थी ४–५ महिन्यापासून वंदे मातरम् हे गीत प्रार्थना म्हणून रोज म्हणत असत. औरंगाबादच्या विद्यार्थ्यांनी १४ नोव्हे १९३८ पासून आपल्या वसतिगृहात ते गीत गायला सुरू केले. प्राचार्यांनी हे गीत गाण्याला बंदी केली. विद्यार्थ्यांनी ऐकले नाही आणि बंदीच्या निषेधार्थ अन्न सत्याग्रह सुरू केला.

विद्यार्थ्यांना मातृभाषेतून शिक्षण न देणे, उर्दू माध्यम लादणे, धार्मिक भेदभाव करणे, मुस्लिम पध्दतीच्या पोषाखाची सक्ती करणे या व अनेक कारणांमुळे विद्यार्थ्यांमध्ये असंतोष होता व तो वंदे मातरम्च्या रूपाने व्यक्त झाला. शेवटी सरकारने कठोर कारवाई करण्याचे ठरविले. वंदे मातरम् म्हणण्याचा आग्रह करणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना संस्थानातील शिक्षण संस्थांतून काढून टाकले, त्यात अनंतराव भालेराव हे एक होते. महाविद्यालयाचे विद्यार्थी शिक्षणासाठी नागपूर, जबलपूरकडे गेले. अनंतरावांनी नागपूरला सिटी कॉलेजमध्ये प्रवेश

घेतला. इंटरची परीक्षा पास झाले. वंदे मातरम् मध्ये सहभागी विद्यार्थ्यांना हैदराबाद संस्थानात शिकायचे असेल तर त्यांनी माफी मागितली पाहिजे अशी अट हैदराबाद सरकारने लावली. अनंतरावांनी माफीनामा देण्यास नकार दिला व आपले शिक्षण थांबवले.

**प्र.४. अनंतराव नूतनमध्ये कसे रूजू झाले ?**

उत्तर – हैदराबाद संस्थानात शिक्षणाचे माध्यम उर्दू होते. मातृभाषेतून शिक्षण देणे, राष्ट्रप्रेमाने भारलेले विद्यार्थी तयार करणे व वेळ पडेल तेव्हा लढ्यात उतरण्यासाठी कार्यकर्ते तयार करणे या भूमिकेतून संस्थानात शिक्षण संस्थांची स्थापना करण्यात आली होती.

१९३८ मध्ये अनंतराव हर्सूल तुरुंगात असताना मनोहरराव सोनदे, विनायकराव चारठाणकर, राजाराम कोकीळ या तरुणांनी आपण खाजगी शाळा काढावी असा विचार केला होता.

सेलू येथे बालवर्ग ते दुसरी असे तीन वर्ग रामवाड्यामध्ये नूतन विद्यालय या शाळेमार्फत चालत होते. लक्ष्मणराव कुलकर्णी, गरुड गुरुजी हे शिकविण्याचे काम करीत तर श्री.रंगनाथराव कंधारकर हे मुख्याध्यापक म्हणून कार्यरत होते. विनायकराव चारठाणकर, मनोहरराव सोनदे व अनंतराव या शाळेत येऊन दाखल झाले. निजाम सरकारच्या विरुध्द संघटित होण्यासाठी व्यायामशाळा चालविल्या जात असत. अनंतरावांनी सेलूत आल्यावर वकील, व्यापारी व इतर प्रतिष्ठितांची बैठक बोलावली व या बैठकीत सध्याच्या शाळेत तिसरी,चौथी व पाचवी असे तीन वर्ग वाढवावेत असे ठरले. श्री.दत्तोपंत गाजरे शिक्षक म्हणून रुजू झाले. अनंतरावांना मुख्याध्यापक पद देण्यात आले. सेलूतील विस्तारीत शाळेचे उद्घाटन करण्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ यांना निमंत्रित करण्यात आले. समारंभानंतर राजाराम टाकसाळे, राजाराम कोकीळ, सोनाजी कुलकर्णी, गोविंदराव देशमुख आदि शिक्षक म्हणून रुजू झाले. नंतर अमजद युसूफजई हे उर्दू शिकविण्यासाठी शिक्षक म्हणून रुजू झाले. शिक्षक होणे या सर्वांच्या लेखी स्वातंत्र्य चळवळीचा एक भाग होता.

**प्र.५. १९४२ च्या काँग्रेसच्या मुंबई अधिवेशनाला अनंतराव गेले होते का ?**

उत्तर – १९४२ हे वर्ष भारताच्या स्वातंत्र्यकाळात महत्त्वाचे वर्ष. हैदराबाद मुक्तिसंग्रामाचे नेतृत्त्व स्वामीजी करीत असले तरी अंतिम निर्णय म.गांधीजी कडेच होते. गांधीजी एक व्यापक व निर्णायक चळवळीची घोषणा या अधिवेशनात करतील, अशी अपेक्षा देशभर होती. सेलूतील शिक्षकांपैकी काहींनी या अधिवेशनाला जावे असे ठरले. परभणी जिल्ह्यातून २०–२५ कार्यकर्ते मुंबई काँग्रेसच्या अधिवेशनाला गेले होते. सेलूतून अनंतराव भालेराव, विनायकराव चारठाणकर, मनोहरराव सोनदे या शिक्षकांबरोबर भांगडियासारखे गावातील काही राष्ट्रीय विचारांचे व्यापारीदेखील अधिवेशनाला गेले होते. अधिवेशनानंतर भूमिगत राजकीय काम करावे असे ठरले. मनोहरराव सोनदे यांनी एक सायक्लोस्टाईल मशीन आणली. यानंतर सेलू येथील गावात महत्त्वाच्या घरात चळवळीची माहिती देणारी पत्रके रात्रीच येऊन पडू लागली. मुख्याध्यापक म्हणून अनंतरावांना पोलिसांनी दमदाटी केली.

**प्र.६. महाराष्ट्र परिषदेबद्दल थोडक्यात माहिती सांगा ? अनंतराव महाराष्ट्र परिषदेचे कार्यकर्ते कसे झाले ?**

उत्तर– गोविंदभाईंचा व नूतन शाळेमधील शिक्षकांचा संवाद नेहमीच चाले. गोविंदभाईंनी अनंतरावांना एक पत्र लिहून शाळा आता व्यवस्थित चालू आहे. महाराष्ट्र परिषद लढाऊ संघटना म्हणून वाढवायची असेल, तर तुझ्यासारख्यांची गरज आहे. तू शाळेचे काम सोडून महाराष्ट्र परिषदेचा पूर्णवेळ कार्यकर्ता हो अशा आशयाचा मजकूर पत्रात होता. अनंतरावांनी शाळेतल्या सहकाऱ्यांबरोबर विचारविनिमय केला

आणि पूर्णवेळ राजकीय कार्यकर्ता होण्याचे निश्चित केले. १९४४ मध्ये अनंतरावांनी शाळा सोडली व महाराष्ट्र परिषदेच्या औरंगाबाद कार्यालयात चिटणीस म्हणून काम सुरु केले.

**प्र.७. अनंतरावांनी महाराष्ट्र परिषदेमध्ये कोणते कार्य केले ?**

**महाराष्ट्र परिषदचे कार्यकर्ते :-**

उत्तर– गोविंदभाई श्रॉफ यांच्या महाराष्ट्र परिषदेच्या औरंगाबाद जिल्हा कार्यालयात अनंतराव चिटणीस म्हणून काम करु लागले. औरंगाबादहून एक वर्षानंतर परभणीला अनंतरावाला पाठविण्यात आले. श्री.विनायकराव, बोरीकर, मुकुंदराव पेडगांवकर यांच्या मार्गदर्शनानुसार अनंतराव परभणी जिल्ह्यातील महाराष्ट्र परिषदेची संघटनात्मक जबाबदारी पार पाडू लागले. गोविंदभाईंच्या कल्पनेप्रमाणे असे संघटक प्रत्येक जिल्ह्यात पाठविण्यात आले.

संघटकाची कामे पुढीलप्रमाणे असत.

१) महाराष्ट्र परिषदेची सभासद नोंदणी करणे.

२) नवीन कार्यकर्ते शोधणे.

३) जनतेच्या तक्रारीची नोंद घेणे.

४) जालीम सत्तेच्या जुलमाविरुध्द लोकांचे मनोबल वाढविणे.

५) निजाम सरकार शेतकऱ्यांकडून लेव्ही घेत असे. पण लेव्ही वसूलीचे काही नियम नव्हते.

महाराष्ट्र परिषदेचे संघटक शेतकऱ्यांना मदत करीत. नांदेड व परभणी जिल्ह्यात लेव्ही प्रश्नावर लोकजागृती करण्याचे काम अनंतरावांनी मोठ्या प्रमाणावर केले. अनंतरावांनी परभणीत काही दिवस काम केले व नंतर त्यांना नांदेडला (१९४५-१९४६) पाठविण्यात आले.

**प्र.८. भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्याचा संस्थान वर काय परिणाम झाला ? संस्थानात कोणते आंदोलन सुरु झाले ?**

उत्तर – या दरम्यान भारत स्वतंत्र झाला होता. संस्थानाबाहेर जनता स्वातंत्र्याचा उत्सव साजरा करीत होती. मात्र संस्थानात स्वातंत्र्य साजरा करता येत नव्हते. पानसरेच्या हत्येनंतर समाधीजवळचा प्रसंग, नांदेडच्या दोषींवर ९ ऑगस्टला झालेला ध्वजदिन, पाटनूरचा जंगल सत्याग्रह या सर्वच ठिकाणी अनंतरावांचे कणखर, निग्रही पण समंजस नेतृत्त्वाचे गुण दिसून आले.

पाटनूरच्या सत्याग्रहानंतर पोलिसांची नजर अनंतराव, नागनाथ परांजपे आणि रघुनाथ रांजणीकर यांच्यावर होती. त्यामुळे या तिघांनी संस्थानच्या बाहेर राहण्याचा निर्णय घेतला. यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड या ठिकाणी प्रतिकार शिबीर उघडले व नांदेड जिल्हा काँग्रेसचे कार्यालय उमरखेडला हलविण्यात आले. अनंतरावांचे काम उमरखेडला सुरू झाले.

भारत स्वतंत्र झाला, परंतु निजामाच्या राज्यातील जनतेला स्वातंत्र्य नव्हते. निजाम भारतात सामील व्हायला तयार नव्हता, अशावेळी एका बाजूला जंगल सत्याग्रह, ध्वजदिन, संघराज्यामध्ये सामील व्हा दिन, असे अहिंसात्मक उपक्रम राबविल्या गेले. तर दुसऱ्या बाजूला रझाकाराची संघटना जनतेवर अन्वन्वित अत्याचार करीत होती. त्यामुळे संस्थानच्या बाहेर सशस्त्र कँप चालविण्याचे ठरले.

**प्र.९. उमरी बँक लुटली या बद्दल माहिती सांगून अनंतरावांची त्यातील भूमिका सांगा ?**

उत्तर– सरहदी लगत सुरु झालेल्या सशस्त्र प्रतिकार शिबिराची व त्यातील कार्यक्रमांची संख्या वाढत होती. खर्चही वाढत होता. महत्त्वाचे म्हणजे या कार्यक्रमांना शस्त्रे पुरवायची होती. शस्त्रे विकत घेण्याचा मोठाच खर्च होता. अशावेळी लढ्याचा खर्च भागविण्यासाठी एखाद्या बँकेचा खजिना

लुटण्यासंदर्भात विचार सुरु झाला.

स्टेट बँक ऑफ हैदराबाद ही सरकारी मालकीची बँक होती व तीच शासकीय कोषागाराचेही काम करीत होती. नांदेड जिल्ह्यात उमरीला स्टेट बँक ऑफ हैदराबादची शाखा होती. महाराष्ट्र परिषदेचे अधिवेशन उमरीला झाले होते. तेथील अनेकांशी परिचय होता. पाठिंबा मिळविणे शक्य होते. नांदेड जिल्ह्याचे काँग्रेस कार्यालय उमरखेडला होते तेथून उमरी हे गाव जवळ होते.

अनंतराव भालेराव, नागनाथ परांजपे, आबासाहेब लहानकर, साहेबराव बारडकर या तरुण मंडळीनी उमरी बँक लुटण्याची योजना तयार केली होती.

उमरखेडहून निघालेले ५० कार्यकर्ते तीन गटात विभागले होते. एका गटाने उमरी रेल्वे स्टेशनवर हल्ला करुन तेथील संदेश यंत्रणा निकामी करावयाची होती म्हणजे त्यामुळे उमरीतील बातम्या बाहेरच्या अधिकाऱ्यापर्यंत जाणार नाहीत. दुसऱ्या गटाने उमरीतील पोलीस स्टेशनवर हल्ला करावयाचा व पोलिसांना ठाण्याबाहेर जाऊ द्यावयाचे नाही. त्यामुळे ते बँकेच्या मदतीला जाऊच शकणार नाहीत.

तिसऱ्या गटाने प्रत्यक्ष बँकेत प्रवेश करावयाचा. या तुकडीचे नेतृत्व अनंतरावांनी केले होते. अनंतराव पिस्तुल काढून हँड्सअप असे ओरडले, त्यानंतर कार्यकर्त्याने किल्ल्या हस्तगत केल्या. तिजोरी उघडली सुमारे वीस लाख रुपयांची संस्थानची चलनातील रक्कम हाती लागली होती. ती सगळी घेऊन उमरखेडला गेले. विदर्भातील काँग्रेसचे नेते गोदाजीराव मुखरे यांच्या घरी न्यायाधीशाच्या पुढे पैसे मोजले व पैसे पुण्याला पाठविल्या गेले.

उमरी येथील प्रकाराबद्दल निजाम सरकारने मध्यप्रांत व वऱ्हाड प्रांतिक सरकारकडे तक्रार नोंदवली. खबरदारीचे उपाय मध्यप्रांत सरकारने योजले परंतु, कुणी सापडले नाही असे त्यांनी निजाम सरकारला कळविले. त्यानंतर उमरखेडचे प्रतिकार शिबीर विसर्जित करण्याचे ठरले. मुंबईत हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या कृती समितीच्या मोरारबागेतील कार्यालयात अनंतरावांनी कार्यालयाचे चिटणीस म्हणून काम करावे असे त्यांना सांगण्यात आले. मुंबईचे हे कार्यालय लढ्याचे केंद्र कार्यालय म्हणून तर काम करत होतेच; शिवाय लढ्यासाठी शस्त्रे मिळविणारे एक केंद्र म्हणूनही तेथे काम चालत होते. अनंतरावांनी कार्यालयात कामाबरोबर 'मराठवाडा' पत्राच्या कामात वाघमारे यांना मदत करावयाची होती. त्याशिवाय शस्त्र खरेदीचाही प्रयत्न करावयाचा होता.

शस्त्रास्त्र खरेदी करताना अनंतराव व सहकारी मुंबईला पोलिसांनी रचलेल्या सापळ्यात पकडल्या गेले. ठाण्याच्या जेलमधून अनंतराव व त्यांच्या सहकाऱ्यांची सुटका पोलीस ॲक्शन होण्यापूर्वी ३ महिने आधी झाली.

**प्र. १०. आपण या मुलाखतीचा समारोप कसा कराल ?**

हैदराबाद मुक्तिसंग्राम हा भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा एक भाग होता. सकृतदर्शनी १९३८ ते १९४८ या दहा वर्षात लढा लढला असे दिसते. या दहा वर्षात स्वातंत्र्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली अहिंसात्मक मार्गाने जनआंदोलन उभे केले. स्वातंत्र्यलढ्याच्या शेवटच्या टप्प्यात सशस्त्र कँप उभारुन हिंसात्मक मार्गही निवडला गेला. हा लढा यशस्वी करण्यात अनंतराव सारख्या असंख्य निष्ठावंत, त्यागी व समंजस वृत्तीच्या कार्यकर्त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

सर, आपण वेळात वेळ काढून ही मुलाखत दिली. त्या बद्दल आपले आभार.

धन्यवाद !

# मुलाखत : प्राचार्य श्री. द. रा. कुलकर्णी

*महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य द.रा.कुलकर्णी यांचे व अनंतरावांचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते. त्यांच्यातील **''ऋणानुबंधनाच्या गाठी''** घट्ट विणलेल्या होत्या. त्यांची विद्यार्थ्यांनी घेतलेली मुलाखत.*

मुलाखत दाता : **प्राचार्य श्री. द. रा. कुलकर्णी**
मुलाखतकार :
**१) कार्तिक पाचलेगांवकर** (बी.एस्सी.तृतीय वर्ष)
**२) नीरजकुमार वैष्णव** (बी.एस्सी. तृतीय वर्ष)
या मुलाखतीत द. रा. सरांनी त्यांच्या ऋणानुबंधाच्या गाठी उलगडून सांगितल्या आहेत.

**प्र.१. सर आपण अनंतरावजींच्या संपर्कात कधी आलात ?**

उत्तर – माझ्या वडिलांच्या निधनानंतर माझ्या आजीने मला आजोळी सेलूला आणले. साधारणत: ते वर्ष १९३९ असावे कारण त्यावेळी मी ५/६ वर्षाचा असेल. सेलू येथील सरकारी प्राथमिक शाळेत मला पहिल्या वर्गात प्रवेश देण्यात आला. मी चौथी पास होऊन नूतन विद्यालयातील ५ व्या वर्गात प्रवेश घेईपर्यंत अनंतरावांनी सेलू सोडण्याचे ठरविले असावे (संदर्भ त्यांचे १० मे १९४४ चे राजीनामा पत्र) महात्मा गांधी यांनी १९४२ साली सुरु केलेल्या 'चले जाव' आंदोलनात सेलू येथील अनेक कार्यकर्ते – अनंतरावासह मुंबईला रवाना झाले होते. सेलू येथील वास्तव्यात त्यांचे राहणे (भाड्याने) अनेक घरात झाले ते मला आठवते. त्यांचा विवाह सेलूला असताना झाला आणि माझ्या आठवणीनुसार त्यांचे पहिले अपत्य सेलूला असतांना झाले. माझे उच्च शिक्षणासाठी हैदराबादला जाऊन उस्मानिया विद्यापीठात प्रवेश घेऊन माझ्या राहण्याची सोय म्हणून सेलू येथील सक्रिय कार्यकर्त्यांचा आणि त्यांच्या मैत्रीचा उपयोग झाला. मराठवाड्यातील काही विद्यार्थ्यांसोबत सोनाजी गुरुजींचे धाकटे बंधु डॉ.मनोहर कुलकर्णी यांच्या सहकार्याने आणि मार्गदर्शनाने मी भालेराव कुटुबांत सामील झालो. त्या काळातील अनंतरावांच्या सान्निध्यात राहण्याचे भाग्य मला लाभले आणि व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत त्यांचे मार्गदर्शन आणि सहवास माझ्या आयुष्याच्या वाटचालीत त्याचा उपयोग झाला आणि 'दत्ताचा' डी. आर. झालो. तोपर्यंत मी दत्तात्रय कुलकर्णी म्हणूनच ओळखला जाई. १९५२ ते ५६ आणि पुढे १९५६ पासून ते त्यांच्या निधनापर्यंत (१९९१) इतक्या प्रदीर्घ सहवास, सान्निध्य आणि मार्गदर्शनाने आतापर्यंत आणि त्यानंतर त्यांच्या गत आठवणींना उजाळा देत आयुष्य कंठित आहे. त्यामुळे कदाचित आपण माझी मुलाखत घेत असाल.

**प्र.२. अनंतरावजी व सेलूचा संपर्क कसा आला ?**

उत्तर – सेलूला येण्यापूर्वी इंटरला दुसऱ्या वर्षात शिकत असताना १९३८ साली 'वंदे मातरम्' आंदोलनात भाग घेऊन या युवकाने राष्ट्र कार्यास वाहून घेतले. त्यामुळे तत्कालीन निजाम सरकारच्या विरोधी आहे असे समजून वंदे मातरम् वर बंदी घालण्यात आली. त्यावेळी माफीनामा न दिल्यामुळे आंदोलनकर्त्या सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयातून काढून टाकण्यात आले. अशा आंदोलनकर्त्या

विद्यार्थ्यांनी पुढील शिक्षणासाठी इतरत्र प्रवेश घेतला. अनंतराव नागपूरच्या सिटी कॉलेजात दाखल झाले.

अनेक समस्यांना तोंड देत ते इंटरची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्यांनी लिहिल्याप्रमाणे मॅट्रीकच्या परीक्षेत ते संस्कृत विषयात त्यावेळच्या संस्थानांत सर्वप्रथम आले. त्यामुळे त्यांना शिष्यवृत्ती मिळाली. अनंतरावांनी सेलूला नूतन विद्यालयात शिक्षकाची नोकरी स्वीकारत सार्वजनिक कार्याचा प्रारंभ केला असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यांचे सेलूतील आगमनापासून (१९३९) ते शाळेतून राजीनामा (१९४४) देईपर्यंत कार्य, त्यांचे अधिक सान्निध्य लाभलेले अनेक जण सेलूत आजही आहेत.

त्यामुळे त्यांना महाविद्यालयीन शिक्षण घेता आले. हे शिक्षण घेत असतानाच हा टप्पा पूर्ण करुन राष्ट्रीय कार्यास प्रारंभ केला, पण सेलूच्या नूतन विद्यालयात बालवाडी ते दुसरीपर्यंत तीन वर्ग होते. शिक्षक म्हणून नोकरी काही काळासाठी स्वीकारली. तिसरी ते सातवीपर्यंत वर्ग काढून या शाळेचा विस्तार केला. अनेक अडचणींवर मात करीत ही शाळा नावारुपाला आणली. त्याच काळात काही काळ त्यावेळच्या प्रथेप्रमाणे मुख्याध्यापक म्हणून कार्य करुन शैक्षणिक कार्याबरोबर, व्यायामशाळा, गणेशोत्सव, सार्वजनिक वाचनालय इत्यादी माध्यमातून राष्ट्रभक्ती जागृत करण्याचे कार्य त्यांनी पार पाडले. आंदोलनासाठी सत्याग्रही तयार करण्याचे काम येथे सुरू केले. त्यातून सत्याग्रही कार्यकर्त्यांची एक फळी तयार झाली. त्यामुळे त्यांचा अशा ध्येयवादी कार्यकर्त्यांचा संच त्यांच्या अखेरपर्यंत त्यांचा पाठीराखा आणि हितचिंतक म्हणून उभा राहिला. त्यातून सेलूचा – शाळा आणि कार्यकर्ते यांचा ऋणानुबंध निर्माण झाला तो आजपर्यंत कायम राहिला. शिक्षक आणि संस्था स्थापन करणारे कार्यकर्ते एकरुप झाल्याने नूतन विद्यालय अल्पकाळात नावारुपाला आली. अनंतरावांच्या नेतृवाखाली केवळ शिक्षणाचे कार्य सुरु झाले असे न होता स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांचा, सत्याग्रहींचा संच तयार झाला. सत्याग्रही तयार करण्याचे, त्यांची नोंदणी करुन त्यात सहभागी होण्यासाठी कार्यकर्त्यांची मानसिकता तयार करुन लोकशाही निष्ठा आणि देशभक्तीचे धडे या ठिकाणी देण्याचे मोठे कार्य सेलू केंद्राने त्याकाळी केले. १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनात सहभागी होऊन स्वातंत्र्य प्राप्तीसाठीचे लढे अधिक तीव्र करण्यात आले. हे कार्य सेलूतूनच घडत गेले. हा ऋणानुबंधाचा धागा घट्ट विणत गेला. १९४२ च्या सत्याग्रहाचे कार्यकर्ते बालपणी मी बघितले ते या निमित्ताने आठवले.

**प्र.३. अनंतरावांनी सेलू सोडल्यावर त्यांचे व नूतनचे संबंध कसे राहिले ?**

उत्तर – मी नूतन विद्यालयातील ५ व्या वर्गात प्रवेश घेण्यापूर्वीच अनंतरावांनी नूतन विद्यालय सोडली आणि अधिक मोठे क्षेत्र – ध्येयवादाने प्रेरित होऊन राष्ट्राला देण्यासाठी नूतन विद्यालयाचा राजीनामा सादर केला. त्या राजीनामा पत्रात त्यांचे भाषेवरचे प्रभुत्व आणि संस्थेविषयीची निस्पृहता आणि तळमळ दिसून येते. ते हैदराबाद मुक्तीसंग्रामाचे क्रियाशील कार्यकर्ते म्हणून कार्य करु लागले. परभणी, नांदेड, औरंगाबाद येथे सत्याग्रहासाठी नोंदणी आणि हैदराबाद स्टेट काँग्रेसचे सभासद नोंदणीचे मोठे काम पार पाडून संघटना मजबूत केली.

सेलू सोडल्यानंतर देखील त्यांचे वेगवेगळ्या निमित्ताने या शहराशी, नूतन विद्यालय आणि कार्यकर्ते यांचा संपर्क सतत वाढतच गेला. अशा संपर्कामुळेच माझ्यासाख्या अनेक होतकरू विद्यार्थ्यांना अनेक प्रकारचे साहाय्य करीत हा ऋणानुबंधाचा धागा अधिक मजबूत झाला.

भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन अधिक गतिमान होऊन चर्चेच्या अनेक फेऱ्या होत शेवटी १५ ऑगस्ट १९४७ ला भारताला स्वातंत्र्य मिळाले, परंतु हैदराबाद संस्थानात निझामाच्या तावडीतून

सुटण्यासाठी पुढील १४ महिने लढा तीव्र करुन हैदराबाद संस्थान १३ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर १९४८ या काळात पोलीस कारवाईद्वारे मुक्त झाले. या हैद्राबाद मुक्ती संग्रामात सेलूचा सहभाग महत्त्वाचा ठरला. हैदराबाद मुक्ती संग्रामात सक्रिय सहभागी होण्यासाठी अनंतरावांनी नूतन विद्यालयचा राजीनामा १९४४ ला दिला आणि ते काँग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते बनले. या संग्रामाविषयी सविस्तर माहिती त्यांच्या 'हैदराबाद मुक्ती संग्राम आणि मराठवाडा' या संशोधनपर आणि अभ्यासपूर्ण ग्रंथात आपणास वाचावयास मिळते.

नूतन विद्यालयाच्या वाटचालीस त्यांचे सतत मार्गदर्शन लाभत गेले आणि या संस्थेच्या विकासास निश्चित दिशा मिळत गेली. नूतन महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते संस्थेच्या हीरक महोत्सवाच्या समारोपात त्यांचे मोलाचे सहकार्य लाभले. १९८९-९० या संस्थेच्या सुवर्ण महोत्सव प्रसंगी प्रकाशित करण्यात आलेल्या स्मरणिकेत त्यांचा सेलू - एक सामूहिक पुरुषार्थाचे गाव' हा प्रदीर्घ लेख त्यांचे या संस्थेशी आणि सेलूशी नाते आणि ऋणानुबंध कसा वाढत गेला हे सहज लक्षात येते. या लेखात या शहरातील अनेकांचा नावानिशी उल्लेख त्यांच्या दांडग्या स्मरणशक्तीचा परिचय करुन देते.

नूतन शिक्षण संस्थेच्या सुवर्ण महोत्सवासाठी (ऑगस्ट १९९१) अनंतराव २/४ दिवस सेलूला राहिले होते. येथे राहणे मला आवडते असे ते म्हणत. या महोत्सवाचे प्रमुख पाहुणे म्हणून त्यांच्या हस्ते संस्था कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे छायाचित्र 'प्रेरणा' वार्षिकांकात मिळेल. अनंतरावांची सेलू शहरास आणि नूतन विद्यालय शिक्षण संस्थेस शेवटची भेट ठरली.

**प्र.४. आपल्यावर अनंतरावांनी कोणते संस्कार केले ?**

उत्तर - माझा आणि भालेराव कुटुंबीयांचा या निमित्ताने ऋणानुबंध कसा जुळत गेला हे नमूद केल्यावरच कळेल. मला नोकरी मिळवून देण्यासाठी ते सतत प्रयत्नशील होते. नोकरीसाठीच्या प्रत्येक अर्जावर मी अनंतरावांचा पत्ता देत असे. मराठवाडा अर्ध साप्ताहिक नोव्हेंबर १९५६ साली औरंगाबादला स्थलांतरित झाले. त्याचे कारण भाषावार प्रांतरचना अस्तित्वात आली आणि मराठवाड्याचे पाच जिल्हे महाराष्ट्राशी - त्यावेळच्या मुंबई या द्वैभाषिक राज्याशी जोडले गेले. माझा विवाह जुळविण्यापासून संसार थाटण्यापर्यंत अण्णा- वहिनींचे सहकार्य लाभले. आमच्या विवाहाला - ५ मे १९५८ - भालेराव कुंटुंबीय उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने सेलू शहर भारावून गेले होते. आमच्या विवाहानंतर औरंगाबादला आमचा संसार उभा करण्यात वहिनींचा (सौ.सुशीलाबाई भालेराव) मनापासून सहभाग होता आणि लहान सहान गोष्टी - वस्तू घेऊन-देऊन आम्हास उपकृत केले. आमच्या पहिल्या अपत्याचे कौतुक करण्यापासून आवश्यक ते सर्व मिळवून देण्यात त्यांनी स्वत: पुढाकार घेतला. अनंतरावांकडील जवळपास सर्व विवाह समारंभात आमच्या कुटुबीयांचा सहभाग असे.

हैदराबादी अनंतरावांच्या सहवासाने माझे व्यक्तिमत्त्व फुलत गेले. त्यांच्याकडे सर्व पक्षांच्या कार्यकर्त्यांची वर्दळ असे. त्यांच्यात चालणाऱ्या चर्चा आम्ही मन लावून ऐकत असू. बाबासाहेब परांजपे, नागनाथ परांजपे, डॉ.बापू काळदाते अशा अनेक नेत्यांचा सहवास घडत असे. त्यावेळी नव्यानेच हैदराबादची विधानसभा अस्तित्वात होती. मराठवाड्यातील प्रथमच निवडून आलेली शहरी-ग्रामीण ढंग असलेली आमदार मंडळी आणि त्यांचे विधानसभेतील अनुभव अण्णांना सांगत.

मराठवाडा अर्ध साप्ताहिकाचे संपादक असलेल्या अनंतरावांच्या घरी अनेकप्रकारची वृत्तपत्रे असत. ते वाचनाची सवय त्याकाळात मला जडली,

कार्यालयात जाताना अण्णा वर्तमानपत्रांचा गठ्ठा बरोबर घेऊन पायी किंवा सायकलने त्यांच्या कार्यालयात पोहचत. त्यांच्या घरी विविध प्रकारच्या वृत्तपत्रांबरोबर दिवाळी अंकाचे गठ्ठे येत असत आम्ही विद्यार्थी मंडळी रात्र-रात्र अंक घेऊन त्यातील विनोद परस्परांना सांगत असू. आणि हास्य सागरात डूंबत असू. हैदराबाद मुक्ती संग्रामातील किस्से त्यांच्या रसाळ वाणीने ऐकत असू. ते रंगून जात आम्ही मन लावून तेव्हाच्या लढ्यातील गप्पा-टप्प्पांमध्ये रमून जात. मी राज्यशास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासक्रमाचा विद्यार्थी असल्याने अण्णांनी मला चीनच्या राज्यघटनेवर लेख लिहावयास सांगितला. एका राज्यपध्दती (Writary State) चा तुलनात्मक लेख मी लिहून दिला.

अखिल भारतीय काँग्रेसचे अधिवेशन हैदराबादला १९५३-५४ मध्ये झाले. आम्ही विद्यार्थी - जयकृष्ण भालेराव, मनोहर कुलकर्णी, वसंत कौसडीकर इत्यादी मित्रांनी स्वयंसेवक म्हणून काम केले. त्यामुळे सर्व राष्ट्रीय नेत्यांना पं.नेहरु, मौलाना आझाद इ. ना जवळून बघता आले आणि त्यांची भाषणे देखील काम करता करता ऐकू शकलो. पू.स्वामीजी त्यावेळी स्वागताध्यक्ष होते. त्या अधिवेशनात त्यांनी भाषावर प्रांत रचना करून हैदराबाद संस्थान तीन प्रांतात विलीन करावे असे सुचविले. पंडित नेहरुंना हे मान्य नव्हते. परंतु पुढे लोकमताच्या दबावामुळे भाषावार प्रांत रचना करावी लागली म्हणून आज आपण मराठी भाषिक महाराष्ट्रात नांदत आहोत.

अण्णा-वहिनींच्या सान्निध्यामुळे सामूहिक जीवनाचे पाठ आम्हास मिळाले. विविध विद्याशाखांचा परिचय झाला. विविध विद्याशाखा अंतर्गत अभ्यासाची दृष्टी आम्हास लाभली. कारण आम्ही विविध विद्याशाखांचे विद्यार्थी एकत्र राहात असू आणि चर्चेतून आम्हास सहजच ही दृष्टी लाभत असे.

औरंगाबाद येथील सन्मित्र कॉलनीत त्यांच्याकडे निवास भोजन होत असे. अनेक नेत्यांची, मराठी साहित्यिकांची चर्चा कानावर पडत असे त्यामुळे आम्ही बहुश्रुत होत गेलो. माझ्या विवाहाची निमंत्रण पत्रिका देखील अण्णांनीच तयार करुन दिली होती. त्यांच्या कार्यालयातील 'स्वातंत्र्याची जिथे प्रचिती, तिथे कर माझे जुळती' हे बोध वाक्य आमच्या मनावर कायमचे ठसले. असे स्वातंत्र्यप्रेमी, लोकशाहीवर निष्ठा असलेले, धर्म निरपेक्ष आणि समतावादी दृष्टी असलेले ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, यशस्वी संपादक आणि माणूसवेडा माणूस आम्हास सहवासाने आत्मसात करता आला, आणि आचरणांत आणत आतापर्यंतची जीवनाची वाटचाल चालू राहिली. २६ आक्टोबर १९९१ ला हृदय विकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. ०१ जुलै २००९ ला वहिनींच्या निधनानंतर या जुन्या ऋणानुबंधाचा धागा तुटला आणि आम्ही पोरके झालो.

परंतु त्यांच्या आठवणी सतत येत असतात आणि आम्हाला कार्यप्रवण करीत असतात.

माझ्या प्रमाणेच सेलूतील श्रीरामजी भांगडिया, विनायकराव चारठाणकर, डॉ.दिगंबरराव मुळावेकर, सोनाजी कुलकर्णी, गोविंदराव देशमुख, आबेद खान, परसराम गेना, वैजनाथराव वीर, गोविंदराव काळेगांवकर अशा अनेक व्यक्ती व कुटुंबांशी त्यांचे प्रेमाचे व जिव्हाळ्याचे संबंध होते. या सर्वांच्या कुटुंबांतील प्रत्येक व्यक्तीशी ते आत्मीयतेने बोलत.

थोडक्यात सेलूकरांच्या हृदयात सामावलेले अनंतराव भालेराव आजही आदरास पात्र आहेत. अनंतरावाने एका लेखात लिहिल्याप्रमाणे 'जो स्वत:ला विसरला, लोक त्याला विसरत नाहीत' याची प्रचिती आपणांसर्वांना वेळोवेळी येते. त्यामुळेच ऋणानुबंधाच्या गाठी पुढची वाट दाखवितात.

# मुलाखत : मा. श्री. निशिकांत भालेराव

*वार्षिकांकाची दीर्घ परंपरा असणारे आमचे नूतन महाविद्यालय याही वर्षी ''कै. अनंतराव भालेराव'' यांच्या शताब्दी वर्ष पूर्तीनिमित्त 'अनंत वृत्त विशेष' हा विषय घेऊन प्रेरणा वार्षिकांची निर्मिती करीत आहे. यानिमित्ताने अण्णांचे सुपुत्र श्री. निशिकांत भालेराव' यांची घेतलेली मुलाखत. या मुलाखतीतून त्यांनी अनंतरावांच्या संचिताची हरीकथा स्पष्ट केली आहे.*

मुलाखत दाता : **मा. श्री निशिकांत भालेराव**
मुलाखतकार :
**१) अमोल बिडवे** (बी.कॉम. तृतीय वर्ष)
**२) मंदाकिनी बिडवे** (१२वी कला)

**प्र. १. सर, अण्णा संपादक कसे व कशामुळे झाले ?**

उत्तर – आपण संपादक कशामुळे व कसे बनलो ? या विषयी अनंतराव यांनी एकदा सांगितले की, ''मॅट्रिक झालो तर बऱ्यापैकी नौकरी मिळेल असे वाटत होते. मॅट्रिक झाल्यावर मनापासून वाटे की वकील व्हावे. वकिली मागची प्रेरणा दोन पैसे कमावून सुखवस्तू बनण्याची होती. घरच्या गरिबीमुळे वकील बनता आले नाही. कारकुनी शिवाय पर्याय नव्हता. एका देशभक्तानेच मला वशिला दिल्याने काम झाले. पंधरा दिवसांनी कॉलेजच्या प्राचार्यांचे पत्र आले की, मी राज्यात संस्कृतमध्ये प्रथम आलो व पुढच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मिळाली आहे. या शिष्यवृत्तीमुळे इंटरमिडीएट पर्यंत तरी शिक्षण झाले. याच काळात मराठीशी संबंध आला. अभ्यासाच्या निमित्ताने मराठीने मला झपाटले. नाथ माधव, हडप, ह. ना. आपटे, खांडेकर, माडखोलकर बघता बघता संपले. वाचनाचा नादच जडला. पुढे पत्रकारितेत भाषा, वाचनाचा व बहुश्रुतपणाचा पाया मिळाला तो एवढाच! पुढे सत्याग्रहामुळे तुरुंगात गेलो तेव्हा गंभीर वाचनाची संधी मिळाली. चिपळूणकर, टिळक, आगरकर, लोकहितवादी – जावडेकर, रॉय, मार्क्स–लेनिन, पामदत्त, रसेल या दिग्गजांची ओळख वाचनातून झाली. या वाचनाचा फायदा चळवळीतील पत्रके तयार करताना मला झाला. पत्रकातून लोकांच्या भावनांना चेतवत त्यांच्या पुरूषार्थाला आवाहन करावे लागे. पत्रके लिहिण्यामुळे भाषेचे सामर्थ्य कळले. भाषा व साहित्याचा जीवनाशी असणारा संबंध लक्षात आला. शब्दातून व्यक्त होणाऱ्या अर्थाचा नाजूकपणा, भडकपणा, त्यांचा तोल, प्रसंगविशेषी आशय लपवून ठेवण्याची खुबी या गोष्टी शिकायला मिळाल्या. पुढे चळवळींमुळे शेकडो माणसांचा संबंध आला व शैलीचे एक भांडारच हाती आले. वडिलांच्या व आईच्या बरोबर लहानपणी वारकऱ्यांचे संस्कार पंढरीच्या वाऱ्या, दिंड्या, हरिनाम सप्ताह, निरूपणे व प्रवचने यातूनही मला घबाडच मिळाले. राजकीय वाचनामुळे मी नास्तिक बनलो तरी भागवत धर्म पंथाच्या प्रवाहामुळे भाषा वैभव – कल्पना विलासाचा माझ्यावर परिणाम झाला. मी पत्रकार होणार हे स्वप्नातही नव्हते पण पत्रकार होण्यासाठी लागणारी किमान

बैठक अशी तयार झाली.''

अशी बैठक घेवून किती जण संपादक बनले किंवा बनू शकतात हा प्रश्न मला आजही सतावतो.

**प्र.२. सर, आपण 'पत्रकारिता' या क्षेत्राकडे वळू नये असे अण्णांना वाटत होते का ?**

उत्तर – मी पत्रकारिता करु नये, या व्यवसायात येवू नये असे त्यांना का वाटत असावे ? इथे एक दृष्टांत सांगावासा वाटतोय.

*पिता शिकवी पुत्रासी । नको जाऊ बापा हरिकथेसी।*
*तेथे पाचा तोंडाशी विवशी । ते वैष्णवे आणिली आहे।।*
*नको जाऊ बापा तेथे । मागुता न येशी रे येथे ।*
*जे जे पाहू गेले तिथे ते । ते आले नाही मागुते ।।*

संत नामदेवांच्या या अभंगातील पिता, पुत्राला सांगतोय की, बाबा रे काहीही कर पण मी जो व्यवसाय करतोय त्याच्या वाटेला येऊ नकोस. इथे संकटंच संकटं आहेत. अनंतराव माझे संपादकही होते अन् जन्मदातेही. त्यांच्यातील बाप कधी कधी जागा व्हायचाही. अगदी नामदेवांच्या उपदेशाप्रमाणे त्यांनी प्रत्यक्षात मला पत्रकारितेकडे वळू नकोस असं सांगितलं नसलं तरी त्यांची इच्छा मात्र मी पत्रकार बनू नये व विशेषत: त्यांच्याच दैनिकांतील उपसंपादक तर नाहीच अशीच होती. पिता पुत्रातील स्नेहपूर्वक संवादाचे ते दिवस नव्हते. अनंतरावांचा दरारा घरी आणि दारी होताच. नामदेवांच्या वरील दृष्टांताप्रमाणे 'थेटपणा' मात्र त्यांनी मला दाखवला नाही. अप्रत्यक्ष आडवळणाने 'पत्रकारितेच्या हरिकथेचा' नाद मी करू नये हे ते सांगत राहिले. इतकी वर्षे पत्रकारिता करून आणि राज्यातील पत्रकारांचे लढाऊ नेतृत्व करणारे आपलेच पिताजी, दुसऱ्या पिढीने हे व्रत–वसा वा व्यवसाय–करिअर करण्याच्या विरोधात का ? संचिताचा काहीच का फायदा नाही ? असा प्रश्न मला सतवायचा. बहुधा घरातील काटेकोर आर्थिक स्थिती आणि पुढे येऊ घातलेल्या भांडवली नफेखोर धंदेवाईक पत्रकारितेत आपल्यापैकी कोणी असू नये असे त्यांना वाटत असणार. असा समज मी त्यांच्या या काळातील कांही लेखनावरून व औपचारिक बोलण्यावरून बनवला. अर्थात मलाही बंडखोरी करायचीच असल्याने मी काही सनसनाटी लेख लिहून आमच्यातील 'जनरेशन गॅप' वाढवायची संधीही साधली ! मला आठवतं या लेखापासून आम्ही दोघांनी एकमेकांना मनोमन समजून घेतले अन् दोघांमधील 'जनरेशन गॅप' एकमेकांचा आदर ठेवत 'अव्यक्त' बनवला तो अखरेपर्यंत ! अण्णांचा आवडता शायर फैज अहमद फैज याने या स्थितीचे वर्णन

*इक तर्ज–ए–तगाफूल है सो वो उनको मुबारक*
*इक अर्ज–ए–तमन्ना है सो हम करते रहेंगे*

असेच केले असते.

**प्र.३. सर, अग्रलेख लिहिताना अण्णा कुठे व कसे बसायचे ?**

उत्तर – अग्रलेख लेखनाचा मुद्दा निघालाच म्हणून सांगावेसे वाटतेय की, त्यांना एकांतात बसून लिहिणे मान्यच नव्हते. त्यांच्या कार्यालयाच्या खोलीत टेबलावर लोकमान्य टिळक यांचा देखणा आठ इंची अर्धपुतळा टेबलावर असे. त्याला इकडे तिकडे हलवलेले त्यांना अजिबात चालत नसे. 'पुळणीत टेकले माथे श्रांत अधीर दर्यावर होता वाहत मंद समीर' असे कदाचित त्यांना वाटत असावे. पण माणसे भेटायला येताहेत जाताहेत,चर्चा, मस्करी चालू आणि मग तुकड्या तुकड्यात अग्रलेख लेखनसुद्धा, त्यांना डॉ. सुधीर रसाळ, नरेन्द्र चपळगांवकर, वा. ल. कुलकर्णी यांच्या सारख्या मित्रांनी खूप सांगून पाहिले की 'ही पद्धत बदला तुम्ही लिहिण्याची वेळ ठरवून घ्या आणि त्यावेळी कोणाला प्रवेश देऊ नका आत.' पण त्यांनी ते धुडकावून लावले.

**प्र. ४. सर, आपल्या दृष्टीकोनातून अण्णांचे**

**संचित काय आहे ?**

उत्तर – सहकारमंत्री होमी तल्यारखान – सोम्मया शुगर वर्सेस भालेराव–सुराणा या प्रकरणाचा ऊहापोह वर्गात केला तेव्हा या संचिताने रोमांच उभे राहिले. एका प्रादेशिक साप्ताहिकामधील सहकारी साखर कारखान्याच्या भ्रष्टाचारविषयक लेखावरून एका मंत्र्याने बदनामी खटला करणे, तो पडद्याआड चालवण्यासाठी धडपडणे, लेखक म्हणून पन्नालाल सुराणा यांनी आणि संपादक म्हणून अनंतराव यांनी माफीनामा द्यावा अशी सरकारने अपेक्षा ठेवणे, सुशील कवळेकर, मुरलीधर कानडे यांनी उच्च न्यायालयापर्यंत कायदेशीर लढाई करणे, साखर कामगार संघटनेने वृत्तपत्राच्या अभिव्यक्ती हक्कासाठी संप करणे आणि माफीनाम्याऐवजी ६ महिने शिक्षा पत्करणे, आणि पुढे जन्मभर 'मोडेन पण वाकणार नाही' अशी टॅगलाईन संपादकाच्या नावापुढे कोरली जाणे हे ते संचित. इथे मला सर्वेश्वरदयाल सक्सेना यांच्या काही ओळी आठवतात.

*'सब कुछ कह लेने के बाद*
*कुछ ऐसा है जो रह जाता है,*
*तुम उसको मत वाणी देना ।*
*वह छाया है मेरे पावन विश्वासों की,*
*वह पूँजी है मेरे गूँगे अभ्यासों की,*
*वह सारी रचना का क्रम है,*
*वह जीवन का संचित श्रम है,*
*बस उतना ही मैं हूँ,*
*बस उतना ही मेरा आश्रय है,*
*तुम उसको मत वाणी देना ।'*

**प्र.५. सर, अण्णा व पन्नालाल सुराणा यांच्या सुटकेवेळी आपण त्यांना आणायला गेला होता. त्या वेळेसचे नेमके चित्र कसे होते ?**

उत्तर – अगदी नक्की आठवतेय. माझे वडील अनंतराव आणि त्यांचे मित्र पन्नालाल सुराणा ६ महिन्यांची शिक्षा भोगून नाशिकच्या तुरुंगातून सुटणार होते. म्हणून मी, माझी मोठी बहीण सविता एका जीप मध्ये १०–१२ जणांच्या सोबत नाशिकला आलो. जून १९६७ चा काळ. मी आठवीत होतो. सकाळी जेलवर गेलो. नाशिक मधील काही कार्यकर्ते आणि पत्रकार तिथे आले होते. कैदी कसे सुटतात ते आतमध्ये का असतात ? काय करतात ? असे काही प्रश्न निर्माण झाले होते मनात, पण उत्तरे कोणाला विचारायची तेच नव्हते ठाऊक. इकडे तिकडे बघणे चालू होते तेवढ्यात नाशिक मध्यवर्ती कारागृहाचा दरवाजा थोडासा उघडला व अण्णा आणि पन्नालाल वळकट्यासह बाहेर आले. एक लाल टोपी घातलेला उत्साही कार्यकर्ता ओरडला 'वृत्तपत्र स्वातंत्र्य अबाधित राहो. कारावास भोगणाऱ्यांचा विजय असो.' नाशिकहून आम्ही निघालो. तेथून अगदी औरंगाबादपर्यंत प्रत्येक गावाच्या वेशीवर आमच्या जीपला लोक घेरत, वडिलांना ओवाळत हार–तुरे घालत, काही ठिकाणी भाषणे त्यांना करावी लागत. नाशिक ते औरंगाबादपर्यंत हे रात्री आम्ही औरंगाबादला पोहोचेपर्यंत तुफानी पावसात चाललेले मी पाहत होतो. उगाच मलाही क्षणभर तेव्हा वाटले की, आपणही काही तरी तीर मारून आलो की काय. या गडबडीच्या दोन दिवसात माझ्याशी काही वडील बोलल्याचे मला नाही आठवत, पण त्यांच्यासोबत जीप मधून येताना, आमच्या वैजापूर तालुक्यात प्रवेश झाल्यावर प्रत्येक गावात लोक साप्ताहिक मराठवाडा, भालेराव–सुराणा झिंदाबाद, सोमय्या – तल्यारखान मुर्दाबाद, वृत्तपत्र स्वातंत्र्य चिरायू होवो असा जल्लोष करत. त्यावेळीचा हा प्रसंग उमज नसताना सुद्धा पाहिल्याने, अनुभवल्याने लक्षात राहिलाय.

**प्र.६. सर, आपण अण्णांच्या संचिताची परतफेड कशी केली ?**

उत्तर – या संचिताची परतफेड कशी करणार ? हा

प्रश्न मला व्यवसायात आल्यावर डाचत राहिला तो संचिताचे धनी गेल्यावर सुद्धा. पण अचानक एक भडक बातमीमुळे १९९६ मध्ये माझ्यावर शिवसैनिकांनी हल्ला केला, पोलिसांनी मला सरंक्षण देण्याऐवजी कायदा सुव्यवस्थेचा बागुलबुवा उभा करून मलाच अटक केली. माझ्या सुटकेसाठी आणि वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी औरंगाबादेत पद्मभूषण गोविंदभाई श्रॉफ यांनी मोठा मोर्चा काढला. दुसऱ्या दिवशी प्रकरण कोर्टापुढे आले, माफी मागून मोकळे व्हा पुन्हा लिहायला ! असे सल्ले, प्रस्ताव पुढे आले. भाईंनी निरोप दिला मला, ''हर्सूल कारागृहाचा मागचा इतिहास लक्षात ठेवून उद्या कोर्टात या''. मला १९६७ मधील संचित आठवले, मी जामीन नाकारला आणि कारावास पत्करला, पुढे काही दिवसातच सरकारने गुन्हे मागे घेतले आणि बाहेर आलो. ''त्या'' संचिताने मला बळ दिले. संचित हे असे काही न सांगता दिशादर्शक ठरते.

**प्र. ७. संपादक म्हणून त्यांना कधी या गोष्टीचा फायदा झाला का ?**

उत्तर – मराठवाडा नियतकालिक १९३८ मध्ये हैदराबादेतून निघू लागले तेव्हा आनंदकृष्ण वाघमारे हे त्याचे मालक आणि संपादक होते. स्वामी रामानंद तीर्थ आणि गोविंदभाई श्रॉफ यांच्या नेतृत्वाखाली निझाम आणि त्यांच्या रझाकार संघटनेविरुद्ध प्रामुख्याने आणि भारतीय स्वातंत्र्य आंदोलन हैदराबाद संस्थानात रुजविण्यासाठी या नियतालिकाचा वापर करता येईल हा त्यावेळचा दृष्टीकोन होता. पुढे एका बाजूला पत्रकारिता आणि एका बाजूला प्रत्यक्ष कृती करण्याची संधी अनंतराव यांना मिळाली. संस्थानातील रझाकारी अधिक स्पष्ट सांगायचे तर मजलिस ए इत्तेहादूल मुसलमीन यांचे अत्याचारी राजकारण संपवायचे असेल तर स्टेट काँग्रेसला गरज पडली तर सशस्त्र लढा द्यावा लागेल आणि त्याची अनुमती त्यांनी त्यांच्या गांधीवादी नेतृत्वाकडून घेतली होती. २९ जानेवारी १९४८ ला अनंतराव आणि त्यांच्या ६ साथीदारांनी नांदेड जिल्ह्यातील उमरी येथील स्टेट बँक ऑफ हैदराबाद ही शस्त्राच्या धाकावर लुटली आणि हे सारे पैसे पुसद येथील तेव्हाचे स्वातंत्र्यसैनिक मुखरे यांच्या हवाली केले होते. पुढे या पैशाचे रीतसर ऑडीट झाले केन्द्र सरकारने हे हिशोब मान्य केले. यातील काही पैशांचे मुंबईत जावून शस्त्र खरेदी करण्याची जबाबदारी त्यावेळी अनंतराव, रघुनाथ रांजणीकर यांच्यावर होती आणि ते मुंबईत जाताना स्वामी रामानंद तीर्थ, श्रॉफ यांनी या दोघांना स्पष्ट सांगितले होते की, मुंबईत मोरारजी देसाई यांचे सरकार आहे आणि पकडल्या गेल्यास ते अधिक शिक्षा तुम्हाला कशी होईल आणि आंदोलन बदनाम करण्याची संधी सोडणार नाहीत हे लक्षात ठेवा. आणि नेमके या शस्त्र खरेदीत अण्णा पकडल्या गेले. २ महिने त्यांना जेलमध्ये डांबण्यात आले होते. पोलिसांची अंतर्गत सहानुभूती असल्याने त्यांनी ही केस फार ताणली नाही आणि ते सुटल्यावर त्यांना 'मुद्देमालासह' हैदराबादच्या दिशेने रवाना केले. अशी सहानुभूती या स्वातंत्र्यसैनिक संपादकास अनेक प्रसंगात लाभली.

**प्र.८. सर, अण्णा तर समाजवादी मग त्यांचा मित्रपरिवारही तसा होता का ?**

उत्तर – अनंतराव समाजवादी (तेव्हा हा पंथ इतका हास्यास्पद नव्हता झालेला.) गांधी – लोहिया हे त्यांचा आदर्श, पण सर्व पक्षात यांचा मित्रपरिवार. शेकापचे उद्धवराव पाटील, अण्णासाहेब गव्हाणे, धोंडगे, रिपब्लिकनचे गवई, तुळशीदास कांबळे, काँग्रेसचे यशवंतरावपासून विलासराव पर्यंत, पी. व्ही. नरसिंहराव, मोहन धारिया कम्युनिस्टचे बी. टी. आर. डांगे, सी. डी. चौधरी, व्ही. डी.देशपांडे भाजपाचे लालकृष्ण अडवाणी, नानाजी देशमुख, प्रमोद महाजन, गोपीनाथ मुंडे, प्रजा समाजवादीचे नानासाहेब गोरे,

मधु दंडवते, नाथ पै, समाजवादी तर सारेच, राष्ट्रवादीचे शरदराव पासून ना. धो. महानोरपर्यंत सर्वांची मांदियाळी ते जमवत. जॉर्ज, मधु लिमये, मृणालताई, निहाल, हे तर घरचेच. यामध्ये बिगर राजकीय नेते म्हणून शेतकरी नेते शरद जोशी, मुस्लिम सत्यशोधकचे हमीद दलवाई, नरहर कुरुदंकर यांच्या समवेतची त्यांची मैत्री विशेषच होती. शेतकरी संघटनेने मराठवाड्यात जो प्रवेश केला तो अनंतराव यांच्या घरात चांगला आठवडाभर मुक्काम ठोकून. संघटनेची मुलुख मैदान तोफ माधवराव खंडेराव मोरे यांचेशी तर त्यांचे सूर जुळले. कोरडवाहू आणि दुष्काळी शेतकऱ्यांना तुम्हीच न्याय देवू शकता असे जेव्हा अनंतराव या मंडळींना सांगत तेव्हा पक्षीय राजकारणाच्या मर्यादाच ते स्पष्ट करत. शेतकरी संघटनेचे हे नेते माणूसकार श्री. ग. मा. मुळे आले आणि घरचेच झाले. आज कोणते असे एखादे संपादक चळवळीतील मंडळींना दुसऱ्या संपादकाच्या सांगण्यावरून आपली ओसरी देतील ? पत्रकारिता वेगळी आणि लोकांचे प्रश्न सोडवण्याची चळवळ वेगळी, त्यात स्वत:चे अभिनिवेश नाही आणले कधी. पूर्वीचा जनसंघ किवा भाजपाचे वैचारिक वैर असूनही प्रमोद महाजन, गोपीनाथराव मुंढे, जयसिंह गायकवाड या तरुण नेतृत्वावर त्यांचा भरवसा होता. आज कोणाला खरे वाटणार नाही पण आणीबाणीत सुरुवातीस भूमिगत कसे लढता येईल या बद्दल अनंतराव यांच्या बरोबर या दोघांची झालेली आणि २ ऑक्टो. १९७५ ला निर्भय बनो विद्यार्थ्यांना घेवून कसा साजरा करता येईल याची आखणी त्यांनी केल्याचे आठवते. कोणताच सामाजिक, राजकीय विचार मांडणारे आपल्याला अस्पृश्य नाहीत असे ते म्हणायचे. म्हणूनच सरसंघचालक देवरस यांचेशी त्यांनी घरी बोलावून चर्चा केली होती. आणि या विषयी त्यांना फार अप्रूप नसे. 'लोक गांधीना विसरले आपण किस झाड की पत्ती' असे ते नेहमी म्हणत.

सांगायचा मुद्दा असा की, मैत्री आणि राजकीय वैर हे त्यांना वेगळे ठेवता आले. आणि वेळप्रसंगी आपल्याच मित्रांविषयी त्यांनी कडक शब्द अग्रलेखातून वापरले. प्रजा समाजवादी पक्ष सोडून अशोक मेहता काँग्रेसवासी झाले आणि त्यांनी समाजवादी मित्रांना अपील केले की तुम्हीही या काँग्रेसमध्ये. ५०० प्रजासमाजवादी दाखल होणार असे मेहता यांनी जाहीर केले होते. यावर अनंतराव यांनी लिहिले की, सत्ताधारी पक्षात गेलो म्हणजे आपले घोडे गंगेत न्हाहणार. दिल्लीच्या दिशेने उधळलेले हे ५०० घोडे पुढे गंगेत जाऊन न्हाले तर गंगेचीच फजिती होईल 'तेव्हा गंगे, तुलाच इशारा सावधान घोडे येत आहेत.'

**प्र. ९. सर, आणीबाणीच्या काळात अण्णांची मन:स्थिती कशी होती ?**

उत्तर – १९७५ मधील आणीबाणीने ते फार अस्वस्थ होते. त्याची दोन कारणे. एक तर पत्रकार म्हणून ते स्वत: १९७४ ला बिहार–गुजरातचे नवनिर्माण आंदोलन जाणून घ्यायला गेले होते. पाटण्याच्या एका सभेत जयप्रकाश यांनी त्यांची आणि मराठवाडा पेपरची ओळख करून दिली होती आणि सांगितले होते 'यह आंदोलन अब मराठवाडा में जा पहुँचेगा.' मराठवाडा दिवाळी अंक त्यांनी त्याचवर्षी काढला. त्याचा परिणाम काय ते माहीत नाही पण, एप्रिल १९७५ ला मराठवाड्यात विद्यार्थ्यांचे फार मोठे विकास आंदोलन उभे राहिले. आणीबाणीत आपल्याला अभिव्यक्त होता येणार नाही याने ते फार चिंतेत होते. २६ जून ते १ जुलै १९७५ या काळात त्यांनी अग्रलेखाची जागा मोकळी ठेवून, काळी ठेऊन किंवा सेन्सॉरने कापलेल्या ओळी तशाच ठेऊन अंक काढले. सेन्सॉरचा माणूस कार्यालयात येऊन बसणे, त्याने आपला अग्रलेख तपासणे, छपाई झाल्यानंतर सेन्सॉरने शिक्का एका अंकावर मारल्यावर अंक पार्सल बाहेर रवाना होणे हे त्यांनी मनाला लावून घेतले. त्यातच मित्र शंकरराव चव्हाण यांनी विरोधकांना

गोळ्या घालण्याची भाषा केली. दैनिकाचे अंक जप्त झाले तेव्हा त्यांनी उघडपणे दैनिकातील आपले सहकारी गोपाळ साक्रीकर, निळू दामले, अरविंद वैद्य यांना सांगितले की, आता मला सहन होत नाही, निझामाला आम्ही जुमानले नाही. त्याच्याशी लढलो, आजची स्थिती अधिक वाईट आहे तेव्हा मी आता चाललोय, तुम्ही चालवा पेपर हा वसा तुम्हाला देतोय' असे म्हणत ते जेलवासी झाले.

**प्र.१०. सर, अण्णांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मुलाखत घेतली होती. त्याविषयी आपण काय सांगाल ?**

उत्तर – १९४६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर हैदराबादला आले होते. त्यावेळी मराठवाडा नियतकालिकासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची एक मुलाखत ''संस्थान जबाबदार राज्यपद्धती आणि भाषावार रचना'' यावर हवी होती. पत्रकारितेत ते तसे नवखे होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मुलाखत दिली अगदी आणि काटेकोरपणे सांगितले 'छपाईपूर्वी दाखवा' दुसऱ्या दिवशी हैदराबाद हाऊसवर जाऊन अनंतराव यांनी मुलाखतीचे हस्तलिखित दाखवले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ते तपासले आणि म्हणाले 'अरे वाह ! अगदी पाहिजे तशी बिनचूक उतरलीय, मला अपेक्षा नव्हती'. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व भारावून टाकणारे आणि बुद्धिमत्तेचे क्षितीज चेहऱ्यावर दिसणारेच होते. कालांतराने हैदराबाद संस्थान विषयक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे काही मुद्दे स्वातंत्र्यसैनिकांना पटले नाहीत. १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराची घोषणा केली. आणि हिंदू धर्मातील प्रथा, चालीरीती यांच्यावर टीका केली तेव्हा अनंतराव यांनी १८ ऑक्टो. १९५६ ला अग्रलेखातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हिंदू धर्म चिकित्सेचे समर्थन केले आणि त्याचवेळी धर्म बदलला तरी रात्रीतून मागासलेपण जाणार नाही त्यामुळे दलितांच्या सवलती सरकारने चालूच ठेवल्या पाहिजेत अशी मागणीही केलीच. घरची स्थिती नसताना सुद्धा काही विद्यार्थी तेव्हा वाराने आमच्या घरी जेवायला असत. त्यात दलित विद्यार्थी जाणीवपूर्वक असत. एवढेच नाहीतर माझी आई एकत्र कुटुंबाच्या महालक्ष्म्या जेवायच्या दिवशी हमीद दलवाई आणि नरहर कुरुंदकर आले होते. अगदी महालक्ष्म्यासमोर जेवायला बसून ते माझ्या आईला म्हणाले ''वहिनी आमचे जाऊ द्या पण तुमचे आता काही खरे नाही बघा.''

**प्र. ११. सर, अण्णांना 'मायस्थेनिया ग्रेवीस' या व्याधीने ग्रासल्यानंतर त्यांचा जीवनक्रम कसा राहिला ?**

उत्तर– १९८४ नंतर त्यांना 'मायस्थेनिया ग्रेवीस' या फारशा ज्ञात नसलेल्या व्याधीने त्रस्त केले. तेव्हा दोन्ही डोळ्यांच्या पापण्या सारख्या पडायच्या. त्यावेळी चक्क सेलो टेप पापण्यांना लावून ते वर उचलायचे आणि डाव्या पायाला मुडपून तो उजव्या मांडीवर घेऊन त्यावर ते लाकडी पॅड ठेवून लिहायचे. 'मांदियाळी' हा संग्रह आणि नेहमीचे त्यांचे कावड सदर याच पद्धतीने त्यांनी पूर्ण केले. त्यांच्या व्याधित नर्व्ह यंत्रणेला इतरांचा संसर्ग होवू शकतो हे डॉक्टरांचे इशारे त्यांनी हाणून पाडले होते. पुढे हाच रोग अमिताभ बच्चनला झाल्याचे जाहीर होताच ते ज्याला त्याला अभिमानाने सांगायचे अमिताभला झालाय तोच रोग आपल्याला झालाय. त्यांनी लोकांमध्ये मिसळून जावू नये असे सर्वांना वाटे. दुपारी आईने तिच्या परीने पहारा द्यायला सुरुवात केली खरी. पण अनंतराव यांनी त्यावर नामी शक्कल लढवली. माझी मुलगी सानिया तेव्हा ४ वर्षांची होती. तिला ते बोलवायचे आणि म्हणायचे तुझे भू भू घेवून ये (पोमेलीयन कुत्रा नाव जानू) यांच्या पायाशी आणि नात सानू टेबलावर बसले की मग यांचे लेखन सुरु व्हायचे. अशी मुलखावेगळी यांची तऱ्हा होती. जाड खादीचे धोतर, तसाच जाड खादीचा पांढरा सदरा, तोंडावर

देवीचे काही व्रण. रापलेला चेहरा, असेच ते. दि. बा. मोकाशींनी 'अठरा लक्ष पावले' मध्ये शाळा मास्तर असे त्यांचे वर्णन केलेय. पुढे दूरदर्शनवर यावर एक मालिका आली ती सुरु झाली की, आमच्या घरचा टी.व्ही. ते बंद करायचे. स्पायडरमॅन ही ॲनिमेटेड मालिका नातीसोबत पाहण्यात ते रमून जात. आणि 'हमलोग', 'रामायण' सर्वांसोबत पाहण्यात ते रंगून जात. मात्र निहलानी ची 'तमस' सारखी मालिका सुरु झाली की ते अस्वस्थ होत. हिंदू–मुस्लिम तणाव, फाळणी, पोलीस ॲक्शन त्यांना आठवे. 'तमस' ने त्या काळात वादळ निर्माण केले होते. तेव्हा ते म्हणायचे 'जखमा ओल्या आहेत, भरलेल्या नाहीत, खपली काढली की भळभळणारच!'

**प्र.१२. सर, अण्णांच्या मित्रद्वयीविषयी आम्हाला सांगाल का ?**

उत्तर– नरहर कुरुंदकर आणि गोविंद तळवळकर हे अनंतराव यांचे विक पॉईंट. ते दोघांविषयी फार हळवे होते. गोविंदराव यांचे अनेकदा त्यांना फोन येत असत. राजकीय चर्चा होत असे. गोविंदराव यांना मराठवाड्यातील बारीक सारीक तपशील अनंतराव सांगत असत. गोविंदराव यांचे मोठेपण असे की, म. टा. सारख्या मानाच्या वृत्तपत्रात अनंतराव यांचे अग्रलेख मराठवाड्याच्या सौजन्याने त्यांनी अनेकदा पुनर्मुद्रित केले. आपल्या हयातीत त्यांनी 'अनंतराव प्रतिष्ठान' स्थापन केले. त्याचा पहिला पुरस्कार गोविंदराव यांनाच देण्यात आला, पण तेव्हा अनंतराव नव्हते. नरहर कुरुंदकर यांचेशी तर त्यांचे द्वैतच होते. एखाद्या मुद्द्याला कुरुंदकर यांनी हात घातला की ते त्याच्या पार चिंधड्या उडवत. ''अनंतराव तुमच्याशी मी वाकडे बोलतोय त्याचे कारण तुम्ही महान संपादक ना, असे म्हणत!'' ते खेटाखेटी करत. नांदेडहून ते रेल्वेने येत आणि हातात बाबुराव अर्नाळकर यांची रहस्यकथा असे. कुरुंदकरांचे वैशिष्ट्य म्हणजे ते आधी अनंतराव आणि सुशीलाबाई यांना चरणस्पर्श करीत आणि मग वादविवाद. अनंतराव मग त्यांची खेचत ते अरे–तुरे करत काय मग नरहर, ''आज तुझा कालापहाड रिचर्डसनची सौंदर्यमीमांसा करत आलास की काय गाडीत ?'' ते सुद्धा म्हणत, ''अहो एक दिवस कालापहाड तुमचे अग्रलेख लिहिणार संपादक. विलक्षण मैत्र होते दोघात. कुरुंदकर यांचा मृत्यू रंगमंचावर झाला तेव्हा मंचावर अनंतराव होते आणि विशेष म्हणजे दुपारी ४ वाजता आमच्या घरी पित्त वाढलेय म्हणून सोडा पिऊन ते कार्यक्रमाला निघाले. ते पित्त नव्हते तर हार्टअटॅक होता हे आपल्याला कसे कळाले नाही याची खंत अनंतराव यांना वाटत होती.

**प्र. १३. सर, अण्णांनंतर 'दै. मराठवाड्याचे' काय झाले ?**

उत्तर – २६ ऑक्टो. हा अनंतराव यांचा मृत्यूदिन. शेवटचे वर्ष त्यांना पाकिस्तान आणि जिन्हा या विषयाने झपाटले होते. त्याच्या नोंदी त्यांनी सुरु केला होत्या. मराठवाडा दैनिकातून ते रीतसर १९८६ ला निवृत्त झालो होते. मानद संपादक म्हणून नाव छापण्यास त्यांनी तशी अनिच्छेनेच परवानगी दिली होती. हा पेपर टिकावा, लोकांचे संसार त्यावर अवलंबून आहेत या पोटी त्यांनी त्याच्या पुनरुजीवनासाठी खूप प्रयत्न केले. सकाळने तो चालवायला घ्यावा असे प्रयत्न त्यांनी १९८९ मध्ये केला पण, विश्वस्त मंडळातील समाजवादी मित्रांनी तसे होऊ दिले नाही. अनंतराव यांच्या पाठोपाठ हा पेपर सुद्धा काळाच्या पडद्याआड गेला. हे वर्ष अनंतराव यांचे जन्मशताब्दी वर्ष आहे. या निमित्ताने या साऱ्या संचिताची आठवण होतेय.

सर, आपण वेळात वेळ काढून ही मुलाखत दिल्याबद्दल आपले खूप खूप आभार.

धन्यवाद !

# मुलाखत : प्रा. प्रकाश कामतीकर

*''प्रेरणा वृत्तपत्रकारिता विशेषांकाच्या तसेच कै. अनंतराव भालेराव यांच्या शताब्दी वर्ष पूर्ती निमित्ताने अण्णांचा सहवास व मार्गदर्शन लाभलेले साहित्यिक, लेखक, पत्रकार, चित्रकार इत्यादी बहुआयामत्व प्राप्त असणारे श्री. प्रकाश कामतीकर यांची मुलाखत...''*

मुलाखत दाता : **प्रा. प्रकाश कामतीकर**

मुलाखतकार :

**१) अयोध्या विनायकराव जोगदंड**

(बी.कॉम. तृतीय वर्ष)

**२) निकिता अच्युतराव डंबाळे**

(बी.कॉम. प्रथम वर्ष)

**प्र.१. ला सर, आपली आणि अण्णांची पहिली भेट कधी आणि कुठे झाली ?**

उत्तर – नूतन विद्यालय शिक्षण संस्थेच्या नूतन महाविद्यालयात मी ३३ वर्षे प्राध्यापक म्हणून कार्य केले. याच शिक्षण संस्थेचा आणि अनंतराव भालेराव यांचा संस्थेशी आणि गावाशी अगदी निकटचा ऋणानुबंध. त्यांचा व माझा ऋणानुबंध अनेक पदरी साधारण १९६१–६२ पासूनचा. त्यावेळेस मी वयात येऊ घातलेला एक पोरसवदा कॉलेज तरुण. पण धडपड्या, महत्त्वाकांक्षी व काहीतरी करुन दाखवण्याची जिद्द बाळगणारा. कला व साहित्याचा चाहता, सामाजिक व सांस्कृतिक कामाची ओढ असणारा असा. विशीच्या आतले अडचणीचे वय. मला आठवते जालना येथे शिक्षण घेत असताना साहित्याच्या आवडीमुळे व सांस्कृतिक कार्याच्या ओढीमुळे गुरुवर्य शिवाजी गऊळर यांचेशी स्नेहाचे व कौटुंबिक सौहार्दाचे नाते जुळले होते. त्यांनीच माझी व अनंतराव भालेराव (उर्फ अण्णा, सारे त्यांना अण्णाच म्हणत.) यांची ओळख करुन दिली.

ही भेट साधारणतः १९६३ च्या ऑगस्ट महिन्यात जालना येथे राधाकृष्ण जैस्वाल यांचे घरी झाली होती. अण्णांनी त्यांच्या चिरपरिचित शैलीत माझी समग्र चौकशी केली. तूर्तास काय करतो वगैरे विचारले. मी. बी. कॉमच्या अंतिम वर्षाला जालना येथील जे. ई. एस. महाविद्यालयात शिकत होतो. सेलू महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. द. रा. कुलकर्णी हे देखील याच महाविद्यालयात उपप्राचार्य होते. त्यांचा, गऊळकरांचा व अण्णांचा कौटुंबिक नातेसंबंध होता. या सगळ्यांशी पोरसवदा माझा स्नेहबंध जुळून आला.

**प्र. २रा. आपल्या लेखनाची नेमकी सुरुवात कशी झाली ? यामागे प्रेरणा कोणाची ?**

उत्तर – मुळातच लिहिणे हा माझा स्वभाव, पण प्रेरणा ही अण्णांचीच म्हणावी लागेल. कारण त्या भेटीत अण्णा म्हणाले, ''मराठवाडा'' या द्वि–साप्ताहिकाला बातम्या पाठवत चला. मी फक्त 'हो' म्हणालो व दुसरे दिवशीपासून माझ्या मगदुराप्रमाणे बातमीपत्र पाठवावयास सुरुवात केली. आपण लिहिलेले काही छापल्या जाते याचेच अप्रूप होते.

त्या काळात जालन्यात सांस्कृतिक, वैचारिक व सामाजिक कार्य करणारी 'स्नेह विकास मंडळ'

ही संस्था 'बहि:शाल व्याख्यानमाला' अशा विविध संस्थांच्या कार्यक्रमांचा व्यवस्थित वृत्तांत मी 'मराठवाडा'साठी पाठवित होतो. काही घटना, राजकीय व सामाजिक बातम्या या सर्वांचा परिपाक म्हणजे माझा लेखनविस्तार वाढत गेला.

'मराठवाडा' हे केवळ बातमीपत्र छापणारं वृत्तपत्र नव्हतं तर, ते लोकशिक्षण करणारं 'मतपत्र' होतं. शिवाय साहित्य व कला यावरच्या बातम्यांना भरपूर स्थान मिळे. त्यामुळेही माझा उत्साह टिकून राहिला. मराठवाडाचे सांस्कृतिक जीवन संपन्न व्हावे ही त्या मागची अण्णांची भूमिका होती.

माझा पहिला वैचारिक लेख 'तालुका क्रीडा महोत्सव आवश्यक आहेत काय ?' या शीर्षकाचा अनेक टाईपमध्ये हेडींग व उपहेडींग देऊन लेखक म्हणून माझ्या नावानिशी छापला गेला (७ नोव्हे. १९६५) त्यावेळेसचा माझा आनंद नुसता निरागस नव्हता तर निर्विवाद होता.

पुढे ६.४.६७ व ९.४.६७ या 'मराठवाडा' च्या दोन अंकातून 'भारतातील आजचे तरुण' हे लेख प्रकाशित झाले. (त्यावेळेस मराठवाडा हे द्वि-साप्ताहिक होते.) क्रमाने अण्णांशी जवळीक वाढत गेली. विचारविनिमय करण्याइतपत धारिष्ट्य आले. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा दरारा तर होताच पण ममत्वाची सावलीही पाठराखण करीत होती. पुढे साहित्यात मी लेखणी चालवयाला सुरुवात केली. १७ जानेवारी १९६५ ला माझा पाहिला ललित लेख 'महाराष्ट्र टाईम्स'च्या रविवार पुरवणीत सुंदर चित्र व सुंदर ले-आऊटसह प्रकाशित झाला.

अण्णांचे अभिनंदनाचे व आशीर्वादाचे पत्र आले शिवाय प्रेमळ धमकीही. 'मराठवाडा' कडेही लक्ष देत जा ! मूठभर मांस अंगावर आले. 'मराठवाडा' १९६६ च्या दिवाळी अंकात 'वैताग' नावाची कथा छापल्या गेली. तेव्हापासून दरवर्षी दिवाळी अंकात कथा व पुढे कविताही असायच्या.

**प्र. ३रा. आपण लेखनापर्यंतच मर्यादित होता का ? किंवा आपल्या लेखनप्रतिभेचे आपणास काय फळ मिळाले ?**

उत्तर – माझ्या लेखन प्रवासातील भन्नाट गती पाहून अण्णांनी मला 'मराठवाडा साहित्य परिषदेवर' कॉप्ट मेंबर म्हणून घेतले व लगोलगच 'प्रतिष्ठान'च्या संपादक मंडळात समावेश केला. त्या काळात 'प्रतिष्ठान'साठी डॉ. सुधीर रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने मी खूप परिश्रम घेतले. 'प्रतिष्ठान'चे अंतर्बाह्य स्वरुप बदलून टाकले. मुखपृष्ठापासून सजावट व मांडणी यात विविध प्रयोग केले.

या सगळ्या गोष्टींवर अण्णांची नजर होतीच. 'मराठवाडा साहित्य परिषदेवर' त्यांचे अतोनात प्रेम होते. स्वत: परंपरावादी विचारसरणीचे असूनही नव्याचे आणि नावीन्याचे त्यांना आकर्षण होते. नव साहित्य, नव चित्रकला, नवनाट्य या सगळ्या नव कलांचा तो उदयकाल होता. आम्ही मंडळी मी, भाऊ समर्थ, भ. मा. परसवाळे, धर्मराज भोईर, मुरली लाहोटी इ. नी नवचित्रकलेत धुमाकूळ घातला होता. अगदी सत्यकथा, समाज प्रबोधन पत्रिका, युगवाणी पासून अनेक व्यावसायिक मासिकातून व मुखपृष्ठावर आमची नावं झळकत होती. अण्णांना या सगळ्या गोष्टींचं अप्रूप होतं. अण्णांमुळे मी लेखनापर्यंत मर्यादित राहिलो नाही आणि त्यांनी माझ्या विविधांगी प्रतिभेची सर्व फळे मला प्राप्त करवून दिली.

**प्र.४था. 'मराठवाडा' दिवाळी अंकासोबत आपण कसे जोडल्या गेलात ? पुढे दिवाळीचा प्रकाश पसरत राहिला का ?**

उत्तर– हा... हा... हा... (हसून) हा माझ्या जीवनातील

अविस्मरणीय प्रसंग म्हणावा लागेल. तो प्रसंग असा मी ६ जुलै १९७० रोजी नूतन महाविद्यालयात मराठीचा प्राध्यापक म्हणून रुजू झालो होतो. त्याच वेळेस सेलूस 'महाराष्ट्र राज्याची समता परिषद' होती. समाजवादी विचारांच्या सगळ्या प्रभृती सेलूत जमा झाल्या होत्या. अण्णाही होते. दिवसभराच्या कार्यक्रमात भेटीगाठी होत होत्याच. अण्णा म्हणाले, ''अरे तुझे लग्न झाले आहे ना ! मग बायको केव्हा दाखविणार ? (माझा विवाह २१ मे १९७० रोजी झाला होता) आम्ही सगळे येणार आहोत तुझ्याकडे!'' माझी पंचाईत झाली. मी म्हणालो, ''अहो ती इथे नसते. ती जालन्यात असते. (माझे वडील तिला पाठवावयास तयार नव्हते, कारण मी नोकरी करावी हे त्यांच्या सकट कोणत्याच कुटुंबियांना मान्य नव्हते)'' अण्णा म्हणाले, ''जालना फार दूर नाही. घेऊन ये तिला. आम्ही येणार म्हणजे येणार. काही पाहुणचार करु नकोस, निदान एक कप चहा पाजशील !''

मी निरुत्तर, रातोरात जाऊन बायकोस घेऊन आलो, ती येण्यास तयारच नव्हती. (कुटुंबातही विरोध होता) कशीबशी समजूत घातली. दोन – एक दिवसांनी परत आणून सोडतो असे सांगितले. संसाराची सुरूवात झालेली नव्हतीच. घरात काहीच सामान–सुमान नव्हते. झोपायचा पलंग, एक सतरंजी, एक पत्र्याची खूर्ची, दोन – चार भांडी एवढंच, मी बाहेरच लॉजवर जेवत होतो. शनिवारी सायंकाळी जालन्यास जाऊन सोमवारी सकाळीच परत सेलूस येत होतो. अखेर परीक्षा घेणारा दिवस उजाडला. त्यावेळेस मी सहकारवाडीत नाईक यांच्या घरात राहत होतो. एक महिनाही झाला नव्हता बाकीची सगळीच प्राध्यापक मंडळी आजूबाजूला शेजारी – पाजारी राहात होती. सगळ्या वहिनीबाईंच्या घरातून चार –चार कप – बशा, थोड्या प्लेट, कुठून सतरंजी, कुठून भांडी असा ऐवज जमा केला. दोन – तीन वहिनीबाई मदतीला बोलावल्या. सामान बाजारातून आणून ठेवले होते. बरोबर रात्रौ आठच्या सुमारास मंडळी आली. आगत – स्वागत, चेष्टा – मस्करी, हास्य कल्लोळ. बसण्यापासून दाटीवाटी, मी तर पुरता भांबावलेला. बायको लज्जेने धूई– मुई. असा अजब माहोल तयार झाला होता. चहा – पोहे झाले. थट्टा – चेष्टा झाल्या. मग टूम निघाली 'आधुनिक चित्रकला म्हणजे काय ?' वाकड्या – तिकड्या रेघोट्या' असा बराच वाद सुरु झाला. सगळे विरोधी पक्षातले व बाजू लढविणारा मी एकटा. आपल्या परीने शर्थ करीत होतो. मग अण्णा म्हणाले, ''तुझी चित्रं दाखव.'' माझा पसारा होताच तिथे. मग एक– एक चित्र त्यावर मल्लीनाथी उलट – सुलट चर्चा असे रात्रीचे बारा वाजले. मनसोक्त गप्पा झाल्या. बायको कुठेतरी शेजारी जाऊन बसली होती. बहुधा भोसकर वहिनीकडे. शेवटी निरोप घेता घेता अण्णा म्हणाले, ''तुझे एक आधुनिक चित्र घेऊन ये औरंगाबादी'' चित्राचा तपशील व रसग्रहणासहित. या वर्षीच्या दिवाळी अंकाच्या मुखपृष्ठावर छापू या. एक नवीन प्रयोग आणि १९७० च्या ''मराठवाडा'' दिवाळी अंकाचे मुखपृष्ठावर माझे चित्र छापल्या गेले. शीर्षक होतं 'काळा सूर्य' (Black Sun). अशाप्रकारे मी दिवाळी अंकाशी जोडल्या गेलो.

पुढे 'मराठवाडा' दिवाळी अंकातून 'प्रयोग पर्व' सुरू झाले. १९७१ ते १९८२ या दहा – अकरा वर्षाच्या कालखंडात आम्हाला 'मराठवाडा' दिवाळी अकांचा प्लॅटफॉर्म मोकळा होता. अर्थात मर्यादा होती फक्त सजावट, मांडणी यापुरती.

मी आणि भ. मा. परसवाळे, कधी – कधी धर्मराज भोईर असे त्रिकूट दिवाळी अंकाच्या कामासाठी औरंगाबाद येथे जमायचो. साहित्य जमा झाले की

अण्णा मला पत्र टाकायचे किंवा कॉलेजमध्ये फोन करायचे. ''दिवाळी अंकाच्या कामासाठी व चर्चेसाठी औरंगाबादी या'' असे. औरंगाबादी सुरुवातीला आम्ही लॉजमध्येच उतरायचो. दिवसभर दिवाळी अंकातील साहित्याचे वाचन, त्यावर चर्चा व त्याला अनुकूल असे अमूर्त चित्रांकन (रेखाटन) शीर्षकाचे केटरींग, मुखपृष्ठापासून प्रत्येक पानाचे सेटींग व मांडणी याची 'डमी प्रत' तयार करणे असा उपद्व्याप आठ – एक दिवसात करुन मी सेलू मुक्कामी परत यायचो. (कारण नोकरीचा जू मानगुटीवर होता ना!) अशाप्रकारे पुढच्या कालावधीतही दिवाळीच्या माध्यमातून निरंतर प्रकाश पसरत राहिला.

**प्र.५वा. आपल्या जीवनात 'जयहिंद प्रिंटींग प्रेसचे' एक वेगळे स्थान आहे ते कसे ?**

उत्तर– होय, निश्चितच वेगळे स्थान आहे. त्यावेळेस जगन्नाथराव बर्दापूरकर हे 'जयहिंद प्रिंटींग प्रेस'चे संचालक, ते मला म्हणायचे, ''प्रत्येक गोष्टीची 'डमी' प्रत करुन देणारा तू एकमेव. एकदा 'डमी' प्रत हाताशी असली का मग फार काही सूचना, विचारणा कराव्या लागत नाहीत व कामाच्या गतीतही खंड पडत नाही.''

माझा कथासंग्रह 'प्रतिष्ठान' चे अंक, 'मराठवाडा'चे दिवाळी अंक, आमच्या महाविद्यालयाचा वार्षिकांक 'प्रेरणा' व इतर सटर – फटर कामं सगळे जयहिंद प्रिंटींग प्रेसमध्येच व्हायचे, आणि ज्या ज्या कामाशी मी संबंधित होतो, त्याची डमी प्रत सोबत असायची सूचनांसहित. मोकळी जागा, टाईप, त्याचे वळण वगैरे मांडणी करताना मजा यायची. आमच्या शिक्षण संस्थेचे अध्वर्यू व चिटणीस श्री. श्रीरामजी भांगडिया यांच्या 'अमृत महोत्सवा' निमित्त मी संपादित केलेला 'श्रेयांकित' हा गौरवग्रंथ व सेलूचे भूषण, अण्णांचे परमस्नेही नि नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे पहिले चिटणीस श्री. विनायकराव चारठाणकर यांच्या नागरी सत्कारानिमित्त संपादित केलेल्या 'स्नेहांकित' या गौरवग्रंथाची छपाई जयहिंद प्रेसमध्येच झालेली होती. 'श्रेयांकित' या ग्रंथास त्यावर्षीचे उत्कृष्ट मुद्रणाचे पारितोषिकही मिळाले होते. 'प्रतिष्ठान' या मासिकालाही तीनदा उत्कृष्ट मुद्रण व संपादनाची पारितोषिकं मिळाली. तसेच 'मराठवाडा' दिवाळी अंकाचाही तीनदा उत्कृष्ट दिवाळी अंक म्हणून गौरव झाला. या सर्वांच्या मागे माझा अप्रत्यक्ष हात होता. त्याचबरोबर जयहिंद प्रिंटींग प्रेसचाही फार मोठा वाटा यामध्ये आहे. याचा आनंद मी आजही मनात जपून आहे.

**प्र.६वा. आपण नूतन विद्यालय शिक्षण संस्थेत निवृत्तीपर्यंत प्रदीर्घ कालावधी व्यतित केला. या संस्थोविषयीचा पूर्वेतिहास सांगावा ?**

उत्तर– स्वातंत्र्यपूर्व काळात व निजामशाहीच्या जोखडात असणाऱ्या या मागास भूभागाला स्वप्न दाखवून, निजामाच्या विरुद्ध चळवळीचा एक भाग म्हणून त्या काळी ठिकठिकाणी राष्ट्रीय शाळा काढण्याची गरज पडू लागली. सेलू अशा चळवळीचं एक प्रमुख केंद्र होतं. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली अशा चळवळी चालू होत्या. त्यांच्या आदेशानेच १९३९ साली अनंतराव भालेराव, मनोहर सोनदे, राजाराम कोकीळ, सेलूस आले व येथे गरुड गुरुजी, लक्ष्मणराव कुलकर्णी व विनायकराव चारठाणकर यांनी चालविलेल्या प्राथमिक विद्यालयाचे 'नूतन विद्यालय शिक्षण संस्था' या राष्ट्रीय शाळेत रुपांतर केले. या शाळेचे अण्णा पाच वर्षे मुख्याध्यापक होते. पुढे १९४४ साली ते औरंगाबादी पूर्णवेळ कार्यकर्ता म्हणून गेले. निजामाविरुद्धच्या चळवळीमध्ये या संस्थेने अतिशय मोलाची कामगिरी बजावली. यामागील प्रेरणा अण्णाच होते असे म्हटले

तर वावगे ठरणार नाही.

**प्र.७वा. सर, 'मराठवाडा' दिवाळी अंकातील साहित्यावरुन कधी वाद - प्रवाद, टीका-टिपणी झाली नाही का ? त्याला आपण कसे उत्तर दिले ?**

उत्तर- होय, झाले ना ! 'मराठवाडा' दिवाळी अंकात आम्ही मांडलेला उच्छाद बऱ्याच लोकांना आवडला नाही. अनेक टीका - टिपण्या, वाद-प्रवाद होत राहिले, पण अण्णा खंबीरपणे पाठीशी राहिले. म्हणून थोडं-फार स्वातंत्र्य आम्हीही घेऊ शकलो. चर्चेमध्ये अनेक विषय निघायचे. प्रत्येक दिवाळी अंकात एक भाग वैचारिक परिसंवादाचा असे. अगदी बिहारचे आंदोलन, विद्यार्थी आंदोलन, जगातील हुकूमशहा ते दलित साहित्य अशा विभिन्न विषयावरील विद्वानांच्या प्रसन्न शैलीतील परिसंवाद हा दिवाळी अंकाचा विशेष घटक असायचा आणि प्रत्येक दिवाळी अंक आपापल्यापरीने गाजायचा. मराठवाड्यातल्या प्रतिभेला आवर्जून स्थान असायचे. तशात मी एक टूम काढली की, ''अण्णा एवढी प्रतिकूल टीका होत असताना तुम्ही नवसाहित्य, नवचित्रकला इ. ना आवर्जून स्थान देता तर मग आपण या सगळ्यांना उत्तर म्हणून व त्यांची मुलाखत दिवाळी अंकात का छापू नये? म्हणजे टीका करणाऱ्यांचं काही अंशी का होईना समाधान होईल!''

सूचना मान्य झाली व जबाबादारी माझ्यावरचं येऊन पडली. चित्रकार, त्यांचे चित्राची निवड, रेखाटनं व मुलाखत हे सगळं मला करायचं होतं. मीही आनंदाने सगळ्या मर्यादा सांभाळत केलं. मराठवाड्यातील कलावंत मुरली लाहोटी (दि. अंक १९७१), धर्मराज भोईर (१९७३), भाऊ समर्थ (१९७४), प्रकाश कामतीकर (१९७५) (माझी मुलाखत भ. मा. परसवाळे यांनी घेतली होती) व भ. मा. परसवाळे असा प्रवास झाला. ही कल्पना व भूमिका सगळ्यांना थोड्या - फार फरकाने आवडली व नंतर टीकेची धार थोडी बोथट झाली.

**प्र.८वा. सर, या धावपळीच्या काळात आपणास कधी एक निवांत व आनंदाचा क्षण आपल्या या चमूसोबत घालवता आला का ?**

उत्तर - हो ना ! याच प्रवासादरम्यान मी अण्णांना विनंती केली की, ''चित्रकारांना (कलावंतांना) पत्राने विचारणा करुन त्यांचे साहित्य मागवण्याऐवजी आपण त्यांचेकडे जाऊन त्यांच्या अनेक चित्रातून सार्थ 'निवड' केली तर कलावंतांना आनंद वाटेल व त्याचा थोडाफार सन्मान ('इगो') सुखावला जाईल.''

सूचना अण्णांनी एकदम मान्य केली व त्याचवर्षी ठरलेल्या धर्मराज भोईर यांच्या चित्रासाठी अण्णा, केशवराव देशपांडे व मी टॅक्सीने औरंगाबादेहून बीड येथे गेलो (भोईर त्या वेळेस बीडला कैलास कला निकेतनच्या चित्रशाळेत प्राचार्य होता.) सूचना अगोदरच केलेली होतीच. त्याला इतका आनंद झाला की... शब्दात व्यक्त करता येत नाही. योग्य त्या आदरातिथ्यानंतर दिवसभराची गप्पाष्टकं रंगली, अनेक चित्रं पाहिली. अर्थ उलगडले, भूमिका मांडल्या व चार- एक चित्रं निवडून मोठाले कॅनव्हास टॅक्सीच्या छतावर बांधून औरंगाबादी घेऊन आलो. दरम्यान केशवराव देशपांडे यांनी एक मार्मिक सूचना केली, ''अण्णा का नाही आपण या सर्व चित्रकारांना एकत्र बोलावून त्यांना शानदार खाना देऊत!'' अण्णांनी मान्य केलं. विचारांती एका रविवारची तारीख ठरली. भोईर येणार होताच. मी भ. मा. परसवाळेंना हिंगोलीहून बोलावून घेण्याचे ठरले. एका रविवारी सगळे एकत्र जमलो व स्टेशनरोडवरच्या ॲड. नावंदरच्या हॉटेलमध्ये साग्रसंगीत, खाना, सुंदर गप्पा, चेष्टा - मस्करी अशा थाटात दिवस आनंदात गेला. चित्राची निवडही झाली. अण्णांनी अनेक 'चिमटे' काढले,

''हा प्रकाश काहीही सांगतो व मी ते ऐकतो. खरं तरं हे आमच्या लक्षातच येत नाही.'' हा जिव्हाळ्याचा उमाळा माझ्या मनात अजून दाटून आहे.

**प्र. ९वा. सर, हे सगळं करताना आपल्याला स्वत:चंही काही असावं असं वाटतं ना ! मग तसा तुम्ही काही प्रयोग केला का ?**

उत्तर – हो ना ! तसा मी 'मराठवाडा' या वृत्तपत्राचा १९६४ पासून वार्ताहर होतो. त्यावेळेसचे माझे वय २१ वर्षाचे. बी. कॉम. ची पदवी पदरात पाडून घेतलेला पदवीधर. पुढे 'केसरी' व 'प्रजावाणी' या वृत्तपत्राचाही प्रतिनिधी झालो. १९६४ ते १९६९ जालना तालुका पत्रकार संघाचा सरचिटणीस व १९६६ ते १९६९ औरंगाबाद जिल्हा पत्रकार संघाचा उपाध्यक्ष अशी पदवी भूषविली. दरम्यान ते सगळे उपद्व्याप सांभाळीत बहिस्थ विद्यार्थी म्हणून बी.ए. व एम.ए. देखील केले. १९६९ साली स्वत:च्या मालकीचे संपादक, मालक, मुद्रक, प्रकाशक, पोस्टमन, हमाल, वाचक व समीक्षक असा एकपात्री प्रयोग 'विविधा' नामे मासिकाचा करुन पाहिला. जो अंगलट आला व अण्णांच्या शिव्या वगैरे खाऊन घरच्यांचा प्रचंड वैताग व विरोध, अनेक दुषणांचे पदकं मिरवित निमूटपणे नंतर लग्नासही उभा राहिलो (मे १९७० ) व जुलै (१९७०) मध्ये सेलू येथे नोकरीत रुजू झालो. अन् एक जीवनाची चाकोरीबद्ध पाऊलवाट स्वीकारली. पण मन स्वस्थ बसू देईल तर ना ! १९७० साली 'स.न.वि.वि.' जन्म झाला. या आंतर्देशीय पत्रावर छापलेल्या लघु–अनियतालिकाचा जन्म झाला. त्याचे १३ अंक निघाले. असे वेगवेगळे प्रयोग केले.

**प्र. १०वा. आणीबाणी, आंदोलन, चळवळीच्या काळातही आपले लेखन चालू होते का ?**

उत्तर – कालप्रवाहात अनेक उलथापालथी होत गेल्या. हळूहळू मी दैनंदिनीत रुळत गेलो. अनेक निमित्ताने अण्णा सेलूत येत राहिले. सहवास घडत राहिला. दिवाळी अंकाच्या निमित्ताने माझेही औरंगाबादी जाणे येणे होतच होते. पत्रकारितेची खुमखुमी अंगात होतीच. पण नोकरीचं बंधन व संहितेचा लगाम होता. तरीही चळवळीच्या, आंदोलनाच्या व आणीबाणीच्या काळात मी टोपणनावाने 'मराठवाडात' लिहितच होतो. काही लेख प्रसन्न पाटील या नावाने, काही प्रभा टोणपे या नावाने, विद्यार्थी आंदोलनाचा वृत्तांत चैताली वसंत या नावाने असे उपद्व्याप चालूच होते.

काही टीकात्मक लेखही अधून–मधून लिहीत होतो. त्यातल्या 'शैक्षणिक अराजकता व आपली मानसिकता' या शीर्षकाचा लेख मराठवाड्यात २४.९.९१ व २५.९.९१ या दोन भागात प्रकाशित झाला होता. (या लेखाची पार्श्वभूमी थोडी गंमतीशीर आहे) मुळात हा लेख 'नूतन शिक्षण संस्थेच्या' सुवर्ण महोत्सवी स्मरणिकेसाठी लिहिलेला होता, ज्याचा संपादक मीच होतो. संपादक मंडळाच्या बैठकीत त्याचे जाहीर वाचन झाले. लेखात शासनावर भरपूर टीका होती. संस्थाचालकांना ती नको होती. संस्था म्हणून शासनाशी वारंवार संपर्क असतो. त्यात अडचणी येतील ही त्यांची भूमिका. (जी रास्त होती) त्यांना काही मजकूर बदलून वा वगळून हवा होता. माझा हट्टी स्वभाव व लिहिलेल्या लेखातून एकही शब्द गाळला जाऊ नये हा आग्रह, पण संस्थेचं हित व व्यावहारिक बाजू लक्षात घेऊन मी स्वत:हून तो लेख परत घेतला व कालांतराने 'मराठवाड्या'त तो प्रसिद्ध केला आणि गंमत व आश्चर्य मी सहज म्हणून तो लेख 'लोकमत'च्या लेखन स्पर्धेसाठी पाठविला आणि १९९१–९२चा 'पा.वा. गाडगीळ स्मृती सामाजिक आर्थिक लेखन पुरस्कार' (प्रथम) मिळाला. हा एक दुष्ट योगायोग. पुढे नागपूर येथे

त्यावेळेसचे दूरसंचार मंत्री खासदार ना. प्रमोद महाजन यांच्या हस्ते हा पुरस्कार प्राप्त झाला. (दुष्ट योगायोग म्हटले, कारण मी लेख परत घेतला नसता तर तो स्मरणिकेपुरताच राहिला असता!) हा आग्रहीपणा, हट्टीपणा हा संस्कार अण्णांच्या सहवासातून आला.

अण्णा आग्रही असायचे पण दुराग्रही नव्हते. मुळातला पिंडच वारकरी परंपरेचा आणि गांधीवादावर पोसलेला. वैष्णवी नैतिकतेच्या पायावर त्यांची मार्क्सवादी, लोकशाही समाजवादी विचारांची इमारत उभी होती. अण्णांचं सगळं आयुष्यच संघर्षशील होतं. गुजरातचं नवनिर्माण आंदोलन, मराठवाडा विकास आंदोलन, बिहारचं समग्र क्रांतीचं आंदोलन, आणीबाणी, आणीबाणीनंतरची निवडणूक या प्रत्येकवेळी अण्णांचा संघर्षशील स्वभाव व तळपणारी लेखणी त्यावेळेसच्या तरुणाईची ऊर्जा होती. अण्णांचे मराठवाड्यातील अग्रलेख म्हणजे एक अनमोल वैचारिक ठेवा होता. टिळक, आगरकर, खाडीलकर वगैरेंच्या ज्वलंत वैचारिक पत्रकारितेच्या परंपरेतील शेवटची कडी म्हणजे अनंतराव भालेराव. वर उल्लेखित प्रत्येक आंदोलनाचे विषय त्या त्या वर्षी दिवाळी अंकाच्या परिसंवादाचे विषय असायचे व त्याला अनुरुप रेखांकन व मांडणी हे आम्हाला आव्हान असायचे.

आणीबाणीच्या वर्षी अण्णा मिसाखाली नाशिकच्या मध्यवर्ती तुरुंगात होते. मराठवाडा दैनिकाची जबाबदारी निळू दामले व गोपाळ साक्रीकर या तरुण द्वयीवर होती. तुरुंगातूनही पत्रं येत होती. बरीच पत्रं गहाळही होत होती. अर्थात ती 'आणीबाणी' होती. इकडे आम्ही दिवाळी अंकासाठी 'जगातील हुकूमशहा' या शीर्षकाची लेखमाला छापायचे ठरवले होते. हिटलर, इदी अमीन पासून अनेक. त्यात मी एक सुचविले, 'परिसंवादाच्या शेवटी एक कोरे पान त्यावर फक्त प्रश्नचिन्ह व खाली कोपऱ्यात बारीक टाईपात 'आणखी एक' असा मजकूर, आयडिया सगळ्यांना आवडली पण शासकीय यंत्रणेच्या सेन्सॉर कचाट्यातून सही-सलामत सुटू शकली नाही. नुसते कोरे पान लावायला देखील हरकत घेतल्या गेली. त्यावर्षी या दिवाळी अंकाला उत्कृष्ट दिवाळी अंकाचा पुरस्कार मिळाला. अशा कितीतरी आठवणी हे सगळं आठवताना मन व्याकूळ होतं. विचार सैरवैर होतात. धुंदीतले भारलेले 'ते' दिवस मनात गर्दी करतात.

**प्र. ११वा. अण्णांना आपण 'आधार - वड' अशी उपमा दिलीत. त्यामागचा आशय काय?**

उत्तर- अण्णा म्हणजे एक विलक्षण व्यक्तिमत्त्व. ते सत्ता आणि संपत्ती यांच्यापासून कटाक्षाने दूर राहत. आपल्या पत्रकारितेतून लोकजागर, लोक शिक्षणाचा गजर अण्णांनी निरंतर चालू ठेवला. त्यांनी जवळ केलेल्या मित्रांकडे ते कुटुंब -घटक म्हणून पाहत व त्यांच्या कुटुंबाचे एक घटक होऊन जात. असा त्यांचा गोतावळा महाराष्ट्रभर पसरलेला होता. त्यातलं त्यांचं विसाव्याचं ठिकाण म्हणजे सेलू. एकतर १९३९ ते ४४ या पाच वर्षात स्वातंत्र्यपूर्व काळातलं व निजामशाही विरोधातलं समग्र आंदोलन त्यांनी गावातूनच चालवलं. त्यांच्या निकटवर्तियांपैकी चारठाणकर कुटुंबीय, सो.ना. कुलकर्णी व गो.बा. देशमुख या गुरुजी द्वयांचे कुटुंबीय असा बराच मोठा व विस्तृत परिवार त्यांनी गोळा केला होता. पुढे काळ बदलत गेला. ठिकाणं बदलत गेली. बदलत्या काळाची गतिमानता वाढत गेली. विवेक व मूल्यांची पायमल्ली वाढत गेली. स्वातंत्र्योत्तर घटितांमध्ये अनेक चांगल्या गोष्टींची अवहेलना झाली. मनस्तापाचे प्रसंग आले, निराशा पदरी पडली, अपेक्षाभंगाचे दु:खही पचवावे लागले. पण या धीरोधात्त व्यक्तिमत्त्वाने कधी पराभूत होऊन हात टेकले नाहीत. सर्व दीन

दुबळ्यांचे कैवारी असणाऱ्या या विशाल हृदयाच्या व्यक्तीच्या मनाची दारं सगळ्यांसाठी खुलीच राहिली. त्यांच्या घराची, मनाची, कार्यालयाची दारं हमेशा सार्वजनिकच होती. त्यांनी उपकृत केलेली कित्येक माणसं या मराठवाड्यात आहेत, जी कृतज्ञतेनं त्यांची आजही आठवण काढीतच असतात. काही कृतघ्नही निघाली. त्यांनी गरजेपुरता निवारा शोधला व गरज संपताच दुसऱ्या आश्रयाला गेली. अण्णा एकप्रकारे मराठवाड्याचा 'आधारवड' होते. घनदाट सावली, अनेक कुटुंबाच्या मैत्र पारंब्या, ज्या वाढत वाढत जमिनीत पुन्हा मूळ धरुन वटवृक्षाचा विस्तारच करत गेली. अनेक पांथस्थ आले, या वटवृक्षाच्या सावलीत विसावले व आपली गरजपूर्ती करुन गेले. वृक्षाचा एक गुणधर्म असतो. आपल्या आश्रयाला आलेल्या कुणालाही ते नाकारीत नाही. निर्मळ मनाने तो ज्याला जे पाहिजे ते देतच जातो. सगळ्यांचं आश्रयस्थान बनतो.

अनंतराव भालेराव नामे 'आधारवडा' ने या मराठवाड्याला जे जे दिले ते ते अनमोल आहे. या आधारवडाच्या पारंब्या जमिनीत मूळ धरून मराठवाड्याच्या बाहेरही विस्तारत गेल्या व हजारो कुटुंबातून कहाण्या बनून राहिल्या. वैभवाच्या काळात डेरेदार वृक्षाला ओरबाडणारे खूप असतात. ते वृक्षाचे वैभव ओरबाडू शकतात पण वृक्ष व त्याची सावली कोणी चोरू शकत नाही. अण्णा नामे वृक्षाच्या डेरेदार सावलीत अजूनही हे मन विसावतं .... !

**प्र.१२वा. सर, आपल्या आयुष्यात कोणकोणत्या व्यक्तींच्या कार्य - कर्तृत्वाचा प्रभाव राहिला ?**

उत्तर - माझ्या आयुष्यात दोन व्यक्तींच्या कार्य - कर्तृत्वाचा प्रभाव आयुष्यभर राहिला. सुदैवाने त्यांचा सहवासही भरपूर मिळाला. पुत्रवत प्रेम, जिव्हाळा व कौटुंबिक आपुलकी ही माझी आयुष्यातील मानसिक सर्वश्रेष्ठ अशी कमाई आहे. त्या दोन व्यक्ती म्हणजे अनंत भालेराव व नरहर कुरुंदकर ! यांच्या स्नेहल वर्षावात जी मनाची जडण-घडण झाली तेच संस्कार आजतागायत मी जपून ठेवले आहेत. हा लेख देताना आठवणींची गुंतागुंत व प्रचंड कासाविशी मात्र मनाला छळत आहे.

अण्णा म्हणजे एकूणच 'मराठवाडा' या भू-भागाचे 'आधारवड' होते तर कुरुंदकर (गुरुजी) हे सांस्कृतिक व वैचारिक वैभव. दोघांचाही सेलू या गावाशी निकटचा व जिव्हाळ्याचा संबंध होता.

सर, आपण वेळात वेळ काढून आमच्याशी गप्पा - गोष्टी केल्या व अनंतरावजी भालेराव यांच्या कार्यकर्तृत्वाचा या माध्यमातून उलगडा केला जो या व येणाऱ्या तरुण पिढीला निश्चितच मार्गदर्शक ठरेल.

टीप : या विशेषांकाच्या संदर्भाने प्रा. प्रकाश कामतीकर सरांना मुलाखतीसंदर्भाने विचारणा केली असता, 'बरे झाले मला त्यांच्या विषयी लिहायचेच होते असे म्हणून सहर्ष मुलाखत दिली.'

पण दुर्दैवाने त्यांचे दि. २२ एप्रिल २०२० देहावसान झाले. या मुलाखतरुपाने अनंतरावजी विषयीचे अंतिम लेखन त्यांच्याकडून झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# मुलाखत : श्री. आसाराम लोमटे

*साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त, कवी, लेखक, पत्रकार, संपादक असे विविधांगी व्यक्तिमत्व असणारे श्री. आसाराम लोमटे यांची विद्यार्थ्यांनी घेतलेली मुलाखत*

मुलाखत दाता : **श्री. आसाराम लोमटे**
मुलाखतकार :
**१) युवराजसिंह हनुमानराव नाईक**
**२) स्वप्नील शिवाजीराव मगर**
(बी.कॉम. तृतीय वर्ष)

**प्र.१. आपण पत्रकारितेकडे कसे पाहता ?**
उत्तर– पत्रकारिता हे केवळ माहिती पोहचविण्याचे आणि बातमी पुरवण्याचे साधन नाही तर तो जबाबदारीने आणि ध्येयनिष्ठेने पार पाडण्याचा व्यवसाय आहे. ७ जानेवारी १८३२ साली आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण या वृत्तपत्राची सुरूवात केली. मराठी पत्रकारितेचा हा आरंभबिंदू मानला जातो. ‘दर्पण’ म्हणजे आरसा, याचा अर्थ आरशात ज्याप्रमाणे आपले प्रतिबिंब दिसते त्याप्रमाणे समाजाचे प्रतिबिंब वृत्तपत्रातून उमटावे हे अपेक्षित आहे. ज्या बाजू दुर्लक्षित असतात, सोयिस्करपणे लपवल्या जातात त्यापुढे आणल्या पाहिजेत. समाजातल्या अनिष्ट प्रवृत्तींवर प्रहार करताना जे चांगले आहे आणि उदात्त, उन्नत आहे असे समाजासमोर आणण्याचे कर्तव्यही पत्रकारितेने पार पाडले पाहिजे. पत्रकारिता समाजमन घडवते. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाला सुबुद्ध केले जाऊ शकते. असंख्य प्रश्न ऐरणीवर आणले जातात आणि अशा प्रश्नांच्या सोडवणुकीचे मार्गही पत्रकारितेच्या माध्यमातून दिसू लागतात, म्हणूनच पत्रकारितेने केवळ प्रश्नच निर्माण करु नयेत तर उत्तराच्या शक्यताही सूचित करण्यात त्यातूनच कुंठितावस्था आलेल्या समाजाला एक नवी दिशा मिळते. प्रवाहाबरोबर वाहणे हा कोणत्याही वस्तूचा गुणधर्म असला तरी प्रवाहाविरुद्ध भूमिका घेणे आणि सत्याची बाजू भक्कमपणे मांडणे हे पत्रकारितेचे प्रमुख कर्तव्य आहे. संत तुकारामांनी त्यांच्या एका अभंगात, ‘सत्य असत्याशी मन केले, ग्वाही मानियले नाही बहुमता’ असे विधान केले आहे. कोणत्याही ध्येयनिष्ठ पत्रकाराने हे विधान अंगीकारले पाहिजे.

**प्र.२. आपल्या मते उत्तम पत्रकारिता कोणती ?**
उत्तर– चांगल्या पत्रकारासाठी काही गोष्टी निश्चितपणे आवश्यक आहेत. समाजातील विसंगती हेरण्याची दृष्टी पत्रकारांकडे असली पाहिजे. आपण कायम समाजाशी बांधील आहोत हा दृष्टिकोन असायला हवा. नवनवे प्रश्न जाणून घेण्याचे कुतूहल असायला हवे. नव्या बदलांना स्वीकारण्याची स्वागतशील दृष्टी असायला हवी. जी माणसे सातत्याने परिघाबाहेर आहेत अशा माणसांच्या आशा – आकांक्षा जाणून घेण्याची वृत्ती असायला हवी. हाती असलेल्या माध्यमांद्वारे जे आपल्याला मांडायचे आहे त्यासाठी भाषेवर प्रभुत्व असायला हवे. आपल्याकडे असलेला आशय ठामपणे व्यक्त करण्यासाठी निर्धार असायला हवा. कोणत्याही परिस्थितीत सत्यापासून ढळणार

नाही हा निग्रह मनाशी बाळगायला हवा. सतत अभ्यास, नवनवी अनुभवविश्वे धुंडाळण्याची वृत्ती मनात असायला हवी. जनसंपर्क हा पत्रकारितेचा प्राण आहे मात्र आपली भूमिका चोखपणे पार पाडण्यासाठी हा जनसंपर्क आड येऊ नये. कोणतीही व्यक्ती सर्वज्ञ नसते पण अभ्यासाअंती आपल्याला एखादा विषय समग्रपणे समजून घेता येतो. पत्रकारांनी सतत अशाप्रकारचा उमेदपणा बाळगला पाहिजे. कोणतेही पूर्वग्रह मनात न ठेवत सतत नव्याचा शोध घेतला पाहिजे.

**प्र.३. साहित्य आणि पत्रकारिता यांतील सहसंबंधाविषयी काय सांगाल ?**

उत्तर– साहित्य आणि पत्रकारिता यांचा संबंध आहे. दोन्ही क्षेत्रात योगदान दिलेली नावे जगभर आहेत. मराठी भाषेत पत्रकारितेसोबतच साहित्याच्या क्षेत्रात लेखन करणारी अनेक नावे आहेत. साहित्य आणि पत्रकारिता यांचा जसा परस्परसंबंध आहे. तशीच या दोहोंमध्ये एक भेदरेषाही आहे. पत्रकारिता समाजातील घडामोडींचे दर्शन घडवते, जसे आहे तसे दाखविण्याकडे पत्रकारितेचा कल असतो . साहित्य मात्र त्यापुढच्या टप्प्यावर जाताना दिसते. मानवी भावभावनांचे चित्रण करण्याचे काम साहित्याद्वारे होते. मानवी मनाचा तळ गाठण्याचे प्रयत्न साहित्यातून होतात. पत्रकारिता ही वस्तूनिष्ठ तर साहित्य अधिक विशाल असते. पत्रकारांकडे जी माहिती आहे ती समाजासमोर आणण्याची एक पद्धत आहे. बातमीचे सुद्धा स्वत:चे एक तंत्र आहे. बातमीमध्ये पत्रकाराला मनाचे काही घुसडता येत नाही. त्याला घटनेशी प्रामाणिक राहावे लागते. लेखक मात्र स्वत:च्या मनाप्रमाणे स्वातंत्र्य घेऊ शकतो. कल्पित अशा कथानकाला तो अनेक नवे आयाम देऊ शकतो आणि स्वत:च्या कल्पनाशक्तीच्या जोरावर साहित्यातून कलात्मक असे जीवनदर्शन घडवू शकतो. पत्रकाराला घटना, घडामोडीचा विपर्यास करता येत नाही किंवा त्यांना कल्पित अशा पद्धतीने साकारता येत नाही. साहित्याची दुनिया मात्र याबाबतीत स्वायत्त आहे. मानवी जीवनातील हर्ष खेद, स्वप्न, आशा–आकांक्षा, ताणतणाव, सुख – दु:ख अशा अनेक बाबींना साहित्य स्पर्श करते. अनेक ललित कलाकृती चिंतनाची डूब लाभलेल्या असतात. साहित्याला जीवनाचे भक्कम असे अधिष्ठान असते. पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाचे प्रश्न पटलावर येतात. मात्र त्यांचे स्वरुप हे पृष्ठस्तरावरचे असते. साहित्य हे मानवी जीवनाचा सकल वेध घेते. पत्रकारिता आपल्याला वेगवेगळ्या स्वरुपाची माहिती देते आणि साहित्य आपल्याला माणूस म्हणून जगण्यासाठी उन्नत करते. या दोन्ही क्षेत्रांत काम करणाऱ्या माणसांना कायम एक खबरदारी घ्यावी लागते, आपल्याकडे असलेल्या अनुभवांपैकी कोणता अनुभव साहित्यासाठी कलात्मक अंगाने मांडता येईल याची एक चाळणीच पत्रकारांकडे असावी लागते. कोणताही अनुभव साहित्यात जसाच्या तसा उतरत नसतो. लिहिणाऱ्याची संवेदनशीलता महत्त्वाची असतेच, पण जगण्यासंबंधीचे कुतूहल आणि मानवी जीवनाबद्दलची आस्था या गोष्टीचा स्पर्श झाल्याशिवाय कोणत्याही अनुभवाला साहित्यरुप प्राप्त होऊ शकत नाही. दोन्ही क्षेत्रांचे महत्त्व आपापल्या परीने आहेच.

**प्र.४. अनंत भालेराव यांच्या पत्रकारितेच्या भाषेविषयी काय सांगाल ?**

उत्तर – अनेक पत्रकारांचे भाषासौष्ठव हे कमावलेले असते. व्यावसायिक जबाबदारी पार पाडताना भाषिक कौशल्य सरावाने साधले जाते. अलंकारप्रचूर, प्रासादिक आणि प्रसंगी नटवी अशी भाषा अनेकांच्या लेखनातून दिसते. अशी भाषा आकर्षक असली तरी

जनसामान्यांच्या हृदयाला हात घालेल अशी नसते. अनंतराव यांची भाषा मात्र लोकजीवन पचवलेली होती. स्वत: वारकरी कुटुंबातून ते आले असल्याने संताची वचने, अभंगातला रोखठोकपणा आणि जनसामान्यांविषयीचा अपार कळवळा यातून अनंतराव यांची भाषा घडली होती. एके ठिकाणी त्यांनी आपल्या या भाषेचे मर्म उलगडून दाखविले आहे. ''आंदोलनाच्या काळात दररोज गुप्तपत्रे काढावी लागत आणि लोकांच्या भावनेला चेतवत त्यांच्या पुरुषार्थाला आवाहन करावे लागत असे. अशी पत्रके लिहिल्यामुळे भाषेचे सामर्थ्य प्रतीत झाले. स्टेट काँग्रेसचा संघटक म्हणून ग्रामीण भागात दररोज भाषणे द्यावी लागत. यातून भाषेच्या संदर्भात बरेच मिळवत गेले. लकबी, म्हणी, वाक्प्रचार परिचयाचे झाले. या काळात पटले की, दहा ग्रंथांच्या वाचनातून आपण जे काही मिळवतो, त्यापेक्षा अधिक एका माणसाच्या अभ्यासातून मिळवू शकतो. माणसांच्या या अभ्यासात पुस्तकी विश्वापेक्षा अधिक वैविध्य असते. शैलीचे एक भांडारच आपल्या समोर येऊन उभे राहते. या सर्व वातावरणाचा माझ्यावर परिणाम होत गेला. '' या शब्दात अनंतरावांनी आपली भाषिक जडणघडण कशी झाली आहे हे सांगितले आहे. याचा अर्थ अनंतराव यांची भाषा ही केवळ ग्रंथिक नव्हती तर या भाषेला जनसामान्यांच्या आशा – आकाक्षांचे अधिष्ठान होते. ही भाषा समाजजीवनातून आली होती म्हणूनच त्यांच्या लेखणीला फार मोठे वजन प्राप्त झाले होते. अन्यायाविरुद्ध तुटून पडण्याची वृत्ती, सामान्यांच्या सुखदु:खाशी असलेले नाते, परखड विश्लेषक म्हणून शब्दांना असलेली धार या बाबी अनंतरावांच्या पत्रकारितेची अभिन्न अंग आहेतच पण त्यांची भाषा हे सर्वात मोठे सामर्थ्य आहे. तुकोबारायांचा रोखठोकपणा त्यांच्या लेखणीत होता. एकाचवेळी त्यांच्या भाषेची अनेक रुपे आपल्याला दिसतात. अग्रलेखांच्या माध्यमातून रोखठोक, परखड आणि धारदार शब्दांतून व्यक्त होणारे अनंतराव ललित लेखनात कमालीचे मृदू मुलायम भासतात. अर्थात, त्याचे भाषेतले हे लालित्य कृतक न वाटता जिवंत व रसरशीत वाटते.

**प्र.५. आपल्याला जाणवलेले भालेरावांच्या अग्रलेखांचे वैशिष्ट्य कोणते ?**

उत्तर– रोखठोक अग्रलेखातून समाजाचे प्रश्न मांडतांना 'खरारा करणारे अश्वमेधाचा घोडा कसा अडविणार ?', 'गंगे सावधान, घोडे येत आहेत', 'फॅसिस्ट बनून फॅसिझमचा मुकाबला करता येईल का ?' ही त्यांच्या काही अग्रलेखांची शीर्षके त्याचबरोबर 'कावड' सारख्या त्यांच्या लोकप्रिय स्तंभलेखनातही, 'सत्तेचे भुकेले कोणते पाप करणार नाहीत ?', 'पाकिस्तान कोणी तोडले ?', 'साहित्य संमेलन: एक निरर्थक सोपस्कार', यांसारखे लेख वाचायला मिळतात. त्याचबरोबर अनंतराव जेव्हा ललित लेखणात रमतात तेव्हा त्यांच्या भाषेचा वेगळाच पोत समोर येतो. निसर्ग, माती आणि माणूस, मानवी जगण्याचे सार, जीवन आणि मृत्यूसंबंधीचे चिंतन व्यक्त करताना त्यांच्या भाषेला विलक्षण झळाळी प्राप्त होते. त्यादृष्टीने पाहिल्यास 'मृगाने बहार केली' यासारखा अग्रलेख असो वा 'कावड' मधील 'पावसा तुझा धर्म कोणता ?' हा लेख असो अशा लेखनातून अनंतरावांची भाषाशैली खूप मोहक रुप धारण करते हे लक्षात येईल, 'मांदियाळी' तून अनेक व्यक्तिचित्रे त्यांनी रेखाटली आहेत. जशी ती माणसांची आहेत तशी ती गावाचीही आहेत. गावांविषयी लिहिताना ते एखाद्या गावालाच व्यक्तिमत्त्व बहाल करतात. 'परभणी एक बहिर्मुख खानदानी गाव' या लेखात त्याची प्रचिती येईल 'पळस गेला कोकणा' या त्यांच्या

प्रवासवर्णनातूनही त्यांच्या भाषेचा आणखी नवा पैलू समोर येतो हैदराबाद, मुक्ती संग्रामातील धुमसता कालखंड त्यांच्या 'पेटलेले दिवस' या पुस्तकातून पाहायला मिळतो. पाटनूरचा जंगल सत्याग्रह, उमरी बँक प्रकरण अशा विविध घटनांचा मागोवा घेताना या पुस्तकातील भाषाशैली ही अत्यंत वेगवान आहे. त्या काळाची धग या लेखनातून उमटलेली दिसते. या सर्व उदाहरणांतून अनंतराव यांची भाषा अत्यंत प्रभावी आणि प्रवाही असल्याचे दिसून येते. मात्र कुठल्याही शब्दकोशातून समृद्ध झालेली ही भाषा नाही तर या भाषेला लोकजीवनाची पक्की बैठक आहे हेच आपल्याला दिसून येईल.

**प्र.६. अनंतरावांच्या ध्येयनिष्ठ पत्रकारितेचे कोणते सूत्र आपल्याला भावते ?**

उत्तर – अनंत भालेराव हे ध्येयनिष्ठ पत्रकार होते. सत्याचा शोध आणि ठाम असे प्रतिपादन हे त्यांच्या पत्रकारितेचे प्रमुख सूत्र होते. १९६३ साली मराठवाडा दैनिकात प्रसिद्ध झालेल्या एका लेखाबद्दल त्यांना आणि पन्नालाल सुराणा यांना तुरुंगवास भोगावा लागला. साखरेच्या कृत्रिम टंचाईचा दंभस्फोट करणारा हा लेख होता. याचाच अर्थ आपण जे सत्य सांगतो त्या सत्याची किंमत चुकवण्याची सदैव तयारी अनंतरावांनी ठेवली होती. निजामी राजवटी विरुद्ध संघर्ष करतांना त्यांनी अनेक लढे उभारले. अहिंसक सत्याग्रह केले आणि प्रसंगी सशस्त्र लढा दिला. चळवळीचा भाग म्हणूनच त्यांनी पत्रकारितेत प्रवेश केला. मराठवाडा सारख्या दैनिकाने कायम एका शस्त्राची भूमिका पार पाडली. आज बारकाईने पाहिलं तर मराठवाड्याचे समाजमन घडवण्याचे मोठे काम अनंतरावांनी त्या काळी केले आहे असे दिसून येईल. अग्रलेख ही वर्तमानपत्रातील तशी दुर्लक्षित जागा. कोणत्याही वर्तमानपत्राचा अग्रलेखकाचा वाचक हा पाच टक्क्यांच्या घरात असत मात्र या विचारी वर्गाला कायम नवा दृष्टीकोन देण्याचे काम संपादकाला करावे लागते. अनंतरावांचे अग्रलेख हे कमालीचे वाचनीय तर होतेच, पण त्यांच्या एकूण लेखनाविषयी कमालीचे आकर्षण असणारा, औत्सुक्य असणारा फार मोठा वर्ग त्याकाळी मराठवाड्याच्या कानाकोपऱ्यात होता. सत्ताधीशांचा वर्तन व्यवहार हा कायम अनंतरावांच्या चिकित्सेचा विषय होता. ही चिकित्सा करताना त्यांनी कुणाचाही मुलाहिजा ठेवला नाही. आपल्याला जे सत्य मांडायचे आहे, त्यासाठी कशाचीही पर्वा केली नाही.

**प्र.७. अनंतरावांकडून आजच्या पत्रकारितेने कोणता बोध घेतला पाहिजे असे वाटते ?**

उत्तर – समाजातल्या भ्रष्टाचारावर, वैगुण्य, अपप्रवृत्ती यावर प्रहार करताना त्यांच्या भाषेला एक प्रकारचा धारदार गुण प्राप्त होत असे. त्याच बरोबर समाजातल्या दुर्लक्षित, वंचित, घटकाविषयी, त्यांच्या न्यायहक्काविषयी अनंतरावांनी कायम आवाज उठवला. जर बारकाईने पाहिले तर या सर्व बाबी केवळ त्यांच्या लेखणीचा विषय नव्हत्या तर ती त्यांची जीवननिष्ठा होती हे आपल्याला दिसून येईल. मराठवाडा मुक्त होण्याआधी त्यांनी शब्दांद्वारे जी झुंज दिली तशीच झुंज त्यांनी स्वातंत्र्यानंतर सर्वसामान्यांच्या हक्कासाठी दिली. पत्रकारांनी सर्व प्रकारच्या प्रलोभनांना दूर सारले पाहिजे, कोणत्याही हितसंबंधांवर सतत पाणी सोडण्याची तयारी ठेवली पाहिजे आणि पत्रकारितेचा धर्म हा कायम समाजातल्या दुबळ्या घटकांच्या हितासाठी कटिबद्ध असला पाहिजे असा विचार त्यांनी प्रकर्षाने मांडला. त्यांची पत्रकारिता केवळ शब्दांचा प्रपंच नव्हता तर ती एक जीवननिष्ठा होती. आजच्या पत्रकारितेने हा गुण लक्षात घेणे आवश्यक आहे.

**प्र.८. आजच्या समाजमाध्यमांविषयी आपले काय मत आहे ?**

उत्तर – पूर्वी वाचकांसाठी केवळ मुद्रित माध्यमेच उपलब्ध होती. कालांतराने यात दृक्‌श्राव्य माध्यमे आली. घडलेल्या ताज्या घटना दर्शकापर्यंत पोहचायला लागल्या. आधी केवळ बातम्यांसाठी दूरदर्शन होते. आता असंख्य वाहिन्या बातम्या देऊ लागल्या आहेत. विषयानुरुप वाहिन्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. अखंड बातम्या देणाऱ्या अनेक वाहिन्या उपलब्ध आहेत. क्रीडा, फॅशन डिझायनिंग, शेअर मार्केट, अध्यात्म, आरोग्य, मनोरंजन, विज्ञान, पर्यावरण अशा एका एका विषयाला वाहिलेल्याही अनेक वाहिन्या आहेत. वाहिन्यांचे हे जग दिवसेंदिवस विस्तारत असताना प्रत्येकाच्या हाती मोबाईल आला. केवळ संवादाचे माध्यम म्हणूनच आज त्याचे अस्तित्व नाही तर, हवामान माहितीचे आदान – प्रदान, बँकींग अशा असंख्य कामांमध्ये मोबाईलची अपरिहार्यता वाढली, समाज माध्यमांचे नवे जग उदयास आले. फेसबुक, व्हाट्सॲप, ट्विटर अशी असंख्य माध्यमे अभिव्यक्तिसाठी खुली झाली. पूर्वी एखाद्या वर्तमानपत्रात चार ओळी छापून याव्या म्हणून मनधरणी करावी लागत असे. आता ती परिस्थिती राहिली नाही. तुम्हाला हवा तो मजकूर टाईप करुन तो एकाच वेळी अनेक लोकांपर्यंत पाठवू शकतो. एका अर्थाने जर आपण विचार केला तर अभिव्यक्तिच्या क्षेत्रात समाजमाध्यमांनी लोकशाहीकरण आणले हे मान्य करावे लागेल. मुद्रित आणि द्रृक्‌श्राव्य माध्यमाच्या मक्तेदारीला समाजमाध्यमांनी छेद दिला. कोणत्याही घटना – घडामोडींवर व्यक्त होताना आज सर्वसामान्यांना समाजमाध्यमांचा मोठा आधार आहे. एखाद्या गोष्टीचे जसे फायदे असतात तसे तोटेही असतात. समाजमाध्यमांचे काही तोटे निश्चितपणे आपल्याला जाणवतात पण तरीही त्यांचे महत्त्व मान्य केले पाहिजे तंत्रज्ञान कोणतेही वाईट नसते. या तंत्रज्ञानाचा अवलंब करताना आपण कितपत विवेक बाळगतो याचा जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाने विचार करायला हवा.

**प्र.९. सामाजिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी माध्यमांनी आपल्या भूमिकेत कोणते बदल करणे आवश्यक वाटते ?**

उत्तर – आज ग्रामीण भागातील प्रश्न दिवसेंदिवस जटील होत आहेत. या प्रश्नांची उकल करण्याची जबाबदारी पत्रकारितेने पार पाडायला हवी. जागतिकीकरणानंतर समाजातले सर्वच दुर्बल घटक आपल्या अस्तित्वासाठी संघर्ष करत आहेत. शेतकऱ्यांचे प्रश्न गंभीर आहेत, प्रचंड मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढली आहे, केवळ पदव्या हाती घेऊन तिष्ठत बसलेले तरुणांचे तांडे आपल्याला प्रचंड संख्येने दिसतात. या सर्वांच्या रोजगाराचा फार मोठा प्रश्न आहे. या तरुणाईला योग्य ती दिशा नाही मिळाली तर समाजात मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण होईल. तरुणाईची ही खदखद आपण समजून घेतली पाहिजे. ग्रामीण भागातील कष्टकरी स्त्रियांचे प्रश्न माध्यमांमध्ये उमटायला हवेत. या प्रश्नांची तीव्रता दाहक आहे. ऊसतोडी करणाऱ्या तब्बल तीस हजार महिलांनी आपले गर्भाशय काढून टाकल्याचे वास्तव गेल्या वर्षी समोर आले. यातून आरोग्याचे प्रश्न निर्माण झाले आहेत. आदिवासी, भटके – विमुक्त यांच्या प्रश्नांकडे बारकाईने पाहण्याची आवश्यकता आहे. मघाशी आपण समाजमाध्यमांचा विचार केला पण त्याची दुसरी बाजूही समजून घेण्याची आवश्यकता आहे. धुळे जिल्ह्यातील राईनपाडा या गावी तीन – चार वर्षापूर्वी भटक्या– विमुक्त समाजातील चौघांना

दगडाने ठेचून मारल्याची घटना घडली होती. मुले पळवणारी टोळी आल्याच्या अफवा. समाजमाध्यमांवर पसरत गेल्या आणि त्या संशयातून गावकऱ्यांनी भटक्या – विमुक्त समाजातील चौघांना खोलीत डांबून ठेवले. दगडांनी ठेचून चौघांचा बळी घेतला. समाजमाध्यम जर विवेकाने वापरले गेले नाही तर काय होते याचे हे उदाहरण आहे. ग्रामीण भागातील पत्रकारांनी सतत कान व डोळे जागृत ठेवले पाहिजे. घडणाऱ्या घटना घडामोडींचा अन्वय आपल्या दृष्टीकोनात लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ज्या ठिकाणाहून प्रश्नांचे असंख्य भुंगे जन्माला येतात त्याठिकाणी ग्रामीण पत्रकार उभा असतो. अशावेळी शोधक नजरेने अनेक गोष्टींचा पाठपुरावा केला पाहिजे. ग्रामीण भागातील शिक्षणाची काय दुरावस्था आहे, सरकारच्या सर्व योजना शेवटच्या माणसापर्यंत पोहचतात काय, ज्या ठिकाणी वृक्षलागवडी होतात तिथे पुढे झाडे जगलेली दिसतात काय, प्रत्यक्ष कागदावर रोजगार हमीची जी काम सांगितली जातात तेवढी कामे आणि तेवढे मजूर प्रत्यक्षात दिसतात काय, गरजू लाभार्थ्यांपर्यंत सरकारी योजनेचा लाभ पोहचतो काय असे कितीतरी प्रश्न असतात. अनेकदा एखाद्याच्या अन्यायाची, शोषणाची बातमी केवळ दोन कॉलमपुरती जागा देऊन गुंडाळली जाते. प्रत्यक्षात अशा घटनेमागचे सर्व संदर्भ तपासले गेले पाहिजेत. सामाजिक न्यायाच्या प्रक्रियेत सातत्याने तळाशी असलेल्या घटकांचा विचार पत्रकारांनी करायला हवा. जी माणसे आपल्यावरील अन्यायाला दाद मागू शकत नाहीत किंवा आजच्या कोलाहलात ज्यांचा आवाज दडपला जातो अशा माणसांना न्यायाच्या प्रक्रियेत आणण्याचे काम सातत्याने केले पाहिजे. ग्रामीण भागात विकासाच्या नावाखाली अनेक प्रकल्प उभे राहतात. स्थानिक भूमिपुत्रांना सहभागी करुन जर हे प्रकल्प रोजगार, उत्पन्न अशा बाबतीत महत्त्वाची भूमिका बजावत असतील तर या प्रकल्पांबाबत नकारात्मक भूमिका बाळगण्याचे कारण नाही. मात्र विकासाच्या नावाखाली राबवल्या जाणाऱ्या या प्रकल्पांमधून केवळ मूठभरांचे हित साधले जाणार असेल आणि बहुसंख्य जनतेच्या जगण्यावर वरवंटा फिरवला जाणार असेल तर अशा प्रकल्पांच्या परिणामांची दाहकता माध्यमांनी लक्षात आणून द्यायला पाहिजे. एकूणच आज समाजातले प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत चालले आहेत. मुख्य म्हणजे सर्वांच्या हाती असलेल्या समाजमाध्यमांमुळे या प्रश्नांचे चटके आपल्याला तेवढे जाणवत नाहीत. फेसबुक, व्हाट्सॲपच्या माध्यमातून एक आभासी जग निश्चित निर्माण झाले आहे. त्यामुळे या आभासी जगात वावरताना आपल्या पायाखाली काय जळते आहे याचा विचार सर्वांनीच करण्याची आवश्यकता आहे. या भासमान जगात पत्रकारितेला आपल्या कर्तव्यांचा विसर पडू नये हे आवर्जून सांगावेसे वाटते. महाराष्ट्राला पत्रकारितेचा फार मोठा वारसा आहे. योगायोगाने हे वर्ष 'मूकनायक' च्या जन्मशताब्दीचे वर्ष आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक', 'बहिष्कृत भारत', 'जनता' यांसारख्या वर्तमानपत्रांच्या माध्यमातून त्याकाळी समाजजागृतीचे मोठे काम केले. आमच्या या बहिष्कृत लोकांवर होत असलेल्या व पुढे होणाऱ्या अन्यायावर उपाययोजना सुचविण्यात तसेच त्यांची भावी उन्नती आणि तिचे मार्ग यांच्या खऱ्या स्वरुपाची चर्चा होण्यास वर्तमानपत्रासारखी अन्य भूमीच नाही, असे बाबासाहेबांनी 'मूकनायक' या पत्राच्या भूमिकेत स्पष्ट केले होते. संत तुकाराम यांचा 'काय करु आता, धरुनिया भीड, निशंक हे तोंड वाजविले' हा अभंग 'मूकनायक' ये ब्रीद म्हणून बाबासाहेबांनी घेतला होता. यावरुन त्यांची सामाजिक

न्यायाची कळकळ दिसून येते. मराठी पत्रकारितेला असा फार मोठा वारसा आहे. तो आपण कृतीतून जतन करण्याची गरज आहे.

**प्र.१०. आजच्या पत्रकारितेतील बदलाकडे आपण कसे पाहता ?**

उत्तर – तंत्राच्या अंगाने मराठी पत्रकारिता प्रचंड बदलली आहे. अर्थात हा बदल केवळ मराठी भाषेतच झाला असे नव्हे, तो जगभर झाला आहे. कधी काळी खिळे जोडून मुद्रण होत असे. हा प्रकार अत्यंत त्रासिक आणि वेळखाऊ होता. खेड्यापाड्यातून बातमी देणाऱ्या पत्रकारांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असे. टपालाने या बातम्या मुख्य कार्यालयापर्यंत पोहचत असत. महत्त्वाची बातमी तारेने द्यावी लागत. छपाई केलेला अंक ग्रामीण भागात पोहचण्यासाठी कैक दिवस लागत असत. आता ती परिस्थिती राहिली नाही. टेलिफोननंतर फॅक्स आला, त्यानंतर इंटरनेट आले आता जणू प्रत्येकाच्या मोबाईलमध्ये संगणक आहे. त्यात तुम्ही हवा तो मजकूर टाईप करु शकता. तातडीने म्हणजे काही सेकंदातच तो जगभरात कुठेही पाठवू शकता. फोटो पाठवता येतात. एखाद्या विषयाची माहिती नसेल तर अशी माहिती मिळवणे गुगलमुळे सोपे झाले आहे. कधीकाळी एका एका संदर्भासाठी प्रचंड वेळ द्यावा लागत असे. आता तंत्रामुळे सर्व काही सुखद झाले आहे. झालेला हा बदल महत्त्वाचा आहे. त्यामुळे पत्रकारिता आमूलाग्र बदलली मात्र केवळ तंत्रज्ञानाने बदल झाला म्हणून पत्रकारिता परिणामकारकरीत्या आपली जबाबदारी पार पाडत आहे असे म्हणता येणार नाही. समाजाविषयाची कळकळ, अनिष्ट, अवैध, अनैतिक अशा प्रवृत्तीविरुद्ध आवाज उठविण्याची क्षमता, समाजातल्या उपेक्षितांचा कैवार, नीतिमूल्यांची चाड, अन्यायाविरुद्ध प्रहार ही अनंतरावांच्या पत्रकारितेची सर्व वैशिष्ट्ये आजच्या पत्रकारितेने आत्मसात करायला हवीत. वर्तमानपत्रे रंगीत झाली, त्यांची पृष्ठसंख्या वाढली, त्यांनी काळाचा वेग पकडला किंवा वेळेत ती वाचकांच्या दारात यायला लागली म्हणजे वर्तमानपत्रांचे काम संपले असे होत नाही. तंत्रज्ञानाने केलेले बदल महत्त्वाचे आहेत मात्र या बदलांमध्ये पत्रकारितेने आपल्या मूळ हेतूंना विसरु नये आणि ध्येयनिष्ठ पत्रकारितेचे अंतरंग बदलले जाऊ नये अशी अपेक्षा निश्चित करता येईल.

सर, आपल्या मुलाखतीवरुन असे वाटते की, आभासी दुनियेत पत्रकारांना जबाबदारीचा विसर न पडणारे अनंतरावजी होते.

सर, आपण वेळात वेळ काढून ही मुलाखत दिल्याबद्दल आपले खूप आभार.

# अण्णांची अत्तरकूपी : सेलू

**स्वप्निल शिवाजीराव मगर,** बी. कॉम. तृतीय वर्ष

**आजच्या महाराष्ट्रातील** तरुणांना कै. अनंतराव भालेराव म्हणजेच अण्णा हे केवल आपल्या लेखणी आणि सडेतोड विचार व भूमिकांनी 'दै. मराठवाडा'ला अजरामर करणारे, संपादकांचा महामेरू म्हणूनच जास्त ज्ञात असावेत. परंतु हे व्यक्तिमत्त्व एकाच साच्यात बसणारे नव्हे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक छटा आहेत. त्यापैकी एक म्हणजे भारतीय स्वातंत्र्यलढ्यात व हैदराबाद मुक्तिसंग्रामात सामान्य कार्यकर्त्यापासून ते नेतृत्वापर्यंत असलेला सहभाग. अण्णांचा जन्म तसा औरंगाबाद जिल्ह्यातील वैजापूर तालुक्यातील खंडाळा नावाच्या छोट्या खेड्यात काशीनाथराव भालेरावांच्या या वारकरी कुटुंबात झाला. त्यामुळे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर-तुकाराम महाराजांच्या विचारांचा संस्कार बालपणापासूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर झाला. वैजापूरात प्राथमिक शिक्षण झाले. त्यानंतर इंटरच्या पहिल्या वर्गात असताना म्हणजे १९३८ साली हैदराबाद स्टेट काँग्रेसच्या सत्याग्रहात अण्णांनी पहिला सत्याग्रही म्हणून नाव नोंदविले आणि अण्णांचा नवा जीवनप्रवास येथून सुरू झाला. अण्णांनी स्वातंत्र्यलढा, मराठवाडा मुक्तिसंग्राम, संयुक्त महाराष्ट्र चळवळ इत्यादींमध्ये विविध जबाबदाऱ्या स्वीकारत, सांभाळत विविध भूमिका पार पाडत अनेक तालुके व जिल्ह्यांमध्ये संघटन करून जनतेला जागृत करून स्वातंत्र्य संग्रामात, मुक्तिसंग्रामात, संयुक्त चळवळीत हिरिरीने सहभाग नोंदविण्यास प्रवृत्त केले. गाव, तालुकावार व जिल्हावार काम करीत असताना त्यांनी प्रत्येक ठिकाणी आपला परिवार तयार केला जो 'आजन्म', अण्णांच्या भाषेत सांगायचे झाले तर 'आमरण' मनाने त्यांच्यासोबत राहिला. यातील एक परिवार म्हणजे सेलू होय.

**अण्णा आणि सेलू :-**

अण्णा आणि सेलू हा संबंध फार गहिरा आहे. अगदी अण्णांच्या भाषेत सांगायचे झाले तर अण्णांसाठी सेलू म्हणजे संदुकात जपून ठेवलेली जुनी अत्तराची कूपीच आहे. जी उघडल्याने अण्णांचा मनोआसमंत एका मस्त सुगंधाने अगदी सचैल भरुन जातो. अण्णांचे मन जेव्हा जेव्हा उदास झाले तेव्हा तेव्हा अण्णांनी या कूपीचा भरभरून उपयोग केला. एवढेच नव्हे तर अण्णांसाठी सेलू म्हणजे आब्यांचे डेरेदार झाडही होते. ज्याच्या सावलीत विसावा घेऊन ताजे-तवाणे होऊन पुढील प्रवासासाठी ऊर्जा देणारे होते. अण्णांनी सेलूला विसावा म्हटले खरे पण या विसाव्यातून जो अंगार निर्माण झाला. त्या अंगाराने प्रथम मशालीचे व नंतर वणव्याचे रूप धारण करीत संग्रामात अनेक योद्धे उभे केले. म्हणून अण्णांच्या या विसाव्याला विसावा न म्हणता, मी विसाव्यातील अंगार असे म्हणतो.

सन १९३८ च्या सत्याग्रहात अण्णांना तुरुंगवास झाला. या तुरुंगवासात अण्णांची अनेकांसोबत मैत्री झाली. त्यात सेलूचे विनायकराव व राजाराम कोळीळही होते. तुरुंगातच असे ठरले की, तुरुंगातून सुटल्यानंतर विधायक कामासाठी सेलू हेच केंद्र बनावे. आणि घडलेही तसेच तुरुंगातून सुटल्यावर अण्णा

आपल्या मनोहर सोनदे या मित्रासोबत काही काळ वैजापूरी काम करून सेलूला आले आणि येथूनच सेलूच्या इतिहासाला नवे भविष्य व दिशा मिळाली.

१९३७ ते १९३९ हा तीन वर्षाचा कालावधी सेलूच्याच नव्हे तर मराठवाड्याच्या इतिहासात फार महत्त्वाचा कालखंड ठरला. मराठवाड्यातील जनतेच्या राजकीय आकांक्षा संघटनेचे रुप घेऊन अवतरल्या. परतूरच्या महाराष्ट्र अधिवेशनापाठोपाठ हैदराबाद स्टेट काँग्रेसची स्थापना झाली. लगेच तिच्यावर बंदी आल्यानंतर स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह सुरू करण्यात आला. हा मराठवाड्याचाच नव्हे तर हैदराबाद संस्थानातील संपूर्ण जनतेच्या राजकीय संघर्षाचा पहिला आविष्कार होता. त्या सत्याग्रहात भाग घेणाऱ्यांचा एक गट पुढे सेलूला एकत्र आला आणि सेलूमध्ये एक कायमचे राजकीय व सामाजिक कार्याचे प्रभावी केंद्र तयार झाले. या सत्याग्रहात सेलूचे भाग्यविधाते कै. श्रीरामजी भांगडियाजी यांचा प्रभावी सहभाग होता. हैदराबादेत सत्याग्रहासाठी एक भूमिगत यंत्रणा हरिश्चंद्रजी हेडा यांच्या नेतृत्वात कायम करण्यात आली होती. भांगडियाजी व हेडाजी यांचा फार घनिष्ठ स्नेह होता. थोडक्यात काय तर प्रस्थापित सत्तेविरुद्ध बंडखोरीच्या व स्वातंत्र्याच्या ज्या ऊर्मी प्रस्फुटीत होऊ लागल्या त्या सेलू परिसरातही कार्यरत होत्या. सर्वार्थाने नवयुगाचा प्रारंभ झाला होता. सेलूमध्येच नव्हे तर सर्व मराठवाड्यात आणि संस्थानात नव परिवर्तनाच्या प्रसूतिवेदना जाणवत होत्या. गावांचे परिसर स्वातंत्र्य आंदोलनाची धगधगती यज्ञकुंडे म्हणून विकसित झाली होती.

१९४२ साली देशभरात एक अनभूत वातावरण तयार झाले. प्रत्येकाच्या मनी कोणत्या तरी वेगळ्या संचाराची जाणीव होऊ लागली. स्टेट काँग्रेसवर बंदी आल्यामुळे भांगडियाजी व इतर महाराष्ट्र परिषदेचे कार्य करू लागले. सेलूत मोठ्या संख्येने सभासद नोंदविल्या गेले. याच साली अ.भा. काँग्रेसचे अधिवेशन मुंबईला भरले आणि गांधीजींनी इंग्रजी सत्तेला भारत सोडून जाण्याचा तर जनतेला 'करा किंवा मरा' असा आदेश दिला होता. या अधिवेशनासाठी सेलू-परभणीहून अण्णा व त्यांचे सहकारी गेले होते. अधिवेशनानंतर बड्या नेत्यांना अटक झाली होती. अण्णा व त्यांचे सहकारी लपत-छपत सेलूला आले होते. याच सुमारास भांगडियाजींनी सत्याग्रहाचा निर्धार अण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांसमोर मांडला. पण अण्णा व इतरांचा कल सत्याग्रहाइतकाच मोडतोडीकडे होता. त्या काळी विध्वंसाचे प्रकार फार मोठ्या प्रमाणात झाले होते. भांगडियाजी मात्र सत्याग्रह करून तुरुंगात गेले. त्यानंतर अण्णा व सहकाऱ्यांनी चळवळ करण्याचे ठरविले. पण हे करत असताना सेलूतील लोकांना सांगूनच करायची, अंधारात ठेऊन नाही असे ठरवून एक बैठक बोलावली व आपला मानस या बैठकीत व्यक्त केला. तेव्हा बहुतेकांनी त्याला अनुमती दिली. त्यानंतर बेचाळीसच्या चळवळीचे सेलू एक केंद्र बनले, तेही भूमिगत. त्यासाठी दोन जागा निश्चित केल्या. आबासाहेब बोधनकर ज्या फॅक्टरीचे मुनिम होते, त्या फॅक्टरीच्या आऊटहाऊसमधील दोन खोल्या व आनंदजीभाईंच्या दुकानास लागून असलेले गोदाम. यातून चळवळीचा कार्यक्रम चालत असे. अण्णांचे सहकारी मनोहर सोनदे यांनी मुंबईहून नवे सायक्लोस्टाईल यंत्र आणले तर विनायकरावांनी हैदराबादची पत्रके सेलूला व सेलूची पत्रके हैदराबादला मिळतील अशी व्यवस्था केली आणि काम सुरू झाले.

सेलू गावात बहुतेकांच्या घरी सायक्लोस्टाईल केलेले सरकारवर प्रहार करणारे पत्रक येऊन पडले. त्यात

गांधीजींचा आदेश तपशीलाने देऊन चळवळ सुरू झाल्याची माहिती दिली. जिकडे-तिकडे पत्रकाची चर्चा. आठ दिवसात सेलूचे वातावरण बदलले. बाजाराच्या दिवशी सत्याग्रहींच्या तुकड्या सत्याग्रह करू लागल्या. सत्याग्रह आणि सत्याग्रही यांची संख्या वाढू लागली. जालन्यापर्यंत सत्याग्रहींनी नावे नोंदविली. या सर्व प्रकारामुळे सरकार संतप्त होणे स्वाभाविकच होते. मनोहर सोनदे व विनायकरावांना अटक झाली होती. आंदोलन संपल्यानंतर भांगडियाजी, मनोहर सोनदे व विनायकराव सुटले आणि सेलू आंदोलनाचे प्रमुख केंद्र बनले.

सन १९४४ मध्ये अण्णा सेलू सोडून परिषदेच्या कार्यासाठी औरंगाबादी गेले. परिषदेचे पाचवे अधिवेशन विनायकरावांच्या म्हणण्यानुसार सेलूला घेण्यात आले. हे अधिवेशन अनेकार्थाने ऐतिहासिक झाले. हजारोंच्या संख्येत शेतकरीवर्ग उपस्थित झाला. त्यांची जेवणाची, निवासाची व्यवस्था चोख झाली होती. मराठवाड्याचा राजकीय इतिहास निर्णायक संग्रामाकडे नेण्याचा मान या अधिवेशनाला (आणि सेलूला) मिळाला होता. शाळा, मुले, शिक्षक व कार्यकारी मंडळ असे सगळेच कामाला लागून स्वयंसेवकांचे मोठे पथकच तयार झाले होते.

अशाप्रकारे सेलू हे संग्रामात, चळवळीत धगधगते यज्ञकुंड बनले होते. याचे श्रेय मोठ्या प्रमाणात अण्णांनाच जाते.

**अण्णा आणि शाळा :-**

या पृथ्वीतलावर ईप्सित साध्य करण्यासाठी एक साधन, कारण, निमित्त नक्कीच असते. जसे आत्म्याला मोक्ष प्राप्तीसाठी साधन देह असतो. मृत्यूला प्राप्त करण्यासाठी जीवन आहे. थोडक्यात काय तर अनित्यातून नित्याला प्राप्त करण्यासाठी साधनांची अपेक्षा असतेच. त्याचप्रमाणे अण्णांना देखील विसाव्यातील अंगार फुलवून स्वातंत्र्याचा धगधगता यज्ञकुंड सेलूला बनविण्यासाठी शाळा हे साधन होते.

१९३८ च्या तुरुंगवासातून बाहेर आल्यानंतर ठरल्याप्रमाणे अण्णा व मनोहर सोनदे सेलूस आले. प्रल्हाद गरुड, लक्ष्मणराव कुलकर्णी व विनायकराव चारठाणकर यांनी गावकऱ्यांच्या मदतीने बालवर्ग ते दुसरी असे वर्ग नूतन विद्यालय म्हणून सुरू केले होते. परंतु गावात आधीच पहिली ते चौथीपर्यंत शाळा असल्याने निजामी सरकार शाळेस मान्यता देणार नाही हे उघड होते. तसेच मोठे व्यापारी असलेल्या लालजी रामजी यांनी पाचवी ते सातवी असे कसेबसे चालणारे वर्ग आनंद विद्यालय नावाने खाजगी सुरू केले होते. अशा परिस्थितीत गावातील व्यापारी, वकील व प्रतिष्ठित नागरिक यांची बैठक बोलावून त्यामध्ये पहिली ते सातवी शाळा उघडण्याचा मानस अण्णा व सहकाऱ्यांनी व्यक्त केला. सरकारी विरोध व अन्य गोष्टीवरून नाही , हो म्हणत शेवटी सर्वांनी सम्मती दिली. तिसरी ते पाचवी वर्ग उघडण्यात आले. लोकांचा प्रतिसाद उत्तम व अनपेक्षित होता. सेलू जणू या क्षणाचीच वाटत पाहत होते. सेलूच्या सामुदायिक व्यक्तिमत्त्वाचे ते एक दर्शनच होते. त्यानंतर भांगडियाजी व आसरिया हेही संस्थेत आले. ठरल्याप्रमाणे वर्ग सुरू झाले. नऊ शिक्षकांची अपेक्षा होती. अण्णा, सोनदे, विनायकराव, लक्ष्मणराव आणि गरुड असे पाच जण होते. गावातीलच गाजरे व पांडव हे दोघेजण शिक्षक शाळेला मिळाले.

नागरिकांच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे स्वामीजींच्या हस्ते उद्घाटनसोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. स्वामीजी त्यावेळी एक मोठे नेतृत्व म्हणून उदयास येत होते. सरकारविरोधात बंडखोरी निर्माण करीत. त्यामुळे साहजिकच सरकार डोळ्यात तेल घालून या उत्सवाकडे आणि नूतन विद्यालयाकडे पाहत होते.

शाळेचा मुख्य उद्देशही देशभक्तीने भारलेले युवक तयार करणे हाच होता. मुलांच्या सर्वांगीण विकासात समाज आणि देश यांच्या विषयीच्या निष्ठेला अधिक महत्त्व ही शाळा देणार होती व हे कर्तव्य बजावताना जे काही सोसावे लागेल, ते सोसण्याच्या तयारीनेच या संस्थेचा शुभारंभ होत होता. समारंभ पार पडला आणि सरकार दफ्तरी शाळा व तिच्याशी संबंधितांची नावे देशद्रोही म्हणून नोंदली गेली. त्यामुळे गावात काही झाले तरी पहिला संशय शाळा व संबंधित लोकांवर येत असे. त्यामुळे पोलीस ठाण्याशी संपर्क वाढला.

वेळ जात होता शाळेचे वर्ग व व्याप वाढतच होता. पुढील दोन वर्ग काढणे क्रमप्राप्त झाले. त्यामुळे शिक्षकांची गरज भासू लागली. तेव्हा अण्णांनी राजाराम कोकीळ व राजाराम टंकसाळे यांना बोलवून घेतले. वाढत्या व्यापाला सांभाळण्यासाठी अजून सहकाऱ्यांची आवश्यकता होती. तेव्हा विनायकरावांनी सांगितले की, जिंतूरच्या तहसील कचेरीत सोनाजी कुलकर्णी नावाचे हुशार व उर्दूचे उत्तम जाणकार असणारे अहलेकार (कारकून) आहेत. प्रयत्न केल्यास ते संस्थेच्या कामी येतील. निजामी राजवटीत हिंदूंना नोकरी मिळणे दुरापास्त असताना मिळालेली नोकरी सोडून व घरची जबाबदारी असतानाही ते संस्थेत आले आणि उर्दू शिकवू लागले. त्याचबरोबर अल्पावधित संस्थेचा कारभार सांभाळू लागले. त्यांच्यानंतर गाजलेले स्कॉलर गोविंदराव देशमुखही संस्थेत आले. अशाप्रकारे एक-एक मौलिक रत्न सेलूच्या शिरपेचात जडू लागला आणि शाळेचा उद्देश सफल होत चालला होता.

व्याप वाढल्यामुळे शाळेला आर्थिक चणचण जास्त जाणवू लागली. शाळेला सरकारी अनुदान नव्हते. फीसही नाममात्रच होती. उत्पन्नाचे साधन म्हणजे मिळणारी देणगीच होती. तेव्हा भांगडियाजींनी व्यापाऱ्यांची बैठक घेऊन मालाच्या खरेदी-विक्रीवर कर लावण्याचा प्रस्ताव मांडला व तो सर्वसंमतीने मान्य झाला. सुरुवातीला कोकीळ व नंतर सोनाजी कुलकर्णी हे वर्गणी जमा करीत. सरकारच्या जुलमी नजरेने हे हेरले आणि प्रथमत: व्यापाऱ्यांवर दमदाटी करून व अन्य मार्गाने हा कर बंद करण्याचा प्रयत्न करू लागले. परंतु व्यापाऱ्यांनी दडपशाहीला न जुमानता अधिक सजगतेने व निर्धाराने कर जमा करून देऊ लागले. व्यापारी जुमानत नाही म्हटल्यावर सरकारने शाळेला अनेक उपायांनी अडचणीत आणण्याचा प्रयत्न केला. परंतु अण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांनी नेहमीच जशासतसे उत्तर दिले. दिवसेंदिवस शाळेचा विस्तार, व्याप वाढतच होता. तशी ती प्रसिद्धही होत होती. खेडोपाड्यातूनही विद्यार्थी शाळेत येऊ लागले. आणि कार्यकर्त्यांच्या फौजाच फौजा तयार होऊ लागल्या. त्यामुळे सरकार निरंतर शाळेला या ना त्या कारणाने थांबविण्याचा प्रयत्न करीत परंतु शाळा तितक्याच जोमाने राष्ट्रीय कार्य करण्यात समरस झाली होती.

अण्णांचा तसा सेलूतील विसावा चार-पाच वर्षांचाच होता, पण याच कालावधीत अण्णांनी शाळेच्या माध्यमातून सेलूला स्वातंत्र्यप्राप्तीचा धगधगता यज्ञकुंड बनवून गेले. त्यांच्या या अल्पशा विसाव्यात त्यांनी जो परिवार तयार केला. तो आजीवन केवळ अण्णांसमवेतच नव्हे तर तो सगळ्यांसमवेत राहिला. एवढेच नव्हे तर तो पिढी दर पिढी वृद्धिंगतच होत आहे. राष्ट्रीय कार्यात त्यांच्या खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या त्यांच्या परिवारातील काही प्रियजणांचा ओझरता प्रवास व या परिवारातील आत्मीयता स्वतंत्र व्यक्तिरेखेच्या रुपात पाहू या.

**आदरणीय श्री. श्रीरामजी भांगडिया :-**

सेलूचे भाग्यविधाते, दलितमित्र, सेलू शहराचे जनतेतून प्रेमपूर्वक निवडलेले प्रथम नगराध्यक्ष आदी बिरुदांनी सुपरिचित, बहुश्रुत व लाडके व्यक्तिमत्त्व म्हणजे श्री. श्रीरामजी भांगडियाजी. १९३८ च्या सत्याग्रहाच्या तुरुंगवासानंतर अण्णा सेलूला आले आणि राष्ट्रीय कार्यासाठी निर्माण केलेल्या नूतन विद्यालयात शिक्षकाची नोकरी करू लागले. देशभक्तीचा मूळ पिंड असणारे भांगडियाजीही १९३८ च्या सत्याग्रहापासून गांधीवादी बनले होते. तेही शाळेशी जोडल्या गेले. चळवळीच्या कामामुळे जवळीकता निर्माण होणे स्वाभाविक होते. यातच १९४२ साली अ.भा.काँग्रेसचे अधिवेशन मुंबईस भरणार होते. त्यासाठी अण्णा व भांगडियाजी आपल्या इतर सहकाऱ्यांसमवेत मुंबईस गेले. मुंबईहून परतल्यानंतर भांगडियाजींचे वर्णन करताना अण्णा म्हणतात, '१९३८ पासूनच भांगडियाजी पक्के गांधीवादी बनले होते. ते कधी गांधीजींच्या आश्रमात वगैरे राहिले नाहीत परंतु त्यांच्यावर आश्रमीय संस्काराचा फार पगडा होता. कधी ते बोलत नसत. परंतु त्यांच्यावर गांधीजींच्या एकाव्रताचा फार गडद परिणाम होता. ते पक्के अहिंसावादी होते. व्यापारी असले तरीही पैसा, मालमत्ता वा अन्य लौकिक मोहाचा उपसर्ग त्यांना झाला नाही. गांधीजी इतकाच जयप्रकाशजींचाही त्यांच्या व्यक्तिमत्वावर परिणाम होता.ते पक्के अंहिसावादी असल्याने त्यांना मोडतोड म्हणजे हिंसाच वाटायची. त्यामुळे त्यांनी सत्याग्रहाचा मार्ग निरंतर पत्करला.' सत्याग्रहात त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगावासातून मुक्तता झाल्यानंतर ते व्यापार उद्दिमात परत येतील अशी सर्वांचीच अपेक्षा होती. पण तसे घडले नाही. याविषयी अण्णा म्हणतात, 'भांगडियाजी हे मूलत:च एक मनस्वी गृहस्थ होते. स्वीकारलेल्या तत्त्वांपासून ढळणे त्यांना माहीतच नव्हते. मोह व स्वार्थ त्यांच्या आसपासही भटकत नव्हता. अपरिग्रह हा त्यांचा बाणाच बनला होता. सर्व गोष्टींचा त्यांनी क्षणार्धात त्याग केला. एखाद्या परिव्राजकासारखेच ते पुढचे जीवन जगत राहिले.'

अण्णांना जेव्हा जेव्हा भांगडियाजींची गरज भासली तेव्हा तेव्हा ते अण्णांसाठी उभे राहिले. मग ती चळवळ, सत्याग्रह असो किंवा शाळा. असा माणूस केवळ सेलूच्या भूमीतच भेटू शकतो. अण्णांचे आणि भांगडियाजींचे नाते वर्णनातीतच होते.

**चारठाणकर दाम्पत्य :-**

ऐश्वर्यसंपन्न, वतनदारी असलेल्या चारठाणकर-वाईकर घराण्यातील हे दांपत्य. १९३८ च्या सत्याग्रहात विनायकरावांनी सहभागी होऊन या दोन्ही घराण्याला राजद्रोहाचा पहिला धक्का दिला. तुरुंगात ठरल्याप्रमाणे विनायकराव १९३९ साली सपत्नीक सेलूस आले. सेलूमध्ये दीड खोलीमध्ये गीताबाईंसह संसार थाटला. विनायकराव पेशाने वकील पण सुरुवातीस घरासमोर नावापुरतीच पाटी होती. गावकऱ्यांच्या मदतीने विनायकरावांनी गरुड व लक्ष्मणराव कुलकर्णींसमवेत बालवर्ग ते दुसरीपर्यंत नूतन विद्यालय नावाने शाळा काढली. अण्णा आणि मनोहरराव सेलूस आल्यानंतर या शाळेचा सर्वांनी मिळून गावकऱ्यांच्या मदतीने विस्तार केला आणि शाळेत काम करू लागले. विनायकरावांच्या मस्तकी निरंतर शाळा राष्ट्रीय कार्यच असे. याविषयी अण्णा म्हणतात, 'बेचाळीसचा सत्याग्रह, महाराष्ट्र परिषद, सेलूतील अधिवेशन, स्टेट काँग्रेसचा लढा हे सर्व एकापाठोपाठ विनायकरावांच्या अंगावर कोसळत असताना ते उत्कृष्ट योद्धे बनून लढले.'

गीताबाई विषयी सांगताना अण्णा म्हणतात, 'देशभक्तीचा कसलाही संस्कार नसलेल्या गीताबाईंमध्ये

दिलदारपणा, आव्हाने घेण्याची जिद्द होती. त्यांची मूस करारी होती. राजकीय कार्याला लागूनच सामाजिक क्षेत्रात उभ्या राहिलेल्या संघर्षाला त्यांनी अतिशय जिद्दीने लढा दिला. त्यांच्या शौर्याने निजामी पोलीसही वचकून राहात.' पुढे गीताबाईचा स्वभावविशेष सांगताना अण्णा म्हणतात, "गीताबाईंचा विशेष असा की, त्या परिस्थितीशी पदोपदी झगडत गेल्या व त्यातून शिकत गेल्या. त्यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत गेले. त्या मुत्सद्दी होत्या.'

विनायकरावांना नगराध्यक्षपद मिळण्यामध्ये त्यांचा खूप मोठा वाटा आहे. अण्णा या दांपत्याचं विशेष वर्णित करताना म्हणतात, 'विनायकराव स्वभावाने व वृत्तीने अगदी शांत, मृदू व शालीन तर गीताबाई तेवढ्याच तापट व जशास तसे या न्यायाने वागणाऱ्या होत्या. विनायकरावांच्या घरी जणू मराठी बाराखडीच पूर्णत्वाला आली होती. सर्व मृदूव्यंजने विनायकरावांच्या रुपाने तर कठोर व्यंजने गीताबाईच्या रूपाने आकारली होती. अशा या दांपत्यासमवेत अण्णांचा स्नेह शेवटपर्यंत राहिला.

**आसारियाभाई चतुर्भूज :-**

भांगडियाजी हैदराबाद सोडून सेलूस आले. चरितार्थासाठी काय करावे या विचारात असतानाच त्यांची आणि आसारिया भाईंची भेट झाली. भांगडियाजी कापूस व्यापारात तज्ज्ञ होते तर, भाईंची सेलूमध्ये फर्म होती. दोघेजणही भागीदार झाले. आणि बघता बघता भाईंची फर्म सेलूच्या पहिल्या रांगेत येऊन बसली. अण्णा त्यांच्याविषयी म्हणतात, 'मी तरी असे प्रामाणिक व जीवाभावाचे मित्र यापूर्वी पाहिले नव्हते. हे दोघेजणही एकमेकांना पूरक असेच होते.'

भांगडियाजी तुरुंगातून आल्यानंतर त्यांनी सर्वच गोष्टींचा त्याग केला. पण आसारियाभाईंनी भांगडियाजींना ते आपले भागीदार नाहीत असे कधीच भासू दिले नाही. भाईंनी त्यांना निरंतर झुकते माप देण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच अण्णा म्हणतात, 'भाई म्हणजे सज्जन व उमद्या मनाचे गृहस्थ.' त्यांचे दुकान कार्यकर्त्यांसाठी निरंतर खुलेच असायचे. कोणताही नेता त्यांच्याकडेच उतरत असे. अशा उमद्या मनाच्या माणसाने प्रत्येक विवंचनेमध्ये साथ दिली.

**मित्र द्वयी : प्रल्हाद गरुड व लक्ष्मणराव कुलकर्णी:-**

निजामी सरकार राजकीय संघटनेला परवानगी देत नसल्यामुळे लोकांनी आखाडे, व्यायामशाळा, वाचनालये आणि खाजगी राष्ट्रीय शाळांचा पर्याय शोधून काढला. परभणी व नांदेड जिल्ह्यात व्यायामशाळा इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अधिक होत्या. या क्षेत्रात प्रल्हाद गरुड व लक्ष्मणराव कुलकर्णी यांची कामगिरी महत्त्वाची. हे मित्रद्वयी सेलूला येऊन स्थायिक झाले आणि रामवाड्यात त्यांनी व्यायामशाळा सुरू केली. सेलूतील बरीच तरुण मंडळी त्यांनी आकर्षित केली. काही कालावधीनंतर प्रल्हाद गरुड, लक्ष्मणराव कुलकर्णी व विनायकरावजींनी येथेच गावकऱ्यांच्या मदतीने बालवर्ग ते दुसरीपर्यंत नूतन विद्यालय नावाने विद्यालय सुरू केले.

अण्णा व मनोहर सोनदे सेलूस आल्यानंतर शाळेचा विस्तार होत गेला तसा तो त्यांच्या मैत्रीतही होत गेला. सर्वजणांनी शाळेच्या माध्यमातन वाहून घेत एक अवीट असा मित्रपरिवार तयार केला व शेवटच्या श्वासापर्यंत टिकवून ठेवला.

**मनोहर सोनदे :-**

गजान्त लक्ष्मीचा मुक्त वावर असणाऱ्या सावकाराच्या घरात जन्मलेले, टाप-टीपीत जीवन जगणारे मनोहर सोनदे आणि अण्णा एकाच गावचे रहिवाशी होते. पूर्वी त्यांचे सख्य नव्हते. १९३८ च्या सत्याग्रहाच्या तुरुंगवासात त्यांचे जे सख्य जमले

ते शेवटपर्यंत तसेच राहिले. अण्णांनी आपल्या स्मृतीकोशात त्यांची जी प्रतिमा साकारली ती व्यक्त करताना म्हणतात, 'A' Man is Capital Letters.'

तुरुंगातून सुटल्यानंतर अण्णा आणि मनोहर सोनदे एकत्रच सेलूला आले आणि नूतन विद्यालयात सामील झाले. मनोहररावांनी कापडाचे दुकानही टाकले. शाळेत ते अवैतनिक शिक्षक म्हणून काम करीत असत. शाळेस पूरक साहित्य, फर्निचर आणि मुख्याध्यापकासाठी स्वतंत्र कक्ष हे सर्व त्यांच्याच विचारातून व कृतीतून साकारलेल्या गोष्टी. अण्णा त्यांच्या व्यक्तिमत्त्वाविषयी सांगताना म्हणतात, ''मनोहर मोठा साक्षेपी व रसिक जीवनवादी होता. तर वैचारिकदृष्ट्या पक्का नास्तिक होता. धर्म वगैरे त्याला मान्य नव्हते. तर मी पुष्कळ कर्मठ होतो.' कालांतराने दोघांच्याही स्वभावात बदल होऊन अण्णा निरीश्वरवादी तर मनोहरराव उपास–तापास करणारे झाले.

राष्ट्रीय कार्यासाठी मुंबईहून सायक्लोस्टाईल आणून पत्रके तयार करून वाटणारे मनोहरराव पुढे पूर्णवेळ कार्यकर्ता बनून जालन्याला गेले. तेथून स्वगावी प्रगतीशील शेतकरी आणि पुन्हा औरंगाबादी येऊन राहिले. एक परमस्नेही पिता, राष्ट्रीय कार्यात सर्वस्व त्यागणारा कार्यकर्ता आणि मैत्रीचे संबंध जपणारा एक सच्चा मित्र. अण्णांच्या जीवनात मनोहररावांचे स्थान खरोखर `Capital letter' चेच राहिले.

**राजाराम कोकीळ :-**

शाळेला अधिक शिक्षकांची गरज भासू लागल्यानंतर अण्णांनी तुरुंगसहवासातील मित्र राजाराम कोकीळ यांना सेलूला बोलावून घेतले. तेही शाळेत रुजू झाले आणि अध्यापनाबरोबरच शाळेचा हिशोब व संस्थेचे कामकाजही पाहात. त्याचबरोबर व्यापाऱ्यांकडून मिळणारी वर्गणीही वसूल करीत. अण्णांनी व काही सहकाऱ्यांनी मिळून राजाराम कोकिळांचा संसार थाटला. याविषयी अण्णा म्हणतात, 'शाळेच्या निमित्ताने झालेले हे पहिले सामाजिक उद्‌बोधन होय.' राजाराम कोकीळ यांनी शाळा व चळवळीच्या कार्यात स्वत:ला वाहून घेतले होते. अण्णांच्या मते, राजारामावर त्यांच्या मोठ्या बंधूचा प्रभाव होता.

**सोनाजी कुलकर्णी :-**

नूतन विद्यालयाचा जसजसा विस्तार होत होता तसतसा कामाचा व्यापही वाढत होता. तेव्हा अण्णांनी विनायकरावांसमोर अजून सहकारी आवश्यक असल्याचे सांगितले. तेव्हा विनायकरावांनी जिंतूरच्या तहसीलमध्ये अत्यंत हुशार व उर्दूचे उत्कृष्ट ज्ञान असणाऱ्या अहलेकाराविषयी सांगितले. ते अहलेकार म्हणजे सोनाजी कुलकर्णी. निजामी राजवटीत हिंदूंना नोकरी मिळणे दुरापास्त असताना सोनाजी कुलकर्णी अहलेकार म्हणून जिंतूरला कार्यरत होते.

विनायकरावांनी त्यांना शाळेविषयी सांगितल्यावर सोनाजी कुलकर्णी स्वत:हूनच सेलूला शाळेत उर्दू विषयाचे शिक्षक म्हणून सामील झाले. शाळेच्या विरोधात असणाऱ्या निजामी सरकारने शाळेत उर्दू शिक्षणाची सोय समाधानकारक नसल्याचे सांगितल्यावर यावर उपाय म्हणून शाळेने सोनाजींना 'मुन्शीफाजिल' पदवीच्या समकक्ष असणाऱ्या पर्शियन परीक्षेसाठी लाहोरला पाठविले. ते तेथून 'अदीब फाजिल' परीक्षा उत्तीर्णही होऊन आले. पण सरकारला मुस्लीम शिक्षकच हवा होता. सोनाजी कुलकर्णींनी शाळेला पूर्णपणे वाहून घेतले होते. कोणतेही काम करण्याचा त्यांचा हातखंडा वेगळाच होता. याविषयी सांगताना अण्णा म्हणतात, 'सोनाजी स्वभावाने भडभड्या नव्हता. जे काय करायचे ते नीट योजनापूर्वक, विचार करून निर्धाराने करायचे. ठरल्यावर पाऊल मागे घ्यायचे नाही. आणि निश्चय

अंमलात येईपर्यंत त्याविषयी फारसे कुठे बोलायचे नाही. स्वत:विषयी न बोलण्याचे व्रत त्याने शेवटपर्यंत पार पाडले.' सोनाजी कुलकर्णींच्या हिशोबीपणाविषयी सांगताना अण्णा पुढे म्हणतात, 'व्यापारी मंडळी अनेकदा कर विसरून जात. तेव्हा ते सोनाजीचा शब्दच प्रमाण मानत आणि त्याने सांगितलेली रक्कम डोळे झाकून त्याच्या स्वाधीन करत.' सोनाजी गुरुजी आणि गोविंदराव गुरुजी यांचे सख्य सर्वविदित होते. या मित्रद्वयीने सेलूस देखणा असा शैक्षणिक परिसर उभा केला. याचेच फळ म्हणून दोघांनाही आदर्श शिक्षकाचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. अण्णा आणि सोनाजी गुरुजींचा ऋणानुबंध इतका होता की, त्यांच्यात शिष्टाचार कधीही आडवा येत नसे.

त्यांची कामाप्रती आणि शाळेप्रती असणारी निष्ठा अलौकिक होती. या अलौकिक निष्ठेविषयी अण्णा म्हणतात, ''सोनाजीने जगाचा निरोप घेत असताना आपल्या लहान मुलाला शरदला जवळ घेऊन म्हटले, 'शाळेचे काही पैसे सेलूला माझ्या बॅगेत ठेवले आहेत. आणि शाळेची कीर्द अर्धवट राहिली आहे तेवढी पूर्ण कर आणि कीर्द व पैसे शाळेच्या स्वाधीन कर.' मृत्यूशय्येवर असणारा बाप आपल्या मुलाला मालमत्ता, आई-बहिणींचा सांभाळ कर असे सांगत असतो, पण अंतिम क्षणीही सोनाजीच्या मनात शाळाच होती. किती ही ध्ययनिष्ठा.'' खरोखरच असा ध्येयनिष्ठ मित्र अण्णांच्या सहवासात होता.

**गोविंदराव देशमुखः-**

परभणीत 'स्कॉलर' म्हणून गाजलेलं व्यक्तिमत्त्व म्हणजे गोविंदराव देशमुख. १९४३ साली नूतन विद्यालयात सामील झाले. अण्णांचे ते कॉलेजमित्र. मॅट्रिकमध्ये प्रावीण्य मिळवून औरगांबादला इंटर सायन्समध्ये दाखल झाले. एक बुद्धिमान विद्यार्थी म्हणून कॉलेजमध्ये त्यांचा लौकिक होता. राष्ट्रप्रेमामुळे 'वन्दे मातरम्' संपात सामील होऊन नागपूरला गेले व तेथेच सायन्सची परीक्षाही प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. भूममध्ये खाजगी शाळेत शिक्षक म्हणून नोकरीला लागले. तेव्हा अण्णा व सहकाऱ्यांनी विनंतीपत्र पाठविल्यानंतर सोनाजी गुरुजीप्रमाणेच पडत्या फळाची आज्ञा समजून सेलूच्या शाळेत गणिताचे शिक्षक म्हणू रुजू झाले. राष्ट्रीय कार्याबरोबरच शाळेसाठी त्यांनी स्वत:ला वाहून घेतले होते. शाळेमध्ये त्यांचे सख्य सोनाजी गुरुजींसोबत झाले. त्यांच्या व सोनाजी गुरुजींच्या स्नेहाविषयी सांगताना अण्णा म्हणतात, 'गोविंदराव व सोनाजी यांची मैत्री म्हणजे दोन देह व एक आत्मा होय.'

त्यांच्या या सेवाव्रताला आदर्श शिक्षक या राष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले. अण्णा, सोनाजी गुरुजी आणि गोविंदराव गुरुजी यांचा पारिवारिक स्नेह आजही पिढी दर पिढी वाढतच आहे.

**आनंदजी भाई :-**

बेचाळीसची चळवळ सुरू झाली तेव्हा अण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांना पैशाची गरज निर्माण झाली. तरुण व्यापारी मंडळाचे सहकार्य तर होतेच, परंतु तेवढ्याने काम भागत नव्हते. त्यावेळी भांगडियाजीही तुरुंगात होते. अशा परिस्थितीत आनंदजीभाईंकडे शब्द टाकण्यात आला. त्यावेळी अण्णांचे त्यांच्याशी एवढे ऋणानुबंध नव्हते. ते मोठ्या फर्मचे मुनीम होते. मोंढ्यात त्यांना फार मान होता. चळवळीसाठी गोदाम देऊन त्यांनी जोखीम पत्करलीच होती. पुन्हा त्यांची मदत घेणे जीवावर येत होते. पण बोलावेच लागले. तेव्हा त्यांनी आम्हाला रक्कम दिली आणि सांगितले की, 'चळवळ संपेपर्यंत लागणारी रक्कम दुकानातून घ्यावी.' त्यांनी दिलेला शब्द अखेरपर्यंत पाळला. 'चळवळीसाठी पैसे देणारा हितचिंतकच नव्हे तर एक उदार मनाचा मित्र व देशभक्त आमच्या

परिवाराला जोडला गेला.' अशा भावना अण्णा आनंदजीभाईंविषयी व्यक्त करतात. असे हे आनंदजी भाई पोलीस कार्यवाहीपर्यंत स्वातंत्र्य आंदोलनाला तन-मन-धनाने मदत करत राहिले.

**आबाराव बोधनकर :-**

बेचाळीसचे चळवळीचे केंद्र सेलूत चालवावे असा अण्णा व त्यांच्या सहकाऱ्यांचा मानस होता. हा मानस हितचिंतकासमोर अण्णांनी मांडला. त्यावेळी आबारावजी शाळेचे सेक्रेटरी होते. शाळेला जेव्हा पैशाची नड जाणवे तेव्हा आबाराजी ती नड आपल्या फर्ममधून भागवत. या चळवळीला व केंद्राला सर्वांनीच मूक संमती दिली. आबारावजी ज्या फॅक्टरीचे मुनीम होते त्या फॅक्टरीच्या आऊटहाऊसच्या दोन खोल्या चळवळीसाठी आबांनी अण्णांना दिल्या. आबारावजीचे घर म्हणजे शिक्षकांचे आश्रयस्थानच होते. त्यांच्या पत्नी सर्वांच्या काकू झाल्या होत्या. खेळ संपल्यानंतर सर्व शिक्षक मंडळी आबांच्या घरी जात असल्याने पुष्कळदा जेवणही तेथेच होत असे. शाळा आणि चळवळीच्या निमित्ताने आबारावांसारखा स्नेही अण्णांना भेटला होता.

**अमजद युसुफ जई :-**

सोनाजी गुरुजी उत्कृष्ट उर्दू शिकवत असत. तरीही निजामी सरकार समाधानी नव्हते तेव्हा सोनाजी गुरुजी लाहोरला जाऊन 'अदीब फाजील' नावाची परीक्षा उत्तीर्णही होऊन आले. तरीही सरकारचे समाधान झालेच नाही. कारण त्यांना उर्दू शिक्षविण्यासाठी शिक्षक म्हणून मुस्लीमच हवा होता. तेव्हा अण्णा व शाळेची पुरती कोंडी झाली होती. तेव्हा हैदराबादच्या ऊर्दू दैनिकात जाहिरात दिली. अर्ज बरेच आले पण मुलाखतीला एकजणच उपस्थित राहिला. त्यांचीच निवड झाली. ते म्हणजे अमजद युसुफ जई. अण्णा त्यांच्याविषयी म्हणतात, 'ते मुसलमान होते परंतु विचाराने आणि वृत्तीने आमच्यासारखेच धर्मनिरपेक्ष व स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते होते. ते रझाकार चळवळीचे कडवे विरोधक होते.' परंतु शासकीय जातीयवाद्यांना ते रुचले नाही. त्यांना निष्क्रिय करण्यासाठी फार प्रयत्न झाले. याविषयी अण्णा म्हणतात, 'त्यांनीच अमजदला सेलूत राहू दिले नाही.' असाही एक स्नेही अण्णांच्या परिवारात होता.

हे सर्व वेगवेगळ्या झाडावरचे पक्षी सेलूरुपी वृक्षावर एकत्र आले आणि नात्यागोत्यापेक्षाही अधिक सुदृढ अशा बंधनाने बांधल्या गेले. ते बंधन देशप्रेमाचे आणि देशभक्तीचे होते. नात्यागोत्याची बंधने स्वार्थामुळे भाऊबंदकीचे स्वरूप धारण करतात. देशभक्तीचे तसे नसते. ती देशभक्तांना निर्मळ, शुद्ध आणि नि:स्वार्थी बंधनांनी एकत्र बांधत असते. ते बंधन शरीराला काचत नाही तर एका मातीच्या आळ्यात लावलेल्या रोपाप्रमाणे वाढत जाते. फुलाने पाकळी-पाकळीने उमलत जावे तसा हा परिवार उमलत गेला आणि आपला परिमल पिढी दर पिढी पसरवीतच आहे.

अण्णांची सेलूतील ही चार - पाच वर्षे त्यांना विसाव्यासारखी वाटतात. पण माझ्या मते या विसाव्यातही अण्णांनी राष्ट्रप्रेमाचा व राष्ट्रभक्तीचा अंगार टाकून त्यांतून सेलूला राष्ट्र आणि समाजजागृतीचे व चेतनेचे एक धगधगते यज्ञकुंडच बनविले. असे असले तरी या कालावधीत अण्णांचा यांच्या जमलेला ऋणानुबंध अत्तराच्या कूपीप्रमाणे त्यांना आनंदच प्रदान करीत राहिला. अण्णांचा सेलूतील मित्रपरिवार तसा मोठा आहे. पण प्रत्येकाविषयी इथे लिहिणं थोडं अवघडच आहे त्यामुळे क्षमस्व!

# अनंतराव भालेराव व्यक्तित्व व कृतित्व

**मंदाकिनी कैलास बिडवे,** बारावी कला

**मराठवाडा म्हणताच** मागासलेपण डोक्यात येते. मराठवाडा म्हणजे दुष्काळ, अशा प्रदेशात जन्मलेला खंडाळ्याचा सुपुत्र म्हणजे अनंतराव भालेराव.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्वातंत्र्यसैनिक आणि लेखक, संपादक. हैदराबाद मुक्तीसंग्राम लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावल्यानंतर अनंतरावांनी संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील सत्याग्रहातही भाग घेतला. त्याबद्दल सक्तमजुरीच्या आणि तुरुंगवासाच्या शिक्षाही भोगल्या. स्वातंत्र्योत्तर काळात औरंगाबादहून प्रसिद्ध होणाऱ्या 'मराठवाडा'तून त्यांनी सातत्याने समाजहिताची व विकासाची भूमिका घेत लेखन केले. विकासासाठी जनतेने केलेल्या आंदोलनात आणि पत्रकार  व साहित्यिकांची एक पिढी घडविण्यात भालेरावांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

आपल्या राजकीय किंवा सामाजिक ध्येयाच्या पूर्तीसाठी लोक शिक्षणाचे साधन म्हणून वृत्तपत्र आवश्यक आहे हे लक्षात घेवून जी माणसं पत्रकार झाली त्यात अनंतरावांची गणना करण्यात येते. अनंतरावांचे भाग्य असे की, वारकरी परंपरा, स्वातंत्र्य चळवळ आणि या दोन्हीच्या जोडीला दारिद्र्य अशा तीन गोष्टींचा संस्कार त्यांच्यावर झाला.

अनंतराव मॅट्रीकनंतर इंटरच्या पहिल्या वर्गात असताना १९३८ मध्ये हैदराबाद स्टेट कॉँग्रेसने जबाबदार राज्यपद्धतीच्या मागणीसाठी सत्याग्रह सुरू केला. अनंतरावांनी पहिले सत्याग्रही म्हणून आपले नाव नोंदवले. त्यांनी वैजापूर येथे आयुष्यात पहिल्यांदा सत्याग्रहात भाग घेतला. त्याबद्दल त्यांना सक्तमजुरीची तीन महिन्यासाठी शिक्षा झाली. त्यानंतर त्यांना उर्दू शाळेतून काढून टाकण्यात आले.

नागपूरला जाऊन ते इंटरची परीक्षा उत्तीर्ण झाले व सेलू येथील नूतन विद्यालयात त्यांनी शिक्षक म्हणून काम सुरू केले.

१९४२ मध्ये 'चले जाव आंदोलन' सुरू झाल्यानंतर त्यांनी शिक्षकी पेशा सोडून हैदराबाद स्टेट कॉँग्रेसचा कार्यकर्ता म्हणून अनंतरावांनी पूर्णवेळ कामास प्रारंभ केला. १९४७ पर्यंत त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

१९५३ ते १९५६ या काळात संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत आणि पुढे आणीबाणीच्या काळात अनंतरावांनी पत्रकार आणि सक्रिय कार्यकर्ता या नात्याने महत्त्वाची भूमिका बजावली. १९४८ मध्ये मुंबईत अनंतरावांनी 'मराठवाडा' या साप्ताहिकाचे सहसंपादक म्हणून काम पाहिले. हैदराबाद येथे सहा वर्षे अनंतराव पत्रकार संघाचे अध्यक्ष होते. एप्रिल १९५३ ला 'मराठवाडा'चे संपादकपद अनंतराव भालेराव यांच्याकडे सोपवले गेले. १९७४ मध्ये मराठवाड्याच्या विकासासाठी झालेल्या आंदोलनाला 'मराठवाडा'च्या माध्यमातून अनंतरावांनी सक्रिय पाठिंबा दिला. भारतात घोषित झालेल्या आणीबाणीच्या काळात सत्याग्रह केल्याबद्दल त्यांना अटकही करण्यात आली.

अनंतरावांनी साहित्य चळवळीतही सहभाग घेतला. मराठवाडा दैनिकांच्या माध्यमातून नव्या

जाणिवांचे प्रवाह साहित्यात आणणाऱ्या साहित्यिकाच्या पिढीला त्यांनी प्रोत्साहन दिले. औरंगाबाद येथे मराठवाडा साहित्य परिषदेची स्वत:ची इमारत तयार करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले.

अनंतरावांची बरीच पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. अनंतरावांना फाय फाउंडेशनचा पुरस्कार, अत्रे प्रतिष्ठानचा पुरस्कार अशा अनेक पुरस्कारांनी गौरविले गेले.

अनंतरावाच्या नावाने लेखक, कलावंत पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते यांना अनंत भालेराव स्मृती पुरस्कार देण्यात येतो.

**अनंतराव आणि आणीबाणी**

जयप्रकाश नारायण यांनी देशभरामध्ये भ्रष्टाचार, बेकारी, महागाई इत्यादी प्रश्नांवर जनआंदोलन उभे केले. त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी पुकारली. आणीबाणी पुकारल्यानंतर नागरी स्वातंत्र्यावर बंधने आली. या आणीबाणीला लोकशाही व्यक्तींचा विरोध होता. अनंतरावसुद्धा त्यांच्यापैकीच एक होते. वर्तमानपत्रावर सेन्सॉरशिप लादल्या गेली. वृत्तपत्रांमध्ये काय छापावे आणि काय छापू नये हेही सरकार ठरवू लागले. आणि त्यामुळे स्वातंत्र्य लढ्यात सहभागी असलेले अनंतराव या हुकूमशाहीच्या विरोधात उभे राहिले. हुकूमशाहीच्या विरूद्ध अग्नि फुलविणे हे पत्रकार या नात्याने आपले काम आहे असे मानून त्यांनी त्यावेळी आपली लेखणी परजली. त्यांच्या लेखनावर प्रसिद्धीपूर्व नियंत्रणाचा बडगा उभारला गेला तेव्हा सेन्सॉर केलेल्या मजूकरांच्या जागा कोऱ्या सोडून ते अग्रलेख छापू लागले. नंतर यावरही जेव्हा बंदी आली तेव्हा सेन्सॉरच्या कात्रीत न सापडणाऱ्या वक्रोक्तिच्या शैलीत ते लिहू लागले. आणीबाणीनंतर छापण्यात दै. मराठवाड्याचे अंक अभ्यासण्यासारखे आहेत. दै. मराठवाड्याची दिवाळी अंक काढण्याची परंपरा अभिमानास्पद होती. मराठवाड्याने एक दिवाळी अंक प्रकाशित केला आणि त्यात जगातील हुकूमशाहीचा वेध घेतला गेला.

लोकशाही मूल्यांचा विशेषत: विचार स्वातंत्र्याचा घास घेणाऱ्या आणीबाणीविरुद्ध फक्त शब्दांनी लढत बसण्यावर त्यांचे समाधान होणे शक्य नव्हते. त्यांच्यातला लढाऊ कार्यकर्ता स्वस्थ बसू देत नव्हता. आणीबाणी लादल्यावर चार महिने चाललेलं आपलं शब्दयुद्ध थांबवून सत्याग्रह करण्याच निर्णय त्यांनी घेतला. त्यांनी सत्याग्रह केल्याने काहीही साधणार नाही, असे अनेक मित्रांनी त्यांना सुचविले. पण संकटात पहिली उडी ठोकण्याचा त्यांचा स्वभाव उफाळून वर आला होता. आपल्या शाब्दिक विरोधाला सत्याग्रहाची जर आपण जोड दिली नाही तर आपल्या शब्दाची किंमत शून्य ही भावनाही त्यांच्या निर्णयामागे होती. आपल्या माघारी दैनिकाचं काय होणार हा प्रश्न कृतिशील कार्यकर्त्याचा पिंड असणाऱ्या अनंतराव समोर नव्हता. युवक क्रांती दल चळवळीतून आलेल्या निळू दामले वर आणि त्यांचे जुने सहकारी असलेल्या गोपाळ साक्रीकरांवर दैनिकाची जबाबदारी टाकून आणि सत्याग्रह करून ते हर्सूल कारावासात दाखल झाले. दोन महिन्यांनी तेथून सुटका झाल्यावर त्यांना तात्काळ मिसाखाली अटक करून नाशिकला पाठविण्यात आले.

# अनंतदृष्टी

अयोध्या विनायकराव जोगदंड

**अनंतराव भालेराव** यांची सहा पुस्तके प्रकाशित आहेत. मी सहाही पुस्तकाचे वाचन करून केवळ त्याचा परिचय आपणास करून देणार आहे. या पुस्तकाचे परिक्षण करणे हे माझे उद्दिष्ट नाही. विद्यार्थ्यांनी भावी आयुष्यात या पुस्तकाचे वाचन केल्यास त्यांना अनंतराव यांचा काळ, त्या काळातील समस्या, राजकीय, सामाजिक स्थिती आणि ती परिस्थिती बदलण्यासाठी आपल्या पूर्वीच्या पिढींनी केलेल्या कार्याचे स्मरण करता यावे इतकीच माफक अपेक्षा आहे.

अनंतराव यांचे पहिले पुस्तक **पळस गेला कोकणा (१९८४)** हे आहे. अनंतराव भालेराव यांचे बंधू डॉ. उद्धव हे अमेरिकेत असतात. त्यांच्याकडे अनंतराव व सुशिलाबाई अडीच महिने राहून भारतात आले. भारतात आल्यावर मित्रांच्या आग्रहावरून त्यांनी परदेशातील अनुभवाच्या आधारे दहा लेख लिहून दै. मराठवाड्यात प्रसिद्ध केले. त्यानंतर मित्रांच्या आग्रहावरून त्यांना पुस्तक लिहिण्याची प्रेरणा प्राप्त झाली व त्यांच्या लेखणीतून पळस गेला कोकणा हे पुस्तक साकार झाले. अनंतरावांना अमेरिकेतील आर्थिक क्षेत्रापेक्षा भारत व अमेरिकेतील इतर अनेक क्षेत्रात दोन समाजाची एकूण जडणघडण, एकंदर भिन्न रचना आहे हा फरक मोठ्या प्रमाणात जाणवला. अनंतराव स्तंभित झाले ते अमेरिकेतील स्वच्छतेने, नीट नेटकेपणा, टाप-टीपीने, कामसू वत्तीने, शिस्त, वक्तशीरपणा व विज्ञाननिष्ठेने. या सर्व गोष्टी संस्कृतीचा परिपोष आहे, असे त्यांना वाटते. अमेरिकेत परिश्रम करावे लागतात व त्यामुळे परिश्रमाचे सुखात रुपांतर झाले आहे आणि त्यासाठी अखंड माणसे श्रमत असतात. त्या तुलनेने त्यांना भारतीय माणसांतील आळस खूप खुपला. अमेरिकन माणसाच्या मनातील भारतप्रेमही त्यांना सुखावून गेले.

**आलो याचि कारणासी (१९८४)** - मराठवाडा या वृत्तपत्रात प्रकाशित झालेल्या अनंतरावांच्या १९५६ ते १९८४ या कालखंडातील संपादकीयमधून ४७ संपादकीय समाविष्ट करून हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले. हे पुस्तक प्रकाशित व्हावे यासाठी नरहर कुरुंदकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अनंतराव यांनी एप्रिल १९५३ ला मराठवाड्याचे संपादक म्हणून जबाबदारी स्वीकारली. तेव्हापासून ते पुस्तक प्रकाशित करण्याचे ठरले. या प्रदीर्घ अवधीतील जे काही संपादकीय लिहिल्या गेले त्यातील एक हजार अग्रलेख निवडले गेले व त्यातून मर्यादित लेखांची निवड करणे फारच अवघड होते. अग्रलेख वाचून अनंतरावांच्या विचारांचे, दृष्टीचे व वृत्तीचे समग्र दर्शन घडते. स्थूलमानाने शैली, विचारांची दिशा अथवा कला याबद्दल माहिती कळते. अनंतरावांच्या वर एका बाजूला वारकरी संप्रदायाचा प्रभाव तर दुसऱ्या बाजूला गांधीवादाचा प्रभाव. अनंतरावांवर एका अभंगाचा प्रत्यय नित्य येत गेला. आपण कोण तर थेट वैकुंठाचे रहिवाशी. येथे आलो कशासाठी ? तर पूर्वसूरींनी, ऋषीमुनींनी जे सांगून ठेवले ते साच भावे वर्तनासाठी, स्वतःचे काही नाही. पूर्वसूरींचेच ऋण परंतु ते इमानदारीने लोकयथार्थ पोहचवायचे या भूमिकेतून त्यांनी अग्रलेख लिहिले व समाजापर्यंत पोहचवले.

**स्वामी रामानंद तीर्थ (१९८९)** नॅशनल बुक स्ट्रट इंडियाने देशातील राष्ट्रीय चारित्र्य असलेल्या नेत्यांची पुस्तके प्रसिद्ध करण्याचा निर्णय घेतला आणि त्याच मालिकेत अनंतरावांनी स्वामी रामानंद तीर्थ यांच्या जीवन व कार्यावर लिहावे असे सुचविले. त्याप्रमाणे अनंतरावांनी स्वामी रामानंद तीर्थ या

पुस्तकाचे लेखन केले. हैदराबाद संस्थानातील स्थितीपासून सुरूवात करून त्यांनी रामानंद तीर्थांचे चरित्र बालपणापासून रेखाटले आहे. त्यांचे हैदराबाद संस्थानातील कार्य, महाराष्ट्राच्या निर्मितीतील योगदान, वाचकापुढे संक्षिप्त स्वरूपात ठेवले आहे. स्वामी रामानंद तीर्थांची वैचारिक परंपराही त्यांनी स्पष्ट केली आहे.

**हैदराबाद मुक्तिसंग्राम आणि मराठवाडा (१९८७)** – हैदराबाद संस्थानात कर्नाटकातील तीन जिल्हे तेलगांनातील ८ व मराठवाड्यातील ७ जिल्ह्यांचा समावेश होता. अनंतरावांनी हैदराबाद संस्थानात झालेल्या लढ्याचा ऐतिहासिक मागोवा या ग्रंथात घेऊन एक उणीव दूर केली आहे. या मागोव्यात मराठवाड्यातील स्वातंत्र्यसंग्रामाचा विस्ताराने इतिहास लिहिला आहे. हा इतिहास मराठवाड्याचा जरी असला तरीही संस्थानातील चळवळीचा तपशील याच्यातून कळतो. राज्य पुनर्रचना झाल्यानंतर झालेली राजकीय पुनर्रचना लक्षात घेऊन त्यांनी तेलंगाना व कर्नाटकातील चळवळीपेक्षा मराठवाड्यातील चळवळीवर भर दिला आहे. परंतु चळवळ उभी करण्यात मराठवाड्याइतकाच संस्थानातील इतर दोन भागांचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळे हा इतिहास हैदराबाद संस्थानाचा ठरावा अशी त्यांनी मांडणी केली आहे. या इतिहासाच्या मागे असलेल्या आर्थिक, सामाजिक, धार्मिक अशा विविध शक्ती होत्या. त्यांचाही तटस्थपणे त्यांनी अभ्यास केला आहे. हा इतिहास लिहिण्यासाठी त्यांनी अनेकांचे सहकार्य घेतले होते. विशेषत: स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्थेने त्यांना या लेखनामध्ये खूप सहकार्याची भूमिका घेतली होती. या पुस्तकाची जी प्रस्तावना अनंतराव भालेराव यांनी लिहिली आहे त्यात त्यांनी आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी त्यांना हे पुस्तक लिखाण करण्यासाठी हैदराबादहून खूप साहित्य उपलब्ध करून दिले असा उल्लेख केला आहे. ही आमच्यासाठी अतिशय गौरवपूर्ण बाब आहे.

**मांदियाळी (१९९४)** मांदियाळी या पुस्तकामध्ये डॉ. सुधीर रसाळ यांनी अनंतराव आधुनिक वारकरी हा भाग लिहून अनंतरावांचा जीवनपट वाचकांपुढे ठेवला आहे. त्यानंतर अनंतराव भालेराव यांचे पूर्वप्रसिद्ध झालेले काशीनाथराव खंडाळकर मौज दिवाळी अंक १९९० आई–आत्या एक द्वैताद्वैत साधना दिवाळी १९९२ नागनाथ एक अवघड गणित मौज दिवाळी १९९२ हे तीन याच ग्रंथात पुनर्मुद्रित केले असून इतर सहा अप्रकाशित लेख मांदियाळी या ग्रंथात समाविष्ट केले आहेत. अनंतरावांचे आई–वडील, आत्या यांच्यासोबत मराठवाड्यातील नागनाथ परांजपे, बाबासाहेब परांजपे, गोविंदभाई श्रॉफ आणि आ. कृ. वाघमारे या व्यक्तिविशेषांचाही या ग्रंथात समावेश केला आहे. परभणी या खानदानी शहराने त्यांना प्रभावित केले होते. परभणी – एक बहिर्मुख खानदानी गाव या शीर्षकाखाली त्यांनी परभणीचे माहात्म्य सांगितले आहे.

**पेटलेले दिवस** – या पुस्तकामध्ये अण्णांनी आपल्या स्वातंत्र्य संग्रामातील चळवळींचा आढावा घेतलेला आहे.

या सर्व पुस्तकांचं अवलोकन केल्यानंतर अनंतराव केवळ पत्रकार वा संपादकच नव्हते तर ते एक उत्कृष्ट साहित्यिकही होते. त्यांचा शब्दांचा गुणग्राहीपणा, माणसांचा गुणग्राहीपणा, त्यांची शैली सर्वकाही अद्भुतच असल्याचे जाणवते. त्याचबरोबर त्यांची समन्यायी भूमिकाही आपल्याला स्पष्टपणे दिसून येते. काळ कोणताही असो संकटे ही सर्वांवरच येत असतात, पण संकटांना तोंड देत मोडेन पण वाकणार नाही या नीतीतत्त्वाने चालणारे अनंतराव कदाचित एकमेव असावेत. समाजातील गरीब वर्गाविषयी, शेतकऱ्यांविषयीची त्यांची आत्मीयता हे सर्वकाही संपादकामध्ये असते का? हा मुळातच प्रश्न पडतो. असे एक ना अनेक प्रश्न पडतात आणि त्या सर्व प्रश्नांचे उत्तर म्हणजे अनंतराव भालेराव.

# प्रेरणा

२०१९-२०

# मराठवाडा

## अनंतराव भालेराव यांचे निवडक अग्रलेख

# १. साच भावे वर्ताया

आजपासून 'मराठवाडा' दैनिक म्हणून प्रकाशित होत आहे. दैनिकाचा हा पहिला अंक वाचकांच्या सेवेत रुजू करताना आनंद तर होतच आहे. परंतु एक समाधानही लाभत आहे. मराठवाडा या संस्थेच्या इतिहासात दैनिकाच्या रूपाने एक नवे प्रकरण लिहिले जात आहे.उणापुरा तीस वर्षांचा कालखंड संपला. १९३८ साली तेव्हाच्या हैदराबाद संस्थानातील जनतेच्या स्वातंत्र्य आंदोलनाचा एक भाग म्हणून पहिला सत्याग्रह सुरू झाला. या पत्राचे संस्थापक आ. कृ. वाघमारे यांचा हे आंदोलन संघटित करण्यात फार मोठा पुढाकार होता. सत्याग्रहासाठीच नव्हे तर संस्थानी जनतेवर लादलेल्या दुहेरी गुलामीतून तिची मुक्तता करण्यासाठी दुप्पट प्रयत्नांची गरज होती. स्वातंत्र्य आंदोलनाचा अग्रदूत म्हणून 'मराठवाडा' सुरू झाला तेव्हाचा तो रोमांचकारी इतिहास, जुलमांचे ते सत्र, सत्तेच्या प्रत्येक आघाताबरोबर उफाळून येणारा उत्साह, भूमिगत स्वरूपात रेल्वेच्या आऊटर सिग्नलजवळ 'मराठवाड्या'चे बेकायदा पार्सल पडले म्हणजे तेथून ते हस्तगत करून त्याचा गुपचुपपणे होणारा बटवडा, 'मराठवाड्या'च्या अंकासाठी नागरिकांच्या झडत्या, अशा नाना आठवणींची मनात गर्दी उसळते. वाटते, जणू आपण त्या वर्तमानातच आहोत. डोळ्यादेखत सर्व घडते आहे. आम्हांला चांगले आठवते आहे. बलवंत मोफत वाचनालयात विद्यार्थी वर्तमानपत्रे वाचायला जात. मात्र, एके दिवशी अवचितपणे टेबलावर जाहिराती डकवलेल्या आढळल्या. आनंद कृष्ण वाघमारे यांचा 'मराठवाडा' पुण्याहून पुढच्या आठवड्यात अवतीर्ण होत आहे. जाहिरातीचे वाचन झाले आणि एखाद्या बंडाळीची वार्ता कानोकान सर्वत्र पोचावी त्या वेगाने ही जाहिरात मराठवाडाभर पोचली. साधे साप्ताहिक वर्तमानपत्र ते काय ? पण तेव्हा त्याचीच एक घटना घडली. लोकांच्या मनावर एवढे मोठे अधिराज्य महाराष्ट्रातील थोड्याच वृत्तपत्रांनी प्रस्थापित केले असेल. 'मराठवाडा' पत्राने ते भाग्य मनसोक्त उपभोगले आहे. नुसते उपभोगले नाही तर त्यासाठी भरपूर सोसलेही आहे.

काळाची अनेक आवर्तने येऊन गेली. विषय बदलले, संदर्भ बदलले, आशयात फरक पडला. इतिहासाच्या या प्रचंड घालमेलीत, उत्पाती वादळात 'मराठवाडा' पत्राची क्षीणबल ज्योत तेवत राहिली. क्षीणबल मुद्दामच म्हटले आहे. भोवतालच्या प्रंचड उलथापालथीच्या तुलनेत 'मराठवाड्या'चे असे कितीसे सामर्थ्य होते ? परंतु ते अविरतपणे टिकले, ही गोष्ट मात्र खरी आहे. वास्तवाचे श्रेय आपल्याकडे घेऊ इच्छिणारी क्षुद्र मने 'मराठवाडा' संस्थेच्या आसमंतात ना आज आहेत ना पूर्वी कधी होती. आपण निमित्तमात्र हे येथे सर्व जण ओळखून होते व आहेत. अलिप्तपणे या सर्व प्रवाहांकडे बघितले म्हणजे गंमत वाटते, हे मात्र खरे आहे. याच अलिप्ततेने दैनिकाच्या दिशेने प्रस्थान ठेवताना काही आत्मनिरीक्षण शक्य झाले आहे, अशी आमची भावना आहे.

**नवी जबाबदारी**

जुन्या इतिहासाचे सदैव पवाडे गाण्यात फारसे हशील नाही. कोणत्या दर्जाचे कर्तव्य आपल्या भाळी आहे, एवढ्यापुरता या इतिहासाचा उपयोग मात्र नक्की करून घेतला पाहिजे. स्वातंत्र्य-संपादनाचा देदीप्यमान इतिहास घडवण्यात या 'मराठवाडा' पत्राने फार मोठा वाटा उचलला त्याचे आता दैनिक होत आहे. ही जबाबदारी फार मोठी आहे. आगापिछा नसणाऱ्यांची पाटी कोरी असल्याने तेथे संस्था, परंपरा वगैरे संज्ञांना वाव नसतो. आनंद कृष्ण वाघमारे यांच्यासारखे धुरंधर पत्रकारित्व, मराठवाडा विश्वस्त मंडळावर आरंभापासून असणारे गोविंदभाई व बाबासाहेब यांची सार्वजनिक क्षेत्रातील तपश्चर्या आणि 'मराठवाडा' पत्राचे ज्या जनतेने आजवर संगोपन केले तिच्या अपेक्षा यांनी दैनिकाच्या संचालकांच्या पायात मणामणांच्या बेड्याही पडू शकतात आणि त्यांचे आपोआप उन्नयनही होऊ शकते. महनीय व्यक्तिमत्त्वाच्या खांद्यावर बसून जनतेच्या हिताहितांची, अधिकारांची आणि तिच्या शिक्षांची देखभाल, रखवालदारी करण्याची ही कामगिरी म्हणजे फार मोठी कसरत ठरण्याचा संभव आहे. मराठवाडा अर्धसाप्ताहिकाने ती गेली १९ वर्षे आत्मसात केली, असा आमचा समज आहे. काही चुका झाल्या असतील, प्रसंगविशेषी तोलही गेला असेल; परंतु एकूण खांद्यावरचे मचाण कोसळले नाही हे तर खरेच आहे. पुढच्या प्रवासासाठी हे पाथेय खूपच उपयोगी पडेल, असा आमचा विश्वास आहे.

'दैनिक मराठवाड्या'चा संकल्प विश्वस्त मंडळाने गेल्या चार महिन्यांपूर्वी सोडला. नदीच्या पात्रात ओंजळीत पाणी घेऊन बरेच दिवस उभे होते; परंतु संकल्प परवा सुटला. परिस्थिती तीच, पूर्वी होती तशी, पायघोळ लंगोटीचा प्रकार. सर्व सुरूवात शेंडीपासून; परंतु हे नमूद करताना साभिमान आनंद वाटतो की, 'मराठवाड्या'च्या सर्व पक्षोपक्षांतील हितचिंतकांनी, नाना थरांतील मित्रांनी रिते भांडार समाधानकारकपणे भरून काढले. आता मागे फिरण्याची सोयच नव्हती. पाहिजे ते घ्या; पण दैनिक करा, असा तगादा सुरू झाला. या भागातील लोकांचे हे प्रेम, त्यांचे हे औदार्य आणि त्यांनी दिलेला आश्रयच दैनिकाच्या जन्माला कारण ठरलेला आहे. लोकांचे हे ऋण या जन्मात तरी फिटणे शक्य नाही.

## दैनिक कशासाठी ?

'दैनिक' कशासाठी, ते कोणासाठी, त्याचे धोरण कोणते, असे नाना प्रश्न विचारण्यात आले व येत आहेत. नव्याने या प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत अशातला भाग नाही. 'मराठवाडा' पूर्वी होता त्यात धोरणाने पुढे चालेल. तो कोणा एका पक्षाचा असणार नाही. संपादक, संचालक अथवा मित्र-परिवार यांच्या व्यक्तिगत पक्षीय विचारांना दैनिकाच्या धोरण-निश्चितीत गौण स्थान असेल. खरे म्हटले तर, याच्या पुनरुच्चाराची तशी गरज नाही; परंतु विकल्प राहू नये म्हणून सांगितले. 'मराठवाड्या'ने आजवर कोणत्याही व्यक्तीचा द्वेषबुद्धीने अगर इतर तऱ्हेने विरोध केला नाही. सामूहिक जीवनाच्या प्रवाहात व्यक्तीच्या महत्त्वाला सर्व दृष्टींनी मर्यादा असतात, याची आम्हांला जाणीव आहे. म्हणून व्यक्तिविरोध आम्ही निषिद्ध मानला आहे. व्यक्तीवर वेळी, प्रसंगी प्रहार करावा लागला तो केवळ त्यांच्या धोरणांवर व समाजजीवनावर परिणाम करणाऱ्या त्यांच्या आचरणावर. सहकाराचे, समाजवादाचे, लोकशाहीचे नाव घ्यावयाचे, प्रत्यक्ष आचरणात मात्र या सर्व सिद्धांतांना काळिमा फासावयाचा, असे जेथे घडले तेथेच व्यक्तीच्या विरोधी लेखणी उचलावी लागली. एरव्ही व्यक्तीच्या खासगी जीवनाशी आम्हांला काही कर्तव्य नाही. मात्र, ज्या व्यक्ती समाजाच्या व सर्वसामान्यांच्या या हिताचा आड येतील, दंभ माजवतील सत्तेच्या मस्तीने धुंद होऊन जे जनतेच्या डोक्यावर वरंवटा फिरवू बघतील त्यांना कडवा विरोध करण्याचे आजवरचे व्रत दैनिकातही चालू राहील. आपल्या देशात महात्मा गांधींनी ज्या अनेक चांगल्या परंपरा सार्वजनिक क्षेत्रात रूढ केल्या त्यांत सार्वजनिक कार्यकर्त्यांचे चारित्र्य धुतल्या तांदळासारखे असावे व त्यांच्या कृतीत आणि उक्तीत विसंगती असू नये, ही परंपरा आम्हाला महत्त्वाची वाटते. गांधीजी स्वत:तर तसे जगलेच; परंतु त्यांच्या पिढीतील बहुतेक मंडळींवर या परंपरेचा सतत वचक राहिला. आमचे असे मत आहे की, यामुळेच आपल्या येथे सार्वाजनिक कार्याला विशुद्धता प्राप्त झाली. दुर्दैवाने गांधीजींचा वारसा शिरोभागी मिरवणाऱ्यांनाच या विशुद्धतेचे महत्त्व कळाले नाही. त्यांनीच परंपरेचा विचका उडविला. अशा दांभिकांच्या रंगाढंगांची गय करणे म्हणजे लाचारी पत्करणेच होय. हे अवधान राखून या अपप्रवृत्ती समाजजीवनात निष्प्रभ ठरविणे हे कोणत्याही चांगल्या वृत्तपत्राचे कर्तव्य ठरते. 'मराठवाडा' ते यथाशक्ती करीत राहणार आहे.

## सत्कर्माचे गाऊ पोवाडे !

लोकशाही आणि समाजवाद या सिद्धांतांवर आमची असीम श्रद्धा आहे. केवळ श्रद्धा असावी म्हणून ती आहे असे नाही, तर या दोन रचना निर्दोषपणे या देशात स्थिर झाल्या नाहीत तर हा देश सर्वसामान्यांना आपला वाटणार नाही, त्यांना भवितव्य उरणार नाही आणि ज्या जनतेचा टिळा लोकशाहीवादी आपल्या कपाळी लावतात त्या जनतेचे प्रश्न मूलत: सुटणार नाहीत, या विश्वासातून या सिद्धांतांचा आम्ही स्वीकार केला आहे. या सूत्रानुसार एखाद्या पक्षाला अगर विचारांना आमचा विरोध राहील. शोषण, संधिसाधूपणा, लाचखोरी, लांड्यालबाड्या आणि फोडाफोड यावर जे आपले प्रपंच उभे करतात, त्यांना सर्वसामान्यांच्या हितासाठी नुसताच विरोध करून चालत नाही तर या सर्व कुप्रवृत्तींचा नि:पात करू शकेल एवढी जनतेची

शक्ती वाढवावी लागते. आजवर 'मराठवाड्या'ने हे व्रत यथामति आचरले आहे आणि इत:परही ते चालू राहणार आहे. समाजहिताचे काम कोणाच्याही हातून होवो त्याला चांगल्या वृत्तपत्राचा पुरस्कार मिळायलाच हवा. नव्याने काय आणि किती म्हणून सांगायचे, आणि त्याची गरज तरी काय ?

दैनिक 'मराठवाडा' कशासाठी निघतो, याचे उत्तर तुकाराम महाराजांच्या शब्दांत देणेच शक्य आहे. आम्ही वैकुंठवासी, आलो याचि कारणासी, बोलिले जे ऋषी, साच भावे वर्ताया, या अभंगचरणाचा पहिला भाग तुकोबांसारख्या संतश्रेष्ठाच्या तोंडी शोभणारा आहे. आपण त्यांची बरोबरी कशी करायची म्हणून आम्ही दुसरा भाग तेवढा दृष्टीसमोर ठेवला आहे. नवे असे आपण काय करणार आहो ? ज्या थोर पुरुषांनी बोलून ठेवले, सांगून ठेवले तेच 'साच भावे वर्तणे' एवढाच आमचा निर्धार. हा निर्धार सर्वत्र पसरला पाहिजे. त्यासाठी संतांचे मार्ग झाडू आणि कळीकाळाला दरारा बसविणे जरूर असेल तर तेही करू. मात्र, हे शेवटी आनंदाच्या जयजयकारासाठी.''

*(१५ ऑगस्ट १९६८, दैनिक 'मराठवाडा')*

**अनंतराव आणि साहित्य परिषद**

अनंतरावांनी मराठवाडा दैनिकात साहित्य, कला यावरच्या बातम्यांना भरपूर स्थान दिले. मराठवाड्याचे सांस्कृतिक जीवन संपन्न व्हावे असे त्यांना वाटे. मराठवाडा साहित्य परिषद त्यांनी लहान मुलासारखी जोपासली. त्यांनी या संस्थेचे अध्यक्ष वा कोणत्याही पदाची जबाबदारी घेतली नव्हती, परंतु मराठवाडा साहित्य परिषद वाढवण्यात त्यांचा मोठा वाटा होता.

# २. मृगाने बहार केली

'मृग नक्षत्र लागून आज बारा-तेरा दिवस होत आहेत. गेल्या काही वर्षांपासून महाराष्ट्राच्या सर्व भागांत व विशेषत: मराठवाड्यात सर्वश: मृगाचा पाऊस झालाच नाही. त्याआधीच्या रोहिण्या जेमतेम पडावयाच्या. त्यामुळे जमिनीत जी काही ओल येईल तिच्यावर विसंबून शेतकऱ्यांनी पेरण्या करावयाच्या. पुढच्या एकेक नक्षत्राने हुलकावण्या द्यावयाच्या, अशी परिस्थिती काही भागांत वर्षाआड तर दुष्काळी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भागांत गेली दहा वर्षे सातत्याने आहे. दुष्काळाची आणि अवर्षणाची एवढी सवय झाली आहे की, ठरलेल्या नक्षत्रात पाऊस पडेल यावरचा परंपरागत विश्वासच उडावा. त्यामुळे यंदा मृगाचा पाऊस हे नक्षत्र लागल्यापासून सुरू झाला याचेच लोकांना खूप अप्रूप वाटते आहे आणि त्यामुळे सध्या तरी सर्वत्र एक अनुपम आनंद व उत्साह आढळून येत आहे.

निसर्गासारखा दाता नाही असे म्हणतात ते काही खोटे नाही. एरव्ही आपण किती जरी धरणे बांधली, पाट खणले, बारमाही सिंचनाची व्यवस्था केली तरी सर्व भूमी सस्यश्यामला दिसत नाही. मधूनमधून हिरवी ठिगळे आढळतात आणि त्यामुळे गोधडीचे दारिद्र्य अधिकच नजरेत भरते. परंतु एक-दोन पावसाचे शिपके येऊन गेले की, सर्व भूमी कशी तरारून उठते. पूर्ण चंद्राच्या दिशेने समुद्राचा कण अन् कण धावत सुटावा तद्वत पावसाच्या थेंबाथेंबाने तृषार्त भूमी तृप्त होते आणि हिरवळीच्या रूपाने तिचे समाधान मोहरून येते. पंधरा-तीन वारांपूर्वी सहज प्रवासाला निघालो तर खिडकीतून बाहेर तोंड काढू नये आणि करपलेल्या ओसाड जमिनीचे दर्शन घेऊ नये असे वाटायचे तीच भूमी आज हिरव्या रंगाने भिजून चिंब झाली आहे. ठिगळ नव्हे तर जणू कोण्या तरी मोठ्या रंगाऱ्याने सर्व भूमीवर हिरवा रंगच ओतून टाकला आहे. पंधरा दिवसांत एवढा फरक, निसर्गाच्या दानाची इतर दानाला सर येत नाही अशा वेळी पटते!

यंदा मृगाने फार बहार उडवून दिली आहे. गेले वर्ष अजून मनातून गेले नाही. मृगच नव्हे तर त्यानंतरच्या मोठमोठ्या नक्षत्रांची वाट बघून असंख्य शेतकऱ्यांचे डोळे शिणले. पाऊस आलाच नाही. काही भाग असे होते की, जेथे संपूर्ण पावसाळ्यात ८-१० इंचांच्यावर पाऊस झाला नाही. यंदा काही निराळेच चित्र दिसते आहे. औरंगाबाद शहरात व सभोवतीच्या परिसरात आताच ७-८ इंच पाऊस झाला असेल. कन्नड, गंगापूर, वैजापूर हे तालुके दुष्काळी. गेल्या वर्षीच नव्हे तर दहा वर्षांत या भागाकडे पावसाने ढुंकूनही बघितले नव्हते. अवकाळी पावसाने या भागातील रबीची पिके तगली. अन्यथा हाहाकार माजला असता. यंदा या असल्या भागात आता म्हणजे मृग संपण्याच्या आधीच ५-६ इंच किमान पाऊस होऊन चुकला आहे. काही ठिकाणी

पेरण्या सुरू झाल्या आहेत तर काही ठिकाणी उघडीप नसल्याने पेरण्या खोळंबल्या आहेत.

उस्मानाबाद आणि नांदेड या दोन जिल्ह्यांत तुलनेने मृग उशिरा सुरू झाला. शेजारच्या परभणीत दोन मोठे पाऊस होऊन गेले तरी नांदेड कोरडे होते. उस्मानाबादची अवस्था तीच होती. परंतु गेल्या तीनचार दिवसांत या दोन जिल्ह्यांतही पावसाने कमाल केली. धो धो करीत तुफान पाऊस कोसळला. नांदेडला गोदावरीच्या पाण्याची पातळी आताच ३९ फुटांपर्यंत वाढली आहे, तर उस्मानाबादेत अवघ्या तास-दीड तासात दोन-अडीच इंच पाऊस झाला. बीड आणि परभणीत रोहण्यांपासूनच पाऊस बरसतो आहे. औरंगाबादची आणि शेजारच्या बुलढाणा व नगर या दोन जिल्ह्यांची अवस्थाही यंदा समाधानकारक आढळते.

जुना समज असा की, रोहिण्या पडल्या तर मृग बरसत नाही. साधारणपणे पावसाची झड मघा नक्षत्रात लागत असते. परंतु हे दोन्ही समज यंदा खोटे ठरले. अवेळी पाऊस तर पावसाळ्याच्या आधी झालाच; परंतु रोहिण्यांचा पाऊस होऊनही मृगाने चांगली निवांत हजेरी लावली. गेल्या तीन दिवसांत सूर्यदर्शन औरंगाबाद विभागात तरी निमित्तापुरतेच झाले! वातावरण एकदम पावसाळी. दीड ते दोन दिवस जवळजवळ संततधारा कोसळली. काही ठिकाणी पावसाचा जोर जबरदस्त होता. आधीच्या वादळाने भरपूर विध्वंस केले असल्यामुळे मृगाचा जोर पावसाच्याच स्वरूपात दिसला. आता हे लिहीत असताना पाऊस थोडा लांबला आहे. परंतु मृगराजाच्या शाही सवारीचा सर्व सरंजाम, सर्व फौजफाटा आपल्या ठिकाणी सज्ज आहे. आकांक्षांच्या नगाऱ्यावर टिपरी केव्हा पडेल आणि उलटे कारंजे केव्हा कोसळेल काही सांगवत नाही, इतके आभाळ भरून आहे. वातावरण ओलेगच्च, प्रसन्न व धुंद आहे. सर्वांच्या एकत्रित आनंदात एक निराळेच सुख असते. आगळीच बेहोषी असते! त्याचाच प्रत्यय या वेळी येत आहे.

थोडी उघडीप झाली तर आता मराठवाड्याच्या पाच जिल्ह्यांत व विदर्भाच्या बुलढाणा, अकोला या जिल्ह्यांत, नगर जिल्ह्यात आगाताच्या पेरण्या होतील. सुदैवाने यंदाचा हंगाम चांगला दिसतो. पुढचा विचार आता करण्याची गरज नाही. म्हणून दुष्काळी भागात जी मोठी कामे सुरू झाली आहेत ती वेगाने पुढे रेटीत राहिले पाहिजे. दुष्काळ-निवारणाच्या किती तरी नव्या गोष्टी आता परिचित झाल्या आहेत. निवडून गेलेल्या प्रतिनिधींनी व लोकांनी त्यापैकी काहींचा आग्रह धरून सरकारकडून त्या करवून घेतल्या पाहिजेत. आताच्या आनंदात त्यांचा विसर पडू नये. यंदाच्या पावसाळ्यात नदीनाले व छोटीमोठी धरणे भरून वाहताना दिसत आहेत. ती कायम या स्थितीत कशी राहतील हे बघितले पाहिजे.''

*(दि. २० जून १९७८, दैनिक 'मराठवाडा')*

## ३. मृत्यूच, पण मृत्यूला रडविणारा!

'गेला बुधवार आणि विशेषत: त्या दिवशीची संध्याकाळ एका आकस्मिक, परंतु दारुण हल्ल्याची तयारी करूनच उगवली. कुरुंदकर औरंगाबादी आले आणि अवघ्या काही तासांतच त्यांची प्राणज्योत निमाली. हे लिहिताना मनाला असह्य वेदना होतात. असा विपरीत प्रसंग कधी काळी येईल असे वाटले नव्हते. व्हावयास हवे होते ते उलट; पंरतु कुरुंदकरांच्या मृत्यूविषयीच लिहिण्याचा दुर्धर प्रसंग ओढवला आहे खरा. असे काही अघटित होण्याचे तादृश कारण नव्हते. कुरुंदकर आता कुठे तरी पन्नाशीत होते. परिपक्व आणि अनुभवसिद्ध जीवनाचा निवांत काळ इथून पुढचाच तर होता. परंतु म्हणतात ना, की मृत्यूही जीवन खुडण्यासाठी स्मरणीय क्षणच निवडीत असतो. कुरुंदकरांचे जीवनपुष्प असेच अकाली खुडले गेले. त्यांच्या जीवनाच्या सूर्याला जणू माध्यान्हच माहीत होती. अस्तमान त्याला ठाऊक नव्हता. जगातील बहुतेक बुद्धमंतांनी सायंकाळ बघितलीच नाही. त्यांची जीवने प्रखर मध्यान्हाचा माथा चढून तेथेच अंतर्धान पावली. अशा देदीप्यमान जीवनात कुरुंदकरांचा अंतर्भाव झाला हे जरी स्वाभाविक आणि योग्य होते तरी या माणसाच्या मृत्यूने मराठवाड्यातीलच नव्हे तर अखिल महाराष्ट्रातील असंख्य स्त्री-पुरुषांच्या काळजाला घरे पाडली. जन्म-मृत्यू आपण नित्यच बघत असतो, सुखदु:खाचे कढही अनुभवीत असतो. परंतु मृत्यूचा एवढा निष्ठुर आणि कठोर घाला यापूर्वी कधी पाहिला नव्हता. कुरुंदकरांचे प्राणोत्क्रमण झाले त्या क्षणापासून त्यांचे पार्थिव गोदावरीच्या काठावर अग्नीच्या स्वाधीन होईपर्यंत अक्षरश: शेकडो आबालवृद्ध स्त्री-पुरुषांना ढसाढसा रडताना, हंबरडे फोडताना, मूर्च्छित होताना, एकमेकांच्या अंगावर कोसळताना बघितले आणि काळजाने ठावच सोडला. रडणारे, शोकविव्हल झालेले, शोकसागरात बुडालेले वगैरे शब्द आपण अन्य वेळी सवयीचा भाग म्हणून वापरतो. परंतु कालचा गुरुवार नांदेडमध्ये उगवला आणि मावळला तो अतीव कारुण्य देऊन आणि घेऊनच. कुरुंदकरांचा मृत्यू आकस्मिक होता, करुण होता, दु:खद होता वगैरे शब्दांच्या संहती वर्णनाला अपुऱ्या आहेत. ही घटनाच इतकी करुण आणि वेदनेने चिंब झालेली होती की, कुरुंदकरांचे जीवन हिरावून नेणाऱ्या मृत्यूलाही या विलक्षण मृत्यूने नक्कीच रडवले असणार. कोणी तरी आपल्या हृदयाची काढघाल करीत आहे, असा विलक्षण अनुभव येत आहे. या सर्वांचे तात्पर्य एवढेच की, कुरुंदकर आपणातून गेले आणि ते आता परत कधी दिसणार नाहीत.

कुरुंदकरांचा मृत्यू अनेकांच्या जिव्हारी लागला. त्याचे कारण असे की, या माणसाला अनेकांनी आपल्या डोळ्यांदेखत लहानाचा मोठा होताना बघितले. एक अवखळ विद्यार्थी, एक धुंदीचा तरुण, एक वाचनवेडा पीर, वादविवादात हार न माणणारा तर्कटखोर, एक आदर्श शिक्षक, एक निष्णात प्राध्यापक, एक लोकप्रिय प्राचार्य आणि व्युत्पन्न बुद्धीचा, प्रचंड व्यासंगाचा एक विद्वान अशा विविध रुपांत कुरुंदकर यशाच्या शिखराकडे जाताना आपण बघितले आहेत. त्यामुळे या माणसाशी मराठवाड्यातील परिवारचेच नव्हे तर महाराष्ट्रातील अनेक जाणत्या माणसांचे घट्ट ऋणानुबंध जोडले गेले. आपल्या आयुष्यात आपल्याला जे साधले नाही ते आपल्याबरोबर इतर कोणी तरी करून दाखववे यात परोक्ष असेल; परंतु जे अलिप्त समाधान लाभत असते तसे कुरुंदकरांच्या बाबतीत झाले. मराठवाड्यात म्हणून अनेकांना असे वाटत आले आहे व वाटत राहील की, आपल्यातले जे काही उत्तम, उन्नत भवितव्य असेल त्याचे प्रतीक कुरुंदकर होते. मराठवाड्यात त्यांच्याविषयी लहान–मोठ्यांच्या मनात जी भूषणाची, गौरवांची आणि अभिमानाची भावना आढळते तिच्यामागे हेच कारण होते. अनेक लोक कुरुंदकरांत आपलेच उन्नयन बघत होते.

अध्यापक आणि विद्यार्थी, कॉलेजे आणि विद्यार्थी यांचे संबंध हल्ली धड राहिले नाहीत, कोणी कोणाला विचारीत नाही, अशा परिस्थितीत कुरुंदकर सरांसाठी ओक्साबोक्शी रडणारे विद्यार्थी व विद्यार्थिनी बघितल्या आणि कुरुंदकरांच्या अध्यापनकौशल्याची पावतीच मिळाली. नरहर कुरुंदकर संपत्तीने संपन्न नसतील, नसू देत; परंतु विद्यार्थ्यांच्या प्रेमाची संमती त्यांच्याइतकी क्वचित इतर कोणाला लाभली असेल. प्रत्यक्ष त्यांच्या वर्गात अगर कॉलेजात त्यांचे विद्यार्थी नसणारे; परंतु त्यांना आपले गुरू मानणारे महाराष्ट्रभर असंख्य विद्यार्थी आहेत. त्यांचीच मुले–विद्यार्थी सांगतात की, सरांच्या तासाला आम्ही धावत जात असू आणि संगीताची मैफल ऐकावी त्या तन्मयतेने त्यांची व्याख्याने ऐकत असू. त्यांच्याच एक विद्यार्थ्याने सांगितले की, बुद्धीवर संदेहाचे जळमट जमू लागले की, आमच्यापाशी एक जालीम उपाय होता. आम्ही गुरूजींची भेट घेत असू आणि संदेहरहित होऊन परतत असू.

नरहर कुरुंदकर यांच्या व्यासंगाला सीमा नव्हती. साहित्य, संगीत, राज्यशास्त्र, तर्कशास्त्र, तत्त्वज्ञान, इतिहास, समाजशास्त्र, धर्मशास्त्र इथपासून वात्स्यायन, वेद, उपनिषदे आणि रहस्यकथा इथपर्यंत त्यांच्या स्वैर भराऱ्या चालत असत. त्यांच्या खास आवडीचा आणि व्यासंगाचा विषय कोणता हे सांगणे तसे कठीणच. आम्हाला आठवते, मराठवाडा दिवाळी अंकात त्यांनी बेंद्रे यांच्या 'संभाजी' या ग्रंथाचे टीकात्मक विश्लेषण केलेले होते. एकदा त्यांच्याबरोबर पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळात जाण्याचा योग आला. शेजवलकर, ओतूरकर, पोतदार वगैरेंसारख्या दिग्गजांशी कुरुंदकरांनी झट्या घेतल्या. पोतदार त्यांच्या पाठीवर थाप मारून वात्सल्याने म्हणाले होते की, कुरुंदकर तुम्ही कुशाग्र बुद्धीचे आहात. तुमचे भवितव्य उज्ज्वल आहे. कै. काकासाहेब नवरे यांना तर कुरुंदकर बोलायला उभे राहिले की, कौतुकाने भरूनच यावयाचे. आचार्य भागवत हैदराबादी आले होते. कालिदासाच्या शाकुंतलावर त्यांची दोन–तीन व्याख्याने झाली. आचार्यांची ओघवती वाणी व त्यांचा जबर व्यासंग यांचा सुरेख संगम म्हणजे त्यांची ती व्याख्याने होती. कुरुंदकर तेव्हा इंटर सायन्सला वारंवार नापास होणारे एक विद्यार्थी होते. इच्छा नसूनही त्यांचे एक पत्र आचार्य भागवतांनी शाकुंतलाविषयी केलेल्या प्रतिपादनावर काही आक्षेप घेणारे आम्ही तेव्हा छापले होते.

आचार्य आपली कानउघाडणी करणार अशी भीती वाटत होती. आचार्यांची भेट झाली तेव्हा त्यांनी मुद्दाम हे कुरुंदकर कोण म्हणून चौकशी केली त्यांच्या आक्षेपांची आस्थेवाईकपणे दखल घेतली. नंतर कुरुंदकरांनी बंगाली कादंबरीकार शरदबाबूंवर लिहिले. पुढे लोकायतवर लिहिले. मग शिवाजीचा त्यांनी खास अभ्यास केला. पं. नेहरू आणि मौलाना आझाद यांच्याविषयीही त्यांनी विस्ताराने लिहिले. मुस्लिम धर्माविषयीचे त्यांचे परखड विवेचन महाराष्ट्रभर गाजले. हमीद दलवाई यांना कुरुंदकरांचा फार मोठा बौद्धिक आधार वाटायचा. सौंदर्यशास्त्र आणि वाङ्मय हे तर त्यांचे नित्य अभ्यासाचे विषय बनले. महाराष्ट्रातील पहिल्या दर्जाचे समीक्षक म्हणून ते लवकरच ख्याती पावले. कुरुंदकरांच्या व्युत्पन्न बुद्धीची चमक व त्यांच्या बौद्धिक व्याप्तीचे दर्शन अगदी अलीकडेच घडले. 'भामती प्रकाश' या नावाचा ग्रंथ महामहोपाध्याय यज्ञेश्वरशास्त्री कस्तुरे यांनी लिहिला. मूळ भामती प्रकाशवरचे हे भाष्य आहे. विषय अत्यंत कठीण. या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ पंढरपुरी झाला. महाराष्ट्रात या विषयाचे व्यासंगी बोटावर मोजण्याइतके, वरखेडकर, तर्कतीर्थ, धुंडामहाराज यांच्या बरोबरीला नरहर कुरुंदकर प्रकाशन समारंभाचे एक मुख्य वक्ते होते. असा जबरदस्त त्यांच्या बुद्धीचा, व्यासंगाचा व अभ्यासाचा आवाका होता. खूप विषयांवर त्यांच्या चिंतनाने व अभ्यासाने परिपक्वता धारण केली होती. महाभारताचे त्यांचे खास आकलन होते. कमलपुष्पाच्या पाकळ्या एकेक करून उमलत जाव्यात आणि प्रकाशाला उन्मुख होऊन संपूर्ण पुष्प रेषेरेषेने प्रफुल्लित व्हावे अगदी तसे फुलणे चालू असतानाच कुरुंदकरांची जीवनयात्रा संपली. एकाच व्यक्तीत अनेक नात्यांचे संमीलन व्हावे तसे कुरुंदकरांचे विलक्षण व्यक्तिमत्त्व होते. अर्ध्या वाटेवरूनच हा दमदार सवंगडी, सुहृद, चिंतक, अभ्यासक आपल्यातून जावा. मन विदीर्ण करणारी ही घटना आहे. कदाचित असेही असेल की, इतक्या अप्रूप संपन्न जीवनाचे आपणच जतन करू शकतो या विश्वासानेही मृत्यूने कुरुंदकरांना उचलले असेल. ते काही असो. त्यांच्या मृत्यूने खरोखरच फार मोठी हानी झाली आहे. वृद्ध मातापिता, बंधू, जन्मभर त्यांची साथ करणारी त्यांची पत्नी, एकुलता एक मुलगा, दोन मुली, जावई, एक अविवाहित मुलगी यांच्यासाठी तर आभाळच फाटले आहे, त्यांच्यासाठी शब्दच नाहीत. त्यांना हे संकट सोसण्याचे सामर्थ्य मिळो!

*( दि. १३ फेब्रुवारी १९८२, दैनिक 'मराठवाडा')*

# ४. बोलके झाड

'स्वर्गीय राजगोपालाचार्य हयात असतानाची गोष्ट आहे. ते गव्हर्नर जनरलच्या पदावरून निवृत्त होऊन मद्रासमध्येच राहत होते. एके दिवशी राजाजींनी मद्रासमधील एका झाडावर श्रद्धांजली वाहणारा मृत्युलेख लिहिला. झाले असे की, मद्रास शहरातील एका मोठ्या हमरस्त्यावरील एक मोठे झाड उन्मळून पडले. प्रयत्न करूनही ते परत काही लावता आले नाही. ते झाड कायमचे अंतर्धान पावले. राजाजींना झाड उन्मळून पडल्याचे समजल्यावर ते त्या जागी गेले. ते झाड राजाजींच्या ओळखीचे होते. इंग्रजांचे राज्य असतानाही ते असेच उन्मळून पडले होते. तेव्हा मद्रासमध्ये एक इंग्रज गव्हर्नर होता. तो झाडांचा फार प्रेमी. त्याने येऊन उन्मळलेले झाड परत लावून घेतले. त्या झाडाचे जीवनचरित्र राजाजींनी रेखाटले. हे झाड म्हणे त्या गव्हर्नरशी सकाळ–संध्याकाळ बोलत असे. त्याच्या स्वप्नात जात असे. स्वप्नात जाऊन ते आपली सुखदु:खे त्या इंग्रज गव्हर्नरपाशी सांगत असे. कुठे कोणी कुऱ्हाड मारली, वाहती जखम झाली, कोणी फांद्या तोडून सरपणासाठी नेल्या, मुळाला दुखापत झाली वगैरे गोष्टी हे झाड गव्हर्नरला रात्री स्वप्नात जाऊन सांगे. दुसरे दिवशी लाटसाहेब झाडापाशी येत आणि बघत तर स्वप्नात सांगितलेली गोष्ट खरी निघे. मग हा साहेब इलाज करी. झाडाला इजा पोचू नये म्हणून त्याने कुंपण तयार करून घेतले. पार बांधला. एकाच झाडाचे लाड कोणाच्या डोळ्यांवर येऊ नयेत म्हणून ज्या ज्या व्यवस्था या झाडासाठी होत त्या त्या व्यवस्था त्या रस्त्यावरील इतर झाडांसाठीही करण्यात आल्या. हा गव्हर्नर पुढे एकटाच भारतात राहू लागला. बायका–मुले नव्हती. सकाळ–संध्याकाळ तो या झाडाखाली येऊन बसे व एकट्या मित्राशी गप्पा माराव्यात त्याप्रमाणे या झाडाशी सुखसंवाद करीत बसे. लोक अर्थात या लाटसाहेबाला वेड लागले, तो झाडाशीच बोलतो असे म्हणत असत. पुढे तो इंग्लंडला गेला. त्याला समजले की, ते झाड उन्मळून पडले आहे. त्याने राजाजींना पत्र लिहून कळविले व त्याची व्यवस्था करण्यासाठी लिहिले. राजाजींनी योग्य ती व्यवस्था केली, परंतु शेवटी जेव्हा हे झाड मेले तेव्हा तो गव्हर्नर हयात नव्हता. राजाजींनी त्या झाडाविषयी कारुण्यपूर्ण मृत्युलेख लिहून ते झाड आणि त्याचा मित्र तो गव्हर्नर दोघांनाही श्रद्धांजली अर्पण केली.

राजाजींचा संपूर्ण लेख आता स्मरणात नाही. परंतु त्यांनी त्यात अनेक गोष्टी नमूद केल्या होत्या. माणसाला आपल्या मर्यादित जीवनाच्या पलीकडे फारसे काही जाणवतच नाही. मानवी आणि मानवतेवर सृष्टीचे आणि माणसाचे अत्यंत घनिष्ठ असे संबंध असतात. निसर्ग आपल्या प्रत्यक्ष योगक्षेमाशीही निगडित असतो. बऱ्याच वियोगानंतर आपल्याला आपले घर आठवले की, घराबरोबर आपल्या परसातील झाड अगर झाडेही आठवतात. वडिलांनी, आजोबांनी, आईने अगर आजीने एखादे झाड वाढविलेले असते. त्यांच्या अनेक आठवणी त्या झाडाच्या रूपाने आपल्या मनात ताज्या होतात. वृक्षाचे आणि माणसाचे सान्निध्य फार सनातन आहे. त्यांच्या भावविश्वात, विचारात, कल्पनासाम्राज्यात व दाहक वास्तवात झाडांनी कायमचे स्थान पटकावले आहे. गौतम बुद्धाचा बोधिवृक्ष ज्ञानाचा आणि श्रद्धेचा प्रतीक ठरला. बोधिवृक्षाच्या दर्शनाने असंख्य भाविकांना

प्रत्यक्ष बुद्धाचेच दर्शन घडत असते. आपल्याकडे ज्ञानेश्वरांचे वर्णन तुकारामांनी 'जयाचिये दारी सोन्याचा पिंपळ' असे केले आहे. कालिदासाच्या नाटकातील अशोक वृक्ष तर कालिदासाइतकाच शृंगाराचा मर्मज्ञ म्हणून ख्याती पावला आहे. प्रेयसीच्या डाव्या पायाचा स्पर्श झाल्यावाचून अशोक बहरत नाही. बकुल वृक्षाला प्रेयसीच्या मुखातील मदिरेची गुळणी हवी असते. अनेक भाषांच्या वाङ्‌मयात, काव्यांत आणि धर्माचरणात असे किती तरी वृक्ष आपल्या जीवनाचे एक अविभाज्य अंग बनले आहेत. तुळस, आवळी, वड, पिंपळ, औदुंबर आदी झाडांना विशिष्ट सणांत वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळाले आहे. परंतु हल्लीची अवस्था लक्षात घेतली तर ही सर्व पुराणातीलच वांगी वाटू लागतात. असंख्य नवयुवतींच्या सलज्ज कुजबुजीला साक्षी राहिलेली लक्षवेधी झाडे आपण निर्लज्जपणे जमीनदोस्त केली आहेत व करीत आहोत. मराठवाड्यात अलीकडची ४०-५० वर्षे ज्यांनी काढली त्यांना हे सहज पटू शकेल. आदिलाबाद, चांद्यातून मराठवाड्यात शिरणारी लहानमोठी पर्वतराजी ३०-४० वर्षांपूर्वी गगनचुंबी झाडांनी आशिखर व्याप्त होती. आता उरले आहेत ते फक्त संन्याशाच्या मस्तकासारखे बोडखे माळ. त्यांचा हिरवटपणा केव्हाच नष्ट झाला. आपल्या जीवनातील आनंद, आपले काव्य, आपला शृंगार आणि आपला रंग संपला हे आपल्या लक्षातच आले नाही. कधीमधी वनमहोत्सव आले की, आपल्याला झाडांच्या आठवणींची उबळ येते. तिच्यातही ढोंगच अधिक असते.

वस्तुतः आपले जीवन सुखद, रंगदार आणि समृद्ध करण्यात झाडांचे जे स्थान आहे ते लक्षात घेऊन आपणास झाडांची लागवड आणि जोपासना करणे आवश्यक बनले आहे. त्यासाठी सरकारी प्रयत्नांची जरुरी काय ? सरकारने उपवने बांधावीत आणि मग प्रेमी युगुलांनी प्रेम करावे असा प्रकार घडू लागला तर आपल्या जीवनाची अगतिकता मरणप्राय ठरेल, पण आपण हे लक्षात घेत नाही. दूरवरच्या जंगलाचे सोडा; परंतु आपल्या घरापुढे, अंगणात, आपल्या गावात, आपल्या शहरात आपण आणि आपला परिवार दररोज ज्या रस्त्यावरून वावरत असतो त्या रस्त्याच्या कडेला मोकळ्या जागेत झाडे लावून आपला आनंद वाढविण्यासाठी सरकारची आवश्यकता काय म्हणून पडावी ? एवढे उदासीन आणि ऐदी जर आपण झालो तर आपल्या समाजाला समाज म्हणून काही अस्तित्वच उरणार नाही. त्याचे कलेवर उरेल.

गल्लोगल्लीच्या युवकांना इतर काही करता आले नाही तर निदानपक्षी आपापल्या भागात आता सुरू झालेल्या पावसाळ्यात हवी तेवढी झाडे लावता येतील. आपल्या नजीकच्या रस्त्यावरची झाडे राखण्यासाठी व नवी लावण्यासाठी युवकांना आपल्या समित्या बनविता येतील. परवाच मुंबईला गेलो होतो. मुंबईच्या बकालपणाविषयी आपण एरव्ही खूप बोलतो; परंतु या वेळी असे दिसले की, फार मोठ्या प्रमाणावर मुंबईत वृक्षारोपण झाले आहे. प्रत्येक भागात मोठमोठे वृक्ष डोलत आहेत. बकाल मुंबई झाडांच्या सान्निध्यामुळे हिरवीगार बनत चालली आहे. आपल्याला आपल्या गावात असे का करता येऊ नये ? यासाठी संजय गांधीच हवा काय ? झाडाझुडपांनी आपला परिसर नयनरम्य करून घेण्यासाठी हुकूमशाहीच आवश्यक आहे काय ? सरकारला एवढे स्थान मिळत गेले तर हनिमूनसाठी सरकारी आदेश म्हणजे जी.आर. निघावे लागतील. असा समाज माणसांचा असणार नाही !

*(दि. १० जुलै १९७८, दैनिक 'मराठवाडा')*

# ५. पुढच्या पेरण्यांची काळजी

'पाण्याआधी वळण बांधणे हे शहाणपणाचे लक्षण मानले जाते. पाणी येईल तेव्हा बघू असे म्हणणाऱ्यांच्या हातून काहीच घडत नाही. ऐन वेळी वळणे बांधली तरी ती फुटतात आणि पाण्याचा काहीच उपयोग होत नाही. म्हणूनच आठवण झाली ती येत्या वर्षी जून १९७३ मध्ये होणाऱ्या पेरण्यांच्या संदर्भात. आपण म्हणाल, अजून ७३ चा जून महिना खूप लांब आहे हिवाळा आणि उन्हाळा जायचा आहे. त्यानंतर जून उजाडेल आणि पाऊस झाला तर पुढच्या पेरण्यांची गरज पडेल. इतक्या आधी पुढच्या पेरणीची काळजी ती काय करावयाची ? आपले म्हणणे खरे असले तरी आमचे म्हणणेही काही खोटे नाही. आता सध्याच्या क्षणी एकेक दिवस कसा ढकलावयाचा याचीच ददात पडलेली आहे. दुष्काळाने सर्वत्र हाहाकार उडवून दिला आहे. पिण्यासाठी साधे पाणी नाही. करोडो लोकांना काम नाही. खेडी ओस पडत चालली आहेत. या तातडीच्या प्रश्नांना तोंड देतादेताच शासनाच्या नाकी नव आले आहेत. त्यात आम्ही ही आगाऊ काळजी मध्यंतरीच उपस्थित करीत आहोत. परिस्थिती बिकट आहे आणि ताबडतोब हाती घ्यावेत असे प्रश्नही भरपूर आहेत आणि तरीही आमचा आग्रह आहे की, पुढच्या पेरण्यांची काळजी आताच घेतली पाहिजे. का आणि कसे ते आता सांगतो.

पुढच्या पेरण्यांत दोन अडचणी येण्याचे संभवते. पहिली अडचण ज्वारीच्या बियाणांची व दुसरी मशागतीसाठी आवश्यक असणाऱ्या गुरांची. आम्हांला असे समजले आहे की, शासनाने पुढच्या पेरणीच्या वेळी बियाणे व विशेषकरून ज्वारी बियाणे कमी पडू नये म्हणून ज्वारी खरेदी करून बियांसाठी राखून ठेवण्याची शिकस्त चालविली आहे. आमची ही माहिती खरी असेल तर शासनाची खबरदारी स्तुत्यच म्हणावी लागेल. खरी अडचण दुसरीच आहे आणि ती आहे गुरांची. सध्या चारा आणि पाणी यांच्याअभावी गुरांची काय परिस्थिती झाली आहे व होत आहे हे सर्वांनाच माहीत आहे. अवर्षणाने मोठी कठीण परिस्थिती निर्माण केली आहे. जनावरांना चरण्यासाठी कुठेच हिरवळ नाही. गुदस्ता पिके चांगली आली नव्हती म्हणून गुदस्ताच वैरणीची फार अडचण झाली होती. परंतु, शेजारच्या जिल्ह्यांतून गेल्या वर्षी दुष्काळी अवस्था नव्हती. गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश आणि आंध्र या राज्यांतून चारा आणणे शक्य झाले. मराठवाड्याच्या शेजारी असलेल्या नाशिक, धुळे, जळगाव आणि तेलंगणाच्या काही जिल्ह्यांतून चारा मागवता आला. परंतु, यंदा तीही सोय नाही. कुठेच चारा नाही. इतरत्र शोध करून चारा अगर गुरांच्या छावण्या उभारून गुरांचे तेथे संगोपन करणे फार कठीण होऊन बसले आहे! चाऱ्याइतकीच हलाखीची परिस्थिती पाण्याची आहे. याचा परिणाम फार दृश्य स्वरूपात बाजारात दिसून येत आहे. हजार–आठशे रुपये किमतीचा बैल अगर म्हैस शे–दोनशे रुपयालासुद्धा कोणी घेत नाही. एवढे गुरांचे बाजार पडले आहेत. शेतकरी मंडळी मधूनमधून भेटतात तेव्हा डोळ्यांत पाणी आणून एकेक कहाण्या सांगतात. कसायाच्या घरी गुरे पाठवताना त्यांच्या पोटात तुटते

आणि शक्यतो असे करू नये असा ते प्रयत्न करतात. काही जण तर चक्क देवाच्या दारी गुरे आणून सोडून देणेच पसंत करतात. काळवंडलेल्या भविष्याच्या छाया कित्येक शेतकऱ्यांच्या चर्येवर बघायला मिळतात. गुरे पाळणे आणि घरी त्यांचे दाणापाणी अशक्य झाले तर काय होईल याची कल्पना करावी!

एकट्या औरंगाबाद जिल्ह्यात ८ लाख गुरे आहेत. १३ ठिकाणी गुरांच्या छावण्या आहेत. प्रत्येक छावणीत जास्तीत जास्त २ हजार गुरांची सोय होऊ शकते. या छावण्यांतही आता आठ–पंधरा दिवसांपुरते पाणी शिल्लक आहे. चाऱ्याचीही अशीच स्थिती. जवळपास कुठे जंगल नाही, म्हणजे आता जादा छावण्याही शक्य नाहीत. परिणाम एकच संभवतो की, आणखी काही महिन्यानंतर गुरे चक्क सोडून द्यावी लागतील आणि शेकडो गुरे मरताना बघावी लागतील. परिस्थिती इतकी भीषण होणार आहे खरी! तेव्हा यातून मार्ग काय काढावा? सर्वांचे रक्षण होऊ शकेल, असा मार्ग सांगणे कठीण आहे. धान्याप्रमाणे चारा आणि गुरांचे खाद्य आयात करावे याखेरीज दुसरा उपाय सुचविता येत नाही.

प्राप्त परिस्थिती लक्षात घेऊन एक गोष्ट शासनाने केली पाहिजे. जेथे गुरांच्या छावण्या आज आहेत आणि आणखी कायम होऊ शकतात त्या छावण्यांतून सर्रास कोणीही गुरे दाखल करण्याचे आतापर्यंतचे जे धोरण होते ते सोडून द्यावे आणि प्रत्येक शेतकऱ्याची किमान एक बैलजोडीच या छावण्यांतून दाखल करून घ्यावी. ही सूचना यासाठी करावयाची की, प्रत्येक शेतकऱ्याची किमान एक जोडी वाचली तर पुढच्या पेरणीच्या वेळी ती वापरता येईल आणि मशागत करणे शक्य होईल. अशी चाळणी लावून प्रत्येक शेतकऱ्याची एक बैलजोडी वाचविण्याचे कामही फार अवघड आणि अशक्य आहे, परंतु जेवढे जमेल तेवढे याच दिशेने केले पाहिजे. दुसरा काही इलाज दिसत नाही.

आणखी जुजबी गोष्टीही करता येतील. सरकारने प्रत्येक साखर कारखान्याच्या स्वाधीन काही गुरे करण्याचा निर्णय याआधीच घेतला आहे. त्याची अंमलबजावणी चालू आहे की नाही हे समजू शकलेले नाही. संबंधित लोक ते बघतीलच. आम्हांला असे वाटते की, या साखर कारखान्यांनी उसाचे चोपट शेतकऱ्यांना मोफत द्यावे. तेही नीट वाटून द्यावे लागेल. नाही तर होईल असे की, साखर कारखान्यांशी संबंध असणारे बडे लोकच ते स्वत:साठी घेऊन जातील अथवा त्याचाही काळाबाजार करतील. तेव्हा गुरांसाठी जे काही अवशिष्ट खाण्याजोगते या कारखान्यातून मिळेल ते व्यवस्थितपणे वाटून द्यावे. आता काही महिन्यांनंतर गव्हाची खळी होतील. पश्चिम महाराष्ट्र आणि विदर्भ या भागांत पाऊस बरा झाला. तेथे गव्हाची पिके बरी आहेत. गव्हाची खळी झाल्यानंतरचा कचराही गुरांसाठी उपयोगी पडतो. जेथे पिके चांगली आहेत तेथून ज्वारी खरेदीप्रमाणे चाऱ्याचीही वसुली करता येईल. त्याची तयारी मात्र आतापासूनच करावी लागेल. चाऱ्याचा प्रश्न बिकट झालेला असला तरी महाराष्ट्राच्या अवघ्या नऊ जिल्ह्यांत दुष्काळ असून बाकी जिल्हे चांगले आहेत. तेथील शेतकऱ्यांनी या वेळी उदार बुद्धी राखून आपल्या इतर शेतकरीबंधूंची गुरे मरणार नाहीत यासाठी आपल्याजवळचा चाराही पुरविला पाहिजे. असे झाले तर हे दोन महिने कसे तरी काढता येतील. सरकी, हुलगे, पेंड, तेलबियांचे पाचट यांचा पुरवठा झाला तर हे दोन महिनेही निघून जातील.''

(दि. २२ नोव्हेंबर १९७२, दैनिक 'मराठवाडा')

# अनंत वृत्त विशेष

## प्रेरणा

२०१९-२०

## वृत्तविश्व विभाग

# मी वर्तमानपत्र

**बोराडे ऋतुराज जीवन,** बी.एस्सी. प्रथम वर्ष

**मी वर्तमानपत्र,** माझा जन्म १६व्या दशकात झाला. तेव्हापासून आतापर्यंत मी तुमच्यापर्यंत दररोज न थांबता, न थकता दररोजच्या ताज्या घडामोडी पोहचवत आहे. माझ्या जन्माची गरज तुम्हाला का पडली ? हे मला अजूनही माहिती नाही पण माझ्या जन्मामुळे तुमच्या आयुष्यात फार बदल झाले. भारतात इंग्रजांविरुद्ध लढण्यासाठी माझा जन्म झाला असे लोक म्हणतात. महात्मा गांधीजी, लोकमान्य टिळक, गोपालकृष्ण गोखले इत्यादी अशा ज्येष्ठ सुधारक व्यक्तींनी माझ्या मार्फत इंग्रजी सरकार विरोधात दोन हात केले. असे म्हणतात की, लेखणीमध्ये ताकद असते त्याच लेखणीला सोबत घेऊन अनेक लेखकांनी माझ्या मार्फत समाजात अनेक विचार पोहचवले, माझ्यामार्फतच लोकांना भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होण्याची प्रेरणा मिळाली. अनेक विचारवंतांनी माझ्यामार्फत इंग्रजी सरकारवर शांततेत हल्ला केला, परिणामी काही काळासाठी माझ्यावर बंदीही घालण्यात आली. पण तरीही मी फार खूश आहे, कारण भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यात माझे मोलाचे योगदान राहिले आहे. मी अनेक भाषांमध्ये दररोज तुमच्यापर्यंत पोहचतो. माझी अनेक नावे आहेत. ज्येष्ठ समाजसुधारकांनी माझे नाव वर्तमानपत्र, अखबार किंवा, Newspaper ही ठेवले आहे. बाळ गंगाधर टिळक यांनी माझे नाव केसरी तर, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी माझे नाव मुकनायक ठेवले अशा अनेक नावांनी मी ओळखला जातो. अनेक विचारवंतांनी माझ्यामार्फत आपले विचार तुमच्या समोर ठेवले. मला माझ्या स्वत:वर फार गर्व आहे. कारण माझ्यामार्फत तुम्हाला काही प्रमाणात ज्ञान मिळालं, चांगले विचार ऐकायला, वाचायला मिळाले. समाजात काही प्रमाणात बदल झाले.

तेव्हापासून ते आतापर्यंत माझे स्वरूप फार बदलले आहे. तेव्हा माझा उपयोग लोकांत ज्ञान पसरवण्यासाठी व देशाबद्दल आपुलकी वाढावी यासाठी होत असे, पण आताही माझा उपयोग बातम्या व माहिती पुरवण्यासाठीच होतो. फक्त बदल इतकाच झाला की तेव्हा माझा उपयोग नि:स्वार्थ भावनेने होत असे आणि आता माझा व्यवसाय झाला आहे. तरी सुद्धा चांगले लेख व बातम्या पोहचवायचे काम अविरतपणे न थांबता करत आहे. तुमची दिवसाची सुरुवात माझ्या शिवाय होऊच शकत नाही. दररोज सकाळी सकाळी मी तुमच्या दरवाज्याच्या बाहेर पडून असतो आणि एकच वाट पाहत असतो की, कधी तुम्ही मला आत घेऊन जाता आणि चहाचा आस्वाद घेत घेत माझाही आस्वाद घेता. माझ्याकडे असलेले ज्ञान, माहिती आणि बातम्या तुम्हाला कधी पुरवतो याचीच मी वाट पाहत असतो. माझ्याकडे असलेल्या सुंदर लेखांची माहिती तुम्हाला देऊन तुमच्या दिवसाची सुरूवात चांगली करून देतो. माझ्याकडे असलेल्या सुविचारांना तुमच्यात विनवून मी तुमची सकाळ व पूर्ण दिवस आनंदी बनवतो. मी तुमच्यासाठी लांबून लांबून, देश विदेशातून तर कधी जवळून खास खास बातम्या आणतो. देश विदेशातल्या बातम्यांचा संग्रह मी तुमच्यासाठी घेऊन येतो. रोज सकाळी सकाळी तुम्ही माझी वाट अशी पाहता जशी देवाचीच, मला फार आनंद होतो. माझ्या अंगावर लिहिलेली काळ्या आणि पांढ्या अक्षरातील वृत्ते वाचून तुम्ही जाणकार बनता. माझे वृत्त वाचून काहीजण आनंदीत होतात तर काहीजण फार दु:खी

होतात. समाजात घडलेल्या चांगल्या गोष्टींची माहिती देताना मी फार खुश होतो, पण वाईट गोष्टींची माहिती देताना दुःखीही फार होतो. समाजात घडलेल्या विकृत कृत्यांची माहिती देताना कधी कधी मलाच लाज वाटते. आपला समाज इतका विकृत का झाला असावा ? याचा विचार करून मला समाजा विषयी फार खंत वाटते. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या बातम्यांची माहिती देताना माझे हात चळचळ कापतात. हाच का तो जिजाऊ, झाशीची राणी, अहिल्यादेवी होळकरांचा देश आहे ? असा मला प्रश्न पडतो. काही क्षेत्रात स्त्रीया अग्रेसर आहेत याची माहिती देताना वाटतं की, हा सावित्रीबाई फुलेंचा देश आहे. महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या बातम्या मला या पुढे न देता येवो हीच मी प्रार्थना करतो. आपण म्हणतो की, हा देश शेतकऱ्यांचा देश आहे, कृषिप्रधान देश आहे पण दररोज मला शेतकरी आत्महत्येचीच माहिती द्यावी लागते हे माझे दुर्दैव. भारतीय सरकार शेतकऱ्यांबद्दल संवेदनशील आहे असे सांगतात, पण मला सरकार असंवेदनशील आहे असेच का बरे सांगावे लागते. शेतकरी आत्महत्या थांबून शेतकऱ्यांना सोन्याचे दिवस यावेत ही बातमी देताना मला आनंद होईल. काही दिवसांपासून मला एक माहिती फार सतत द्यावी लागते, ती म्हणजे बँकांना गंडवून परदेशात पळून गेलेल्या देशद्रोहींच्या. गोरगरीब जनतेचा पैसा लुटून पळून गेलेले लोक मला आठवतात. तर फारच राग येतो. PMC बँकेच्या खातेदारांचे दुःख मांडताना मलाच रडू कोसळते. देशातील पैसा बँकेतही सुरक्षित नाही याचं वाईट वाटतं. सरकारने कार्यवाही करावी हीच अपेक्षा.

मागच्या काही काळापासून देशात आलेल्या मंदीची बातमी सांगताना भविष्याचा धोका माझ्या नजरे समोर येतो आणि देश पुढे जाऊन महासत्ता बनेल का ? याचीच काळजी मला पडते. अनेक उद्योगधंदे बंद पडल्याने बेरोजगारी वाढल्यामुळे त्यांचे व त्यांच्या कुटुंबाचे काय होईल ही चिंता सतावते. मी फार काळापासून वाट पाहत आहे की, केव्हा मी ही बातमी देईल की, भारत हा जगामध्ये महासत्ता देश झाला. हा दिवस लवकर येवो.

देशात वाढलेल्या महागाईची बातमी देताना मला फार दुःख होते. देशातील वाढलेले कांद्याचे भाव, जीवनावश्यक गोष्टींचे भाव ऐकून मला दुःख होते, गोरगरीब जनता आपला उदरनिर्वाह कसे करत असेल याची काळजी मला पडते. ह्या देशात गरीब जनतेने कसे जगावे ? हीच मला चिंता पडते.

काही काळापासून देशात घडणाऱ्या जातीय दग्यांचे वृत्त देताना ह्या देशाच्या संस्कृतीवर निर्माण झालेली धोक्याची घंटा मला नेहमीच सतावते. हा देश सर्वजाती धर्माच्या लोकांचा असून प्रत्येक धर्माच्या लोकांना येथे मुक्तपणे वास्तव्य करण्याचा अधिकार आहे.

देशावर झालेल्या परकीय आक्रमणाची वृत्ते देताना देशासाठी बलिदान दिलेल्या सैनिकांच्या कुटुंबांचे दुःख न समजण्याच्या पलीकडे आहे. सीमेवर देशासाठी आपले प्राण गमावणाऱ्या वीरांसाठी मला फार दुःख तर होते, पण अभिमानही वाटतो. देशासाठी निःस्वार्थ भावनेने प्राण देणाऱ्या जवानांसाठी सलाम. अशा अनेक वेदना देणाऱ्या बातम्या देताना मलाही फार वेदना होतात, पण काय करणार ते माझे काम आहे, आणि मी माझे काम निःस्वार्थपणे करतो.

असे मुळीच नाही की, फक्त दुःखद घटनाच ह्या देशात घडतात. ह्या देशात अनेक महत्त्वाच्या व देशावर गर्व, प्रेम निर्माण होणाऱ्या घटनाही घडतात. देशाने केलेली प्रगती, भारतीय लष्कर, नौदल, वायुदल यांनी गाजवलेल्या शौर्याचे वृत्त देताना स्वतःलाच फार गर्व होतो. वर्धमान अभिनंदन यांसारख्या शुरवीर व्यक्तींबद्दल बोलताना माझ्या मनाला फार आनंद होतो. देशासाठी स्वतःच्या अंगावर वार सहन करणाऱ्या वीरांची अजूनही ह्या देशात कमतरता नाही याची खात्री माझ्या मनाला पटली आहे. चांद्रयान–२ सारख्या मोहिमेला यशस्वी करण्यासाठी प्रचंड

मेहनत घेणारे के. सिवन सारख्या शास्त्रज्ञांची अजूनही भारताकडे कमतरता नाही याचा मला फार आनंद आहे. भारतीय शास्त्रज्ञांनी आपल्या देशाची मान आंतरराष्ट्रीय स्तरावर उंच केली. देश-परदेशात भारतीयांचा डंका वाजवला. सर्जिकल स्ट्राईक करुन आपल्या जवानांनी आपल्या शेजारील देशाला अद्दल घडवली. भारताने आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वत:ला महासत्ता म्हणून अनेक वेळा सिद्ध केले. भारतीयांनी आंतरराष्ट्रीय राजकारणावर स्वत:ची पकड बनवली. भारतात झालेली प्लास्टिक बंदी, तेलंगना स्टेटने लावलेली ३ कोटी झाडे, महाराष्ट्र सरकारने घेतलेला कर्जमाफीचा निर्णय असे अनेक वृत्त देताना माझी छातीही फुगून येते.

भारतीय स्त्रीयांनी केलेली प्रगतीही सांगताना मला फार आनंद होतो. पहिल्या नेवी पायलट शिवांगी, P.V. सिंधू ज्यांनी आताच गोल्ड मेडल जिंकले, आशियातील बेस्ट वुमन फायटर मेरी कॉम, निर्मला सीतारमण व किरण मजुमदार यांचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर असलेला प्रभाव, यांसारख्या अनेक महिलांच्या बातम्या देताना मला फार आनंद होतो.

क्रीडा क्षेत्रात भारतीयांनी गाजवलेले शौर्य अकल्पनीय आहे. South Asian Game मध्ये ११८ मेडल जिंकणे असो किंवा भारताची वर्ल्डकप मधील कामगिरी असेल किंवा वुमन्स संघाची कामगिरी असो मला अभिमान वाटतो.

भारतात घडलेल्या अनेक ऐतिहासिक घटनांचा मी साक्षीदार आहे. त्यात बालाकोटची एअर स्ट्राईक असो किंवा मुस्लीम महिलांसाठी ट्रिपल तलाकचा निर्णय असो किंवा CAA, NRC सारखा मुद्दा असो. अनेक वर्षांपासून रखडलेला राममंदिराचा किंवा ३७० सारख्या निर्णयांचा मी साक्षीदार आहे. देशाने गमावलेल्या सैनिकांचा, नेत्यांचा मी साक्षीदार आहे. अटलजी, सुषमाजी, अरुणजी सारख्या महान नेत्यांच्या मृत्यूचा मी साक्षीदार आहे.

देशात घडलेल्या व घडणाऱ्या राजकारणाचा मी साक्षीदार आहे. देशात संविधानाचा अवमान झाल्याचाही मी साक्षीदार आहे.

काही जण मला लोकशाहीचा चौथा स्तंभही म्हणतात. लोक म्हणतात, ''मी जर नसतो तर देशाची लोकशाही धोक्यात सापडली असती. माझ्याच मुळे आजही देशात लोकशाही जिवंत आहे. मी नसतो तर नेत्यांनी हा देश विकून खाल्ला असता, मी आहे म्हणून तर देशात वेडंवाकडं घडवण्याची जातीयवादी आणि भ्रष्ट नेत्यांची हिम्मत होत नाही.

मी सर्वसामान्य नागरिकांचा आवाज आहे, जो भारतीय लोकशाहीत महत्त्वाची भूमिका बजावतो. सर्वसामान्य नागरिक ते शासन यांच्यातला मी महत्त्वाचा धागा आहे. माझ्या मार्फत शासन आपल्या विविध योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहचवते. देशातल्या महत्त्वाच्या मुद्द्यावर मी लोकांचे मत शासनापर्यंत पोहचवतो. मी लोकशाहीवर पाळत ठेवणारा महत्त्वाचा धागा आहे. लोकशाहीत माझी ताकद खूप मोठ्या प्रमाणात आहे. काही ठिकाणी माझा दुरुपयोगही होतो. मोठे नेते, व्यापारी मला विकत घेऊन माझा दुरुपयोग करतात. तरी सुद्धा मी सर्वसामान्यांचा आवाज बनून लढत राहतो. मी जर चुकीच्या हातात पडलो तर संपूर्ण देश चुकीच्या हातात जाऊ शकतो. म्हणून मला चुकीच्या हातात जाऊ देऊ नका हीच माझी तुमच्याकडे मागणी आहे. काहीही झालं तरी मी ह्या देशाला चुकीच्या हातात जाऊ देणार नाही. मी माझे काम चोखपणे करत राहणार. कारण मी भारतीय लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे.

कधी कधी माझ्या मनात विचार येतो की, जर मी नसतो तर लोकशाही जिवंत राहिली असती का ? भ्रष्ट पुढाऱ्यांनी, व्यापाऱ्यांनी हा देश विकला असता. हा देश लोकशाही मार्गावर चालणारा देश भ्रष्टाचारी आणि मुजोरांचा देश राहिला असता. सध्याच्या काळात माझे स्वरूप फार बदललेलं आहे. मी नवीन स्वरुपात तुमच्यापुढे येत आहे. मी आधी तुमच्यापर्यंत छापून येत असे. पण आता मी तुमच्यापर्यंत ऑनलाईन,

आणि electronic media यांच्या माध्यमाने तुमच्या जवळ पोहचलो आहे. काहीजण तर मला आता विसरलेही आहेत. ते पहिल्यासारखे चहा पित पित सकाळी सकाळी मला वाचत नाहीत. ते मला मोबाईलवर, कॉम्प्युटरवर इंटरनेटच्या मदतीने कधीही कोठेही वाचू शकतात. माझा आस्वाद घेऊ शकतात. परंतु पहिल्यांदा जशी मजा यायची तशी आता येत नाही. माझ्यात व तुमच्यात आधी एक प्रेमाचे, जिव्हाळ्याचे संबंध होते ते संबंध आता उरले नाहीत ही खंत आहे. आधी तुम्ही रोज माझी वाट पाहत होतात आणि मी आल्यावर तुमच्या चेहऱ्यावरचा जो आनंद होता तो आनंद आता हरवला आहे, कोठेतरी लुप्त झाला आहे, आज-काल सगळ्यांकडे टी.व्ही. आहे. सर्वजण मला टी.व्ही.च्या माध्यमातून बघत असतात. आज अनेक टी.व्ही. चॅनल्सवर न्यूज चॅनल मोठ्या प्रमाणात आहेत. सर्वजण सकाळी उठल्यापासून टी.व्ही. वर न्यूज पाहतात. आता त्यांना माझी आठवण येत नाही. मोबाईलच्या माध्यमातूनही मी त्यांना मिळत असतो.

सध्याची माझी स्थिती पाहताल तर ती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. माझे स्वरुप आता व्यावसायिक झाले असून माझे अनेक प्रमाणात खाजगीकरण झाले असून माझा मोठ्या प्रमाणात वापर जाहिरातींसाठी केला जात आहे. मी पैसे कमवण्याचे साधन बनलो असून माझा वापर करणारे लोक माझा वापर मनसोक्तपणे करत असले तरीही मी न थांबता, न थकता तुमच्यापर्यंत सध्याची देशातील परिस्थिती पोहचवत आहे. आजही समाजात अनेक चांगले लोक आहेत जे माझ्याद्वारे समाजात चांगला आदर्श निर्माण करत आहेत.

माझे स्वरूप आता जाहिरातीपूर्ण असून जाहिरातीतून माझे मालक खूप पैसे कमवत आहेत. कधी कधी मला प्रश्न पडतो की लालचेपोटी हे लोक देशाशी आणि माझ्याशी गद्दारी तर करणार नाहीत! पण मी माझे काम करत राहणार.

माझे नवीन स्वरूप असे आहे की, माझ्यावर आता फक्त वृत्तंच नाहीतर अनेक जाहिराती, लेखकांचे लेख, जन्मदिनाची वेगळी जागा, कोचिंग क्लासेसच्या जाहिराती, क्रीडा क्षेत्रासाठी वेगळे पान, देश-विदेशातील बातम्यांसाठी वेगळे पान, प्रादेशिक, तालुका, जिल्हानिहाय बातम्यांसाठी वेगळे पान, तर प्रत्येक रविवारी संडे स्पेशल म्हणून वेगळे पान. असे माझे रोजचे स्वरूप, तर विशेष पानावर अनेक लेख, नवनवीन कल्पना, नवनवीन विषय, इतिहासाविषयी माहिती देत असतात. अनेक पानावर ज्योतिष, रोज राशीभविष्यही लिहीत असतात, तर अनेक शासकीय जाहिरातीही एका विशेष पानावर असतात.

एका विशेष तक्त्यात परिपाठाच्या माध्यमातून सुविचार, दिनविशेष, पंचाग असा विशेष तक्ताही दिला जातो.

नव सिनेमांचे विशेष प्रमोशनही माझ्याद्वारे होत राहते. माझ्यामार्फत अनेक व्यंगचित्रकार समाजाच्या परिस्थितीवर राजकीय नेत्यांची फिरकी घेत असतात. असे माझे स्वरुप.

इतके असूनही तुम्ही तुमचं काम झाल्यावर मला फेकून देता व रद्दी घ्या या नावाने माझी थट्टा करता. पण मी, मी आहे. रद्दी झालो तरी तुमचा पाठलाग सोडत नाही. रद्दी बनूनही तुमची कोणत्या न कोणत्या माध्यमातून मदत करतच राहतो. दररोज मी मोठ्या प्रमाणात वाया जातो. पण काही देशात माझ्यावर प्रक्रिया करुन माझा पुन्हा वापर करतात.

एक गोष्ट लक्षात ठेवा मी आहे म्हणून तुम्ही आहात. मला तुम्ही विसरु नका मी तुम्हाला कधीच विसरत नाही. आपण एकमेकांना अशीच साथ देत राहू.

तुमचाच वर्तमानपत्र.....

# भारतीय वृत्तपत्रांचा उदय

**तळणकर सोनाली दत्तराव**, बी.ए. तृतीय वर्ष

**वृत्तपत्रांना 'लोकशाहीचा** चौथा स्तंभ' मानतात. वृत्तपत्र हे इतिहासाचे एक महत्त्वपूर्ण साधन आहे. ज्ञान प्रसारित करणारे, स्वातंत्र्य, व नीतीमूल्यांचे जतन करणारे साधन आहे. वृत्तपत्रातील लिखाणात बातम्या, विविध प्रकारची माहिती, मतप्रदर्शन, मनोरंजनात्मक लिखाण, संपादकीय अग्रलेख इत्यादींचा समावेश होतो. वृत्तपत्रीय लिखाणाची प्रेरणा सर्वस्वी सत्य घटनांची असते. म्हणून वृत्तपत्रांना 'समाज जीवनाचा आरसा' असे म्हणतात.

मनुष्य आजूबाजूला माहिती मिळवण्यासाठी सहज निरीक्षण व चौकशी करीत असतो. यातूनच वृत्तपत्राचा उदय झाला. पूर्वी दवंडी देणे, घंटा वाजवणे, युद्ध व आपत्तीकाळात भोंगा वाजविणे हे बातमी देण्याचे प्रकार होते. नवीन अघटित ज्याविषयी सर्वांना उत्सुकता असेल अशा एखाद्या घटनेची माहिती सर्वप्रथम जाहिरात करणे यास 'बातमी' म्हणतात. बातमीचा प्रसार करण्याचे एक प्रभावी आणि लोकप्रिय माध्यम 'वृत्तपत्र' आहे.

इंग्लंडमध्ये इ.स. १६६६ मध्ये 'लंडन गॅझेट' हे पहिले वृत्तपत्र निघाले. अमेरिकेत बोस्टन शहरात 'पब्लिक ऑक्युरेन्स' या वृत्तपत्राची सुरूवात झाली. आज जगातील सर्व देशांत सुमारे तीन अब्ज लोक विविध भाषांतून प्रकाशित वृत्तपत्रांचे वाचक आहेत. आज जपानी, इंग्रजी व चीनी भाषातील दैनिकांचा उल्लेख महत्त्वाच्या जागतिक दैनिकांत होतो. आज वृत्तपत्राच्या ई. आवृत्ती सुद्धा उपलब्ध आहेत.

ईस्ट इंडिया कंपनीची राजधानी कोलकाता होती. कोलकाता येथेच भारतातील पहिले वृत्तपत्र जेम्स आगस्ट्स हिक्की यांनी इ.स. १७८० साली 'बेंगॉल गॅझेट' या इंग्रजी वृत्तपत्राची सुरूवात केली.

भारतीय भाषेतून प्रकाशित होणारे पहिले वृत्तपत्र 'समाचार दर्पण' होते, ते बंगाली भाषेतून प्रकाशित झाले. समाचार दर्पणचा पहिला अंक २३ मे १८१८ रोजी प्रसिद्ध झाला.

प्रमुख वृत्तपत्रे :-

१) मुंबई समाचार - गुजराती भाषेतील १८२२ साली साप्ताहिक स्वरूपात वृत्तपत्राची सुरूवात झाली. मुंबई समाचार १८३२ पासून दैनिक स्वरूपात प्रसिद्ध झाले. हे आशिया खंडातील सर्वात जुने वृत्तपत्र आहे.

२) संवाद कौमुदी - १८२१ मध्ये भवानीचरण बॅनर्जी यांनी 'संवाद कौमुदी' हे बंगाली भाषेतील वृत्तपत्र सुरू केले.

३) टाईम्स ऑफ इंडिया - मुंबईमध्ये 'बॉम्बे हेरॉल्ड, 'बॉम्बे कुरिअर,' 'बॉम्बे टाईम्स' ही इंग्रजी वृत्तपत्रे प्रकाशित होत होती.

४) इतर वृत्तपत्रे - म. गांधींनी 'यंग इंडीया', 'हरिजन', या वृत्तपत्रांतून सोप्या भाषेतून लिखाण केले.

**'दर्पण' ची सुरुवात :-**

आचार्य बाळशास्त्री जांभेकर ०६ जानेवारी १८३२ रोजी दर्पणची सुरूवात मुंबईत केली. 'दर्पण' हे वृत्तपत्र इंग्रजी - मराठीतून प्रसिद्ध होत असे. भारतीय लोकांत पाश्चिमात्यविद्यांचा अभ्यास व्हावा. देशाची समृद्धी आणि लोकांचे कल्याण व्हावे या

उद्देशाने 'दर्पण' सुरू केले. 'दर्पण' इ. स. १८४० पर्यंत चालले. मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण आहे. दर्पणनंतर 'दिग्दर्शन' हे मासिक त्यांनी काढले. बाळशास्त्री जांभेकर 'दिग्दर्शनचे' संपादक होते. दर्पणने मराठी वृत्तपत्राचा पाया घातला.

दर्पणनंतर 'प्रभाकर', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश', 'इंदुप्रकाश' इत्यादी वृत्तपत्रांची सुरूवात झाली. म. फुले यांच्या प्रेरणेने कृष्णराव भालेराव यांनी 'दीनबंधू' हे वृत्तपत्र सुरू केले. बहुजन समाजाच्या चळवळीत दीनबंधूचे कार्य महत्त्वाचे आहे.

**केसरी आणि मराठा :-**

भारतीय स्वातंत्र्यलढ्यात, लोकमान्य टिळकांनी सुरू केलेल्या 'केसरी' आणि 'मराठा' वृत्तपत्राचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. इ. स. १८८१ ला केसरी अन् 'मराठा' वृत्तपत्राची सुरूवात झाली. यातून लोकमान्य टिळकांनी प्रखर लिखाण केले. गो. ग. आगरकरांनी सन १८८८ ला 'सुधारक' ची सुरूवात केली. लोकमान्यांनी वृत्तपत्रांतून जनतेत ब्रिटिश शासनाच्या विरोधात जागृती निर्माण केली. पत्रकार व्हॅलेटाईन चिरोल यांनी लोकमान्य टिळकांचे वर्णन 'असंतोषाचे जनक' असे केले आहे.

'राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नाही', 'शासनाचे डोके ठिकाणावर आहे काय ?' असे प्रखर अग्रलेख लोकमान्य टिळकांनी लिहिले.

अशा वृत्तपत्रांचा उदय झाला आणि वृत्तपत्र हे सगळ्यांना परवडेल असे प्रभावी प्रसारमाध्यम आहे.

# वर्तमानपत्राचे स्वरूप

**रुपणर प्रियंका शाम,** बी.ए. प्रथम वर्ष

**वर्तमानपत्र म्हणजे** काय तर सुखद – दुःखद वार्ता सांगणारे माध्यम होय. तर वर्तमानपत्राची सुरूवात कशी झाली ते पुढील प्रमाणे सांगता येईल. भारतात वर्तमानपत्राची सुरूवात इंग्रजी वृत्तपत्रांच्या प्रकाशनाने झाली. ईस्ट इंडिया कंपनीच्या गैरव्यवहाराला वाचा फोडण्याचे काम हे वर्तमानपत्राने केले. भारतात पहिले इंग्रजी वर्तमानपत्र कलकत्ता जनरल अॅडव्हाटयिझर किंवा बेंगॉल गॅझेट हे होते. त्याची सुरूवात २९ जानेवारी १७८० रोजी जेम्स ऑगस्ट्स हिकी या ब्रिटिश व्यक्तीने केली. मराठीतील पहिले वर्तमापत्र ''दर्पण'' आहे. दि. ६ जानेवारी १८३२ रोजी बाळशास्त्री जांभेकर यांनी मुंबईतून सुरू केले. या वर्तमानपत्रात मराठी व इंग्रजी दोन्ही भाषांत मजकूर छापला जात असे.

मराठी वर्तमानपत्रातून व्यंगचित्रे छापण्याची प्रथा 'हिंदू पंच'ने सुरू केली. लोकमान्य टिळक हे मराठा या वृत्तपत्राचे संपादक होते. ते २ जानेवारी १८८१ रोजी सुरू झाले, तर लोकमान्य टिळक स्थापित केसरी या वृत्तपत्राचे संपादक गोपाळ आगरकर हे होते. ते ४ जानेवारी १८८१ ला सुरू झाले. मराठी वर्तमानपत्राचे जनक बाळशास्त्री जांभेकर यांना म्हटले जाते. दर्पण हे प्रारंभिक पाक्षिक होते. ४ मे १८३२ पासून ते साप्ताहिक झाले. वर्तमानपत्र कसे असावे हा विचार करण्याची वेळ आली तर म्हणता येईल की ते उत्कृष्ट दर्जाचेच असावे.

मराठी वर्तमानपत्राचे स्वरूप हा व्यापक विषय आहे, कारण त्याची सुरूवात ६ जानेवारी १८३२ रोजी 'दर्पण' या वर्तमानपत्राद्वारे झाली. बाळशास्त्री जांभेकर यांनी आपल्या दर्पणच्या पहिल्या अग्रलेखात वर्तमानपत्राचे स्वरूप स्पष्ट केले होते. मनोरंजन करणे, चालत्या काळाचे वर्तमान कळविणे आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे या गोष्टीची दर्पण छापणाऱ्यास मोठी उत्कंठा आहे. अशी त्रिसूत्री बाळशास्त्रीने सांगितली. दर्पणकारांचा दृष्टेपणा यातून दिसून येतो कारण वर्तमान कळविणे म्हणजे बातम्या देणे प्रमुख काम आहे. परंतु त्याच बरोबर मनोरंजन करणे हेही वर्तमानपत्रात असले पाहिजे. यातील तिसरा भाग म्हणजे उद्योग, व्यवसाय, नोकरी यामध्ये यश मिळविण्यासाठी छापले पाहिजे. माझ्या भाषेत सांगायचे झालेच तर ''करिअर गाईडन्स द्यावे'' होय.

परंतु आजकाल कोणीही वर्तमानपत्र छापायला घेतात. त्याचे फार स्वरूप बदलून गेले आहे. वर्तमानपत्र वाचायला घेतले की, वाचताना उत्सुकता

असणे किंवा वाटणे महत्त्वाचे आहे. वर्तमानपत्र हे चालू घडामोडींवर भाष्य करणारे सर्वसामान्यांसाठी महत्त्वाचे आणि सोपे साधन होय. दुसऱ्या देशांच्या आणि आपल्या देशांच्या वर्तमानपत्राची तुलना केली तर कळेल की नक्की काय फरक आहे. त्यात खूप मोठा फरक जाणवून येईल. त्यांच्या वर्तमानपत्रातील पहिल्या पानांवर सुखद आनंदाच्या बातम्या असतात. त्या गोष्टीचा सर्वात मोठा फायदा होतो तो म्हणजे वाचकाच्या मनात सकारात्मक बदल घडतो. परंतु याउलट पाहायचे झाले तर भारतातील वर्तमानपत्रांचे स्वरुप हे वेगळे. त्यात दु:खद, वाईट, घटना सुरूवातीच्या पानावर असतात. आत्महत्या, बलात्कार किंवा अन्य कुठल्या बातम्या सुरुवातीच्या पानावर असताना दिसत नाहीत. ज्या वर्तमानपत्रातून जगाच्या बातम्या, घडामोडी कळतात त्या घटना प्रेरणादायी असणे खूप आवश्यक आहे.

''वर्तमानपत्र दारोदारी
प्रगती घरोघरी''

# वर्तमानपत्रांचा इतिहास

**कोमल बालासाहेब बेंद्रे,** बी.कॉम प्रथम वर्ष

**मुद्रणकलेचा शोध** युरोपमध्ये १५ व्या शतकात लागल्यामळे वृत्तपत्रे व ग्रंथनिर्मितीस चालना मिळाली. मुद्रणकलेचा प्रवेश भारतामध्ये १६ व्या शतकात झाला. भारतामध्ये मुद्रणाची सुरूवात सर्वप्रथम गोव्यात झाली. भारतामध्ये मुद्रणकलेचा प्रसार ख्रिश्चन मिशनऱ्यांनी केला. २१ जानेवारी १७८० रोजी भारतातील पहिले वृत्तपत्र बेंगॉल गॅझेट या नावाने जेम्स ऑगस्ट्स हिकीने इंग्रजी साप्ताहिक बंगालमध्ये सुरू केले आणि त्यानंतरची पुढील वर्तमानपत्रे अशाप्रकारे प्रकाशित झाली. 'मुंबापूर' वर्तमानपत्र (१८२८), 'दर्पण' (१८३२), बाळशास्त्री जांभेकर, 'मुंबी अखबार' (१८४०), 'प्रभाकर' (१८४१) 'ज्ञानसिंधू' (१८४१), 'मित्रोदय' (१८४४) पुणे, 'ज्ञानप्रकाश'(१८४९), 'ज्ञानोदय' (१८४२), 'विचारलहरी' (१८५२), 'वर्तमान दीपिका' (१८५३). त्यापैकी, बाळशास्त्री जांभेकर यांनी सुरू केलेले दर्पण हे वृत्तपत्रच घ्या. बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' ६ जानेवारी, १८३२ रोजी सुरु केले होते आणि जुलै, १८४० मध्ये दर्पणचा शेवटचा अंक प्रकाशित झाला होता.

महाराष्ट्र शासनाने पत्रकार दिन हा ६ जानेवारी रोजी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जन्मदिनानिमित्त घोषित केला आहे आणि तो तितक्याच आदराने महाराष्ट्र राज्यात साजरा करण्यात येतो. गोविंद कुंटे आणि भाऊ महाजन यांच्या मदतीने त्यांनी दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र काढले.

**दर्पण वृत्तपत्र काढण्यामागचा उद्देश –**
समाजाचे प्रबोधन व्हावे या उद्देशाने काढण्यात आले. या वृत्तपत्राद्वारे समता आणि व्यक्तीस्वातंत्र्य या तत्त्वावर समाजाची उभारणी करण्याचा प्रयत्न करणे हा उद्देश होता.

१) भारतीयांना देश – काळ – परिस्थितीचे आणि परदेशी राज्य व्यवहाराचे ज्ञान मिळवण्यासाठी बाळशास्त्री जांभेकरांनी हे वृत्तपत्र सुरू केले.

२) समाजातील लोकांच्या हितासाठी कोणताही नफ्याचा उद्देश समोर न ठेवता हे चालवले आहे.

३) वर्तमानपत्रे, जे चुकणारे लोकनेते आहेत किंवा अंमलदार आहेत किंवा प्रशासकीय अधिकारी आहेत त्यांच्यावर नजर ठेवायची.

४) स्वातंत्र्यासाठी झगडणारे लोक आहेत त्यांना सर्वतोपरी मदत करायची.

५) वृत्तपत्रे ही सामान्य लोकांच्या विचारांशी, ध्येयवादाशी त्यांच्या सामान्य गरजा, त्यांचे प्रश्न, त्यांच्यावरील अन्याय, त्यांचे अभिमान, त्यांचे आनंद झालेली असली पाहिजेत.

**वृत्तपत्राची समाजातील भूमिका – काल आणि आज**

वृत्तपत्रे हा मानवी जीवनाचा एक आवश्यक घटक आहे. म्हणूनच वृत्तपत्राला लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ म्हणून गणले जाते. रोजच्या ताज्या घडोमोडी घेऊन येणारे वृत्तपत्राचे स्थान आजही माहिती तंत्रज्ञानाच्या युगात अनेक वेगवान प्रसारमाध्यमे असतांनाही, मानवी मनाच्या कोपऱ्यात टिकून आहे.

यावरुनच आपल्याला वृत्तपत्राचे महत्त्व व भूमिका कळून येते. विश्वसनीय माहिती, ज्ञान, प्रबोधन आणि मनोरंजन करणारे विविधांगी मजकूर वृत्तपत्रातून प्रकाशित होतात. म्हणूनच वृत्तपत्राला समाजमनाचा आरसा संबोधले गेले आहे.

समाज परिवर्तन घडविण्यात वृत्तपत्रांची महत्त्वपूर्ण भूमिका दिसून येते. वृत्तपत्रांचा महत्त्वपूर्ण उद्देश म्हणजे समाजात लोकजागृती, घडविणे, अयोग्य घटनांचा निषेध करणे, कमजोर घटकांना शक्तिशाली बनविणे व दैनंदिन घटना नोंदविणे हा होय. त्यामुळेच अनेक वाईट गोष्टींचा निषेध केला जातो. सत्य घटना व वास्तवचित्र समाजापर्यंत पोहचवत असतांना पूर्वी सुद्धा अनेक वृत्तसंपादकांना शिक्षा देण्यात आली होती, तर कधी वृत्तपत्रावर बंदी घालण्यात आली, परंतु मराठीमध्ये एक अशी म्हण आहे, 'जगण्यासारखे जोपर्यंत जवळ काही आहे तो पर्यंत मरण्यात मजा आहे' हे अगदी खरंच आहे. आजही वृत्तपत्रांतून वाईट गोष्टींचा निषेध केला जातो. पण त्यासाठी अनेक पत्रकारांना आपल्या प्राणाची आहुती द्यावी लागते किंवा प्राणघातक हल्ल्यांना सामोरे जावं लागतं. डॉ. नरेंद्र दाभोळकर व गोविंद पानसरे या विचारप्रवर्तकांच्या विचारांना बंदुकीच्या गोळ्यांनी मारले. याला आपल्या देशात नावीन्य नाही. ए. एम. कलबुर्गी व आताच झालेली कानडी पत्रकार गौरी लंकेश यांची हत्या म्हणजे भारतीय स्वातंत्र्य लोकशाही विचारांची हत्याच म्हणावी लागेल. नोटाबंदी, परराष्ट्र व्यवहारातील अपयश, वाढती महागाई, बेरोजगारी व भ्रष्टाचारावर लेखन करणे, हेच त्यांच्या हल्ल्या मागचे खरे कारण मीडियाद्वारे बाहेर आले.

मागील वर्षात १० पत्रकार मारल्या गेले व बऱ्याच पत्रकारांना जीवानिशी मारण्याच्या धमक्या मिळाल्या. हे खऱ्या सरेआम लोकशाहीची केलेली हत्याच म्हणावी लागेल नाही का ?

वृत्तपत्रे हे माहिती व मनोरंजनाचे एक प्रभावी माध्यम असून त्यातून ज्ञान, विज्ञान, वैचारिकता व मनोरंजनात्मक लिखाण केले जाते. समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे, चांगल्या गोष्टींना न्याय देणे, वाईट गोष्टींवर तीव्र प्रहार करुन समाजातील वास्तवचित्र व सत्य घटना समाजासमोर आणण्यात वृत्तपत्राची महत्त्वपूर्ण भूमिका असून ती लेखणीतून मांडणे आज काळाची गरज आहे.

# पत्रकारितेचे विविध प्रकार

**आदित्य आप्पारावसाहेब लहाने,** बी.एस्सी. द्वितीय वर्ष
(संकलित)

**वृत्तपत्रकारिता : वृत्तपत्राच्या** किंवा नभोवाणी व दूरचित्रवाणी यांसारख्या जनसंज्ञापनाच्या माध्यमातून वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या वृत्तविषयक गरजा भागवण्याचे कार्य म्हणजे वृत्तपत्रकारिता असे म्हणता येईल.

लोकशाही राज्यव्यवस्थेची इमारत कायदेमंडळ, राज्यशासन, न्यायसंस्था व पत्रकारिता या चार आधारस्तंभावर उभी असते. ही कल्पना प्रथम मेकॉलेने १८२८ मध्ये आपल्या 'कान्स्टिट्युशनल हिस्टरी' या निबंधात मांडली. वृत्तपत्राच्या सदर्भात त्यांनी चौथी शक्ती असा शब्दप्रयोग केला. कार्लाइलने ''ऑन हिरोज, हिरो वरशिप ॲन्ड हिरोइक इन हिस्टरी'' (१८४१) या आपल्या ग्रंथातील ''द हिरो ॲज मॅन ऑफ लेटर्स'' या प्रकरणात एडमंड बर्कचे पुढील उद्‌गार उद्‌धृत केले आहेत. मानवी जीवनाचे नियमन करणाऱ्या धर्मसत्ता (लॉर्डस स्पिरीच्युअल), राजसत्ता (लॉर्डस टेपोरल) व लोकसत्ता (कायदेमंडळ) या तीन शक्तीप्रमाणे नव्हे, त्याच्यापेक्षाही अधिक महत्त्वाची शक्ती म्हणजे पत्रकारिता (प्रेस गॅलरी) होय. या उद्‌गारांतून पत्रकारितेचे महत्त्व व्यक्त झाले आहे.

पत्रकारितेचे मुख्यत: तीन कार्ये असतात माहिती देणे, उद्‌बोधन करणे आणि मनोरंजन, ही कार्ये चांगल्यारीतीने पार पाडता यावीत म्हणून वृत्तपत्रे व पत्रकार यांना स्वातंत्र्याची आवश्यकता असते. वृत्तपत्रे व पत्रकार यांच्यावर सात प्रकारचे दबाव येत असतात, राज्यशासन, वृत्तपत्रसंस्थेचे व जनसंज्ञापन माध्यम संस्थेचे मालक, जाहिरातदार, समाजातील विविध हितसंबंधी दबावगट, बातम्या व माहिती पुरवणारे स्त्रोत , वृत्तपत्राचा स्वार्थ आणि पत्रकाराचा वैयक्तिक स्वार्थ या सात दबावगटांपैकी प्रत्येकाला वृत्तपत्राचा उपयोग करून आपले स्वत:चे हितरक्षण व हितसंवर्धन करावयाचे असते. या सर्व दबावगटांना खंबीरपणे तोंड देऊन पत्रकारितेला आपले कर्तव्य पार पाडायचे असते. निर्मितीखर्चापेक्षा कमी किंमतीला विकली जाणारी एकमेव वस्तू म्हणजे वृत्तपत्र होय. वृत्तपत्राच्या विक्रीतून कागदाचा खर्च जेमतेम भरुन निघतो. वृत्तपत्रांना आपले सर्व प्रकारचे खर्च जाहिरातीच्या उत्पनातून भागवावे लागतात. वृत्तपत्राने आपला व्यवसाय यशस्वी केला तर त्याला आपले स्वातंत्र्य जपता येते आणि आपले स्वातंत्र्य जर निष्ठापूर्वक जपले तर त्याला आपल्या व्यवसायात यश मिळू शकते. व्यावसायिक यश व स्वातंत्र्याची जबाबदारी यामध्ये समतोल साधणे हे वृत्तपत्राच्या यशाचे म्हणजे विश्वासार्हतेचे, जाहिरातीच्या उत्पन्नाचे प्रतिष्ठेचे गमक असते.

भारताच्या राज्यघटनेत आविष्कारस्वातंत्र्य हा मूलभूत अधिकार म्हणून मान्य करण्यात आला आहे आणि आतंरराष्ट्रीय करारनाम्याच्या कलम १९ (३) मध्ये मान्य करण्यात आलेल्या बंधनाचाच भारतीय राज्यघटनेत समावेश करण्यात आला आहे. मात्र आंतरराष्ट्रीय करारनाम्यापेक्षा भिन्न अशी एक तरतूद भारतीय राज्यघटनेत आहे. आविष्कारस्वातंत्र्याचा अधिकार फक्त भारताच्या

नागरिकांपुरताच मर्यादित करण्यात आला आहे. परदेशी पत्रकाराला तो भारतामध्ये उपलब्ध नाही. भारतीय पत्रकारितेच्या दृष्टीने मात्र सर्वोच्च न्यायालयाचे अनेक निर्णय पत्रकाराच्या मूलभूत आविष्कार स्वातंत्र्याचे रक्षण करणारे ठरले आहेत.
पत्रकारितेचे विविध प्रकार : पत्रकारितेचे उदिदष्ट्ये, स्वरुप, कार्य यानुसार विविध प्रकार संभवतात. विकास पत्रकारिता, शोध पत्रकारिता, अन्वयार्थक पत्रकारिता, नवपत्रकारिता हे त्यातील प्रमुख प्रकार आहेत.
विकास पत्रकारिता :– दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघटना (यूनेस्को) स्थापन झाली. आशिया, अफ्रिका, दक्षिण अमेरिका या भूभागांमध्ये असलेल्या आपल्या वसाहतींना स्वातंत्र्य देणे यूरोपमधील राष्ट्रांना भाग पडले. चीनमध्ये कम्युनिस्ट क्रांती झाली आणि युरोपमधील अनेक राष्ट्रांतही कम्युनिस्ट राजवटी स्थापन झाल्या. त्यामुळे प्रगत पाश्चात्य औद्योगिक राष्ट्रे, कम्युनिस्ट राष्ट्रे आणि नव्याने स्वतंत्र झालेली पण मागास असलेली राष्ट्रे असे जगाचे तीन भाग किंवा तीन जगे अस्तित्वात आली. मागासलेल्या तिसऱ्या जगातील राष्ट्रांना मदत देऊन त्यांना आपल्या गोटात ओढण्याची स्पर्धा अमेरिका व रशिया यांच्यात सुरू झाली.

तिसऱ्या जगातील राष्ट्रांच्या विकासांच्या वाटचालीमध्ये वृत्तपत्रे व अन्य जनसंज्ञापन माध्यमे महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतील, अशा विश्वासातून १९५० च्या दशकात 'विकास' पत्रकारितेचा जन्म झाला. 'विकास' ची संकल्पना पहिल्या महायुद्धानंतर युरोपमध्ये मार्शल योजनेच्या रूपाने पुढे आली. दुसऱ्या महायुद्धानंतर तीच संकल्पना 'तिसऱ्या' जगातील राष्ट्राच्या संदर्भात वापरण्याचा प्रयत्न झाला. परंतु पहिल्या महायुद्धानंतरची राष्ट्रे आणि दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र झालेली तिसऱ्या जगातील राष्ट्रे यांच्यात मूलभूत भेद असल्यामुळे 'विकास'च्या संकल्पनेत व प्रक्रियेत वेळोवेळी बदल करावे लागले आणि त्यानुसार विकास पत्रकारितेच्या स्वरूपात व भूमिकेत वेळोवेळी बदल झाले. माहितीचे केवळ एकाच दिशेने वितरण न करता सामान्य माणसाच्या विकासाबद्दल कल्पना, अडचणी, अनुभव याचा शोध घेणे, त्या माहितीचे सरकारला वितरण करणे आणि लोकांनी आपला विकास आपणच घडवावा यासाठी त्यांना उद्युक्त करणे, त्यांना सहभागी करुन घेणे ही सुद्धा विकास पत्रकारितेची भूमिका असली पाहिजे, असे १९७० व १९८० च्या दशकात मानण्यात येऊ लागले.
शोध पत्रकारीता :– वृत्तपत्रे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ असून उरलेल्या तीन आधारस्तंभावर लक्ष ठेवण्याचे काम वृत्तपत्रांना करावे लागते. १९६० च्या दशकात अमेरिकेत आणि १९७० च्या दशकात भारतात शोध पत्रकारितेचा प्रारंभ झाला. भारतात भागलपूरच्या तुरुंगात कैदी गुन्हेगारांच्या डोक्यात ॲसिड घालण्याचा प्रकार, क्युको या कंपनीशी भारताने केलेला तेल खरेदीचा व्यवहार, बोफोर्स खरेदी मध्ये उच्चपदस्थांनी घेतलेली लाच इ. प्रकारणांच्या संदर्भात इंडियन एक्सप्रेस, इंडिया टुडे, हिंदू इ. वृत्तपत्रांनी शोध पत्रकारितेचा अवलंब केला. शोध पत्रकारितेची काही पथ्ये आहेत. भक्कम पुरावा मिळवणे, माहिती देणाऱ्यांचे नाव गुप्त ठेवणे, संशोधनाचा झोत विशिष्ट पत्रापुरता किंवा विशिष्ट व्यक्तीपुरता मर्यादित न ठेवणे, गौप्यस्फोटाची धमकी देऊन पैसे उकळण्यासाठी याचा उपयोग होणार नाही याची दक्षता घेणे आणि संशोधनाअंतीचे निष्कर्ष प्रांजळपणे मान्य करणे, इ.

शोध पत्रकारितेमुळे संबंधित व्यक्तीच्या अपकृत्याबद्दल त्यांना शिक्षा होऊ शकते. एवढेच

नव्हे, तर अपकृत्यांना आळाही बसू शकतो. काही प्रसंगी गैरकृत्य करणाऱ्यांकडून धमक्या वा अनेक प्रकारचे त्रास सहन करावे लागतात. परंतु, वृत्तपत्राच्या प्रतिमेसाठी आणि जनमानसात आपुलकी, आदर व नैतिक दरारा निर्माण करण्यासाठी वृत्तपत्रांना शोध वृत्तपत्रकारितेचा उपयोग होऊ शकतो.

अन्वयार्थक पत्रकारिता :– वस्तूनिष्ठ बातमीबरोबरच त्या बातमीतील घटना, घटना घडण्यामागे असलेले राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रवाह व शक्ती आणि घटनांचे संभाव्य परिणाम यांचे विश्लेषण करणे, वाचकांना सुजान करणे, घटनांबद्दलची ममदृष्टी देणे आणि आपले मत बनविण्यासाठी साहाय्य करणे या गोष्टींचाही आता पत्रकारितेत समावेश होतो त्यासाठी तज्ज्ञांचे साहाय्य घ्यावे लागते. मात्र वाचकांना समजेल अशा सोप्या भाषेत व सोप्या पद्धतीने या गोष्टी वृत्तपत्रांना लिहाव्या लागतात. अशा लेखनाला अन्वयार्थक पत्रकारिता असे म्हणतात.

अन्वयार्थक पत्रकारितेशी संबंधित अशी काही नवी रुपे पुढे आली आहेत. वृत्तपत्रांमध्ये अनेक विषय येतात. या विषयाचे वृत्तांकन, विश्लेषण आणि त्यावरील टीका – टिपणी करण्यासाठी तज्ज्ञांची गरज असते. त्यामुळे अशा तज्ज्ञ व्यक्तींना पत्रकारितेचे शिक्षण देणे किंवा पत्रकारांना अशा विषयाचा सखोल अभ्यास करणे हे दोनच पर्याय असतात. त्यामुळे अनेक वेळा अशा विशेष विषयातील पत्रकारिता त्या त्या विषयाच्या नावे ओळखली जाते. उदा. व्यापार – उद्योग पत्रकारिता, क्रीडाविषयक पत्रकारिता, नाटक – चित्रपट – चित्रकला, नृत्य, संगीत, अशा कला व करमणुकीसंबंधीची पत्रकारिता, स्त्रियांच्या प्रश्नांविषयीची पत्रकारिता असे पत्रकारितेचे काही प्रकार मानण्यात येतात, असे दिसते. त्या त्या विषयांचा वाचकांना परिचय व्हावा, त्यांचे रसग्रहण करता यावे किंवा व्यवहारात त्यांचा उपयोग करुन घेता यावा अशा रीतीने त्या विषयांबद्दल लिहिणे हे त्या विषयाच्या पत्रकारितेचे उद्दिष्ट असते. त्यामुळे या विषयांचे मूलभूत स्वरुप, त्याची सद्यं:स्थिती, त्याचे भविष्य, इ. गोष्टींचा पत्रकारितेच्या दृष्टीने सोप्या भाषेत वेध घेणे, असे त्या पत्रकारितेचे स्वरुप असते.

पीत पत्रकारिता :– खप वाढविण्यासाठी भडकपणाचा आश्रय घेणाऱ्या पत्रकारितेसाठी 'पीत पत्रकारिता' (यलो जर्नलिझम) ही संज्ञा वापरली जाते. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात अमेरिकेमध्ये या संज्ञेचा उगम झाला. त्यावेळी सुरू झालेली रंगीत छपाई प्रथम विनोदी चित्रपटांच्या विभागासाठी वापरली जाऊ लागली आणि त्यासाठी पिवळ्या शाईचा उपयोग केला जाई. त्यावेळच्या अत्यंत लोकप्रिय असलेल्या विनोदी चित्रपट्टी – मालिकेचे शीर्षकही 'यलो किड्स ऑफ होगन्स ॲली' असे होते. प्रथम जोसेफ पूलिटझरचे न्यूयॉर्क वर्ल्ड आणि नंतर रँडाल्फ हर्स्टचे न्यूयॉर्क जर्नल या दैनिकांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या या चित्रपट्टी – मालिकेतील मुलांच्या अंगात पिवळा गाऊन असे. त्यावरुन' ही संज्ञा प्रथम वापरात आली. मात्र पुढे ती पत्रकारितेतील अपप्रवृत्तींची निदर्शक म्हणून रूढ झाली. भडक आणि भावनांना आवाहन करणाऱ्या मजकुरांवर या पत्रकारितेचा भर असतो. गुन्हेगारी, लैंगिकता, मिथ्या – वैज्ञानिक लेख तथाकथित प्राचीन शोध, चमत्कार ठराविक अशी औषधे यांच्या बरोबरच भ्रष्टाचार, फसवणुकीची कृत्ये आणि सामाजिक अपकृत्ये यांविरुद्धच्या मोहिमांचा वापरही ह्या पत्रकारितेत खप वाढविण्यासाठी केला जातो. वेगवेगळ्या स्पर्धा व त्यातील विजेत्यांसाठी आकर्षक बक्षीसे याचाही समावेश पीत पत्रकारितेत होतो.

धनादेश पत्रकारिता :– वृत्तपत्रांच्या रविवार आवृत्या

अधिकाधिक वाचनीय करून वाचकांना आकर्षित करण्याची स्पर्धा वृत्तपत्रांमध्ये सुरू झाली. एखादी कादंबरी किंवा ग्रंथ रविवार आवृत्तीमध्ये क्रमश: छापणे, प्रसिद्ध नाट्य – चित्रपट कलावंतांचे आत्मवृत्त किंवा आठवणी क्रमश: छापणे यांसारखे उपक्रम वृत्तपत्रांनी सुरू केले. परंतु याची परिणती, विशेषत: पाश्चात्य राष्ट्रांमध्ये गुन्हेगारांच्या अनुभवासाठी किंवा कबुलीजबाबासाठी त्यांना मोठमोठ्या रकमा देण्याचा प्रघात सुरू होण्यात आली. आर्थिक मोबदला देऊन असे लेखन मिळवणे हे वृत्तपत्राच्या नीतीच्या दृष्टीने स्पृहणीय नाही. त्यामुळे अशा पत्रकारितेला धनादेश पत्रकारिता असे म्हणण्यात येऊ लागले. इंग्लंडच्या वृत्तपत्र समितीने १९८३ नंतर असे म्हटले की, गुन्हेगाराप्रमाणेच गुन्हेगारांचे सहकारी, नातेवाईक, इत्यादींना तत्संबंधीच्या वृत्तलेखासाठी पैसे देण्यात येऊ नयेत. वृत्तपत्रांनी या बाबतीत संयम बाळगला नाही आणि पत्रकारितेची नीती तत्त्वे आचरणात आणली नाहीत, तर शासनाला त्यासंबंधी कायदा करावा लागेल, असेही वृत्तपत्र समितीने म्हटले आहे.

नवपत्रकारिता :– १९६० नंतरच्या कालखंडात धरणे व घटना यांना प्रभाावित करण्याचे एक साधन म्हणून वृत्तपत्राकडे तरुण पिढी पाहू लागली. अमेरिकेमध्ये दूरचित्रवाणीवरील वृत्तनिवेदकाच्या वाढत्या लोकप्रियतेमुळे पत्रकारांचा दर्जा उचांऊ लागला. दूरचित्रवाणीवरील पत्रकार व वृत्तनिवेदक हा राजकीय नेते, लोकप्रिय लेखक, नट, संगीतकार, चित्रकार इत्यादींच्या जवळ जाऊ शकतो, आणीबाणीच्या प्रसंगात तो हजर असतो, हे दिसल्यामुळे पत्रकारितेच्या व्यवसायाबद्दल उच्चवर्गीय युवक – युवतींनाही आकर्षण वाटू लागले. त्यामुळे विद्यापीठीय शिक्षण घेतलेले तरुण – तरुणी वृत्तपत्रे, नभोवाणी आणि दूरचित्रवाणी यांच्यात काम करू लागले. पत्रकारांच्या या बदलत्या सामाजिक दर्जामुळे पत्रकारितेचाही व्यावसायिक दर्जा उंचावू लागला. या पत्रकारितेने वृत्तलेखनाची पारपांरिक पथ्ये धुडकावून लावली. ललित वाङ्मयातील अनेक युक्त्यांचा वापर करण्यास सुरूवात केली उदा. नाट्यमय प्रारंभ उत्कंठावर्धक विवेचन, छोटे छोटे परिच्छेद, वृत्तनिवेदनात कथनशैलीचा उपयोग इत्यादी. या पत्रकारितेची गाजलेली उदाहरणे म्हणून नार्मन मेलरच्या 'आर्मीज ऑफ द नाईट' आणि 'फायर ऑन मून' या वृत्ताकनांचा उल्लेख केला जातो. मराठीतही अनिल अवचट यांनी नवपत्रकारितेच्या पद्धतीचे चांगले लेखन केलेले आहे. उदा. माणसं.

युक्तीवादात्मक पत्रकारिता :– तटस्थ पत्रकारितेला विरोध करुन एखाद्या समस्येची आपल्याला पटणारी बाजू घेऊन पत्रकाराने तिच्या समर्थनासाठी युक्तीवाद करावा असे ही पत्रकारिता मानते. व्यवहारात तटस्थता अशक्य असते व तिचा अट्टहास पत्रकाराने बाळगू नये असे या पत्रकारितेच्या समर्थकांचे म्हणणे आहे. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात घडणाऱ्या घटनांबाबत नैतिक दृष्ट्या न्याय असलेली बाजू उचलून धरण्यासाठी त्या घटनांमध्ये सहभागी व्हावे असे ही पत्रकारिता मानते. समाजातील गरीब, अल्पसंख्याक आणि सामाजिक न्यायासाठी धडपडणारे लोक यांना आपली मते व्यक्त करण्यासाठी प्रभावी प्रवक्ते मिळत नाहीत, म्हणून पत्रकारांनी अशा गटांच्या बाजूने सहभागी व्हावे आणि संघर्षातील बाजू समान पातळीवर येतील असा प्रयत्न करावा. मात्र युक्तीवादात्मक पत्रकारितेमुळे वाचक प्रेक्षकांवर अन्याय होतो, वस्तुस्थितीचे वर्णन दुर्लक्षित होते, शिवाय या पत्रकारितेतच अनेक गट संभवतात, त्यामुळे तिची विश्वसनीयता संपते व मुख्यत: पत्रकारितेची स्वायत्ताही नष्ट होते इ. आक्षेप या पत्रकारितेवर

घेतले जातात.

विरोधक पत्रकारिता :– ज्या लोकशाहीमध्ये विरोध पत्र निष्प्रभ ठरतात, त्या ठिकाणी पत्रकारांनी विरोधी पक्षांची भूमिका बजावली पाहिजे, असे काही पत्रकार मानतात, परंतु नेहरुंनीही याच अर्थाचे विधान केले आहे. राजकीय नेते आणि संस्था यांच्या संदर्भात पत्रकारितेने सकल समीक्षेची आणि प्रभावी टोकाची भूमिका घेतली पाहिजे. त्यामुळे मतदार जागृत होईल आणि लोकशाहीला बळकटी येईल. १९६० नंतरच्या प्रस्थापितांना विरोध असणाऱ्या वातावरणात, विरोधक पत्रकारितेचा जन्म झाला. अमेरिकन पत्रकारितेच्या जगात हेरगिरी करणारे यु–टू विमाने, बे ऑफ पिग्ज मधील आक्रमण, व्हियतनाम युद्ध आणि वॉटरगेट प्रकरण यांचा या संदर्भात उल्लेख केला जातो. या सर्व प्रकरणांत पत्रकारांनी उपलब्ध माहितीचा शोधक आणि संशयी वृत्तीने पिच्छा पुरवून सत्य उघडकीस आणले. पत्रकारितेने असे न केल्यास ती राजकारणी व्यक्तींच्या वाकड्या मार्गावरील सहप्रवासी होऊन जनतेची फसवणूक करण्यात सहभागी होते, असे ही पत्रकारिता मानते.

छायाचित्र पत्रकारिता :– घटना सोपी करुन सांगणे हा संज्ञापणाचा मूळ हेतू असतो. शब्दांपेक्षा दृश्य माध्यमातून संज्ञापण अधिक प्रभावीपणे साधता येते. म्हणून वृत्तपत्रात बातम्यांबरोबर छायाचित्रांचा वापर केला जातो. छायाचित्रांप्रमाणेच व्यंगचित्र, नकाशा, आलेख, रेखाटन, कल्पनाचित्रे आदींचा वापर करून संज्ञापण साधले जाते. त्यास 'छायाचित्र पत्रकारिता' म्हणतात. यासाठी पत्रकारितेची दृष्टी असलेला छायाचित्रकार आवश्यक असतो कोणत्याही घटनेचा सर्वात महत्त्वाचा, नेमका क्षण कॅमेऱ्याने टिपणे यातच त्याचे कौशल्य असते.

वृत्तपत्रात छायाचित्र प्रसिद्ध करताना त्याच्या तांत्रिक गुणवत्तेपेक्षा त्यातील पत्रकारिता मूल्यास अधिक महत्त्व दिले जाते. प्रसिद्धीसाठी निवड करताना छायाचित्र बातमीला पूरक आणि छापण्यायोग्य असावे, अशी अपेक्षा असते. त्याखेरीज ते बनावट, दिशाभूल करणारे, न्यायालयीन कारवाई ओढवून घेणारे, वाचकावर विपरित परिणाम करणारे, हीन अभिरुची असू नये, असे काही निकषही पत्रकारितेत मानले जातात. आधुनिक पत्रकारितेत मात्र हे निकष धुडकावून लावण्याची वृत्ती बळावू लागली आहे. वलयांकित खाजगी आयुष्यावरील आक्रमण हा छायाचित्र पत्रकारितेतील वादाचा विषय बनला आहे.

# वृत्तपत्रविषयक कायदे

**विद्या विष्णपंत कटारे,** बी. एस्सी. तृतीय वर्ष

(संकलित)

**ज्यामध्ये बातम्या,** लेख, लेखावरील मते, वैशिष्ट्ये, जाहिराती इ. पानावर छापून दररोज किंवा साप्ताहिक वितरण केले जाते त्यास आपण वृत्तपत्र असे म्हणतो. ही वृत्तपत्राची सर्वसाधारण व्याख्या आपल्याला करता येते. स्वातंत्र्यपूर्व काळात आपल्या विचारमशालीने संपूर्ण समाजाला जागृत करण्यासाठी एक उत्तम साधन म्हणून वृत्तपत्राकडे पाहिले आणि तसा उपयोगही त्याकालावधीत या वृत्तपत्रांचा करण्यात आला. वृत्तपत्र त्या कालावधीत एक प्रभावी साधन बनले ते इलेक्ट्रानिक मीडिया येईपर्यंत तसेच राहिले.

काळ बदलला की माणूसही बदलतो, कारण परिवर्तन हा सृष्टीचाच नियम आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात ज्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून समाजजागृती करुन स्वातंत्र्य प्राप्त केले. स्वातंत्र्योत्तर काळात याच वृत्तपत्रांच्या अभिव्यक्तीवर बंधने आणण्याच्या हेतूने काही कायद्यांची निर्मिती करण्यात आली. आपण थोडक्यात वृत्तपत्रांचे लोकशाहीतील स्थान लक्षात घेता वृत्तपत्रांना पुरेसे स्वातंत्र्य असणे आवश्यक असते. मात्र हे या स्वातंत्र्याला आपण अनिर्बंध असे म्हणू शकत नाही. कायद्याच्या माध्यमातून वृत्तपत्र स्वातंत्र्याचे रक्षण व नियंत्रण केले जाते. या कायद्यांना एकत्रितपणे 'वृत्तपत्रविषयक कायदे' म्हटले जाते. या कायद्याचा आपण थोडक्यात आढावा घेणार आहोत.

१) वृत्तपत्र स्वातंत्र्याचे रक्षण करणारे, २) वृत्तपत्र स्वातंत्र्यावर बंधन घालणारे आणि ३) वृत्तपत्र व्यवसायाची 'उद्योग' (धंदा) ही बाजू नियंत्रित करणारे यापैकी पहिल्या व दुसऱ्या प्रकारातील कायदे केवळ वृत्तपत्रांसाठी बनविलेले नसून अन्य व्यक्ती व माध्यमे यांनाही ते लागू होतात. मात्र तिसऱ्या प्रकारातील कायदे खास वृत्तपत्रांसाठीच बनविण्यात आले आहेत.

१) वृत्तपत्र स्वातंत्र्याचे रक्षण करणारे कायदे :- भारतीय संविधानाच्या कलम १९(१) (अ) नुसार भारतीय नागरिकांना विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार दिला आहे. वृत्तपत्रांना नागरिकत्व नसले तरी वृत्तपत्रांचा मालक, संपादक वाचक इ. नागरिकांकडून या स्वातंत्र्याची अंमलबजावणी करता येते. अमेरिकेच्या घटनेने स्वतंत्र तरतुदीच्या माध्यमातून वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य मान्य केले असले तरी भारतात न्यायालयाने कलम १९(१) (अ) मध्येच वृत्तपत्र स्वातंत्र्याचा समावेश होतो हे मान्य केले आहे.

वृत्तपत्रसंस्था हा एक प्रकारचा उद्योग असल्याने त्याच्या व्यवसाय स्वातंत्र्यावर बंधने घालता येतात. मात्र अशा बंधानामुळे जर अभिव्यक्ति स्वातंत्र्याचा संकोच होत असेल तर ते बंधन अवाजवी ठरेल असे न्यायालयाने नमूद केले आहे. भारतीय संविधानाच्या कलम १९(२) नुसार भाषणस्वातंत्र्यावर वाजवी बंधने घालता येतात. भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता, राष्ट्राची सुरक्षितता, सद्भिरुची, नैतिकता, न्यायालयाचा अवमान, बदनामी किंवा गुन्हा करण्यास प्रोत्साहन देणे यासंदर्भातच कायदे मंडळांना स्वातंत्र्यावर वाजवी बंधने घालता

येते. घातलेले बंधन वाजवी की अवाजवी हे न्यायालय ठरवतात.

२) वृत्तपत्र स्वातंत्र्यावर बंधन घालणारे कायदे :– या प्रकारात मोडणारे काही महत्त्वाचे कायदे. १) संसदेचे विशेषाधिकार, २) न्यायालयाच्या अवमानाचा कायदा, ३) लेखाधिकाराचा कायदा, ४) अब्रुनुकसानीचा कायदा, ५) शासकीय गोपनीयतेचा कायदा, ६) अश्लीलता विषयक कायदा, ७) फौजदारी कायदा, ८) आक्षेपार्ह जाहिरातीचा कायदा, ९) वृत्तपत्रसमिती विषयक कायदा

वरीलापैकी काही कायद्याचे महत्त्व संक्षेपाने :–

१) संसदेचे विशेषाधिकार :– भारतीय लोकशाही राज्यात संसदेचे विशेष अधिकार मान्य करण्यात आलेले आहेत. राज्याची विधीमंडळे व संसद यांना घटनेच्या अनुक्रमे १९४ व १०५ यांनुसार विशेषाधिकार देण्यात आले आहेत. वरील सभागृहाच्या कामकाजाचा वृत्तांत देण्याचा अथवा प्रसिद्ध करण्याचा अधिकार फक्त सभागृहासच असतो. हा त्यांचा विशेषाधिकार आहे. वृत्तपत्र वा अन्य माध्यमे सभागृहाच्या परवानगीने तो वृत्तान्त प्रसिद्ध करु शकतात. 'द पार्लमेंटरी प्रोसिडिंग्ज (प्रोटेक्शन ऑफ पब्लिकेशन) ॲक्ट', १९५६ या कायद्यान्वये संसदेच्या कुठल्याही सभागृहाचा वृत्तान्त वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केल्यास त्यांची दिवाणी व फौजदारी कारवाईपासून मुक्तता केली आहे. मात्र तो वृत्तान्त सत्य असल्यास, लोकहितासाठी प्रसिद्ध केल्यास व दुष्ट बुद्धीने प्रसिद्ध केला नसल्यासच दिवाणी व फौजदारी न्यायालयीन प्रक्रियेतून मुक्तता होते. अशीच तरतूद ४४ व्या घटनादुरुस्तीने कलम ३६१ अ नुसार संसद व राज्य विधीमंडळासाठीही केली आहे. मात्र त्यात लोकहिताची अटच वगळण्यात आली आहे.

२) शासकीय गोपनीयतेचा कायदा :– इ.स. १९२३ साली ब्रिटिश राजवटीत शासकीय माहितीची गुप्तता राखण्याच्या दृष्टीने सोयीचे व्हावे, या कारणाकरिता हा कायदा संमत करण्यात आला. यामध्ये 'गोपनीय माहिती' किंवा 'गोपनीय कागदपत्रे' कोणती, याची व्याख्या करण्यात आलेली नाही. म्हणून कोणती माहिती गोपनीय ठरवायची, ते सर्वस्वी शासनाच्या अधीन असते. अशी माहिती दुसऱ्यास देणे व मिळविणे, या दोन्ही कृती गुन्हा समजल्या जातात. त्यासाठी दंड व तुरुंगवास अशा शिक्षा आहेत. त्यामुळे शासनाकडून अधिकृतरीत्या प्राप्त न झालेली व शोधपत्रकारितेचा उपयोग करुन मिळविलेली गोपनीय माहिती वृत्तपत्रांनी प्रसिद्ध केल्यास वृत्तपत्रांवर या कायद्याच्या अधीन कारवाई करता येऊ शकते. लोकशाही राज्यात शासनात पारदर्शकता असली पाहिजे, हे मान्य केल्यास अपवादात्मक महत्त्वाच्या गोष्टींबाबतच गोपनीयता असावी.

३) आक्षेपार्ह जाहिरातींचा कायदा :– जाहिराती हे वृत्तपत्रांचे उत्पन्नाचे साधन असते. कोणत्या जाहिराती प्रसिद्ध करावयाच्या व कोणत्या प्रसिद्ध करावयाच्या नाहीत, याबाबत वृत्तपत्र व अन्य माध्यमे काही विधिनिषेध बाळगतात व त्यानुसार त्यांनी बनविलेले नियम बंधनकारक मानून ते पाळतात. याचबरोबर काही कायद्यांच्या तरतुदींनीही जाहिरातींवर बंदी घालण्यात येते. जाहिरात अश्लील असेल, तर फौजदारी कायद्याने त्यावर बंदी घालता येते. तसेच फसवणूक करणाऱ्या जाहिरातींविरुद्ध ग्राहक संरक्षण कायदा व मक्तेदारीचा कायदा (मोनॉपलिज अँड रिस्ट्रिक्टिव्ह ट्रेड प्रॅक्टिसेस ॲक्ट) या कायद्यांनी ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने कारवाई करता येते.

औषधांच्या व अद्भुत इलाजांच्या काही जाहिराती प्रसिद्ध करणाऱ्यांवर १९५४ नुसार

कायद्याने बंदी घातली आहे. गंभीर प्रकारच्या आजारांमध्ये रुग्णांनी वैद्यकीय सल्ला न घेताच, केवळ जाहिराती वाचून स्वत:वर स्वत:च उपाय करून घेऊ नयेत, या हेतूने समाजहितासाठी आक्षेपार्ह जाहिरातींचा कायदा करण्यात आला आहे. खोट्या औषधीबद्दल दिशाभूल केली जात असेल, औषधाबद्दल खोटा दावा करीत असेल, तर अशी जाहिरात करणे कायद्याने गुन्हा आहे. ही जाहिरात देणाऱ्याबरोबरच ती छापणारा मुद्रक, प्रकाशक हे दंडास पात्र ठरतात.

मंत्र, ताईत, कवच इ. इलाजांनी रोग बरा करणे, रोगनिदान करणे, रोगास प्रतिबंध करणे, तसेच त्यामध्ये रोगनिवारणाची अद्भूत शक्ती आहे अशी जाहिरात करणे, यांवर वरीलप्रमाणे बंदी आहे व असे कृत्य दंडनीय आहे.

४) वृत्तपत्र व्यवसायाची धंदा ही बाजू नियंत्रित करणारे :-

मुद्रणालये व पुस्तकनोंदणीचा कायदा :- मुद्रणालयांचे नियमन करण्यासाठी, भारतात छापलेल्या प्रत्येक पुस्तकाच्या व वर्तमानपत्राच्या प्रती जतन करण्यासाठी आणि पुस्तक व वर्तमानपत्रे यांची नोंदणी केली जावी, यासाठी हा कायदा १९६७ मध्ये संमत करण्यात आला. या कायद्याने पुस्तकावर मुद्रकाचे नाव व मुद्रणस्थळ सुस्पष्टपणे छापले पाहिजे, तसेच प्रकाशकाचे नाव व प्रकाशनस्थळ छापणे आवश्यक आहे. पुस्तकावरील तपशील देण्यामागे, त्यातील लेखन जर कायद्याचा भंग करणारे असेल, तर त्या बेकायदेशीर व दंडनीय लेखनाची जबाबदारी कोणाकोणाची आहे, हे समजावे असा हेतू आहे. याच कायद्याने मुद्रणालयाची नोंद करणेही आवश्यक ठरविले आहे. तसेच वृत्तपत्रांची नोंदणीही बंधनकारक आहे. त्या नोंदणीत वृत्तपत्राचे नाव, वृत्तपत्राची भाषा, प्रकाशन कालावधी प्रकाशन व मुद्रणस्थळ, किंमत, मालकाचे नाव व पत्ता इ. गोष्टी समाविष्ट केल्या जातात.

श्रमिक पत्रकार कायदा :- हा कायदा वृत्तपत्राध्ये काम करणाऱ्या पत्रकारांच्या व अन्य कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती ठरविण्यासाठी १९५५ मध्ये तयार करण्यात आला. त्यामध्ये वृत्तपत्र कर्मचारी, श्रमिक पत्रकार, वृत्तपत्राचे श्रमिक पत्रकारेतर सेवक इत्यादींच्या व्याख्या देण्यात आल्या असून श्रमिक पत्रकारांचे कामाचे तास व रजा निश्चित केल्या आहेत. वेतननिश्चिती करण्यासाठी कालांतराने पुन्हा पाहणी करुन त्यात बदल करण्यासाठी वेतनमंडळाची स्थापना करणे ही तरतूद अत्यंत महत्त्वाची आहे. तसेच या कायद्याने औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ श्रमिक पत्रकारांना लागू केला. आहे. तसेच औद्योगिक सेवायोजना (स्थायी आदेश) अधिनियम, १९६४ आणि कर्मचारी भविष्यनिधी (आणि संकीर्ण उपबंध) अधिनियम, १९५२ हे लागू करण्यात आले आहेत. श्रमिक पत्रकारांना उपदान देण्याबाबतही तरतूद करण्यात आली आहे.

अशाप्रकारे वृत्तपत्रांसंबंधी कायदे आपल्याला दिसून येतात आणि वृत्तपत्रेही त्यांचे तंतोतंत पालन करताना दिसतात. पण इलेक्ट्रॉनिक मीडिया कायद्याचे पालन करते की नाही याबाबतीत साशंकता, दिसून येते. टी.आर.पी. च्या नावाखाली संवेदनशील गोष्टी किंवा भावनोद्युक्त होऊन बातमीपत्र सांगणे यावरुन कायदा हा केवळ वृत्तपत्रांसाठीच आहे का ? हा प्रश्न निर्माण होतो.

# वृत्तपत्राचा कप्तान

**जीवन शंकरराव लिपणे**, बी.एस्सी. प्रथम वर्ष

**तसे तर** प्रत्येक खेळामध्ये प्रत्येक खेळाडू महत्त्वाचा असतो, तो त्याच्या एका वैशिष्ट्यपूर्ण गुणामुळे, क्षमतेमुळे. अशा वैशिष्ट्यपूर्ण क्षमता असलेल्या खेळाडूंचा एक संघ निर्माण होतो. मैदानात उतरणाऱ्या संघाला आवश्यकता असते ती योग्य दिशादर्शनाची. मग त्यांच्यापैकीच एकापेक्षा अधिक क्षमता असणाऱ्या खेळाडूला त्यांचा प्रमुख म्हणजेच 'कप्तान' म्हणून नियुक्त करण्यात येते. हाच कप्तान मैदानात आपल्या दूरदृष्टीने आणि क्षमतेच्या जोरावर खेळाडूंना योग्य दिशादर्शन करीत संघाला विजयी बनवत असतो. अशाप्रकारचा कप्तान केवळ खेळामध्येच नव्हे तर समाजातील सर्वच क्षेत्रामध्ये असतो. त्यामध्ये वृत्तपत्रेही आली. मग वृत्तपत्रांचा कप्तान कोण ? असा प्रश्न उपस्थित होतो. वृत्तपत्राचा कप्तान म्हणजे संपादक होय. या लेखाच्या माध्यमातून आपण या कप्तानाविषयी म्हणजेच संपादकाविषयी जाणून घेणार आहोत. काळ बदलत गेला तशी वृत्तपत्रेही बदलत गेली. त्यांचे स्वरुपही बदलत गेले. त्यांचा व्यापही वाढत गेला. पूर्वी संपादक, वार्ताहर आणि मुद्रक या तीन व्यक्तिविशेषांवर चालणाऱ्या वृत्तपत्राचा व्याप, विस्तार मोठ्या प्रमाणात होऊ लागला. जसा विस्तार होऊ लागला तशी काम करणाऱ्या मनुष्यबळाची (Man Power) ची आवश्यकता भासू लागली. मनुष्यबळाने परिपूर्ण अशी वृत्तपत्रे वृटवृक्षाप्रमाणे झाली. मग या व्यापाचे, विस्ताराचे त्यातून निर्माण होणाऱ्या कामाचे योग्य व्यवस्थापन होण्याच्या दृष्टीकोनातून वेगवेगळी अस्थायी पदे निर्माण करण्यात आली. जसे संपादकीय विभाग, व्यवस्थापन विभाग इत्यादी. तर आता आपण या संपादकाविषयी जाणून घेऊ या.

संपादकाचे खालीलप्रमाणे प्रकार पडतात. हे प्रकार विविध ग्रंथांमध्ये विविध प्रकारे सांगितले आहेत. त्यांच्या नावामध्ये बदलही असू शकतो.

१) कार्यकारी संपादक

२) प्रमुख संपादक

३) व्यवसाय संपादक

४) साहित्य संपादक

५) संपादक सल्लागार

६) व्यवस्थापकीय संपादक

७) छायाचित्र संपादक

असे संपादकाचे प्रकार आपणास पाहावयास मिळतात. काळानुरूप या पदामध्ये कमी अधिकपणा झालेला असू शकतो.

१) कार्यकारी संपादक :- नामोच्चारणावरुनच या संपादकाचे कार्य केवळ कार्य करवून घेणे त्याचबरोबर वृत्तपत्राची संपूर्ण जबाबदारी सांभाळण्याचे किंवा देखरेख करण्याचे कार्य कार्यकारी संपादकाचे असते. हे आधुनिक काळात निर्माण झालेले पद असावे.

२) प्रमुख संपादक :- हा संपादक म्हणजे संपादन करणारा, काय घ्यायचे आणि काय टाळायचे याचा निर्णय घेणारा शब्दाच्या पसाऱ्यातून योग्य शब्दांची निवड करणारा, मांडणी आणि रचना करणारा असा हा संपादक असतो. हा संपादक वृत्तपत्राचा मूळ आत्मा असतो. तो उच्चविद्याविभूषित, बहुशास्त्रविद, सर्व गुणसंपन्न असतो. तो निरंतर नवकल्पनांना स्वीकारणारा असतो. या संपादकाच्या लेखणीवरच वृत्तपत्राचे यशापयश अवलंबून असते.

३) व्यवसाय संपादक :- वृत्तपत्राचे व्यवसायीकरण मोठ्या प्रमाणात आधुनिक काळामध्ये झालेले दिसून येते. तेव्हा व्यवसायामध्ये टिकून राहण्यासाठी आवश्यक असणाऱ्या सर्व गोष्टी यांच्या अधीन असतात.

४) साहित्य संपादक :- साहित्य संपादक म्हणजे वेगवेगळ्या साहित्य लेखकांकडून आवर्जून साहित्य मागवून घेणे. वेगवेगळ्या वाङ्मयप्रकारातील लेखनाला स्थान देणे, जुन्या लेखकांबरोबर नव लेखकांना स्थान देऊन, प्रोत्साहित करुन लिहिते करणे, लेखनस्पर्धा जाहीर करणे, तत्कालीन वाङ्मयीन व्यक्ती - घटना, - प्रसंग यांच्यावर संपादकीय लेखनातून टीका टिपणी करणे. थोडक्यात लेखक, वाचक व वृत्तपत्राचे उत्पादक / प्रकाशक यांच्यात सुसंवादी वातावरण निर्माण करणे. साहित्यिकाकडून आलेल्या कृतींवर योग्य उपचार करून छपाईस देण्याचे कार्य साहित्य संपादकाकडे असते.

५) संपादक सल्लागार :- या संपादकाचे कार्य अपेक्षित ठिकाणी सल्ला देण्याचे असून वेळोवेळी हा संपादक इतरांना मार्गदर्शन करतो. हा संपादक कोणत्याही एका क्षेत्रातला तज्ज्ञ असतो. वृत्तपत्राचे कार्य अस्खलितपणे चालण्यासाठी हा निरंतर कार्यप्रवृत्त असतो.

६) व्यवस्थापकीय संपादक :- हा व्यवस्थापन संघाचा वरिष्ठ सदस्य असतो. हा व्यवस्थापकीय संपादक सरळ मुख्यसंपादकापासून शेवटच्या कार्य करणाऱ्या व्यक्तीपर्यंत देखरेख ठेवतो. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहित करण्याचे कार्यही करतो. सर्व संपादक विभाग व्यवस्थापकीय संपादकाला रोज गोषवारा (रिपोर्ट) देत असतात. प्रशासनाने निर्धारित केलेल्या धोरणांची अंमलबजावणी करण्याचे कार्यही यांचेच असते. आवश्यक ठिकाणी आवश्यक निर्णय घेण्याचे कार्यही या संपादकाकडेच असते. त्याचबरोबर वृत्तपत्रासाठी आवश्यक साहित्य, मनुष्यबळ इ. गोष्टींची पूर्तता करण्याचे कार्यही यांच्याकडेच असते. मुद्रित वृत्तपत्रे समाजातील प्रत्येकापर्यंत पोहचविण्यासाठी वितरकांची नेमणूक करणे त्यासाठी आवश्यक सामग्रींची पूर्तता करण्याचे कामही यांचेच असते.

७) छायाचित्र संपादक :- काळ बदलला तसे वृत्तपत्राचे स्वरूपही बदलत गेले. समाजात आलेले तंत्रज्ञान, आधुनिकता याचे प्रतिबिंब वृत्तपत्रातही दिसू लागले. पूर्वीपेक्षा वृत्तपत्रे अधिक सजावटीची होऊ लागली. वृत्तपत्रामध्ये छायाचित्र पत्रकारांचा समावेश झाला. वृत्तपत्राचे छायाचित्रकार आणि व्यावसायिक छायाचित्रकार यांच्यात मोठा फरक असतो. वृत्तपत्रांसाठी काम करणाऱ्या छायाचित्रकारांची दृष्टी ही ज्या घटकांचे छायाचित्र घ्यायचे आहे त्यातील सौंदर्य ते शोधतात. त्यात कोणती बातमी मिळवायची आहे याचा विचार करून त्या घटनांचे छायाचित्र ते घेत असतात. त्यामुळे व्यावसायिक छायाचित्रकारापेक्षा त्यांच्यात अधिक गतिमानता निर्माण झालेली असते. अशा छायाचित्र पत्रकारांनी छायाचित्रासहित दिलेल्या बातम्या संकलित करून त्यातील उपयुक्त लक्षवेधक प्रसंगाची कलात्मकदृष्ट्या उत्तम आणि परिणामकारक छायाचित्रे बातम्यांसह छाटणी करण्याचे कार्य या संपादकाचे असते. अशा छायाचित्राने युक्त बातम्याचे प्रकाशन जगामध्ये सर्वप्रथम 'लाईफ' या नियतकालिकाने केले.

अशाप्रकारे वृत्तपत्रांमध्ये काळानुरुप अस्थायी / स्थायी पदांची निर्मिती करण्यात आली. याचबरोबर निवासी संपादक, अतिथी संपादक इ. अनेक प्रकारचे संपादक आपल्याला वृत्तपत्रांमध्ये आढळतात. संपादकाचे कितीही प्रकार असो शेवटी या सर्वांच्या माध्यमातून निर्माण होऊन आपल्या हातात पडणारे वृत्तपत्र आपल्याला ज्ञान प्रदान करते. आपले मनोरंजनही करते आणि समाजाला प्रवाहीही बनविते हेच खरे.

# मला भावलेले संपादक

**वर्षा विठ्ठलराव गजमल,** बी. ए. द्वितीय वर्ष

**प्रस्तावना**

*व्यक्ती, समाज व राष्ट्र या तीनही घटकांच्या संदर्भातील अन्यायावर तुटून पडण्यात वर्तमानपत्रे महत्त्वाची भूमिका पार पाडतात. मानवी संस्कृतीच्या इतिहासात वृत्तपत्रांचा उदयही एक सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वपूर्ण अशी क्रांती होय. वृत्तपत्राचा संबंध हा समाज जीवनाशी, विकासाशी आणि नव्या जीवनमूल्यांशी असल्याने वृत्तपत्रांच्या उगम आणि विकासामुळे मानव समाजाच्या समग्र इतिहासात विचार प्रसाराची मौलिक क्रांती घडून आली आहे. असे हे वृत्तपत्र समाजाचा आरसा, लोकशाहीचा चौथा स्तंभ झाले. अशा वृत्तपत्राची निर्मिती कोण्या एकट्या – दुकट्याने होणे शक्य नसून ते एक सामूहिक कार्य आहे. असे असले तरी वृत्तपत्रामध्ये संपादकास अनन्यसाधारण महत्त्व आहे. तोच या वृत्तपत्राचा कर्ता : धर्ता असतो. संपादक म्हणजे काय तर, काय घ्यायचे आणि काय टाळायचे याचा निर्णय घेणारा, शब्दाच्या फाफट पसाऱ्यातून अचूक शब्द निवडून त्यांची योग्य मांडणी आणि रचना करणारा असा साधा, सरळ अर्थ संपादक या शब्दाचा लावता येईल. सर्वगुणसंपन्न, बहुभाषा व शास्त्रविद् असा संपादक असणे आवश्यक आहे. कारण संपादकाच्या लेखनीवरच त्या त्या वृत्तपत्राचे यश अवलंबून असते. म्हणूनच संपादकास अनन्यसाधारण महत्त्व आहे.*

*आपल्या महाराष्ट्रात आपल्या लेखणीने, वाणीने समाजजागृतीचे, अन्यायाप्रती लढण्याचे कार्य करणाऱ्या संपादकांची फार मोठी परंपरा आहे. त्यापैकी स्वातंत्र्यपूर्व स्वातंत्र्योत्तर आणि आधुनिक काळातील काही संपादकांविषयी माझ्या लेखात माहिती देत आहे.*

**स्वातंत्र्यपूर्व काळ –**

**बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर :–**

मराठी वृत्तपत्रविश्वाचा प्रारंभ ज्यांच्या नामोल्लेखाशिवाय पूर्णच होत नाही ते बाळशास्त्री जांभेकर. जांभेकरांचा जन्म दि. ६ जानेवारी १८१२ मध्ये पोंभुर्ले ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग या गावी झाला. जांभेकरांनी महाराष्ट्रातील दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र ६ जानेवारी १८३२ रोजी सुरू केले. जांभेकरांनी बालपणी वडिलांकडे घरीच मराठी व संस्कृत भाषांचा अभ्यास आरंभला इ.स. १८२५ साली त्यांचे मुंबईमध्ये आगमन झाले. मुंबईस येऊन ते सदाशिव काशीनाथ ऊर्फ 'बापू छत्रे' आणि बापूशास्त्री शुक्ल यांजकडे अनुक्रमे इंग्रजी व संस्कृत शिकू लागले. या दोन विषयांबरोबरच गणित आणि शास्त्र या विषयांत त्यांनी प्रावीण्य मिळविले. 'बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी'च्या विद्यालयात अभ्यास करून त्यांनी विशीच्या आत कोणाही भारतीयाला तोवर न मिळालेली प्राध्यापक म्हणून नियुक्ती मिळवण्याइतपत ज्ञान मिळविले. इ.स. १८३४ साली एल्फिन्स्टन कॉलेजात पहिले एतद्देशीय व्याख्याते म्हणून जांभेकरांची नियुक्ती झाली.

बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी, तेलुगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीक या भाषांचे ज्ञान होते. फ्रेंच भाषेतील नैपुण्याबद्दल

फ्रान्सच्या राजाकडून त्यांचा सन्मान झाला होता. जांभेकरांनी प्राचीन लिप्यांचा अभ्यास करून कोकणातील शिलालेख व ताम्रपट यांच्यावर शोधनिबंध लिहिले. मुद्रित स्वरूपातील ज्ञानेश्वरी त्यांनीच प्रथम वाचकांच्या हाती दिली.

त्यांच्यात पांडित्य आणि अध्यापनपटुत्व या गुणांचा मिलाप होता. गणित व ज्योतिष यातंही ते पारंगत असल्यामुळे त्यांची कुलाबा वेधशाळेच्या संचालकपदी नियुक्ती झाली होती. शिवाय त्यांना रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, न्यायशास्त्र, इतिहास, मानसशास्त्र या विषयांचे उत्तम ज्ञान होते. अनेक विषयांचे ज्ञान आत्मसात केलेल्या बाळशास्त्री जांभेकर यांची तत्कालीन सरकारने मुंबई इलाख्याच्या शिक्षण विभागाचे अधिकारी म्हणून नेमणूक केली. या काळामध्ये बाळशास्त्रींनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. शिक्षणाच्या संदर्भात महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांचा जन्मदिवस महाराष्ट्र सरकारतर्फे दर्पण दिन अथवा वृत्तपत्र दिन म्हणून साजरा होतो. व्याकरण, गणित, विज्ञान अशा विविध विषयांची पाठ्यपुस्तकेही त्यांनी निर्माण केली. वाङ्मय आणि विज्ञान या दोन्ही शाखांमध्ये ते निष्णात होते.

मुंबईतल्या एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये असताना व समाजात वावरताना बाळशास्त्रींना अनेक समस्या अस्वस्थ करीत. पारतंत्र्याने ग्रासलेला देश, याबरोबरच समाजातील अनेक रूढी, चालीरीती, अज्ञान, दारिद्र्य, भाकड समजुती यामुळे एतद्देशीय समाज कसा व्याधिग्रस्त झाला आहे, या विचाराने ते चिंता करीत. केवळ महाविद्यालयात शिकवून उपयोग नाही, तर संपूर्ण समाजालाच धडे दिले पाहिजेत. ते करायचे असेल तर समाजाचेच प्रबोधन कराने लागेल, असे त्यांच्या लक्षात आले. त्यासाठी वृत्तपत्र काढावे, असे त्यांना वाटू लागले. या जाणिवेतून आपले सहयोगी गोविंद विठ्ठल कुंटे उर्फ भाऊ महाजनांच्या मदतीने त्यांनी 'दर्पण' हे मराठीतील पहिले वृत्तपत्र काढले. ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला. या वृत्तपत्रात इंग्रजी व मराठी भाषेमध्ये मजकूर असायचा. या वर्तमानपत्राचा उद्देश हा स्वदेशीय लोकांमध्ये विलायतेतील विद्यांचा अभ्यास अधिक व्हावा आणि लोकांना त्या देशांची समृद्ध व येथील लोकांचे कल्याण याविषयी स्वतंत्र विचार व्हावा हा होता.

दर्पण वृत्तपत्र हे आजच्या काळातील वर्तमानपत्राला योग्य दिशा देणारे असेच होते. या वर्तमानपत्रात सर्वच विषयांना प्राधान्य असे. ज्ञान, विज्ञानापासून संस्कार, ज्योतिषापर्यंत अशा सर्वच विषयांनी परिपूर्ण असे हे वर्तमानपत्र होते. खरोखरच जांभेकर आणि त्यांचे दर्पण खऱ्या अर्थाने भारतीय समाजाचे प्रतिक होते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. असे हे विद्वान शिरोमणी १८ मे १८४६ रोजी अनंतात विलीन झाले.

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक :**

थोर भारतीय नेते, भगवद्गीतेचे आधुनिक भाष्यकार, प्राच्यविद्या पंडित, मराठी वृत्तपत्राच्या अग्रणी संपादकांमध्ये ज्यांचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते ते म्हणजे लोकमान्य टिळक. यांचा जन्म २३ जुलै १८५६ साली चिखलगाव, ता. दापोली, जि. रत्नागिरी येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गंगाधरपंत व आई पार्वतीबाई असे होय. गंगाधरपंतांना कौटुंबिक अडचणीमुळे इंग्रजी शिक्षण सोडून पुण्याहून गावी जावे लागले. पुढे त्यांनी मराठी शाळेत शिक्षकाची नोकरी केली. बाळ गंगाधर टिळकांचे पारंपरिक संस्कृत अध्ययन घरातच झाले. १८६६ मध्ये गंगाधरपंतांची बदली पुण्यास

झाल्यामुळे बाळगंगाधर टिळक आपल्या मातापित्यांबरोबर पुण्यास आले. पुण्यात राहूनच ते १८७२ मध्ये मॅट्रिक झाले. १८७१ मध्ये त्यांचा विवाह कोकणातील लाडघर गावच्या बल्लाळ कुटुंबातील सत्यभामाबाई (माहेरचे नाव तापीबाई) यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आणि विश्वानाथ, रामभाऊ व श्रीधर असे तीन मुलगे होते. त्यांचे नातू ज. टिळक हे केसरीचे विद्यमान संपादक असून खासदार आहेत.

महाविद्यालयीन जीवनापासूनच त्यांनी आपली प्रकृती व्यायामाच्या माध्यमातून सुदृढ ठेवली. याच कालावधीत टिळक आणि आगरकर यांचा स्नेह जमला. दोघांनी देशकार्याला वाहून घेण्याचा संकल्प केला. आगरकरांनी आर्यभूषण छापखाना काढला. लोकमान्य टिळकांनी केसरी (मराठी) व मराठा (इंग्रजी) ही दोन वृत्तपत्रे सुरू केली. आगरकर हे केसरीचे तर टिळक हे मराठाचे संपादक होते. या पत्रांद्वारे लोकशिक्षण, राजकीय जागृती व शासकीय अन्यायाचा प्रतिकार हे त्यांचे ऐतिहासिक कार्य येथूनच सुरू झाले. टिळकांना राष्ट्राइतकाच हिंदू धर्माचाही जाज्ज्वल्य अभिमान होता. धर्म हा त्यांच्या व्यासंगाचा विषय होता. चाफेकर बंधूंनी रँडचा खून केला. त्यावेळी सरकारने पुण्यावर अनन्वित जुलूम केला. टिळकांनी 'राज्य करणे म्हणजे सूड उगविणे नव्हे,' 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' असे एकापाठोपाठ एक प्रखर लेख लिहिले. ज्यांचा उल्लेख आपण आजही करतो. या अग्रलेखांचा परिणाम म्हणून त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवला. त्यात त्यांना अठरा महिन्यांची सक्तमजुरीची शिक्षा झाली.

टिळकांनी केसरीतून एकापेक्षा एक असे अनेक सरस अग्रलेख लिहिले. शिक्षा होऊनही त्यांच्या लेखनविषयक धोरणात किंचितही बदल त्यांनी केला नाही. त्यांच्या लेखांच्या वैशिष्ट्याविषयी, 'म्हणजे प्रत्येक शब्द सरळ, स्पष्ट, युक्तिवादात्मक, व्यावहारिक, सामान्य मनुष्याला समजणारा व उमजणारा असल्यामुळे त्यांचे मर्म समजले नाही, असा वाचक किंवा श्रोता आढळलाच नाही' असे न. चिं. केळकर म्हणतात.

**प्रल्हाद केशव अत्रे :-**

प्र. के. अत्रे यांचा जन्म १३ ऑगस्ट १८९८ रोजी झाला. अष्टपैलू साहित्यिक, शिक्षणतज्ज्ञ, चित्रपट निर्माते-दिग्दर्शक, वृत्तपत्रकार, वक्ते आणि नेते म्हणून ते संपूर्ण महाराष्ट्राला परिचित होते. त्यांचे जन्मगाव सासवड, पुणे. मुंबई आणि लंडन येथून बी.ए., बी. टी. टी. डी. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. भारतात परतण्यापूर्वी त्यांनी हॅरो येथे अध्यापन केले. पुण्यातील कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत ते अध्यापक होते. पुढे याच शाळेचे ते मुख्याध्यापकही झाले. नवयुग वाचनमालेद्वारे त्यांनी लिहिलेली शालेय क्रमिक पुस्तके हे त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील मोठं योगदान मानले जाते. त्यांची टोकदार लेखणी, बोचरा विनोद आणि दिलदार वृत्तीला महाराष्ट्र कधीही विसरू शकणार नाही.

प्र.के. अत्रे म्हणजे महाराष्ट्रातील झंझावाती व्यक्तिमत्त्व होतं. साहित्य, शिक्षण, नाटक, चित्रपट, राजकारण व पत्रकारिता अशा विविध क्षेत्रात त्यांनी आपला ठसा उमटविला. या सर्वच क्षेत्रांमध्ये त्यांचा विलक्षण असा दबदबा होता. ते फर्डे वक्ते होते. आपल्या वक्तृत्वाने श्रोत्यांना भारावून टाकत असत.संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. आचार्य ही बिरुदावली त्यांना प्राप्त झाली होती. तेव्हाचे राष्ट्रपती डॉ. राधाकृष्णन यांनी त्यांचे 'रायटर अँड फायटर ऑफ महाराष्ट्र' असे यथार्थ वर्णन केले होते.

आचार्य अत्रेंनी १९४७ रोजी 'जयहिंद' हे सांजदैनिक आणि १५ नोव्हेंबर १९५६ रोजी 'मराठा' हे दैनिक सुरू केले. मृत्यूलेख व अग्रलेख ही त्यांची खासियत होती. कामगार, मजुर बांधवांच्या व्यथा त्यांनी मराठातून मांडल्या. तेव्हा ते पत्र जणू मजुरांचे मुखपत्रच झाले होते. लोकप्रिय वक्ते म्हणूनही त्यांचा मोठा लौकिक होता. फार काय, तर आचार्य अत्रेंच्या घणाघाती भाषणांमुळेच संयुक्त महाराष्ट्र मिळाला असे मानले जाते. अत्रेंनी अध्यापन, रत्नाकर, मनोरमा, नवे अध्यापन, इलाखा शिक्षक ही मासिके काढली. उपहास, उपरोध, विडंबन व अतिशयोक्ती या विनोदसाधनांच्या माध्यमातून विविध मराठी, हिन्दी भाषेतील नाटके, चित्रपटनिर्मितीही केली. १९ जानेवारी १९४० साली त्यांनी नवयुग साप्ताहिक सुरू केले. त्यानंतर ते अखेरपर्यंत वृत्तपत्रक्षेत्रातच कार्यरत राहिले. असे हे आचार्य लोकांच्या जीवनात आनंदाच्या माध्यमातून सहजता निर्माण करीत १३ जून १९६९ साली कालोदरात सामावून गेले.

**रावसाहेब मुकुंदराव पाटील**

आधुनिक महाराष्ट्राच्या विचारवंतांमध्ये दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांचे पत्रकार, निष्ठावंत सत्यशोधक कार्यकर्ते व साहित्यिक म्हणून गौरवास्पद स्थान आहे. महात्मा ज्योतिराव फुले यांनी १८७३ साली सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजास १९११ पासून भरघोस यश मिळाले, त्यात मुंकुदराव पाटील यांचा फार मोठा वाटा आहे. म. फुले व कृष्णराव भालेराव यांच्या विचारांचा नंदादीप तेवत ठेवण्यासाठी त्यांनी 'दीनमित्र' साप्ताहिक ५७ वर्षे चिकाटीने आजन्म चालविले. कर्ज व अज्ञानाने हैराण झालेल्या शेतकरी व कष्टकऱ्यांची गाऱ्हाणी त्यांनी वैशीवर टांगली. त्यासाठी आपली लेखणी झिजवली. कथा, कादंबरी, कविता, नाटक व निबंध या वाङ्मय प्रकारातून आपल्या सत्यशोधकी तत्त्वांचा प्रसार सातत्याने केला. त्यांनी आपली दृष्टी आर्थिक लाभावर न ठेवता विचारप्रवर्तक वाङ्मय प्रसारावर ठेवली. त्यांचे वाङ्मयीन व सामाजिक कार्य वेगळे नजरेत भरणारे आहे.

मुकुंदराव पाटील यांच्या जन्मतारखेच्या बाबतीत निश्चितता आढळत नाही. तरीही त्यांचा २० डिसेंबर १८८५ साली भांबुर्डे (हल्लीचे पुण्यातील शिवाजी नगर हा भाग) येथे झाला असावा असे मानावयास हरकत नाही. नोकरीनिमित्त वडिलांच्या भ्रमंतीमुळे मुकुंदरावांच्या शिक्षणावर परिणाम होऊ लागला. शिक्षणाची आवड असणाऱ्या त्यांच्या शिक्षणावर पाणी पडत असले तरी वडिलांच्या छत्रछायेत त्यांचे समाजसेवेचे शिक्षण सुरू झालेले होते. विद्यापीठातील चार भिंतीच्या आतील पुस्तकी शिक्षणापेक्षा प्रत्यक्ष समाजात जाऊन उपेक्षित व दीन-दुबळ्यांची सेवा करण्याचे व्रत हेच खरे शिक्षण आहे. याची जाणीव मुकुंदरावांना वडिलांकडून सातत्याने होत होती. म्हणूनच तिसऱ्या इयत्तेत शाळा सुटल्यानंतर ते पुन्हा शाळेत गेले नाहीत. वडिलांच्या तालमीत त्यांचे समाजसेवेचे व वाङ्मयलेखनाचे पाठ सुरू झाले. त्यातूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व आकारास आले. आपल्या वडिलांचे पत्रकारितेचे अपुरे राहिलेले स्वप्न पूर्ण करण्याची जिद्द त्यांच्या मनात निर्माण झाली. मुकुंदरावांचा विवाह श्री. बालाजी अहिलाजी गोरे यांची सुकन्या लक्ष्मीबाई यांच्या बरोबर मे, १९०६ मध्ये झाला.

लेखनाचा पिंड निर्माण झालेल्या मुकुंदरावांनी भालेकरांच्या भाषणाची व लेखांची टाचणे तयार करणे, नक्कल करणे इ. कामातून लेखनाची सुरूवात केली आणि आपण स्वतंत्रपणे लेखन करावे अशी भावना त्यांच्या मनात झाली. भालेकरांनी सुरू

केलेल्या 'दीनबंधू' या पत्रातून अत्यंज विलाप या टोपण नावाने काव्यलेखनास प्रारंभ केला. अज्ञान, दारिद्र्य व शोषण, उपेक्षितांचे दु:ख व वेदना त्यांनी आपल्या लेखनातून व्यक्त केल्या. उपेक्षित व निराश्रितांचे दु:ख व वेदनेने ते व्यथित होत असे. ना.वा. टिळक, बालकवी ठोंबरे यांचा सहवास व ग्रंथ याद्वारे त्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होत होता. शिक्षण कमी असल्यामुळे आपल्या लेखनावर मर्यादा येऊ शकते हे ओळखून आणि संपादक हा व्यासंगी, बहुश्रुत व बहुभाषिक असला पाहिजे या जाणिवेने त्यांनी इंग्रजी व संस्कृत या भाषांचा अभ्यास सुरू केला. वेद, स्मृति, पुराणे, ज्ञानेश्वरी, एकनाथ भागवत, तुकाराम गाथा इ. ग्रंथांचे वाचन व मनन केले, आणि लहान वयात पहिला ग्रंथ प्रसिद्ध केला.

भालेकरांनी 'दीनमित्र' वृत्तपत्रही सुरू केले होते. काही कारणास्तव ते बंद पडले. ते पुन्हा सुरू करण्यासाठी अर्ज केला व परवानगी प्राप्त झाल्यावर प्रेस सुरू होण्याआधीच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या दुर्दैवी मृत्यूने आणि वडिलांना दिलेल्या वचनामुळे दीनमित्राच्या पुनरुज्जीवनाची जबाबदारी २४ वर्षाय मुकुंदरावांवर येऊन पडली व ती त्यांनी समर्थपणे पेलत शिदोरे बंधूंच्या मदतीने २३ नोव्हे. १९१० मध्ये छोट्याशा खेड्यात म्हणजेच सोमठाणे ता. पाथर्डी जि. अहमनगर येथे दीनमित्रांचे पुनरुज्जीवन केले. त्यानंतर त्यांची लेखनी चालतच राहिली. त्यांनी या वृत्तपत्राच्या माध्यमातून तत्कालीन उपेक्षित समाजावर होणाऱ्या अन्यायाविषयी, अन्याय करणाऱ्यांविषयी अतिशय सेडतोडपणे लिहिण्यास प्रांरभ केला. याचाच परिपाक म्हणून काही द्वेष्ट्यांनी दीनमित्र बंद करण्यासाठी अतोनात प्रयत्न केले. प्रसंगी मुकुंदरावांना जीवे मारण्याच्या धमक्याही दिल्या. पण ते त्यांना घाबरले नाहीत. पण दीनमित्र बंद झाले. या परिस्थितीतही न डगमगता त्यांच्या महत्प्रयासांनतर ते पत्र पुन्हा सुरु झाले. आणि त्यांची लेखनी कडकडू लागली. उपेक्षित व निराश्रितांसाठीचा संघर्ष सुरू झाला. या सर्व गोष्टींमुळे दीनमित्र हे सर्वोच्च उंचीवर जाऊन पोहोचले. या पत्राच्या माध्यमातून मुकंदराव बहुश्रुत झाले. त्यांची ख्याती शाहू महाराजांपर्यंत पोहचली. आणि महाराजांनी त्यांची भेट घेऊन त्यांच्या कार्याची प्रशंसा केली. त्यांचा सत्कार केला आणि पाचशे रुपये मदतही देऊ केली. एवढेच नव्हे तर मुकुंदरावांच्या समाज प्रबोधनाच्या कार्याचे महत्त्व सरकारच्या लक्षात आले आणि सरकारने त्यांचा रावसाहेब हा किताब देऊन गौरव केला. त्यांच्या एकनिष्ठ समाजसेवेचा हा गौरव होता, या किताबाबरोबरच सरकारने २०० एकर जमीनही दिली होती, परंतु नि:स्वार्थ वृत्तीने समाजसेवा कररणाऱ्या त्यांनी जमीन घेण्याचे नाकारुन ती गरिबांना वाटून देण्याची सूचना केली. विशेष म्हणजे या पत्रावर कर्जाचा डोंगर असतानाही निर्लोभी व नि:स्वार्थीपणाची त्यांची स्वभाववृत्ती मनाला स्पर्शून जाते. त्यांच्या लेखनामुळे त्यांना अनेकदा अनेक अडचणींना सामोरे जावे लागले, फौजदारी गुन्हेही दाखल होत होते. अशा एका केसची माहिती घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कानापर्यंत पोहचली असता त्यांनी मुकुंदरावांना पत्र पाठवून म्हटले की, ''अशा प्रसंगी माझा काही उपयोग होत असल्यास कळवावे. साहाय्य करण्यास तयार आहे.'' असे पत्र पाठवून डॉ. बाबासाहेबांनी त्यांना समाजसेवेची पावतीच दिली. अनेक चढ –उतारांना लीलया पार करत मुकुंदरावांनी दीनमित्राची २५ वर्षे पूर्ण केली, तेव्हा त्यांच्या चाहत्यांनी या पत्राचा रौप्य महोत्सव साजरा केला. त्यांची प्रचंड मोठी मिरवणूक काढून, सत्कार करुन पाच हजार रुपये व मानपत्र देऊन

गौरव केला.

लेखक, मुद्रक, प्रकाशक व संपादक एकच व्यक्ती असलेले दीनमित्र हे महाराष्ट्रातील एकमेव पत्र होते. त्याचबरोबर तरवडी व सोमठाणे सारख्या ग्रामीण भागातून प्रकाशित होणारे आणि बस न जाणाऱ्या गावी मुकुंदरावाने हे पत्र ध्येयाने चालविले. समाजजागृती व सेवा करणारा हा उत्कृष्ट संपादक काळाच्या पडद्याआड जावू नये हीच अपेक्षा.

**दिनकरराव जवळकर :-**

स्वातंत्र्यपूर्वकाळात ज्यांच्या लेखनीने समस्त समाज ढवळल्या गेला अशा संपादकांपैकी दिनकरराव जवळकर हे एक स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे. त्यांच्या लेखनाचा बाजच वेगळा आहे. पत्रकाराच्या लेखणीतून अंगार कसा फुलतो याचा प्रत्यय जवळकरांच्या लेखणीतून स्फुटणाऱ्या भाषेतून प्रत्ययास येतो. त्यांचे संपूर्ण वाङ्मय म. फुले प्रतिष्ठानने प्रसिद्ध केले आहे. बहुजन चळवळीचे अध्वर्यू असणाऱ्या जवळकरांनी शाहू महाराजांच्या इच्छेनुसार १९२२ मध्ये 'तरुण मराठा' हे वृत्तपत्र सुरु केले. या वृत्तपत्राच्या माध्यमातून अल्पावधीतच ते नावारुपास आले. तिखट वाणी आणि लेखणी याकरिता प्रसिद्ध असलेल्या त्यांनी आपल्या लेखणीचा उपयोग तलवारीसारखाच केला. १० वर्षांचीच कामगिरी परंतु त्यांनी या अल्प कालावधीतही झंझावात निर्माण केला. 'भगवा झेंडा', 'कैवारी', 'तेज' इ. वृत्तपत्रे त्यांनी सुरू केली. तत्कालीन राजकीय संदर्भावर 'प्रणय प्रभाव' नाटकही लिहिले.

मुंबई कायदे कौन्सिलच्या तुकडे बिलाच्या वेळी जवळकर यांनी दौऱ्याच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्र पिंजून काढला. १९२८ ला झालेल्या मजुरांच्या संपावेळी ते मजुरांचे कैवारी, पुढारी म्हणून पुढे आले व आपल्या कैवारी पत्राचा अंक दर बुधवारी 'मजुरांचा कैवारी' म्हणून प्रसिद्ध करु लागले. जवळकरांची प्रकृती बरी नसतांनाही बहुजन संघाच्या विनंतीवरुन नागपूरला गेले व तेथे दौरा काढला. नागपूर येथे वृत्तपत्र व ग्रंथमाला काढण्याचे ठरले. ते त्या व्यवस्थेसाठी पुण्यास गेले. प्रकृती बरी नसतानाही ते नाशिक येथे सत्याग्रहात गेले. तेथे ते अत्यास्वस्थ झाले. शेवटी ३ मे १९३२ रोजी हा लेखणीने तळपणारा सूर्य रात्रीच्या १०.३० च्या अंधकारात पुणे येथे मुक्कामी मावळला. यावेळी त्यांचे वय केवळ ३५ वर्षे इतके होते. या अल्पवयात १२वर्षे महाराष्ट्राचे समाजकारण व राजकारण आपल्या बुद्धीसामर्थ्याने हलवून सोडणारा बहुजनांचा पुढारी, मजुरांचा कैवारी, सत्यशोधकांचा नेता, शेतकऱ्यांचा कैवारी, स्वातंत्र्य देवतेचा उपासक, आर्थिक स्वातंत्र्याचा पुरस्कर्ता नाहीसा झाला. अल्पायुष्यात पत्रकारितेच्या क्षेत्रामध्ये त्यांनी जे कार्य केले ते अलौकिकच होते. अशा तत्त्वनिष्ठ पत्रकारांची जीवनी भावी पिढीला निरंतर मार्गदर्शकच राहील.

**किसन फागू बनसोडे -**

इ. स. १८ फेब्रु. १८७९ साली किसन बनसोडे यांचा जन्म मोहपा या गावी झाला. उपेक्षितांच्या हृदयाची व मनाची उंची वाढवून त्यांना समाजजीवनात मानाचे स्थान प्राप्त व्हावे म्हणून त्यांनी आजन्म आपल्या लेखणी व अन्य माध्यमातून प्रयत्न केले. १८९२ साली ते नार्मल स्कूल मध्ये प्रशिक्षित अध्यापक झाले होते. पुढील उच्च शिक्षण घेण्याची परिस्थिती असूनही ते न घेता त्याचबरोबर शिक्षकांची चालत आलेली नोकरीही न पत्करता राष्ट्रीय बाणा पत्करुन ते खऱ्या अर्थाने समाजशिक्षक झाले. ते अत्यंत अभ्यासू, चिकित्सक, धोरणी, मुत्सद्दी होते. आपल्या या सद्‌गुणांचा उपयोग त्यांनी उपेक्षितांच्या कल्याणासाठी तिळमात्र कसूर न करता, कसलाही

विसावा न घेता तन्मयतेने केला. त्यांच्या असामान्य कर्तृत्वाची व गुणांची जाणीव होऊन तत्कालीन ब्रिटिश अधिकाऱ्यांनी त्यांना मोठ्या पगाराच्या, बहुमानाच्या अधिकारपदाच्या जागा देऊ केल्या, पण किसन बनसोडेंनी, ''माझ्या बांधवांचे आत्मे जळत असताना, त्यांच्यावर जुलूम करुन गरिबांची घरे – संसार उद्ध्वस्त केले जात असलेले हे उघड्या डोळ्याने पाहताना मी माझे कल्याण करून घेण्याइतका स्वार्थी नाही. दुःखाने विव्हळणाऱ्या बांधवांच्या आर्त हाकेला ओ देणे आणि त्यास्तव माझा देह विसर्जित करणे हाच खरा मानवधर्म होय'' असे बाणेदार उत्तर देऊन त्यांनी खडतर सेवेचे व्रत धारण केले. इतकेच नव्हे तर ब्रिटिश आमदानीत राजकीय व सामाजिक स्वरुपाच्या जागा प्राप्त होत असतानाही, ''प्रलोभन दाखवून भाकरीच्या तुकड्याला बळी पडणारा मी तो गुलाम नसून माणूस आहे'' असा करडा जबाब देण्यास ते विसरले नाहीत. असाच बाणेदारपणा व करडेपणा त्यांच्या लेखणीतही दिसून येतो.

१९१० साली किसन बनसोडे यांनी 'निराश्रित हिन्दू नागरिक' नावाचे मासिक वृत्तपत्र सुरु केले. याशिवाय त्यांनी 'विटाळ विध्वंसक' (१९१३), 'मजूर पत्रिका' (१९१८) ही वृत्तपत्रेही चालविल्याची नोंद आहे. बनसोडे यांनी आपल्या वृत्तपत्रांच्या माध्यमातून सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक प्रश्नांवर बाणेदारपणाने लिखाण केले. त्यांनी आपल्या वृत्तपत्रातून विद्रोही साहित्याच्या माध्यमातून उपेक्षित समाजात जागृती निर्माण करण्यास प्रारंभ केला. याचबरोबर धर्म, रुढीग्रस्तता, अन्याय व अन्यायामागील कारणांचा शोध घेण्याचा 'निराश्रित हिन्दू नागरिक' मधून सातत्याने प्रयत्न केला. यातून समाजावर होणाऱ्या परिणामांची ते मांडणी करतात, हे करीत असताना सामाजिक परिवर्तन झाले पाहिजे अशी भूमिका घेतात. सुधारणांपेक्षा सामाजिक परिवर्तन होणे त्यांना अधिक महत्त्वाचे वाटते. वृत्तपत्र चालविण्यामागची भूमिका स्पष्ट करताना बनसोडेजी म्हणतात, उपेक्षित समाजसुधारणेला ज्या प्रयत्नांची गरज आहे, त्यात वर्तमानपत्र चालविणे हाही एक अत्यंत आवश्यक आणि महत्त्वाचा भाग आहे. चळवळीचा प्रसार करण्याचे व लोकजागृती घडविण्याचे हे एक मुख्य साधन होय. त्यांची शेवटपर्यंत सामाजिक परिवर्तनाचीच भूमिका होती. निराश्रित हिन्दू नागरिक मध्ये विचार प्रसाराची भूमिका महत्त्वाची होती. त्यामुळे त्यात ललितलेखन दुर्मिळ दिसून येते. बनसोडेजी सुधारणेविषयीची भूमिका दोन प्रकारे मांडतात, 'प्रथम उपेक्षित समाजास सन्मानाची वागणूक व दुसरे म्हणजे हक्कासाठी संघर्षास प्रवृत्त करतात.'

अनेक समस्यांचा सामना करीत बनसोडेजींनी वृत्तपत्र चालविले. सामाजिक परिवर्तनासाठी संघर्ष करणाऱ्या या वृत्तपत्रास स्थैर्य लाभले नाही. कालांतराने बनसोडेजींना हे वृत्तपत्र बंद करावे लागले. परंतु बनसोडेजी केवळ या वृत्तपत्रापर्यंत मर्यादित न राहता त्यांनी उपेक्षिताचे शिक्षण, स्त्रीशिक्षण, उपेक्षित विद्यार्थ्यांसाठी शाळा व वसतिगृहे, सामाजिक कार्यांच्या माध्यमातून आपले योगदान समाजाला दिले. असे संपादक भावी पिढीसाठी निरंतर प्रेरणास्रोतच आहेत. मात्र इतकेच की ते कालाच्या पडद्याआड जावू नयेत.

**स्वातंत्र्योत्तर काळ –**

**दीपस्तंभ गोविंद तळवळकर**

वृत्तपत्रविश्वाला एक प्रतिष्ठा मिळवून देणारे, मराठी व इंग्रजी भाषेत लेखन करणारे पत्रकार व लेखक असणारे, वृत्त्पत्रीय अग्रलेखांकरिता विशेषत्वाने परिचित असलेले एक स्तंभलेखक असणारे, सामाजिक, राजकीय व आंतरराष्ट्रीय

घडामोडींचे भाष्यकार आणि साचेपी संपादक म्हणून ख्यात असणारे, आणि वृत्तपत्रविश्वात दीपस्तंभ असणारे गोविंद श्रीपाद तळवळकर.

गोविंद श्रीपाद तळवळकर यांचा जन्म २२ जुलै, १९२५ साली डोंबिवली येथे झाला. त्यांचा जन्म एका सामान्य कुटुंबात झाला होता. त्यांचे एक काका गोपीनाथ तळवळकर हे ख्यातप्राप्त कवी व लेखक होते. तर दुसरे काका शरद तळवळकर प्रसिद्ध मराठी अभिनेता होते. मुंबई विद्यापीठात पदवीला प्रवेश घेतल्यानंतर विद्यापीठाची फीस भरण्याकरिता ते काम करीत होते.

गोविंद तळवळकरांनी १९४७ साली बी.ए. झाल्यानंतर शंकरराव देव यांच्या नवभारतमध्ये काम करण्यास सुरुवात केली. पुढे ते १९५० ते १९६२ अशी बारा वर्षे लोकसत्तामध्ये उपसंपादक म्हणून कार्यरत होते. त्यानंतर १९६२ – ६७ च्या दरम्यान त्यांना महाराष्ट्र टाईम्स मध्ये काम करण्याची संधी मिळाली. १९६८ मध्ये 'महाराष्ट्र टाईम्स'च्या संपादकपदाची जबाबदारी त्यांनी स्वीकारली आणि पुढे १९९६ पर्यंत म्हणजे जवळ जवळ अठ्ठावीस वर्षे 'महाराष्ट्र टाईम्स' सारख्या अग्रणी वृत्तपत्राचे संपादक म्हणून आपली कारकीर्द त्यांनी गाजवली. 'महाराष्ट्र टाईम्स' ला महाराष्ट्रातील एक प्रभावी व परिणामकारक दैनिक म्हणून घडविण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे.

तळवळकरांच्या स्वभावाविषयी बोलताना ते हस्तिदंती मनोऱ्यात बसून काम करतात. लोकांशी बोलण्यास त्यांना आवडत नाही अशी मते व्यक्त केली जात असत, परंतु आपल्या कार्यालयात आलेल्या नवीन कर्मचाऱ्यांची अतिशय काळजीपूर्वक व आस्थेने विचारपूस करायचे. त्यांचा साहित्य, राजकारण संगीत या क्षेत्रातील मित्रवर्ग भरपूर होता, पण त्यांनी कोणाचीही छाप स्वत:वर पडू दिली नाही. मा.कै. यशवंतराव चव्हाण व त्यांचे संबंध सर्वांना माहीत होते. पण त्यांच्या विरोधात भूमिका घेताना ते घाबरले नाहीत. त्या त्या परिस्थितीला अनुसरुन त्यांनी लेखन करुन समाजातील वाचकांचे ते अतिशय प्रिय बनले. त्यामुळेच की काय म.न.से. अध्यक्ष मा. राज ठाकरे साहेबांनी त्यांचा 'अग्रलेखांचा बादशहा' म्हणून गौरव केला. कटाक्षाने वेळ पाळणारे ते बरोबर दहाच्या ठोक्याला हजर राहून दुपारर्यंत लेख लिहायचे.

पत्नीच्या निधनानंतर ते कमालीचे अस्वस्थ झाले. त्यानंतर ते अमेरिकेतील बुस्टन येथे त्यांच्या मुलीकडे वास्तव्यास होते. त्यांना दोन मुली. अमेरिकेतही त्यांनी 'एशियन एज' मध्ये लेखन केले. अमेरिकेत राहात असले तरी त्यांची नजर निरंतर महाराष्ट्रातील घडामोडींवर असायची. ते केवळ एका वृत्तपत्रापर्यंत कधीही मर्यादित राहिले नाहीत. त्यांच्यावर सुरुवातीस एम.एस. रॉय यांच्या विचारांचा प्रभाव होता. त्यांनी आपल्या लेखनातून वेळोवेळी महात्मा गांधीवर होणाऱ्या टीकांना उत्तरे दिली होती. त्यांचे एकूण प्रकाशित साहित्य २५ असून त्यामध्ये 'सोव्हियत साम्राज्याचा उदय आणि अस्त' (खंड १ ते ४) अतिशय प्रसिद्ध आहेत. त्यांना अनेक सामाजिक व शासकीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले. लोकमान्य टिळकांची परंपरा जपणारे आणि संताप्रमाणे सामान्यांनाही समजेल अशी लेखनशैली जोपासणारे तळवळकर हे खऱ्या अर्थाने 'अग्रलेखांचे बादशहा' होते. भाषेवरील प्रभुत्व, राजकीय आणि सामाजिक भान व प्रचंड व्यासंग या जोरावर त्यांनी अग्रलेखांना वेगळ्या उंचीवर नेले होते. अशा तळवळकरांना २२ मार्च, २०१७ रोजी ब्युस्टन येथे देवाज्ञा झाली.

**विद्याधर गोखले**

विद्याधर संभाजीराव गोखले यांचा जन्म ४ जानेवनारी १९२४ रोजी अमरावती येथे झाला. त्यांचे वडील संभाजीराव गोखले हे मध्यप्रदेशच्या काँग्रेस प्रशासनात मंत्री होते. लहानपणी घरातून मिळालेल्या संस्काराचा विद्याधर गोखले यांच्यावर प्रभाव होता. आपल्या मुलाने आपल्या स्थानाचा उपयोग करु नये अशी त्यांच्या वडिलांची तीव्र इच्छा होती. अमरावती येथे पदवीपर्यंत शिक्षण घेऊन १९४४ मध्ये ते मुंबईला आले. अमरावतीत असताना त्यांना वीर वामनराव जोशी यांचा सहवास लाभला. जोशी यांच्या 'सावधान' पत्राचे चाहते होते. न. चि. केळकर, अच्युत बळवंत कोल्हरकर, शि. म. परांजपे यांच्या लेखनाचा त्यांनी खास अभ्यास केला होता.

मुंबईस आल्यावर काहीकाळ शिक्षक म्हणून त्यांनी कार्य केले. त्यानंतर त्यांनी भा.रा. धुरंधर यांच्या 'नवभारत' मध्ये काम केले. त्यानंतर ह. रा. महाजनी संपादक असताना ते 'लोकसत्ता'मध्ये आले. त्यांच्याकडे 'साप्ताहिक लोकसत्ते' ची जबाबदारी आली. लोकासत्तेतील 'कोडे' त्यांच्यामुळे खूप प्रसिद्ध झाले. कारण त्यांच्या लेखणीत साक्षात सरस्वतीच नांदत होती. संपादकीय लेखनाचे धडे त्यांनी महाजनी यांच्या मार्गदर्शनाखाली गिरवले. प्रत्यक्ष संपादकीय लेखन त्यांनी विपूल प्रमाणात केले. त्यामुळे संपादकाची जबाबदारी गोखले यांनी अगदी सहजपणे स्वीकारली.

विद्याधर गोखले यांचे लेखन मात्र गांभीर्यापेक्षा रंजकतेकडे अधिक झुकणारे होते. राजकीय लेखनही ते साहित्यिक शैलीने नटवत. लेखन सालंकृत करण्यावर त्यांचा अधिक भर असे. कारणही तसेच होते ते म्हणजे नाट्यलेखन. संपादकीय लेखनाबरोबरच त्यांनी ऐतिहासिक, पौराणिक आणि सामाजिक विषयावर नाटके लिहिली. त्यांनी एकूण १८ नाटके लिहिली. संगीत नाटकांद्वारे त्यांनी मराठी मनाला भुरळ घालत रंगभूमीला पुनरुज्जीवित केले आणि रंगशारदा ही संगीत नाटकांना प्राधान्य प्राधान्य देणारी नाट्यसंस्था त्यांनी स्थापन केली. संस्कृत व उर्दू साहित्याचा चांगला अभ्यास असलेले ते त्यातील वचने व कल्पना आपल्या अग्रलेखात वापरत. सरळ, सुबोध अशा त्यांच्या लेखनात विनोदाचा शिडकावाही असे. प्रक्षोभक लिहिण्यापेक्षा मुद्द्यांकडे, भाषेच्या व शब्दांच्या नेटक्या वापराकडे संपादकाने लक्ष द्यावे असे त्यांचे मत होते. असे हे उत्तुंग व्यक्तिमत्त्व १९८९ ते १९९१ पर्यंत मुंबई लोकसभा मतदार संघातून लोकसभेचे सदस्य म्हणूनही निवडून आले होते. त्यांचा सामाजिक आणि शासकीय असा यथोचित गौरवही अनेकदा झाला आहे. अशा या बहुआयामी व्यक्तीला दि. २६ सप्टेंबर १९९६ रोजी देवाज्ञा झाली.

**नीळकण्ठराव यशवंतराव (आण्णासाहेब) खाडीलकर**

महाराष्ट्रात साहित्यिकांनी साहित्याच्या माध्यमातून अनेक पिढ्या समृद्ध करीत विचारवंताची निर्मिती करीत त्यांना प्रगल्भ बनविले आणि या मातीला उत्तमोत्तम पत्रकारही दिले. पत्रकारांची थोर परंपरा या महाराष्ट्राला लाभली. टिळकांनी स्वातंत्र्याने प्रेरित 'केसरी' पत्र सुरु केले. हे विचारवंतांचे पत्र होते. टीकाही तारतम्य राखून केली जायची. पुढे टिळकांना सरकारविरोधी लेखनामुळे शिक्षा झाल्यानंतर 'केसरी' ची धुरा चिंतामण केळकर यांच्यावर आली. त्यांच्याबरोबर संपादकीय व्यवस्था पाहणारे सुप्रसिद्ध नाटककार काकासाहेब खाडीलकर होते. त्यांनी आपल्या नाटकांबरोबरच आपल्या लेखणीतून ब्रिटिश जुलमाविरुद्ध आग ओकण्यास

सुरुवात केली. तेव्हा केळकरांना चिंता वाटून त्यांनी काकासाहेबांना संपादकीय जबाबदारीतून मुक्त केले. तेव्हा रागावलेल्या काकांनी ७ मार्च १९२३ रोजी स्वत:चे 'नवाकाळ' हे वृत्तपत्र सुरु केले.

पुढे काकासाहेबांना जहाल लेखनाबद्दल १९२९ साली राजद्रोहाचा खटला भरुन शिक्षा सुनावली. तेव्हा त्यांनी 'नवाकाळच्या ' संपादकपदाची धुरा यशवंत उर्फ आण्णासाहेब खाडीलकर यांच्याकडे दिली. पुढे आण्णासाहेबांनी १९६९ मध्ये हे पद सोडून त्यांचे सुपुत्र नीळकण्ठराव यांना संपादक केले. अत्रे, कोल्हटकर यांच्या सोबतच एक नाव गाजत होते. ते म्हणजे नीळकण्ठराव खाडीलकर आचार्य अत्रे दैनिक मराठाच्या माध्यमातून कामगारवर्गाचा आवाज बनले. त्याकाळी वृत्तपत्रे ही भांडवलादारांची असल्यामुळे 'मराठा' सामान्यांचा आवाज बनले, तसाच नवाकाळही तळपत होता. अत्र्यांप्रमाणेच नीळकंठराव अग्रलेखाचा परिच्छेद न पाडताच लिहीत असत व ते मुखपृष्ठावरच छापायचे. त्यामुळे 'नवाकाळ'चे ते आकर्षण ठरले.

त्यानंतर संयुक्त महाराष्ट्राचे कार्य संपल्यानंतर आर्थिक अडचणींमुळे व तुटपुंज्या यंत्रसामग्रीमुळे 'नवाकाळचा' खप कमी होऊ लागल्याचे लक्षात येताच नीळकंठरावांनी आपल्या प्रतिभेने व स्मरणशक्तीने तो पुन्हा वर आणला. एखाद्या गोष्टीतील ज्वलंत व जिवंत असा प्रसंग उभा करण्याच्या त्यांच्या लेखन हातोटीमुळे 'नवाकाळ' वाढीस लागला. त्यांचे अजून एक वैशिष्ट्य म्हणजे टिपणे न घेता मुलाखत घेण्याची त्यांची पद्धत, ज्या अतिशय लोकप्रिय झाल्या. त्यात १९९२ साली मा. शरद पवारांची मुलाखत. क्रमश: पाच दिवस एकही शब्द लिहून न घेता 'नवाकाळ' मधून प्रसिद्ध झालेली मुलाखत. यामुळे मराठी पत्रकारितेचा दर्जा अजूनही उंचावला आणि नीळकंठरावांना 'अग्रलेखांचा बादशहा' हा अनभिषिक्त किताब जनतेने त्यांना त्यांच्या अग्रलेखांमुळे बहाल केला. पुढे खाडीलकर व अग्रलेखांचा बादशहा असे समीकरणच बनले. सामान्य वाचकालाही अवगत होईल अशा साध्या व सुलभ भाषेतील त्यांच्या अग्रलेखांनी सामान्य जनतेच्या मनावर अधिराज्य गाजविले. त्यांनी अनेक पुस्तकांचे लेखनही केले. त्यांच्या पत्रकारितेचा गौरव म्हणून महाराष्ट्र शासनाने 'लोकमान्य टिळक जीवन गौरव' पुरस्काराने तर, भारत सरकारने 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित केले. त्यानंतर १९९७ साली स्वत: संपादकपद सोडून स्वपुत्री जयश्री पांडे यांना 'नवाकाळ' चे संपादकपद बहाल केले व रोहिणीला 'संध्याकाळ' चे संपादकपद.

**आधुनिक काळ –**

**महावीर जोंधळे**

महावीर जोंधळे यांचा जन्म १९४८ साली जोंधळे पिंपळगाव (लिंगी) तालुका कळंब, जि. उस्मानाबाद या ठिकाणी एका शेतकरी कुटुंबात झाला. घरी बऱ्यापैकी शेती होती. पुढे ती राहिली नाही. दोन – एक हजार  वस्तीचं गाव. गावात चौथीपर्यंत शाळा, वडिलांच्या निधनानंतर सारं घर आर्थिक विवंचनेत सापडले. पुढील शिक्षणासाठी वडीलभावाने गुरुकुलात कुंथलगिरीला नेऊन सोडलं. निसर्गाच्या रम्य वातावरणात असलेलं ते गुरुकुल. त्यात प्रामुख्याने आरोग्य संवर्धनावर अधिक भर असल्यामुळे व्यायामशाळा सक्तीची  होती. येथूनच त्यांना वाचनाचा छंद जडला. सातवी बोर्डाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर त्यांच्या जीवनाची खरी भटकंती सुरू झाली. कारण गुरुकुलात सातवीपर्यंतच शिक्षण होते. त्यानंतर आष्टी, बार्शी व अंबाजोगाई येथे त्यांनी शिक्षण घेतले. त्यांचं खरं शिक्षण झाले ते चार भिंतीबाहेर. शाळेत येणारी

केसरी, मराठा ही पत्रे अगदी मन लावून वाचत. त्याचबरोबर त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले, कार्ल मार्क्स यांचाही अभ्यास याच काळात केला. पुढे गुरुकुलात शिकले, तिथेच वर्षभर शिक्षक म्हणून कार्य केले. पण तेथे जास्त काळ त्यांचे मन रमले नाही.

श्री जोंधळे यांनी 'दै. केसरी,' 'मराठा,' 'सकाळ' आदी वर्तमानपत्रांतून आपल्या लेखनकार्यास प्रारंभ केला. तसेच 'साधना', राजस आदी मासिकांतूनही त्यांनी लेखन केले. 'आनंद' मासिकाचे संपादक गोपीनाथ तळवळकर यांनी त्यांना लेखनासाठी मोठ्या प्रमाणावर प्रोत्साहित केले. त्यातून पुढे वाचन आणि विद्यार्थी चळवळ अशी जोड जमली व कथा, कविता, ललितलेखन मोठ्या प्रमाणावर जोर धरु लागले. 'मराठा', 'साधना', 'किशोर' या नामवंत दिवाळी अंकातून त्यांचे लेखन प्रसिद्ध होऊ लागले. 'साधना' मासिकातील लेख वाचून मराठवाडा दैनिकाचे संपादक अनंतराव भालेराव यांनी त्यांना औरंगाबादला बोलावून घेतलं. जवळ जवळ अकरा वर्षे उपसंपादक म्हणून अनंतरावांच्या हाताखाली काम करण्याचं भाग्य त्यांना मिळालं. तिथंच खऱ्या अर्थानं त्यांच्या आयुष्याची जडण–घडण झाली. इथेच त्यांना अनेक ख्यातकीर्त कवी, लेखक, साहित्य, नाट्य, काव्यक्षेत्रातील व्यक्तींचा सहवास लाभला... 'मराठवाडा'त काम करण्यापूर्वी ते मुंबईस नोकरीच्या शोधात गेले असता तेथे त्यांना श्रीमती शांता शेळके, शिरीष पै., सदानंद रेगे आदी मान्यवरांचा आधार मिळाला. पण पुढे त्यांना मुंबई सोडावी लागली. 'दै. मराठवाडा' तच जोंधळेजी लहानाचे मोठे झाले.पत्रकारितेचं चांगलं भान त्यांना प्राप्त झाले. त्यांनी लेखकाची गुणसंपदा जोखून, मर्जी राखून त्यांना लिहितं करुन स्वत:ची गुणग्राह्यता सिद्ध केली. पुरवण्यामधूनही वाङ्मयीन अभिरुची ढळू दिली नाही. त्यांनी सवंग लोकप्रियता नेहमीच टाळली. त्याला कारण म्हणजे दूरदृष्टी होय.

प्रतिष्ठानचा कार्यकारी संपादक असो, योगिताच्या बालविशेषकांचा निमंत्रित संपादक असो की, अन्य एखाद्या दिवाळी अंकाचा मानद सल्लागार असो. त्यांनी संपादनाची छाप कायम ठेवलेली दिसते. त्यासाठी संयोजन कौशल्य लागतं, तेही त्यांनी आत्मसात केलं आहे. दैनिकात काम करताना विविध प्रकारचं लेखन अपरिहार्यपणानं करावं लागतं. ती एक प्रकारची विविधभारतीच होय. त्यातूनही कधी – कधी अग्रलेखाचीही जबाबदारी येऊन पडत. तीही जबाबदारी ते तत्परतेनं पार पाडतात. इतकेच नव्हे तर सुंदर अग्रलेखही त्यांनी दिले आहेत. त्याबद्दल त्यांना गौरविण्यात आले. ''हे प्राप्त करण्यासाठी लेखणीच्या टोकावर प्राण ठेवावे लागतात'' असे ते म्हणतात. महावीरजी हे प्रकृतीधर्माचे लेखक आहेत. यामुळे समाजातील विविध प्रश्नांवर त्यांचे लेखन दिसून येते. मग ते ऊसतोड कामगारांच्या मुलांचे प्रश्न असो अथवा ग्रामीण भागातील दुर्लक्षित मुलांचे प्रश्न असो. यासाठी त्यांनी स्वतंत्र विचार डोक्यात घेऊन कार्यक्रम आखून व्याख्यानाच्या माध्यमातून समाजजागृतीचा कार्यक्रम केला.

त्यांनी आपल्या लेखांच्या माध्यमातून कधी वृत्तपत्रसृष्टीचा आढावा घेतलेला दिसतो, तर कधी राजकारणी लोक, शासक, समाजसुधारक, पुढारी यांच्यावर प्रकाश टाकण्याचे कार्यही दिसून येते. शिगेला पोहचलेला भ्रष्टाचार, माणसामाणसातील द्वेष व अविश्वास या वास्तवाचं चित्रण आणि यातून मार्ग दाखविण्याचं धाडस वृत्तपत्रे करताना दिसत नाहीत. यावर विवेचनात्मक लेखही लिहिलेला दिसून येतो. त्याचबरोबर जातीयवादावरही त्यांचे लेखन दिसून येते. त्यांच्या सर्व लेखातून त्यांच्या निकोप मनाचे

दर्शन होते. अन्यायाच्या विरोधात कठोर होणारी त्यांची लेखणी साहित्यिकावरील लेखात हळूवार बनते, काव्यात्मक बनते.

श्री. जोंधळेजी हे मराठी भाषेतील साहित्यिक, लेखक, पत्रकार व संपादक आहेत. त्यांनी सुमारे चाळीस वर्षे 'बेळगाव तरुण भारत,' 'मनोहर,' 'महाराष्ट्र टाईम्स,' 'लोकमत,' 'लोकसत्ता,' 'सकाळ' या वृत्तपत्रांत पत्रकारिता आणि स्तंभलेखन केले. सहज सोपी शब्दरचना आणि भावनिक आवाहन करणारी लालित्यपूर्ण लेखनशैली हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य आहे. ललित वाङ्मय प्रकारात त्यांची अकरा पुस्तके प्रकाशित झाली असून अनेक कवितासंग्रहही आहेत. त्यामध्ये बालगीतांचा समावेशही आहे. उत्कृष्ट व्याख्याते म्हणूनही सर्वपरिचित आहेत. त्याचबरोबर त्यांनी अनेक साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही भूषविले आहे. या कार्यकर्तृत्वामुळे त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे.

कुंथलगिरीच्या गुरुकुलात शिकलेले, स्व. कवी बालसुत यांच्या सान्निध्यात आणि कुंथलगिरीच्या रम्य परिसरात त्यांचे बाल्य बागडले. कुंथलगिरी ही योगीद्वयाची तपोभूमी निर्वाणभूमी ! त्या भूमिकणांचा स्पर्श आणि वातावरणातील गंधकण यांचा त्यांच्या प्रतिमेला परिस्पर्श झाला आणि प्रयत्न – पुरुषार्थाने बालमन संस्कारसंपन्न करण्याचे व्रत अंगीकारले. पिंपळगाव (लिंगी) या खेड्यानं मराठीला एक नामवंत सारस्वत, संपादक, पत्रकार दिला.

**कुमार केतकर**

राज्यसभेतील खासदार, पत्रकार, लेखक आणि व्याख्याते असलेल्या कुमार केतकरांनी 'दै. लोकसत्ताचे' प्रमुख संपादक, 'महाराष्ट्र टाईम्स आणि लोकमत या वृत्तपत्राचे माजी मुख्य संपादक,' 'डेली ऑब्झर्व्हर' चे मुख्य संपादक तसेच 'इकॉनॉमिक टाईम्स'चे विशेष प्रतिनिधी म्हणूनही काम केले आहे. संपादकपदाच्या कारकीर्दीच्या अखेरीस ते 'दिव्य मराठी'चे संपादक होते. यांचा जन्म ७ जानेवारी १९४५ रोजी झाला. कुमार केतकर यांनी जवळपास, पाच दशके मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांतून पत्रकार – संपादक म्हणून काम केले. ही दशके त्यांना महाराष्ट्रातील सर्व प्रकारच्या बुद्धिवादी वर्तुळात महत्त्वाचे स्थान बहाल करणारी ठरली. वृत्तपत्रांतून लिहिलेल्या हजारो लेख व अग्रलेखांच्या माध्यमातून त्यांचा दबदबा निर्माण झाला. सुस्पष्ट विचार, प्रवाही भाषा व थेट मांडणी हे लेखणीचे वैशिष्ट्य आणि पुरोगामी, उदारमतवादी ही त्यांच्या विचारांची दिशा.

आर्थिक सुधारणा कार्यक्रम, उदारीकरण पर्व, खासगीकरणाचे धोरण यांचे त्यांनी समर्थन केले. त्यांनी अनेकांवर, त्यांच्या भ्रष्टाचारावर, अपप्रवृत्तीवर सातत्याने आसूड ओढले. त्यामुळे अनेकांनी त्यांच्याशी असभ्य वर्तनही केले. त्यांच्यावर अनेक स्तरातून अनेकदा टीकाही झाली. पण त्यांनी आपल्या भूमिकेत आणि मांडणीत यत्किंचितही बदल केला नाही. काही विशिष्ट गोष्टी सोडल्या तर लेखन, भाषण यासाठी केतकर हवे असतात. सर्वच स्तरातल्या प्रवाहात व्यक्ती, संघटना, संस्था, यांच्यात त्यांची ऊठ–बस असे. नेमके त्यांच्या बाबतीत काय दृष्टीकोन असावा हे सांगणे कठीणच आहे. त्यांनी लिहिलेल्या अग्रलेखांच्या, वक्तव्यांच्या माध्यमातून अनेकदा वाद निर्माण होत. त्याचा परिणाम त्यांच्या जीवनावरही अनेकदा झालेला दिसून येतो. अशा परिस्थितीतही त्यांनी आपले लेखन थांबवले नाही. त्यामुळेच त्यांना भारत सरकार व महाराष्ट्र सरकाने विविध पुरस्कारांनी सन्मानित केले.

**गिरीश विनय कुबेर**

श्री. गिरीश कुबेर मुंबई विद्यापीठातून विज्ञान

शाखेतून पदवी शिक्षण व पुणे विद्यापीठातून पत्रकारितेचे पद्व्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर इ.स. १९८५ –८६ पासून ते पत्रकारितेत कार्यरत आहेत. इ.स. १९८८ साली ते महाराष्ट्र टाईम्स मध्ये रुजू झाले. इ.स. १९९८ मध्ये त्यांना ब्रिटीश सरकारची मौल्यवान अशी शिष्यवृत्ती प्राप्त झाली. अशा शिष्यवृत्तीसाठी निवड होणारे ते पहिले मराठी पत्रकार ठरले. ते भारताच्या पोखरण – २ च्या चाचणी चे वर्ष होते व उपखंडातून मजकुराची मागणी अतिशय वेगाने वाढू लागली त्यांनी त्यांच्या पालकांसोबत लंडन मध्ये कामास सुरूवात केली. जून १९९८ मध्ये लिवर पुल येथे आयोजित केलेल्या जी–८ परिषदेमध्ये भारतावर निर्बंध जाहीर करण्यात आले. सुदैवाने त्यांना याविषयी त्यांच्या पालकांचा प्रतिनिधी म्हणून वृत्तांकनाची संधी मिळाली.

नंतर ते 'इकोनॉमिक टाईम' मध्ये रुजू झाले. गिरीश कुबेर यांनी 'इकॉनॉमिक टाईम' मध्ये राजकीय संपादकाचे काम केले. त्यांनी सातत्याने विविध इंग्रजी व मराठी वाहिन्यांवर अर्थसंकल्पाचे विश्लेषण केले. सध्या ते लोकसत्ता मध्ये संपादक आहेत. अलीकडे ते श्री. विजय केळकर व कीर्ती पारेख यांच्या सोबत दिल्ली येथील 'CERA WEEK' (सेरा विक) या आंतरराष्ट्रीय ऊर्जा परिषदेमध्ये सहभागी झाले होते. या परिषदेसाठी आमंत्रित केलेल्यांपैकी ते एकमेव पत्रकार होते.

गिरीश कुबेर यांचे साहित्याप्रती योगदान– त्यांची प्रमुख चार पुस्तके आहेत.

**हा तेल नावाचा इतिहास आहे :**– इ.स. २००५ साली प्रकाशित झालेल्या या पुस्तकामध्ये इ.स. १८५० पासूनचा इतिहास आहे. जेव्हा रॉकेफेलर याने स्वत:चे तेल साम्राज्य स्थापन्याचं स्वप्न बांधलं होतं. मागील १५० वर्षापासून तेल हे विकासात किती महत्त्वाची भूमिका निभावते आहे याचे सुद्धा वर्णन या पुस्तकात केले आहे.

**एका तेलियाने :**– २००७ साली प्रकाशित झालेल्या या पुस्तकामध्ये सुप्रसिद्ध सौदी तेल मंत्री शेख झाकी यामनी यांची भूमिका व पश्चिम अशियाई दुर्घटना यांचा उल्लेख आहे.

**अधर्म युद्ध :**– २००९ साली प्रसिद्ध झालेले हे पुस्तक पाश्चिमात्य शक्तींनी कशाप्रकारे मुस्लिमांचा वापर छोट्या राजकीय फायद्यांसाठी केला याची सर्वसमावेशक कथा सांगते. या पुस्तकामध्ये तेल कंपन्यांचे तिसऱ्या युगातील गुप्तकारस्थाने उघडकीस आणली आहेत. २६/११ चा संदर्भ देत या पुस्तकात हे सुद्धा सांगितलेले आहे की सध्याचा दहशतवाद हा ऊर्जा युद्धाचा परिणाम म्हणून त्यावर झाला आहे.

**युद्ध जीवांचे :**– ही एक विविधप्रकारच्या भयानक जैविक युद्धांची कथा आहे.

वरील चारही पुस्तके विख्यात व प्रतिष्ठित प्रकाशन संस्था राजहंस यांनी प्रकाशित केली आहेत व अनेक पुरस्कार या पुस्तकांना प्राप्त झाले आहेत. चारही पुस्तकांना लोकांप्रमाणेच समीक्षक व विद्वान यांच्याकडून प्रचंड प्रतिसाद मिळाला आहे.

**टाटायन :**– १ जानेवारी रोजी प्रसिद्ध झालेलं हे पुस्तक टाटा परिवाराचा सर्वसमावेश इतिहास सांगतो. या पुस्तकाची ११वी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली आहे.

**लोकसत्ता अग्रलेख :**– दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली आहे.

**पूतीन :**– १ मे २०१७ रोजी प्रसिद्ध झालेल्या पुस्तकाची चौथी आवृत्ती प्रकाशित कण्यात आली आहे. याशिवाय, विविध साहित्यिक व सामाजिक प्रकाशनांमध्ये गिरीश कुबेर यांचे नियमित योगदान असते. गिरीश कुबेर यांनी खूप मोठ्या प्रमाणात

प्रवास केला आहे. त्यांनी आत्तापर्यंत २१ देशांना भेटी दिल्या आहेत.

अशा काही संपादकांनी आपल्या लेखनशैलीने समाजमन ढवळून काढले. वेळवेळी समाजाला नवदिशा देण्याचे कार्य केले. काळ कोणताही असो मग तो स्वातंत्र्यपूर्व, स्वातंत्र्योत्तर अथवा आधुनिक संपादकाचे, पत्रकारांचे कार्य अविरतपणे निहित नियमानुसार चालूच आहे. काळ बदलत गेला तशी वर्तमानपत्रंही बदलत गेली. स्वातंत्र्यपूर्वकाळात एका ध्येयाने, विचाराने प्रेरित असणारी, समाजजागृती करणारी वृत्तपत्रे स्वातंत्र्यानंतर बदलेल्या समाजानुसार समाजनीती व अर्थनीती यावर, तर आधुनिक काळात कशावर हा अभ्यासाचा विषय आहे असे माझे मत आहे. संपादक, पत्रकार हा शिक्षकाप्रमाणेच असतो. शिक्षक जो आजन्म विद्यार्थी असतो तोच खरा शिक्षक – त्याचप्रमाणे समाज कितीही बदलला, काळ बदलला तरीही संपादक, पत्रकाराने समाजातील बदलल्या स्थित्यंतराचा परिणाम त्याच्यावर होत असला तरी त्याच्या ध्येयावर व लेखनीकर्तृत्वात होता कामा नये. असे करणारा तोच खऱ्या अर्थाने संपादक, पत्रकार होय. अशा संपादक, पत्रकारांची आपल्या महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही फार मोठी श्रृंखला आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे निष्पक्ष पत्रकारिता, आपल्या देशात निष्पक्षपणे संपादकीय, पत्रकारिता करणारे अनेकजण आहेत. पण दुर्दैव असे की, समाजमनाची बदलेली परिस्थिती अत्यंत वाईट असून संपादक, पत्रकाराने कितीही निष्पक्ष, नम्रतेने लिहिलेल्या लेखनाला धार्मिक, सांस्कृतिक वा अन्य पैलूंच्या माध्यमातून पाहून त्यांच्यावर तो ‘टॅग’ लावलाच जातो. संपादक, पत्रकार, साहित्यिक,लेखक हे नियमांना अनुसरुनच चालणारे असतात. त्यांना समाजाच्या कोणत्याही चौकटीत न बसवता अभिव्यक्ती स्वातंत्र्यानुसार त्यांना लेखन करुन देऊन समाजाला जागृत करण्याचे, नवमार्ग दाखविण्याचे कार्य करू द्यावे कारण समाजजागृती हे कोणत्याही देशाच्या विकासाच्या गतीचे साधन होय.

# महाराष्ट्राची आद्य स्त्री संपादक तानुबाई बिरजे

अजंली विजय वाव्हळे, बी.ए. तृतीय वर्ष

**तानुबाई बिरजे** हे शीर्षक वाचल्यानंतर कदाचित अनेक वाचकांच्या मनामध्ये अनेक प्रश्न उपस्थित झाले असतील आणि ते होणेही साहजिकच आहे. कारण विषय वृत्तपत्रकारिता आहे. आणि ही वृत्तपत्रकारिता आजही पुरुषी मानली जाते. भलेही वृत्तसमूहामध्ये कार्य करणाऱ्या अनेक महिला आहेत. मास मीडिया तर त्यांच्याशिवाय चालत नाही. पण मुद्रित पत्रकारितेमध्ये स्त्रीयांचा सहभाग शून्यासारखाच समजावा लागेल. आज आपण एकवीसाव्या शतकात वावरत असूनही मुद्रित पत्रकारितेत स्त्रीसहभाग नसणे ही शोकांतिकाच म्हणावी लागेल. ही मनाची शोकांतिका शमविण्याच्या हेतूने मी मराठीतील स्त्री संपादकाचा शोध घेत असता मला तानुबाई बिरजे हे नाव मराठी संपादकाच्या आणि स्त्री संपादकाच्या नावामध्ये ध्रुवताऱ्याप्रमाणे अढळ असं दिसलं आणि त्यांच्याविषयी आपल्यासमोर मांडण्याचं भाग्यही लाभलं.,



तानुबाई वासुदेवराव बिरजे यांचा जन्म इ.स. १८७६ च्या कालावधीत झाला. देवराव कृष्णराव ठोसर यांची ती कन्या. ठोसर  हे नाशिक जिल्ह्यातील गंगापूर निवासी कुटुंब. ठोसर हे महात्मा फुले यांचे जवळचे व विश्वासू सहकारी होते. आपल्या मुलामुंलीची लग्ने त्यांनी सत्यशोधक समाजपद्धतीने लावली. तानुबाईंचा विवाह वासुदेवराव लिंगोजी बिरजे यांच्याशी झाला. ते अतिशय बुद्धीमान, संस्कृत, इंग्रजी, गुजराती व हिंदी भाषेचे अनन्यसाधारण ज्ञान असणारे होते.

बिकट परिस्थितीमुळे विल्सन कॉलेजमधून शिक्षण अर्धवट सोडून वासुदेवराव बिरजे बाहेर पडले. या कालावधीत ते 'दीनबंधू' व 'शेतकऱ्यांचा कैवारी' या पत्रांमधून अभ्यासपूर्ण लेखन करीत असत. ना. म. लोखंडे 'दीनबंधू'चे संपादक असताना बिरजे यांनी उपसंपादकाची भूमिका योग्यरीतीने पार पाडली. राजे सयाजीरावांची नजर त्यांच्यावर पडली आणि त्यांनी त्यांचा बडोद्याच्या लक्ष्मीविलास ग्रंथालयात ग्रंथपाल म्हणून नेमणूक केली. सन १८९४ ते १९०५ अशी अकरा वर्षे त्यांनी तेथे ग्रंथपाल म्हणून कार्य केले. पण ही नोकरी सोडून ते परत मुंबईला आले. त्यानंतर १८९७ ला लोखंडे यांच्या मृत्यूनंतर बिरजे यांनी 'दीनबंधू' ची जबाबदारी स्वीकारली. १९०३ मध्ये संपादक म्हणून कार्य करू लागले आणि दीनबंधूला एक वेगळ्या उंचीवर घेऊन गेले.

नाशिकमध्ये आयोजित दुसऱ्या मराठा शिक्षण परिषदेस गेले असता त्यांना कॉलरा या रोगाने अकाली निधन प्राप्त झाले.

पतीच्या आकस्मिक मृत्यूनंतर तानुबाईंनी दीनबंधूची जबाबादारी स्वीकारली. त्यावेळी त्यांचे वय केवळ ३२ वर्षांचे होते. आपल्या बंधू आणि मेव्हुणे यांचे लेखनविषयक धोरण पसंत न पडल्याने त्यांनी स्वत: संपादकपद सांभाळले. त्यांनी दीनबंधू मध्ये शिक्षण, कृषी, राजकारण, समारंभ, सत्यशोधक समाज, मराठा आदी जातींच्या शिक्षण परिषदा यांचे सविस्तर वृत्तांत प्रसिद्ध केले. सत्यशोधक चळवळीच्या वृत्तांवर त्या विशेष भर देत असत. तुकाराम महाराजांचे अभंग अग्रलेखांच्या शीरोस्थानी प्रसिद्ध करून त्या दीनबंधूचे उद्दिष्ट व्यक्त करीत असत.

त्याकाळातील आणि आजच्या काळातील संपादकालाही विचारप्रवृद्ध करायला लावणारी लोकशाही शासन प्रणाली विषयीची लेखमाला त्यांनी लिहिली. त्याचबरोबर मुंबई इलाख्यात लेजिस्लेटिव्ह कौन्सिल आणि बहुजन समाज हे तानुबाईंचे अनन्यसाधारण संपादकीय आहे. गरीब-श्रीमंत भेदाबरोबरच समाजातील तत्कालीन जातीपंथ यातील भेदाभेद, चालीरीती व आचार - विचार याचबरोबर समाजातील विषमतेवर प्रहार करुन चांगलीच चिरफाड त्यांनी आपल्या अग्रलेखातून निरंतर केली आहे.

तानुबाई बिरजे यांची संपादकीय कारकीर्द केवळ चार वर्षांचीच आहे. निश्चितच कालावधी कमी असेलही परंतु त्यांनी आपल्या लेखणीसामर्थ्याने ज्यांना आयुष्यभरही जमणार नाही इतके विपुल आणि अभ्यासपूर्ण लेखन करुन दीनबंधू वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले. ज्या तत्कालीन समाजात स्त्रीयांवर अत्याचार, रीती, रुढी, परंपरामध्ये बांधून ठेवण्याचे काम पुरुषी व्यवस्थेने केले आणि करीत आहेत. अशा परिस्थितीत एका स्त्रीने दीनबंधू सारख्या पत्राचे संपादकपद स्वीकारावे आणि आपल्या बुद्धीमत्तेच्या, लेखणीच्या, आत्मविश्वासाच्या, जिद्दीच्या, अभ्यासाच्या जोरावर क्वचितही भयभीत न होता तत्कालीन समाज, राजनीति, शिक्षण इतकेच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावरच्या वृत्तांचे संपादकीय लिहावे. निश्चितच काय ते विलक्षण व्यक्तिमत्त्व असेल. असे हे तानुबाई बिरजे यांचे व्यक्तिमत्त्व तत्कालीन आणि नंतरच्याही पुरुषी समाजव्यवस्थेने नावारुपास येऊ दिले नाही. किती मोठी ही शोकांतिका, यामागील कारणे वाचली तर मन उद्विग्न होते. असो.

आजच्या पिढीतील युवकांना मार्गदर्शक ठरेल अशा प्रकारची पत्रकारिता आणि संपादकीय लिहिणाऱ्या तानुबाई बिरजे या महाराष्ट्रातील, देशातीलच नव्हेतर विश्वातील पहिल्या स्त्री संपादक आहेत असे म्हणणे वावगे ठरणार नाही. अशा या पहिल्या स्त्री संपादकास कोटी कोटी प्रणाम.

पहा पुढील वर्षीच्या पत्रकारदिनी आपल्याला या स्त्री संपादकाची आठवण होते का ? आणि यांना पत्रकारदिनी आपण निरंतर स्मरण करु शकू का ? किंवा तत्कालीन परिस्थितीप्रमाणे आजही आपण पुरुषी व्यवस्थेलाच प्राधान्य देऊन महाराष्ट्राच्या या लेकीला आणि त्यांच्या योगदानाला भूतकाळातील अंधाराच्या विश्वात तसेच ठेवायचे हे आता आपणच ठरवायचे आहे.

# वृत्तपत्रातील अग्रलेखाचे प्रकार व महत्त्व

**विकास खंडू मालसमिंदर,** बी.ए. द्वितीय वर्ष

**प्रस्तावना :-**

इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या या आधुनिक जगामध्ये आजही प्रिंट मीडियाला म्हणजेच वृत्तपत्राला अनन्य साधारण महत्त्व आहे. अनेकांची दैनंदिनी वृत्तपत्राशिवाय सुरूच होत नाही. प्रत्येकजण आपआपल्या रुची अनुसार याचे वाचन करीत असतो. काहीजण केवळ मथळेच वाचतात, तर काही जणांना क्रीडाविश्वातील, मनोरंजनाच्या, नोकरीविषयक अशा विविध वृत्तांमध्ये रस असतो. बुद्धीवादी लोकांचा कल हा जास्त करुन अग्रलेख व स्तंभालेखाकडे असतो. हा अग्रलेख म्हणजे वृत्तपत्राचा आत्मा आहे. हा अग्रलेख म्हणजे वृत्तपत्राचा कणा आहे. अग्रलेखाचे आवाहन समाजातील बुद्धिजीवी वर्ग, विचारवंत, राज्यकर्ते, प्रशासन व समाजधुरीण यांच्यासाठी असते. सामान्य वाचकांचे प्रबोधन करणे हा एक महत्त्वाचा उद्देश असतो. अग्रलेखातून एखाद्या घटनेबद्दल भाष्य करताना वाचकांना त्या घटनेचा अन्वयार्थ समजावून सांगितला जातो. कोणत्याही प्रश्नाच्या दोन्ही बाजू मांडून वाचकांना अग्रलेखातून आवाहन केले जाते. यातून त्याला विचारप्रवृत्त तर करण्यात येतेच पण त्या प्रश्नाबाबत त्याचे मतही घडविले जाते. वाचकांच्या विचारांवर व मतांवर अग्रलेखातून अप्रत्यक्षरीत्या संस्कार केला जातो. सामान्य वाचक व राज्यकर्ते अग्रलेख वाचून निर्णय करतात असे नव्हे. उलट आपल्या एखाद्या निर्णयाचे समाजमनावर कोणते परिणाम होतील याचा अंदाज राज्यकर्ते निर्णयापूर्वी करतात, पण त्यापेक्षाही सामान्य नागरिकांची प्रतिक्रिया काय होऊ शकते याचा अंदाज राज्यकर्त्यांना अग्रलेखातून येतो. बदलत्या काळानुसार अग्रलेखाचे विषयही बदलत आहेत. म्हणूनच की काय सामान्यजनांच्या ताणतणावाचे, जिव्हाळ्याचे प्रश्न हेही अग्रलेखाचे विषय ठरु लागले आहेत. अग्रलेख लिहिणारा संपादक हा एकप्रकारे समाजाचे वैचारिक नेतृत्व करीत असतो. तसेच राजकीय, सामाजिक दिशादर्शनच करीत असतो आणि मते घडवित असतो. अग्रलेखामध्ये साठ टक्के मत व चाळीस टक्के माहिती त्या वृत्तापत्राच्या धोरणाशी निगडित संपादक लिहीत असतात.

अग्रलेखाची व्याख्या :-

लोकशाहीमध्ये वृत्तपत्राचे जसे अनन्यसाधारण महत्व आहे तसे वृत्तपत्रांमध्ये अग्रलेखांचे महत्त्व आहे. जी. के. पुरी हे आपल्या ग्रंथामध्ये वृत्तपत्र व त्यातील अग्रलेख यांच्यातील परस्पर संबंधाविषयी आपले मत व्यक्त करताना म्हणतात, ''The best Newspaper is that which has the best editorial''.

अग्रलेख हा वृत्तपत्राचा आत्मा आहे. वृत्तपत्र हे चक्र मानले तर अग्रलेख हा त्याचा केंद्रबिंदू होय. लोकांचा माहिती करुन घेण्याचा हक्क, पारदर्शकता, मानवी प्रतिष्ठेची जाणीव या साऱ्या निष्ठांच्या तारा या अग्रलेखाशीच जुळलेल्या असतात.

''अग्रलेख हे वाचकांचे मत बनविण्याचे साधन आहे. वाचकाला आपल्या मताबरोबर घेऊन जायचे काम अग्रलेखांद्वारे संपादकांना करावे लागते.''

शेवटी आपणही असे म्हणू शकतो की, 'अग्रलेख हा समाजव्यवस्थेचे प्रतिबिंब असून तो आपल्या माध्यमातून वाचकांच्या विचारप्रक्रियेला निरंतर चालना देऊन समाज जागृत ठेवण्याचे कार्य करतो.'

**अग्रलेखाची रचना व भाषा :-**

अग्रलेख हा वृत्तपत्रातील ठराविक जागेवरच लिहिला जातो. तो म्हणजे पान क्र. दोन अथवा पान

क्र. चारवर डावीकडील दोन स्तंभात प्रकाशित होतो. अग्रलेखाची जागा मर्यादित म्हणजे दोन कॉलम ३६ से.मी. एवढी कायम असते. त्यात एक अथवा दोन अग्रलेख लिहिले जातात. ही जागा चारशे ते एक हजार शब्दापर्यंतच मर्यादित असते. अग्रलेखाचा आकृतिबंध हा जुन्या वैचारिक निबंधाशी नाते सांगतो, अग्रलेखाची भाषा एकाचवेळी भारदस्त व सोपी असावी लागते. भारदस्त म्हणजे जड, संस्कृत, अपरिचित शब्द वापरणे वा प्रदीर्घ वाक्य लिहिणे नव्हे. भारदस्तपणा वाचकांच्या भूमिकेतून, विचारातून व धोरणातून प्रकटतो. अग्रलेख लिहिणे ही एक कला आहे. त्यासाठी संपादकाच्या अंगी प्रगल्भता, समयसूचकता व समृद्ध शब्दभाण्डार असणे आवश्यक असते.

अग्रलेखाचे प्रकार :-

वृत्तपत्र हे विविध अंगांनी सजलेले असते. त्यामुळेच ते परिपूर्ण असते असे म्हणावयास हरकत नाही. अशा या वृत्तपत्राला सामान्य जनमानसाचा प्रतिनिधी बनवून परमोच्च स्थानी नेण्याचे कार्य हा अग्रलेख करीत असतो. मग असा हा अग्रलेख एकांगी असणे अशक्यच आहे. मग याचे प्रकार किती व कोणते ? असा प्रश्न निर्माण होतो. विविध ग्रंथांमध्ये याचे विविध प्रकार नोंदविले आहेत. त्या प्रकारांविषयी आपण पाहू या अग्रलेखाचे एकूण दहा प्रकार आहेत ते असे.

१) विशेष लेख २) प्रांसगिक लेख ३) धोरणात्मक लेख ४) उपरोधिक अग्रलेख ५) आक्रमक अग्रलेख ६) आंतरराष्ट्रीय अग्रलेख ७) विकासविषयक अग्रलेख ८) राजकीय अग्रलेख ९) मृत्यू लेख १०) मूल्यमापनात्मक अग्रलेख

१) विशेष लेख :- एखाद्या गोष्टीचा हेतू, धोरण यांच्याविषयी अभ्यासपूर्ण माहिती म्हणजे विशेष अग्रलेख होय. एखाद्या हेतूचा अथवा धोरणाचा समाजमनावर होणारा परिणाम, त्याची वैशिष्ट्ये इत्यादी गोष्टींचा त्यात आढावा घेण्यात येतो.

२) प्रासंगिक लेख :- वर्तमानपत्र व्यवसायात कुठलेही नियतकालिक प्रसंगानुसार ताज्या विषयावर अग्रलेख लिहीत असते. उदा. स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन तसेच इतिहासावर ठसा उमटविणाऱ्या घटनांवर प्रासंगिक अग्रलेख लिहिले जातात. तसेच प्रासंगिक विषयावर विशेषांकही काढले जातात.

३) धोरणात्मक अग्रलेख :- वृत्तपत्राचे स्वरुप बदलले की त्याचे धोरणही बदलते. मूळ धोरणात्मक बदल करून नवीन दृष्टीकोन मांडावा लागतो. जेणेकरून त्यामाध्यमातून वृत्तपत्राची भूमिका सहजरीतीने समाजापार्यंत पोहचते. परिवर्तन हा निसर्गाचा नियम असून काळानुरुप प्रत्येक गोष्टीत बदल हा घडत असतो. बदल घडला की धोरणही बदलते, समाजप्रवाहासोबत चालण्यासाठी हा बदल अपेक्षितच असतो आणि तो केला पाहिजे. अन्यथा आपण या समाजप्रवाहातून बाहेर फेकल्या जातो.

४) उपरोधिक अग्रलेख :- एखादी गोष्ट, धोरण इत्यादीवर टीका-टिपणी करणे म्हणजे उपरोधिक अग्रलेख होय. टीका-टिपणीचा अर्थ त्याविषयी पूर्वग्रहदूषितपणा नसून त्यात असणाऱ्या उणिवांचे दर्शन घडविणे असा असू शकतो. समाजात भिन्न भिन्न मतप्रवाह असणारे अनेक लोक असतात. प्रत्येकाला प्रत्येकाचे मत मान्य असतेच असे नाही. अशा वैचारिक मतभेदातून टीका-टिपणी घडत असते. ज्याप्रमाणे नाण्याला दोन बाजू असतात त्याचप्रमाणे प्रत्येक गोष्टीला, धोरणाला आणि विचारालाही दोन बाजू असतात. सम्प्रति मांडलेल्या धोरण, विचाराविषयीची दुसरी भूमिका म्हणजे उपरोधिक अग्रलेख होय.

५) आक्रमक अग्रलेख :- प्रतिपक्षावर टीका करुन त्यांना नामोहरम करणाऱ्या अग्रलेखास आक्रमक अग्रलेख असे म्हणतात. लोकमान्य टिळकांच्या, 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' या केसरीतून सुरू झालेल्या अग्रलेखांची परंपरा मुकुंदराव पाटील, श्रीपतराव शिंदे, दिनकरराव जवळकर

यांपासून नीळकण्ठराव खाडीलकरांपर्यंत आणि त्यानंतरही सुरू आहे.

६) आंतरराष्ट्रीय अग्रलेख :- संपूर्ण जगामध्ये विविधप्रकारच्या घडामोडी घडत असतात. परिषदा, संमेलने इत्यादी अनेक महत्त्वपूर्ण घडामोडी घडत असतात. या घडामोडींचा संपूर्ण विश्वाबरोबरच आपल्या देशावरही चांगला, वाईट परिणाम घडतो. या परिणामांची अद्ययावत माहिती ज्या अग्रलेखातून मांडली जाते त्यास आंतरराष्ट्रीय अग्रलेख म्हणतो.

७) विकासविषयक अग्रलेख :- नवीन शास्त्रीय ज्ञान, तंत्रज्ञान, वैज्ञानिक प्रगती यामुळे संपूर्ण जगाचा चेहरामोहराच बदलून गेला आहे. आपला देश हा विकसनशील देश आहे आणि अर्थव्यवस्था कृषिप्रधान आहे. विविध क्षेत्रात होत असलेली प्रगती ग्रामीण भागापर्यंत पोहचली पाहिजे. तरच खऱ्या अर्थाने आपला देश समृद्ध होईल. यासाठी विकासोन्मुख पत्रकारिता ही काळाची गरज आहे. विकासाचे वारे देशभरात वाहू लागले असताना या विकासाची फळे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत व्यवस्थित पोहचतात की नाही. त्या योजना राबविणाऱ्या यंत्रणेवर अंकुश राहण्यासाठी पत्रकारांनी जागरूक असले पाहिजे. विकासाच्या विविध योजनांची माहिती व त्यातील त्रुटींचा आढावा घेणारा म्हणजे विकासविषयक अग्रलेख होय.

८) राजकीय अग्रलेख :- देशांर्गत असणारे राजकीय पक्ष, त्यांची देशाच्या, समाजाच्या, विकासाच्या प्रती असणारी ध्येय, धोरणे यातून घडणाऱ्या हालचाली यांचे सखोल विश्लेषण, सरकार, शासनांतर्गत घडणाऱ्या राजकीय घटनांचा वैचारिक आढावा म्हणजे राजकीय अग्रलेख होय.

९) मृत्यू लेख :- डॉ. धारुरकरांच्या मते, ''लोकमान्य टिळक, आचार्य अत्रे यांनी मराठी वृत्तपत्रात मृत्यूलेख हा प्रकार रुढ केला.'' समाजातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, साहित्य आदी क्षेत्रांमध्ये देदीप्यमान कार्य करुन पंचतत्त्वात विलीन होणाऱ्या व्यक्तिविशेषाविषयी लिहिल्या जाणाऱ्या लेखास मृत्यू लेख असे म्हणतात, या संदर्भास अनुसरुन अनेक लेख आपल्या वृत्तपत्रविश्वातील इतिहासात आढळतात.

१०) मूल्यमापनात्मक अग्रलेख :- कुठल्याही प्रकारच्या घटनेचे केवळ वर्तन करून न थाबंता त्याच्या माध्यमातून काय कमावले आणि काय गमावले ? याचा सापेक्ष विचार म्हणजेच मूल्यमापनात्मक अग्रलेख होय.

अग्रलेख व स्तंभलेखातील फरक :-

संपादकीय पानावर अग्रलेखाशेजारी जो लेख असतो त्याला स्तंभलेख असे म्हटले जाते. स्तंभलेख हे देखील संपादकीय भाष्य असते. अग्रलेखांपेक्षा कमी महत्त्वाचा परंतु त्यावर संपादकीय टिपणी आवश्यक असते. पूर्वी स्तंभलेख देखील लिहीत असत. स्तंभलेख राजकीय विषयाव्यतिरिक्त असण्यावर जोर दिला जातो. त्यामुळे विविध विषयावर स्तंभलेखन केले जाते. तसेच स्तंभलेखनही अभ्यासपूर्ण असल्या कारणाने अग्रलेखा इतकेच महत्त्व त्याला आहे.

अशाप्रकारे वृत्तपत्रांमध्ये आपणास अग्रलेख आढळून येतात. प्रकार कोणताही असो त्यामाध्यमातून आपणास सद्यस्थिती, घटना, धोरण आदी विविध पैलूंचे ज्ञान होते. हे केवळ ज्ञानापुरतेच मर्यादित नसून त्यापुढे विचारनिर्मिती, प्रसारालाही वाव मिळतो आणि नकळतपणे देशाच्या विकासगती चक्रामध्ये आपणही सामील होतो. या वैशिष्ट्यपूर्ण महत्त्वामुळेच इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या आधुनिक जगामध्ये वृत्तपत्रे टिकूनच आहेत. असे नव्हे तर दिवसेंदिवस प्रगतीही करीत आहेत. मला विश्वास आहे की, हा लेख वाचून आपली नजर अग्रलेखाकडे वळल्याशिवाय राहणार नाही. एवढेच नव्हे तर आपण यापुढे एका आकलनात्मक दृष्टीने वृत्तपत्रे पाहू आणि वाचू !

# आधुनिककाळात वृत्तपत्रांची भूमिका

**राधा बाबासाहेब होगे,** बी.एस्सी. तृतीय. वर्ष

**वृत्तपत्र हा** समाजजीवनाचा आरसा आहे असे म्हटले जाते. समाजातील सद्य:स्थितीचे दर्शन जसे वृत्तपत्रांमधून घडते, त्याचबरोबर लोकशिक्षण व समाजप्रबोधनही वृत्तपत्राद्वारे घडते. वृत्तपत्रांची ही प्रमुख भूमिका असते. स्वातंत्र्योत्तर काळात आपण संसदीय लोकशाही राज्यपद्धतीचा स्वीकार केला असल्याने सर्वसामान्य माणसाचे महत्त्व वाढले आहे. लोकशाही यशस्वी होण्यासाठी आदर्श व जागरुक समाज निर्मितीसाठी वृत्तपत्रे निरंतरपणे आपली भूमिका समर्थपणे पार पाडत आली आहेत. आपातकालीन परिस्थितीमध्ये जनमत संघटित करुन अन्यायाविरुद्ध लढण्याचे दिशादर्शन वृत्तपत्रांनी केले. गोवा मुक्तीसंग्राम, मराठवाडा मुक्तीसंग्राम, संयुक्त महाराष्ट्र चळवळ अशा संघर्षाच्या प्रसंगी वृत्तपत्रांनी आवाज उठवून आपली भूमिका समर्थपणे पार पाडली होती.

लोकशाही राज्यपद्धतीत निवडणुकांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. सार्वत्रिक निवडणुकीच्या निमित्ताने विविध पक्षांची ध्येयधोरणे लोकांसमोर मांडण्याचे काम वृत्तपत्रे बजावीत असतात. जनतेचे मतदानाद्वारे निवडून दिलेल्या प्रतिनिधींची कर्तव्ये, प्रतिनिधींकडून जनतेच्या असलेल्या अपेक्षा सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहचविण्याचे काम वृत्तपत्रे करीत असतात. लोकप्रतिनिधींनी केलेली जनहिताची कामे, संसद वा विधिमंडळाचे कामकाज, जनतेच्या प्रश्नांना तेथे मिळणारे स्थान, जनलेच्या अपेक्षा, गाऱ्हाणी, भावना राज्यकर्त्यापर्यंत पोहचविण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वृत्तपत्र होय. काही वेळा जनमताची अचूक माहिती होण्यासाठी सरकारी यंत्रणा किंवा पक्षीय यंत्रणा या अपुऱ्या पडतात. प्रसंगी त्यात एकांगी दृष्टिकोन येऊ शकतो. परंतु वृत्तपत्रे लोकमानसाचे वस्तुनिष्ठ चित्रण करतात. त्यामाध्यमातून राज्यकर्त्यांना लोकमताची नाडी अचूक कळते. राजकर्त्यांचे गैरकारभारही वृत्तपत्रे जनतेसमोर वस्तुनिष्ठपणे आणतात. याचबरोबर सामाजिक घटनांचे भान ठेऊन समाजासाठी समाजाला जागृत करण्याचे, सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य वृत्तपत्रे उत्तमप्रकारे पार पाडतात. त्याचबरोबर वेळोवेळी राज्यकर्त्यांच्या चुकांना दर्शवून कान टोचण्याचे कार्यही करतात. अनेक आंदोलने, चळवळी यांना समाजाचा पाठिंबा तसेच यश मिळविण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करीत असतात. आधुनिक काळातही ते आपली भूमिका चांगल्याप्रकारे वठविताना दिसत असल्याचे आपल्याला खालील प्रातिनिधिक स्वरुपाच्या घटनांच्या माध्यमातून पाहता येईल.

किल्लारी भूकंप :-

३० सप्टेंबर १९९३ ची पहाट महाराष्ट्र कधीच विसरु शकत नाही. गणपती विसर्जनानंतरचा तो दिवस होता. सारा महाराष्ट्र साखर झोपेत असताना लातूर जिल्ह्यातील किल्लारी आणि आजूबाजूची गावे भूकंपाने हादरुन गेली. हजारो लोक झोपेतच जमिनीच्या उदरात सामावले गेले. ढिगाऱ्यात अडकलेले मृतदेह, जखमी लोक, नातेवाईकांना शोधणारे ग्रामस्थ, मदत करणारे स्वयंसेवक, कोलमडलेले संसार ही सगळी चिन्हं हाहाकाराची ही विदारकता काळीज भेदून टाकणारी होती. त्या रात्री काही तासांत लातूर - उस्मानाबादच्या

गावागावांत स्मशानासारखी अवकळा पसरली. जिकडे तिकडे मृतदेह पडलेले होते. क्षणार्धात होत्याच नव्हतं झालं. आता जरी या भूकंपातून लातूर – उस्मानाबादसह संपूर्ण महाराष्ट्र सावरला असला तरी भूकंपाने त्यांच्या मनावर केलेली जखम मात्र अजूनही ओलीच आहे. त्यादिवशी न जाने किती हात मदतकार्यात काम करत होते. या भूकंपाच्या पूर्वीपर्यंत महाराष्ट्रातला भूकंपप्रवण भाग म्हणून कोयना खोऱ्याचा भाग विचारात घेतला जात असे. मात्र हा केंद्रबिंदू पुढे लातूर – उस्मानाबादसारख्या ठिकाणी सरकेल असे कुणालाही वाटले नव्हते. या भूकंपाचा फटका जवळपास ५२ गावांना बसला होता. दु:ख, हताशा, निराशा सर्वत्र पसरलेली होती. किल्लारी – सास्तूरच नव्हे तर मंगरुळ, पेठ सांगवी, होळी, तळणी, कवठा, एकोंडी, राजगांव, चिंचोळी, सालेगांव अशा आजूबाजूच्या सगळ्याच गावांत हे दृश्य पाहायला मिळत होतं. गाव वेगवेगळं परंतु भूकंपाचा उत्पात सगळीकडे सारखाच होता. त्या रात्रीची घटना बघितली तर माणसाचं निसर्गापुढचं अस्तित्व नगण्य ठरतं. आपण किती खुजे आहोत याची जाणीव होते. पण माणुसकी आणि सामाजिक बांधिलकीच्या माध्यमातून आपण कोणत्याही संकटाचा सामना करु शकतो. ती माणुसकी आणि बांधिलकी जागृत करण्याचे काम वृत्तपत्रांच्या माध्यमातून प्रभावीपणे करण्यात आलं. म्हणूनच समाजाच्या प्रत्येक स्तरातून मदत मोठ्या प्रमाणात येऊ लागली. सरकारच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या सूचना समाजापर्यंत योग्यरीतीने पोहचविण्याचे प्रभावी माध्यम वृत्तपत्रेच होती. तेथील खडा न् खडा माहिती शासनापर्यंत पोहविण्यासाठी सरकारी यंत्रणेसोबत पत्रकारांच्या माध्यमातून वृत्तपत्रेही पोहचवत होती. उजाडलेल्या संसाराच्या करुण कथा, विलग झालेली माणसे यांच्या करुण कहाण्या, उजाडलेली गावे यांची सविस्तर माहिती गोळा करुन वृत्तपत्रांमध्ये छापल्या गेली. ज्यामुळे तेथील दु:खी जनतेला यथायोग्य मदत मिळत गेली. त्या त्या गावातील इतरत्र राहणाऱ्या आप्तेष्टांना, नातेवाईकांना, मुलांना आपल्या प्रियजनांच्या विषयी माहिती मिळण्याचे माध्यम केवळ वृत्तपत्रेच होती. सरकार, पोलीस, डॉक्टर, समाजसेवक इत्यादींसमवेत अहोरात्र काम करुन त्या त्या गावांचे पुनर्वसन करण्यासाठी आपले पूर्ण योगदान वृत्तपत्रांनी दिले. प्रत्येक नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मग ती त्सुनामी असो, महापूर असो वा अन्य इतर कोणतीही आपत्ती त्या त्या कालावधीमध्ये वृत्तपत्रांनी आपली भूमिका योग्यरीतीने व प्रभावीपणे पार पाडली.

भ्रष्टाचार :–

सार्वजनिक जीवनात स्वीकृत मूल्यांच्या विरुद्ध केल्या जाणाऱ्या आचरणास भ्रष्ट आचरण म्हणजेच भ्रष्टाचार असे म्हणतात. सार्वजनिक जीवनात याला केवळ आर्थिक गुन्ह्यांसाठी जोडले आहे ही चिंतेची व विचाराची बाब आहे. असो आज जगामध्ये भ्रष्टाचाराच्या बाबतीत भारत ८० व्या क्रमांकावर आहे. ब्रिटिशांपासून प्राप्त झालेल्या या भस्मासुराची विविध रूपे म्हणजेच विविध प्रकार आपल्याला पाहावयास मिळतात ते म्हणजे –

१) सरकारी क्षेत्रातील भ्रष्टाचार, २) राजनीतिक भ्रष्टाचार, ३) न्यायिक भ्रष्टाचार, ४) शिक्षण व्यवस्थेतील भ्रष्टाचार, इत्यादी अनेक प्रकारचे भ्रष्टाचार आज आपणास आपल्या देशात पाहावयास भेटतात. प्रत्येक गोष्ट मिळविण्यासाठी लाचेची लाचारी पत्करावी लागते आपले दुर्दैव.

भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर अनेक घोटाळे झाले. अर्थातच भ्रष्टाचाराशिवाय कोणताही घोटाळा होत नाही हे खरे या घोटाळ्यातील मोठे घोटाळे ते असे .१) बोफोर्स घोटाळा २) युरिया घोटाळा ३) चारा घोटाळा ४) शेयर बाजार घोटाळा ५) सत्यम्

घोटाळा, ६) स्टँप पेपर घोटाळा ७) कॉमनवेल्थ गेम्स घोटाळा, ८) २ जी स्पेक्ट्रम घोटाळा ९) धान्य घोटाळा १०) कोळसा खाण घोटाळा ११) विजय माल्या, ललित मोदी, नीरव मोदी, राहुल चोकशी यांनी केलेले घोटाळे. अशा अनेक घोटाळ्यांनी आज आपला देश बरबटला आहे. सरकार कोणाचेही असो आपल्या मर्जीतील लोकांना, उद्योगपतींना लाभ होण्याच्या हेतूने राजनेते भ्रष्टाचार करीत असतात. केवळ राजनेतेच नव्हे तर सम्पूर्ण कार्यप्रणाली ज्याला आपण सिस्टिम असे म्हणतो, त्या सिस्टिममधील सेवकापासून ते सर्वोच्च पदस्थ अधिकारी (काही प्रामाणिक लोक वगळले तर) लक्ष्मीदर्शनाशिवाय कामच करीत नाहीत. मग हेच लोक भ्रष्टाचारी आहेत काय ? तर नव्हे या लोकांकडून लाच देऊन काम करुन घेणारा सर्व समाजच भ्रष्ट आहे. मग हाच समाज सिस्टिम भ्रष्ट असल्याचा कांगावा करतो. आपणही याच सिस्टिमचा भाग आहोत हे विसरुन. असो आज भ्रष्टाचार कमी झाला असे आपण म्हणत असलो तरी तो आहे तसाच आहे फक्त मार्ग बदलले आहेत एवढेच. अशा भ्रष्टाचारांना जनतेपर्यंत पोहचविण्याचं म्हणजे त्याची इत्यंभूत माहिती लोकमानसापर्यंत पोचविण्याचं कार्य वृत्तपत्रे चोखपणे करतात. केवळ माहिती पुरविण्यापर्यंतच ती काम करीत नाहीत तर यामागील कारणांचा ऊहापोह करणे व त्यावरील उपायांचे मार्गही आपल्याला दर्शवितात. श्रीमंत – गरीब ही असमानता, अनेक अनावश्यक योजना ज्यामुळे तरुण वर्ग त्यामध्ये अडकून उद्योगाभिमुख होण्याऐवजी तो उद्योगविन्मुख, विचारशून्य होऊन योजनेच्या पैशावरच आपले दारिद्र्यपूर्ण जीवन कंठित करतो. अशा योजना निर्माण करून भ्रष्टाचार करणे आणि जनतेतील असमानतेची दरी वाढवून भ्रष्टाचाराला प्रोत्साहित करण्याचे काम केले जाते. अशा सर्व भ्रष्टाचारांविषयी वृत्तपत्रे जनजागृती तर करतातच पण लेखणीच्या माध्यमातून त्या त्या शासनाचे कान टोचण्याचे कार्य वृत्तपत्रे निरंतर करीत असतात. भ्रष्टाचाराविरुद्ध जनमत संघटित करुन प्रसंगी शासनावर दबाव आणून भ्रष्टाचाऱ्यास शिक्षा करण्यासही भाग पाडतात. भ्रष्टाचारविरोधी ही वृत्तपत्रे जनतेचे कान, डोळे बनून, अव्याहतपणे आपली भूमिका पार पाडतात.

आन्दोलने :–

आन्दोलन, सत्याग्रह म्हटले की आपल्या मन:चक्षूसमोर सर्वात प्रथम येतात ते महात्मा गांधीजी, या अस्त्रांचा उपयोग करुन बापूंनी आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त करवून दिले. त्यानंतर म्हणजे स्वातंत्र्यानंतर आणि बापूजी नंतर लहान – मोठी दोन – चार आन्दोलने, सत्याग्रहे झाली पण ती लक्षात राहण्याइतकी प्रभावशाली ठरली नाहीत. त्यानंतर किसन बाबूराव हजारे म्हणजेच अण्णा हजारे हे व्यक्तिमत्त्व जून १५, १९३७ रोजी महाराष्ट्राच्या क्षितिजावर (अहमदनगर जिल्हा, भिंगार या गावी) उदयास आले. सैन्यात वाहनचालक असलेल्या त्यांनी नोकरी सोडून महात्मा गांधीजींच्या तत्त्वांना आपले जीवन मानून समाजाप्रती आपले जीवन समर्पित केले. बापूंप्रमाणेच अण्णांनी समाजकल्याणासाठी अनेक आन्दोलने केली. त्याचा थोडक्यात आढावा आणि त्यामधील वृत्तपत्रांची भूमिका पाहू या.

भ्रष्टाचाराविरोधात उपोषण :–

महाराष्ट्राला भ्रष्टाचार हा काही नवीन नाही. सत्तालोलूपाने राजा – महाराजांपासून ब्रिटिश आणि ब्रिटिशांपासून राजनेता अशी दीर्घ परम्परा देशात आणि राज्यात आपल्याला दिसून येते. महाराष्ट्रातील काही नेते भ्रष्टाचार करीत असल्याचे अण्णांच्या लक्षात आल्यानंतर अण्णांनी या भ्रष्टाचाराविरोधात उपोषण सुरु केले. या उपोषणाची फलश्रुती म्हणजे तत्कालीन सरकारमधील काही भ्रष्ट मंत्र्यांवर कारवाई

करण्याचे आश्वासन मिळाले. त्या नेत्यांना आपल्या पदाचा राजीनामा देऊन तुरुंगवास भोगावा लागला. ही प्रत्येक पक्षातील नेत्यांसाठी मोठी चपराक सिद्ध झाली. राजनीतिक भ्रष्टाचारात थोड्याफार प्रमाणात कमतरता आली. त्यानंतर सहकार चळवळीतील भ्रष्टाचाराच्या विरोधात, सहकार कायद्यात आमूलाग्र बदल करण्यासाठी केलेल्या उपोषणामुळे सहकार कायद्यात सुधारणांची प्रक्रिया सुरू झाली.

माहितीचा अधिकार :-

शासनप्रणालीमध्ये अनेक कामे गैरमार्गाने सर्रासपणे चालत होती. त्यावर कोणत्याही स्वरुपाचा अंकुश नव्हता. नोकरशाही यथेच्छपणे, स्वैरपणे कार्य करीत होती. सामान्यांना कोणत्याही प्रकारच्या गोष्टी सहजासहजी कळत नव्हत्या. तेव्हा अण्णांनी प्रत्येक माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहचावी म्हणून माहितीच्या अधिकारासाठी आन्दोलन, उपोषण केले. याचाच परिपाक म्हणजे हा कायदा काही महत्त्वाची कार्यालये वगळून सर्वत्र लागू करण्यात आला. त्यामुळे सर्वसामान्याला हवी असलेली माहिती निहित नियमानुसार प्राप्त होत आहे. या कायद्यामुळे विविध संस्थांतर्गत होणारा भ्रष्टाचार फार मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे.

जनलोकपाल कायदा :-

आतापर्यंतची केलेली आन्दोलने उपोषण महाराष्ट्रापुरतीच मर्यादित होती, परंतु महाराष्ट्रीय जनतेप्रमाणेच देशातील जनताही भ्रष्टाचाराने व्यथित झाली होती. या जनतेसाठी, त्यांना या व्यथेतून बाहेर काढण्यासाठी अण्णांनी ५ ते ९ एप्रिल २०११ रोजी जंतर - मंतर मैदानावर उपोषणास प्रारंभ केला. भ्रष्टाचाराने पोळलेल्या जनसामान्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. परिणामी तत्कालीन सरकारवर मोठा दबाव निर्माण झाला. त्यामुळे सरकारने कायद्याच्या मसुद्यासाठी सरकारच्या ५ मंत्र्यांसह अण्णा आणि त्यांच्या सिव्हील सोसायटीच्या ५ सदस्यांसह जॉईन्ट ड्राफ्ट कमिटी स्थापन केली. परंतु यामधून कोणत्याही प्रकारचे फलित प्राप्त झाले नाही म्हणून अण्णांनी पुन्हा भ्रष्टाचारविरोधी जनलोकपाल कायद्यासाठी रामलीला मैदानावर आन्दोलन सुरु केले. या आन्दोलनाला पाठिंबा देण्यासाठी देशातील मोठमोठ्या शहरांपासून ते अगदी खेड्यापर्यंत मोठ्या प्रमाणावर निदर्शने, कँडल मार्च, मोर्चे, रॅली इत्यादी काढण्यात आली. या सर्वांची परिणिती म्हणून हे आन्दोलन यशस्वी झाले.

या आणि अशा आन्दोलनांचा विचार करता समाजाच्या हितासाठी असलेल्या आन्दोलनाला समाजातील सर्व घटकांचा पाठिंबा मिळण्याच्या हेतूने वृत्तपत्रांनी केलेले कार्य अतिशय महत्त्वाचे आहे. सरकारविरोधात जनमत तयार करण्याचे भीमकाय कार्य केवळ वृत्तपत्रेच करू शकतात. त्यांनी ते केले म्हणून या आन्दोलनांना समाजाचा सम्पूर्ण उत्स्फूर्त पाठिंबा प्राप्त होऊन ती पूर्णपणे यशस्वी झाली. चिपको, नर्मदा आन्दोलन कोणतेही आन्दोलन असो वृत्तपत्रांनी आपली भूमिका चोखपणे निभावली. पण मनामध्ये एक खंत आहे ती अशी की, पूर्वी ज्या पद्धतीने वृत्तपत्रांच्या माध्यमातून चळवळी उभ्यारल्या जायच्या अशा चळवळी आता उभ्या राहत नाहीत. याला कारण कदाचित कालानुरुप बदललेले स्वरुपही असू शकते. आधुनिककाळातही वृत्तपत्रांनी आपली भूमिका न सोडता ती सार्थपणे निभावत आहेत.

संस्थानातील पहिले मराठी वृत्तपत्र

# निजाम विजय

**गीता मुंजाभाऊ गोरे,** बी.ए. तृतीय वर्ष

**प्रस्तावना :-**

कै. अनंतराव यांच्या जन्मशताब्दी प्रित्यर्थ आमच्या महाविद्यालयाने अनंत वृत्त विशेष हा विषय निवडला. वृत्तपत्रे, त्यांची विविधांगे, इतिहास इत्यादी विषयास अनुसरुन तसेच मराठवाडा मुक्तिसंग्रामातील कार्यकर्ते, नेते असलेल्या आणि दै. मराठवाडा चे संपादक असलेल्या अनंतरावजींचा (अण्णा) सेलू शहरासोबत असलेला संबंध, या संबंधातून त्यांनी रुजविलेली तत्त्वे, विचारप्रणाली यांचा सेलूतील जनमानसावर फार मोठा परिणाम आजही आहे. याच विचारप्रेरणेतून निजाम संस्थानमध्ये प्रकाशित तत्कालीन एखाद्या मराठी वृत्तपत्राविषयी लिहिण्याचा मानस केला. परंतु तत्कारलीन निजाम राजवटीत अशा स्वरुपाचे वृत्तपत्र असेल का ? हा यक्षप्रश्न होता. कारण तत्कालीन राजवटीत महाराष्ट्राच्या लहानमोठ्या जिल्ह्यांतून प्रकाशित होणाऱ्या सर्वच वृत्तपत्रांवर बंदी होती. त्यामुळे महाराष्ट्राच्या एकूण सामाजिक, राजकीय, वाङ्‌मयीन व सांस्कृतिक जीवनात घडणाऱ्या घटनांचे आकलन हैदराबादी जनतेला होत नसे. वृत्तपत्रांवर बंदी घालून निजामाने जनतेला अज्ञानाच्या गर्द अंधकारात लोटून स्वातंत्र्यप्रवण विचारांचा त्यांना स्पर्श होऊ न देता गुलामीत ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता. अशा गुलामीरुपी अंधकारात चाचपडणाऱ्या जनतेला स्वातंत्र्यप्रवण विचारांचा स्पर्श करुन देण्याच्या हेतूने लक्ष्मणराव फाटक यांनी 'निजाम विजय' हे मराठी नियतकालिक १९२० पासून आरंभ केले व एका तपस्येला, अग्निदिव्याला आरंभ झाला.

श्री. लक्ष्मणराव फाटक हे मूळचे हैदराबादचे नव्हते. पण ते साधारण १९०७-०८ च्या सुमारास येथे आले व पाहता पाहता येथील वातावरणात समरस झाले. येथे त्यांनी चळवळी सुरु केल्या, संस्था स्थापन केल्या. वामन नाईक व केशवराव यांचे ते विश्वासू सहकारी, मित्र व अनुयायी होते. १५ वर्षे त्यांच्यासोबत कार्य करीत असताना त्यांना आपल्या येथे वृत्तपत्र नाही ही गोष्ट टोचत होती. खूप प्रयत्नांनी नाईकांच्या साहाय्याने व केशवरावांच्या प्रेरणेतून 'निजाम विजय' हे मराठी वृत्तपत्र उद्‌यास आले. पण शत्रूच्या गुलामगिरीत, जुलमी राजवटीत त्यांच्याविरुद्ध जनतेस जागृत करण्याच्या उद्देशाने निघालेल्या या वृत्तपत्रास शत्रूचे म्हणजे निजामाचे 'निजाम विजय' असे नामकरण का केले ? असा प्रश्न उपस्थित होतो. याचे उत्तर फाटकजींच्याच भाषेत सांगायचे तर 'आमचे वर्तमानपत्र ते काय ? गरीब विचारे !' तुमच्या दयेवर चालणारे, जगणारे, याचा शब्दश: अर्थ न घेता आपले इप्सित साध्य करण्यासाठी स्वमनाविरुद्ध काही गोष्टी करणे आवश्यक असते. मवाळ धोरणावादी परंतु स्वातंत्र्याप्रती, जनजागृतीप्रती आक्रमक असणाऱ्या लक्ष्मणरावांच्या मनी हेच असावे.

मराठवाड्यातील पत्रकारितेच्या विकासाचा इतिहास हा या प्रदेशाच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक जागृती आणि नवचेतना देणारा, प्रेरणादायी इतिहास आहे. या प्रदेशाच्या तेजस्वी स्वातंत्र्याच्या लढ्यासारखीच वृत्तपत्राच्या विकासाची

गाथा आहे. आजचा मराठवाडा हैदराबाद संस्थानच्या अखत्यारितला भाग असताना बेलगाम निजामी हुकूमशाहीशी झुंजत दीर्घ काळ चालू राहिलेले वृत्तपत्र म्हणून 'निजाम विजय' या वृत्तपत्राचा उल्लेख करावा लागेल.

हैदराबाद राज्यातील पहिल्या मराठी वृत्तपत्राचा मान 'निजाम विजय' या वृत्तपत्रालाच जातो. कै. लक्ष्मणराव फाटकांनी मराठी भाषा आणि साहित्याच्या विकासासाठी व राजकीय जागृतीसाठी या अर्धसाप्ताहिकाचे प्रकाशन सुरू केले होते. स्वत:च्या मनाविरुद्ध त्यांना 'निजाम विजय' हेच नाव या अर्धसाप्ताहिकासाठी निवडावे लागले. ज्या हेतूने फाटकांनी हे साप्ताहिक काढले तो त्यांचा हेतू बऱ्याच प्रमाणात तडीस गेला. 'फिरस्ता' या टोपणनावाने लिखाण करणारे मराठी साहित्यिक श्री. वा.दा. गाडगीळ हे 'निजाम विजय' चे लेखक होते. शंकर गोविंद नांदेडकर यांनी एका लेखात हैदराबाद राज्यातील पहिल्या मराठी वृत्तपत्राचा मान 'निजाम विजय' या पत्रालाच जातो असे म्हटले तरी लक्ष्मणराव फाटकांनी हे पत्र ११ नोव्हेंबर १९२० साली सुरु केले. असा उल्लेख या पत्रात सातत्याने लेखन करणाऱ्या कृष्ण मुकुंद उजळंबकर, आणि न्यायमूर्ती नरेंद्र चपळगांवकर यांच्या लेखात आलेला आहे. त्यामुळे 'निजाम विजय' अगोदर हैदराबाद राज्यात सुरू असलेल्या वृत्तपत्राची माहिती आढळत नाही असे दिसते. 'निजाम विजय'चा आरंभ ११ नोव्हेंबर १९२० मध्ये झाला. २० वर्षे हे साप्ताहिक चालले. एका वर्षाचे ५२ अंक असे वीस वर्षांचे जवळजवळ एक हजार आठवड्याच्या सलग अंकाच्या संचिका (फाईल्स) लक्ष्मणराव फाटक यांचे चिरंजीव श्री. वासुदेव फाटक यांच्याकडे सुरक्षित आहेत. या सर्व अंकांचा प्रा.द.पं. जोशी यांनी अत्यंत कष्टपूर्वक व चिकित्सक अभ्यास करुन 'काळाच्या पडद्याआड' हा त्रिखंडात्मक ऐतिहासिक साधन ग्रंथ तयार केला आहे. या संचिका (फाईल्स) चाळतांना द.पं. जोशी यांनी किती कष्ट उपसले असतील हे त्यांच्याच मनोगतातून व्यक्त होते. ते म्हणतात, ''निजाम विजय या साप्ताहिकाच्या संचिका (फाईल्स) आता अक्षरश: जीर्ण झाल्या आहेत. पुन्हा पुन्हा वाचून, हाताळून आम्ही त्यांना नको तितके कष्टविले.'' द.पं. जोशी यांनी अत्यंत कष्टपूर्वक रचलेला हा त्रिखंडात्मक ग्रंथ म्हणजे हैदराबाद मराठवाड्याचा स्वातंत्र्यपूर्व काळातील लोकजीवनाचा आलेख नोंदविणारा एक दुर्लभ, दुर्मीळ, ऐतिहासिक दस्तऐवज जसा आहे तसा संस्थानी राजवटीतील सर्वथा प्रतिकूल परिस्थितीत राजकीय व सामाजिक जागृतीसाठी वृत्तपत्र सृष्टीने केलेल्या तेजस्वी कार्याचा आढावा घेणारा संदर्भग्रंथ आहे.

संस्थानातील अधिकाऱ्यांच्या अवकृपेला बळी न पडण्यासाठी तारेवरच्या कसरती करीत, अगदीच सौम्य भाषेत आपले मत व्यक्त करीत, तर कधी या अवकृपेला तोंड देत दीर्घकाळ चालू शकलेले वृत्तपत्र म्हणजे 'निजाम विजय' हे साप्ताहिक. अगदी प्रारंभीच्या काळात या पत्राची संपादकीय जबाबदारी लक्ष्मणराव फाटक, दिगंबराव बिंदू व राघवेंद्र शर्मा असे तिघे सांभाळात. बिंदू पुढे स्वातंत्र्य चळवळीचे प्रमुख नेते व स्वातंत्र्यानंतर गृहमंत्री झाले. प्रारंभी 'निजाम विजय'चे अग्रलेख आणि बातम्यांचे संकलन करीत असत. वृत्तपत्राची आर्थिक परिस्थिती वाईट असल्याकरणाने बिदूंचा दरमहा पंचेवीस रुपये हा ठरलेला पगारही वेळेवर देणे फाटक यांना शक्य होत नसे. अशा बिकट परिस्थितीतही फाटक यांनी हे वृत्तपत्र अतिशय जिद्दीने व नेटाने चालविले. ११ नोव्हेंबर १९२० रोजी या वृत्तपत्राचा पहिला अंक

प्रकाशित झाला. मधला सहा महिन्यांचा कालावधी सोडला तर पोलीस ॲक्शन होऊन निजाम संपुष्टात आल्यानंतरही हे पत्र चालूच होते. १९२० ते १९४४ हा कालावधी हैदराबादच्या समाजजीवनात जागृतीचा व संघर्षाचा होता. त्यामुळे वेगाने घडणाऱ्या घटनांमुळे कोणी कितीही संयमित व मवाळ लेखन करायचे म्हटले तरी तत्कालीन जनमानसाचे प्रतिबिंब यामध्ये उमटणे साहजिकच होते. संस्थानातील सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील घडामोडींचा, त्या क्षेत्रात निर्माण झालेल्या संस्थानी संस्काराची नोंद 'निजाम विजय' ने प्रामाणिकपणे ठेवण्याचा प्रयत्न केला. यामुळे हे वृत्तपत्र महत्त्वाचे ठरते. संयमित लेखन करुनही हे वृत्तपत्र सहा महिने बंद ठेवण्याचा आदेश निजामच्या गृह खात्याने दिला. त्यामुळे फाटक यांना हे वृत्तपत्र सहा महिने बंद ठेवावे लागले. (९/०८/१९२९ ते २१/०९/१९३०). जाती – जातीमध्ये वैमनस्य पसरविणे व सरकारी धोरणाविरुद्ध लिहिणे असे दोन आरोप ठेवण्यात आले होते. न्या. नरेंद्र चपळगांवकर या बाबत आपले मत व्यक्त करताना म्हणतात. ''निजाम विजय'' चे महत्त्व मराठवाड्याच्या वाङ्मय इतिहासाच्या संदर्भात मोठे आहे. संस्थानात वाङ्मयीन संस्था स्थापण्याचे जे प्रयत्न झाले त्याला प्रोत्साहन देण्याचे कार्य 'निजाम विजय'नेच केले होते.'' शिवाय संस्थानातील लेखकांना, इतिहासकारांना, विचारवंताना आपल्या लेखन आविष्कारासाठी हे वृत्तपत्रच माध्यम होते. यामध्ये कृष्णकुमार एम. ए., वा.दा. गाडगीळ यांसारखे लेखक, विश्वेश्वर कानोले, न. शा. पोहनेरकर, पाडुंरग देसाई, माधवराव लेले यांसारखे इतिहास संशोधकांचे लेखन 'निजाम विजय' मध्येच प्रसिद्ध झाले आहे. त्याचबरोबर श्री. रामचंद्रराव नांदापूरकर, श्री. गाडगीळ व श्री. विक्रांत यांच्या चर्चा, श्री. लक्ष्मणराव गानू यांचे विवेचन, श्री. विठ्ठलराव देशपांडे इ. मान्यवरांचे लेखही याच वृत्तपत्रातून प्रसिद्ध आहेत. 'निजाम विजय' ने सुमारे वर्षभर साहित्य पुरवणी प्रकाशित केली. या पुरवणीचे संपादन करण्यास श्री भालचंद्र कहाळेकर, भगवंत देशमुख व उजळंबकर यांचाही हातभार लागला आहे. विशेष म्हणजे मराठवाड्याचे झुंझार पत्रकार कै. आ. कृ. वाघमारे हेही या वृत्तपत्रातून लिहीत असत.

हैदराबाद संस्थानच्या भोवती असलेल्या पोलादी बंधनामुळे नवविचार निर्मितीला आणि संघटन उभे राहण्यास संधीच नव्हती. प्रत्येक सामाजिक कार्य संशयास्पद समजले जात. सरकारी परवानगीशिवाय कोणताही सामाजिक, सांस्कृतिक उपक्रम घेता येत नसे. निजामी राज्याचे सार्वभौमत्त्व टिकवून त्याला इस्लामी संस्कृतीचे केंद्र बनविण्याच्या संस्थानच्या धोरणामुळे वाचनालय सुरु करणे, विद्यालयाची स्थापना करणे, व्यायामशाळा चालविणे, सार्वजनिक सभा इत्यादींवर बंदी होती. मुद्रण, संघटन, भाषण आणि धार्मिक विधी करण्याचेही स्वातंत्र्य नव्हते. याविरुद्ध जनजागृती करण्यासाठी चळवळी उभारणे गरजेचे होते. लोकजागृतीचा वसा घेतलेल्या वृत्तपत्रांनी प्रारंभापासूनच या चळवळीसाठी प्रेरकाची भूमिका घेतली होती. १९२० नंतर या प्रांतातील सार्वजनिक जीवनाची सर्वांगाने विचारपूर्वक पायाभरणी सुरू झाली होती. याचे वर्णन करताना द.पं. जोशी म्हणतात, ''हा जो पायाभरणीचा भाग आहे तो केवळ काही व्यक्ती, काही संस्था वा घटना यांपुरता मर्यादित नव्हता.'' 'निजाम विजय'ने अनेक चळवळींबरोबर ग्रंथालय चळवळीला विशेष प्रोत्साहन दिले. मराठी ग्रंथ संग्रहालय स्थापन करण्यात लक्ष्मणराव फाटक यांचा सिंहाचा वाटा होता. त्यांनी अग्रलेख व विद्वानांच्या लेखांद्वारे ग्रंथालय चळवळ नेटाने

चालविली. 'निजाम विजय' मध्ये प्रसिद्ध झालेल्या लक्ष्मणराव गानू यांच्या लेखात ग्रंथालयाच्या तत्कालीन अवस्थेची स्पष्ट कल्पना येते. हैदराबादसारख्या एका बड्या संस्थानच्या राजधानीच्या ठिकाणी एखादे नाव घेण्याजोगे ग्रंथालय नसणे ही लाजीरवाणी गोष्ट आहे. सरकारद्वारा चालविलेले एक ग्रंथालय आहे, परंतु हे ग्रंथालय म्हणजे एखादे भूषण नसून सुधारलेल्या जगाच्या आम्ही किती मागे आहोत हे दर्शविणारे एक साधन आहे. 'सार्वजनिक ज्ञानसत्रे' या संपादकीयमध्ये लक्ष्मणराव फाटक लिहितात, ''सामान्य लोकांत उच्च शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी लोकभाषेतील पत्रे व पुस्तके यांचा संग्रह करणाऱ्या ग्रंथालयांचा अतिशय उपयोग झाला पाहिजे. असे माझे पूर्वीइतकेच ठाम मत आहे. आमच्या भावी बौद्धिक उन्नतीकरिता शिक्षण संस्थांप्रमाणे ग्रंथालयांच्या प्रसाराचीही अतिशय आवश्यकता आहे असे मला वाटते.'' याच अग्रलेखात पुढे अमेरिकेसारख्या प्रगत राष्ट्राने ग्रंथालयांना दिलेले महत्त्व व कार्नेजी यांनी दिलेले दान यांचा उल्लेख करुन फाटक म्हणतात. ''ग्रंथालये ही आजकालची खरी विद्यापीठे होत हे कालाईलचे वचन तर सुप्रसिद्ध आहेच. ग्रंथालय हे जर सुधारणामापक यंत्र असेल आणि ते तसे आहे हे म्हणावयास हरकत नाही तर आम्ही संस्थान निवासी अत्यंत मागासलेले आहोत ही गोष्ट उघड आहे.'' 'निजाम विजया'तून सातत्याने येणाऱ्या अग्रलेख व लेखांद्वारे हैदराबाद संस्थानात ग्रंथालय चळवळ वाढण्यास मदत झाली. त्यातून मराठवाड्यातील अनेक गावांमध्ये ग्रंथालये स्थापन झाली. त्यामध्ये वासुदेवानंद सरस्वती वाचनालय, कळमनुरी, (१९२२) बोधानन्द वाचनालय, वसमत (१९२५), गोकुळेश्वर वाचनालय, चारठाणा (१९२९), समर्थ सार्वजनिक वाचनालय, जांब समर्थ (१९३२), आनंद वाचनालय परतूर (१९३२), शारदा वाचनालय (१९३४), समर्थ वाचनालय; जिंतूर (१९३४), साहित्य मंदिर वाचनालय, हिंगोली (१९४५), लोकमान्य वाचनालय, नळदुर्ग (१९२६) या व अनेक वाचनालयांचा उल्लेख करता येईल. ग्रंथालय चळवळीला 'निजाम विजय' च्या माध्यमातून फाटक यांनी दिलेले योगदान मोलाचे आहे. संस्थानच्या जुलमी राजवटीत 'निजाम विजय' ने जनजागृतीसाठी केलेल्या कार्याला तोड नाही. या पत्रामुळे मराठवाड्याला समृद्ध वाङ्मयीन वारसा लाभलेला आहे. हा वारसा जतन करण्याचे व नवीन वाङ्मयीन पिढी निर्माण करण्याचे मोलाचे कार्य 'निजाम विजय' ने केले. ज्या काळात मराठी भाषेला सासूवासिणीसम जाच होता. मराठी दैनिके, साप्ताहिके व नियतकालिकेच हे कार्य नेटाने करु शकतात, याची जाण या पत्राचे संपादक फाटक यांना होती, त्यामुळेच 'निजाम विजय' हे केवळ बातमीपत्र न राहता ते वाङ्मयीन चळवळीचे प्रेरणास्थान ठरावे अशी फाटकांची कल्पना होती. त्यादृष्टीनेच त्यांनी 'निजाम विजय' चा पसारा वाढविला समाजात दबदबा असलेल्या केशवराव कोरटकर, वामन नाईक, दिगंबरराव बिंदू, सेतू माधवराव, वा.रा. कान्त, के. गोळेगावकर, न.शे. पोहनेरकर, आ. कृ. वाघमारे, कानोले अशा कितीतरी विद्वान व अभ्यासू लोकांना फाटकांनी 'निजाम विजय' मधून लिहिते केले.

समाजसेवेचे असिधारव्रत स्वीकारलेल्या लक्ष्मणरावांनी वृत्तपत्र व्यवसायाची सेवा केली. त्यांनी 'निजाम विजयच्या ' माध्यमातून सम्मेलन, विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, मराठीचा पाठपुरावा, विविध परिषदांचा अहवाल इ. अनेक विषयावर लेखन करुन वेळोवेळी संस्थानाचा रोषही ओढवून घेतला.

मराठीवरील निस्सिम प्रेमामुळे मराठीची होत असलेली हेळसांड त्यांना पाहवत नव्हती. म्हणूनच त्यांनी केवळ व्यापक चळवळ छेडण्याची भाषा न करता मराठी भाषेला ऊर्जितावस्था प्राप्त करवून देण्यासाठी नेटाने प्रयत्न केले. मराठी शिकण्याची, वाचण्याची व लिहिण्याची आवड निर्माण व्हावी यासाठी त्यांनी या वृत्तपत्राद्वारे मोठी चळवळ उभी केली. संस्थानात मराठी संमेलन भरविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. मराठीची होणारी उपेक्षा दूर करुन मराठीवरील प्रेम वृद्धिंगत करण्यासाठी त्यांनी सुरु केलेला वाग्यज्ञ सतत धगधगत ठेवण्यासाठी त्यात निरंतर विचारांच्या समिधा टाकत राहिले. अज्ञानरुपी अन्धकारात चाचपडणाऱ्या मराठी जनतेला विकासाच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी फाटकांनी या चळवळीला जोडूनच ग्रंथालय चळवळ हाती घेतली.

खरोखरच द.पं. जोशी यांनी 'काळाच्या पडद्याआड व 'मराठवाड्यातील वृत्तपत्रे एक चिकित्सक अभ्यास' या ग्रंथाच्या माध्यमातून शोधगंगेने ते पुनरुजीवित करण्याचे मोलाचे कार्य करुन भावी पिढीसाठी एक अनमोल ठेवा प्रदान केलेला आहे.

# मराठवाडा पत्राचे संस्थापक-संपादक : आ.कृ.वाघमारे

दिव्या विजय वाव्हळे

**'पतन् त्रायते** इति पत्रम्'. 'जे समाजाला सर्वांगीण अध:पतनापासून वाचवते व प्रगतीच्या मार्गावर समाजाला खेचून नेते तेच खरे पत्र होय.' या व्याखेला सत्यात उतरविणारे वृत्तपत्र म्हणजे 'दै. मराठवाडा' होय. हैदराबाद मुक्तीसंग्राम म्हणजे धगधगते अग्निकुंडच. निजामाच्या जुलमी राजवटीतून हैदराबाद मुक्त करण्यासाठी अनेक शूरवीरांनी उभे आयुष्य या अग्निकुंडात झोकून दिले. अत्यंत संघर्षपूर्ण अशा या संग्रामानंतर १७ सप्टेंबर १९४८ रोजी मुक्तीची पहाट उगवली. मात्र, मुक्तिसंग्रामात जीवाचे रान करणारे अनेक नायक प्रसिद्धीच्या पडद्याआड राहिले. त्यापैकीच एक त्यागी, तपस्वी व्यक्तिमत्त्व म्हणजे आनंद कृष्ण वाघमारे म्हणजेच आ. कृ. वाघमारे. पत्रकारासोबत झुंजार स्वातंत्र्यसैनिक आणि सामाजिक कार्यकर्ते म्हणूनही त्यांचा नावलौकिक राहिला.

प्रजेला बाहेरचा प्रकाश दिसू नये आणि बाहेरच्या लोकांना आतील परिस्थितीचा सुगावा लागू नये असा निजामी राजवटीचा वर्षानुवर्षे खटाटोप चालू होता. वृत्तपत्रे नाहीत, सभा परिषदा नाहीत, संघटना नाहीत, शाळा काढायची परवानगी घ्या, वृत्तपत्रे काढायची परवानगी घ्या, मिरवणूक काढायची परवानगी घ्या, उत्सव करायचा परवानगी घ्या अशा अनेक बाबींना परवानगीच्या शृंखला घालून हैदराबाद सरकारने आपल्या प्रजेला पशू करून ठेवले होते. ही बंधने तोडण्याचा, झुगारण्याचा प्रयत्न करणे म्हणजे एक दिव्यच होते. थोडक्यात सार्वजनिक जीवन जगण्याची शक्यताच नसल्यामुळे संस्थानातील जीवन मागासले, परावलंबी आणि भयभीत बनले होते. हैदराबाद संस्थान हा एक प्रचंड तुरुंग बनला होता. अशा परिस्थितीत वृत्तपत्राच्या माध्यमातून भयभीत जनतेला अध:पतनापासून वाचविण्यासाठी व प्रगतीच्या मार्गावर खेचून आणण्यासाठी म्हणून आ. कृ. वाघमारे हे व्यक्तिमत्त्व उदयास आले.

१६ मार्च १९०१ रोजी जन्मलेले आ. कृ. वाघमारे यांचे कार्यक्षेत्र मराठवाडा हे होते. ते ध्येयवादी पत्रकार होते. तसेच संघटनाकुशल कार्यकर्तेही होते. 'मराठवाडा' प्रकाशनापूर्वी त्यांनी हैदराबादहून मराठीत प्रसिद्ध होणाऱ्या निझाम विजय या साप्ताहिकाचे १९३५ ते ३७ अशी तीन वर्षे संपादन केले. आजचा मराठवाडा हैदराबाद संस्थानच्या अखत्यारितला भाग असताना बेलगाम निझामी हुकूमशाहीशी झुंजत दीर्घ काळ चालू राहिलेले वृत्तपत्र म्हणून 'निजाम विजय' या पत्राचा उल्लेख होतो. 'निजाम विजय' नाव असले तरी त्यातून निझामी राजवटीची निंदा करण्याचे काम आ. कृ. वाघमारेजी करीत होते. त्यानंतर त्यांनी हैदराबाद संस्थानात वृत्तपत्र काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, वृत्तपत्र काढण्यासाठी थेट मंत्रिमंडळाची परवानगी घ्यावी लागते. ती मिळतच नसल्यामुळे १० फेब्रुवारी १९३८ रोजी पुण्याहून 'साप्ताहिक मराठवाडा' सुरू केला. या साप्ताहिकाने मराठवाड्याच्या वैचारिक जीवनात एक नवीन कालखंड सुरू झाला. २-३ अंक प्रसिद्ध होताच निझामांची त्यावर नजर पडली आणि ते बंद करण्यात आले. मात्र, वाघमारेजींनी बंदी हुकूमातील नाव वगळून

दरवेळी नवनवीन नावांनी मराठवाडा सुरू ठेवला. एका वर्षात मराठवाडा, नागरिक, संग्राम, रण दुंदुभी, समरभूमी, हैदराबाद, स्वराज्य, मोगलाई, कायदेभंग, सत्याग्रह, कायाकल्प, संजीवनी अशा निरनिराळ्या नावांनी साप्ताहिकाचे संपादन–प्रकाशन केले आणि मराठी जनतेला संस्थानी राजवटीविरुद्ध स्वातंत्र्य संग्रामाला उद्युक्त केले. वृत्तपत्रे चालविण्यासाठी त्यांना करावा लागलेला असा संघर्ष वृत्तपत्रीय क्षेत्रात अद्वितीय मानावा लागेल. केवळ दहा महिन्यांच्या छोट्याशा कालखंडात अकरा साप्ताहिके बंद पाडण्याचा निजामाचा 'विक्रम' आणि तेवढ्याच हिरिरीने नावे बदलून पुन्हा पुन्हा त्यांचे संपादन–प्रकाशन करणे हाही विक्रमच. वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी आणि जनतेत विचारजागृती करण्यासाठी एवढा निकराचा संघर्ष, एवढ्या चिकाटीने केल्याचे क्वचितच उदाहरण सापडेल. या संघर्षात ते मागे हटले नाहीत, थांबले नाहीत आणि हताशही झाले नाहीत. खडतर परिस्थितीतही त्यांनी मराठवाड्यात राजकीय विचारांच्या पायाभरणीचे भक्कम कार्य केले आणि मराठवाड्यातील जनतेची अस्मिता जागृत केली. हैदराबाद संस्थानची सरंजामी सत्ता अधिकच अमानुष बनली होती. आधुनिकतेपासून अनेक योजने दूर असलेल्या अशा राजवटीला हलवणे केवढे महत्प्रयासाचे काम होते याची आज कल्पनाही येऊ शकणार नाही. श्री. वाघमारेजींनी आपल्या धारदार लेखणीने आणि राष्ट्रीय विचाराने त्या राजवटीला केवळ अस्वस्थच केले नाही तर तिला प्रचंड हादरे दिले. जनतेत चैतन्य जागृतीबरोबरच नागरिक स्वातंत्र्य, मातृभाषेतून शिक्षण आणि मराठी भाषेची सुरक्षितता याविषयीचे विचार त्यांनी पत्रातून मांडले. मराठी भाषेविषयीचे प्रेम, आत्मीयता त्यांच्या मनात फार मोठ्या प्रमाणात होती. त्यासाठी ते निरंतर झगडत राहिले.

श्री. वाघमारेजींची प्रतिपादनशैली अत्यंत स्पष्ट आणि रोखठोक होती. अलंकार किंवा सजावट यांच्या ते भरीस पडत नसत. तर्कशुद्ध मांडणी आणि पुराव्यासह केलेला युक्तिवाद हे त्यांच्या विवेचन पद्धतीचे प्रमुख गुण होते. लोकांच्या मनात प्रस्थापित अन्याय्यी सत्तेविरुद्ध तीव्र प्रक्षोभ वाढविणे हे त्यांच्या प्रचाराचे उद्दिष्ट असले तरी, त्यासाठी त्यांनी असत्याचा किंवा अतिशयोक्तीचा आश्रय घेतला नाही. आपला युक्तिवाद ठामपणे मांडून परिस्थितीचे अचूक दर्शन घडविण्यासाठी सरकारचीच आकडेवार माहिती त्यांनी अनेक ठिकाणी उपयोगात आणली आहे. मोराची पिसे लावलेला डोंबकावळा, हैदराबाद सरकार व मराठी, कायदेभंगाला आव्हान, संग्राम सुरू झाला, कारागृहाचे दरवाजे उघडा, सत्याग्रह सुरू झाला, तरुण वर्ग काय करणार ? इत्यादी त्यांचे लेख नित्य स्मरणात राहणारेच आहेत.

अशा या महान व्यक्तिमत्त्वास आधुनिक मराठवाड्याचे लोकहितवादी उपाधी देणेच सार्थ वाटते. एक संघर्षशील, विक्रमशील पत्रकार–संपादक या नात्याने वाघमारेजी यांची जीवनदृष्टी ही खरोखरच प्रादेशिक वृत्तपत्रास एक नवा आकार देणारी ठरली. अर्धसाप्ताहिक मराठवाडा दैनिक म्हणून १५ ऑगस्ट १९६८ रोजी सुरू झाले. याच्या एक दिवस आधी म्हणजे १४ ऑगस्ट १९६८ रोजी वाघमारेजी पंचतत्त्वात विलीन झाले. जे स्वप्न पाहिले होते त्याची पूर्तता पाहण्याआधीच ते दीर्घ विश्रांतीत गेले. मराठवाडा दैनिकाच्या पहिल्या अंकाची मुख्य बातमी त्यांच्या निधनाचीच होती. यास काय म्हणावे हे शब्दात न मांडण्याजोगेच आहे.

# अण्णांच्या शब्दांची कावड

**अनुजा परमेश्वर बोराडे,** बी. एस्सी. तृतीय वर्ष

**'मराठवाडा' हे** नाव उच्चारले की, आपणास आठवतो तो मराठवाडा मुक्तीसंग्राम आणि आपल्या तेजोवलयाने गुलामगिरीचा अंधकार दूर करुन स्वातंत्र्यरुपी प्रकाश प्रदान करणारे स्वामीजी. त्याचबरोबर 'दैनिक मराठवाडा'च्या माध्यमातून महाराष्ट्रातील मानवी चेतना जागृत करणारे, ज्यांच्या नावातच अनंतत्व आहे असे शब्दयोगी आदरणीय कै. अनंतरावजी भालेराव.

कै. अनंतरावजी भालेराव म्हणजे निश्चितच एक विलक्षण व्यक्तिमत्त्व. त्यांनी आपल्या लेखणीसार्थ्याने या दैनिकास संपूर्ण महाराष्ट्रात अजरामर केले. उतरत्या वयामध्ये माणसाला शारीरिक व मानसिक दृष्टीकोनातून निवृत्ती प्राप्त होत असते. अशी निवृत्ती स्वीकारणाऱ्यास आपण सामान्यच म्हणावे. शरीर कितीही दुय्यम, टाकाऊ आणि नाशवंत असले तरी मनाचे, आत्म्याचे आणि बुद्धीचे एकूण एक व्यवहार शरीराद्वारेच व्यक्त होतात. त्यामुळे नाही म्हटले तरी शरीराचे महत्त्व ठसत जाते. परंतु कै. अनंतराव याला अपवादच म्हणावे लागतील. अशा परिस्थितीत अनेकांनी कै.अनंतरावजींना मनोरंजनाच्या वेगवेगळ्या विधा सांगितल्या. तेव्हा त्यांनी तसा थोडासा प्रयत्न करुन पाहिला, परंतु त्यात त्यांचे मन रमलेच नाही. त्यांना चांगलेच माहीत होते की, आपल्याला लिहिण्या-वाचण्यापलीकडे काहीच येत नाही. मनाच्या आवडी-निवडीही साचेबंद होऊन गेल्या आहेत. अशावेळेस थोडासा न्यूनगंड निर्माण होऊन लघुत्वाची जाणीव अधिक बोचरी बनते. परिणामी निष्क्रियता व आत्मविश्वासाचा अभाव वाढतो अशा प्रसंगी कै. अनंतरावजींना रामदासांच्या शब्दांची आठवण येते, ते म्हणतात, ''दिसामाजी काहीतरी लिहावे, प्रसंगी अखंडित वाचीत जावे.'' यातले 'काही तरी' महत्त्वाचे.

पूर्वी संपादकीय स्तंभातून 'आम्ही' चा आयता माथा लाभला होता. आता वरील 'काही तरी' हा धागा पकडून त्यांनी 'सदर' लिहिण्याचा मानस केला. संपादकीय लिहिताना काही बंधने पडतात. 'सदर' लिहिताना ही बंधने नसतात. पुष्कळ मोकळे व स्वैर लिहिता येते. म्हणून त्यांनी 'सदर' लिहिण्याचे ठरविले.

या सदराला अनंरावजींनी 'कावड' असे नाव दिले. कावड या शब्दाने माझ्या मनात फार मोठा गोंधळ निर्माण केला. मी विचारसागरातून बुद्धीरुपी नावेने बाहेर पडण्याचा प्रयत्न केला आणि शोधकर्ता झाले. तेव्हा अनंतरावजी याचे विवेचन करताना म्हणतात, ''कावड या शब्दाचे संत एकनाथांच्या चरित्राशी साहचर्य आहे. आपल्याकडे अशी समजूत पूर्वापार चालत आली आहे की, पुण्यसंचयासाठी चारी धामांची तीर्थयात्रा करावी, काशीला गंगोदकाची कावड भरावी व ती खाली दक्षिणेत रामेश्वरापर्यंत नेऊन रामेश्वराच्या चरणी रिचवावी. यातील पाप - पुण्याचा  भाग सोडला तर भारतासारख्या खंडप्राय देशाची एकात्मता साधण्याचा हा छोटासा प्रयत्न होता असे मानता येईल. या संकेतातील व्यापकता

महत्त्वाची. नाथांनी काशीला भरलेली कावड रामेश्वरापर्यंत न नेता मध्येच एका गाढवाची तहान भागविण्यासाठी रिचवली. त्या पशूच्या ठायी नाथांना त्यांचा परमेश्वर आढळला. कावड आणि संत एकनाथ यांचा पहिला संबंध तो असा. दुसरा संबंध खुद्द पैठणमधलाच. नाथांच्या घरी एक मोठा रांजण होता. श्रीखंड्या गोदावरीच्या पाण्याच्या कावडी आणून तो रांजण भरीत असे. यातून पुढे संकेत असा रुढ झाला की, श्रीखंड्याची अखेरची कावड पडल्याखेरीज हा रांजण भरीत नाही. कै. अनंतरावजी म्हणतात, ''अशा अनेक कल्पनांशी व भावभावनांशी मला काही कर्तव्य नाही. श्रीखंड्याचे श्रम आणि त्यातून निर्माण होणारे पूर्णत्व मला महत्त्वाचे वाटते.''

'कावड' शब्दाविषयी ते पुढे म्हणतात, 'हल्लीच्या पिढीतील पुष्कळांना माहीतही नसेल आणि ते बरोबरही आहे. आता घरोघरी पाण्याचे नळ आले आहेत. पाणी शेंदणे, ओढणे अगर भरणे या क्रिया आता बाद झाल्या आहेत. पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्थेत फरक पडला आणि पूर्वी रुढ असलेली शब्दसृष्टी नाश पावली. शब्दांना व भाषांनाही माणसाप्रमाणे उत्पत्ती, स्थिती आणि लय असतात. जीवन बदलत आले तशी भाषाही बदलत आली. या वहिवाटीत अनेक शब्दं मरण पावले तर अनेक नव्याने जन्माला आले. थोडे अंतर्मुख होऊन सिंहावलोकन केले तर अनेक शब्दांचे मृत्यू लक्षात येतात. 'जणू अज्ञात सैनिकांच्या स्मशानात आपण उभे आहोत.'

कै. अनंतरावजीचे 'कावड' या शब्दावरुन शब्दांच्या अवस्थेतील झालेला बदल मनाला उद्विग्न करुन सोडणारा आहे. खरोखरच आज ग्रामीण भागातील ओसरी, ढाळज, माजघर, लादणी, वावर, खळे, मदन आदी अनेक शब्द मानवाच्या मनमस्तिष्कातून आणि शब्दकोशातून बाद होताना पाहून आत्यंतिक दु:ख होते. परंतु कै. अनंतरावजींच्या शब्दातच सांगायचे झाले तर, ''जे मरण्यासारखे आहे ते मरु दिले पाहिजे. हा सृष्टीचाच नियम आहे. या अशा पडझडीची खंत बाळगून चालणार नाही.'' पण उत्पत्तीच्या आनंदाबरोबरच विनाशाचे दु:खही तेवढेच महत्त्वाचे हे एकप्रकारचे द्वन्द्वच आहे. उत्पत्तीला विनाश हाच पाया असतो. म्हणूनच अनंतरावजी म्हणता, 'नित्य बदलणाऱ्या अशा विश्वात शब्द मरण पावत असतील आणि भाषा नष्ट होत असतील तर ते सर्जनाच्या नियमाला धरुनच आहे. परंतु प्रौढ, परिपक्व, प्रगल्भ मानवी संस्कृतींना वर्तमान आणि भविष्यकाळाप्रमाणेच भूतकाळही असतो. कवीने म्हटलेच आहे. 'पूर्व दिव्य जयांचे, त्यांना रम्य भावी काळ.' पुष्कळदा वर्तमानापेक्षा भूतकाळच ज्वलंत असतो. भाषा ज्या शब्दांच्या बळावर ऐश्वर्यसम्पन्न बनत असतात ते शब्दही काळाचा मारा चुकवून भाषेच्या कोठारांचे भूषण बनतात.

खरोखरच आज मराठीतील अनेक ओव्या, गाणी, शब्द लुप्तप्राय होताना आपल्याला दिसतात. अशाप्रसंगी कै. अनंतरावजींची कावड हा शब्द मनात शब्द आणि भाषा याविषयीच्या विचाराचे वादळ निर्माण करते. 'कावड' या सदरेच्या माध्यमातून जनमानसातील भल्या-बुऱ्या वृत्ती-प्रवृत्तीविषयीचे विचार व्यक्त होताना दिसून येतात कावड ज्याप्रमाणे पाण्याची पूर्तता करते त्याचप्रमाणे शब्दांची कावड समाजामध्ये विचारांची निश्चितच पूर्तता करते आणि त्यांच्या सदरेस 'कावड' हेच नाव सार्थ ठरते.

# गांधी आमचा कोण लागतो ? अण्णांच्या परिप्रेक्ष्यातून

**शेख अफशाईम शेख मुनीर,** बी.एस्सी. द्वितीय वर्ष

**बऱ्याच दिवसापासून** कै. अनंतराव भालेराव (अण्णा) यांच्या विषयी 'काहीतरी' लिहावे असे वाटत होते. पण ते 'काही तरी' काय असावे याविषयी मनात विचार कल्लोळ सुरू झाला. कारणही तसेच होते ते असे, मी नवीन पिढीतली, इतिहासापासून थोडीफार दूर असलेली. कारण काहीही असो पण मी मनात ठरवले की, अण्णांविषयी 'काही तरी' लिहावे. म्हणून मी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात त्यांच्याविषयीचा पुस्तकांचा शोध घेताना समग्र अनंतराव भालेराव-खंड दुसरा हा निशिकांत भालेरावजी संपादित ग्रंथ माझ्या हाती लागला. आणि मी वाचती झाले. तेव्हा निशिकांतजींनी त्यांच्या मनोगतात म्हटल्याप्रमाणे अण्णांचे 'शब्दबाण' माझ्या हृदयाचा वेध घेत मनात विचारांचे वादळ निर्माण करीत होते. खरोखरच त्यांचे लिखाण धारदार, सडेतोड, रोखठोक आणि मानवाला व्यापक दृष्टी प्रदान करुन समाजाकडे उघड्या डोळ्याने पाहण्याचा दृष्टीकोन प्रदान करणारे आहे. तर या ग्रंथातील हा लेख माझ्या मनाला स्पर्शून गेला त्या विषयी मी येथे लिहीत आहे.

गांधी आमचा कोण लागतो ?

३० जानेवारी १९४८ हा दिवस संपूर्ण जगालाच एक प्रचंड धक्का देऊन गेला. या दिवशी गांधीजींची हत्या झाली. आणि संपूर्ण जग शोकसागरात बुडून गेले. जगभरातून बापूंना शब्दसुमनांनी आदरांजली वाहण्यात आली. त्यामध्ये सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ, आईनस्टाईन यांनीही "Greatest in the world" या शब्दात गांधीजींना आदरांजली वाहिली आणि मलाही पहिल्यांदा येथे प्रश्न पडतो गांधी आमचा कोण लागतो ? तसा गांधी जगाचाही कोण लागतो ?

अण्णांनी या लेखात उमरी बँकेवर हल्ला करुन ३१ जानेवारीच्या सकाळी देवसरीच्या सीमेवर आल्यानंतरची घटना वर्णित करताना म्हणतात, मोठी कामगिरी फत्ते केल्याचा आनंद आणि अभिमान निथळत असताना, आपल्याच मस्तीत उमरखेडला जात असताना शेतकरी शेतमालाच्या गाड्या परत घेऊन जाताना दिसू लागले. त्यांना परत का येत आहात ? मोंढा बंद आहे काय ? असे विचारले असता, त्यांनी बापू गेले म्हणून मोंढा बंद आहे असे सांगत असताना त्यांच्या मुखातून शब्दांची गर्दी बाहेर पडावयास तयार नव्हती. इतकी शोकाकूल अवस्था त्यांना दिसली. ते ऐकूण आपले सर्वस्वच गेले, संसार अक्षरश: उघड्यावर पडले आणि आपण निराधार झालो अशा शोकविव्हळ अवस्थेत त्यांच्या मनाला प्रश्न स्पर्शून गेला तो म्हणजे गांधी आमचा कोण होता ? आमचा तो कोण लागतो ? कशासाठी आपण एवढे हादरुन गेलो व शोकमग्न झालो आहोत ? अण्णांना पडलेले हे प्रश्न म्हणजे 'हुतात्मा दिनाच्या' दिवशी आपल्यालाही पडल्याशिवाय राहत नाहीत.

अण्णा पुढे लिहिताना अजून एक घटना उद्धृत करतात ती अशी, गांधीजी गेल्यानंतर काही वर्षांनी अमेरिकेतील निवडक लघुकथांचा एक प्रातिनिधिक संग्रह प्रकाशित झाला होता. त्यात एक कथा होती. एका तरुण जोडण्याला गांधींजी गेल्याची वार्ता कळाल्यानंतर त्यातील तरुणी अत्यंत उदास झाली. तिची अवस्था पाहून तिचा पतीही अस्वस्थ झाला. दोघांचेही कशातच लक्ष लागेना. भारतात जन्मलेल्या व्यक्तींचा अमेरिकेतील व्यक्तीशी काहीच संबंध

नसताना कशी काय शोकाकूल होऊ शकते ? गांधीजी त्यांचे कोणीही नव्हते. अशा अवस्थेत नातीगोती दूर होऊन ख्रिस्त आणि गांधी त्यांचे नातलग बनतात म्हणूनच की काय त्या जोडप्याची मुलगी म्हणते, ''गांधीसाठी आपण काहीही करु शकत नाही. एव्हाना आपल्याला ते कळतही नाहीत. परंतु ते शाकाहारी असल्यामुळे यापुढे मी मांसाहार करणार नाही. माझा मगदूर एवढाच मी गांधींची उतराई होईल.'' तेव्हा मलाही प्रश्न पडतो गांधीजी त्यांचा कोण लागतो ? आज २१ व्या शतकात अनेक अत्याधुनिक सोयीसुविधा उपलब्ध आहेत. त्यांचा संवाद, वार्तालापासाठी अनेक यंत्रे व त्यातील गोष्टी ज्याला आपण 'सोशल मीडिया' असे म्हणतो उपलब्ध असतानाही आज आपण एकमेकांजवळ असूनही फार दूर गेलेलो आहोत असे चित्र उभे झालेले दिसते. त्याकाळी अशी साधने उपलब्ध नसतानांही भावभावनाच्या तरल विश्वामध्ये गांधीजी अमेरिकेपर्यंत सहज वावरताना दिसतात. असे गांधीजी त्यांचे कोणीतरी लागतात पण हेच गांधींजी आजच्या युगात व जगात आपले कोण लागतात ? हा प्रश्न मनाला भेडसावतो.

गांधीजींच्या हत्येचा जगावर परिणाम झाला तसा तो पाकिस्तानवरही चांगल्या व वाईट अर्थाने परिणाम झाला व प्रतिक्रियाही दोन्ही प्रकारच्या आल्याच्या दिसतात. बापूजी गेल्यानंतर पाकिस्तानच्या घटना समितीत सहवेदना व्यक्त करणारा ठराव मांडला गेला. त्याकाळचे पंतप्रधान लियाकत अली खान, ख्वाजा नजिमोद्दीन यांनी गांधीजींचा उल्लेख 'महात्मा' म्हणून केला व थोर मानवाचा अंत झाल्याबद्दल हळहळ व शोक व्यक्त केला. तेव्हा बॅ. जिना अध्यक्षस्थानी होते. त्यांना आपल्या शिष्यांनी गांधीजींना महात्मा म्हटलेले आवडले नाही. कारण बॅ. जिना गांधीजींना आपला प्रतिस्पर्धी मानत, गांधीविषयी त्यांच्या मनात असूया होती. त्यामुळे त्यांनी स्वत: शोक संदेश न पाठवता सेक्रेटरीला तो पाठवायला सांगितला व त्यातही 'हिंदूस्तानचा एक नेता गेला' असा उल्लेख केला. त्याचबरोबर मियाँ इफ्तिखारोद्दीन भारताकडे निघाले. पेशावरच्या विमानतळावर बापूंच्या निधनाची वार्ता माहिती नसलेल्या सुशीला नायर यांची भेट झाली अन् त्यांना शोक अनावर होऊन ते म्हणाले, 'हम खत्म हो गये, मेरा सबकुछ चला गया' असे म्हणून ओक्साबोक्सी रडू लागले. अण्णांनी उद्‌धृत केलेल्या या घटनेतून भूमीपासून विलग झालेली पण गांधींजीवर मनापासून प्रेम करणारी माणसे पाकिस्तानातही होती. गांधी नावाचं हे अजब रसायन नेमकं कसं होतं हे आजही आपणास कळालं नाही म्हणून प्रश्न पडतो गांधी आमचा कोण लागतो ?

अण्णा पुढे म्हणतात, बंगालधील दंगली झाल्यावर बापूजी तेथे गेले. तेथील मंदिरात मूर्तींची प्रतिष्ठापना करून अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. अनेक अत्याचार पीडित स्त्रीयांना मंगळसूत्र इत्यादी देऊन त्यांना सौभाग्य परत दिले. तेव्हा त्यांच्यावर हिंदूत्ववादी म्हणून टीका झाली. तर दिल्लीमधील मशिदीचा व दर्ग्याचा पुनरुद्धार केला. तसेच मेहोरोलीचा हजरत चिश्तीचा दर्गा पूर्ववत केल्यानंतर त्यांच्यावर मुस्लिमधार्जिणे म्हणून टीका केली. बिहारमध्ये जातीय दंगलीत बिहार काँग्रेस प्रदेशचे अध्यक्ष अन्सारी नावाचे तरुण गृहस्थ हिंदूच्या घरावर हल्ला करण्यासाठी जाणाऱ्या मुस्लिमांना अडवीत असताना मारल्या गेला. तेव्हा गांधीजी त्यांच्या पत्नीला भेटण्यासाठी गेल्यावर ती संतप्त होईल व खूप रडेल अशी कल्पना होती. ती रडली पण गांधीजींना म्हणाली, ''बापू मी तुमची मुलगी आहे. तुम्हाला शोभेल असेच वागले पाहिजे. गांधींच्या जावयाला याहून वेगळे मरण कसे काय शोभले असते ?'' गांधीजींनी प्रार्थनासभेत या धीरोदात्तेचा गौरव केला.

हे सर्व वाचल्यानंतर कुणी बापूंना हिंदू, कुणी

मुस्लिम म्हणून हिणवले असेल. पण गांधीजी नेमके कोण होते ? अत्याचार ग्रस्त स्त्रीयांना सौभाग्यलेणं देणारे मंदिराचा जीर्णोद्धार करणारे हिंदू होते काय ? किंवा मशिदी व दर्ग्यांचा पुनरुद्धार करणारे मुस्लिम ? पण याहीपेक्षा ते वेगळे म्हणजे भारतातील कोणत्याही जातीधर्मातील मुलीने पिता मानावे इतके मानवीयता जपणारे महामानव निश्चितच होते. एवढे वाचूनही काहीही न समजलेले असे नेमके गांधी आमचे कोण होते ? हा प्रश्न पुन्हा निर्माण होतोच. म्हणून अण्णांना या प्रश्नाच्या उत्तरासाठी कुसुमाग्रजांची अखेर कमाई ही कविता आठवते ती अशी,

*मध्यरात्र उलटल्यावर*
*शहरातील पाच पुतळे*
*एका चौथऱ्यावर बसले*
*आणि टिपे गाळू लागले*
*ज्योतिबा म्हणाले.*
*शेवटी मी झालो*
*फक्त माळ्यांचा*
*शिवाजीराजे म्हणाले,*
*मी फक्त मराठ्यांचा,*
*आंबेडकर म्हणाले,*
*मी फक्त बौद्धांचा,*
*टिळक उद्‌गारले,*
*मी तर फक्त*
*चित्पावन ब्राह्मणांचा*
*गांधींनी गळ्यातला*
*गहिवर आवरला*
*आणि ते म्हणाले,*
*तरी तुम्ही भाग्यवांन*
*एकेक जात – जमात तरी*
*तुमच्या पाठीशी आहे.*
*माझ्या पाठीशी मात्र*
*फक्त सरकारी कचेऱ्यातील भिंती !*

ही कविता काळजाला भिडून मन सुन्न करणारी व विचारप्रवण करणारी आहे. खरोखरच आज आपण या महापुरुषांना आपल्या जातीपुरतेच मर्यादित करून त्यांची प्रतिमा खुंटित करण्याचा निरंतर प्रयत्न करतो आहोत. त्यामुळेच समाजात आज चळवळी उभ्या न राहता झुंडशाही माजलेली आपल्याला दिसून येते. जातीच्या नावावर राजकारण करून आपण आपला स्वार्थ शोधू पाहत आहोत. आणि त्यासाठी आपण या महापुरुषांच्या नावाचा गैरवापर करत आहोत. जे आपल्या राष्ट्राचे गौरव आहेत त्यांना आपण जातीचे गौरव मानून धन्यता मानतो आहोत. यातही बापूजींचे दुर्दैव ते किती मोठे की कुसुमाग्रज म्हणतात. ''त्यांना हिंदूत्ववादी मानणारे मुस्लिम स्वीकारत नाहीत आणि मुस्लिमधार्जिणे मानणारे हिंदूही स्वीकारत नाहीत. गुलामीच्या जोखडातून मुक्त करुन स्वातंत्र्य प्राप्त करुन देणारे, समाजातील अनेक वाईट चालीरीतींना दूर करणारे, दुसऱ्याच्या दु:खाला स्वत:चे दु:ख मानणारे, मानवताधर्माचे पालन करणारे गांधींजी कचेऱ्यातील व शासकीय कार्यालयातील भिंतीपुरतेच मर्यादित राहिले. आपल्या घराच्या भिंतीवर मात्र त्यांना स्थान प्राप्त होऊ शकले नाही. म्हणूनच पुन्हा एकदा अण्णांप्रमाणे मलाही प्रश्न पडतो गांधी नेमके कोणाचे कोण लागतात ?

पहा, तुम्हाला या प्रश्नाचे उत्तर मिळते काय ? अण्णा खरोरच तुमच्या लेखणीत एक विलक्षण सामर्थ्य आहे. विषयाची वस्तुनिष्ठता, त्याची प्रगल्भता, आशय या सर्व गोष्टी अतिशय सरळ व साध्या शैलीत मांडण्याचं व ते वाचकांच्या मनी उतवरण्याचं तुमच्या शब्दबाणाचं कसब वेगळच आहे. अण्णा आजच्या पत्रकारितेलाच नव्हे तर तरुण पिढीलाही तुमची आणि तुमच्या शब्दबाणांची आवश्यकता आहे.

## संस्कृत भाषेतील वृत्तपत्र –

# सुधर्मा

हर्षल पंडितराव पाटील

**आता जंगलं** वृक्षांनी परिपूर्ण झालेली आहेत, परंतु एकेकाळी फक्त एक वृक्ष होता. तो वृक्ष टिकविण्यासाठी आपण खूप सारे श्रम करतो. परिश्रमांती त्याला आपल्याला टिकविता येते. पण परिश्रम न घेताच आपण केवळ भावनावश होऊन वाणीनेच टिकविण्याचा प्रयत्न केला तर ते मृत पावणारच अशीच परिस्थिती संस्कृत भाषेची, जो त्या एका जुन्या वृक्षाप्रमाणेच आहे. या भाषेतून निर्माण होणाऱ्या नियतकालिकांची काय परिस्थिती असेल ? हा विचारही मनाला उदिग्न करणारा आहे. तर आज अमृतवाणी, गीर्वाणवाणी, देवभाषा म्हणून संबोधल्या जाणाऱ्या संस्कृत भाषेतील अतिशय जुने असणाऱ्या 'सुधर्मा' या वृत्तपत्राविषयी आपण थोडक्यात जाणून घेऊ या.




'सुधर्मा' हे वृत्तपत्र इ. स. १९७० पासून संस्कृत भाषेत प्रकाशित होणारे वृत्तपत्र आहे. हे वृत्तपत्र मैसूर येथून 'बिलेन' (Bylane) प्रकाशनातर्फे प्रसिद्ध होते. मैसूर हे कर्नाटकातील सुप्रसिद्ध शहर आहे. ज्यावर बऱ्याच राज्यकर्त्यांनी अधिराज्य गाजविले आहे. ज्यामध्ये अनेक हिंदू – मुस्लिम राजांचा समावेश आहे. त्यानंतर ब्रिटिशांचा काळ. अशा अनेक स्थित्यंतरातूनही हे शहर आपल्या वैशिष्ट्यांसह टिकून राहिले व उजळतच राहिले. या शहराने भगवान शिव आणि विष्णू यांच्या ५० हून अधिक मंदिरांच्या माध्यमातून स्वत:चे प्राचीनत्व आणि स्थापत्य कला जपलेली आहे. या शहरात 'ओडियार घराणे' हे सुप्रसिद्ध घराणे. शिक्षणाचे महत्त्व जाणणाऱ्या या घराण्याने बऱ्याचशा संस्था स्थापन केल्या. त्यामध्ये 'महाराजा संस्कृत महाविद्यालय' हे भारतातील सर्वात जुने संस्कृत महाविद्यालय आहे. के. एन. वरदराजा अयंगार यांनी वृत्तपत्र चालू करण्यासाठी जे पहिले पाऊल उचलले ते या महाविद्यालयामधूनच. या वृत्तपत्राच्या उभारणीमध्ये या महाविद्यालयाचे मोठे योगदान आहे. ज्याकाळी भाषेलाच महत्त्व नव्हते त्या भाषेतून वृत्तपत्र निर्मिती करणे आणि प्रचार, प्रसाराची माध्यमे नसताना ती वाचकांपर्यंत पोहचविण्यासाठी मनुष्यबळ (मार्केटिंग टिम) आणि आर्थिक साहाय्य (बजेट) नसतानाही श्री. वरदराजा अयंगार यांनी स्वविद्वत्ता, स्वकर्तृत्व आणि भाषेवरील अतोनात प्रेम या जिद्दीवर लीलया हे कार्य केले.

''आज आपल्या भारतामध्ये शंभरपेक्षा अधिक प्रकाशने संस्कृत भाषेमध्ये पाहावयास मिळतात. असेच एक 'सुधर्मा' नावाचे सर्वात जुने संस्कृत

दैनिक आहे. ''साधनांची अपरिहार्यता असूनही आर्थिक परिस्थिती नसल्याकारणाने उपलब्ध साधनांच्या माध्यमातून बिकट परिस्थितीतही हे वृत्तपत्र आजतागायत यशस्वीरीतीने वाटचाल करीत आहे.'' असे 'सुधर्मा'चे मुख्यसंपादक नागराजाराव म्हणतात.

के. एन. वरदाराज अयंगार यांच्या सूनबाई, जयलक्ष्मी म्हणतात, ''तुम्ही मातीच्या घरात प्रिंटिंग प्रेस चालविलेली ऐकले आहे का ? माझे सासरे के. एन. वरदराज अयंगार यांनी ती मातीच्या घरात चालविली. वृत्तपत्र विक्रेत्यांनी या वृत्तपत्राच्या विक्रीसाठी नकार दिल्यामुळे हे वृत्तपत्र त्यांनी वाचकांना पोस्टाने पाठविले''. यावरुन हेच लक्षात येते की, कोणतीही कृती अजरामर होण्यासाठी साधनांपेक्षा जिद्दीची आवश्यकाता असते. ती जर तुमच्याजवळ असेल तर परिस्थिती कशीही असो विजय शेवटी तुमचाच होतो.

ही प्रिटिंग प्रेस सुरू करण्यासाठी वरदराजा अयंगार यांना अनेक लोकांनी प्रतिसाद दिला. त्यामागील धारणा किंवा भावना अशी होती की, संस्कृतभाषा ही दुर्लक्षित होता कामा नये, आणि आजसुद्धा याच भावनेने ही प्रेस चालू आहे. अयंगार यांचे सुपुत्र संपतकुमार म्हणतात, ''सुधर्मा सोबतच आम्ही बँकेचे विविध फॉर्म, लग्नपत्रिका, पावती पुस्तिकाही छापतो. आमची मिळकत किंवा जी काही कमाई आहे, ती आम्ही या प्रेससाठीच वापरतो. मी माझ्या वडिलांना वचन दिले आहे की, त्यांच्यानंतरही ही प्रेस तशाच पद्धतीने चालू राहील. ते वचन मी पाळले.''

महाराजा संस्कृत महाविद्यालयाचे वरिष्ठ प्रा. गंगाधर भट्ट जे 'सुधर्मा' चे नियमित वाचक आहेत, ते म्हणतात, ''१९७० चा कालावधी म्हणजे ज्यावेळेस संस्कृतभाषेला शिक्षणक्षेत्रातून वगळण्याचे कारस्थान रचले जाऊ लागले त्याला प्रत्युत्तर म्हणून अयंगार यांनी हे वृत्तपत्र सुरू केले. तसेच आकाशवाणीवर संस्कृत बातम्या सादर करण्यावरही त्यांनी भर दिला.''

चंदन गोडा सांगतात की, ''१९७० मध्ये संस्कृत हा विषय 'ग्रेड' तत्त्वावर विद्यार्थ्यांसाठी समाविष्ट केला होता. या कालावधीत संस्कृत अध्यापकांनी विद्यार्थ्यांना संस्कृत विषयाकडे आकर्षित करण्यासाठी बरेच प्रयत्न केले. १९७९ मध्ये संस्कृतभाषेला तृतीय भाषेचा दर्जा मिळाला अशा तत्कालीन परिस्थितीमध्ये जेथे भाषेलाच मान्यता असून नसल्यासारखी होती, येथे त्या भाषेत वृत्तपत्र काढणे म्हणजे अतिदुष्करच. अशा परिस्थितीतही अयंगार यांनी 'सुधर्मा' अतिशय नेटाने चालविले.''

नागराजा राव म्हणतात, ''मी सुद्धा संपूर्ण दिवस संस्कृत बोलू शकत नाही. मी कुणासोबत संस्कृत बोलणार ? जेव्हा मला संस्कृत बोलणारा (विद्वान) भेटतो तेव्हाच मी संस्कृत बोलतो. भारतामध्ये १०,००० संस्कृत अध्यापक असतील, पण संस्कृत ही म्हणावी तेवढी लोकप्रिय भाषा बनली नाही.''

सुधर्मासाठी कोणतीही पायाभूत सुविधा नव्हती. तसेच सरकारचे आर्थिक पाठबळ न मिळणे हे एक 'सुधर्मा'चे दुर्दैवच म्हणावे लागले. दोन पाने किंवा जास्तीत जास्त चार पाने एवढाच मोठा असलेले हे वृत्तपत्र आहे. ''या वृत्तपत्रासाठी दीड लाख रुपये मासिक खर्च होतो. जाहिरातींच्या माध्यमातून 'सुधर्मा'स जास्तीत जास्त दीड हजार रुपये एवढीच मदत मिळत होती.'' असे संपतकुमार सांगतात.

भाषा मग ती कोणतीही असो त्या त्या राज्याची, देशाची वैभव, गरिमा असते. १६०० हून अधिक भाषांच्या वैभवाने श्रीमंत असणाऱ्या आपल्या देशात आज अनेक भाषा लोप पावत असल्याचे दुर्दैवी

चित्र दिसत आहे. भाषा ही केवळ भाषा नसून त्या त्या राज्याच्या, देशाच्या संस्कृतीचे द्योतक असते. इतकेच नव्हे तर मानवी स्वभाव, आचार – विचार इ. ना दर्शविणारी असते. एवढेच नव्हे तर प्रत्येक देशाची तत्कालीन परिस्थिती, स्थित्यंतरे इत्यादींच्या माध्यमातून इतिहासनिर्मिती होण्यास केवळ आणि केवळ भाषाच उपयुक्त ठरते. प्रत्येकाचा भूत, वर्तमान आणि भविष्यकाळ असणाऱ्या या भाषेविषयी केवळ सरकार दरबारीच नव्हे तर जनमानसातही अनास्था दिसून येते ही दुर्दैवाची बाब आहे. मातृभाषेत शुद्ध दहा वाक्ये बोलू न शकणारी अशी अनेक माणसे आजही समाजात सहजरीतीने पाहू शकतो. याचा अर्थ आपण नकळपणे आपल्या मातृभाषेचा ऱ्हास करीत आहोत हे वेळीच समजून घेणे आवश्यक आहे. जर मातृभाषेचीच इतकी बिकट अवस्था असेल तर सर्व ज्ञान परिपूर्ण, सर्वोत्कृष्ट तत्त्वज्ञान आणि अध्यात्माने परिपूर्ण, प्रगत विज्ञान इत्यादी अनेक विषयांनी परिपूर्ण असणाऱ्या, विदेशी विद्वानांनी जिचे माहात्म्य शब्दातीत आहे असे म्हणून गौरविलेल्या, विश्वातील सर्वोत्कष्ट व परिपूर्ण असणाऱ्या संस्कृतभाषेविषयी आपले अज्ञान असणे ही विचारप्रवण करणारी गोष्ट आहे. 'अभिज्ञान शाकुन्तलम्' हा ग्रंथ वाचून आनंदाच्या भरात त्या ग्रंथास डोक्यावर घेऊन नाचणाऱ्या विदेशी विद्वानाप्रमाणे संस्कृत भाषेत निर्माण होणाऱ्या 'सुधर्मा' सारख्या कृतींचे वाचन करुन आपणही आपल्या सर्वभाषा जननी, देवभाषा आणि वटवृक्षासमान असणाऱ्या या संस्कृतभाषेचे रक्षण, प्रवर्धन करु या.

भाषा लोकप्रिय बनली नाही हे भारतवर्षाचे दुर्दैवच म्हणावे लागेल. कारण एकेकाळी 'विश्वगुरु' अशी बिरुदावली या देशाला मिळण्यामागे संस्कृतभाषाच होती. विश्वातील जे उत्कृष्ट ज्ञान आहे ते केवळ आणि केवळ संस्कृत भाषेतच आहे. या भाषेची महती वर्णातीत आहे. अशा या भाषेवरील प्रेमापोटी वरदराजा अयंगार यांनी 'सुधर्मा' वृत्तपत्राची निर्मिती करुन ते अगदी नेटाने चालविले. त्यांच्या पश्चात त्यांचे सुपुत्र व सूनबाई हेही हे वृत्तपत्र चांगल्यारीतीने चालवत आहेत, परंतु गतवर्षी संस्कृत भाषेत निर्मित होणाऱ्या 'सुधर्मा' विषयी वृत्तपत्रातून, बातम्यातून व सोशल मीडियातूनही बंद होत असल्याच्या बातम्या येऊ लागल्या आणि मन उद्विग्न झाले. या भारतदेशात आज हजारो लोक संस्कृत जाणणारे किंवा बोलणारे आहेत. तरीही या वृत्तपत्रावर अशी का वेळ यावी ? यासाठी कोणीही काहीच केले नाही का ? शासन दरबारीही साहाय्य प्राप्त झाले नाही का ? कमी वाचक वर्ग असलेले हे वृत्तपत्र टिकवून ठेवणे का महत्त्वाचे आहे ? कोणी साहाय्य करो अथवा न करो. पण जर तुम्ही संस्कृतप्रेमी असाल तर या वृत्तपत्रास वाचविणे आवश्यक आहे. आज जरी हे वृत्तपत्र महत्प्रयासाने चालू असले तरी याला सुलभरीतीने चालविण्यासाठी आणि चिरकाल टिकविण्यासाठी आपणही प्रयत्न करणे गरजेचे आहे. के. एन. वरदराजा अयंगार, त्यांचे सुपुत्र संपतकुमार व सूनबाई जयलक्ष्मी यांना 'सुधर्मा' वृत्तपत्राबद्दल खूप धन्यवाद !

# आजची समाजमाध्यमे आणि वृत्तपत्र....

**मानसी अनंत कुलकर्णी,** बी.एस्सी. तृतीय वर्ष

**जगण्याच्या प्रचंड** वेगवान काळात अनेक समाजमाध्यमे संपर्क स्थळे निर्माण झाली आहेत. आंतरजालातून (इंटरनेट) खूप वेगवान घडामोडी – बातम्या आपल्यापर्यंत पोहचतात, ज्याची शहानिशा न करता पुढेही पाठविल्याही जातात. एखाद्या बातमीला इतक्या वेळा दाखवलं जातंय, आग्रहाने ठसवण्याचा प्रयत्न केला जातोय त्यातून विचार करण्याला अवसरच दिला जात नाही. जे दाखवलं जातंय आणि ते सांगताहेत तसंच खरं असल्याचे सांगितलं जातंय, भासवले जातंय. खरं – खोटं कळत नसल्याने विश्वासार्हतेचा प्रश्न अनुत्तरित राहतो.

फेसबुक, व्हाट्सअ‍ॅप, ट्विटर, इन्स्टाग्रॅम, यु ट्यूब, इत्यादी अशी वेगवेगळी माध्यमे आपल्या हाताशी आहेत पण याचा वापर कशासाठी करायचा हे स्वत:वरच आहे. असं सांगितलं जात असले तरी कमी अधिक अशा वेगवेगळ्या वयाच्या लोकांच्या हातात असलेली साधनं वापरताना असलेल्या खाजगीपणात कुठलाही निर्बंध नसल्याने त्याचे वेगवेगळे परिणाम आपल्यासमोर येताना दिसत आहेत. गांभीर्याने काही बाबी घेण्याची गरज असते पण, खूप वेळा तसं केलं जात नसल्याचं दिसतंय. मानसिक आजाराचे प्रमाणही वाढताना दिसत आहे. आपण आज जेव्हा या माध्यमांकडे पाहतो तेव्हा दिसणारं चित्रं आपल्या मनाला वेदना देणारं आहे. आपण पाहतोय की, या माध्यमांचा वापर सर्रास वाढदिवस, स्वत:च्या फोटो – व्हिडीओसाठी होताना दिसतोय. आपल्या फोटो ला (Like) लाईक किती मिळाल्या ते सतत बैचैन होऊन पाहत राहणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढत आहे.

इलेक्ट्रॉनिक माध्यमे टीआरपी वाढवण्याच्या नादात, ब्रेकींग न्यूज देताना त्याचे समाजमनावर होणारे परिणाम, मानवी मनावर उमटले जाणारे ओरखाडे या बाबी दुर्लक्षित होताना दिसत आहेत. सगळं आपल्या खिशात आहे म्हणण्याचे दिवस.... या काळातही वृत्तपत्रांचे महत्त्व टिकून असल्याचे आपण पाहतोय. भारतीय वृत्तपत्रांना २०० वर्षांचा इतिहास आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची होती. सामाजिक, न्यायिक, राजकीय परिवर्तन घडवून आणण्यासाठी जनजागृतीची भूमिका वृत्तपत्रांनी निभावली. भारतीय वृत्तपत्रांचे जनक राजाराम मोहन राय यांनी जाती – धर्माच्या आधारे सुरू असलेल्या दुष्ट रुढींना कुप्रथांना विरोध करणारे विचार वृत्तपत्रांतून मांडल्यामुळे १९२८ लार्ड बेटिंग ने सती प्रथेला बंदी घातली. कायद्याच्या समोर सगळे समान आणि न्यायदान व्यवस्थेचे स्वातंत्र्य ही रॉय यांची भूमिका पुढे अनेक चळवळीच्या नेत्यांनी मांडली. महाराष्ट्रातही अनेक वृत्तपत्रांनी विचार – भूमिका घेवून कार्य केल्याचे दिसते. बाळशास्त्री जांभेकरांनी दर्पण (१८३२) ची स्थापना अभ्यास व्हावा, ज्ञान, मनोरंजन, चालते वर्तमान कळविणे, योग्य मार्ग दाखविणे.

'सामाजिक सुधारणां'चा आग्रह धरत 'प्रभाकर', 'धुमकेतु', 'ज्ञानदर्शन', 'ज्ञानोदय', 'ज्ञानप्रकाश', 'सत्सार', 'निबंधमाला', 'केसरी', 'मराठा',

'सुधारक', 'दीनमित्र', 'मुकनायक', 'बहिष्कृत भारत' अशी अनेक वृत्तपत्रे निघाली. स्वातंत्र्यपूर्व काळापासून स्वांतत्र्योत्तर काळातही वृत्तपत्रांनी वैचारिक मते मांडल्याचे, व्यक्त केल्याचे दिसते. स्वातंत्र्योत्तर काळात प्र. के. अत्रे, वा. रा. कोठारी, ह .रा. महाजनी, द्वा. भ. कर्णिक, ठाकूर, अनंतराव भालेराव, गोविंद तळवळकर, गणतराव जाधव, अनंतराव पाटील, श्री ग. मुणगेकर, माधव गडकरी, चंद्रकात घोरडे, रंगा वैद्य, बाबा दळवी इत्यादी संपादकांनी महत्त्वपूर्ण कार्य केल्याच्याही नोंदी आहेत. १९८० नंतर वृत्तपत्रांनी नव्या आवृत्या निर्माण केल्या. त्यातून स्थानिक बातम्यांना जागा मिळू लागली. अनेक वृत्तपत्रांनी तरुण वाचकांसाठी पुरवण्या काढल्या. त्यात स्पर्धा परीक्षा ते तारुण्यातील उलथापालथ अशा वेगवेगळ्या विषयांना वृत्तपत्रांनी महत्त्वाचे स्थान दिले. आज 'सकाळ', 'लोकसत्ता', 'महाराष्ट्र टाईम्स', 'लोकमत' अशी अनेक वृत्तपत्रे नव – नव्या पुरवण्या निर्माण करुन सामाजिक जाणिवेच्या प्रश्नांबाबत व्यक्त होताना दिसत आहेत. स्त्रियांच्या प्रश्नांची उकल करण्यासाठी शेतकऱ्यांचे प्रश्न, शेतीमालाला हमीभाव, अल्प भूधारक, शेतमजूर, यांच्या जगण्याला उजागर करत त्यांना न्याय मिळावा, देशाचे – राज्याचे अर्थकारण कळावे म्हणून अर्थविषयक विचारांना वृत्तपत्रांनी आपल्या पुरवण्यात वाव दिल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांची जोपासना करताना विविध प्रश्नांनी थैमान घातलेल्या काळात स्वत:ला सजग आणि जागृत ठेवण्याबरोबर, आपल्याला सांगितलेलं, दिसणारं सत्य आहे का ? हे पडताळून पाहता येणं आवश्यक आहे. ते सत्य मुद्रित माध्यमांतून पाहता येवू शकते. काळाबरोबर स्वत:ला बदलत, जाणिवेचा परिघ विस्तारीत, व्यापकता स्वीकारून, नवे बदल मांडताना, सर्व सामाजिक स्थितंतरे आपल्या कवेत घेऊन, सर्वजणांचा आधार बनत पुढे जाण्याचा मार्ग वृत्तपत्रांनी स्वीकारला. त्यात अनेक उणिवा आहेत. काही वृत्तपत्रं काही पक्षांची मुखपत्रं झाल्याचेही दिसतंय. जाहीराती छापताना आशय, विषय, सामाजिकतेपेक्षा पैशाला महत्त्व दिल्याचेही दिसत असले तरी वृत्तपत्राची आवश्यकता आहे हे निदर्शनास येते.

आपल्याला पुन्हा पुन्हा लागणाऱ्या संदर्भासाठीही वृत्तपत्र उपलब्ध होऊ शकतात. आपल्याला आजही लोकहितवादीचे शतपत्रे वाचायला मिळतात. निबंधमालेतील निबंध, 'दीनमित्र' मधील लेख, चळवळी संबधीचे अनेक दस्तऐवज उपलब्ध होतात. आपल्याला वाचाव्या वाटणाऱ्या पुरवण्या कितीही काळानंतर वाचता येतात. या सगळ्यांमुळे जागतिकीकरणाच्या आणि जग जवळ आल्याच्या काळातही वृत्तपत्रांची मुळं तग धरुन दिसताहेत...

# कोरोनाच्या पावलांनी चीन महासत्तेकडे : वृत्तपत्रांच्या चष्म्यातून

**अमोल बिडवे,** बी.ए.तृतीय वर्ष

**वृत्तपत्रे ही** सामाजिक जडण-घडणीचे महत्त्वाचे माध्यम आहे. समाजाच्या सर्वांगीण विकास प्रक्रियेला प्रगतीशील बनविण्यासाठी वृत्तपत्रांचे फार मोठे योगदान आहे. समाजाला मार्गदर्शन करणारे, दिशा दाखविणारे वृत्तपत्र हे विचारांचे विद्यापीठ आहे. हे विद्यापीठ काळानुरूप इतर विद्यापीठांप्रमाणे क्षयास न जाता अपेक्षित बदलानुरूप नवचेतना धारण करीत केवळ माहितीच प्रदान न करता समाजात अपेक्षित बदल घडवितात. वैश्विकस्तरावर घडणाऱ्या घटना, घडामोडी आपल्यापर्यंत सहजगत्या पोहचविण्याचं कठीण कार्य लीलया करतात. एवढेच नव्हे तर या घटना आणि घडामोडींचा आपल्या देशावर आणि समाजमनावर होणारे परिणाम याविषयीही विस्तृतपणे ज्ञान प्रदान करतात. याचाच परिणाम म्हणून जगातील प्रत्येक व्यक्ती हा एक-दुसऱ्याशी भावभावनांच्या स्तरावर अगदी खोलपर्यंत जोडल्या गेलेला आपणास दिसून येतो. जगामध्ये कोणत्याही देशात घडणाऱ्या चांगल्या-वाईट घटना वृत्तपत्रांमुळे सामान्य माणसापर्यंत पोहचतात. भूंकप, महापूर, दहशतवादी हल्ले, सायबर क्राईम इत्यादी अनेक घटनांनी आजचे विश्व त्रस्त झाल्याचे चित्र आपल्याला दिसते आहे. अशा या कठीण प्रसंगी मानवतेच्या भावनेने (जी सर्व धर्मांचा मूलभूत पाया आहे.) एक देश दुसऱ्या देशाची सर्वतोपरी मदत करीत असल्याचेही आपल्या निदर्शनास येते. नव्हे आपणही आपल्या परीने साहाय्य करीत मानवता जपण्याचे कार्य करीत आहोत. पण ज्याप्रमाणे गव्हामध्ये कीडे असतात त्याचप्रमाणे अशा घटनांचा उपयोग आपल्या स्वार्थासाठी, उन्नतीसाठी करणारे देशही या जगात आहेत. एकमेकांवर कुरघोडी करण्याच्या उद्देशाने जगातील प्रथम क्रमांकाची महासत्ता होण्याच्या ईर्ष्येने आज काही देश वेगवेगळ्या प्रकारच्या युक्त्या लढवत आहेत. मग त्यासाठी कोणी अणुबॉम्बचा उपयोग करीत आहे तर, कोणी जैविक अस्त्रांचा, शस्त्र कोणतेही असो. पातळी कोणतीही असो, पण आपली स्वप्नपूर्ती झालीच पाहिजे असा अट्टहास काही देश करताना दिसून येतात. सद्यस्थितीत कोरोना विषाणूच्या माध्यमातून (ज्याला जैविक अस्त्र असे संबोधल्या गेले) चीन अमेरिकेसारख्या देशाला पराभूत करून महासत्तेकडे वाटचाल तर करत नाही ना! याचा अभ्यास वृत्तपत्रांच्या माध्यमातून करू या.

आज आपण सगळेच एका विसंगतीपूर्ण आणि तेवढ्याच विस्मयचकित करणाऱ्या अशा युगात जगत आहोत. हे युग विरोधाभासाचे आहे, अतिरेकाचे आहे. आणि झपाट्याने होणाऱ्या बदलांचे सुद्धा आहे. मानवी इतिहासाकडे नजर टाकल्यास दिसून येईल की, एवढ्या मोठ्या संख्येने लोक आरामाचे, आरोग्यपूर्ण, सम्पन्न आणि दीर्घ आयुष्य पूर्वी कधीही जगले नाहीत. पण असे असूनही मानवजातीला कधी नव्हे एवढी स्वत:च्या अस्तित्वाविषयी असुरक्षिततेविषयीची जाणीवही याच काळात होऊ लागलेली आहे. एवढ्या उंच कड्यावर उभे राहिल्यावर वाटावी तशी ही काहीशी जाणीव, ज्यामुळे मानवी वंशच नष्ट होईल अशा एखाद्या वातावरण बदलाच्या, अणुयुद्धाच्या किंवा

त्याहीपेक्षा वेगळ्या हिंसेची, मग ही हिंसा कोरोनाच्या माध्यमातून असू शकते. या कोरोनाचा आपल्या देशावर आणि जगावर झालेला आणि होणारा परिणाम पाहू या.

**कोरोना आणि चीन:-**

चीनमधील 'वुहान' शहरातून सुरू झालेला कोरोना विषाणूचा संसर्ग आता जगभरातील १४० हून अधिक देशांमध्ये पसरला आहे. या विषाणूमुळे लाखो लोकांना जीव गमवावा लागला आहे. मात्र जगातील कोरोनाचा संसर्ग झालेली पहिली महिला ठणठणीत बरी झाल्याचं वृत्त आहे. तब्बल एक महिन्याच्या उपचारानंतर ती बरी झाली. परदेशी माध्यमांनी या पहिल्या रुग्णाचा शोध लावल्याचा दावा केला आहे. उपचाराअंती बरे झाल्यानंतर या महिलेनं चीन सरकारवर निशाना साधताना म्हटले की, 'सरकारने लवकर पावलं उचलली असती तर इतक्या लोकांना आपला जीव गमवावा लागला नसता.' अमेरिकेतील 'वॉल स्ट्रीट जनरल' ने दिलेल्या वृत्तानुसार कोरोना विषाणूची लक्षणं दिसलेली सर्वात पहिली (पेशंट जीरो) रुग्ण ५७ वर्षीय 'वेई गायक्सिअन' आहे. ही महिला चीनमधील हुन्नान प्रांताच्या माशांच्या बाजारात मासे विकण्याचं काम करते. १० डिसेंबर २०१९ रोजी या महिलेने एका सार्वजनिक शौचालयाचा वापर केल्यानंतर तिला हा रोग झाला. ०१ डिसेंबरला वुहानच्या आरोग्य आयुक्तांनी सर्वात आधी या महिलेचं नाव कोरोना बाधित म्हणून जाहीर केलं होतं. सर्वात आधी कोरोनाचा संसर्ग झालेल्या पहिल्या २७ रुग्णांमध्ये या महिलेचा समावेश होता. या २७ रुग्णांमध्ये २४ जणांना संबंधित महिला ज्या बाजारात मासे विकत होती तेथेच संसर्ग झाला होता. यानंतर मात्र या विषाणूने चीनमध्ये मृत्यूचं थैमान घालण्यास प्रारंभ केला आणि हजारो लोकांचा जीव घेतला. चीननेही कठोर पावले उचलत या विषाणूला देशातील इतर प्रांतात पोहचू न देता वुहानपर्यंतच मर्यादित ठेवले. आजघडीला चीनमध्ये ८२,८८६ इतकी कोरोना रुग्णांची संख्या असून त्यापैकी ४,६३३ इतके मृत्यू झालेले असून उर्वरित ७८,९७७ रुग्ण बरे झाले आहेत.

**कोरोना आणि भारत :-**

सध्या जगभरात कोरोना विषाणूच्या साथीने थैमान घातले आहे. या साथीत जगभरात आतापर्यंत ३,८३३,६९७ इतके संक्रमित रुग्ण असून २६८,१११ इतके रुग्ण मृत पावले असून १,२८३,०२९ इतके रुग्ण बरे झाले आहेत. या साथीमुळे जगातील बलशाली सत्ता देखील हतबल झालेल्या दिसत आहेत. अगदी सूक्ष्म स्वरूपातील या विषाणूने परिस्थिती चिंताजनक केली आहे. या रोगाच्या वाढत्या प्रसारामुळे जगभरातील मानवी जिवंत राहणे हीच आपली प्राथमिकता आहे हे अधोरेखित करायला भाग पाडले आहे. साथीच्या प्रकारातील या विषाणूचा प्रादूर्भाव जगभरातील अनेक श्रीमंतापासून ते गरिबापर्यंत होतोय. जोपर्यंत या विषाणूचे स्वरूप, त्याचा प्रसार आणि व्याप्ती याचा ताळेबंद घालायच्या आतच या विषाणूने व्यस्त प्रमाणात पसरायला सुरूवात केली आहे. अजूनतरी या आजारावर लस बनविण्यात शास्त्रज्ञांना यश आलेले नाही. भारतात देखील कोरोनाची साथ पसरलेली आहे.

भारतातील केरळमध्ये कोरोनाचा पहिला रुग्ण आढळला असून तो तरुण चीनमधील हुआन विद्यापीठात शिक्षण घेत होता. तो भारतात परतल्यानंतर त्याची तपासणी केली असता तो पॉझिटिव्ह निघाला. त्यानंतर रुग्णालयात त्याच्यावर

उपचार होऊन बराही झाला आहे. तर भारतामध्ये कोरोनाचा पहिला बळी हा कर्नाटकातील कलबुर्गी येथील ७६ वर्षीय रुग्णाच्या रुपाने गेला आहे.

भारतामध्ये या विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी २२ मार्च रोजी एक दिवसाचा 'जनता कर्फ्यू' पाळण्याचे पंतप्रधानांनी आवाहन केल्यानंतर जनतेने त्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. त्यानंतर २४ मार्चपासून २१ दिवसांचा पहिला लॉकडाऊन, जो १४ एप्रिलपर्यंत होता. त्यानंतर १८ एप्रिलपासून ०३ मे पर्यंत दुसरा तर ०३ मे पासून १७ मे पर्यंत तिसरा लॉकडाऊन जाहीर करण्यात आला. या कालावधीमध्ये रुग्णाला वाचविण्यासाठी डॉक्टर्सनी आपल्या प्राणांची बाजी लावली. यात काही डॉक्टर्सना आपला जीवही गमवावा लागला. त्याचबरोबर पोलीस, सफाई कामगार इ. सर्वजण आपल्या जीवाची पर्वा न करता काम करीत आहेत. पण आपली जनता ती आपलीच जनता. यामुळेच तर आज भारतात कोरोना रुग्णांची संख्या ९२,९८२ एवढी झाली असून त्यापैकी १,७८३ इतक्या रुग्णांचा मृत्यू झाला असून १६,७७६ रुग्ण बरे झाले आहेत. मी लेख लिहीत असतानाची ही आकडेवारी आहे. यापुढे काय होईल सांगता येत नाही.

**भारतातील अस्थिरता आणि चीन :-**

कोरोना विषाणूच्या फैलावामुळे भारतातील बाजारपेठा बंद झाल्या. यामुळे भारतात आर्थिक अस्थिरता निर्माण झाली आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. यामुळे भारताची विकासाकडे मंद गतीने वाटचाल चालू आहे. भारत आणि चीन यांच्या अर्थव्यवस्थेत फार मोठा फरक आहे. चीनची उद्योगधंद्यावर आधारीत अर्थव्यवस्था ही १३ ट्रिलियन अमेरिकन डॉलर असून आपला देश २.६ ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सवरच घुटमळत आहे. आता कोरोनामुळे ती अजूनही खाली येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. चीनने भारतीय बाजारातील घसरगुंडी पाहून संधीचे सोने करण्यासाठी पैसा ओतायला सुरूवात केली होती. मात्र भारत सरकारने यावर रोख लावली आहे. चीनने भारताला लाखो पी.पी.ई. कीट्स, मास्क इत्यादी पाठविले. यातून अब्जो रुपये कमविले. त्यानंतर पाच लाख रॅपिड टेस्टिंग किट्स पाठविल्या. त्या खराब निघाल्या. या टेस्टिंग किट्सवरून वातावरण तापलेले आहे. चीनच्या 'गुआगंजो वोन्डफो बायोटेक' आणि 'झुवाई लिवजोन डायग्नोस्टिक्स इंक' या दोन कंपन्यांनी या किट्सचा पुरवठा केला होता. या किट्स खराब असल्याचे भारत सरकारने सांगतिले असता भारत सरकारचा दावा फेटाळून लावत या कंपन्यांनी म्हटले की, 'आम्ही गुणवत्ता तपासूनच किट निर्यात करतो. गुणवत्ता आमच्यासाठी प्राथमिकता आहे.' तर भारताने यावर कडक भूमिका घेतली असून त्या सर्व किट्स चीनला परत केली जाणार असल्याचे भारत सरकारकडून सांगण्यात आले. एवढेच नव्हे तर या किट्सची रक्कमही अदा करण्यात येणार नाही असेही दरडावून सांगितले.

एकंदरीत चीन हा भारतातील आर्थिक अस्थैर्याचा फायदा घेण्याच्या तयारीत असताना भारताने त्यास चोख प्रत्युत्तर दिले खरे पण, मेडिकल वस्तूंच्या बाबतीत आपण जगाप्रमाणेच चीनवर अवलंबून आहोत हेही तितकचे खरे.

**हताश अमेरिका आणि चीन :-**

कोरोनाचा प्रभाव जगभर झाला असून त्यापासून बलाढ्य महासत्ता असलेला अमेरिकाही वाचू शकलेला नाही. सुरूवातीच्या काळात इटली, स्पेन हे देश कोरोनाने अधिक ग्रासलेले होते. या देशात कोरोनाचा इतका फैलाव झाली की हजारो लोक अल्पावधीतच

मृत्यू पावले. त्यानंतर कोरोनाने अमेरिकेमध्ये शिरकाव केल्यानंतर मात्र अमेरिकेची फार मोठी वाताहत झाली. आजघडीला अमेरिकेमध्ये १,२५९,१०८ इतके कोरोना संक्रमित असून ७५,७८१ एवढे रुग्ण मृत्यू पावले आहेत तर १९५,०३६ रुग्ण बरे झाले आहेत. जगामध्ये सर्वाधिक मृत रुग्णांची संख्या ही अमेरिकेमध्ये आहे. याचाच परिपाक म्हणून चीन व अमेरिकेमध्ये जोरदार वाक्युद्ध सुरू झालं. अमेरिकेनं चीन आणि डब्ल्यू.एच.ओ. वर कोरोनाशी संबंधित माहिती लपविल्याचा आरोप केला. त्याचबरोबर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प वारंवार कोरोना व्हायरसला 'चीनी व्हायरस' म्हणत आहेत. तर त्यांचे परराष्ट्रमंत्री माईक पॉम्पिओ याला 'वुहान वायरस' म्हणत आहेत. तर दुसरीकडे चीनचा सोशल मीडिया सांगत आहे की. 'अमेरिकेच्या मिलिटरी जर्म वॉरफेअर मार्फत हा रोग पसरविण्यात आला आहे.' हताश झालेल्या अमेरिकेचे दुर्दैव असे की, या बाबतीत अमेरिका जगामध्ये एकटाच पडलेला दिसून येतो. इतर कोणताही देश याबाबतीत उघडपणे टीका करताना दिसून येत नाही. चीन आणि अमेरिकादरम्यान छेडलं गेलेलं हे युद्ध फक्त आरोप-प्रत्यारोपांपुरतंच मर्यादित नसून आणखीही काही गोष्टी या दरम्यान घडत आहेत. सुरूवातीच्या महिन्यात अमेरिकेने इटली आणि युरोपियन देशासाठी आपल्या सीमा बंद केल्याची घोषणा केली तर त्याचवेळेस चीनने इटलीमध्ये मेडिकल टीम व इतर गोष्टी पाठविण्याची घोषणा केली. जगासमोर स्वत:चा मोठेपणा सिद्ध करण्याच्या दृष्टीने ही मोठी गोष्ट होती. पण यावरुन हेही लक्षात आलं की दोन्ही देशामध्ये पडद्याआड एक मोठी लढाई सुरू आहे. या अडचणींच्या काळात चीन आपण जगाचं नेतृत्व करू शकतो हे सिद्ध करण्यासाठी प्रयत्न करीत आहे आणि या लढाईत अमेरिका चीनच्या मागे पडली आहे हे दिसून येत आहे.

संपूर्ण जगातल्या प्रशासकीय आणि राजकीय व्यवस्था किती सक्षम आणि स्वयंपूर्ण आहेत याची परीक्षा ते कोरोना व्हायरसच्या संकटाला कशाप्रकारे तोंड देत आहेत यावरून केली जात आहे. कोरोनाविरोधातल्या या युद्धात नेतृत्व कोणाकडे आहे याला प्रचंड महत्त्व आहे. सध्याच्या घडीला राजकारणात सक्रिय असणाऱ्या या नेत्यांनी या संकटसमयी कशाप्रकारे काम केलं यावरुन त्यांची क्षमता जोखली जाईल. त्यांनी या रोगाला किती प्रभावीपणे नियंत्रणात आणलं यावर त्यांच्या कार्यपद्धतीचं आकलन केलं जाईल. आपल्या देशातल्या साधनांचा वापर करून त्यांनी कशाप्रकारे या प्रकोपापासून जनतेला वाचवलं, हे सुद्धा लक्षात येईल.

**जागतिक व्यवस्थेत चीनचा दबदबा :-**

जागतिक व्यवस्थेत आतापर्यंत अमेरिका प्रथम क्रमांकाची महासत्ता आहे. गेल्या सात दशकांपासून अमेरिकेस मिळालेला हा महासत्तेचा दर्जा केवळ पैसा व ताकदीच्या जोरावर मिळालेला नसून तो देशांतर्गत सत्तेची घटनात्मकता, जगभरात सार्वजनिक गोष्टींची व्यवस्था करणे आणि संकटकाळी जलदगतीने काम करण्याची तसेच इतरांसोबत सहकार्य करण्याची इच्छा या गोष्टीमुळे मिळाला होता. तर दुसऱ्या क्रमांकावर जपानचे महासत्ता म्हणून नाव घेतल्या जायचे. आता चीनने या स्पर्धेत जपानला मागे टाकल्याचे सांगितल्या जाते. त्याची कारणेही तशाच स्वरूपाची सांगितली जातात. एकतर चीनचा जगाच्या आर्थिक व्यवस्थेत २० टक्के वाटा असल्याचे तर पॅरामेडिकल क्षेत्रात ७० टक्के वाटा असल्याचे सांगितले जाते. त्याचबरोबर चीनने तेल निर्यातदार देशांमध्ये फार मोठी गुंतवणूक केली आहे. तसेच

चीनने सार्क, बार्कप्रमाणेच तेल निर्यातदार देशांची संघटना निर्माण करून त्या देशांच्या बैठकीत अमेरिकेस पर्यायी अशी महासत्ता निर्माण करण्यासाठी वेगवेगळे अंजेडे सादर केले. त्यामध्ये प्रमुख व प्रथम मुद्दा म्हणजे अमेरिकेच्या डॉलरला पर्यायी चलन म्हणून चीनच्या चलनास उभे करण्याचा डाव मांडला. पण चीनच्या चलनास चीनने जागतिक स्तरावर आणले नसल्याने आणि चीन हा आपल्या मर्जीप्रमाणे आपल्या चलनाच्या पतबाबत कमी–अधिकपणा करत असल्याने यावर त्या बैठकीत निर्णय होऊ शकला नाही. पण अमेरिकेचे नाक दाबण्यासाठी चीनने मात्र आपले प्रयत्न सुरूच ठेवले याचा परिणाम म्हणजे वंशवादाचा पुरस्कर्ता असलेल्या चीनने हा मार्ग सोडून अफ्रिका खंडातील गरीब व लहान मोठ्या देशांमध्ये पीपी कायद्याअंतर्गत विकासाभिमुख कार्यक्रम राबविले व मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत देऊन त्यांचे भूखंड आपल्यासाठी हस्तगत करून घेतले. जागतिक स्तरावर अमेरिकेच्या बरोबरीने उभा राहण्याचा यशस्वी प्रयोग चीनने केला. तसेच अमेरिकेच्या ॲपलसारख्या मोठ्या कंपन्याही चीनमध्ये आहेत. याचाही गैरफायदा चीन घेत असून वेळोवेळी या कंपन्यांच्या माध्यमातून चीनने अमेरिकेचे नाक दाबण्याचा प्रयत्न केलेलाच आहे. या सर्व गोष्टींमुळे अमेरिका आणि चीन यांमध्ये एकप्रकारचं शीतयुद्ध चालत असलेलं आपण पाहत आहोत आणि अनुभवत आहोत. यामध्ये विशेष बाब अशी की, अमेरिकेचा अनेक दशकापासूनचा शत्रू असलेला रशिया ज्याच्या कुबड्या घेऊन चीनने महासत्तेचं स्वप्न पाहिलं त्याच रशियाला बाजूला सारून स्वत:ची उन्नती साधत आहे.

अमेरिका आणि चीन शस्त्रास्त्र जमा करण्याच्या स्पर्धेत आहेत. दोन्ही देश भविष्यात एशिया पॅसिफिक भागात एकमेकांसमोर उभं राहण्याची वेळ आली तर, एकमेकांचा सामना करण्यासाठी समर्थ होण्याच्या प्रयत्नात आहेत. चीनने आधीच स्वत:ला या भागात सैनिकी महासत्ता म्हणून सिद्ध केलं आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वत:ला सिद्ध करण्याची वेळ आली आहे असं चीनला वाटतं. आता अमेरिकेला स्वेच्छा नसतानाही या व्हायरससाठी चीनची मदत घेणे अनिवार्य झाले आहे. कारण कोरोना व्हायरसशी लढण्याचा मेडिकल डेटा चीनकडे आहे. ते अनुभव आणि डेटा इतरांसोबत शेअर करणं महत्त्वाचं आहे. दुसरीकडे मेडिकल उपकरणं, मास्क आणि प्रोटेक्टिव्ह सुट्स यांसारख्या गोष्टींचा चीन सगळ्यात मोठा उत्पादक आहे. एका रात्रीत आपलं उत्पादन कित्येक पटीने वाढवण्याचं सामर्थ्य आजच्या घडीला केवळ चीनमध्येच आहे. याचाच फायदा घेत चीनने या सर्व गोष्टी फार मोठ्या प्रमाणात उत्पादित करून त्या अन्य राष्ट्राला पुरवित अब्जावधी डॉलर आपल्या खिशात टाकत आहे. याचाच परिणाम म्हणजे जगातील टॉप १०० अब्जोपतींमध्ये चीनच्या अब्जोपतींची संख्या अधिक होत असताना दिसत आहे. आतापर्यंत चीनने जगभरातील ५० हून अधिक देशांमध्ये ३.६० अब्जपेक्षाही अधिक मास्क, ३.७ अब्जपेक्षाही अधिक प्रोटेक्टिव्ह क्लोदींग आणि २०.८४ लाखांपेक्षाही अधिक टेस्ट किट चीनने जगाला निर्यात केले आहेत. चीन जगभरातील देशातून मोठ्या प्रमाणात पैसा गोळा करत आहे. जेव्हा या व्हायरसला मात दिली जाईल तेव्हा ढासाळलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेला पुन्हा नव्याने उभं करण्यात चीनची महत्त्वाची भूमिका ठरेल. याच माध्यमातून चीनचं महत्त्वाकांक्षी स्वप्न अस्तित्त्वात येण्याची दाट शक्यता आहे.

आजचे जग हे परमाणू इ. बॉम्बवर अवलंबून न राहता जैविक शस्त्रास्त्रांच्या निर्मितीमध्ये व्यस्त झालेले

दिसत आहे. पुढील कालावधीमध्ये युद्ध खेळण्याची आवश्यकता भासणारच नाही. एखाद्या राष्ट्राला सर्वार्थाने नष्ट करण्यासाठी जैविक अस्त्रांचाच उपयोग केल्या जाईल अशी भीती अनेकदा तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. कोव्हीड-१९ या व्हायरसच्या माध्यमातून चीनही अमेरिकेला व त्याच्या मित्र देशांना हतबल करून महासत्तेच्या दृष्टीने वाटचाल करीत असल्याचे सकृतदर्शनी दिसत आहे. कारण सोशल मीडियावर पसरलेल्या चीनच्या अनेक बातम्यातून हेच सिद्ध होते की, चीनने स्वत:च्या लॅबमध्ये हा विषाणू निर्माण केला. त्यावर लसही तयार केली असावी. कारण सर्व जगात पसरणारा हा रोग चीनच्या अन्य प्रांतात कसा पसरला नाही. हा मुद्दा विचार करण्यासारखा आहे. त्यामुळे चीन स्वप्नपूर्तीसाठी काहीही करू शकतो आणि त्याने ते करुनही दाखवले हे मात्र निश्चितच असे मला वाटते. यापुढेही या विषाणूमुळे रुग्णांची आणि मृतांची संख्या वाढतच राहील. अनेक लोक मृत्यूमुखी पडतील. हे थांबावे आणि असे घडू नये यासाठी चीनने मानवतेच्या दृष्टीकोनातून प्रयत्न करणे गरजेचे आहे जे तो कधीही करणार नाही. कारण त्याच्याकडे मानवता नाही हे हा विषाणू पसरवून त्याने सिद्ध केले आहे.

# मुलाखत : श्री. जयचंद हिराचंद खोना

*जनसामान्यांची मनाची, मतांची होणारी घालमेल, सामाजिक प्रश्नांच्या गुंतागुंतीला सोडविणाऱ्या लेखणीच्या भावविश्वाला जनसामान्यांपर्यंत पोहचविणासाठी अविरत झटणाऱ्या वितरकाचे कार्य निश्चितच अमूल्य आहे. अशा वितरकांची मुलाखत घेणे अपरिहार्यच ठरते. या मुलाखतीच्या माध्यमातून वितरकांचे विश्व उलगडणारी ही मुलाखत.*

**मुलाखत दाता – श्री. जयचंद हिराचंद खोना**
**मुलाखतकार –**
**१) राऊत महादेव नामदेव** (बी.ए प्रथम वर्ष)
**२) राहूल रमेश डंबाळे** (बी.ए प्रथम वर्ष)

**प्र.१. आपले संपूर्ण नाव काय ?**
उत्तर – माझे संपूर्ण नाव जयचंद हिराचंद खोना हे आहे.
**प्र. २. आपले वास्तव्य कोठे आहे ?**
उत्तर – मी आदर्श नगर, सेलू ता. सेलू, जि. परभणी येथे राहतो.
**प्र.३. आपले शिक्षण किती झाले आहे ?**
उत्तर – मी बी.कॉम. फायनल आणि एल.एल.बी. प्रथम वर्ष उत्तीर्ण आहे.
**प्र. ४. आपण शिक्षण पूर्ण का केले नाही ?**
उत्तर – कुटुंबाची परिस्थिती नसल्यामुळे आणि कौटुंबिक जबाबदारी माझ्यावरच आल्यामुळे मला शिक्षण पूर्ण करता आले नाही.
**प्र.५. आपलं शिक्षण असूनही आपण नोकरीकडे न वळता व्यवसायाकडे कसे वळलात ?**
उत्तर – पदवी शिक्षणानंतर मी व्यवसायाकडे वळल्यामुळे नोकरीसाठी विशेष असे प्रयत्न केले नाही. त्याचबरोबर नोकरीसाठी योग्य मार्गदर्शन मिळाले नाही. त्यामुळे नोकरी मिळत नव्हती आणि त्या काळात घरची गरीब परिस्थिती यामुळे मला जास्त काही प्रयत्न करता आले नाही. तसेच मी पदवीचे शिक्षण घेत असतानापासूनच सकाळी वृत्तपत्रे वाटपाचे कार्य करीत होतो. तेव्हा लक्षात आले की, हा व्यवसाय कमी गुंतवणुकीत जास्त मेहनत घेतल्यावर अधिक उत्पन्न प्राप्त करवून देणारा आहे म्हणून मी याकडे वळलो.
**प्र.६. तुम्हाला हा व्यवसाय करण्यासाठी जागा कशी उपलब्ध झाली ?**
उत्तर – १९८३ साली आपल्या सेलू बसस्थानकावर बुकस्टॉलसाठी एस.टी. महामंडळातर्फे जाहिरात प्रसिद्ध झाली. सर्व प्रक्रिया करून बुकस्टॉल सुरू केले. अशाप्रकारे सेलू तालुक्यातील पहिले बुकस्टॉल १९८३ साली बसस्थानकावर सुरू झाले.
**प्र.७. सुरुवातीच्या काळात कोणकोणती दैनिके तुमच्याकडे होती ?**
उत्तर – त्या काळात दै. मराठवाडा, दै. अजिंठा, दै. लोकविजय, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. जन्मभूमी, दै. गोदातीर समाचार इ. दैनिके आमच्याकडे होती.
**प्र.८. कोणत्या वृत्तपत्रांना जास्त मागणी आहे ?**
उत्तर – सुरूवातीच्या काळात अनंतराव भालेराव संपादक असलेले दै. मराठवाडा हे वृत्तपत्र जास्त

प्रमाणात विकल्या जायचे. त्यानंतर दै. अंजिठा, दै. लोकविजय इ. वृत्तपत्रांना मागणी असायची. नंतर मात्र दै. लोकमत औरंगाबादहून जेव्हा प्रकाशित होऊ लागले तेव्हापासून जुन्या वृत्तपत्रांना मागणी कमी झाली. प्रथम दै. अंजिठा, दै. लोकविजय आणि १९९६ ला दै. मराठवाडा ही वृत्तपत्रे क्रमाक्रमाने बंद झाली आणि नंतर २००१ पासून दै. सकाळ हे वृत्तपत्र पुण्याहून आणि कालांतराने औरंगाबादहून सुरू झाले. आजच्या घडीला दै. लोकमत, दै. लोकसत्ता, दै. सकाळ, दै. महाराष्ट्र टाईम्स इ. वृत्तपत्रांना जास्त मागणी आहे.

**प्र.९. आजमितीस कोणकोणती वृत्तपत्रे विक्रीसाठी आहेत ?**

उत्तर – सद्यस्थितीत माझ्याकडे दै. लोकमत, दै. लोकसत्ता, दै. पुण्यनगरी, दै. गावकरी, दै. नवाकाळ, दै. तरुण भारत, दै. महाराष्ट्र टाईम्स, दै. देशोन्नती, दै. पुढारी, दै. तरुण भारत, दै. सामना, दै. सम्राट, दै. मुंबई चौफेर, दै. झुंजार नेता, लोकमत समाचार, दै. दैनिक भास्कर, दै. टाईम्स ऑफ इंडिया, दै. इंडियन एक्सप्रेस, दै. दिव्य मराठी इ. आहेत. तसेच काही मासिके, साप्ताहिकंसुद्धा आहेत.

**प्र.१०. या व्यवसायात तुम्हाला कोणकोणत्या अडचणी आहेत ?**

उत्तर – या व्यवसायात बऱ्याच अडचणी आहेत. आज वृत्तपत्र वितरणासाठी मुले भेटत नाहीत. पूर्वी तरुण वर्ग हे काम उत्साहानं करीत असत, पण आता मात्र काहींना याची लाज वाटते. तसेच यातून मिळणारे उत्पन्न देखील अत्यंत कमी आहे. अशा विविध समस्या आहेत.

**प्र.११. आज वाचकवर्ग कमी झालेला आहे काय ? तुम्हाला याविषयी काय वाटते ?**

उत्तर – हो. आज वाचकवर्ग कमी झालेला आहे. आता संगणकाचं युग आलं आहे. त्यामुळे तरुण वर्गात वाचनाची आवड कमी झालेली आहे. सगळेजण मोबाईलमध्ये हरवलेले आहेत. आता फक्त बोटावर मोजण्याइतकेच तरुण आणि घरातील ज्येष्ठ नागरिक हेच वृत्तपत्र वाचताना दिसत आहेत.

**प्र.१२. वर्तमानपत्रे ही आता काही राजकीय पक्षाची गुलाम झाली आहेत का ? यावर आपलं काय मत आहे ?**

उत्तर – बऱ्याचशा वृत्तपत्रांच्या मालकाचे संबंध हे राजकीय पक्षाशी येतात. आजमितीस राजकीय पक्षाच्या मदतीशिवाय वृत्तपत्रे निघूच शकत नाहीत. बरीच वृत्तपत्रे कोणत्या ना कोणत्या पक्षाशी निगडित आहेत. सत्ताधारी पक्ष वृत्तपत्रांना आपल्या हातातील बाहुले बनवून ठेवतात. स्वत:च्या आवश्यकतेनुसार बातम्या रुजवितात. त्यामुळे जनतेच्या काय समस्या आहेत याकडे बऱ्याच प्रमाणावर दुर्लक्ष केलं जात आहे. त्यामुळे आजच्या या वृत्तपत्रांकडून समाजसेवेची अपेक्षा करणे चुकीचे आहे.

**प्र. १३. तुम्ही आजच्या समाजाला आणि तरुण वर्गाला काय संदेश द्याल ?**

उत्तर – वाचकाने सत्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी, आकलन करून घेण्यासाठी वृत्तपत्र नियमित वाचावे. टी.व्ही., सोशल मीडिया यांपासून मिळणारं ज्ञान म्हणजे केवळ अल्पोहार असून वाचकांना संपूर्ण आस्वाद मिळविण्यासाठी वृत्तपत्रांशिवाय पर्याय नाही. त्यामुळे समाजाने जागृत झाले पाहिजे. तसेच तरुणांनी सुद्धा वाचनामध्ये आवड निर्माण करून एका चांगल्या आणि सुसंस्कृत समाजाची रचना केली पाहिजे. बस्स एवढेच.

सर, आपण वेळात वेळ काढून ही मुलाखत दिल्याबद्दल आपले आभार.

धन्यवाद!

# मुलाखत : श्री. राम दगडोबा सोनवणे

*जनसामान्यांची मनाची, मतांची होणारी घालमेल, सामाजिक प्रश्नांच्या गुंतागुंतीला सोडविणाऱ्या लेखणीच्या भावविश्वाला जनसामान्यांपर्यंत पोहचविणासाठी अविरत झटणाऱ्या वितरकाचे कार्य निश्चितच अमूल्य आहे. अशा वितरकांची मुलाखत घेणे अपरिहार्यच ठरते. या मुलाखतीच्या माध्यमातून वितरकांचे विश्व उलगडणारी ही मुलाखत.*

मुलाखत दाता : **श्री. राम दगडोबा सोनवणे**
मुलाखतकार :
**१) किशोर परमानंद मेहता** (१२वी कला)
**२) कृष्णा परमानंद मेहता** (१२वी कला)

**प्र.१. आपले पूर्ण नाव काय ?**
उत्तर – राम दगडोबा सोनवणे, गाव आदर्श,नगर सेलू.
**प्र.२. आपले शिक्षण किती झाले ?**
उत्तर – एस.एस.सी. उत्तीर्ण
**प्र.३. नोकरीसाठी प्रयत्न केले का ?**
उत्तर – सर्वसाधारण परिस्थिती व अल्प शिक्षणामुळे नोकरीचे प्रयत्न यशस्वी ठरले नाही.
**प्र. ४. वृत्तपत्र विक्री या व्यवसायाकडे कसे वळलात ?**
उत्तर – दहावी शिक्षण सुरू असताना शिक्षक शिवप्पा खके, के. आर. कुलाल, प्रल्हाद बेंबळगे,रामचंद्र रोकडे आदि गुरुजन आणि औरंगाबाद वाल्मी संस्थेचे कृष्णा देशपांडे यांच्या आग्रहामुळे व खात्रीशीर मार्गदर्शनातून दि.१७ मार्च १९८० रोजी दैनिक मराठवाडा ची एजन्सी घेऊन वृत्तपत्र विक्री व्यवसाय सुरू केला.
**प्र.५वा. आपल्याकडे कोणती वृत्तपत्रे येतात ?**
उत्तर – आज मितीस माझ्याकडे पुण्यनगरी, देशोन्नती,सकाळ, लोकसत्ता, लोकमत, दिव्य मराठी, पुढारी, अग्रोवन, नवाकाळ, झुंजार नेता, सम्राट, सामना, मुंबई चौफेर, इंडियन एक्सप्रेस ही वृत्तपत्रे येतात.
**प्र.६वा. वृत्तपत्राचा खप कसा आहे ?**
उत्तर – पुण्यनगरी, सकाळ, लोकमत, लोकसत्ता, दिव्यमराठी या प्रमुख अंकाचा खप १,००० हजार असून उर्वरित अंक १००० आहेत. या व्यतिरिक्त लोकप्रभा, चित्रलेखा, साप्ताहिक सकाळ, गृहशोभिका, यांसह प्रमुख आघाडीची मासिके येतात.
**प्र.७. या व्यवसायातील अडचणी काय आहेत ?**
उत्तर – शासनाने आखलेल्या विकास योजनांसह ताज्या घडामोडींची माहिती दररोज वृत्तपत्र वाचकांच्या हाती देणे तेही सर्व अडचणींवर मात करीत हे केले जात आहे. परंतु महिन्यानंतर काही वाचकांकडून

वेळेवर बिलाचे पैसे मिळण्यास उशीर होतो.तसेच वृत्तपत्र वाटप करणाऱ्या मुलांना दरमहा कमिशन रक्कम द्यावी लागते. शिल्लक वृत्तपत्रांचे सी.आर. कंपनीकडून मिळण्यास बराच अवधी लागतो. एकंदरीत या परिस्थितीमुळे व्यवसायात अडचणीत येतात.

**प्र.८. या अडचणींवर मात करता येते का ?**

उत्तर – वृत्तपत्र व्यवसायाची वाटचाल सद्यस्थितीत खूपच कष्टदायक आहे. परंतु यावर मात करण्यासाठी मी जोडव्यवसायास सुरुवात केली. यामुळे काही अंशी मी या अडचणीवर मात करण्यास यशस्वी झालो.

**प्र.९. वाचक वर्ग कमी होण्याची कारणे ?**

वाचनाची सवय दिवसेंदिवस कमी होत असून सोशल मीडियावर तरुणाई आकर्षित झाल्याने नवीन वाचकवर्ग कमी झाला असून घरातील वृत्तपत्र ज्येष्ठांसाठी उपयोगाला येत आहे. या चळवळीसाठी वर्तमानपत्र अथवा सामाजिक संघटना प्रयत्न करत नसल्यामुळे वाचकांची संख्या कमी होत आहे.

**प्र.१०. पत्रकाराच्या बाबतीत आपले मत काय ?**

बातमी हा दैनिकाचा आरसा असते. दैनिकात येणाऱ्या बातम्या पत्रकाराच्या अंगीभूत कौशल्यातून आणि वस्तुस्थितीजन्य असेल तर असे दैनिक जनतेच्या विचारांशी निगडित असते. म्हणून पत्रकारांनी आपले लिखाण वाचक आणि वृत्तपत्र याला अभिप्रेत असे केले पाहिजे.

**प्र.११. वृत्तपत्राच्या रूपरेषे विषयी आपले मत काय ?**

उत्तर – हल्लीचे वृत्तपत्र सोशल मीडियामधील यूट्यूब सारखे आहे. वाचकांना काय द्यायचे, अंकात काय असावे याचा अधिकार वृत्तपत्रांना असल्यामुळे दैनिकाचा खप वाढविण्यासाठी सर्व वृत्तपत्रं प्रयत्न करतात त्यातच विक्रेत्याचा फायदा आहे.

**प्र.१२. आजची वृत्तपत्रे समाजाभिमुख आहेत काय ?**

उत्तर – वृत्तपत्राचे कामच बातमीद्वारे समाजातील प्रवृत्तीवर होत असलेल्या लिखाणामुळे अशी वृत्तपत्र समाजाभिमुख असली तरी आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्याने वृत्तपत्राला समाजाभिमुख ठेवायचे की वृत्तपत्र चालवायचे असे आवाहन असल्याने समाजाभिमुख वृत्तपत्रे समाजाच्या उपयोगी असले तरी अशा वृत्तपत्रांना समाज स्वीकारत नाही. म्हणून कमी संख्या असली तरी वृत्तपत्रे समाजाभिमुख आहेत याचे ज्वलंत उदाहरण दैनिक नवाकाळ, दैनिक लोकपत्र म्हणता येईल.


**प्र.१३. समाज वाचनाकडे आकृष्ट होण्यासाठी आपण काय संदेश द्याल ?**

उत्तर – वाचक हा वृत्तपत्राचा आत्मा आहे. याचा विचार दैनिकांनी केला पाहिजे. यास अनुसरून खप वाढवायचा असेल तर वाचक वाढला पाहिजे. आणि वाचक वाढवायचा असेल तर दैनिकांनी वाचकासाठी स्वतंत्रस्तंभ अंकात देऊन वाचकांचे अभिप्राय काय आहे याची दखल घेतली तर वाचनाकडे वाचक वर्ग आकर्षित होईल.

# प्रा. प्रकाश कामतीकरांविषयी

**प्रा. विश्वास वसेकर**

**प्रकाश कामतीकर** जात राहिले. आपल्या असंख्य, सुंदर आठवणी सेलूकरांजवळ सोडून. सेलूने कामतीकरांचे जेवढे कौतुक केले, तेवढे त्यांचे बाह्य अनुकरण करणारे अनेक विद्यार्थी मी जवळून पाहिले आहेत. कामतीकरांचे बाह्य वर्तन आणि राहणीमानही एखाद्या 'हिरो'सारखे होतेही. त्यांचे वाढलेले कल्ले, मिशा अगदी युनिक होत्या. आपण एक कलावंत आहोत याचे सदैव भान त्यांच्या बाह्यवर्तनातून पेहरावामधून सूचित होत असे. त्यांच्या केशभूषेचे अनुकरण कोणीच करू शकणार नाही. एकदा मी गंमतीने म्हणालो होतो, ''तुम्ही कंगवा वगैरे वापरता की नाही.'' यावर आमचा दोघांचा समान मित्र प्रा. श्रीकांत देशपांडे म्हणाला होता, ''कंगव्याऐवजी तो रवी वापरतो आणि ताक घुसळावे तसे केस घुसळून काढतो.'' शोले सिनेमा आला होता तेव्हा कामतीकरांनी गब्बरसिंगचा ड्रेस शिवला होता. वर पुन्हा कवटीचे कीचैन पँटला अडकवलेले! सांगतो काय, कामतीकरांच्या यासकट सगळ्याच गोष्टींचे सेलूकरांना विलक्षण कौतुक होते. कलंदर किवा ऋषी म्हणता येईल असे बाह्यदर्शन असायचे त्यांचे.



जालन्यात जन्मलेले कामतीकर लहानपणापासून ग्रंथ व्यवहाराशी संबंधित प्रत्येक घटकाशी निगडित होते. जालन्याला त्यांच्या वडिलांचा प्रेसच होता. प्रकाश प्रिंटिंग प्रेस. त्या काळात खिळे जुळवण्याचे कंपोजिंग होते. कामतीकरांना स्वत:ला प्रुफ रिडींगपासून सगळ्याच गोष्टी येत होत्या. ते उत्कृष्ट मांडणीकार होते. चांगले ले–आऊट कसे द्यायचे हे त्यांना कळायचे. 'प्रतिष्ठान' या 'मराठवाडा साहित्य परिषदे'च्या मासिकाच्या निर्मितीत त्यांना रस होता. अनेक चांगल्या गोष्टी त्यांनी तिथे घडवल्या. चित्रकारांच्या मुलाखतीचे एक सदरच 'मराठवाडा दिवाळी' अंकात कामतीकरांनी चालवले होते. 'मराठवाडा साहित्य परिषदे'चे नेतृत्व करणारे नरहर कुरुंदकर, डॉ.सुधीर रसाळ, अनंतराव भालेराव यांचा कामतीकरांवर विशेष लोभ होता. १९७३–७५ या काळात मी 'मराठवाडा साहित्य परिषदे'त नोकरी करून शिकत होतो. तेव्हापासून आमची मैत्री होती कारण कामतीकरांची तिथे कायम येरझार असायची. मला सेलूला प्राध्यापकी लाभली याचेही एक कारण हे होते. गंमत म्हणजे सेलूच्या महाविद्यालयात

माझ्यासारखा (गुणी) तिथल्या स्टाफमध्ये शोभून दिसेल असे पत्र मुलाखतीला येताना प्राचार्य द. रा. कुलकर्णी यांना देण्यासाठी अनंत भालेरावांनी दिले होते. ते वाचून कामतीकर मला गंमतीने म्हणाले होते, ''आता तुला नोकरी दिली नाही तर माझी नोकरी चालली!'' कामतीकरांसारख्या ज्येष्ठ कलावंताचा सहवास आणि स्नेह पुढची पंचेवीस वर्षे मला मिळाला आणि नूतन महाविद्यालयासारख्या शैक्षणिकदृष्ट्या आदर्श महाविद्यालयात माझी एक शिक्षक म्हणून योग्य जडणघडण होऊ शकली.

कामतीकरांच्या वाङ्‌मयीन व्यक्तिमत्त्वाला अनेक पैलू होते. अतिशय कमी वयात त्यांनी 'विविधा'सारखे वाङ्‌मयीन मासिक संपादित करून एक साक्षेपी संपादक म्हणून नावलौकिक मिळवला. स. न. वि. वि. नावाचे आंतर्देशीय पत्रावरील लघु अनियतकालिक काढून मराठी वाङ्‌मयाच्या इतिहासात स्वत:चे नाव सुनिश्चित केले. स. न. वि. वि. चे देशभर खूप कौतुक झाले कारण आंतर्देशीयावर लघु अनियतकालिक छापण्याची भन्नाट कल्पना तोवर कुणाच्याही डोक्यात आली नव्हती.

मराठी साहित्यातला असा एकही वाङ्‌मयप्रकार नाही जो कामतीकरांनी हाताळला नाही. कविता, कथा, कादंबरी, नाटक, ललितगद्य, बालसाहित्य यांची त्यांची पुस्तके खूप गाजली.

कामतीकर हे उत्कृष्ट चित्रकार होते. मराठीतल्या अनेक पुस्तकांची सुंदर मुखपृष्ठं त्यांनी केलीत. स्वत:च्या सगळ्या पुस्तकांची मुखपृष्ठंही कामतीकरांनीच काढली आहेत.

कामतीकरांच्या ओळखी आणि स्नेह यांच्यामुळे मराठीच्या अनेक महान सारस्वतांचे पाय सेलूला लागले आहेत. मंगेश पाडगावकर, विंदा करंदीकर, नारायण सुर्वे, आनंद यादव ही सहज आठवणारी काही नावे. विनायकराव चारठाणकर पुरस्काराचे दीर्घकाळ संयोजक असल्यामुळे त्यांनी मराठीतल्या पन्नास तरी बिन्नीच्या कलावंतांना सेलूला आणले. यात काही पुरस्कार प्राप्त होते, तर काही प्रमुख पाहुणे. एकंदर सेलूचे सांस्कृतिक जीवन समृद्ध करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. आपल्या विद्यार्थ्यांमध्ये अनेक लेखक त्यांनी घडविले. गणेश आवटे, रेणू पाचपोर, गौतम सूर्यवंशी ही सहज आठवलेली नावे. सेलूने हे महान रत्न त्याच्या सगळ्या लहरींसकट सांभाळले हे सेलूचे मोठे योगदान आहे.



## लेखणी

**प्रा. मोहन नारायणराव पाटील**

मशाल होऊनी लेखणी तुझे हे पेटणे कसले.
स्वातंत्र्यसूर्यकिरणे मोती होऊनी भूतली ठसले.
कर्मठ चालीरीतींनी तोंडा काळे फासले.
पर जीव तुझा न गुझरला,
तव शब्दांनी नारीजन मुक्त हसले.
कुणी नीच, कुणी शूद्र म्हणूनी जग हे रुसले.
पर हुंकार तू भरता,
तव पंखांनी ते विहंग होऊनी नभी वसले.
घोर या कलीयुगी असत्य ठानुनी बसले.
सत्याची असिधार होऊनी तू काळीम ते पुसले.
हे लेखणी,
तू कधी न निश्चल, नि:शब्द न व्हावी.
नित्य तू अजर–अमर बनुनी राहावी.
शब्दधार तुझी ती अमृतधार असावी.
गेली कल्पे जरी सृष्टीपरी तू बहरावी.

स्वलेखणी सामर्थ्याने वृत्तपत्रांना अजरामर करणाऱ्या लेखक, संपादक, पत्रकार व त्यांच्या इतर सहकाऱ्यांना सादर समर्पित.

अनंत व्रत निश्चय

# प्रेरणा
२०१९-२०

## हिंदी विभाग

अनुक्रम


१. **समकालीन पत्रकारिता का बाजार** – गोविंद दत्तात्रय मानमोडे
२. **इक्कीसवीं सदी की हिंदी पत्रकारिता और स्त्री लेखन** – भाग्यश्री महादेव हावळे
३. **हिंदी पत्रकारिता का स्वरुप** – कैलास मखमले
४. **हिंदी पत्रकारिता के विभिन्न रुप** – ज्ञानोबा घोरपडे
५. **समाचार पत्रों में संपादकीय लेखन का स्वरुप** – मुक्ता गायके
६. **हिंदी पत्रकारिता का उद्‌भव और विकास** – भाग्यश्री हावळे
७. **कोरोना के दौर में पत्रकारिता** – निशा कनकुटे
८. **वर्तमान समय में ग्रामीण एवं कृषि पत्रकारिता स्वरुप** – सुरभी थोरात
९. **पत्रकारिता में रोजगार की संभावनाएँ** – योगेश गायके
१०. **समाज में पत्रकार की भूमिका** – युवराज नाईक
११. **पत्रकारिता के विभिन्न आयाम** – अर्जुन मगर
१२. **सुना है कि अब मैं पत्रकार हो गया हूँ** – अशोक बाबासाहेब गिनगिने
१३. **हाँ ! मै एक पत्रकार हूँ** – मुक्ता मल्हारी गायके (संकलन)

# समकालीन पत्रकारिता का बाजार

**गोविंद दत्तात्रय मानमोडे,** कला प्रथम वर्ष

**भारतीय स्वतंत्रता** संग्राम में पत्रकारिता का योगदान अमूल्य था। इसलिए स्वतंत्रता के बाद पत्रकारिता को लोकतंत्र का चौथा स्तंभ माना जाता है। लोगों के प्रश्नों को अपने पत्रकारिता द्वारा समाज में चर्चा एवं विश्लेषण करके उसकी गूंज सरकार तक पहूँचाकर उन प्रश्नों को हल करने का प्रभावी काम पत्रकारिता करते आया है। लोंगो के अधिकारों के खातिर कई चुनौतियों का सामना कर कठिन से कठिन से राहों पर चलकर लोंगों की समस्याओं का अध्ययन करना, सरकार द्वारा लोक कल्याणकारी योजनाओं की जानकारी देना और समाज का प्रबोधन भी करना यह सदियों से काम पत्रकारिता कर रही है। सत्य, निष्ठा, ईमानदारी, विवेकता के बल पर पत्रकारिता की नीव सदियों से रखी है। लेकिन जैसे – जैसे काल बदलता गया वैसे – वैसे पत्रकारिता अपने मूल उद्देश्य से भटकती गयी है। इसका कारण पूँजीवाद ने पत्रकारिता की नीव बदल डाली और केवल खबर बेचो और पैसा कमाओं इसी मूल्यों के कारण आज पत्रकारिता में बाजारवाद का प्रवेश हो गया है। लोंगों को जिन खबरो को पढ़ना सूनना अच्छा लगता है वही खबर उनके सामने परोसकर मुनाफा कमाना आज पत्रकारिता का काम हो गया है। इसमें प्रिंट मीडिया और इलेक्ट्रॉनिक मीडिया भी बराबरी की भागीदार है। जहाँ बाजारवाद हावी हो जाता है वहाँ नैतिक मूल्यों का अंत होता है। और जहाँ नैतिक मूल्यों का अंत हो जाता वहाँ समाजवाद नष्ट हो जाता है। लोकतंत्र को बचाये रखने की जिस प्रकार जिम्मेदारी न्यायपालिका की है ठिक उसी प्रकार पत्रकारिता की भी है। लेकिन समकालीन पत्रकारिता केवल अपना अखबार कैसे अधिक बिके, अपना टीआरपी कैसे अधिक बढ़े इसी पर अधिक ध्यान देती है। इनके लिए लोकतंत्र एक खिलौना है। जिस पार्टी की सरकार है उनके बारे अच्छी से अच्छी खबरों को छापों या चैनलों पर उनकी चर्चा करो। आज कल तो चुनाव के पहले टि.वी. न्यूज पर किसी सरकार आएगी इसकी चर्चा जोरों से चलती है। इसके लिए राजनितिक पार्टियों द्वारा उन्हे पैसा मिलता है। पत्रकार हो या संपादक या टी.व्ही. न्यूज न चैनल का मालिक सभी लोग अपनी पत्रकारिता का लक्ष्य केवल पैसा कमाना ही है। ऐसा आज महसूस होने लगता है।

समकालीन पत्रकारिता का अगर विश्लेषण करें तो समाज हित कम अपना स्व हित अधिक इसी नीति पर चल रही है। कहा जाता है कि सन् २०१४ के पहिले पत्रकारिता के क्षेत्र को सरकार द्वारा १३० करौड का विज्ञापन मिलते थे। मगर अब वह बढ़कर ६०० करोड के ही आगे बढे है। इसका क्या कारण हो सकता है ? कारण है कि आज सरकार को लगता है कि मीडिया को पैसा खिलाओं तो कल मीडिया चुनाव प्रचार में सरकार को सहायता करेगी। और ऐसा होता भी है। क्योंकि लोगों को अखबार पढ़ना, टी.व्ही. चैनलों पर न्यूज या चर्चा देखना आज आदत सी हो गई है। मीडिया या पत्रकारिता जो भी दिखाए या सूनाए उस पर जनता आँख बंद करके विश्वास

रखती है। वर्तमान सरकार गलत काम कर रही हो तो भी मीडिया उसे सही साबित करने में माहिर होती है। सरकार जहाँ गलत नीति अपना रही हो, कोई काम नहीं कर है या अपने वादों को पूरा नही कर रही है तो ऐसे समय पत्रकारिता लोगों का ध्यान इन मुद्दों से भटकाने के लिए फर्जी चर्चा अपने चैनलों से करती है। इसके लिए ढेर सारा पैसा या किसी संपादक को विधायक भी बनाया जाता है। वर्तमान पत्रकारिता अपना बाजार एक व्यापारी के समान चलती नजर आती है। वर्तमान सरकार अगले चुनाव में हारने का अंदाज हो तो आनेवाले चुनाव में आनेवाली पार्टी की चापलुसी करती है।

मनोरंजन, सेक्स जैसे विषयों को आधिक प्राथमिकता और कृषि जीवन, महिला, शिक्षा, रोजगार, पानी, बिजली, सडकें इन सभी को द्वितीय स्थान देनेवाली पत्रकारिता अधिक देखने को मिलती है। हिरो – हिरोईन, नेता, बडा व्यापारी इनके जीवन को अखबारों में प्राथमिकता मिलती है, लेकिन किसान, सफाई कर्मचारी, रोजगार के लिए भटके युवा, भिकारी लोंगों को द्वितीय स्थान दिया जाता है। कारण है जिस चिज से टीआरपी बढ़ेगी वही चिज अखबारों में या टी.व्ही. न्यूज पर बेची जायगी।

संपादकों को, पत्रकारों को, टी.व्ही. न्यूज मालिकों को भी हाय सोसायटी का जीवन जीने की लत लग गई है। बड़े – बड़े हिरो के साथ, बडे–बडे व्यापारियों के पार्टियों में जाकर इन्हें अमीर होने के सपने देने लगे है। और इसके लिए इन्होंने अपना ईमान बेचकर पक्के बाजारवादी बन गए है।

ऐसा नहीं है कि अच्छी पत्रकारिता समाप्त हो गयी है, कुछ अच्छे पत्रकार, संपादक आज भी है, लेकिन बहुत कम मात्रा में । अधिक तर बाजारवादी पत्रकारिता चलाने में ही धन्यता मानते है। आज केवल फिल्मों में ही ईमानदारी, निडर, पत्रकार देखने को मिलती है हकीकत में नहीं। बाजारवादी पत्रकारिता में केवल ग्राहक, मालिक और वस्तुएँ ही नजर आती है। लोकतंत्र – अखबारों के हर पन्ने पर में हारता हुआ और बाजारवाद जितता हुआ नजर आता है। जिसमें बड़े – बड़े संपादक, उनकी बड़ी – बड़ी गाडियाँ, बड़े – बड़े घर ही दिखाई देते हैं, इन्सान नहीं। अंत में इस बाजारवादी भिड़ को देखकर एक कवि की सटीक पक्तियाँ याद आती है –

*बड़े – बड़े घर देखे,*
*बड़े – बड़े घरों पर*
*बड़े – बड़े ताले देखे*
*बड़े – बड़े तालों के उपर*
*बड़े – बड़े आहुदे देखे*
*बहुत ढूँढा*
लेकिन आदमी नहीं मिला

# इक्कीसवीं सदी की हिंदी पत्रकारिता और स्त्री लेखन

**भाग्यश्री महादेव हावळे,** कला प्रथम वर्ष

**इक्कीसवी सदी** में पत्रकारिता का अध्ययन एक स्वतंत्र विधा के रुप में हो रहा है। साहित्य की अनेक विधाओं को पत्रकारिता ने प्रस्तुति दी है। सांस्कृतिक, सामाजिक, भौगोलिक, भाषाई और धार्मिक विविधताओं को साहित्य के माध्यम से पत्रकारिता ने पाठकों के सामने रखा है। हिंदी पत्रकारिता के इतिहास का अध्ययन करने से पता चलता है कि हिंदी पत्रकारिता ने शुरु से ही भारतीय विविधता को रेखांकित किया है। भारत की पहली महिला पत्रकार हेमंत कुमारी देवी से लेकर वर्तमान महिला पत्रकारिता के जाने – माने हस्ताक्षर मृणाल पाण्डे, क्षमा शर्मा, अलका सक्सेना, वर्तिका नंदा, श्वेता सिंह, शालिनी जोशी, ऋचा अनिरुद्ध, प्रेमा झा, मनीषा कुलश्रेष्ठ आदि अनेक पत्रकारों का अध्ययन समय की माँग है।

वर्तमान समय साहस का समय माना जा रहा है। साहस को केंद्र में रखकर ही मृणाल पाण्डे जैसी अनेक प्रभावशाली महिला पत्रकारों ने अपनी लेखनी के माध्यम से समाज उन्नती के लिए लड़ रही है। हिंदी पत्रकारिता का विचार किया जाए तो न्यूज रुम से लेकर एडिटोरियल विभाग, आई. टी. विभाग, न्यूज स्क्रिप्टिंग विभाग आदि में महिला पत्रकार सक्षमता और आत्मबल के साथ काम करती नजर आती है। सामान्य स्त्री के संदर्भ में भी हिंदी पत्रकारिता शुरु से उदारता की दृष्टि से अपना कर्तव्य बजा रही है। अनेक महिला पत्रकार मानवीय पक्ष को प्रस्तुत करती नजर आती है। हिंदी लेखिका – पत्रकारों की संख्या भी कम नहीं है। अर्चना वर्मा, जयंती, प्रभा खेतान, अनामिका, मैत्रेयी पुष्पा, मृदूला गर्ग, सुधा अरोडा, लवलीन, विभा खरे, प्रतिभा काटियार, राजी सेठी, सुमन केशरी, निशा नाग, सुषम बेदी, नीरजा माधव आदि लेखिकाओं ने हिंदी पत्रकारिता को मौलिक लेखन के माध्यम से नई दिशा दी है।

सामाजिक शिक्षा और जागरुकता के लिए महिला पत्रकारों द्वारा विभिन्न पत्र – पत्रिकाओं और चैनलों के माध्यम से अपने विचारों को प्रस्तुति दी है। औद्योगिकरण और आर्थिक असमानता के युग का सुत्रपात करती हिंदी पत्रकारिता महिला आंदोलन के साथ जुडी हुई दृष्टिगोचर होती है। हिंदी पत्रकारिता ने धर्म और रुढ़िवादिता के संदर्भ में जागृत लेखन करने वाली विकास शील विचारों की महिला पत्रकारों को महत्त्वपूर्म स्थान दिया है। हिंदी पत्रकारिता में कार्यरत महिला पत्रकारों ने समय – समय पर महिला विकास का मुद्दा उठाया है, देश के विकास के लिए महिलाओं के विकास को जरुरी बताया। जिस प्रकार ग्रामीण, दलित आदिवासी, शहरी इन वर्ग के समान महिलाओं का विकास होना जरुरी है। उसके विकास के बगैर समाज का विकास नहीं हो सकता।

समाज की चुनौतियों का सामना करने हेतु प्रेरणा देनेवाली स्त्री लेखन हिंदी पत्रकारिता के माध्यम से हो रहा है। आंध्रप्रदेश के चित्तुर जिले से निकलने वाली नवोदय पत्रिका में सिर्फ महिलाएं ही सभी काम देखती है। खेतों में काम करने वाली साक्षर माहिलाओं द्वारा हुआ यह प्रयास हिंदी पत्रकारिता

को नया आयाम प्रदान करता है। हिंदी पत्रकारिता में स्त्री लेखन को सामाजिक सुधार के रुप में देखा जा सकता है। भले ही घिसे – पिटे विचारों की चर्चा होती होंगी फिर भी स्त्री लेखन का वैचारिक पक्ष हिंदी पत्रकारिता का आधार सूत्र दृष्टिगोचर होता है।

हिंदी पत्रकारिता ने परंपरागत साहित्य में चित्रित स्त्री की छवि को बदलकर स्त्री सबलीकरण की आवाज स्त्री लेखन ने दी है। हंस पत्रिका के माध्यम से विशेष संपादिका के रुप में अर्चना वर्मा ने स्त्री लेखन को नया रुप दिया है। वंश – परंपरा, जनम – पत्री, संदर्भ और विचार, पितृसत्ता के षडयंत्र और स्त्री छवि आदि स्तंभों के माध्यम से हंस पत्रिका में अपनी प्रस्तुति दी है। भारत के साथ अंतर्राष्ट्रीय स्तर पर हिंदी पत्रकारिता के माध्यम से स्त्री लेखन जा पहुँचा है। लेकिका अनामिका, नासिरा शर्मा, सुधा अरोडा, मृणाल पाण्डे, प्रभा खेतान, उर्मिला शिरीष, रमणिका गुप्ता आदि ने स्त्री लेखन की सभी परंपरा को संभाला है। और हिंदी पत्रकारिता के विकास में अपना सकारात्मक रुप दर्शाया है। फिर भी पुरुष प्रधान समाज में अपना लेखन का स्वागत हुआ है। और महिलाओं को भी अपनी स्पष्ट विचारधारा को प्रस्तुति देने के मौका मिला है। अत: नारी आंदोलन को आधारभूत तत्वों के साथ सही दिशा देने का, स्त्री लेखन को विस्तार देने का महत्त्वपूर्ण कार्य हिंदी पत्रकारिता ने किया है इस में दो राय नहीं ।

# हिंदी पत्रकारिता का स्वरुप

**कैलास मखमले,** कला प्रथम वर्ष

**प्रजातंत्र में** पत्रकारिता का विशेष महत्व है। मनुष्य के जीवन में समाज अत्यंत महत्वपूर्ण है। समाज के बिना मानव जीवन की कल्पना नहीं की जा सकती। समाज और मनुष्य एक दूसरे के पूरक है। समय – समय पर विभिन्न घटनाएँ समाज में घटती रहती है। परिवर्तित होते समाज की गतिविधियों की जानकारी समाज के प्रत्येक वर्ग तक पहूँचाने का कार्य पत्रकारिता के माध्यमसे होता है। केवल समाचार इकट्ठा करना पत्रकारिता काम नही बल्कि पत्रकारिता के द्वारा मनुष्य समाज और सामाजिक चेतना से संपूर्ण रुप से जुडा रहता है। समाज से उसकी कुरुपता का विनाश कर समता के धरातल पर उसका नवनिर्माण करना पत्रकारिता की मूल भावना है।

आज पत्रकारिता जनसेवा का सशक्त माध्यम है। आज के वैज्ञानिक युग में पत्रकारिता का महत्व दिन –ब– दन बढ़ता जा रहा है। पत्रकारिता अपने विचारों को जनता तक पहुँचाने का एक सशक्त साधन है। अब इस पत्रकारिता का स्वरुप कैसा है। यह जान लेना हमारे लिए आवश्यक है। पत्रकारिता विज्ञान की देन है। इसका प्रथम स्वरुप अखबार है। सूचना के आदान–प्रदान के लिए पत्रकार को जितना तकनिकी ज्ञान चाहिए उसकी पूरी जानकारी दैनिक अखबारों से हो जाती है। अंग्रेजी में इसे प्रिंट मीडिया कहते है। कम्प्युटर के विकास से पत्रकारिता का स्वरुप विकसित हुआ है। और कम समय मे अखबार का प्रकाशन संभव हो गया है। पत्रकारिता का स्वरुप विभिन्न विशेषताओं द्वारा स्पष्ट किया जा सकता है –

**समाज का दर्पन** – पत्रकारिता समाज का दर्पण है। समाज मे कब, कहाँ, क्यों किसे, क्या हो रहा है इन प्रश्नों का उत्तर पत्रकारिता है। पत्रकारिता वह माध्यम है जिसके द्वारा हम अपने मस्तिष्क से उस दुनिया के बारे में समस्त सूचनाएँ संकलित करते है, जिसे हम स्वत: कभी नही जान सकते । पत्रकारिता सामाजिक जीवन की सत् – असत्, दृश्य – अदृश्य और शुभ – अशुभ छवियों का दर्पण है। समाज में फैली कुरीतियों, अंधाविश्वासों, रुढ़ियों आदि के प्रती भी पत्रकारिता संघर्ष छेड़ती है तथा समाज से इन बुराइयों को मिटाने का प्रयत्न करती है।

**सूक्ष्म शक्ति** – पत्रकारिता के माध्यम से परिवेश का सर्वांगिन निरुपण होता है। आज हमारा जीवन जटिल हो गया है। प्रतिपल घटनेवाली घटनाओं के कारण मनुष्य आश्चर्य चकित हो जाता है। मानवीय संबंधो में आज परिवर्तन हो रहा है। पत्रकार समाज के सजग प्रहरी के रुप मे समाज में घटित घटनाओं को गहराई से समझता है।

**समिक्षात्मकता** – पत्रकारिता का लक्षण नीर – क्षीर विवेचन तथा निर्णय का काम होता है। पत्रकार समस्त राष्ट्र की जनता की चित्तवृत्तियों, अनुभूतियों और आत्मा का साक्षात्कार कराता है। पत्रकारिता मनुष्य को मनुष्य के भाँति जीने की प्रेरणा देता है। जहाँ उसे अन्याय, अज्ञान, उत्पीड़न, भ्रष्टाचार दिखाई देता है वह उनका विरोध करता है।

**सामाजिक मूल्यों की विधायिका** – पत्रकारिता स्वस्थ सामाजिक मूल्यों की नियामिका है। देश और समाज में व्याप्त किसी भी प्रकार का असंतोष क्यों न हो पत्रकारिता उसका सही विश्लेशण करती है। राष्ट्र में घटनेवाली सभी महत्वपूर्ण घटनाओं के बारे में चिंतन की प्रक्रिया को जन्म देकर उसे सही दिशा में अग्रसर होने में सहायता करती है। वास्तविक पत्रकारिता तो एक मार्गदर्शिका, सामाजिक मूल्यों की विधायिका है।

**संप्रेषण का सशक्त माध्यम** – पत्रकारिता संप्रेषण का एक सशक्त माध्यम है। पत्रकारिता जनता को सूचीत करती है, साथ ही उसे शिक्षित करती हुई सुरुचिपूर्ण मनोरंजन भी प्रदान करती है। यही वह साधन है, जो हमें विश्व मे होनेवाले संपूर्ण नविन अविष्कारों और घटनाओं को अनुसंधानो से परिचित कराकर प्रभावित करता है।

**जीवन का अभिन्न अंग** – पत्रकारिता वर्तमान जीवन का अभिन्न अंग है। वर्तमान समय में मनुष्य व्यस्त होने के कारण चाहता है कि समस्त संसार की घटनाओं की जानकारी उसे कम से कम समय में मालूम हो जाए। अर्थात साहित्य, विज्ञान, खेलकुद, फिल्म, मनोरंजन आदि से संबंधित जानकारी भी इस में होती है। अर्थात जीवन का प्रत्येक क्षेत्र समाचार पत्रो से प्रभावित होता है।

**परिवेश से साक्षात्कार**– पत्रकारिता मनुष्य को उसके परिवेश के अंतराष्ट्रीय घटनाचक्र से जोड़ देती है। पत्रकारिता के माध्यम से हमे न केवल अपने परिवेश से परिचित होते है वरन् दूरवर्ती देशों से भी हमारा साक्षात्कार कुछ ही क्षनों मे हो जाता है। जन संपर्क के माध्यम – रेडियो, टेलिविजन, टेलिप्रिंटर, टेलेक्स, वायरलेस और समाचार पत्र आज ऐसे माध्यम है जो सारे विश्व को एक चक्र मे बाँध देते है। और मनुष्य की जिज्ञासा को जागृत करते है, तब मनुष्य केवल सामाजिक ही नही आंतरराष्ट्रीय प्राणी बन जाता है और संपूर्ण विश्व घटनाचक्र में एक इकाई की तरह जुड़ जाता है।

# हिंदी पत्रकारिता के विभिन्न रुप

**ज्ञानोबा घोरपडे,** कला प्रथम वर्ष

**जीवन की** विविधता और संचार साधनों की प्रचुरता ने पत्रकारिता को बहुआयामी बना दिया है। जीव – जगत् के हर कोने में पत्रकारिता व्याप्त है। आज पत्रकारिता अपने निर्भयता के कारण समाज में लोकप्रिय बनी है। पत्रकारिता की लोकप्रियता दिन–दूनी रात – चौगुनी बढ़ती जा रही है। आज पत्रकारिता का प्रभाव को देखते हुए इसे प्रजातंत्र का चौथा स्तंभ माना जा रहा है।

मनुष्य के जीवन मे अनेक प्रकार की घटनाएँ घटती है। कुछ घटनाएँ व्यक्ति को आनंदित करती है, वही कुछ घटनाएँ व्यथित कर देती है। मानव जीवन विविधता से भरा हुआ है। नवीन साधनो ने मानव जीवन को बहुआयामी बना दिया है। व्यक्ति अपनी रुचि, प्रकृति एवं प्रतिभा के अनुसार अपने लिए विशिष्ट क्षेत्र का चयन करता है। यही बात पत्रकारिता के क्षेत्र में लागू होती है। क्योंकि वर्तमान युग विशिष्टिकरण का युग है। अब वो समय नहीं रहा जब पत्रकारिता का एक मात्र उद्देश्य देश को स्वाधीनता प्रदान करना था। आज पत्रकारिता का क्षेत्र विशाल हो गया है। व्याक्ति अपने रुचि के अनुसार विभिन्न क्षेत्रों का चयन करता रहता है। आज पत्रकारिता का क्षेत्र अत्यंत व्यापक हो गया है। इस व्यापकता के कारण वह अनेक रुपो में सामने आ रही है। पत्रकारिता में जो विविधता दृष्टिगोचर हो रही है, उस के अनुसार पत्रकारिता के कई भेद किए जा सकते है।

जैसे – आर्थिक पत्रकारिता, ग्रामीण पत्रकारिता, कृषि पत्रकारिता, अन्वेषणात्मक पत्रकारिता, व्याख्यात्मक पत्रकारिता, विकास पत्रकारिता, संदर्भ पत्रकारिता, संसदीय पत्रकारिता, विज्ञान – पत्र करिता, रेड़ियो पत्रकारिता, दूरदर्शन पत्रकारिता, फिल्मी पत्रकारिता, बाल – पत्रकारिता, फोटो पत्रकारिता, खेल पत्रकारिता, महिला पत्रकारिता, आध्यात्मिक पत्रकारिता, वृत्तांत पत्रकारिता, सर्वोदय पत्रकारिता, साहित्यीक पत्रकारिता, शैक्षणिक पत्रकारिता, हास्य – व्यंग्य पत्रकारिता, ब्रेल पत्रकारिता, सांस्कृतिक पत्रकारिता, इंटरनेट पत्रकारिता, शिक्षा पत्रकारिता, पर्यावरण पत्रकारिता, साक्षात्कार पत्रकारिता, कार्टून पत्रकारिता, फीचर पत्रकारिता, आदि । पत्रकारिता के विभिन्नी रुपो का प्रचार – प्रसार वर्तमान युग में हम देखते है। पत्रकारिता के विभिन्न रुप भले ही कितने भी हो किंतु उसका एक मात्र उद्देश्य मानवजीवन को बहुमायामी बना देना।

# समाचार पत्रों में संपादकीय लेखन का स्वरुप

**मुक्ता गायके,** कला प्रथम वर्ष

**किसी भी** समाचार पत्र में जो कुछ छपता है उसको निश्चित करने का अधिकार प्रेस रजिस्ट्रेशन ऍक्ट १८६८ के अनुसार संपादक को ही होता है। किसी भी समाचार पत्र मे प्रकाशित पाठ्य सामग्री का संपूर्ण दायित्व संपादक पर ही होता है। संपादक ही समाचार पत्र की रीति – नीति तय करता है। भले ही वह रीति – नीति तय करता है किंतु उसे अपने संस्थान की हितों का खयाल रखना पड़ता है। समाचार की सफलता, लोकप्रियता, श्रेष्ठता, बहुत कुछ संपादक की प्रतिभा, योग्यता, कुशलता पर आधारित होती है। संपादकीय लेखन समाचार पत्र के स्तर और श्रेष्ठता की कसौटी होती है। वस्तुत: समाचार पत्र का इकलौता भाग वह संपादकीय पृष्ठ होता है जिस पर संपादक अपनी व्यक्तिगत मोहर लगा सकता है। संपादक अपनी कल्पनाशीलता और सृजनशीलता के जरिये अपने समाचार पत्र मे कुछ न कुछ नया देने की कोशिश करता है। ताकि वह चर्चा में रहे। संपादक समाचारगत प्रेरणा, बल, अभिप्राय, चेष्ठा, नियंत्रण, चयनात्मकता आदि के संबंध में अपनी व्यक्तिगत निष्ठा और कर्तव्य का विचार कर उसे कार्यरुप में परिणत करने के लिए प्रत्यक्ष तथा अप्रत्यक्ष दोनों प्रकार से प्रयास करता है। संपादक की नजर एक तरफ प्रेस संबधी कानून पर रहती है तो दूसरी तरफ संस्थान के हित, पाठकों की रुचि का भी उसे ध्यान रखना पड़ता है। बदलते समाज मूल्यो के अनुरुप प्रतियोगिता और प्रयोगशिलता के दौर मे एक प्रयोगशिल संपादक ही अपने समाचार पत्र को जिंदा रख सकता है।

संपादकीय लेखन का क्षेत्र अत्यंत व्यापक होता है। इस क्षेत्र में अग्रलेख, फीचर, विशेष लेख, विभिन्न समीक्षाएं, टिप्पणियाँ आदि विविध लेखन आते है पर संपादकीय लेखन का सर्वाधिक महत्वपूर्ण रुप होता है, संपादकीय या अग्रलेख ।

संपादकीय लेखन प्राय: समाचार पत्र के मध्यवर्ती पृष्ठ पर होता है। संपादकीय लेखन का विषय मानव जीवन से संबंधित कोई भी क्षेत्र हो सकता है। संपादकीय लेखन विविध विषयों से संबंधित विविध मतों का स्पर्श करती उनका विवेचन, विश्लेषण कहती है। समाचार पत्र की नीति तथा विचारधारा से संबंध संपादकीय आलेखन सजग तथा सतर्क पाठको को आकर्षण का केंद्र बनते है। गंभीर मनोवृत्ति के पाठक तो संपादकीय लेखन से तो विशेष जुड़ते है क्योंकि इसमे समसामयिक समस्याओं, परिवेश आदि का सटीक, सार्थक, विवेचन – विश्लेषण, होता है। समाचार पत्र केवल समाचारों के कारण महत्वपुर्ण नहीं है क्योंकि समाचारों का प्रसारण जो आकाशवाणी, दूरदर्शन से भी होता है। वह इसलिए महत्वपूर्ण है क्योंकि संपादकीय लेखन किस स्तर का है यह भी निर्भर होता है। उसी लेखन को लेकर कुछ महत्वपूर्ण बिंदूओं पर हम दृष्टिक्षेप डालेंगे –

– संपादक के तथ्यों का प्रस्तुतीकरण ईमानदारी के साथ करना चाहिए। अर्थसत्य पर आधारित संपादकीय बेईमानी तथा अयोग्यता का सूचक है। उसे जान बूझकर पाठक को भ्रमित करना, स्थिति

को बिगाड़ना या किसी व्यक्ति को गलत प्रभाव में नही रखना चाहिए।

– संपादक को वर्णित तथ्यों से उद्देश्यात्मक निष्कर्ष निकालना चाहिए तथा उन्हें प्रमाणोंपर तथा उनकी उत्तम अवधारना पर आधारित करना चाहिए।

– संपादक को निजी स्वार्थ से प्रेरित नहीं होना चाहिए, न ही अपने प्रभाव का प्रयोग निजी या किसी और के स्वार्थ के लिए करना चाहिए। किसी भी संभावित भ्रष्टाचार उसका स्त्रोत कोई भी हो, उसे स्वयं को उपर रखना चाहिए।

– संपादक को अनुभव करना चाहिए कि वह भ्रमातित नहीं है, अत: अपनी सामर्थ्यानुसार उसे अपनी विरोधियों के स्वर को जनपक्ष स्तंभ या अन्य उपयुक्त स्थान पर स्थान देना चाहिए।

– प्राप्ति सूचना के प्रकाश में संपादक को नियमित रुप से अपने निष्कर्षों की समीक्षा करनी चाहिए। पूर्ववर्ती भ्रामक अवधारणाओं पर आधारित निष्कर्षों को सुधारने मे उसे कदापि हिचकिचाना नहीं चाहिए।

– संपादक को दृढ आधारित धारणा और जीवन के प्रजातांत्रिक दर्शन के प्रति साहस दिखाना चाहिए। उसे ऐसे किसी वस्तु को न तो दिखना चाहिए और न प्रकाशित करना चाहिए, जो उसकी आत्मा के विरुद्ध है। बहुत से संपादकीय पृष्ठ एक से अधिक मास्तिक की उपज होते है।

– संपादक को व्यावसायिक सत्यनिष्ठा के सर्वोच्च स्तर के पालन में लगे अपने सहयोगियों का सदैव सहारा देना चाहिए।

– समाचार पत्र में समाचारों की दृष्टि से प्रथम पृष्ठ ही महत्वपूर्ण होता है, किंतु समाचारों पर विचार और समीक्षाओं की अपेक्षा से संपादक का महत्व ही प्रमुख माना जाता है। दैनिक, साप्ताहिक समाचार पत्रों में एक संपादकीय स्तंभ आता है। जिसमें एक या अधिक से लेख होते है। पहला लेख अग्रलेख कहलाता है और बाकी टिप्पणियाँ होती है। अग्रलेखों तथा टिप्पणियों में देश – विदेश की सामान्य घटनाओं – प्रवृत्तियाँ जनजीवन से संबंध रखनेवाले राजनीतिक हलचलो, सरकार के कार्यों, नीतियों आदि के बारे में समाचार पत्रों के नीति के बारे में विचार प्रकट किये जाते है। जिसमें आवश्यकता के अनुसार सराहना, आलोचना तथा सुझावों का समावेश होता है। अग्रलेख इतना आसान काम नहीं, इसके लिए विशेष ज्ञान तथा प्रतिभा आवश्यक है।

– समाचार पत्रों में संपादकीय उस विषयपर होना चाहिए जो सबसे महत्वपूर्ण हो इसके लिए संपादक अथवा अग्रलेख लिखनेवाले में पूर्ण ज्ञान तथा वेग की आवश्यकता होती है। जिससे वह तत्काल निर्णय ले सके। उस दिन की घटनाओं अथवा समस्याओं में इस पर अग्रलेख लिखना उचित है। इसके लिए उस दिन के सारे समाचारोंको देखना चाहिए।

– संपादकीय स्तंभ के लिए हर एक समाचार पत्र में पृष्ठ तथा स्थान निर्धारित होते है। इस संबंध में प्रत्येक समाचार पत्र की अपनी प्रणालियाँ है। अग्रलेख का पृष्ठ पूरे समाचार पत्र में सबसे गंभीर सामग्री का पृष्ठ समझा जाता है। अग्रलेख लिखनेवाले की भाषा पर अधिकार होना चाहिए। भाषा की क्लिष्ठता अथवा सरलता अग्रलेख की विषयवस्तु पर निर्भर करती है। यदि अग्रलेख किसी महत्वपूर्ण तकनीकी अथवा वैज्ञानिक आदि विषयों पर लिखा जाये तो उस की भाषा का क्लिष्ट होना स्वाभाविक है लेकिन यदि अग्रलेख किसी राष्ट्रीय तथा अन्तराष्ट्रीय घटना अथवा विषय पर हो, जिसे समझने के लिए आम आदमी उत्सुक हो ।

# हिंदी पत्रकारिता का उद्‌भव और विकास

**भाग्यश्री हावळे,** कला प्रथम वर्ष

**हिंदी पत्रकारिता** का श्रीगणेश 'उदन्त मार्तंड' के साथ ३० मई १८२६ इ. को युगलकिशोर शुक्ल ने किया। इस पत्र का मूल उद्देश्य भारतवासियों में राष्ट्रप्रेम और सर्वांगिण विकास हेतु जागृति का भाव निर्माण करना था। युगल किशोर शुक्ल को यह श्रेय जाता है कि उन्होने हिंदी पत्रकारिता को ये परंपराएँ डाली जिनमें से कुछ पर तो भारत के स्वाधिन होने तक हिंदी समाचार पत्र अमल करते रहे। उन्होने हिंदी समाचार पत्रों के लिए उपयुक्त भाषा शैली भी निर्धारित की । किंतु आर्थिक कठिनाईयों के कारण यह पत्र ४ दिसंबर १८७२ को बंद कर देना पड़ा ।

'उदन्त मार्तण्ड' के पश्चात काशी से पहला समाचार पत्र १८४५ से राजा शिवप्रसाद सितारे हिंद ने 'बनारस अखबार' से सन १९५४ में समाचार 'सुधावर्षण' नाम से निकला। इसके पहले १८५२ मे आगरे से 'बुद्धिप्रकाश' का प्रकाशन हुआ। इस पत्र के संपादक लाला सदासुखलाल थे। ८ फरवरी १८५७ में स्वतंत्रता आंदोलन के नेता अजीमुल्ला खाँ ने दिल्ली से 'पयामें आजादी' का प्रकाशन किया। यह समय भारत की आजादी के लिए संघर्ष का युग था। अत: स्वातंत्र्य भावना, राष्ट्रहित, अंग्रेजी को दमन नीति, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक समस्याओ पर इन पत्रों में खुब लिखा गया। हिंदी पत्रकारिता का विकास भारतेन्दु युग में विशेष रुप से उल्लेखनीय है। इस युग में हिंदी की कई पत्र–पत्रिकाएँ निकली । 'हिंदी – प्रदीप' के पत्र ने हिंदी पत्रकारिता को नई दिशा के साथ निर्भिकता भी दी।

इस युग में कई पत्र – पत्रिकाएँ निकली जिनमें हिंदु – प्रकाश, नागरी, अल्मोडा अखबार, नागरी, हिंदी प्रदीप, भारत मित्र इ. । इस युग की पत्र पत्रिकाओं मे सामाजिक समस्याओं पर विचार किया जाता था। इन पत्रिकाओं में देश – प्रेम, भाषा – प्रेम, समाज – सुधार आदि पर लेख लिखे गये। त्रिवेदी युग हिंदी पत्रकारिता के इतिहास का एक महत्वपूर्ण युग है। 'सरस्वती' पत्रिका के संपादक के रुप में आ. महावीरप्रसाद विवेदी के योगदान को भूलाया नहीं जा सकता । इस पत्रिका के माध्यम से उन्होने राष्ट्रीय सांस्कृतिक चेतना जगाने का प्रयास किया । पं. मदन मोहन मालवीय ने १९०७ में इलाहाबाद से साप्ताहिक 'अभ्युदय' प्रकाशित किया । थोडे ही समय में यह पत्र अत्यंत लोकप्रिय बन गया। इस युग की अन्य पत्र पत्रिकाँए थी – श्री शारदा, कलकत्ता समाचार, तरंगिनी, कर्मवीर, माधुरी इ. । इस युग की पत्रकारिता में स्वदेश प्रेम, शासन के दमन का विरोध, समाचार सुधार आदि की भावना प्रधान थी। इसयुग की पत्रिकाओं में भी राष्ट्रभक्ति का स्वर प्रधान था।

भारतीय राजनीति में गांधीजी का आगमन महत्वपूर्ण घटना है। गांधीजी की नीतियों से उस युग का साहित्य, समाज, पत्र – पत्रिकाएँ, सभी प्रभावित थी। गांधीजीने 'यंग इंडिया', 'हरिजन' तथा 'जनजीवन' आदि पत्र निकाले। इसके पश्चात इलाहाबाद से 'लिडर', कानपुर से 'वर्तमान',

कलकत्ता से बांगला में 'आनंद बाजार पत्रिका' पत्र निकले जो राष्ट्रवादी स्वर लिए हुए थे। इस युग में इन पत्रिकाओं के अलावा समन्वय, सुधा, विशाल भारत, मधुकर, हंस, दैनिक हिंदुस्तान, आर्यावर्त, दैनिक संसार, चित्ररेखा, सन्मार्ग, कौमी आवाज, जयहिंद आदि पत्र – पत्रिकाएँ प्रकाशित हुई।

स्वतंत्रता के पश्चात हिंदी पत्रकारिता ने उल्लेखनीय प्रगति की है। स्वतंत्रता के बाद हिंदी पत्रकारिता सहित भारतीय पत्रकारिता का समूचा परिदृश्य ही बदल गया। स्वतंत्रता के पूर्व जहाँ पत्र–पत्रिकाओं का उद्देश्य राष्ट्रप्रेम और आजादी की भावना को लेकर था, वही आजादी के बाद राष्ट्र के विकास और समाज सुधार पर केंद्रित हुआ। स्वतंत्रता के बाद टाईम्स ऑफ इंडिया, इंडियन एक्सप्रेस, हिंदु, हिदुस्तान टाईम्स जैसे प्रेस समुह बड़ी पूँजी के साथ सामने आए। इसलिए इसमें व्यावसायिकता की प्रवृत्ती बढ़ती गई।

स्वतंत्रता के बाद ४ अप्रैल १९४७ को दिल्ली से 'दै. नवभारत टाईम्स' का प्रकाशन आरंभ हुआ। इसके प्रथम संपादक हरिशंकर व्दिवेदी थे। अज्ञेय भी इसके संपादक रह चुके है। यह एक राष्ट्रीय दैनिक पत्र है। इसमें आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय और स्थानीय समाचार होते है। दैनिक पत्रों की श्रेणी में 'अमर उजाला' का अपना स्थान है। कानपुर से 'दैनिक जागरण' का प्रारंभ १९४७ में पूर्णचंद्र गुप्त ने किया। १९५८ में 'दैनिक भास्कर' का प्रकाशन हुआ। यह मध्यप्रदेश से निकलनेवाले अखबारों में से सबसे अधिक लोकप्रिय समाचार पत्र है। 'दैनिक भास्कर' ग्वालियर, झाँसी, जयपुर आदि कई स्थानों से प्रकाशित होता है। पंजाब से १९६५ में 'पंजाब केसरी' दैनिक पत्र निकलता था जो निर्भीकता एवं निष्पक्षता के लिए प्रसिद्ध था। १९७८ में चंदीगढ से 'दैनिक ट्रिब्युन' प्रकाशित हुआ। दिल्ली से प्रकाशित 'जनसत्ता' का नाम आज अग्रणी पत्रों में लिया जाता है। 'राष्ट्रीय सहारा' दैनिक पत्र का प्रकाशन १५ अगस्त १९९१ को प्रारंभ हुआ। १९ पृष्टोंके साथ प्रकाशित होनेवाला यह हिंदी का पहला पत्र है। इस प्रकार स्वतंत्रता के पश्चात हिंदी में अनेक पत्र – पत्रीकाएं प्रकाशित हुई। इन्होंने हिंदी पत्रकारिता के विकास मे महत्वपूर्ण योगदान दिया है। कुछ पत्र निम्न है – वीर अर्जुन (दिल्ली), नवभारत (नागपुर), विश्वमित्र (कलकत्ता), स्वदेश (इंदौर), युगधर्म (नागपूर), राष्ट्रदल (जयपुर), देशबंधु (रायपुर), दै. नवज्योति (अजमेर), नवयुग (दिल्ली), स्वतंत्र भारत (लखनऊ), जलते दीप (जोधपुर), नूतन सवेरा (मुंबई) इ. ।

इस शताब्दी के अंतिम दशक में इलेक्ट्रॉनिक मीडिया का वर्चस्थ बढ़ गया है। किंतु अभी भी प्रिंट मीडिया का प्रभाव अक्षुण्ण है।

# कोरोना के दौर में पत्रकारिता

**निशा कनकुटे,** कला द्वितीय वर्ष

**विश्व स्वास्थ्य** संगठन (W.H.O.) ने कोरोना वायरस को महामारी घोषित कर दिया है। इस वायरस के संक्रमण के कारण आज संपूर्ण विश्व जुझ रहा है। इस वैश्विक महामारी की आड़ में मीड़िया अपना कार्य ईमानदारी से कर रहा है। पत्रकारिता का कार्यक्षेत्र इनता व्यापक रहा है कि वह जनसेवा का एक सशक्त माध्यम है। यह हमारे जीवन की विविधताओं, नित्य घटित होनेवाली नई–नई घटनाओं को शीघ्रता के साथ दुनिया के कोने – कोने में पहुँचाती है।

कोरोना वायरस पत्रकारों के जीवन की सबसे कहानी है और एक अरब से ज्यादा लोग इस दौर में उनके लिए हालत पर नजर रखें, खबरें देते है, संपादन का दायित्व निभाते है और सरकारी तंत्र की खामियों को उजागर करते दिखाई दे रहे है।

इस विशाल और विविधता से भरे देश के एक अरब से ज्यादा लोग मनुष्य जीवन के बारे में खबरें देते है या जो विचार रखते है उनपर भरोसा किया जा सकता है। चुनाव अभियानो के दौरान यात्रा करते पत्रकार उदारता का भाव रखते है। गरीब से गरीब गाँवो की महिलाएँ भी पत्रकारों से किस तरह खुल कर बातें करने लगी है। भारत के लोगों और उनके पत्रकारों के बीच का यह सामाजिक करार अनूठा है। इसकी ठोस वजह उनका यह विश्वास है कि हम अपना काम बहुत कर्मठता और साहस से करते है।

जब हम कोरोना वायरस के रुप में अपने जीवन की सबसे बड़ी खबर से रु–ब–रु होने वाले है तब लोगों की अपेक्षाएँ भारतीय पत्रकारिता परिवार के लोगों के लिए बड़ी परीक्षा होने वाली है। यह एक मारक वैश्विक महामारी है, हर देश और हर व्यक्ति अपनी समस्याओं से घिरा है। हमारा देश बेहद जटिल और हम लोगों के मुकाबले कम साधन संपन्न वंचितों की भारी तादात वाला देश है। देखा जाए तो भारतीय पत्रकारों को सम्मान और स्वतंत्रता सबसे बड़े वरदान के रुप में स्वभावत: हासिल है। सामाजिक करार का दायित्व पत्रकारोंपर है। किंतु प्रेस की आजादी किसी कानून या संविधान में शायद ही दर्ज है। अनुच्छेद १९ हर नागरिक के लिए सम्मान रुप से लागू है वह पत्रकारों को विशेष अधिकार नहीं देता। हम संकटपूर्ण स्थितियों में भी पत्रकार हमें खबर दे रहे है अर्थात वह अपना काम ईमानदारी से कर रही है। इसलीए प्रधानमंत्री ने देश के नाम अपने संदेश में दो बार कहा कि डॉक्टरों, अस्पताल के कर्मचारियों, सरकारी अफसरो आदि की तरह मीडिया भी आवश्यक सेवाओं में शामिल है। मीडिया को आवश्यक सेवाओं शामिल करना एक सुखद बदलाव है। कोरोना युग पत्रकारिता के लिए ऐसी चुनौती लेकर आया है जैसी उसे पहले कभी नहीं मिली थी।

# वर्तमान समय में ग्रामीण एवं कृषि पत्रकारिता स्वरुप

**सुरभी थोरात,** कला द्वितीय वर्ष

**प्रजातंत्र में** पत्रकारिता का विशेष महत्व है। समय और समाज के संदर्भ में सजग रहकर नागरिकों में दायित्वबोध कराने की कला पत्रकारिता कहलाती है। पहले पत्रकारिता का कार्य केवल समाचार संकलन था किंतु अब पत्रकारिता का क्षेत्र अत्यंत व्यापक हुआ है।

आज अपना देश गाँव का देश कहा जाता है। इसका कारण यह है कि देश की लगभग ७० प्रतिशत जनता गाँवों में रहती है। आजादी के ७० साल बाद भी गाँवों में पिछड़ापन नजर आता है। आज हम अत्याधिक प्रगती का दावा करते रहे, फिर भी हमारे पिछड़ेपन को नजर अंदाज नहीं किया जा सकता । विशेषत: हमारें गाँवों में जो पिछड़ापन दिखाई देता है उसका कारण है, संचार की रिक्तता। आज जितने भी समाचार पत्र प्रकाशित होते है वो शहरों में ही प्रकाशित होते है। इन समाचार पत्रोंमे शहरी जीवन को महत्व दिया जाता है और गाँवों को अनदेखा किया जाता है। गाँवों में नई चेतना और वैज्ञानिक विकास को पत्रों द्वारा पहुँचाया जा सकता है। प्रसिद्ध पत्रकार गणेश शंकर विद्यार्थी ने कहा है कि – 'राष्ट्र महलों में नहीं रहता, प्रकृत राष्ट्र के निवासस्थल में अगणित झोपड़ें है जो गाँव और पूर्वी में फैले हुए खुले आकाश के दैदीप्यमान सूर्य और शितलचंद्र और तारांगण से प्रकृति का संदेश लेते है। इसलिए राष्ट्र का मंगल और उसकी जड़ उस समय तक मजबूत नहीं हो सकती जब तक कि अगमित लहलहाते पौधों की जड़ों में जीवन का जल नहीं सींचा जाता । पंरपरागत लोककला, लोकसंस्कृति, कुटीर उद्योग, ग्रामीण स्वास्थ्य, हरित और खेत क्रांति द्वारा गाँव के संपूर्ण विकास हेतु समर्पित पत्रकारिता को ग्रामीण पत्रकारिता कहना उचित होगा।'

आज बड़े – बड़े समाचार पत्रों की स्थिति यह है कि वे चकाचौंध से कभी मुक्त नहीं हो पा रही है। जब कभी ग्रामीण परिवेश का चित्रण इन अखबारों में हुआ तो वह केवल स्वाद बदलने जैसा ही रहा है। भारत के गाँवो में नई चेतना और वैज्ञानिक विकास का प्रचार – प्रसार पत्रकारिता के द्वारा आसानी से किया जा सकता है। देश की ग्रामीण जनता की समस्या का निवारण, उनके जीवन में व्याप्त कुप्रथाओं को दूर करना, खेती के बारे में नवीन खोजो की जानकारी देना, ग्रामीण उद्योगों को बढावा देना, ग्रामीण जनता को रोगों के बचाव की जानकारी देना ग्रामीण पत्रकारिता का महत्वपूर्ण काम है।

ग्रामीण पत्रकारिता उसे कही जाएगी जिसमें ज्यादा से ज्यादा जानकारी गाँवों की होती है। जो पत्र गांवों में प्रचलित परंपरागत लोककला, लोकसंस्कृति, लघुउद्योग, नारी – शिक्षा, पशुपालन, खेती, खाद्य, बीज, प्रौढ़शिक्षा, परिवार कल्याण, परिवार नियोजन आदि से संबंधित सामग्री प्रकाशित कराता है।

ग्रामीण पत्रकारिता मे विशेष रुप में कृषि पत्रकारिता महत्वपूर्ण रही है। भारत में विज्ञान तंत्रज्ञान

ने भलेही प्रगति कर ली हो किंतु गाँवों के किसानों को यह तक खबर नहीं कि विज्ञान ने ऐसे अविष्कार किये है। जिससे फसल कई गुना ज्यादा निकल सकती है। किसानों को इस बात का पता नहीं है कि किस मौसम में कौन – कौन से बीज तथा खाद का प्रयोग करना चाहिए । यहाँ का किसान यह नही जनता है कि फसल तयार होने के बाद उसे कहाँ ले जाकर बेचा जाए जिससे उसे अधिक से अधिक लाभ हो सके। इस प्रकार अधूरी जनाकारी, अनभिज्ञ अंधाविश्वासों से ग्रसित भारतीय किसान नयी जानकारी के अभाव में पुराने ठर्रे पर चल रहा है। इस कारण उसे किसी भी प्रकार का फायदा नहीं हो पा रहा है। वह रात – दिन मेहनत करता है, पसीना बहाता है, अथक परिश्रम का लाभ वह नहीं ले पाता। उसके परिश्रम तथा खून – पसीने का लाभ दूसरे लोग उठा रहे है। कृषि पत्रकारिता के द्वारा किसानों के हितों के लिए उनके काम के तरीके में नवीन खोज और प्रविधि को अपनाने हेतु आजादी से प्रेरित किया जा सकता है। कुछ लोग ग्रामीण पत्रकारिता को ही कृषि पत्रकारिता कहते है। दोनों में मुलभूत अंतर है, इन दोनों का क्षेत्र अलग है तथा इनकी अपनी – अपनी विशेषताएँ है। कृषि पत्रकारिता ग्रामीण समाज की आवश्यकताओं के अनुरुप न होकर वह सीधे – कृषकों के हितों और लाभों से जुड़ती है। कृषि पत्रकारीता में कृषि अर्थशास्त्र, मुद्रा एवं कृषि रसायन, कीटशाला और जीव – विज्ञान, कृषि प्रसार, पशु – पालन, तथा दुग्ध व्यवसाय, शारीरिकी, वंशगति और उद्यानशास्त्र आदि विषय आते है। कृषि पत्रकारिता के अंतर्गत बाजार भाव, दुग्धपालन, फलउत्पादन, फसल रिपोर्ट, अनाज के भाव, मंडी की ताजा खबरें, मोसम का समाचार आदि प्रकाशित होते है। किंतु आज ग्रामीण एवं कृषि पत्रकारिता का भाविष्य उज्वल दिखाई देता है क्योंकि कई अखबारों में ग्रामीण एवं कृषि पत्रकारिता ने अपना वजुद निर्माण कर उसे एक नई दिशा देने का प्रयास इस पत्रकारिता ने किया है।

# पत्रकारिता में रोजगार की संभावनाएँ

**योगेश गायके,** वाणिज्य द्वितीय वर्ष

**आज वैश्वीकरण** का युग है। इस युग में समाचारपत्र का बहुत महत्व है। इस समाचार पत्र में पत्रकारिता की अहम् भूमिका है। रेडियो, टेलीविजन, समाचारपत्र में विश्व में घटित घटनाओं के समाचार पत्रकारिता के द्वारा ही हमें उपलब्ध होते है। संचार के क्षेत्र में यह एक क्रांति है। कोई भी समाचार हमें पल भर में देख, पढ या सुन लेते है, वह पत्रकारिता के कारण ही। उसके पीछे पत्रकार लोगों की मेहनत, एकाग्रता महत्वपूर्ण है।

भारत का पहला समाचारपत्र 'बंगाल गजट' है। जिसका प्रारंभ सन १७८० में बंगाल में हुआ। इसके आरंभ होते ही देश के विविध भागों में, भाषाओं में अनेक समाचारपत्र प्रकाशित होने लगे। हर समाचारपत्र का ध्येय भिन्न होने के बावजूद वे समाचार पत्र राष्ट्रीयता से संबंधित थे। उनका लक्ष्य मनोरंजन, ज्ञानवर्धन और सूचना का प्रसारण था। उसी आधारपर पत्रकारिता भी निर्भर थी।

पत्रकारिता ऐसा क्षेत्र है जिसमें देश के युवकों के लिए रोजगार की कमियाँ नहीं है। इसकारण युवाओं को सामान्य कोर्स की बजाए पत्रकारिता जैसे व्यावसाचिक कोर्स की और ज्यादा ध्यान देना चाहिए। यह क्षेत्र देश के युवाओं को अपने करिअर के साथ – साथ अपने वैयक्तिक अभिव्यक्ति का सशक्त, प्रभावशाली माध्यम है। वर्तमान परिप्रेक्ष्य में समाचार पत्रों और न्यूज चैनलों की बढती संख्या से देश के युवाओं रोजगार की संभावनाएँ बहुत ज्यादा हो गई है।

रेडियो, आकाशवाणी, दुरदर्शन, प्रिंट मीडिया, न्यूज चैनल आदि विभिन्न क्षेत्रों में पत्रकारिता की जरूरत है। रेडियो की शुरुआत १६ मई १९२४ को हुई, इसी तरह १५ दिसंबर १९५९ को दूरदर्शन की शुरुआत हुई। आकाशावाणी ने बहुजन हिताय: बहुचन सुखाय... और दूरदर्शन ने सत्यं – शिवं – सुंदरं के मूल मंत्र को अपनाकर जनता के हित हेतु प्रसारण शुरु किया। इन समाचार चैनलों के अलावा अन्य कई समाचार चैनलों, विदेशी चैनलों के माध्यम से प्रसारित किए जानेवाले समाचार घर-घर में पहूंचते है। यह समग्र कार्य पत्रकारिता के माध्यम से ही संभव है।

प्रिंट मीडिया में समाचारों की कागजों पर छपाई होती है। इसमें भी विविध समाचार एजंसियों से समाचार प्राप्त किए जाते है। इसके अलावा पत्र के अपने रिपोर्टर भी शहर में घुमकर समाचार प्राप्त करते है। उपसंपादक समाचार लेखन का कार्य करते है। इसके साथ – साथ इस टीम में प्रोड्यूसर, इंजीनियर, कॅमरामन, वीडियो संपादक, ग्राफिक, आर्टिस्ट, मेकअप आर्टिस्ट, टेप लाईब्रेरी, समाचार संपादक तथा अन्य बहुत सारे कर्मचारीगण शामिल होते है। यह समग्र देश के युवाओं को रोजगार के अवसर प्रदान कर देते है।

इस क्षेत्र में समाचार लेखन, वाचन और प्रसारण तक यह टीम गंभीरता से एक – दूसरे से जुडी रहती है। समाचार वाचक एंकर की भूमिका निभाता है। समाचारपत्र, रेडियो और टेलीविजन में समाचार प्राप्त करने के अनेक साधन है – संवाददाता, समाचार एजेंसियाँ, भेटवार्ताएं, साक्षात्कार, क्षेत्रीय जनसंपर्क अधिकारी, राजनीतिक पार्टियों के प्रवक्ता आदी। इन समग्र पदों पर देश के युवाओं को आवश्यक पात्रता प्राप्त करने रोजगार मिल सकता है।

वर्तमान में मीडिया के सभी माध्यमों की संख्या बहती जा रही है। इसले इसमें योग्य व्यक्तियों की आवश्यकता भी बढ़ गई है। रोजगारों का अवसर प्रदान करने हेतु विभिन्न विश्वविद्यालयों तथा कॉलेज में बी.ए. और एम.ए. के स्तर पर व्यावसायिक कोर्स चलाए जा रहे है। कॉलेज में प्रशिक्षण हेतु मीडिया लॅब भी स्थापित की गई है। सीर्फ हमें आवश्यकता है इस क्षेत्र में अपनी योग्यता, क्षमता और प्रतिभा के अनुसार रोजगार प्राप्त कर लेना ।

# समाज में पत्रकार की भूमिका

**युवराज नाईक,** वाणिज्य तृतीय वर्ष

**मानव का** अपने आसपास में घटित घटनाओं, चीजों और पदार्थों के बारे में जानकारी रखना सहज स्वभाव गुणधर्म है। इन सभी के बारे में कोई आश्चर्य कारक बदलाव हो जाता है, तब उसके मन में एक जिज्ञासा भाव निर्माण होता है। उसी जिज्ञासा की परिपूर्ति हेतु वह अधिक प्रबलता से नूतन कार्य या खोज करता है। यही जिज्ञासा समाचार और व्यापक अर्थ में पत्रकारिता का मूल तत्व है। मानव में जिज्ञासा नहीं रहेगी तो समाचार की भी जरुरत नहीं रहेगी। इसी कारण पत्रकारिता जन से लेकर जन के या समाज के हित के लिए है।

पत्रकारिता का जब जन्म हुआ तब विश्व के किसी कोने में घटित घटना का समाचार कभी – कभी मिलता था। वर्तमान में स्थिति यह है कि हमं छोटे से छोटे स्थान पर भी जन संचार, संपर्क एवं समाचार प्रस्तुतिकरण के विभिन्न माध्यम मिलते है। विज्ञान की प्रगति के कारण हमारे सामने नये साधन प्रस्तुत हो रहे है। समाज में हर पल घटित होनेवाली धड़कन, आवाज सुनाई दे रही है। आज की पत्रकारिता सामाजिक जीवन की रंगत को स्पर्श कर रही है। उसका स्वरुप नया रुप धारण कर लक्ष्य महान हुआ है। इस वजह से जनसंचार और जन संपर्क के समग्र माध्यम पत्रकारिता के अंतर्गत समाविष्ट हुए है।

पत्रकारिता एक ऐसा माध्यम है जिसमें समाज की, जन जीवन के विभिन्न रुपों को समाविष्ट करता है।

**सत्यता :**

समाज के लिए पत्रकारिता का सबसे पहले कार्य है सत्यता, सच्चाई जन या समाज के सामने लाना पत्रकारिता का आधार है। शिक्षित या अशिक्षित आज भी छपे हे अक्षरों पर ज्यादा विश्वास करते है। उसे मालूम है कि सच्चाई को दबाने या नष्ट करने की या परिवर्तित कर देने की कोशिश बार – बार होती है। ऐसे समय पत्रकारित जनता के हित के लिए सच्चाई सामने लाती है। यह सत्य कहने का साहस पत्रकारिता में होता है।

**अन्याय का विरोध :**

सच्चाई के साथ – साथ अन्याय का विरोध स्वाभाविक है। लगभग अधिकत्तर देशों की पत्रकारिता का इतिहास यही कहता है कि उसने आरंभिक अवस्था में तत्कालिन सत्ता के अन्याय के विरोध में संघर्ष किया भारतीय लोगों अग्रेजों के अन्यायी सत्ता को अंत करने के लिए पत्रकारिता का ही आधार लिया। हिन्दी केसरी, भारत मित्र, कर्मयोगी, प्रताप, आदि पत्र – पत्रिकाएँ अंग्रेजी नीति के खिलाफ थी। यह पत्र – पत्रिकाएँ अन्याय के विरोध में आवाज उठानेवाली शक्ति थे।

आम आदमी से लेकर अमीर तक, बडे से बडे राष्ट्र पर जब – जब अन्याय हुआ तब – तब उसके विरोध में लड़ने वाली शक्ति के रूप में पत्रकारिता ने कार्य किया ।

**प्रेरक शक्ति –**

पत्रकारिता देश के लिए प्रेरक शक्ति के रुपमें कार्य करती है। द्वितीय विश्वयुद्ध के समय कई देशोने समाचार पत्रों और पत्रकारिता के द्वारा जनता को देशप्रेम से परिचित कर उसका उपयोग प्रेरक शक्ति के रुप में किया। इतना ही नहीं हर देश के लोगों को शक्ति प्रदान करने के लिए उसके विविध आयाम हमारे सामने आते है। जन और समाज में शिक्षा,

कला, साहित्य, अर्थ, विज्ञान, राजनीति इन समग्र क्षेत्र में पत्रकारिता ने शक्ति का विकास करने के पत्रकारिता निरंतर विकसित हो रही है।

**आशा और जिज्ञासा**

अधिकत्तर लोग सुबह होते ही समाचार पत्र को हाथ में पढ़ने के लिए लेते है। चाय की चुस्कियाँ लेते हुए विश्व में घटित होनेवाली घटनाओं से जुडने की आशा और पढ़ने की जिज्ञासा उनके मन में रहती है। जब एक – दो समाचार पत्र उनके सामने आ जाते है तो उनके द्वारा अपनी जिज्ञासा पुरी करते है।

आज अपने कमरे में बैठकर व्यक्ति विश्व से तुरंत जुड जाता है। उसका परिचय प्राप्त करने लगता है। पत्रकारिता सिर्फ दुनिया का हमें परिचय नहीं प्राप्त कर देती बल्कि विश्व स्तर पर परिवर्तित परिवेश से हमारा साक्षत्कार कर देती है। जन या समाज को यथार्थ से जोड देती है।

**भविष्य निर्माता** –

पत्रकारिता समाज के लिए सही दिशा देकर उनका भविष्य निर्माण कर देती है। यह कार्य वह वर्तमान की परिभाषा के आधारपर करती है। मानव जाति का इतिहास उसी के आधार पर निर्माण होता है। पत्रकारिता जन के निर्णयों का संग्रह न कर जनहित के लिए कार्य करती है। प्राचीनकाल से लेकर आजतक जो भी राष्ट्रनिर्माता, समाजसुधारक, संत, राजा – महाराज हुए उन सभी ने जो समाजहित के लिए कार्य किया उसे वर्तमानकाली समाज के सामने लाकर अपने भविष्य निर्माण का कार्य करने के लिए पत्रकारिता अहम् भूमिका निभाती है।

**अंतर्दृष्टि का विकास** –

पत्रकारिता के द्वारा मनुष्य अपने अंदर छिपी हुई शक्तियों का विकास करने में समर्थ होता है। हर इन्सान में स्पष्टवादिता, साहसिकता, निर्भिडता, सच्चाई रहती है। किंतु व्यक्ति उसे बाहर नहीं लाता। पत्रकारिता इन्सान को अपने व्यक्तित्व में ऐसे गुणों का समावेश करा देती है। वह हमें निष्ठा, शक्ति का पाठ सिखाती है। अपने अंदर सोई हुई आत्मा को जगाती है। आज पत्रकारिता अनेक लोगों के जीवन का आधार बनी हुई है।

**राष्ट्रीय चेतना** –

पत्रकारिता राष्ट्रीय चेतना की वाहक है। अपने देश में इसके जन्म की कहानी ही देशभक्ति के विकास की कहानी है। १९वी शताब्दी में देश की जनता में राष्ट्रीय चेतना का निर्माण करने का कार्य पत्रकारिता के द्वारा ही संभव हुआ है। वैचारिक क्रांति के साथ – साथ सामाजिक क्रांति करने का कार्य पत्रकारिताने ही किया है। आज भी पत्रकारिता के द्वारा विश्व के अधिकत्तर देशों में निरंतर जागरुकता आ रही है। सामाजिक जीवन में होनेवाली क्रांतियों तक पहुँचने के लिए कई पत्रकार लोगों ने अपने प्राण त्याग दिए।

**मानव कल्याण** –

पत्रकारिता जनता के लिए ही है। वह जनता की आवाज है। उसका एक मात्र उद्देश लोकमंगल है। अविकसित देशों में दबी हुई जनता की आवाज पत्रकारिता के द्वारा बाहर आयी है। इस दृष्टि से देखे तो पत्रकारिता जनमत को बनानेवाली उसे विकसित करनेवाली एक शक्ति है। जनता के सुख – दुख, आशा – आकांक्षाओंको सरकार तक पहुंचाने का कार्य पत्रकारिता करती है। जहाँ पर मानव हित या कल्याण है, वहां पर शक्ति या शस्त्र के रूप में पत्रकारिता कार्य करती है।

अत: पत्रकारिता में अनेक प्रकार की शक्तियाँ है। यह मनुष्य को निरंतर संदेश देनेवाली एक पद्धति है। जिसके द्वारा हम देश, काल, जाति, लिंग और धर्म से परिचित होते है। इस कारण पत्रकारिता समाज का मसीहा है।

# पत्रकारिता के विभिन्न आयाम

**अर्जुन मगर,** वाणिज्य द्वितीय वर्ष

**प्रजातंत्र प्रणाली** में समाचार पत्र को अनन्यसाधारण महत्व है। समाचार पत्र प्रजातंत्र का चतुर्थ आधार है और पंचम वेद है। प्रजातंत्र के मूल्यों को आम जनता में निर्माण करना, लोगों को अपने अधिकारों के प्रति सचेत करना, समाज तथा शासक को राह दिखाना आदि उद्देश्य को लेकर पत्रकारिता का जन्म हुआ। वर्तमान में समाचार पत्र लोगों के जीवन का अभिन्न हिस्सा बन गया है। अधिकांश लोगों के दिन का आरंभ समाचार पत्र पढ़ने से ही होता है।

समाचार पत्रों में उत्तरोत्तर विकास होता गया। इस कारण उनके प्रकारों में भी बदलाव हुआ। पाठकों की रुचि में भी विभिन्नता दिखाई देती है। एक भरे – पूरे परिवार में जब समाचार पत्र पहुँचता है, तब उस परिवार के सदस्य अपनी – अपनी रुचि के अनुसार पृष्ठ पढ़ने लगते है। किसी को राजनीति में रुचि है तो किसी को खेलकुद में। कोई वाणिज्य, फिल्म, कृषि, विज्ञान, साहित्य, अर्थ से संबंधित समाचार पढ़ना है। इसी कारण समाचार पत्र में अलग – अलग पृष्ठों में विभिन्न विषयों को लेकर समाचार छपते है। समाचार पक्ष में जितनी विविधता होगी, उतनी ही रुचि पाठकों की होगी। इस आधारपर विद्वानोंने पत्रकारिता के प्रकारों का विभाजन निम्न रुप से किया है–

**खेल पत्रकारिता** –

खेल जगत ऐसा क्षेत्र है जिससे संबंधित समाचारों में लोग ज्यादी रुचि रखते है। विद्यार्थी वर्ग तो इस प्रकार के समाचारों से बहुत रुचि रखता है। स्कूल, कॉलेज, मुहल्लों में हर दिन अनेक खेल प्रतियोगिताओं का आयोजन किया जाता है। खेल पत्रकार के लिए ये सभी स्थल समाचार इकठ्ठा करने के स्त्रोत हो इनमें नगर, राज्य और राष्ट्रीय स्तर की कई प्रतियोगिताएं शामिल है। उनके समाचार लिखना और उन्हें प्रस्तुत करना खेल पत्रकार का कार्य है।

खेल पत्रकार केवल खेल का वर्णन ही नहीं करता बल्कि उसका विश्लेषण, विशेषताओं के साथ प्रस्तुत कर खिलड़ियों के कार्य को उजागर करता है। खेल पत्रकार अपने करतब के द्वारा उसे अधिक मनोरंजक बनाकर उसे लोकप्रिय बनाता है, जिस वजह से खेल समाचार पढनेवाला भी ज्यादा आानंद लेता है। D.D. Sport, Star Sports आदि चॅनल के साथ– साथ हरदिन निकलनेवाले समाचार पत्र में 'खेल जगत' पृष्ठ खेल समाचार ज्ञापित करते है।

**फिल्म पत्रकारिता** –

भारत में पिच्छले पचास वर्षों में फिल्म क्षेत्र में अधिकत्तर प्रगति हुई है। इस कारण भारत का स्थान फिल्म निर्माण के क्षेत्र में हॉलिवुड से भी बढ गया है। बम्बई, कलकत्ता, मद्रास, पूना आदि स्थानों पर फिल्म निर्माण का कार्य किया जाता है। इस कारन फिल्म संबंधी समाचार इसी शहर से होते है। फिल्मी हस्तियों से मिलना, उससे संपर्क प्रस्थापित कर उनसे विस्तृत जानकारी प्राप्त करना, पत्रकारिता का कार्य है। फिल्म समाचार को संकलित करने के लिए फिल्म निर्माण के स्टूडियोज, फिल्मी जगत से

संबंधित कलाकारों, उससे संबंधित लोगों के कार्यकलाप की जानकारी पत्रकारों को इकठ्ठा करनी पडती है।

नये फिल्मों की जानकारी, अदाकारी, व्यक्तिगत जीवन में घटित होनेवाली विभिन्न घटनाएँ, रहस्थमय तथा प्रेरक घटनाओं में लोगों को बहुत रुचि रहती है। इससे संबंधित समाचार प्राप्त करना पत्रकार का कार्य होता है। समारोह, संमेलन, विचार सभा, पुरस्कार, पुरस्कारों का वितरण, फिल्मी हस्तियों से भेटवार्ताएँ साक्षात्कार आदि के आधारपर भी समाचार बनाए जाते है। इसके लिए पत्रकार को फिल्मी जगत की समग्र जानकारी होना आवश्यक है।

**कृषि पत्रकारिता –**

भारत की अधिकांश जनता गाँवों में रहती है। ग्राम्य जीवन और वहाँ पर घटित होनेवाली हर घटनाओं के प्रति लोगों की रुचि होती है। इसलिए कृषि पत्रकारिता का महत्व अधिक है। कृषि समाचार प्राप्त करनेवाले को ग्राम्य जीवन तथा कृषि से संबंधित कुछ महत्वपुर्ण बातों की जानकारी होना आवश्यक है। समाचार जिस इलाके संबंधित है वहाँ पर मुख्य तथा सहयोगकी फसलें कौनसी ली जाती है ? एक साल में कितनी फसले ली जाती है ? सिंचाई के साधन कौन – कौन से है ? फसलों की बुवाई, गुडाई, कटाई की जाती है ? उस इलाके के किसानों के पास कौनसे औजारों, बीज, खाद, किटनाशकों के साधन उपलब्ध है ? आदि बातों की जानकारी समाचार संकलन कर्ता के पास होनी चाहिए।

कृषि से संबंधित संवाददाता को खेती संबंधित सरकारी तथा गैर सरकारी स्तर पर किए जानेवाले कार्य जानकारी रखनी पडती है। कृषि एवं पशुपालन विभाग, कृषि अनुसंधान केंद्र, खेती के उन्नती के लिए सहायक सामग्री, कीडों से फसल को बचाने के साधनों, कृषि महाविद्यालय, कृषि उपज मंडियाँ, कृषि – गोष्टियों, सम्मेलनों एवं समारोंह के माध्यम से समाचार प्राप्त होते है।

**विज्ञान पत्रकारिता**

विज्ञान के प्रगति के कारण आदमी की सुविधों और समाज की सेवा के लिए आज विभिन्न प्रयोग किए जा रहे है। हर दिन कोई न कोई छोटा – मोटा अविष्कार मानव के सामने आ रहा है। स्वास्थ्य, शिक्षा, उर्जा, अंतरिक्ष, आवास आदि क्षेत्रों में होनेवाली प्रगति के समाचारों को विज्ञान समाचार लेखक को लिखना पडता है।

वैज्ञानिक नई खोज क्षेत्रों, गोष्टियों, संमेलनों, देश – विदेश में विज्ञान विषय को लेकर प्रकाशित होनेवाली पत्र – पत्रिकाओं, विज्ञान से संबंधित लेखन द्वारा समाचार प्राप्त होते है। इस क्षेत्र में कार्य करनेवालों संवाददाता विज्ञान का छात्र रहा तो सबसे अच्छा है। उसे विज्ञान की जटील जानकारी रकता है।

**उद्योग, व्यवसाय एवं अर्थविषयक पत्रकारिता**

उद्योग, व्यवसाय देश की प्रगति में सहायक होते है। उद्योगों की प्रती दिन की प्रगति एवं व्यवसायों से संबंधित समाचार हमारे देश की आर्थिक उन्नती का विश्लेषण करते है। शेयर बाजार की तेजी – मंदी, आवक – जावक, घटने – बढ़ने से संबंधित समाचार इस क्षेत्र से संबंधित लोगों के लिए खास रुचि रखते है। यह समाचार देश की आर्थिक स्थिति का परिचय देते है। इसके अंतर्गत बाजारभाव, उद्योग व्यवसायों की गति, आयोजन, राष्ट्रीय और आंतर्राष्ट्रीय उत्पादनों की जानकारी, देश – विदेश की बैंकिंग पद्धतियाँ, अर्थविषयक स्थिति आदि का उल्लेख आँकडों में किया जाता है।

इस क्षेत्र के पत्रकारों के लिए उस इलाके की जानकारी सूक्ष्मता से होनी चाहिए। वहाँ के लोगों की

रुचि, उद्योग धंदों और मजदूरों की उपलब्धि, शेयर बाजार, अनेक क्षेत्रों की अर्थव्यवस्था का तुलनात्मक अध्ययन समाचार लेखक के लिए आवश्यक है। आज Economic Times जैसा समाचार पत्र उद्योग, व्यवसाय एवं अर्थविषयक को लेकर चलता है।

**स्वास्थ्य पत्रकारिता**

स्वास्थ्य पत्रकारिता आज के युग की जरुरत है। आधुनिक युग में व्यक्ति ज्यादा से ज्यादा भौतिक साधनों का प्रयोग कर रहा है। ऐसी स्थिति में वातावरण में विभिन्न प्रदुषण निर्माण हो रहे है। जिसका असर मानव स्वास्थ्य पर हो रहा है। स्वास्थ से संबंधित जानकारी देने हेतु स्वास्थ्य पत्रकारिता का आरंभ हुआ है। स्वास्थ्य संबंधी जागरुकता लोगों में निर्माण करने हेतु वर्तमान समय में कुछ समाचार पत्र – पत्रिकाएँ, विभिन्न चॅनल तथा दूरदर्शन पर स्वास्थ्य विषयक स्वतंत्र रुप से अपना पर्चा निकाल रहे है।

लोगों में स्वास्थ्य संबंधी जागरुकता निर्माण करना, स्वास्थ्य संबंधी अच्छी आदतें निर्माण करना, अच्छे अस्पताल, डॉक्टरों की जानकारी देना, स्वास्थ्य क्षेत्र की महत्वपूर्ण बातें आदि कार्य स्वास्थ्य पत्रकारिता करती है। जैसे – पोलिओं निर्मुलन, क्षयरोग निर्मुलन, एच.आय.व्ही. प्रतिबंध आदि की जानकारी लोगों तक पहुँचाना स्वास्थ्य पत्रकारिता करती है।

**पर्यावरण पत्रकारिता** –

लोगों में पर्यावरण के बारेमें जागृकता लाने की दृष्टि से पर्यावरण पत्रकारिता महत्वपुर्ण है। पेड को काटनेसे वनों का होनेवाला विनाश, औद्योगीकिकरण से बढनेवाला प्रदुषण, शहरों में बढनेवाले मकान, यातायात के साधनों में बढोत्तरी आदि की वजह से पर्यावरण को हानी पहुँच रही है। इस पर्यावरण के प्रति लोगों को सचेत करने लिए पर्यावरण पत्रकारिता का आरंभ हुआ।

पर्यावरम की रक्षा, बढोत्तरी करने हेतु लोगों में जागृती लाने का सशक्त माध्यम समाचार पत्र है। साथ –साथ रेडियो, दूरदर्शन आदि के द्वारा पर्यावरण विषय समाचार, चर्चाएँ, संगोष्ठियाँ, साक्षात्कार, लेख आदि के द्वारा जन में सचेतता लायी जाती है। वर्तमान में पर्यावरण से संबंधित पत्र – पत्रिकाएँ प्रकाशित हो रही है। नॅशनल जिओग्राफी जैसे चॅनल विशेष तौरपर समाज में सचेतता लाते है।

**राजनीतिक पत्रकारिता** –

देश का हर व्यक्ति किसी न– किसी राजनीतिक पार्टी से संबंध रखता है। भारत जैसे बहुभाषिक प्रजातंत्रवाले देश में कई राष्ट्रीय और प्रादेशिक राजनीतिक पार्टियाँ है। देश की बागडौर अच्छी तरह चलाने, कानुन तथा सरकार के नीति – नियमें का पालन करने हेतु राजनीतिक पत्रकारिता का प्रारंभ हुआ।

अधिकतर समाचार पत्र – पत्रिकाएँ, विभिन्न प्रकार के न्यूज चॅनल देश की राजनीतिक गतिविधियों का बखान करते है। सत्ताधारी पक्ष हो या विपक्ष हो दोनो पर राजनीतिक पत्रकारिता तीखा प्रहार करती है। जिसके द्वारा जनता का कल्याण हो।

पत्रकारिता का कोई भी रुप हो वह जनहित के लिए, लोकमंगल के लिए कार्य करता है। जिस में सत्यं, शिवंम, सुंदरम्, की कामना होती है। क्योंकि वह जानता है कि सच को जब दबाने की, नष्ट करने की कोशिश की जाती है तब उससे उबरकर असलियत सामने आ जाती ही है।

# सुना है कि अब मैं पत्रकार हो गया हूँ

**अशोक बाबासाहेब गिनगिने,** कला प्रथम वर्ष

सुना  है कि अब मैं पत्रकार हो गया हूँ
ना समझ था पहले अब समझदार हो गया हूँ ।
बहुत गुस्सा था इस व्यवस्था के खिलाफ
अब उसी का भागीदार हो गया हूँ।
दिल पसीजता था राह चलते हुए पहले
कलम हाथ में आते ही दिमागदार हो गया हूँ।
कभी नफरत थी कुछ छपी हुई खबरों से मुझे
आज उन्ही खबरों का तलबगार हो गया हूँ।
सोचा था अलग राह पकडूगाँ पत्रकार बनकर
अब मैं भे भेड़ चाल में शुमार हो गया हूँ।
लिखकर बदलने चला था दुनिया को मैं
नोकरी की वफादारी में खुद बदल गया हूँ।
मुझे दिख रही है देश की तरक्की सारी
क्योंकि अब मैं नेताओं का यार हो गया हूँ।
इकबाल, वंदे मातरम् कई नारे आते है मुझे
पर क्या करुँ विज्ञापनों के कारण लाचार हो गया हूँ।
ढूँड़ता था पहले देश की बेहाली के जिम्मेदारों को
समझ गया हूँ सब कुछ, अब मैं समझदार हो गया हूँ।
सुना है कि अब मैं पत्रकार हो गया हूँ ।

## हाँ ! मै एक पत्रकार हूँ

**संकलन – मुक्ता मल्हारी गायके**, कला प्रथम वर्ष

हाँ ! मै एक पत्रकार हूँ
मै एक चलता फिरता समाचार हूँ ।
हॉ ! मै एक पत्रकार हूँ ।

कलम ही हमारी ताकत है, जान पर अनेकों आफत है फिर भी मैं
कभी न डरता हूँ, सर्वदा सच्चाई ही लिखता हूँ।
हॉ ! मै एक पत्रकार हूँ ।
मैं एक चलता फिरता समाचार हूँ ।।
आवाज – हिन की आवाज हूँ, लोकतंत्र का मैं साज हूँ, जनता की
आलोचनाओं का हर बार बनता मैं शिकार हूँ।
हॉ ! मैं एक पत्रकार हूँ ।
मै एक चलता फिरता समाचार हूँ ।।
कलम के बूते मै लिखता हूँ, कलम के चलते ही मै जिता हूँ,
धमकियों को रख किनारे, बेबाक पत्रकारिता मै करता हूँ ।
हाँ ! मै एक पत्रकार हूँ ।
मै एक चलता फिरता समाचार हूँ ।
रोज नये खबर के लिए मै कड़ी मेहनत करता हूँ । इन सब को कर
दरकिनार हर रोज ढाडस बांधे मै निकलता हूँ ।
हाँ ! मै एक पत्रकार हूँ
एक चलता  फिरता समाचार हूँ
हाँ ! मै एक पत्रकार हूँ ।

प्रेरणा
२०१९-२०

# English Section

**Index :**


1 “History of Journalism in India” Divya Subhash Padmavat (B. Sc. SY)
2 “News Paper past present & future” Boken Mayur Rajiv (11th Science)
3 “News paper and Democracy” Amol Abasaheb Bidwe (B.A.T.Y.)
4 “Newspaper and Its Role as a Study Material” Vyanktesh Diliprao Daud (BA,TY)
5 “How Advertising Has Become an Agent of Social Change In News” Vaishnavi Gopal Mehta (12th Commerce)
6 “Ethics in journalism” Yuvraj Hanumanrao Naik (B.com TY)
7 “Advantages Advertisement in Print Form” Dipak Rajesh Padmavat (11th Commerce)
8 “Newspaper Essays: Important For Students And Children” Ashiya Sattar Sheikh (B.A.T.Y.)
9 “Newspaper and English language Teaching” Diksha Ashokrao Wagh (B.A.T.Y.)
10 “Role of Advertisement in Newspaper”Rajesh Kondiba Katare (B.A.T.Y.)

# "History of Journalism in India"

**Divya Subhash Padmavat,** B. Sc. SY

**Introduction:** With the permission of East India Company, a person named James Hicky started a newspaper in India called 'Hicky's Gazette' (or Calcutta general advertiser). There were only four pages to this entire newspaper. This newspaper was well-known for openly criticizing the money-making and political policies of the East India Company.

In 1792, Bombay Courier relaunched this newspaper and published advertisements in English and Gujarati. The first newspaper under Indian Administration appeared in the year 1816. It was published by Gangadhar Bhattacharjee as the "Bengal Gazette". It had advocated the reforms of Raja Ram Mohan Roy. Raja Ram Mohan Roy published The Brahmanical Magazine to counteract the religious propaganda of the Christian missionaries of Serampore. In 1822, in Mumbai by Ferdunji Marzban, there was the rise of Chandrika Samachar in Bengal and Bombay Samachar. In Bengal, the first Hindi newspaper was Oodunt Martand and it was published in 1826. Later, a newspaper introduced known with the name Jami Jahan Numa. In 1832, Pune saw its first Anglo – Marathi Newspaper which was published by Bal Shastri Jambhekar. Mr. Knight merged the Bombay Standard, Bombay Times and Telegraph in 1861 and this brought out the first issue of Times of India.

Fighting for the liberty of press, Hicky was imprisoned and his paper was stopped. Later six papers had started in Calcutta, three in Madras and three in Bombay, in the span of 13 years from 1780 to 1793. Free press of India, this was the basic foundation of during this era, the birth of vernacular press took place and it had mainly a part of liberal views. Even, it was also performing the task of spreading knowledge on various matters.

In 1838, Bombay Times was founded and it was an important newspaper. In current era, the Bombay Times is known as Times of India. Few papers played a very noteworthy role during the fight against British including 'Hindu Patriot'. 'Hindu Patriot' was launched as fighting movement against the British by asking the people not to grow crops for the British traders. The newspaper 'Kesari' ignited the fire of independence in millions and it was owned by the great Indian Freedom Fighter Bal Gangadhar Tilak.

The notable name in the launching of Newspaper in India is Raja Ram Mohan Roy before the name of Bal Gangadhar Tilak, He was one of the pioneers of Indian language journalism with his Persian newspaper Miratool Akbar. In order to indicate to the rulers' knowledge of the real situation of their subjects, he created the newspaper. For the same purpose, he makes the subjects acquainted with the establishment of laws and customs of their rules. Unfortunately, in protest against the Government's Press Regulations, Roy had

to stop this newspaper later.

Bengal Gazette was another important newspaper which had contributed in the freedom struggle and was very popular newspapers in pre-independent India. It was known as Hicky's Gazette in 1780. James Augustus Hicky started it in order to purchase freedom for 'My Mind and Soul'- 'A weekly political and commercial paper, open to all parties but influenced by none.' In essence, this paper was, no better than a scandal sheet so in the very next year means 1781, Hicky was arrested and imprisoned, from where he continued to write for the Gazette.

In the form of Gagging Act, 1857, restrictions were brought back. This was the year which received two different title British and by Indians as the British historians termed 'the Sepoy Mutiny', and a few Indian historians called it the 'First war of Independence.' With the Crown taking over the 'colony' and with the promise of religious toleration and press freedom, the Mutiny brought the rule of the East India Company to a close position. In the English and vernacular press, the main topics of discussion before and after the Mutiny were sati, caste, widow remarriage, polygamy, crimes and opposition to the teaching English in schools and colleges. In particular, Bombay's Gujarati press, surpassed in the defence of the Indian way of life. The Vernacular Press Act was promulgated in 1876.

There was the main difference between English controlled newspaper and the vernacular newspapers as the English-controlled papers entitled The Times of India, the Pioneer and the Madras Mail didn't report it to a great extent while the vernacular papers like Amrit Bazar Patrika and Kesari reported the inaugural meeting at length.

It is the print press which is attracting more advertisers, making up 47% of the whole share, despite of the holding television industry in the country. Only 25% of the total population of the country, Newspapers in the current time have penetrated. It is true that in these days, the digital technology is battering the conventional print newspaper and this is because of the digital phase of current era which has not affected India too much due to less percentage of Indians surfing the Internet regularly. The rich English language, extremely cheap cost and the total availability of the newspapers also help in their sale.

**Conclusion:** Thus, the development of India's economy has had its impact on the newspaper industry. The circulation increased, resulting in increased revenues. As per a report displayed in 2010, the dailies in the regional languages command more than half of the average readership. There are 90 million readers of dailies in the regional languages as compared to 54 million for dailies in Hindi and 8 million for dailies in English.

# "NEWS Paper- Past, Present and Future"

**Boken Mayur Rajiv,** 11th Science

A NEWS paper is a periodical publication containing written information about current event and it is often typed in black ink with a white or gray background. Newspaper can cover a wide variety of fields such as politics, Business, Sports and Art and often including materials such as opinion columns, weather, forecasts, review of local services, obituaries, birth notice crosswords, editorial cartoons, comic strips and advice columns.

Most of the newspaper are having special column for business and they pay their expenses with a mixture of subscription revenue, newsstand sales and advertising revenue. The journalism organizations that publish newspaper are themselves often metonymically called newspapers.

Newspapers have traditionally been published in print casually on cheap on, low-grid paper called newsprint. However, today most newspaper, are also published on websites as online newspaper, and some have entirely abandoned their print versions.

The History of newspaper means the newspaper which are developed in the 17th century, as an information sheet for merchants by the early 19th century, many cities in Europe as well as North and South America, published newspaper during the 19th century.

Today, the newspaper in India is the proud institution for our society. While working as a vehicle of persuasion. It has basic function to provide info-edu-entertainment. It can have added the current information. This article deals with the history of newspaper, how it is involved from till now, what impact it paved in the society etc.

Newspaper can be defined as a printed means of conveying current information. Today, the newspaper in India is a proud institution of our society. While working as a vehicle of persuasion its basic function is to provide info-edu-entertainment (information, education and entertainment). It also plays the role of watch dog of the society.

Man is a social animal and very human being has an unquenchable thirst to communicate. Now a day's man has evolved various systems and technology for communication from the development of language and scripts to printing and finally to the world-wide-web (www) of the internet.

A newspaper typically generates 70-80% of its revenue from advertising and the remainder from sales and subscription and the remainder the portion of the newspaper is not advertising is called editorial content, editorial matter or simply editorial although the last term is also used to refer specifically of those articles in which the newspaper and which guest writers express their opinions.

Thus, though, there are many changes in the form of newspapers, main aim to give information to the maximum number of people is the basic task of newspapers.

# News paper and Democracy

**Amol Abasaheb Bidwe,** B.A.T.Y

The present essay highlights on the importance of newspaper and the crucial role of newspaper. It plays the important role in several sectors such as the entertainment. Newspaper is considered as one of the prominent tool of democracy. Almost in every country of the world, newspaper had been playing the role of torch bearer. Newspaper also questions to the rulers and represents people as the tool to control the monopoly.

It opens and displays the dark side of rulers who are acting against the principles of democracy. The researcher attempted analytical method based on primary and secondary sources.

Newspaper is the voice of people which plays a very important role in democratic countries like India. It forms the important link between the public and the government. It is the newspaper through which the public comes to know about the priorities, polices, and programs of the government. Similarly, the government can keep itself well informed about grievances, aspirations, exceptions, and opinion. Newspaper supply news, views and comments to its readers about local, national and international affairs. They help in providing formation about the Public opinion on matter of national and global importance. They not only mould but also reflect public opinion. The editorial and leading articles play a significant role in the newspaper. Even, there are interviews of great people and personality who which inspires readers for their betterment of life. Newspapers are the real watchdog of a democracy and of the right and privilege of the people. Newspaper can play vital role in the construction and regeneration of a country. During our struggle for independence, the newspaper played an important and valuable role. It reminds us great leaders as Tilakji, Gandhiji, Neharuji and other leaders who published and edited newspaper, magazines or wrote articles and reviews. They played a positive role in the process of national struggle for freedom. Their heroic, bold and missionary writing had declared their impact on the masses and consequently they got actively involved in the movement.

The withdrawal of newspaper can motivate the process of an archly in a country. Newspaper maintains the moderate policy between people and government. They question, interrogate policies, views perceptions. Hence, they can work for controlling to people and government who cannot act beyond the limits and restrict in principles due to newspapers.

# "Newspaper and Its Role as a Study Material"

**Vyanktesh Diliprao Daud,** B.A. T.Y.

The present paper highlights on the role of newspaper as a study material formerly. It is believed that only books journals, magazines were the effective medium of teaching. The latest research and study proven that newspaper are playing the vital role as a study material. Different types of news oriented to politics, commerce, business, economics, and more importantly the editorials articles are providing the latest information with updated references and application. The researcher has attempted analytical method in writing the chapter.

Media plays a vital role when it comes to inform the public on what happening around the world, which is very helpful to students who need to be updated on the issues happening in their surroundings. Education channel is a useful newspaper channel in teaching learning process and as a teaching aid. Specially, it is used as a tool to promote the reading culture where a lot of efforts have been invested by the government and other stockholders.

When teacher uses newspaper in the classroom, it helps student to look at things with the bigger scope and it improves their critical thinking skill because they cover a wide range of things all in one pack. Newspapers are more current than textbooks. There is a lot of information which can boost the performance of student in general. Through newspaper, students learn different skills as how one can use photography to tell story which is very encoring to learners who are talented in arts. Newspapers are very helpful in language improvement. If students read frequently, they can improve general knowledge and the current status of the world.

Hearing basically should be to percent practical through teaching aids like newspaper using real life stories written and 30 percent theory so as to provide all round development of child. Newspaper can be used in teaching subject like English, Science, Geography, sport, Music and Business studies.

Newspaper plays a vital role as a study material as it provides latest and overall information about Commerce, Business, Science, Economic and certain fields. It provides knowledge through visual impact which attracts the learners. The content reading of newspaper enhances the language competent and skills.

# "How Advertising Has Become an Agent of Social Change In News"

**Vaishnavi Gopal Mehta,** 12th Commerce

Marketing and advertising play a huge role in shaping our society — the way we see, think, understand and act. In 2019, with over Rs 697 billion, spent on India advertising last year. The average Indian is exposed to over an hour of TV commercials, and as many 5,000 ads every day. The advertising we're constantly consuming paints a picture of society, thus shaping how we view ourselves and what many aspire to. When advertising promotes unhealthy behaviours, it can have very real and it may have very negative effects. It hurt children resulting into increased unhealthy food. As the advertisements on food and rising childhood obesity, and connection between tobacco and alcohol advertisements resulted as the underage smoking and drinking of children in India. Even, more profound than influencing our consumption behaviour, advertising has the ability to shape our aspirations. A great deal of damage can be done in setting unhealthy or unattainable expectations. Mainstream advertising often depicts women as over-sexualized, underweight, and photo shopped to 'perfection'. Studies have found that exposure to this unrealistic, thin; sexualized ideal is linked to disordered eating attitudes, lower self-esteem, negative mood and depressive symptoms among our young girls and women. Given all this, it's no wonder that advertising has generally seen as a negative influence. But it doesn't have to be. While unrealistic, unhealthy images can have very real, harmful effects, advertising with positive messages, depicting an inclusive picture of society can also impact us for good.

The advertising industry will never act as the first pioneer instigating social change- but that doesn't mean- it can't be an important part of the process. We consume massive amounts of advertising day in and day out, and when this content promotes an inclusive picture of society; marketing and advertising can work as an accelerator for social progress. Its value is not in starting the fire, but in fanning the flames. Twenty years ago, it was unimaginable that there would be a lesbian love story in Valentine's Day advertisements, or more importantly, that these women would have the right to marry in 28 states, with the majority of Indian youth supporting it. Advertising's cultural power stems from its ability to shape our perception and give a voice to those outside the mainstream. So what social issues will our advertising address over the next twenty years? To figure that out, we must first stop and ask ourselves — who aren't we listening to today?

# "Ethics in journalism"

**Yuvraj Hanumanrao Naik,** B.com T. Y.

**Abstract:** The present research paper intends to explore the dynamics of journalism in contemporary scenario. The media of all formats has undergone such tremendous changes where it feels very desperate to search of ethics in journalism. Sting operations, video clips, audio clips sensational photography, inside stories, have made media to convert form moral ethical to pure professional. The soul of journalism is to explore, search, and present the truth unfortunately we find the elements of moral sanctity in very less manners.

**Introduction:** We now live and interact in highly mediated system. The form of information produced and distributed by the mass media on a daily basis can impact significantly on the manner in which people, communicates and societies understand each other. This sector has also fancy and several challenges and insecurity the information has found its way into public space it is difficult to take it break. Today, media is biased against groups, people, cast, community, and gender. Some media channels only propagate negativity and channels are delivering news without the quantity as some political leaders, actors, sportsman, critics media for presenting their speakers in a half way that can create controversy and wrong message in a country. There are several cases where people are blackmailed by News Reports. They demand huge amount from the concerning person in return of stopping the news. Several other reporters won with honey trap palm and blackmail their profession. There are various newspaper which publish the extreme the first page instead of giving primarily to the news of education , health , motivate , finance, business, some TV reporter arrange debate program perform like judge and improve their own decisions .

**Conclusion:** Maintaining the ethics in media is a need of time. The performance of journalism in not only a profession to earn money but also a business consist moral, ethics. Hence, it is a need of time. Unfortunately, we are observing a very dangerous condition today

# "Advantages Advertisement in Print Form"

**Dipak Rajesh Padmavat,** Class-11th Commerce)

**Introduction:** Today's era is technical era. The current society is a technologically-obsessed society. People aren't comfortable without the constant connection via some sort of digital device. Some people in the advertising industry would have you believe print advertising is dead and buried because the entire world has moved online but this is not true. Though, technical development is there, yet print media is alive. Still there are many organizations, institutions which prefer offline advertisement in the printed form, sometimes direct in news papers and sometimes pamphlet attached with newspaper and circulated with new papers. There are many reasons behind it; six common benefits of it are as:

**1. Credibility of Leverage:**

In this sector of the Print publications we found following benefits as:

a) It consistently offers readers high-quality.
b) It has reliable content develop credibility.
c) The advertisement can easily leverage this credibility.
d) It is known as the "halo effect," brands who place ads in respected print publications receive the same positive feelings from readers that are associated with the publication itself.

Thus we can define it as the advertisement in Print media can be seen as completely trustworthy and it makes the generating leads and sales much easier.

**2. Influence in Swayed by Print:** As per the Survey of An MRI - American Consumer- "influential," found in those consumers who have the ability to sway other consumers, are influenced by print advertisement with 47% being influenced by magazines and 53% influenced by newspapers.

**3. Bigger Attention of Readers:**

The truth of current scenario is that the digital age has pretty killed the attention of human for a span of time. There are multi different tabs which can be opened with web as:

a) Someone is instant messaging us.
b) Another is texting us,
c) "The Walking Dead" is on the TV in the background.
d) People are simply not as receptive to all of the digital advertising happening around us.

On the other hand, in printing advertisement readers don't typically multitask when they read a magazine or newspaper, making them far more receptive to the ads within the publication.

**4. Unplugging Is In:**

We contacted ourselves with the assumption that we are tech-obsessed creatures but the fact is that we are tech-obsessed creatures who have begun to understand the value of "unplugging" every now and then. We tend to turn to print media as a form of entertainment and engagement, when we do unplug from the digital world.

5. **Print Ads Offer More Flexibility and Options:**

Print ads allow you to target your audience. You can choose exactly which section of the newspaper or magazine your audience is most likely to read. You can choose to run ads in specialty magazines or only in papers that deliver to specific geographic locations in your area. You can choose to have your ads run in Wednesday's paper or Sunday's paper.

Beyond these options, print allows you to tailor your campaigns to fit your budget by offering quarter-page, half-page and full-page ads. And finally, advertising in print publications mean you'll actually work with a human being when buying your ad space as opposed to relying on an online algorithm to decide where your ads should live.

**6. Print Advertisement Drive Action:**

There is the report by The Nielson Global Trust which says that 65% of print readers typically take some form of action after viewing a newspaper advertisement such as: people who viewed an advertisement from a national grocery chain were six times more likely to buy the product than the retail average.

**Conclusion:** Thus, we can say that results can be dramatic when print and digital advertising work synergistically. To create a bridge between the print-digital divide, the use of QR codes and other interactive features within print advertisement has helped. Advertisement which includes free download offers or social media URLs support as the prediction of engaging the brands online. It inevitably helps to drive more traffic and create awareness. Effective communication of a message, and drive action is the key of successful advertisement campaigns which helps to reach targeted markets. Advertisers can leverage the power of both print and digital to create the most awareness and revenue possible, through the embracement of the many advantages of print advertising and adding it to their marketing mix.

# Newspaper Essays: Important For Students And Children

**Ashiya Sattar Sheikh,** B.A.T.Y.

The present chapter focuses on the effect of newspaper and its benefits for children and students. Newspaper is one of the greatest means of communication between people and the world. They are a great source of knowledge. The essays of newspaper have immense importance for children. Various newspapers publish special stories, quiz, and essay. It ultimately proves its Importance. In the present essay, there is an attempt to analyze the method based on primary and secondary data.

Newspaper has created a positive impact on society. It helps people to become aware of current affairs and stay curious about them. Newspaper also has releases incredible articles that coverall topics viz., social issues, cultures, arts and many more. The essays written in newspaper contain very sharp, pointed and updated information.

It is true that the complex ambiguous and connotative words are always difficult to understand for children and students. Impressive, effective and attractive words catch the attention of children. Simple words with simple sentence structures create an interest to learn. Newspaper consisting essays provide the habit of curiosity amongst children. Hence, they enjoy it properly. The essay on great leaders, hobbies, dreams, sports always provide useful information to students.

The topic selected in newspaper chose for children are student's interest oriented. They try their level best to maintain the linguistic compatibility as well as new words is introduced to the student. The essays written in newspaper mostly attract the psychology of students. The matter concerning Principles, Environment, Science, History and Geography provide a base in giving introductory knowledge to students with an effective use of graph, Picture and tables in essay provides a healthy background to learning process.

Thus, Newspaper essay plays a vital role for children and student in various curious matters and topics. They get chance to enter in the several unknown areas of knowledge. It is quite useful in modern sense.

# Newspaper and English language Teaching

**Diksha Ashokrao Wagh,** B.A.T.Y

The concept of globalization has changed as the perception of the world. It brought a large world into village and several local objects are global. The mass media is very important component of globalised world. The affairs belong to one country and they are crucial for other country too. Hence, the acquisition of language got special mention and recognition. The present paper aims to highlight the role and important of newspaper in language learning or acquisition. The researcher has attempted analytical method to give justice for the selected problem.

Information dissemination is the chief function of the newspaper. The newspaper today, has the added responsibility of providing instruction. A newspaper fulfils this function of instruction through its enlightening comments and special features. Efforts were made in USA to integrate the reading of newspaper in to classroom activities. The programme was called newspaper in education i.e. NIE. It brought an idea which encourages the reading habit, underscores the responsibility of citizenship.

Newspaper deals with contemporary issue and provides motivation for reading and dissection. It provides students a lot of language practice through activities which develop reading, writing, speaking and listening skill. In newspaper activity, teacher should read the newspaper loudly with correct stress and pronunciation. The students listen to the news with proper attention. After that, the student listen it and then he/she has to read the same piece of article with correct accent. The activity shows how well they are listening to the article.

Though Newspaper is informal media of communication, it provides very influential education. They are the cheapest reading material. It can be used to teach areas from the alphabet to sentence structure, grammar, discourse, techniques stile and all the major composition skills including creative activity.

Newspaper plays a vital role in language teaching. In covers the news item which belongs to various areas and ultimately the readers get acquainted with various new words, sentence construction. At a large extend newspaper; it is very useful for vocabulary enriching accent and connotations pattern.

# Role of Advertisement in Newspaper

**Rajesh Kondiba Katare ,** B.A.T.Y.

The present research paper aims to study the role of advertisement in newspapers. Today the world accepts only those things which attract to the buyers and readers. Advertisement is playing a very vital role in the establishment and creation of everything. Even you possess a genuine quality and lack of advertisement, it is doubtful to say about the intensity of success. Newspaper is a medium which readers to maximum people in an attempt. It helps to convey our passion perception to all at a same time as compare to the other mediums of social media newspaper still has a reliability.

The research has attempted analytical method based primary and second sources. Indian wakes up to reading newspaper. The educated class read newspaper as a sheer habit. Even today, when the digital media arguably is taking a way almost the major chunk of the business, if newspaper decide to vanish, there will be a troubles after all, newspaper still remain the most reliable media vehicle. There is no doubt that the advertisements are overnumbered.

**Advantages:**

Newspaper advertising has been the most important form of advertising since the time the word advertising came in to being. It might sound not good but the fact remains that there is no media vehicle can even think of competing with the reach of newspaper. One of the most crucial factors which answer the question why is advertising so important in the newspaper because of the local regional and national courage.

One can give innumerable number of reasons as to why newspaper advertising is so important and it might differ for different types of advertising and categories but there are some dispersible and interesting reasons which prove newspaper advertising diseur a place of prominence. The reach of newspaper and the one of the oldest form of media it has got immense impact and influence over the mind of readers. The changing form from black and white to colour has received special recognition.

Newspaper advertising is one of the most trusted medium of advertising. They are not intensive in nature. The fine tuning of a brands merge can be best done by newspaper. It is the fast form of advertising and it indentifies the brand and its quality. It is one of the quick and result oriented medium.




सेलू ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ. संजय हरबडे कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व जनजागृती निर्माण होण्याच्या हेतूने विद्यार्थांना मार्गदर्शन करीत असताना.



मराठी विभागाच्या वतीने शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जन्म शताब्दी निमित्त आयोजित अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य - समकालीन परिप्रेक्ष्य या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्रात मनोगत व्यक्त करताना प्रसिद्ध कवी प्रा. इंद्रजित भालेराव.



प्रो. गोविंदराव लटपटे कम्युनिकेशन अँड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट लॅबचे उद्घाटनसोहळा प्रसंगी मनोगत व्यक्त करताना श्री. गोपीनाथराव लटपटे.




गुणवत्ता सन्मान पारितोषिक योजनेच्या समारोहात प्रमुख अतिथी श्री. अजित बिनायके विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करीत असताना.

रा. से. यो. विद्यार्थी उपक्रम समितीच्या वतीने वन गॉड वन नेशन या संकल्पनेवर मार्गदर्शन करीत असताना श्री. जकियोद्दीन खतीब.







कॅडेट संगमेश मलवडे याची सैन्यात निवड झाल्यानंतर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी त्यांनी सेवादलातील विविध संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठी ग्रंथालयाचे उत्कृष्ट सचिव म्हणून सन्मानित करण्यात आले.






महाविद्यालयामध्ये आयोजित सायबर सेफ वुमन या कार्यक्रमाप्रसंगी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना पोलीस निरीक्षक वसुंधरा बोरगावकर मॅडम

संस्थेचे सहचिटणीस डॉ. व्ही.के. कोठेकर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त त्रिदिवशीय कौशल्य विकास कार्यक्रमाचे आयोजन करुन त्यांचा सत्कार करण्यात आला.





महाराष्ट्र शासनाच्या निर्देशाप्रमाणे कोरोनाच्या लॉकडाऊन काळात महाराष्ट्रातील व महाराष्ट्राबाहेरील ६५ मजुरांची निवास व खानपान व्यवस्था श्री. श्रीरामजी भांगडिया वसतिगृहात करण्यात आली होती. याप्रसंगी मा. उपजिल्हाधिकारी श्री. उमाकांत पारधी, तहसीलदार श्री. बालाजी शेवाळे व इतर सहकारी यांची वसतिगृहास भेट.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने आयोजित रक्तदान शिबीर.






वार्षिक स्नेहसम्मेलनानिमित्त आयोजित रांगोळी स्पर्धेमध्ये आपली कला सादर करताना विद्यार्थिनी

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने उत्कृष्ट नियतकालिकांच्या स्पर्धेत तृतीय क्रमांकाचे बक्षीस स्वीकारताना मार्गदर्शक प्राध्यापक व संपादक मंडळ.



# प्रेरणा

२०१९–२०

## अहवाल विभाग

अहवाल २०१९-२०

वरिष्ठ विभाग

विद्यापीठ स्तरावरील उपक्रम

१. मराठवाडा विकास आणि मुद्रित माध्यमांची भूमिका
२. पदवी वितरण समारंभ अहवाल

महाविद्यालयीन स्तरावरील उपक्रम

१. सुवर्ण महोत्सव
२. महाविद्यालयाचे यश व सन्मान
३. विद्यार्थी उपक्रम समिती
४. गुणवत्ता सन्मान पारितोषिक योजना
५. विद्यापीठ रौप्य महोत्सव व्याख्यान
६. पदवी वितरण समारंभ
७. नवीन उपक्रम
- भाषा प्रयोगशाळा
- इतिहास संशोधन केंद्र
- बॅचलर ऑफ बिझनेस ऍडमिनिस्ट्रेशन (ऍग्रिकल्चर बिझनेस मॅनेजमेंट)

८. ग्रंथालय
९. हेल्थ क्लब
१०. क्रीडा विभाग
११. स्पर्धा परीक्षा केंद्र
१२. राष्ट्रीय सेवा योजना व उन्नत भारत अभियान
१३. महिला वसतिगृह

१४. महिला सक्षमीकरण कक्ष
१५. श्री. श्रीरामजी भांगडिया वसतिगृह
१७. दूर शिक्षण
१८. य.च.म.मु.वि.नाशिक अभ्यास केंद्र
१९. माजी विद्यार्थी संघटना अहवाल
२०. कोव्हीड - १९ जागृतीसाठी उपक्रम
२१. मराठी विभाग
२२. विज्ञान मंडळ
२३. वाणिज्य शाखा विभाग अहवाल
२४. हिंदी विभाग अहवाल
२५. वनस्पतीशास्त्र विभाग
कनिष्ठ विभाग
१. गुणवत्ता सन्मान पारितोषिक योजना
२. गुणवत्ता विकास प्रकल्प
३. सांस्कृतिक विभाग
४. क्रीडा विभाग
५. राष्ट्रीय सेवा योजना
६. IQAC अहवाल
६. अभिनंदन
७. भावपूर्व श्रद्धांजली
कोलाज (वर्तमानपत्राच्या दृष्टिकोनातून नूतन महाविद्यालय)

# वरिष्ठ विभाग
# विद्यापीठ स्तरावरील उपक्रम

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या रौप्य महोत्सवानिमित्त स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यान**

**व्याख्याते - श्री. महावीर जोंधळे (ज्येष्ठ पत्रकार)**

**विषय - मराठवाड्याचा विकास आणि मुद्रित माध्यमांची भूमिका.**

**दिनांक - २० सप्टेंबर २०१९ (शुक्रवार) स्थळ - कै. रा.ब.गिल्डा सभागृह, नूतन विद्यालय, सेलू.**

विचार मंचावर उपस्थित मान्यवर आणि इतर सर्व मान्यवर... स्वा.रा.ती.म. विद्यापीठाच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत मला विचार मांडण्याची संधी दिली आहे. मला इतर तीन महाविद्यालयांचा व्याख्यान देण्यासाठी पर्याय होता. परंतु मी निवड केली नूतन महाविद्यालयाची. निवडायचे कारण असे की, सेलू ही स्वामी रामानंद तीर्थ यांची कर्मभूमी आहे. ज्या समाजवादी विचाराने प्रेरित झालेली मंडळी या सेलूकरांनी मराठवाड्याला दिली ते श्री. श्रीरामजी भांगडिया, विनायकराव चारठाणकर, द.रा. कुलकर्णी इ. लोकांनी सेलूसह मराठवाड्याच्या विकासात हातभार लावला, त्यामुळे सेलूसारख्या श्रेष्ठभूमीत या व्याख्यानमालेचं पहिलं पुष्प गुंफलं जातंय याचा मला आनंद आहे. मला जो विषय देण्यात आला त्या विषयातील दिग्गज मंडळी या नूतन विद्यालय शिक्षण संस्थेच्या उभारणीमध्ये होती. माझे पत्रकारितेमधील गुरुवर्य अनंतराव भालेराव तसेच अनेक पत्रकार मित्रांमुळे सेलू हे गाव माझ्या अधिक जवळ आहे.

विषयाला प्रारंभ करण्यापूर्वी माध्यमांच्या इतिहासात थोडेसे डोकावून पाहिले पाहिजे. कारण माध्यमांपूर्वीची माध्यमं साध्य, साधन आणि संस्कृती या तीन सूत्रांशी बांधलेली होती. साधायचं काय त्यासाठी साधन कुठले वापरायचं, तर ते मुद्रित माध्यम वापरायचं. माध्यमांच्या योगदानाचा विचार करत असतांना संयुक्त महाराष्ट्र चळवळीपासून आपल्याला काही गोष्टी सांगाव्या लागतात. कारण, त्या या संपूर्ण विकासाच्या मुळाशी आहेत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये मान्यवरांची वृत्तपत्रं होती. मान्यवर संपादक होते. विश्वस्त निधीतून ती माध्यमं चालायची. विश्वस्त निधीचा हेतू असा होता की, विकासाच्या कामासाठी माध्यम वापरायचं असेल तर त्याची मालकी कुठल्याही एका व्यक्तीकडे असू नये. ती विचारांच्या माध्यमामध्ये असायला पाहिजे, ते माध्यम केवळ पैसा संपादन करण्यासाठी आपल्याला वापरायचं नाही तर, या मागास प्रदेशाच्या उन्नती, प्रश्नांसाठी आणि विविध विषयावर जागृती करण्यासाठी वापरायचं असा तो मुख्य गाभा होता.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये सक्रिय वर्तमानपत्र जनतेच्या प्रश्नांसाठी बांधील होते. लोकमान्य टिळक, आगरकर, दैनिक मराठाचे संपादक आचार्य अत्रे, कॉ. डांगे, सोलापूरचे रंगाअण्णा वैद्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता या दृष्टीने महत्त्वाची आहे.

माझी पत्रकारिता १९६८ साली आचार्य अत्रे यांच्याकडे स्तंभलेखनानेच झाली. मग १९७० साली दै. मराठवाडामध्ये माझे प्रथम गुरु अनंत भालेराव यांच्या मार्गदर्शनाखाली पत्रकारिता करत होतो. त्यानंतर मला गुरुवर्य बाबा दळवी यांच्या सोबत काम करण्याची संधी मिळाली. स्वातंत्र्यपूर्व काळातील पत्रकारिता ही स्वातंत्र्य मिळविण्याच्या हेतूने प्रभावित होती. देशाला स्वातंत्र्य मिळवाचंय आणि जनजागृतीसाठी आपलं दैनिक आणि आपलं माध्यम एकनिष्ठेने चालवलं पाहिजे ही निष्ठा दोन स्वरुपात पुढे आली होती. एक हा प्रदेश, या प्रदेशाची प्राथमिकता, गरजा, प्रश्न यांचा विचार करून काहींनी पत्रकारिता केली.

आ.कृ. वाघमारे यांनी मराठवाडा या साप्ताहिकाचे रुपांतर दैनिकात केले. पहिल्या अंकाच्या संपादनानंतर वाघमारे यांचं निधन झालं. दुसरी महत्त्वाची गोष्ट अशी की स्वातंत्र्य आंदोलन देशाचं वेगळं आणि निजामी राजवटीतून मुक्ततेच वेगळं या दोन्ही घटना संदर्भाला पत्रकारिता ही वेगळी. मराठवाडा मुक्ती संग्रामातील पत्रकारिता स्वामी रामानंद तीर्थ यांच्या विचारांचे बोट धरून केली गेली आहे. स्वामींचा संबंध या शिक्षण संस्थेशी अधिक गडद होता. सेलू हे गाव एका विचारधारेनं प्रेरित झालेलं चिंतकांचं, अभ्यासकांचं, निष्ठावंत कार्यकर्त्यांचं, गाव म्हणून सुपरिचित आहे. या नगरीतील अनंत भालेराव हे हाडाचे शिक्षक आणि संपादक कसा असावा याचे महत्त्वाचे उदाहरण आहे.

मी स्वत: १९६५ पासून संपादक बघत आलो. जेव्हा मी अनंत भालेराव यांच्याकडे शिक्षणाचा गंडा बांधला. मी गंडा हा शब्द वापरतो कारण पत्रकारितेची पदवी देणारे कोर्सेस मराठवाड्यात नव्हते किंबहुना महाराष्ट्रात नव्हते. जो विद्यार्थी आपल्याला उपसंपादक म्हणून निवडायचा आहे त्याची परंपरा तपासली जायची, त्याची आवड-निवड, विचार, बांधिलकी तपासली जायची या सर्व परंपरेत उतरल्यानंतर विद्यार्थ्याला संधी मिळायची.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील महत्त्वाचे नेते आचार्य अत्रे यांनी दै. मराठाच्या माध्यमातून या चळवळीला ऊर्जा दिली. मी स्वत: अत्र्यांजवळ पत्रकारितेचा पहिला धडा गिरवला. पत्रकारांना नाही रे वर्गाच्या हितासाठी झटायचंय. अविकसित प्रदेशाच्या विकासासाठी लढा द्यायचा ही पत्रकारितेची मूळ लक्षणं मी तिथे अनुभवली, वर्षभरातच अत्र्यांचे निधन झाले आणि मराठा दैनिकही बंद झालं. नंतर मी मराठवाडा दैनिकात आलो. मराठवाड्याच्या विकासासंबंधी बोलत असतांना मराठवाडा दैनिकाचं योगदान हे आपल्याला कधीही विसरता येणार नाही. अनंत भालेरावांच्या अग्रलेखाचा दराराच एवढा होता की, कुठलाही राष्ट्रीय नेता औरंगाबादला आला तर तो अनंतरावांना त्यांच्या केबिनमध्ये भेटायला यायचा. आम्हाला आजची पत्रकारिता अशी दिसते की, एखादा नेता जर आपल्या गावात आला तर कोण कोण कशाकशाला पाय लावून पळतात हे मी बघितलं आहे. अनंतरावांशी चर्चा करण्यासाठी दिग्गज नेते येत असत. यशवंतराव चव्हाण, जॉर्ज फर्नांडिस, मृणाल गोरे, मधु दंडवते, मधु लिमये ही मंडळी विकासासंदर्भात चर्चा करायची, तेव्हा आपल्या सहकाऱ्यांना ती चर्चा ऐकायला बोलवायचे. मान्यवर नेते मराठवाड्यासंबंधी काय बोलतात? ते प्रश्न

कसे सोडवणार आहेत ? ही चर्चा आम्हाला ऐकायला मिळायची. अनंतरावांनी नवीन मुलं आपल्या हाताखाली विद्यार्थी म्हणून घेतली आणि पत्रकारिता कशी करायची, काय साध्य मिळवायचं आहे याचा छान आराखडा दै. मराठवाडाने आपल्यासमोर ठेवला आहे.

मराठवाड्याच्या विकासाचा विचार केला तर वैधानिक विकास मंडळाची स्थापना दै. मराठवाडाच्या आग्रहामुळे झाली हे सांगणे महत्त्वाचे आहे. त्यामागे अनंत भालेराव, गोविंदभाई श्रॉफ आणि बापू काळदाते यांचा महत्त्वाचा हातभार होता. मराठवाड्यातील महत्त्वाच्या शिक्षण संस्थांमध्ये दै. मराठवाडाचे योगदान महत्त्वाचे आहे. अनंत भालेराव यांनी मराठवाड्यातील खेड्यापाड्यातून केलेली जनजागृती सामान्यांना समजेल अशा सोप्या शब्दात केली.

गुजरात नवनिर्माण चळवळ आणि जयप्रकाश नारायण यांची चळवळ या दोन्ही चळवळींच्या माध्यमातून मराठवाड्यात विद्यार्थी चळवळ उभी राहिली. यासोबत सर्व संघटना एकत्र आल्या. कारण मराठवाड्याच्या विकासाचे प्रश्न सरकारकडे घेऊन जायचे आहे. ही चळवळ जनता विकास परिषदेच्या नेतृत्वात चालत होती.

या परिषदेचे अध्यक्ष दै. मराठवाडाचे विश्वस्त अध्यक्ष गोविंदभाई श्रॉफ हे होते. हा भाग मुद्दाम तुम्हाला सांगतो. ब्रॉडगेजसाठी झालेलं आंदोलन यशस्वी का झालं कारण, समाजवादी विचारसरणीचे मधु दंडवते व जॉर्ज फर्नांडिस हे केंद्रात मंत्री होते आणि गोविंदभाई, अनंतराव, कॉ. देशपांडे, कॉ. चंद्रगुप्त चौधरी, उध्दवराव पाटील, केशवराव धोंडगे यांनी केंद्राला निवेदन केलं होतं. त्यामुळे मराठवाड्याला ब्रॉडगेज रेल्वे मिळाली. हे सर्व नेते दै. मराठवाडाच्या संपूर्ण विचारव्यवहारांशी एकरूप झालेले होते. ते एवढ्यासाठी मी तुम्हाला सांगतो की, एखादं दैनिक चालवत असताना त्याला मिळणारं वैचारिक पाठबळ हे फार महत्त्वाचं असतं. आजचं पाठबळ हे पैशाचं आहे.

१९९० पर्यंत पैशाच्या पाठबळावर एकही दैनिक या महाराष्ट्रात चाललेलंच नव्हतं, ते विचारांच्या पार्श्वभूमीवर चालत होतं. आपल्याला मोडून पडलेला माणूस उभा करायचा आहे. त्याचा अभ्यास संपादक करायचे. मराठवाड्याचा विचार करायचा तर मराठवाड्याच्या विकासाचा विचार १९९० पर्यंत दै. मराठवाडाने केला. अग्रलेख आंदोलन पेटवतात तसे अग्रलेख आंदोलन विझवतातही. दंगली विझवण्याची भूमिका माध्यमांनाच करावी लागते.

मराठवाड्याच्या मुद्रित माध्यमांची परंपरा विधानसभेपर्यंत महत्त्वाची होती. जेव्हा एखादा प्रश्न विधानसभेत उपस्थित केला जायचा तेव्हा मुख्यमंत्री म्हणायचे की, दै. मराठवाडाची बातमी आणि अग्रलेखाची कात्रणे माझ्या टेबलवर ठेवा, ही आपली परंपरा. ही परंपरा स्वीकारण्यासाठी काय करावं लागेल ? साधेपणा स्वीकारावा लागेल, कमी पगारात काम करावं लागेल. सर्वात महत्त्वाचं पत्रकारांना भयमुक्त काम करावं लागेल. बाबा दळवींनी मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी दिलेला लढा हा एक इतिहास सांगून जातो. दुष्काळी परिस्थितीमध्ये मूठ–मूठ धान्य गोळा करुन हा माणूस. मराठवाड्यातील, विदर्भातील मुलांसाठी झटणारे संपादक म्हणून मी बाबा दळवींचा गौरव करतो. विकासासाठी आपली लेखणी झिजवणाऱ्या संपादकांची ही मालिका आहे.

शब्दाची तीव्रता, शब्दाचा आशय, शब्द अर्थप्रवाही करणे आणि उपेक्षित, वंचित समाजाच्या काळजापर्यंत घेऊन जाण्याची क्षमता ही पूर्वी संपादकांमध्ये होती. माध्यमांची शक्ती ही कमालीची

ताकदवान असते. ज्यांना विकास करता येत नाही त्यांना विकासाचे प्रश्न राबवता येत नाहीत. विकासाची संकल्पना पूर्णपणे डोळ्यांसमोर आणता येत नाही, अशा सत्ताधाऱ्यांना घरचा रस्ता माध्यमं दाखवू शकतात. म्हणजे माध्यमं सत्ता बदलवू शकतात. माध्यमं भ्रष्टाचार बाहेर आणू शकतात, माध्यमं विकासही करू शकतात आणि विचित्र वागणाऱ्या लोकप्रतिनिधींना आवाक्यातही ठेवू शकतात. हे आणिबाणीनंतर सत्ताधाऱ्यांच्या लक्षात आलं. नंतर एक नवी लाट आली ती म्हणजे स्वायत्त निधीतून चालणारी दैनिकं. ही विकत घेण्याची परंपरा काँग्रेस नेत्यांनी सुरू केली. महाराष्ट्राच्या अनेक नेत्यांना लक्षात आलं, मग नेत्यांची दैनिकं निर्माण झाली. पण ती परखड संपादकांची दैनिकं नाही. म्हणून आता ती दैनिकं दबल्या आवाजात बोलतात. अनेक गोष्टी अशा आहेत की, सत्तेविरुध्द बोललं पाहिजे, त्यांच्या चुका दाखवल्या पाहिजे. पण चुका दाखवण्याच्या दैनिकावरचा भयाचा मारा १९९० पासून चालू झालाय तो आजतागायत सुरू आहे. ही बाब पत्रकारितेसाठी घातक आहे. नाही रे वर्गाचा विचार, तळागाळातील माणसाचा विचार, ज्या माणसाला अजूनही शिकता येत नाही, शिकायला पैसा मिळत नाही त्यांचा विचार आता संपलेला आहे. आता आपण जागतिकीकरणाच्या नावाखाली भांडवलदारी वृत्तीने दैनिकांकडे बघतो. माझं मत असं आहे की, महानगरातील संपादकांना शेतकरी- शेती विषयक बाबी, गरिबी, अर्थकारणाशी काही देणं- घेणं नाही.

त्यांचं देणं एका विशिष्ट सांस्कृतिकवादासाठी आहे. हा वाद दै. मराठवाडाने कधी जपला नाही त्याचं कधी भांडवल केलं नाही. त्याचा कोणता कोश निर्माण केला नाही. तो कोश १९९० नंतर जी दैनिकं अस्तित्वात आली, त्या दैनिकांनी निर्माण केला आणि भांडवलदारी अर्थशाहीला पाठिंबा दिला. आज मंदीचे दिवस आहेत, पण त्यावर कुणालाही परखडपणे लिहिता येत नाही. हे आपल्या पत्रकारितेच दुर्दैव आहे. आजच्या पत्रकारांनी काय करायला पाहिजे? तर त्यांनी लोकांचे प्रश्न समजून त्यांना आपल्या लेखणीतून न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न सातत्याने केला पाहिजे.

लोकांमध्ये मिसळल्यावर अनेक गोष्टी समजतात, त्या शिकल्या पाहिजेत. पत्रकारांनी शिकण्याची तयारी ठेवली तरच माध्यमं जनतेच्या बाजूने राहू शकतील. आज जेवढा विकास आपल्याला दिसतो त्याचं श्रेय पुढाऱ्यांना जात नाही तर जुन्या माध्यमांना जातं. माध्यमं लढली, माध्यमांचे संपादक रस्त्यावर आले, माध्यमांनी जनतेला विचार दिला, जनता एकत्र आली आणि अनेक प्रश्न आपले सुटले, अनेक प्रश्न अजून सोडवायचेत. त्यासाठी आपल्याला निधी मिळवावा लागेल, पण हा निधी कसा मिळेल याचा विचार माध्यमांनी करणे गरजेचे आहे. तो निधी मिळवण्याचे सामर्थ्य आम्हाला मुद्रित माध्यमांनी द्यावे. एवढी इच्छा व्यक्त करुन मी थांबतो.....धन्यवाद....।

**– श्री. महावीर जोंधळे**

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आणि नूतन महाविद्यालय, सेलू जि. परभणी आयोजित

# पदवी वितरण समारंभ अहवाल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने यावर्षीपासून प्रथमच पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ संबंधित महाविद्यालयात घेण्याचे ठरवले. त्यानुसार नूतन महाविद्यालय, सेलू येथे दि. ३० डिसेंबर २०१९ रोजी दु. ०३:०० वा. पदवी प्रमाणपत्र वितरण सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी तर प्रमुख अतिथी म्हणून स्वा.रा.ती.म. विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. शिवराज बोकाडे हे उपस्थित होते.

प्रारंभी परीक्षा विभागप्रमुख, प्रमुख अतिथी व स्नातक विद्यार्थी मिरवणुकीने सभागृहात दाखल झाले. दीपप्रज्वलन व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरूवात झाली. यावेळी स्नातकांना उद्देशून डॉ. बोकाडे यांनी भाषण केले. विद्यार्थ्यांनी पदवीकडे केवळ कागद म्हणून न पाहता पदवीचा, त्यासाठी घेतलेली मेहनत, अभ्यास याचा जीवन यशस्वी करण्यासाठी वापर करावा. आपल्या ज्ञानाचा राष्ट्रासमोरील, समाजातील प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी उपयोग करावा. तरुणांनी समाजमाध्यमांच्या अतिआहारी न जाता वाचनाकडे वळले पाहिजे. व्यसनाधीनता सोडून राष्ट्रीय, सामाजिक ऐक्यासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे. असे प्रतिपादन डॉ. बोकाडे यांनी केले.

अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी पदवीधारक विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक परीक्षा विभागप्रमुख डॉ. महेंद्र शिंदे यांनी केले.

या कार्यक्रमात कला, विज्ञान व वाणिज्य अशा तीन शाखांतील १६४ पैकी १२० पदवी प्रमाणपत्रांचे वितरण विद्यार्थ्यांना करण्यात आले. या कार्यक्रमासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. राजाराम झोडगे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. उत्तम राठोड यांनी केले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# महाविद्यालय स्तरावरील उपक्रम

**महाविद्यालय सुवर्ण महोत्सव**

नूतन महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता समारंभ दि.१८ जून २०१९ रोजी आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ डॉ. श्री अनिल काकोडकर उपस्थित होते तर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडचे कुलगुरू डॉ.उध्दव भोसले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठचे माजी कुलगुरू डॉ.नागनाथ कोत्तापल्ले यांची विशेष उपस्थिती होती.

सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सन्मान सोहळा दि.१६ ऑगस्ट रोजी ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे यांच्या हस्ते, प्राचार्य द. रा. कुलकर्णी यांच्या विशेष उपस्थितीमध्ये व संस्थाध्यक्ष डॉ. एस. एम. लोया यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात स्मृतिचिन्ह, सूताचा हार व अनंतराव भालेराव यांच्यावरील पुस्तक सर्वांना भेट देण्यात आले. याच प्रसंगी 'सुवर्णकल्प' या स्मरणिकेचे विमोचन डॉ. सोमनाथ रोडे यांच्या हस्ते करण्यात आले. सुवर्ण महोत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या सर्व उपक्रमाचा आढावा 'सुवर्णकल्प' या स्मरणिकेत घेण्यात आला.

**महाविद्यालयाचे यश/ सन्मान**

■ महाविद्यालयाच्या स्थापनेपासून सातत्याने प्रकाशित होणारा प्रेरणा वार्षिकांक हे महाविद्यालयाचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट आहे. विद्यार्थ्यांतील सर्जनशीलता, आविष्कार, प्रतिभा यांना चालना देणारा वाङ्मय विशेषांक ठरला.

महाविद्यालयाच्या प्रेरणा वाङ्मय विशेषांकाचा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडने तृतीय पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

■ स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या युवक महोत्सवात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धेत सहभाग नोंदविला. श्री. नीरज वैष्णव या विद्यार्थ्याने तालवाद्य या वाद्य स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला या विद्यार्थ्याची आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी सुध्दा निवड झाली.

■ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी हे महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे संचलित रामानंद तीर्थ मराठी ग्रंथालयाचे चिटणीस म्हणून गेल्या ४० वर्षापासून कार्यरत आहेत. संस्थेने त्यांचा 'उत्कृष्ट सचिव' म्हणून १४ मार्च २०२० रोजी सन्मान केला आहे.

■ प्रा. एन. एस. पद्मावत यांना जिनियस वर्ल्ड रेकॉर्डस यांच्याकडून 'Extraordinary Talent' पुरस्काराने गौरविण्यात आले.

■ प्रा. एस. बी. गरुड यांना जीवन साधना फाऊंडेशन कडून 'नेताजी सुभाषचंद्र पुरस्कार' देऊन सन्मानित केले आहे.

**विद्यार्थी उपक्रम समिती**

अहवाल (२०१९-२०)

विद्यार्थ्यांतील सुप्त कलागुण व व्यक्तिमत्त्व विकासास प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालयात विद्यार्थी उपक्रम समिती कार्य करते. यासाठी या समितीच्या वतीने विद्यार्थांसाठी विविध अभ्यासपूरक व अभ्यासेतर सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक

कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०१९-२० च्या प्रांरभी जुलै महिन्यात समितीची बैठक घेऊन वर्षभर घ्यावयाच्या उपक्रमांचा आराखडा तयार करण्यात आला.

महाविद्यालयात प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थांना महाविद्यालयाविषयी, महाविद्यालयात चालणाऱ्या विविध उपक्रम, सुविधांविषयी माहिती व्हावी यासाठी उद्‍बोधन वर्गाचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार दि.०१ ऑगस्ट २०१९ रोजी वाणिज्य प्रथम वर्ष, दि.०२ ऑगस्ट रोजी विज्ञान प्रथम वर्ष आणि दि.०३ ऑगस्ट रोजी कला प्रथम वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांसाठी उद्‍बोधनवर्ग तथा स्वागत कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयात उपलब्ध सोयी सुविधा तसेच ग्रंथालय, राष्ट्रीय सेवा योजना, सांस्कृतिक उपक्रम, क्रीडा आदींविषयी संबंधित संयोजकांनी माहिती दिली.

दि.०१ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी विद्यार्थांनी या महापुरुषांच्या कार्यावर आपले मनोगत व्यक्त केले.

दि.०६ ऑगस्ट रोजी विद्यार्थी उपक्रम समितीची बैठक संपन्न झाली. त्यात विद्यार्थी संसद निवडणुका घेण्यासंदर्भात चर्चा झाली.

दि.०३ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांसाठी 'निसर्गाचा समतोल : एक ज्वलंत समस्या' या विषयावर वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

दि.०५ सप्टेंबर रोजी 'शिक्षकदिन' साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांना गुलाबपुष्प देऊन शुभेच्छा दिल्या व आपले मनोगत व्यक्त केले.

दि. ०९ सप्टेबर रोजी तत्कालीन महसूलमंत्री मा. चंद्रकांत पाटील यांच्या वतीने विद्यार्थांसाठी देण्यात आलेल्या गणवेश वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात ४९५ विद्यार्थिनींना मोफत गणवेश देण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले दै.सकाळचे जिल्हा प्रतिनिधी श्री. महेश पाटील यांनी 'विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास' या विषयावर सुंदर व्याख्यान दिले. तर साप्ताहिक दिलासाचे संपादक श्री. संतोष धारासुरकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.

दि.११ सप्टेंबर रोजी स्वा.रा.ती.म.विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाकरिता निवड चाचणी घेण्यात आली.

दि. २१ सप्टेंबर ते २४ सप्टेंबर या कालावधीत कै.व्यंकटराव देशमुख महाविद्यालय बाभळगाव, जि. लातूर येथे पार पडलेल्या 'विलास युवक महोत्सव-२०१९' मध्ये महाविद्यालयाच्या संघाने वक्तृत्व, वादविवाद, शास्त्रीय गायन, शास्त्रीय सूरवाद्य, शास्त्रीय तालवाद्य कलाप्रकारांत सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या नीरजकुमार वैष्णव या विद्यार्थ्याने शास्त्रीय तालवाद्य या प्रकारात तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त केले.

दि. २६ सप्टेंबर रोजी प्रा.वाजेद अली खाँ (मौलाना आझाद कॉलेज, औरंगाबाद) यांचे व्याख्यान संपन्न झाले. त्यांनी 'One God Human Family' या विषयावर मार्गदर्शन केले.

दि. २६ नोंव्हेबर २०१९ रोजी विद्यार्थी उपक्रम समिती व राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने 'संविधान दिन' साजरा करण्यात आला. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून संविधान 'प्रास्ताविक' व 'नागरिकांची मूलभूत कर्तव्ये' यांचे वाचन करण्यात आले. या कार्यक्रमास डॉ. महेंद्र शिंदे, डॉ. आर. ए. झोडगे, डॉ. आर. आर.

बैनवाड, प्रा. एच. आर. हडसनकर, यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महाविद्यालयाच्या नीरजकुमार वैष्णव या विद्यार्थ्याची इंद्रधनुष्य राज्यस्तरीय आंतर विद्यापीठ युवक महोत्सव गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या तालवाद्य या कलाप्रकारासाठी निवड झाली.

दि. १८ डिसें. २०१९ रोजी 'अल्पसंख्यांक हक्क दिवस' साजरा करण्यात आला. यावेळी 'अल्पसंख्यांक हक्क व समानतेचे तत्त्व' या विषयावर डॉ.आर. ए. झोडगे यांनी विचार मांडले. अध्यक्षीय समारोप प्रभारी प्राचार्य डॉ. महेंद्र शिंदे यांनी केला. डॉ.आर. आर. बैनवाड यांनी आभार मानले.

दि. ०३ जाने. २०२० रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त विद्यार्थी उपक्रम समिती व पोलीस प्रशासन, सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर सेफ वुमन' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सेलूच्या पोलिस निरीक्षक मा. बोरगावंकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दि. २५ जाने. २०२० रोजी महाविद्यालयात 'राष्ट्रीय मतदार दिवस' साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व प्रतिपादित केले. तसेच विद्यार्थ्यांना मतदान करण्यासंबंधीची शपथ देण्यात आली. या कार्यक्रमास तहसील कार्यालयाच्या निवडणूक विभागाचे कर्मचारी तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

दि. २९ जाने. ते ३१ जाने २०२० या कालावधीत महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसम्मेलन संपन्न झाले. स्नेहसंमेलनानिमित्त वक्तृत्व, काव्यवाचन, गीतगायन, चित्रकला, रांगोळी तसेच विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विविध गुणदर्शन, शेलापागोटे या कार्यक्रमांसह स्नेहभोजनाचा आस्वाद विद्यार्थ्यांनी घेतला.

दि. १९ फेब्रु.२०२० रोजी महाविद्यालयात छ. शिवाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांनी 'छ. शिवरायांचे कृषीधोरण' या विषयावर विचार मांडले. विद्यार्थ्यांनी पालखी मिरवणूक व मोटारसायकल रॅलीचे आयोजन केले होते.

दि. ०७ मार्च रोजी विद्यार्थी उपक्रम समिती, हेल्थ क्लब व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने 'कोरोना आजार प्रतिबंधात्मक उपाययोजना' यावर मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. सेलू उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक डॉ. संजय हरबडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या शैक्षणिक वर्षात विविध महाविद्यालयात संपन्न झालेल्या वक्तृत्व, वादविवाद स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. औरंगाबाद येथे संपन्न झालेल्या 'लोकसत्ता वक्तृत्व' वादविवाद स्पर्धेत प्रभाकर जाधव, विक्रम कटारे, गणेश गोरे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यापैकी विक्रम कटारे व प्रभाकर जाधव या विद्यार्थ्यांची लोकसत्ता विभागीय वक्तृत्व स्पर्धेसाठी निवड झाली. वर्षभरात विविध सांस्कृतिक, शैक्षणिक व इतर उपक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी उपक्रम समितीचे संयोजक डॉ. आर. ए. झोडगे यांच्या सोबत डॉ. अर्चना पत्की, डॉ. एम. डी. सवंडकर, प्रा. के. के. कदम तसेच सर्व सहकारी प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी मित्रांनी सहकार्य केले.

**गुणवत्ता सन्मान पारितोषिक योजना**

शैक्षणिक आस्था व जिव्हाळा असलेले आमच्या

संस्थेचे हितचिंतक आणि सहकारी शिक्षकांच्या वतीने प्रतिवर्षी गुणवंतांचा यथोचित सन्मान सोहळा दि.२३/०८/२०१९ रोजी आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मेजर प्रा. डॉ. व्ही. आर. चौधरी (योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई) व मा.श्री. अजितदादा बिनायके यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी वरिष्ठ महाविद्यालयातून रु.१२०५३/- रु. ची पारितोषिके गुणवंत विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली.

**विद्यापीठ रौप्य महोत्सव व्याख्यान**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त विद्यापीठ कार्यक्षेत्रातील २५ महाविद्यालयात २५ वक्त्यांच्या विविध प्रश्नांवर जनप्रबोधन करणाऱ्या व्याख्यानांचे आयोजन करण्याचे विद्यापीठाने ठरवले. २५ व्याख्यानांपैकी विद्यापीठ परिक्षेत्रात पहिले व्याख्यान ज्येष्ठ संपादक श्री.महावीर जोंधळे यांचे **'मराठवाड्यातील मुद्रित माध्यमे'** या विषयावर २० सप्टेंबर २०१९ रोजी आयेजित करण्यात आले.

**पदवी प्रमाणपत्र वितरण**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडने असा निर्णय घेतला की पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ महाविद्यालय पातळीवर घेण्यात यावा. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक डॉ. शिवराज बोकाडे हे या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी होते. त्यांच्या हस्ते पदवीच्या विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

## नवीन उपक्रम/ अभ्यासक्रम

**भाषा प्रयोगशाळा**

या भाषा प्रयोगशाळेचे उद्‌घाटन दि.१२/१२/२०१९ रोजी परभणी जिल्हा परिषदेचे कार्यकारी श्री.पृथ्वीराज बी. यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया हे होते.

भाषा प्रयोगशाळेमध्ये घेतलेल्या विषयी १० प्राध्यापकांना ३ दिवस प्रशिक्षण देण्यात आले. महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्री. गोपीनाथ लटपटे यांनी महाविद्यालयामध्ये भाषा प्रयोगशाळेची उभारणी करुन दिली. या भाषा प्रयोगशाळेमध्ये विद्यार्थ्यांचे भाषिक कौशल्य विकसित करण्याबरोबर या भागातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, व्यापारी आदींना प्रवेश देण्यात येणार आहे.

**इतिहास संशोधन केंद्रास मान्यता**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडने इतिहास विभागाला संशोधन केंद्र म्हणून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून मान्यता दिली असून इतिहास विभागप्रमुख डॉ. यु. सी. राठोड यांना संशोधन केंद्राचे संचालक म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

इतिहास विभागप्रमुख डॉ.यु.सी.राठोड यांची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या इतिहास विषयाच्या बोर्ड ऑफ स्टडीज् चे सदस्य म्हणून निवड झाली. इतिहास विभागातर्फे प्राचार्य डॉ. किरण देशमुख यांचे वेरुळ लेणे यावर स्लाईड शो व व्याख्यान आयोजित करण्यात आले.

**(B.B.A.) ॲग्रीकल्चर बिझनेस मॅनेजमेंट**

महाराष्ट्र शासन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने या शैक्षणिक वर्षापासून (२०१९-२०) पासून बी.बी.ए. हा नवीन अभ्यासक्रम विनाअनुदान तत्त्वावर सुरू करण्यास मान्यता दिली आहे. त्याप्रमाणे या शैक्षणिक वर्षापासून बी.बी.ए. अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला.

**ग्रंथालय अहवाल २०१९-२०**

ग्रंथालय हा महाविद्यालयाचा आत्मा मानला जातो. शिक्षणाच्या प्रक्रियेमधील अध्ययन, अध्यापनाच्या कार्यामध्ये ग्रंथालयाची नेहमीच मोलाची मदत राहिली आहे. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये ग्रंथ उपार्जन, वर्गीकरण तथा तालिकीकरण, ग्रंथ देव घेव तसेच विविध ग्रंथालयीन सेवा देण्यासोबतच अनेक उपक्रम ग्रंथालयातर्फे राबविण्यात आले.

**ग्रंथालयाची ओळख (Library Orientation):-** शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला कला, विज्ञान तथा वाणिज्य शाखेच्या प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची, ग्रंथालयीन कामकाजाची ओळख करून देण्यात आली.

**उत्कृष्ट वाचक पुरस्कार स्पर्धा :-** अनेक वर्षापासून ग्रंथालयातर्फे राबविण्यात येत असलेली उत्कृष्ट वाचक पुरस्कार स्पर्धा ग्रंथालयातर्फे यावर्षीही राबविण्यात आली. या स्पर्धेचे उद्घाटन ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस. आर. रंगराजन यांच्या जन्मदिनी दि.०९ ऑगस्ट २०१९ रोजी करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रसिध्द वक्ते मा. मोहीब कादरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात त्यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले. सदरील स्पर्धा १५ ऑगस्ट २०१९ ते २६ जानेवारी २०२० या कालावधीत राबविण्यात आली. स्पर्धेला विद्यार्थ्यांनी मोठा प्रतिसाद दिला.

**ग्रंथ प्रदर्शन :-** अनेक विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाव्यतिरिक्त इतर विविध पुस्तकांची माहिती व्हावी यासाठी प्रसंगानुरुप ग्रंथालयातर्फे पुस्तक प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी मा. राष्ट्रपती ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती तथा वाचन प्रेरणा दिनानिमित्त दि.१५ व १६ ऑक्टोबर रोजी ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. तसेच मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करत असताना ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या दोन्ही ग्रंथ प्रदर्शनास विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने भेट दिली.

**सामान्य ज्ञान स्पर्धा :-** एकलव्य ज्ञानवर्धिनी नागपूर यांच्यातर्फे घेतली जाणारी सामान्य ज्ञान स्पर्धा महाविद्यालाच्या ग्रंथालयामार्फत ऑगस्ट महिन्यात आयोजित करण्यात आली. या स्पर्धेस विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला.

**उत्कृष्ट वाचक पुरस्कार स्पर्धेचा समारोप :-** उत्कृष्ट वाचक पुरस्कार स्पर्धेचा समारोप मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने बक्षीस तथा प्रमाणपत्र वाटपाने झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून परभणीचे प्रसिध्द कवी संतोष नारायणकर यांची उपस्थिती होती.

**मान्यवरांच्या भेटी :-** शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये अनेक मान्यवरांनी ग्रंथालयाला भेट देऊन ग्रंथालयाचे कौतुक केले. यामध्ये वक्ते मा. मोहीब कादरी, दै. लोकसत्ताचे संपादक मा. गिरीश कुबेर, प्रसिध्द लेखक अच्युत गोडबोले, उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती पी.बी. वराळे तथा मा. वि. भा. कंकणवाडी यांचा समावेश आहे.

**ग्रंथपाल**

**हेल्थ क्लब नूतन महाविद्यालय, सेलू**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे शरीर व मन:स्वास्थ्य ही खरे तर व्यक्ती-समाज, राष्ट्राचे निर्मितीक्षम, कर्तृत्वसंपन्न, मनुष्यबळ संवर्धनाचे एक मानक समजले जाते. म्हणूनच महाविद्यालयाचा क्रीडा विभाग अनौपचारिक शिक्षणाचे ऊर्जाशील असे केंद्र असते. सामूहिक जीवन-कर्तृत्वाला आशय संपन्न करणाऱ्या क्रीडा विभागाने 'मल्टी-जिम' खेळाची मैदाने यांच्या माध्यमातून तरुणांस बलोपासनेचा

मूलमंत्र दिला. त्याच बरोबरीने संपर्क संवादाचे परीघ वाढवणारे शहरातील अनेक गणमान्य व्यक्ती, प्रशासकीय अधिकारी यांना निरोगी जीवनासाठी उपयुक्त आपले शरीर सदृढ राहण्यासाठी व्यायामाचा भाग असलेला बॅडमिंटन, योगासन, टेबल टेनिस, बुध्दीबळ, कॅरम, वगैरे खेळाचे मुक्त मंच आणि आरोग्य विषयक संवादासाठीचे विचारपीठ या स्वरूपात 'हेल्थ क्लब'चे निर्माण केले. या हेल्थ क्लबच्या कार्याचा हा अहवाल.

दि. २४ डिसेंबर २०१९ रोजी हेल्थ क्लबतर्फे मुलींची रक्तगट तपासणी तसेच एच. आय. व्ही. व हिमोग्लोबीन तपासणी शिबीर संपन्न झाले. परभणी येथील डॉक्टर व कर्मचारी यांनी या शिबीरासाठी सहकार्य केले.

दि. २४ डिसेंबर २०१९ रोजी HDFC बॅक व जिल्हा शासकीय रक्तपेढी, परभणी यांच्या सहकार्याने हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणी केली. त्यात ४० विद्यार्थ्यांनी रक्तदान केले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, प्रा. डॉ. वसंत पांचाळ, डॉ. पी. आर. कंठाळे, डॉ. एन. एस. पद्मावत, डॉ. पत्की मॅडम, डॉ. एम. डी. सवंडकर, प्रा. पिंपळगावकर, प्रा.जामगे, प्रा. हेसे, प्रा. गायकवाड, श्री. रिठ्ठे आदींनी परिश्रम घेतले. HDFC बॅंकेचे सहकारी व जिल्हा शासकीय रक्तपेढी, परभणी येथील डॉक्टर व कर्मचारी यांनी शिबीरासाठी सहकार्य केले.

दि.०७/०३/२०२० (शनिवार) रोजी हेल्थ क्लब विभागातर्फे विद्यार्थी उपक्रम समिती व राष्ट्रीय सेवा योजना यांच्यातर्फे ''कोरोना आजार : प्रतिबंधात्मक उपाययोजना'' विषयावर डॉ. हरबडे (वैद्यकीय अधिक्षक) शासकीय रुग्णालय, सेलू यांचे मार्गदर्शन आयोजित करण्यात आले.

ध्यानधारणा (मेडिटेशन) हेल्थ क्लबतर्फे महाविद्यालयात नियमितपणे नादब्रह्म ध्यान घेण्यात येते. डॉ. एम. एस. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थी याचा लाभ घेतात.

## क्रीडा विभाग (वरिष्ठ)
## २०१९-२० वार्षिक अहवाल

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाचा क्रीडा अहवाल सादर करताना आनंद होतो की, दरवर्षीप्रमाणे याही वर्षी क्रीडा विभागाने आपले क्रीडा कौशल्य दाखवित नूतन महाविद्यालयाच्या लौकिकाला साजेसे कार्य केले. महाविद्यालयाचे नाव क्रीडा जगतात उंचावण्याचा प्रयत्न करत यशाचे शिखर सपांदन केले. मुलींच्या व मुलांच्या सघांनी विविध क्रीडास्पर्धेत प्रतिनिधीत्व करून मोलाचे यश संपादन केले.

महाविद्यालयात प्रत्येक मुला व मुलीसाठी अद्ययावत असे मैदान असून सर्वांना क्रीडा स्पर्धेच्या तयारीसाठी बॅडमिंटन, टेबल टेनिस, कबड्डी, खो-खो, योगा, बुध्दीबळ, व्हालीबॉल, कुस्ती, तायक्वांदो (Tackwondo), मैदानी खेळ इत्यादी स्पर्धेच्या तयारीसाठी सकाळी व सायंकाळी सरावासाठी मैदान व खेळाचे साहित्य उपलब्ध असते. सराव पाहूनच प्रत्येक जणाची पुढील स्पर्धेसाठी निवड केली जाते, तसेच महाविद्यालयात विद्यार्थी व विद्यार्थिनीसाठी अद्ययावत असे जिमखाना दररोज सकाळी व सायंकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत उपलब्ध असतो. त्यात सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी नियमितपणे सराव करतात.

**वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी :-**

दि. २१ जून २०१९ रोजी जागतिक योग दिनानिमित्त योग दिन साजरा करण्यात आला. योग दिनानिमित्त महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. के. के. कदम,

प्रा. नागेश कान्हेकर यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनींनी सहभाग घेतला.

१) दि. २९ नोव्हेंबर ते ०३ डिसेंबर २०१९ या कालावधीत जयपूर विद्यापीठ, राजस्थान येथे पार पडलेल्या पश्चिम विभागीय अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बुध्दीबळ स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या चि. वैभव नाईकनवरे याने विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले.

२) दि. ०८ जानेवारी ते १२ जानेवारी २०२० या कालावधीत योगी व्हेमन्ना विद्यापीठ, कडप्पा येथे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल क्रीडा स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील चि. शुभम पवार यांने विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधीत्व केले.

३) दि. ०७ मार्च ते १० मार्च या कालावधीत पंजाब पतियाळा येथे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वांदो क्रीडास्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील चि. शुभम पवार याने विद्यापीठ संघाचे प्रतिनिधीत्व केले.

४) मुलींच्या संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करुन कु. अंकिता भोकरे, कु. खोसे अयोध्या, कु. शुभांगी रणशिंगे यांनी वैयक्तिक द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे झालेल्या आंतर महाविद्यालयीन योगासन स्पर्धेत त्यांची निवड झाली. 'ड' झोन तर्फे स्वा.रा.ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे सराव शिबीरासाठी निवड होऊन अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन क्रीडा स्पर्धा कडप्पा (आंध्रप्रदेश) येथील स्पर्धेत कु. अंकिता भोकरे, कु. खोसे अयोध्या, कु. शुभांगी रणशिंगे, कु. कनकुटे निशा, कु. राजश्री गिरी यांनी दि. ०१ जानेवारी ते ०६ जानेवारी २०२० या कालावधीतील राजीव गांधी विद्यापीठ, कडप्पा (आंधप्रदेश) येथे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ योगासन क्रीडा स्पर्धेत यांनी विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व केले.

संघ आंतरविद्यापीठ स्पर्धेला जाण्यापूर्वी योग प्रशिक्षण शिबीर महाविद्यालयात घेण्यात आले.

**तायक्वांदो क्रीडा स्पर्धेचे आयोजन :-**

■ दि.०७ डिसेंबर २०१९ रोजी स्वा. रा. ती. म. वि. नांदेड अंतर्गत 'ड' झोन आंतरमहाविद्यालयीन तायक्वांदो क्रीडा स्पर्धेचे आयोजन आपल्या महाविद्यालयात करण्यात आले. 'ड' झोन अंतर्गत वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेच्या उद्घाटनास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, 'ड' झोनचे संयोजक प्रा. लोकरे, प्रा. सातपुते, प्रा. पवन पाटील, प्रा. नागेश कान्हेकर, प्रा. नलगे, प्रा. राजाराम झोडगे, श्री चापके सर, श्री जुल्लाह खुद्दुस, श्री पदमपल्ले, श्री फिरोज पठाण, प्रा. हेसे सर, प्रशिक्षक व संघ व्यवस्थापक, पंच इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

**बॅडमिंटन व टेबल टेनिस** :- २९ ऑगस्ट २०१९ रोजी श्री. शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे 'ड' झोन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात मुलांमध्ये शुभम पवार, भुजबळ गणेश, खवणे प्रेमनाथ, बांदल नामदेव, शेख वसीम यांनी बॅडमिंटन व टेबल टेनिस स्पर्धेत सहभाग नोंदवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. तसेच त्यात बॅडमिंटन व टेबल टेनिस मुलीच्या संघात केंद्रे यशश्री, आडळकर गौरी, वायाळ प्रतिक्षा, कनकुटे निशा यांनी सहभाग नोंदवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

**बुध्दीबळ** :- दि.३१ ऑगस्ट २०१९ रोजी बी. रघुनाथ महाविद्यालयात पार पडलेल्या 'ड' झोन

बुध्दीबळ स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाचे वैभव नाईकनवरे, पाचलेगांवकर कार्तिक, निलवर्ण विशाल, कदम वैभव, शेवाळे गणेश, सोनवणे अभिजीत इत्यादींनी सहभाग नोंदवून संघ उपविजयी राहिला. त्यात वैभव नाईकनवरे याची आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेसाठी 'ड' झोन मधून निवड झाली. विद्यापीठात 'ड' झोनचा संघ उपविजयी राहून वैभव नाईकनवरे या विद्यार्थ्याची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ बुध्दीबळ स्पर्धेसाठी निवड झाली.

**बॉक्सींग (मुले) :-**

दि. ९ सप्टेंबर २०१९ रोजी शारदा महाविद्यालय, परभणी येथे 'ड' झोन बॉक्सींग क्रीडास्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील चव्हाण कृष्णा, पवार शुभम यांनी त्यांच्या वजन गटात सहभाग नोंदवून विजय संपादन केला. त्यांची 'ड' संघात निवड होऊन आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत ते सहभागी झाले. त्यात त्याने आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत विजय संपादन करुन सराव शिबिरासाठी त्याची निवड झाली.

**मैदानी स्पर्धा (मुले व मुली):-**

दि.१५ व १६ सप्टेंबर २०१९ रोजी के. के. एम. महाविद्यालय, मानवत येथे पार पडलेल्या 'ड'झोन मैदानी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या महाविद्यालयाच्या बुधवंत शिवाजी याने ४०० मीटर धावणे या क्रीडा स्पर्धेत प्रथम व १५०० मी. धावणे तृतीय क्रमांक मिळवला. त्यात कु. खोसे आयोध्या हिने गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. १५०० मी. धावणे स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळविला व थाळीफेक क्रीडा स्पर्धेत व्दितीय क्रमांक मिळविला. तसेच स्वा. रा. ती. मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे संपन्न झालेल्या मैदानी स्पर्धेत गोळाफेक क्रीडा प्रकारात प्रथम क्रमांक मिळवून महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा महोत्सव स्पर्धेत सहभाग नोंदवला. कु. शुभांगी रणशिंगे हिने ४०० मी. धावणे क्रीडा प्रकारात तृतीय क्रमांक मिळविला. विविध मैदानी क्रीडा प्रकारात महाविद्यालयातील दौड व्यंकटेश, बुधवंत शिवाजी, चव्हाण सनी, पवार शुभम, तर मुलीमध्ये खोसे अयोध्या, रणशिंगे शुभांगी, चव्हाण कल्याणी, वायाळ प्रतिक्षा, सोनवणे जया, कुंभार स्नेहल यांनी सहभाग नोंदवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

**सॉफ्टबॉल व बेसबॉल :-**

दि. २८ व २९ सप्टेंबर २०१९ या रोजी राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या आंतर महाविद्यालयीन सॉफ्टबॉल व बेसबॉल क्रीडा स्पर्धेत महाविद्यालयाच्या शुभम पवार, काळे कुलदीप, भुजबळ गणेश, खवणे प्रेमनाथ, बांदल नामदेव, भांडवले प्रथमेश, गायकवाड अर्जुन, पंडागळे धम्मपाल, वाघ बाबासाहेब,भदर्गे विक्रान्त, शेरे आन्शीराम, शेरे शुभम यांनी सहभाग नोंदवून नूतन महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले. आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल सराव शिबिरासाठी शुभम पवार याची निवड झाली.

दि. ०८ जाने. ते १२ जानेवारी २०२० या कालावधीत योगी व्हेमन्ना विद्यापीठ कडप्पा, आंध्रप्रदेश येथे पार पडलेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ सॉफ्टबॉल क्रीडास्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील चि. शुभम पवार याने विद्यापीठाच्या संघाचे प्रतिनिधीत्व केले.

**बुध्दीबळ (मुली)** :- दि. ३० सप्टेंबर व ०१ आक्टोबर २०१९ रोजी श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे पार पडलेल्या आंतर महाविद्यालयीन बुध्दीबळ (मुलींच्या) स्पर्धेत आपल्या

महाविद्यालयातील कु. उघडे उमा, कु. होगे पूजा, कु. शहारे प्रिती, कु. शेख अफशाइम यांनी सहभाग नोंदवून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केले.

**योगासन (मुले व मुली) :-**

दि.०१ नोव्हेंबर २०१९ रोजी नागनाथ महाविद्यालय, औंढा नागनाथ येथे पार पडलेल्या 'ड' झोनच्या योगासन स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या संघाने सहभाग नोंदवला. त्यात क्षीरसागर आनंद, पाचलेगांवकर कार्तिक, धर्माधिकारी आदित्य, महाजन सोमनाथ तर मुलीं मध्ये भोकरे अंकिता, खोसे आयोध्या, रणशिंगे शुभांगी, कनकुटे निशा, गिरी राजश्री यांनी सहभाग नोंदवून मुलींच्या संघाने वैयक्तिक योगासन क्रीडा प्रकारात प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक मिळविला. आंतरमहाविद्यालयीन व आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी त्यांची निवड झाली. मुलांमध्ये क्षीरसागर आनंद, पाचलेगावकर कार्तिक, धर्माधिकारी आदित्य यांची आंतर महाविद्यालयीन स्पर्धेसाठी निवड झाली.

**योगासन सराव शिबीर :-**

दि. ०९ नोव्हेंबर ते १३ नोव्हेंबर २०१९ या कालावधीत 'ड'झोन विभागीय आंतर महाविद्यालयीन योगासन (मुली) संघाचे प्रशिक्षण शिबीर आयोजन करण्यात आले होते. त्यात अंकिता भोकरे, खोसे आयोध्या, शुभागी रणशिंगे, कनकुटे निशा, राजश्री गिरी यांनी योगाचे प्रशिक्षण पूर्ण केले. त्यात त्यांना प्रशिक्षक म्हणून श्री. डी. डी. सोन्नेकर, प्रा. भरदम मॅडम, प्रा. संभाजी रोडगे यांनी सहकार्य केले. शिबीर यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

**तायक्वांदो :-**

■ दि.०७ डिसेंबर २०१९ रोजी स्वा. रा. ती. म. वि. नांदेड अंतर्गत 'ड' झोन आंतर महाविद्यालयीन तायक्वांदो क्रीडा स्पर्धेचे आयोजन आपल्या महाविद्यालयात करण्यात आले. 'ड' झोन अंतर्गत वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व खेळाडूंनी सहभाग घेतला. या स्पर्धेचा उद्‌घाटन सोहळा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, 'ड' झोन चे संयोजक प्रा. लोकरे, प्रा. सातपुते, प्रा. पवन पाटील, प्रा. गणाचार्य, प्रा. गोवींद वाकणकर, प्रा. नागेश कान्हेकर इत्यादी मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला. महाविद्यालयात झालेल्या तायक्वांदो क्रीडा स्पर्धेत पवार शुभम, चव्हाण सनी, चव्हाण कृष्णा यांनी स्पर्धेत सहभाग नोंदवून त्यांची 'ड' झोन संघासाठी निवड झाली. त्यात पवार शुभम याची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली.

क्रीडा विभागाच्या विविध क्रीडा स्पर्धेत व इतर कार्यक्रमांच्या आयोजनासाठी प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, क्रीडा समितीचे सर्व सदस्य, सर्व प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी व क्रीडा विभागाचे खेळाडू या सर्वांचे मोलाचे सहकार्य लाभले.

**प्रा.के.के.कदम**
**क्रीडा संचालक, क्रीडा विभाग**
**नू.म.से.**

## स्पर्धा परीक्षा केंद्र

स्पर्धा परीक्षा केंद्र व करिअर गाईडन्स सेल च्या वतीने एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले होते. रिलायबल अॅकॅडमी, परभणीचे संचालक श्री. क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. १४९ विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा घेण्यात आली व त्यातील ५० विद्यार्थ्यांना १५ दिवस प्रशिक्षण देण्यात आले.

'अनुलोम' या संस्थेबरोबर झालेल्या कराराप्रमाणे दि. २४/० /१९ रोजी पदवी व पदव्युत्तर

विद्यार्थ्यांसाठी एक कार्यशाळा आयोजित केली होती. श्री. ज्योतिबा कानडे यांनी शेतकऱ्यांसाठी राबवित असलेल्या शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांना E-support चे प्रशिक्षण देण्यात आले. महाराष्ट्र शासनाने विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाची प्रशंसा केली आहे.

वाणिज्य विभाग व अर्थशास्त्र विभागाच्या वतीने ११/११/२० रोजी एक आंतरराष्ट्रीय कार्यशाळा शिक्षण, सामाजिक–आर्थिक व पर्यावरण जागृती या विषयावर आयोजित करण्यात आली. डॉ.दीपक वाईकर यांनी या कार्यशाळेत मार्गदर्शन केले.

### राष्ट्रीय सेवा योजना २०१९–२०

■ नूतन महाविद्यालय परिसरामध्ये दर रविवारी सकाळी ८ ते १० या वेळेत परिसर स्वच्छता, श्रमदान उद्बोधनपर भाषण घेण्यात आले.

■ नूतन महाविद्यालयात दि. २१ जून २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, प्रा.कमलाकर कदम, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश बैनवाड व मोठ्या संख्येने स्वयंसेवक सहभागी होते.

■ दि.०१ जुलै ते ०७ जुलै २०१९ महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार या कालावधीमध्ये महाविद्यालयात व दत्तक गावात वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, प्रा. कमलाकर कदम, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश बैनवाड व मोठ्या संख्येने स्वयंसेवक सहभागी होते.

■ महाविद्यालयात दि. २३ जुलै २०१९ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिनानिमित्त वाचन दिन साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश बैनवाड, डॉ. माणिक सवंडकर व स्वयंसेवक सहभागी होते.

■ १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी व रा.से.यो. चे कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.

■ १५ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यालयात भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

■ दि. २० ऑगस्ट २०१९ रोजी भारताचे माजी पंतप्रधान मा.राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त सद्भावना उद्‌बोधन वर्ग व सद्भावना दिन साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांना सद्भावना दिनाची शपथ दिली.

■ दि.०८ सप्टेंबर २०१९ रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर पुण्यतिथी निमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. सर्व विद्यार्थी व सहकारी यावेळी उपस्थित होते.

■ सेलू शहरातील ८ प्रभागांमध्ये ६२ विद्यार्थ्यांनी केंद्र शासनाच्या कार्यक्रमानुसार दि.१४ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर या कालावधीमध्ये स्वयंसेवकांनी घरोघरी जाऊन कुष्ठरोग शोध सर्व्हेक्षणाचे काम केले. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश बैनवाड, डॉ. माणिक सवंडकर व स्वयंसेवक सहभागी होते.

■ महाविद्यालयात २६ सप्टेंबर २०१९ रोजी एच.आय.व्ही. तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. यात ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यक्रमात सेलू उपजिल्हा रुग्णालयातील अधिक्षक व त्यांचे सहकारी आणि महाविद्यालयाचे

प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश बैनवाड, डॉ. माणिक सवंडकर व स्वयंसेवक सहभागी होते.

■ दि. ०२ ऑक्टोबर २०१९ रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंती साजरी करण्यात आली. या निमित्त महात्मा गांधीजी व लालबहादूर शास्त्री यांच्या जीवन कार्यावर वक्तृत्व स्पर्धा व स्वच्छता सप्ताह घेण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश बैनवाड, डॉ. माणिक सवंडकर व सर्व स्वयंसेवक सहभागी होते.

■ दि. २६ ऑक्टोबर २०१९ रोजी मतदान जागृती अभियानांतर्गत रॅली व पथनाट्य सादरीकरण करण्यात आले. याप्रसंगी उपजिल्हाधिकारी उमाकांत पारधी, तहसीलदार बालाजी शेवाळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश बैनवाड, डॉ. माणिक सवंडकर व मोठ्या संख्येने स्वयंसेवक सहभागी होते.

■ दि. २९ ऑक्टोबर २०१९ रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी निमित्त अभिवादन सभा घेण्यात आली.

■ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने व ग्रामीण रुग्णालयाच्या सहकार्याने दि.०१/१२/ २०१९ रोजी ‘HIV Test Camp’ चे आयोजन करण्यात आले.

■ भारतीय संविधान दिन निमित्ताने दि. २६/ ०१/२०१९ रोजी महाविद्यालयाच्या परिसरातील संविधानाच्या प्रस्तावनेसमोर सामूहिक वाचन केले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. महेंद्र शिंदे यांनी विद्यार्थ्यांना संविधानाची शपथ दिली. या प्रसंगी डॉ. राजाराम झोडगे, डॉ. अर्चना पत्की, कार्यक्रमाधिकारी डॉ. एम. डी. सवंडकर व मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

■ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. २८/०१/२०१९ रोजी थोर समाजसुधारक महात्मा फुले यांचा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश बैनवाड, डॉ. माणिक सवंडकर व मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

■ महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. ०६/१२/२०१९ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश बैनवाड, डॉ. माणिक सवंडकर, डॉ. राजाराम झोडगे व मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

■ दि. ०५/०१/२०२० रोजी न्यायाधिकरण महानिधी २०२०, उपजिल्हाधिकारी कार्यालय, सेलू व परभणी जिल्हा न्यायाधिकरण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिबिरात १२००० लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी, उच्च न्यायालय, मुंबई यांच्या मार्गदर्शनानुसार या महाशिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जनतेतील प्रत्यक्ष लाभार्थी १२००० जनता उपस्थित होती. यामध्ये नूतन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील १७० स्वयंसेवकांनी शिबिराच्या नियोजनातून शिस्त पालनात मोलाचे कार्य करुन महाशिबीर यशस्वी करण्यात मदत केली. या प्रसंगी प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी डॉ. रमेश बैनवाड, डॉ. माणिक सवंडकर व मोठ्या प्रमाणात स्वयंसेवक उपस्थित होते.

■ राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि.२०/१२/ २०१९ रोजी राष्ट्रीय संत गाडगेबाबा यांची जयंती

साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रमेश बैनवाड, प्रा. डॉ. माणिक सवंडकर व सहकारी प्राध्यापक वर्ग आणि मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

■ दि. ०३/०१/२०२० रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. ०३/०१/२०२० रोजी थोर समाजसेविका व पहिली स्त्रीशिक्षिका सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रमेश बैनवाड, प्रा. डॉ. माणिक सवंडकर व सहकारी प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

■ नूतन महाविद्यालयात दि.१२/०१/२०२० रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने विवेकानंद यांची जयंती म्हणजे राष्ट्रीय युवक दिन आणि राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ जयंती साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रमेश बैनवाड, प्रा.डॉ.माणिक सवंडकर व सहकारी प्राध्यापक वर्ग आणि मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

■ नूतन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. २६/०१/२०२० रोजी संविधानाचा अंमल दिन त्यालाच आपण प्रजासत्ताक दिन म्हणतो. तो दिवस महाविद्यालयाच्या प्रांगणात साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रमेश बैनवाड, प्रा. डॉ. माणिक सवंडकर व सहकारी प्राध्यापक वर्ग आणि मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

■ नूतन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि.३०/०१/२०२० रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रमेश बैनवाड, प्रा. डॉ. माणिक सवंडकर व सहकारी प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

■ नूतन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. १९/०२/२०२० रोजी हिंदवी स्वराज्याचे निर्माते जाणते राजे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

■ नूतन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि.२७/१२/२०२० रोजी 'मराठी राजभाषा दिवस' साजरा करण्यात आला.

■ नूतन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. ०७/०३/२०२० रोजी जगभर थैमान घालणाऱ्या 'कोरोना' या रोगाबाबत जाणीव व जागृती करण्यासाठी सेलू उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ.संजयजी हरबडे यांनी विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना व काळजी कशी घ्यावी याबाबत मार्गदर्शन केले. महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांना मास्कचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. महेंद्र शिंदे कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. रमेश बैनवाड, प्रा. डॉ. माणिक सवंडकर, विद्यार्थी उपक्रम समितीचे प्रा. डॉ. राजाराम झोडगे, क्रीडा विभाग संचालक कमलाकर कदम व सहकारी प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी आणि मोठ्या प्रमाणात राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

■ नूतन महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. ०८/०३/२०२० रोजी 'जागतिक महिला

दिन' साजरा करण्यात आला.

■ नूतन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. १४/०४/२०२० रोजी थोर समाजसुधारक व घटनेचे शिल्पकार डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यात आली.

**विशेष शिबीर ब्राम्हणगाव - २०२०**

नूतन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबीर दि.१९/०१/२०२० ते २५/०१/२०२० रोजी मौजे ब्राम्हणगाव येथे संपन्न झाले. नूतन महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराचे उद्‌घाटन नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया यांच्या हस्ते झाले. तर दि. २५/०१/२०२० रोजी वार्षिक शिबिराचा समारोप मौजे ब्राम्हणगाव येथे संपन्न झाला. या समारोपाला अध्यक्ष म्हणून नूतन शिक्षण संस्थेचे माजी सचिव द. रा. कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे म्हणून सेलू पोलीस स्टेशनच्या निरीक्षक बोरगावकर मॅडम होत्या. त्यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले.

**उन्नत भारत अभियान**

केंद्र सरकारने उन्नत भारत अभियान सुरू केले असून या योजनेमध्ये महाविद्यालयाने प्रथमच सहभाग घेतला आला. महाविद्यालयाने ५ गावाचे सर्व्हेक्षण करून त्या गावच्या विकासाच्या योजनेचा आराखडा केंद्र सरकारला सादर करावा असे अपेक्षित आहे. खरकपूर येथे प्रशिक्षण घेऊन आल्यानंतर रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. आर. आर. बैनवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी पावडे हादगाव, जवळा जिवाजी, म्हाळसापूर, कुंडी, ब्राम्हणगाव या गावांचे सर्व्हेक्षण पूर्ण केले आहे.

**'महिला वसतिगृह' अहवाल (२०१९-२०)**

सेलू शहर मूळातच ग्रामीण संस्कृतीशी निगडित आहे. स्त्री शिक्षण त्यातही महाविद्यालयीन शिक्षण अनास्थेचा विषय, घर परिसर सोडून शिक्षणासाठी दूरच्या गाव-शहरात मुलींना पाठवायचे म्हटले की, अनेक यक्ष प्रश्न पुढ्यात घेऊन ते दुर्मुख चेहरा ठेऊन चिंतित होतात. एकूणच परभणी जिल्ह्यातील स्त्रियांचे उच्च शिक्षण हा स्वतंत्र संशोधनाचा विषय आहे. हे वर्तमान विचारात घेत आता स्त्रियांच्या उच्च शिक्षणाबाबत सामाजिक जाणिवांचा विकास घडावा यासाठी प्रबोधनात्मक जाणिव जागृती सुरू झालेली आहे. त्याचा परिणाम व महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुलींसाठी स्वतंत्र वसतिगृहाची केलेली योजना उपयुक्त होताना दिसते. विद्यापीठ अनुदान आयोगाने जिल्हा व तालुकास्तरीय महाविद्यालयांसाठी मुलींच्या वसतिगृह निर्माणासाठी विशेष अनुदान देण्याची तयारी केली. त्यास महाविद्यालयाने प्रतिसाद दिला. या योजनेत विद्यापीठ अनुदान आयोगाने चाळीस लाखाचे अनुदान दिले. याच अनुदानातून भव्य अशा मुलींच्या वसतिगृहाची निर्मिती झाली. या वसतिगृहाचा विशेष असा की, प्राचीन भारतीय परंपरेतील गुरुकुल सदृश असे येथील वातावरण आहे.

मुलींच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास व्हावा अशा सर्व वाङ्मयीन व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन देखील प्रभावीपणे होत असते. सर्व सुविधांनी युक्त इमारतीत २०१९-२० या शैक्षणिक वर्षात ६८ विद्यार्थिनींना प्रवेश तसेच क्रीडा साहित्य उपलब्ध करून दिले. वसतिगृहातील विद्यार्थिनींसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

**'महिला सक्षमीकरण कक्ष' अहवाल**

नूतन महाविद्यालय, सेलू व पोलीस प्रशासन, सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने क्रांतीज्योती सावित्रीबाई

फुले यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या सभागृहात 'सायबर सेफ वुमन' विषयावर प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रम प्रसंगी पोलीस निरीक्षक बोरगावकर मॅडम म्हणाल्या की, अमानुष रुढी, परंपरा व कर्मकांडामध्ये अडकलेल्या समाजात शिक्षण प्रचाराचे कार्य करतांना सावित्रीबाईंना आलेल्या अडचणी, झालेला त्रास व अपमान याबद्दल माहिती देतांना सावित्रीबाईंच्या या कार्यात जोतीबांनी केलेले सहकार्य या बाबतही उदाहरणे दिली. आजच्या दैनंदिन जीवनात इंटरनेटचा संबंध वाढला आहे. त्यामुळे समाजात सायबर गुन्हे वाढत आहेत. टीक टॉक, चॅटींग करतांना सावधानता बाळगणे आवश्यक आहे. स्मार्ट फोन वापरा पण स्वत:चा स्मार्टनेस घालवू नका. उपविभागीय पोलीस अधिकारी प्रकाश एकबोटे म्हणाले की, व्हॉट्स ॲप व फेसबुक वर तुम्ही प्रकाशित केलेली माहिती देशाबाहेर जाते. त्यावर कोणाचाही अंकुश नाही. सायबर गुन्हेगारी जगतात फसू नका, असे आवाहन देखील त्यांनी केले. या प्रसंगी सेलू शहरातील विविध शैक्षणिक संस्थांतील प्रमुख, विद्यार्थिनींचा सहभाग होता.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. कीर्ती निरालवाड तर आभार प्रा. डॉ. अर्चना पत्की यांनी मानले. या कार्यक्रमात महाविद्यालयीन विद्यार्थिनींचा सहभाग मोठ्या प्रमाणवर होता.

या शिवाय महाविद्यालयात विद्यार्थिनींसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

**श्री. श्रीरामजी भांगडिया वसतिगृह**

श्री. श्रीरामजी भांगडिया वसतिगृह हे संस्कार केंद्र आहे. ग्रामीण व बहुजन समाजातील विद्यार्थ्यांसाठी अल्पशा दरात हे वसतिगृह उपलब्ध असते. शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये वसतिगृहात ३५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. श्रीरामजी भांगडिया जयंती निमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले. कोविड-१९ मुळे वसतिगृहातील मुलांना कोरोनाचा संसर्ग होऊ नये म्हणून विद्यार्थ्यांना त्यांच्या गावी पाठविण्यात आले. २८ मार्च २०२० पासून ते ०५ मे पर्यंत वसतिगृहात विविध जिल्ह्यांतून व राज्यातून आलेले निर्वासित कामगार यांच्या निवासाची तात्पुरती व्यवस्था मा. उपविभागीय अधिकारी, सेलू यांच्या आदेशान्वये श्री. श्रीरामजी भांगडिया वसतिगृहात करण्यात आली., तसेच निवासाबरोबरच त्यांना अल्पोपहार व चहाची व्यवस्था विविध प्रायोजकांच्या सहकार्याने केली तर दुपारचे भोजन श्री महेश रुग्ण सेवा मंच व सायंकाळचे भोजन नितीन कला व क्रीडा मंडळाच्या वतीने करण्यात आले.

**दूर शिक्षण अभ्यास केंद्र**
**नूतन महाविद्यालय, सेलू**

ग्रामीण भागातील विद्यार्थी, नौकरी/ व्यवसाय करणारे, गृहिणी यांना पदव्युत्तर शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी या हेतूने महाविद्यालयात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे दूरशिक्षण अभ्यासकेंद्र कार्यरत आहे. मराठी, इंग्रजी, राज्यशास्त्र, इतिहास, अर्थशास्त्र, हिंदी अशा सात विषयात पदव्युत्तर शिक्षणाची (एम.ए.) सोय, या अभ्यास केंद्रात उपलब्ध आहे.

सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात एम.ए. प्रथम वर्षासाठी ४३ तर एम.ए. व्दितीय वर्षासाठी २० अशा एकूण ६३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. अभ्यास केंद्रात विद्यार्थ्यांसाठी संपर्क पत्र, संदर्भ ग्रंथ, प्रभाव लेखन, मार्गदर्शन, अभ्यास साहित्य आदी सुविधा पुरविण्यात येतात.

प्रा. विनायक टेंगसे हे या अभ्यास केंद्राचे केंद्र

समन्वयक म्हणून काम पाहतात.

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**
**अभ्यासकेंद्र :- नूतन महाविद्यालय,सेलू जि.परभणी (8704A)**
**वार्षिक अहवाल २०१९-२०**

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे खंडित झालेले शिक्षण, तसेच इतर अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिकचे अभ्यासकेंद्र आमच्या महाविद्यालयात कार्यान्वित असून दहावी/ बारावी नापास विद्यार्थ्यांना पूर्वतयारी शिक्षणक्रम परीक्षा उत्तीर्ण होऊन बी. ए./बी.कॉम प्रथम वर्षासाठी प्रवेश दिला जातो व पोलीस भरती, शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांना बढतीसाठी या संधीचा फायदा होतो. आमच्या अभ्यासकेंद्रात पूर्वतयारी / बी.ए / बी. कॉम अभ्यासक्रम शिकविले जातात. सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षात एकूण ३५१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यात पदवी पूर्वतयारी साठी २५, बी.ए. प्रथम वर्ष १४५, बी. ए. द्वितीय वर्ष ७६, बी. ए. तृतीय वर्ष ७४, बी. कॉम. प्रथम वर्ष ०८, बी. कॉम. द्वितीय वर्ष ११, बी. कॉम. तृतीय वर्ष १२ असे एकूण ३५१ विद्यार्थी अभ्यासकेंद्रात शिक्षण घेत आहेत. आमच्या अभ्यासकेंद्रात दरवर्षी दि.१ जुलै रोजी विद्यापीठ स्थापना दिनानिमित्त कै. वसंतराव नाईक यांची जयंती आणि दि.१२ मार्च रोजी मा. कै. यशवंतराव चव्हाण यांची जयंती साजरी करण्यात येते. विद्यापीठाकडून वेळोवेळी निर्धारित केलेले उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांना वेळेवर समंत्रण व मार्गदर्शन केले जाते तसेच उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखलेली आहे. तसेच यावर्षी विभागीय क्रीडा स्पर्धा डिसेंबर २०१९-२० मध्ये झाल्या या स्पर्धेत महाविद्यालयाच्या खेळाडूंना यश मिळाले १) राठोड विशाल राजेश, बी.ए. तृतीय वर्ष, २०० मी. धावणे या क्रीडाप्रकारात दुसरा क्रमांक मिळवला, २) नाईक पल्लवी सहदेव, बी. ए. प्रथम वर्ष, कबड्डी क्रीडाप्रकारात दुसरा क्रमांक मिळवला ३) चव्हाण अनिता रामा, बी. ए. व्दितीय वर्ष, कबड्डी क्रीडाप्रकारात दुसरा क्रमांक मिळवला, ४) धापसे आश्विनी लक्ष्मणराव, बी.ए. व्दितीय वर्ष, कबड्डी क्रीडाप्रकारात दुसरा क्रमांक मिळवला, ५) भदर्गे काजल रावसाहेब, बी.ए. व्दितीय वर्ष, २०० मी. धावणे क्रीडाप्रकारात प्रथम क्रमांक मिळवला, व भदर्गे काजल यांची विद्यापीठाच्या संघात निवड झाली.

**माजी विद्यार्थी संघटना अहवाल २०१९-२०**

महाविद्यालयाच्या गुणवत्ता वाढीसाठी तसेच भौतिक विकासासाठी माजी विद्यार्थी संघटना अंत्यत महत्त्वाची आहे. महाविद्यालयाच्या अनेक उपक्रमात संघटना सक्रिय सहभाग घेऊन सहकार्य करते. जेणे करुन महाविद्यालयाचा भौतिक विकास होतो व आजी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळते.

शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, माजी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष श्री हेमंतराव आडळकर तसेच संघटनेचे सर्व पदाधिकारी यांच्या मार्गदर्शनानुसार खालीलप्रमाणे विविध उपक्रम घेण्यात आले.

**माजी विद्यार्थ्यांचे मार्गदर्शन**

श्री. शंतनू हदगावकर (अहमदाबाद) यांनी विज्ञान मंडळा अंतर्गत (सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने) विज्ञान मंडळाचे उद्घाटन केले. त्यांनी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना सूक्ष्मजीवशास्त्र या विषयाचे महत्त्व याबद्दल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप

प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला. याप्रसंगी व्यासपीठावर प्रा.डॉ. व्ही. एच. पांचाळ, प्रा.डॉ.आर.एम. खाडप, प्रा. डॉ. एन. एस. पद्मावत, प्रा. डॉ. पी. आर. कंठाळे, प्रा. अमित कुलकर्णी, प्रा. ए. पी. पटाईत, प्रा. छाया गिते यांची उपस्थिती होती. सूत्र संचालन प्रा. ए. पी. पटाईत यांनी केले. तर आभार प्रदर्शन कु. मीना वटाणे हिने केले.

श्री. योगेश साळेगावकर यांनी विज्ञान प्रथम वर्ष या वर्गातील विद्यार्थ्यांना 'जीवन व शिक्षण' या विषयावर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्रा. डॉ. व्ही. एच. पांचाळ यांनी केला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. ए. पी. पटाईत यांनी केले.

मेजर प्रा.डॉ.व्ही.आर. चौधरी (योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई जि. बीड) व श्री. अजीतदादा बिनायके (प्रतिष्ठित व्यापारी, सेलू) यांनी गुणवत्ता सन्मान पारितोषिक योजना समारंभ प्रसंगी गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया यांनी केला.

प्रा. डॉ. बाबर (ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी) यांनी विज्ञान मंडळ अंतर्गत वनस्पतीशास्त्र विभागातर्फे आयोजित 'जल संवर्धन' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला. सूत्र संचालन प्रा. डॉ. व्ही. एच. पांचाळ यांनी केले. तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. आर. एम. खाडप यांनी केले.

प्रा. कु. नंदा शेंडगे, कु. सविता गात (डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद), प्रा. कु.रंजना ढाले (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड) यांनी विज्ञान मंडळा अंतर्गत विज्ञान प्रथम वर्ष या वर्गातील विद्यार्थ्यांना 'पदव्युत्तर शिक्षण' या बाबत मार्गदर्शन केले. या प्रसंगी व्यासपीठावर प्रा. डॉ. व्ही. एच. पांचाळ, प्रा. डॉ. आर. एम. खाडप, प्रा. डॉ. एन. एस. पदमावत, प्रा. डॉ. पी. आर. कंठाळे, प्रा. ए. पी. पटाईत, प्रा. छाया गिते, प्रा. स्वप्निता ढवळे यांची उपस्थिती होती. सूत्र संचालन व आभार प्रदर्शन प्रा. ए. पी. पटाईत यांनी केले.

ॲड.विवेक काला (औरंगाबाद) हे स्वामी विवेकानंद जयंती व माँ जिजाऊ जयंती निमित्त प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

**शेतकरी मेळावा**

माजी विद्यार्थी संघटना, वनस्पतीशास्त्र विभाग व सार्वजनिक गणेशोत्सव गणेश मंडळ, खवणे पिंपरी ता. सेलू जि.परभणी यांच्या संयुक्त विद्यमाने खवणे पिंपरी येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. कृषी महाविद्यालय, सेलू येथील प्रा .एन. एस. राठोड, प्रा. एस. डी.गाडेकर, प्रा. व्ही. टी. लिपणे तसेच प्रा.दयानंद जामगे यांनी कापूस लागवड व संरक्षण या विषयी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोप प्रा. डॉ. व्ही. एच. पांचाळ यांनी केला. हा शेतकरी मेळावा यशस्वी करण्यासाठी श्री रमेश चव्हाण, तसेच खवणे पिंपरी येथील सर्व शेतकरी बांधवानी मोलाचे सहकार्य केले. सदरील शेतकरी मेळावा प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनानुसार संपन्न झाला.

**महात्मा गांधी विचार प्रसार परीक्षा**

सर्वोदय मंडळ, मुबंई व माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयात महात्मा गांधी जयंती निमित्त महात्मा गांधी विचार प्रसार परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील परीक्षेसाठी ९१ विद्यार्थी/ विद्यार्थिनी उपस्थित होते.या परीक्षेसाठी वसमत येथील सर्वोदय मंडळाचे कार्यकर्ते श्री विशाल अग्रवाल व प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांच्या

मार्गदर्शनानुसार प्रा. डॉ. व्ही. एच. पांचाळ, प्रा. दयानंद जामगे, प्रा. एस. जी. घुलेश्वर, प्रा. संभाजी रोडगे, प्रा. यु. के. हेसे, प्रा. डॉ. पुरुषोत्तम व्यवहारे यांनी विशेष परिश्रम घेतले.

**आर्थिक योगदान**

माजी विद्यार्थी संघटनेने महाविद्यालयास आर्थिक वर्ष २०१८-१९ मध्ये पाच लक्ष रु.५०००००/- तर आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये एक लक्ष रु१०००००/- योगदान दिले.

**विभागीय मशरुम निर्मिती कार्यशाळा**

दि.०३ ऑगस्ट २०१९ शनिवार रोजी स्वामी विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय,वनस्पतीशास्त्र विभाग मंठा जि.जालना व न्यूट्रीमिस्ट मशरुम फार्म,औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय विभागीय मशरुम निर्मिती कार्यशाळेत विज्ञान प्रथम वर्ष या वर्गातील २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसोबत प्रा. डॉ. व्ही. एच. पांचाळ यांची उपस्थिती होती. सदरील सहभाग प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनानुसार घेण्यात आला.

**कोव्हिड-१९ जागृती उपक्रम**

२१ मार्च २०२० रोजी सर्व महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना कोव्हिड -१९ संसर्गजन्य विषाणूची माहिती व्हावी म्हणून सेलू येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.संजय हरबडे यांचे व्याख्यान आयोजित केले होते. डॉ.हरबडे यांनी कोव्हिड -१९ या विषाणू बद्दल माहिती देऊन या विषाणू पासून संरक्षण व्हावे म्हणून कोणती काळजी घ्यावी या संदर्भात मार्गदर्शन केले.

महाविद्यालयाच्या क्रीडागंणावर दररोज सकाळी व सायंकाळी व्यायाम, खेळण्यासाठी व फिरण्यासाठी २००० च्यावर नागरिक येत असतात. मा.उपजिल्हाधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे क्रीडांगणावर सूचना लावून जनजागृती करण्यात आली. कोव्हिड-१९ पासून बचाव करण्यासाठी जन जागरण करणारे एक पत्रक काढण्यात आले.

वनस्पतीशास्त्र विभाग व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने कोव्हिड-१९ विषाणू पासून संरक्षण व्हावे यासाठी जनजागृती अभियान चालविले जात आहे.

राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक आपआपल्या भागात कोव्हिड-१९ विषाणू पासून संरक्षण व्हावे म्हणून जनप्रबोधन करीत आहेत.

महाविद्यालयाने कोव्हिड-१९ विषाणू वर एक प्रश्नावलीचे आयोजन केले होते. देशातील विविध भागातील २२५६ विद्यार्थी, नागरिकांनी या प्रश्नावलीमध्ये सहभाग नोंदविला.

अनेक विषयाचे Online वर्ग प्राध्यापक घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षा पण घेतल्या जात आहेत. मोहकरे महाविद्यालय यांच्याबरोबर महाविद्यालयाने राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन १७/०४/२०२० रोजी केले होते. डॉ. गणेश हेगडे (नॅक) यांनी NAAC New Framework Guideline या विषयावर मार्गदर्शन केले.

Faculty Development Program अंतर्गत महाविद्यालय व वसंतराव नाईक महाविद्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने २९/०४/२०२० ते ०१/०५/२०२० या कालावधीमध्ये Opportunities and Challengses on Covid-19 : Post Lockdown आयोजित करण्यात आला.

शारीरिक क्षमता चाचणी प्रश्नावली तयार केली असून ५०० च्यावर विद्यार्थी, प्राध्यापक, नागरिक या प्रश्नावलीमध्ये सहभागी आहेत.

प्राणीशास्त्र विभागाकडून १५/०५/२०२० ते २१/०५/२०२० कालावधीत लघु अभ्यासक्रम

आयोजित केला आहे.

महाराष्ट्रातील व महाराष्ट्राच्या बाहेरील ६५ मजुरांची निवास व्यवस्था श्री. श्रीरामजी भांगडिया वसतिगृहामध्ये करण्याचे शासनाने सुचविले. त्याप्रमाणे २८ मार्च ते ०३ मे पर्यंत वसतिगृहामध्ये त्यांची राहण्याची सुविधा करण्यात आली. दोन वेळा चहा, अल्पोपहार व दुपारचे जेवण व सायंकाळचे भोजन प्रायोजकांच्या सहकार्याने मजुरांना देण्यात आले. दोन टी.व्ही.संच सुध्दा बघण्यासाठी ठेवण्यात आले.

**मराठी विभाग**

**अहवाल २०१९-२०**

दि. ०६ ऑगस्ट २०१९ रोजी मराठी विभागाच्या वतीने 'लेखक आपल्या भेटीला' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यात कवी श्री. जयराम खेडेकर व श्री. इंदर बोराडे, श्री. बालाजी चव्हाण यांचे काव्यवाचन संपन्न झाले.

दि. ०३ सप्टेंबर रोजी विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

दि. २५ डिसेंबर २०१९ रोजी स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड, महाविद्यालयाचा मराठी विभाग, म.सा.प. शाखा परभणी व शब्दसह्याद्री प्रतिष्ठान, सेलू यांच्या संयुक्त विद्यमाने 'अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य : समकालीन परिप्रेक्ष्य' या विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र घेण्यात आले.

मराठी विभागाच्या वतीने दि.०१ ते १५ जानेवारी २०२० या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा साजरा करण्यात आला. त्यात विद्यार्थ्यांसाठी गटचर्चा, माहितीपट दाखवणे, ग्रंथप्रदर्शन, भित्तीपत्रक, निबंध स्पर्धा इ. उपक्रम घेण्यात आले.

दि. १० व ११ जानेवारी रोजी विद्यार्थ्यांसाठी 'अभ्यास सहलीचे' आयोजन करण्यात आले. यात ९३ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन, उस्मानाबाद येथे भेट देण्यात आली.

दि. २७ फेब्रुवारी रोजी मराठी विभागाच्या वतीने मराठी भाषा गौरव दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात कवी संतोष नारायणकर यांचे मार्गदर्शन व काव्यवाचन संपन्न झाले.

**विज्ञान शाखा - विज्ञान मंडळ**

दि. २३/०७/२०१९ रोजी विज्ञान मंडळाचे उद्‌घाटन महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी शंतनू हदगांवकर यांच्या स्कोप ऑफ मायक्रोबायोलॉजी या विषयाच्या व्याख्यानाने झाले.

दि. ३०/०७/२०१९ रोजी श्री. योगेश साळेगावकर यांचे 'शिक्षणाचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दि. ०२/०८/२०१९ रोजी श्री. विशाल अग्रवाल, वसमत यांचे 'सेंद्रिय शेती' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दि. ०८/०८/२०१९ रोजी विज्ञान प्रथमवर्ष या वर्गाच्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ कार्यक्रम घेण्यात आला.

दि. १५/०८/२०१९ रोजी भित्तीपत्रकाचे विमोचन मा. डॉ. एस. एम. लोया यांच्या हस्ते करण्यात आले.

दि.११/१०/२०१९ ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक कै. गंगाप्रसाद अग्रवाल यांच्या पुण्यतिथी निमित्त 'कै. गंगाप्रसाद अग्रवाल यांचे जीवनकार्य' या विषयावर विद्यार्थ्यांचा परिसंवाद घेण्यात आला.

दि. १३/०१/२०२० रोजी श्री. विवेक काला यांचे स्वामी विवेकानंद जयंती निमित्त 'स्वामीजींचे जीवन' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

दि. २६/०१/२०२० रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त संविधान वाचन' या कार्यक्रमाचे आयोजन

करण्यात आले. विविध विषयावरील भित्ती पत्रकाचे विमोचन करण्यात आले.

दि. २८/०२/२०२० रोजी विज्ञान दिन साजरा करण्यात आला.

**वाणिज्य विभाग अहवाल (२०१९-२०)**

CMA बरोबर केलेल्या कराराप्रमाणे विद्यार्थ्यांसाठी एक दिवसाची कार्यशाळा आयोजित केली होती. CMA च्या तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२२ विद्यार्थी व प्राध्यापकांनी CMA ने आयोजित केलेल्या **'Cost Accounting and GST'** या विषयाच्या सेमिनार मध्ये सहभाग नोंदविला. बजाज फायनान्स बरोबर एक करार करून विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणातून विद्यार्थ्यांना पदवी प्राप्त झाल्यानंतर नोकरी प्राप्त करण्यासाठीचे आवश्यक कौशल्य विकसित करण्याची संधी देण्यात आली.

**हिंदी विभाग**

हिंदी विभागातर्फे विश्व हिंदी दिनानिमित्त प्रा. डॉ. मुकूंद कवडे, पिपल्स कॉलेज नांदेड व प्रा. डॉ. विजय जाधव, गुरुबुध्दी महाविद्यालय, पुर्णा यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

**वनस्पतीशास्त्र विभाग**

अहवाल (२०१९-२०२०)

■ दिनांक ३/८/२०१९ रोजी स्वामी विवेकानंद महाविद्यालय, मंठा जिल्हा जालना येथे एक दिवसीय 'मशरूम कल्चर' या विषयावरील कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्राचे २६ विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभाग नोंदवला. या कार्यशाळेत मशरूमच्या विविध जाती, त्याचे संवर्धन, उत्पादन, उत्पादन पद्धती व त्यांचे उपयोग या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन झाले.

दिनांक ९/९/२०१९ रोजी वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने खवणे पिंपरी, तालुका सेलू, जिल्हा परभणी येथे भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याचे अध्यक्षस्थान डॉक्टर व्ही. एच. पांचाळ यांनी भूषवले व प्रमुख मार्गदर्शक प्राध्यापक गाडेकर व प्राध्यापक राठोड कृषी महाविद्यालय, सेलू यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या शेतकरी मेळाव्यात खरीप व रब्बी पिकांच्या उत्पादन देणाऱ्या विविध जाती, त्यांची लागवड पद्धत, त्यासाठी लागणाऱ्या खतांच्या मात्रा व पिकांवरील कीड व त्यांचे व्यवस्थापन याबद्दल मार्गदर्शन केले. या शेतकरी मेळाव्यात १०५ शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

दिनांक १४/०९/२०१९ रोजी वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने माहुर, जिल्हा नांदेड येथे एक दिवशीय अभ्यास सहलीचे आयोजन करण्यात आले. या सहलीमध्ये बी.एस्सी. द्वितीय वर्षाचे ३३ विद्यार्थी व प्राध्यापक डॉ. व्ही. एच. पंचाळ, प्राध्यापक डॉ. आर. एम. खाडप व प्राध्यापक डॉ. पी. आर. कंठाळे यांचा समावेश होता. सहलीमध्ये माहुर जंगलाच्या विविध भागातील निसर्ग व विविध वनस्पतींचा अभ्यास केला. त्याच बरोबर औषधी वनस्पती व त्यांचे उपयोग या बद्दल विद्यार्थ्यांनी माहिती घेतली.

दिनांक १७/१२/२०१९ रोजी कुमारी नंदा शेंडगे, कुमारी रंजना ढाले व कुमारी सविता गात या माजी विद्यार्थिनींनी वनस्पतीशास्त्र व 'नोकरीच्या संधी' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांना भाजीपाला पिकाच्या विविध जातींची माहिती, त्याची लागवड, उत्पादन, पीक व्यवस्थापन व कीड नियंत्रणाची माहिती होण्यासाठी दिनांक २४/०१/२०२० रोजी जालना येथे एक दिवशीय

सहलीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी कलश सिड्स कंपनी, जालना येथे भेट दिली व या ठिकाणी लावलेल्या विविध जातीच्या भाजीपाला पिकांची पाहणी केली व त्यांची माहिती घेतली. तसेच बीज प्रक्रिया विभाग व बीज पॅकिंग युनिटला भेट देऊन याची माहिती घेतली. विद्यार्थ्यांनी बदनापूर, जिल्हा जालना येथील नूर वैद्यकीय महाविद्यालयास भेट दिली व त्या ठिकाणच्या विविध विभागांची माहिती घेतली. प्राध्यापक गिरी यांनी रोगाचे प्रकार व रोग होऊ नये या साठी घेतलेली खबरदारी या विषयावर माहिती दिली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी केंद्रीय रोप वाटिका, जालना येथे भेट दिली. या ठिकाणी विद्यार्थ्यांनी विविध फळांच्या कलमांची माहिती घेतली. श्री. बहिरट यांनी कलमांचे प्रकार, बांधणी पद्धत, कलम तयार होण्यात लागणारा कालावधी यांचीही माहिती दिली. या सहलीमध्ये बी.एस्सी. प्रथम व तृतीय वर्षाचे ५६ विद्यार्थी व प्राध्यापक डॉ. व्ही. एच . पांचाळ, प्राध्यापक डॉ. आर. एम. खाडप, प्राध्यापक डॉ. पी. आर. कंठाळे, प्राध्यापक पटाईत व प्राध्यापक गिते यांचा समावेश होता.

दिनांक २६/०१/२०२० रोजी महाविद्यालयात वनस्पतिशास्त्र विभागाच्या वतीने भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले. यामध्ये सहा विद्यार्थ्यांनी भाग घेतला.

दिनांक २८/१/२०२० रोजी एकदिवशीय भित्तीपत्रक स्पर्धेचे आयोजन व्यंकटेश महाविद्यालय, देऊळगाव राजा, जिल्हा बुलढाणा येथे करण्यात आले. वनस्पतीशास्त्राचे बी.एस्सी. द्वितीय वर्षाचे पाच व तृतीय वर्षाचे सहा विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या मध्ये लिंबाजी मुसळे व गिता टाके या विद्यार्थ्यांच्या भित्तीपत्रकास उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले. प्राध्यापिका अश्विनी पटाईत व प्राध्यापिका छाया गिते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

दिनांक ०९-०१-२०२० रोजी वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची माहिती या विषयावर एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. मार्गदर्शक म्हणून सेलूचे तहसीलदार श्री. बालाजी शेवाळे यांची उपस्थिती होती. श्री. बालाजी शेवाळे यांनी विद्यार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली व विद्यार्थ्यांबरोबरच चर्चा केली. या कार्यशाळेचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केला तर सूत्रसंचालन डॉ. कंठाळे यांनी केले व आभार प्रदर्शन डॉ. निर्मला पद्मावत यांनी केले. या कार्यशाळेत १२५ विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदवली.

दिनांक ०२/०२/२०२० ते ८/०२/२०२० च्या दरम्यान पुणे विद्यापीठ, महाबळेश्वर, प्रतापगड, रायगड, गणपती पुळे, दाजीपूर अभयारण्य, कोल्हापूर सहलीचे आयोजन करण्यात आले होते. या सहलीत ४२ विद्यार्थी व चार प्राध्यापकांचा समावेश होता.

विभागाच्या वतीने लॉकडाऊनमध्ये गुगल क्लासरूमद्वारे विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली. गुगल क्लासरूम मध्ये बी.एस्सी. प्रथमवर्षाचे ३५विद्यार्थी, द्वितीय वर्षाचे ३४ विद्यार्थी व तृतीय वर्षाचे ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

विभागाच्या वतीने कोव्हिड-१९ या विषयावर प्रश्न मंजुषा तयार केली व ऑनलाईन प्रमाणपत्र दिले. या प्रश्न मंजुषाला भरपूर प्रतिसाद मिळाला.

विभागाच्या वतीने 'कंजर्वेशन ऑफ फॉरेस्ट' या विषयावर प्रश्न मंजुषा तयार केली व ऑनलाईन प्रमाणपत्र दिले. या प्रश्न मंजुषाला भरपूर प्रतिसाद मिळाला.

कर्मवीर डॉ. पी. आर. घोगरे सायन्स कॉलेज धुळे यांनी दिनांक ०५ जून २०२० रोजी आयोजित

केलेल्या ऑनलाईन भित्ती पत्रक स्पर्धेत वनस्पतीशास्त्र विभागाची शेख अफशाईम शेख मुनीर या विद्यार्थिनीने देशात तिसरा क्रमांक पटकावला. या स्पर्धेत कुमारी उमा उघडे व यशा कदम यांनी सहभाग नोंदवला.

लॉकडाउनमध्ये वेबिनार, शार्ट टर्म कोर्स आणि एफ.डी.पी. मध्ये सहभाग घेतला.

### सूक्ष्मजीवशास्त्र विभाग

१) सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्रा. अमित कुलकर्णी यांनी बेंगलोर येथे संपन्न झालेल्या इंडियन सायंस काँग्रेस असोसिएशन या कार्यक्रमात आपला संशोधन प्रबंध दि. ०३ जानेवारी २०२० रोजी सादर केला.

२) प्रा. अश्विनी पटाईत यांनी ज्ञानोपासक महाविद्यालय, परभणी येथे संपन्न झालेल्या सूक्ष्मजीवशास्त्रातील राज्यस्तरीय भित्तीपत्रक स्पर्धेत सहभाग नोंदविला.

३) कु. अफ्शा शेख व कु. प्रिती शहारे या विद्यार्थिनींनी ज्ञानोपासक महाविद्यालयात झालेल्या सूक्ष्मजीवशास्त्रातील राज्यस्तरीय भित्तीपत्रक स्पर्धेत दि. २७ जानेवारी २०२० 'जेनेटीकली मॉडिफाईड माइक्रोऑरगॅनिझम' या विषयावर सहभाग नोंदवून राज्यातून द्वितीय क्रमांक पटकावला. यांना प्रा. अमित डी. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले तसेच यांच्या सोबत शिक्षक प्रतिनिधी म्हणून सौ. अश्विनी पटाईत यांची उपस्थिती होती.

४) कु. उमा उघडे व कु. तेजस्वी आवटे, विज्ञान द्वितीय वर्ष या विद्यार्थिनींनी ज्ञानोपासक महाविद्यालयात झालेल्या सूक्ष्मजीवशास्त्रातील राज्यस्तरीय भित्तीपत्रक स्पर्धेत दि. २७ जानेवारी २०२० 'जेनेटीकली मॉडिफाईड माइक्रो ऑरगॅनिझम' या विषयावर सहभाग नोंदविला,

५) कु. प्रिती शहारे, उमा उघडे, तेजस्वी आवटे, अफ्शा शेख यांनी नूतन महाविद्यालयातील प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या सूक्ष्मजीवशास्त्र विषयावरील भित्तीपत्रकात सहभाग नोंदविला.

६) सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील कु. उमा उघडे, कु. विद्या बुधवंत, कु. प्रिती शहारे, कु. गिता झोल, कु. अफ्शा शेख, कु. टाके या विद्यार्थिनींनी बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा येथील श्री व्यंकटेश महाविद्यालय येथे दि. २८/०१/२०२० आयोजित केलेल्या राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेत सहभाग नोंदविला.

७) सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील कु. ईषा सांगतानी या विद्यार्थिनीने पुर्णा येथील गुरुबुद्धी स्वामी महाविद्यालय येथे दि. २६/१२/२०१९ आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय संशोधन आविष्कार स्पर्धेत सहभाग नोंदविला.

**डॉ. पी. आर. कंठाळे**
विभाग प्रमुख, सूक्ष्मजीवशास्त्र
नूतन महाविद्यालय, सेलू

### कोरोना विषाणू संदर्भात जनजागृती अभियान

या अभियाना अंतर्गत कोरोना विषाणूंची वैज्ञानिक माहिती प्रसारित करण्यात आली. या विषाणूचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी समाज माध्यमांचा वापर करून स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण केली जात आहे. स्वच्छतेविषयी जागरूकता करताना हात धुण्याच्या पद्धती, शिंकताना, खोकलताना नाका तोंडावर रुमाल अथवा टिश्यू पेपर धरणे, कच्चे व अर्धवट शिजवलेले मांस खाऊ नये, फळे, भाज्या स्वच्छ मिठाच्या पाण्याने धुवून खाणे, सॅनिटायझरचा योग्य प्रकारे वापर करणे, हॅण्डवॉश वापरण्याच्या पद्धती व दिवसातून किती वेळा हात धुवावे, कशा कशाला स्पर्श केल्यावर हात धुणे अनिवार्य आहे या विषयक माहिती पुरवली.

अत्यावश्यक कामाकरिता बाहेर जात असताना मास्कचा वापर व सोशल डिस्टंसिंगचे नियम तसेच बाहेरुन परत घरी आल्यावर व्यवस्थित निर्जंतुकीकरण करणे, वापरलेल्या मास्कची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे या विषयी माहिती देण्यात आली. शिवाय घरात बसून लॉकडाऊन पाळत असताना कोरोना विषयक प्रश्न मंजुषा स्पर्धा आयोजित केली. तसेच महाराष्ट्रातील व इतर राज्यांच्या विविध महाविद्यालयांनी आयोजित केलेल्या कोरोना विषयक प्रश्न मंजुषा स्पर्धेत विभागातील प्राध्यापकांनी सहभाग नोंदविला.

सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना सुद्धा समाज माध्यम जसे की, फेसबुक, व्हाट्सॲप, इन्स्टाग्राम, ट्विटर, टेलिग्राम यांसारख्या सोशल नेटवर्कींग द्वारे कोरोना विषयी मार्गदर्शन केले. ऑनलाईन आंतरराष्ट्रीय विज्ञान परिषद, आंतरराष्ट्रीय चर्चा सत्र, ऑनलाईन राष्ट्रीय परिषद, ऑनलाईन आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय वेबिनार, फ्युचर डेवलपमेंट प्रोग्राम आणि सूक्ष्मजीवशास्त्र विभागातील शॉर्ट टर्म कोर्स यामध्ये विभागातील प्राध्यापकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला.

या जनजागृती अभियानासाठी संस्थेचे अध्यक्ष श्री डॉ. एस. एम. लोया, सचिव श्री डी. के. देशपांडे, सहसचिव डॉ. व्ही. के. कोठेकर, सहसचिव श्री जयप्रकाशजी बिहाणी, नूतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, नॅक समन्वयक डॉ. निर्मला पद्मावत, पर्यवेक्षक श्री नागेश कान्हेकर, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ. पी. आर. कंठाळे, समन्वयक श्री दयानंद जामगे, प्रा. अमित कुलकर्णी व प्रा. सौ. अश्विनी पटाईत यांचे मार्गदर्शन लाभले.

# नूतन महाविद्यालय, सेलू
## कनिष्ठ विभाग
## अहवाल २०१९-२०

### गुणवत्ता सन्मान पारितोषिक योजना

शैक्षणिक आस्था व जिव्हाळा असलेले आमच्या संस्थेचे हितचिंतक आणि सहकारी शिक्षकाच्या वतीने प्रतिवर्षी गुणवंतांचा यथोचित सन्मान सोहळा दि. २३/०९/२०१९ रोजी आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी मेजर प्रा. डॉ. व्ही. आर.चौधरी (योगेश्वरी महाविद्यालय, अंबाजोगाई) व मा. श्री. अजितदादा बिनायके यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. कनिष्ठ महाविद्यालयातून रु.१८९७१/- व एच.एस.व्हि.सी. या विभागातून रु. ५८२०/- ची पारितोषिके एकूण ३६८४४/- रु.ची पारितोषिके गुणवंत विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली.

### गुणवत्ता विकास प्रकल्प

गुणवत्ता विकास प्रकल्पा अंतर्गत विद्यार्थ्यांच्या ०३ घटक चाचणी परीक्षा व दोन सराव सराव परीक्षा घेतल्या जातात. गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक दिले जाते.

### सांस्कृतिक विभाग

दि. ०१ ऑगस्ट २०१९ या दिवशी अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या पुण्यतिथी निमित्त कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. निबंधाचा विषय 'आजच्या तरुणांपुढील आव्हाने' हा ठेवण्यात आला होता. स्पर्धेचा कालावधी ५० मिनिटे होता. वाचनकक्षात एकूण ७७ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

निकाल ११ वी वर्गातून प्रथम कु. गात प्रतिक्षा जीवन - विज्ञान, व्दितीय-कु. निकम दिशा पंकज - कला, तृतीय-चि. ठाकरे दिपक निवृत्ती - वाणिज्य, १२ वी वर्गातून प्रथम चि. गायकवाड अभिषेक भीमराव - कला, व्दितीय कु. बिडवे मंदाकिनी कैलास-कला, तृतीय चि. चव्हाण भागवत यमाजी - कला, प्रथम कु. मोतियानी ज्योती कन्हैयालालजी वाणिज्य (इंग्रजी माध्यम) भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून दि.१०/०८/२०१९ रोजी रांगोळी, दि. १३/०८/२०१९ रोजी वक्तृत्व, दि. १४/०८/२०१९ रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन केले होते. वक्तृत्व स्पर्धेचे विषय 'भारताची चांद्रयान मोहीम', 'निर्मलग्राम अभियान', 'कौशल्य विकास कार्यक्रम' हे ठेवण्यात आले होते.

निकाल :- रांगोळी कु. लिंगे तन्वी (११ वी वाणिज्य), कु.लिपणे कोमल गणेश (११ वी वाणिज्य), चित्रकला प्रथम कु. मोतीयानी ज्योती कन्हैयालाल (१२ वी वाणिज्य), द्वितीय कु. वायाळ नेहा अशोक (११वी विज्ञान), तृतीय चि. लोंढे पवन भगवान (१२ वी कला)

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने युवा जागर ' महाराष्ट्रावर बोलू काही' युवक कल्याण उपक्रमांतर्गत युवा वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन दि. १३/०५/२०१९ रोजी करण्यात आले. या स्पर्धेत एकूण **२०** विद्यार्थी सहभागी झाले.

तालुकास्तरीय झालेल्या या स्पर्धेसाठी आयोजन स्थळी मा. गटशिक्षण अधिकारी, प्राचार्य, तालुका क्रीडा अधिकारी उपस्थित होते.

निकाल प्रथम पारितोषिक रु ३०००/- कु. काकडे मनिषा (११ वी विज्ञान (क)), द्वितीय

पारितोषिक रु २०००/- कु. पाटील ऋतुजा (११ वी विज्ञान (क)), तृतीय पारितोषिक रु १०००/- कु मोरे मयुरी (११ वी कला) या विद्यार्थ्यांनी यश मिळविले.

जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी वरील विद्यार्थ्यांना परभणी येथील. श्री शिवाजी महाविद्यालय, परभणी येथे पाठविण्यात आले. तिन्ही विद्यार्थिनींनी सहभाग नोंदविला.

संविधान दिनानिमित्ताने (दि.२६/११/२०१९) दि.०३ डिसेंबर रोजी पोस्टर प्रेझेंटेशन, रांगोळी व काव्यवाचन स्पर्धांचे आयोजन क्रीडा विभागात करण्यात आले. माननीय प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी तसेच सर्व सांस्कृतिक विभाग सदस्य या स्पर्धेसाठी उपस्थित होते. आदरणीय प्राचार्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

यशस्वी विद्यार्थी काव्यवाचन :-

प्रथम - कु. बिडवे मंदाकिनी कैलास (१२ वी कला)

द्वितीय - चि. कृष्णा पवार (१२ वी कला)

तृतीय - कु. गिरी सोनिया बाबासाहेब

यशस्वी विद्यार्थी पोस्टर प्रेंझटेशन :-

प्रथम - कु. कऱ्हाळे आदिती (११ वी वाणिज्य)

द्वितीय - चि. कृष्णा पवार (१२ वी कला)

तृतीय - कु. लिपणे कोमल गणेश

दि. ०३ डिसेंबर २०१९ दु.१२.०० वाजता कॅडेट संगमेश मलवडे यांचे मार्गदर्शनपर व्याख्यान सभागृहात आयोजित करण्यात आले. माननीय प्राचार्य, श्री. मलवडे सर, कॅडेट संगमेश मलवडे तसेच प्राध्यापक वर्ग व विद्यार्थ्यांनी या मार्गदर्शनावेळी उपस्थिती नोंदविली.

दि. १४ डिसें २०१९ रोजी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी तर्फे श्री. शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसानिमित्त वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. कु. आदिती कऱ्हाळे (११ वी वाणिज्य) हिने प्रथम रु. ५०००/- तर कु. पाटील ऋतुजा (११ वी विज्ञान क) हिने रु. ३०००/- पटकावले.

**क्रीडा अहवाल २०१९ - २०२०**

शैक्षणिक वर्ष २०१९ - २० मध्ये कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंनी राज्य स्तरावर सहभाग घेऊन प्राविण्य प्राप्त केले आहे. सुवर्ण पदक , रौप्य पदक व कास्य पदक प्राप्त केले असून महाविद्यालयाचा लौकिक त्यांनी वाढवला आहे .

१) राष्ट्रीय शालेय सेपकटकारा स्पर्धेत आंध्रप्रदेश येथे ब्रॉन्झ मेडल प्राप्त केल्याबद्दल ७,७५०/रु. पूजा चव्हाण हीस तर निलेश माळवे यास ३,५००/- रु. क्रीडा शिष्यवृत्ती शासनाच्या वतीने देण्यात आली.

२) ५ ते ८ मे २०१९ या कालावधीत सोलापूर येथे राज्यस्तरीय ज्युनियर सॉफ्ट टेनिस क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील राठोड महादेव याने सहभाग घेतला.

३) दि.२६ ते २८ मे २०१९ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय,अमरावती येथे २३ वी राज्यस्तरीय ज्युनियर सेपकटकारा क्रीडा स्पर्धा संपन्न झाली. यात राठोड महादेव व शिंदे विठठ्ल यांनी सहभाग घेतला.

४) २७ ते ३१ जुलै २०१९ या कालावधीत राज्यस्तरीय टेबल टेनिस स्पर्धा , परभणी येथे संपन्न झाली . याप्रसंगी ऑफिशियल म्हणून प्रा. नागेश कान्हेकर उपस्थित होते.

५) दि.३०/७/२०१९ - जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी क्रीडा स्पर्धा आयोजनासंदर्भात बैठक घेतली. याप्रसंगी राष्ट्रीय शालेय पदक प्राप्त खेळाडू घडविल्याबददल प्रा.नागेश कान्हेकर यांचा सत्कार

डॉ.वंदना वाहूळ ( शिक्षण अधिकारी, परभणी ) यांनी केला.

६) दि.१३ ऑगस्ट २०१९ नूतन इंग्लिश स्कूल मध्ये तालुकास्तरीय योगासन व तायक्वांदो स्पर्धा संपन्न झाल्या. योगासन स्पर्धेत शेख नवीद याने सहभाग घेतला व त्याने प्रथम क्रमांक पटकाविला. तायक्वांदो स्पर्धेत आठवे रितेश, डुकरे अश्विनी, जोगदंड निकिता यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. तसेच साखरे प्रणिता हिने सहभाग घेतला.

७) दि.१९ ऑगस्ट २०१९ तालुकास्तरीय शालेय बुध्दीबळ स्पर्धा न्यू मॉडर्न इंग्लिश स्कूल , सेलू येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत खोना तन्मय , कदम दीप , बेरगुडे विशाल यांची जिल्हास्तरीय बुध्दीबळ स्पर्धेसाठी निवड झाली तर मणियार विवेक, साठे कुलदिप यांनी सहभाग घेतला.

८) दि.२० ऑगस्ट २०१९ तालुकास्तरीय कराटे स्पर्धा प्रिन्स अकॅडमी येथे संपन्न झाल्या . या स्पर्धेत आठवे रितेश , डुकरे अश्विनी , जोगदंड निकिता , चव्हाण पूजा यांनी सहभाग घेतला व त्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. तसेच साखरे प्रणिता व पाठक आकांक्षा यांचा या स्पर्धेत सहभाग होता.

९) दि. २०ऑगस्ट २०१९ तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. या स्पर्धेत पाटील ऋतुजा हिने व्दितीय क्रमांक पटकाविला. तिला रु.२०००/- बक्षीस देण्यात आले.

१०) दि.२४ ऑगष्ट २०१९ रोजी जिल्हास्तरीय बुध्दीबळ स्पर्धा परभणी येथे संपन्न झाल्या.या स्पर्धेत खोना तन्मय, बेरगुडे विशाल सहभागी होते, तर खोना तन्मय याची शालेय बुध्दीबळ विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

११) दि. १३ सप्टेंबर २०१९ तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धा परभणी येथे संपन्न झाल्या. या स्पर्धेत नूतन महाविद्यालय, सेलू संघाने प्रथम क्रमांक पटकाविला. या स्पर्धेतील सहभागी विद्यार्थी -चव्हाण विशाल, राठोड योगेश, आघाव गणेश, आढे मुकेश, केदार रामभाऊ, मदने पवन, कदम निशांत, शेरे भागवत, चव्हाण कुणाल, ताल्डे दीपक, शेख आफताब, शेख सुफियान.

१२) दि. ३० ऑगष्ट ते १ सप्टें.२०१९ या कालावधीत पुणे येथे राज्यस्तरीय सेपकटकारा स्पर्धा पार पडली. त्यामध्ये महाविद्यालयातील राठोड महादेव , डुकरे अश्विनी , साखरे प्रणिता , चव्हाण पूजा, जोगदंड निकिता, कऱ्हाळे आदिती, डोंगरे गोदावरी, लाटे शीतल या मुले व मुलींनी सहभाग घेतला.

१३) दि. १६ सप्टेंबर २०१९ परभणी येथे तायक्वांदो स्पर्धा पार पडली. त्यामध्ये डुकरे अश्विनी, जोगदंड निकिता , साखरे प्रणिता , आठवे रितेश यांनी सहभाग घेतला.

१४) दि.२० सप्टेंबर २०१९ रोजी जिल्हास्तरीय योगा स्पर्धा परभणी येथे संपन्न झाली. या स्पर्धेत शेख नवीद याने प्रथम क्रमांक पटकाविला.

१५) दि.२३ सप्टेंबर २०१९ - जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत बोरी येथे आपल्या संघाने जिल्ह्यात तृतीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धेसाठी महाविद्यालयातील चव्हाण विशाल, राठोड योगेश , आघाव गणेश , आढे मुकेश , केदार रामभाऊ , मदने पवन , कदम निशांत , शेरे भागवत, चव्हाण कुणाल, ताल्डे दीपक , शेख आफताब , शेख सुफियान या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

१६) दि. १८ सप्टेंबर २०१९ जिल्हास्तरीय तलवारबाजी ही स्पर्धा नूतन विद्यालय, सेलू येथे संपन्न झाली.

या स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुले/ मुलींनी सहभाग घेतला, मुलींमध्ये डोंगरे गोदावरी , डंबाळे निकिता , खापरे सारिका , काळे अंजली , यादव कोमल , गिरी अक्षदा , बोराडे अंकिता , डख पूजा, यादव दिपाली , बिडवे मंदाकिनी, घोडके रुख्मीण, किरळकर वैष्णवी, भुजबळ सीमा, गायके संध्या तर मुलांमध्ये चव्हाण कैलास , राठोड योगेश , आघाव गणेश, आढे मुकेश , कदम निशांत , पवार किरण , राठोड कुणाल , माने परमेश्वर यांनी सहभाग घेतला.

१७) दि.२५ सप्टेंबर २०१९ जिल्हास्तरीय सेपकटकारा स्पर्धा नूतन महाविद्यालयात संपन्न झाल्या. या स्पर्धेत चव्हाण पूजा , डुकरे अश्विनी , जोगदंड निकिता, साखरे प्रणिता , लाटे शीतल यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. तर मुलांमध्ये राठोड महादेव , वाघ शैलेश , शेख अल्ताफ , बोकण मयुर, चव्हाण कुणाल यांनी प्रथम क्रमांक मिळविला.

१८) दि.२७ सप्टेंबर २०१९ विभागीय शालेय तायक्वांदो क्रीडा स्पर्धा औरंगाबाद येथे संपन्न झाली. या स्पर्धेत डुकरे अश्विनी, जोगदंड निकिता यांनी सहभाग घेतला.

१९) दि.२८ सप्टेंबर २०१९ तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा नूतन महाविद्यालय, सेलू येथे संपन्न झाल्या या स्पर्धेत अंभोरे संदेश १०० मी. प्रथम व लांब उडी प्रथम, केदार रामभाऊ २०० मी. प्रथम, १५०० मी. व्दितीय. मदने पवन २०० मी. व्दितीय, वाघ विकास ८०० मी. प्रथम, पवार युवराज गोळा फेक प्रथम, गव्हाडे भाग्यश्री १०० मी. प्रथम, डुकरे अश्विनी लांब उडी व्दितीय, शेळके साक्षी – गोळाफेक, थाळी फेक प्रथम, चव्हाण पूजा – थाळी फेक व्दितीय, भाला फेक व्दितीय

२०) दि.३० सप्टेंबर २०१९ जालना येथे संपन्न झालेल्या विभागीय शालेय बुध्दीबळ स्पर्धेत खोना तन्मय व कदम दीप सहभागी झाले. कदम दीप याने या स्पर्धेत यशस्वी कामगिरी केली. त्याची निवड रायगड जिल्ह्यातील खोपोली ता. खालापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय बुध्दीबळ स्पर्धेसाठी औरंगाबाद विभागाच्या संघात झाली.

२१) दि.४ आक्टो. २०१९ रोजी परभणी येथे मुलांच्या शालेय मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत अंभोरे संदेश याने १०० मी. धावणे व लांब उडी या स्पर्धेत तर केदार रामभाऊ याने २०० मी. धावणे व १५०० मी. धावणे या स्पर्धेत सहभाग घेतला. मदने पवन याने २०० मी. धावणे. वाघ विकास ८०० मी. धावणे ,पवार युवराज याने गोळा फेक स्पर्धेत सहभाग घेतला.

२२) दि.४ आक्टो. २०१९ रोजी जालना येथे संपन्न झालेल्या मुलींच्या विभागीय शालेय सेपकटकारा स्पर्धेत महाविद्यालयाच्या चव्हाण पूजा , डुकरे अश्विनी, जोगदंड निकिता, लाटे शीतल , साखरे प्रणिता यांनी सहभाग घेतला. अंतीम फेरीत हा संघ औरंगाबाद विभागात प्रथम क्रमांक पटकावून नागपूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय सेपकटकारा स्पर्धेसाठी पात्र झाला.

या स्पर्धेत मुलांच्या संघात राठोड महादेव, वाघ शैलेश, शेख अल्ताफ, बोकण मयुर , चव्हाण कुणाल यांनी सहभाग घेतला. राठोड महादेव, याची निवड राज्यस्तरीय स्पर्धेच्या निवड चाचणी साठी झाली.

२३) दि. ५ आक्टो. २०१९ रोजी परभणी येथे जिल्हास्तरीय मुलींच्या मैदानी स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत गव्हाडे भाग्यश्री हिने १०० मी. धावणे तर डुकरे अश्विनी हिने लांब उडी स्पर्धेत सहभाग घेतला. शेळके साक्षी हिने गोळा फेक व थाळी फेक

स्पर्धेत तर चव्हाण पूजा हिने थाळी फेक व भाला फेक स्पर्धेत सहभाग घेतला. शेळके साक्षी ही गोळाफेक मध्ये प्रथम आली तर चव्हाण पूजा भाला फेकमध्ये व्दितीय आली. शेळके साक्षी व चव्हाण पूजा यांची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली.

२४) दि. १४ आक्टो.२०१९ रोजी परभणी येथील जिजाऊ ज्ञानतीर्थ विद्यालयात संपन्न झालेल्या विभागीय शालेय योगासन स्पर्धेत शेख नवीद याने सहभाग घेतला. त्याची निवड औरंगाबाद विभागाच्या योगासन संघात होऊन तो राज्यस्तरासाठी पात्र ठरला.

२५) दि.१४ ते १७ आक्टो. २०१९ या कालावधीत नागपूर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय सेपकटकारा स्पर्धेत औरंगाबाद विभागाचे नेतृत्व महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने केले. या स्पर्धेत चव्हाण पूजा , डुकरे अश्विनी , जोगदंड निकिता , लाटे शीतल , साखरे प्रणिता यांनी सहभाग घेतला. राठोड महादेव याने राज्यस्तरीय निवडचाचणीत सहभाग नोंदविला .

२६) दि. १६ ते १९ आक्टो. २०१९ या कालावधीत संगमनेर जि.नगर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय योगासन स्पर्धेत औरंगाबाद विभागाचे प्रतिनिधित्व महाविद्यालयाच्या शेख नवीद याने केले असून त्यात त्याने सहभाग घेतला. त्याचा त्या स्पर्धेत तृतीय क्रमांक आला व त्याला कांस्य पदक प्राप्त झाले.

२७) दि.१६ ते १९ आक्टो.२०१९ या कालावधीत हाळ ( खोपोली ) जि. रायगड येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय शालेय बुध्दीबळ स्पर्धेत औरंगाबाद विभागाचे प्रतिनिधित्व कदम दीप याने केले असून या स्पर्धेत त्याने सहभाग घेतला.

२८) दि. १७ आक्टो. २०१९ रोजी जालना येथे संपन्न झालेल्या. विभागीय शालेय मैदानी स्पर्धेतील गोळाफेक या प्रकारात शेळके साक्षी हिने सहभाग घेतला.

२९) दि.१ ते ४ नोव्हें. २०१९ या दरम्यान आळंदी जि. पुणे येथे झालेल्या राज्यस्तरीय ज्युनियर टेनिस व्हॉलीबॉल स्पर्धा संपन्न झाल्या यात गव्हारे भाग्यश्री हिने प्रथम क्रमांक पटकावून सुवर्ण पदक प्राप्त केले.

३०) दि.१८ नोव्हें.२०१९ रोजी सेलू येथे जिल्हास्तरीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा संपन्न झाल्या या स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलांच्या व मुलींच्या संघाने सहभाग घेऊन प्रथम क्रमांक पटकाविला. मुलांच्या संघात सुखनानी यश, जोग निषाद , जोशी सदाशिव ,झुटे अभिषेक, सोळंके ज्ञानेश्वर तर मुलींच्या संघात जमदाडे सायली, मुपडे जान्हवी, जोशी गितांजली , बोराडे अंकिता, मिर्झा फरहानाझ यांचा समावेश होता.

३१) दि.२० नोव्हे.२०१९ रोजी परभणी येथे विभागीय शालेय टेबल टेनिस स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या मुलांच्या संघात सुखनानी यश , जोग निषाद , जोशी सदाशिव, झुटे अभिषेक, सोळंके ज्ञानेश्वर तर मुलींच्या संघात जमदाडे सायली, मुपडे जान्हवी , जोशी गितांजली ,बोराडे अंकिता, मिर्झा फरहानाझ या खेळाडूंनी सहभाग घेतला.

३२) दि.९ डिसें.२०१९ रोजी सेलू येथे जिल्हास्तरीय मिनी गोल्फ स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत राठोड महादेव, रघुवंशी प्रतापसिंह, बोकन मयुर, पवार युवराज, चव्हाण विशाल, चव्हाण कुणाल, कदम विशाल, नावाडे चैतन्य ,पटाईत यश, घुटे धनराज यांनी सहभाग घेतला. त्यापैकी राठोड महादेव, रघुवंशी प्रतापसिंग, मयुर बोकन, घौरी फरहान यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.

३३) दि. ९ डिसें.२०१९ रोजी सेलू येथील नूतन विद्यालयामध्ये शालेय जिल्हास्तरीय फ्लोअर बॉल

स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील मुलांच्या गटात राठोड महादेव , रघुवंशी प्रतापसिंग , घौरी फरहान, बोकन मयुर, चव्हाण कुणाल ,चव्हाण विशाल, राठोड योगेश, आघाव गणेश, आढे मुकेश, नावाडे चैतन्य, घुटे धनराज, नागरे पवन , गोरे अमोल, मुळे रत्नेश्वर , मदने पवन या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३४) दि.१० डिसें.२०१९ रोजी सेलू मध्ये जिल्हास्तरीय शालेय आट्या –पाट्या स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील मुलांनी सहभाग घेतला या स्पर्धेत (कॅप्टन) राठोड महादेव, राठोड योगेश, चव्हाण विशाल, चव्हाण कुणाल ,रघुवंशी प्रतापसिंह, आघाव गणेश, आढे मुकेश, कदम निशांत , जाधव अनिकेत, गोरे अमोल, मुळे रत्नेश्वर , नागरे पवन यांनी सहभाग घेतला.

३५) दि.११ डिसें.२०१९ रोजी विभागीय शालेय फ्लोअर बॉल स्पर्धा संपन्न झाल्या. यात कुणाल चव्हाण याची निवड राज्यस्तरीय स्पर्धेसाठी झाली.

३६) दि.१२ डिसें. २०१९ रोजी विभागीय शालेय मिनी गोल्फ स्पर्धा संपन्न झाल्या. यात राठोड महादेव, रघुवंशी प्रताप, बोकन मयुर , घौरी फरहान याने सहभाग घेतला. यापैकी राठोड महादेव, रघुवंशी प्रताप यांची निवड राज्यस्तरीय शालेय स्पर्धेसाठी झाली.

३७) दि. १३ ते १५ डिसें.२०१९ मेहकर येथे झालेल्या राज्यस्तरीय फ्लोअर बॉल स्पर्धेत कुणाल चव्हाण याने सहभाग घेऊन कांस्य पदक प्राप्त केले.

३८) दि. १३ ते १७ डिसें. २०१९ कामरगाव जि. वाशीम येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय मिनी गोल्फ स्पर्धेत राठोड महादेव याने सहभाग घेऊन सुवर्ण पदक प्राप्त केले, तर रघुवंशी प्रताप याने सहभाग घेतला.

३९) दि.१८ ते २० डिसें.२०१९ रोजी नंदुरबार येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय फ्लोअर बॉल निवडचाचणी साठी चव्हाण कुणाल याची औरंगाबाद विभागातून त्याची निवड झाली व त्याने सहभाग घेतला.

४०) दि. २१ ते २३ डिसें.२०१९ कालावधीत माजलगाव, जिल्हा बीड येथे झालेल्या २१ व्या मिनी युथ राज्यस्तरीय टेनिस व्हॉलीबॉल अजिंक्यपद स्पर्धेत नावाडे चैतन्य याने सहभाग घेतला व त्याचा या राजस्तरीय स्पर्धेत व्दितीय क्रमांक आला व त्याने रौप्य पदक प्राप्त केले.

४१) दि.१५ जाने.२०२० नेहरु युवा केंद्र यांच्या वतीने नूतन विद्यालय सेलू येथे तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेत महाविद्यालयाचा संघ प्रथम आला. या संघात खालील खेळाडूंचा सहभाग होता.

चव्हाण विशाल , राठोड योगेश , चव्हाण कुणाल , केदार रामभाऊ , आघाव गणेश , आढे मुकेश , बरकुले सत्यम , राठोड महादेव , पाठक अर्थव , मगर संकेत .

४२) दि.१७ डिसें.२०१९ व दि.२७ जाने.२०२० रोजी आकाशवाणी परभणी रेडीओ केंद्रावरुन शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यावर प्रा.नागेश कान्हेकर यांचे व्याख्यान प्रसारित झाले.

क्रीडा विभागाच्या वतीने विविध स्पर्धांचे आयोजन या वर्षात करण्यात आले असून स्पर्धेच्या आयोजनात महाविद्यालयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले तसेच खेळाडूंनी यात सहभाग घेतला.

### राष्ट्रीय सेवा योजना २०१९-२०

### माहे जून-२०१९

१. २० जून २०१९ रोजी राष्ट्रीय सेवा योजना या विषयावर उद्बोधन शिबीर संपन्न झाले प्रा. एस. जी. घुलेश्वर यांचे मार्गदर्शन लाभले.

२. २१ जून २०१९ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

३. २६ जून २०१९ रोजी महाविद्यालयात शाहू महाराज जयंती साजरी करण्यात आली त्यानिमित्त शाहू महाराज यांच्या जीवन कार्यावर प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी मार्गदर्शन केले.

**माहे - जूलै-२०१९**

१) ११ जुलै २०१९ रोजी जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त भित्तीपत्रकाचे विमोचन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले.

२) २५ जुलै २०१९ रोजी उद्‌बोधन शिबिर घेण्यात आले या शिबिरात श्री. के. डी. वाघमारे यांनी स्वयसेवकांना मार्गदर्शन केले.

३) दि.२९ जुलै २०१९ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे मा.संयोजक राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या अंतर्गत वार्षिक नियोजनाची बैठक संपन्न झाली. या बैठकीस कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.

**माहे - ऑगस्ट-२०१९**

१) दि.०१/०८/२०१९ रोजी महाविद्यालयात कै. अण्णाभाऊ साठे जयंती व मा. लोकमान्य टिळक पुण्यतिथी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

२) दि.०८/०८/१९ रोजी महाविद्यालयातील विद्यार्थी व स्वंयसेवकांना रक्तदानाचे महत्त्व या विषयावर डॉ. जोग यांनी मार्गदर्शन केले.

३) दि.१५/०८/१९ स्वातंत्र्यदिनानिमित्त विद्यार्थ्यांना फळ वाटप करण्यात आले व भित्तीपत्रकाचे विमोचन करण्यात आले.

४) दि.१७/०८/२०१९ रोजी सद्भावना दिन साजरा करण्यात आला. यात विद्यार्थ्यांना सद्भावना शपथ देण्यात आली.

५) दि.१९/०८/२०१९ रोजी महाविद्यालयात क्रांतीदिनानिमित्त लोकमान्य ब्लड बँक, औरंगाबाद व रा. से. यो. नूतन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान व रक्तगट तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले. त्यात एकूण ६२ विद्यार्थी व प्राध्यापकांनी रक्तदान केले. तसेच १६४ जणांची रक्तगट तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमासाठी ब्लड बँकेचे डॉ.नागरे, त्यांच्या सहकाऱ्यांनी, रा.से.योजनेच्या स्वयंसेवकांनी व कार्यक्रमाधिकाऱ्यांनी मदत केली.

**माहे - सप्टेंबर-२०१९**

१) ०५ सप्टेंबर २०१९ शिक्षक दिनाचे आयोजन करण्यात आले.

२) ०६ सप्टेंबर २०१९ रोजी १८४ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.

३) १७ सप्टेंबर २०१९ मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनानिमित्त वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना फळ वाटप करण्यात आले.

४) २२ सप्टेंबर २०१९ राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिनानिमित्त व्यक्तीमत्त्व या विषयावर तज्ज्ञाचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.के.डी.वाघमारे यांचे बहुमोलाचे मार्गदर्शन लाभले.

५) २९ सप्टेंबर २०१९ 'संवाद कौशल्य' या विषयावर डॉ. आर. ए. झोडगे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.

**माहे -ऑक्टोबर**

१) ०२ ऑक्टोबर २०१९ म.गांधी व लाल बहाद्दू शास्त्री यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे नियोजन

व आंतरराष्ट्रीय अंहिसा दिवस साजरा करण्यात आला.

**माहे नोव्हेंबर**

१) २८ नोव्हेंबर २०१९ म.फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमात सेलू गावातील अनेक नागरिक उपस्थित होते.

२) ३० नोव्हेंबर २०१९ श्री. श्रीरामजी भांगडिया स्मृती दिनानिमित्त उद्‌बोधन वर्ग घेण्यात आले. या कार्यक्रमासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व कार्यक्रमाधिकारी उपस्थित होते.

**माहे डिसेंबर**

१) १ डिसेंबर २०१९ जागतिक एड्स दिनानिमित्त जिल्हा रुग्णालय परभणी, जिल्हा उपरुग्णालय, सेलू यांच्या वतीने 'एड्स जन जागृती' रॅलीचे आयोजन केले होते. त्यात महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

२) महिला सबलीकरण निमित्त आयोजित रॅलीमध्ये महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी सहभागी झाले होते.

३) स्वामी विवेकानंद जयंती निमित्त '२१ व्या शतकातील युवक' या विषयावर विद्यार्थ्यांचे मनोगत घेण्यात आले.

**रा.से.यो. वार्षिक शिबीर**

२०१९-२० या वर्षीचे वार्षिक शिबीर १९ जानेवारी ते २५ जानेवारी या कालावधीत मौजे ब्राम्हणगाव ता.सेलू जि.परभणी येथे संपन्न झाले.

**माहे जानेवारी**

१) ३० जानेवारी गांधीजी यांच्या पुण्यतिथी निमित्त गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

**माहे फेब्रुवारी**

१) १९ फेब्रुवारी २०२० छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त मूर्ती पूजनानंतर विद्यार्थ्यांनी भव्य शोभायात्रेचे आयोजन केले होते.

२) राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.

**माहे मार्च**

१) १२ मार्च यशवंतराव चव्हाण जयंती निमित्त अभिवादन सभेचे आयोजन केले होते. यावेळी प्रा.के.के.कदम यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

**माहे एप्रिल**

१) ११ एप्रिल रोजी महात्मा फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

२) दि.१४ एप्रिल डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त अभिवादन करण्यात आले.

# अंतर्गत गुणवत्ता समिती अहवाल

१) विद्यापीठ अंतर्गत होणारे शैक्षणिक आणि प्रशासकीय मूल्यांकन (२०१७-१८ ते २०१९-२०) पूर्ण करुन त्यांचा अहवाल ०९ फाईलमध्ये सादर करण्यात आला. १८ जाने. २०२० ला डॉ. वसंतराव भोसले यांच्या नेतृत्वाखाली एका समितीने महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यांकन केले. विद्यापीठाकडून अद्याप प्रमाणपत्र प्राप्त झाले नाही.

२) IQAC मध्ये शैक्षणिक आणि प्रशासकीय मूल्यांकन External Agency ची स्थापना करण्यात आली असून या मध्ये डॉ. शरद कुलकर्णी, डॉ. निर्मला पद्मावत, प्रा. पटारे, प्रा. पांडे आणि प्रा. गरुड यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. या समितीने एम. डी. शाह महाविद्यालय, मालाड यांचे AAA 18 विभागाचे काम करुन दिले.

३) IQAC ने Mapping Department ची स्थापना करुन त्या त्या अंतर्गत एम. डी. शाह महिला महाविद्यालय मालाड, मुंबई तसेच लोकमान्य महावनिद्यालय, सोनखेड यांना Course outcome, Program outcome, Course Specific outcome काढण्यास मार्गदर्शन व मूल्यांकन करुन त्याचा अहवाल सादर केला. या कमिटीवर प्राचार्य, डॉ. शरद कुलकर्णी, IQAC Coordinator डॉ. निर्मला पद्मावत, Mapping Co. श्री. पंकज सोनी यांनी काम केले.

४) IQAC अंतर्गत माजी विद्यार्थी संघटना Chapter Aurangabad, Chapter Nanded व Chapter Parbhani ची निर्मिती करण्यात आली. Chapter Aurangabad चे काम C.A. आनंद परतानी पाहतात. Chapter Nanded चे काम श्री. सतीश कुलकर्णी पाहतात. Chapter Parbhani चे काम श्री. संतोष चिद्रवार व श्री सतीश कुंडीकर हे पाहतात.

५) IQAC च्या अंतर्गत You Tube ची निर्मिती केली असून यावर वेळोवेळी झालेल्या सर्व महत्त्वाच्या कार्यक्रमांचे व्हिडीओ Upload करण्यात आले आहेत.

६) SST college Mumbai, Lokmanagal College Nanded, Vasantrao Naik Mahavidyalaya Vasarni व Dr. Babasaheb Ambedkar या महाविद्यालयातील IQAC समिती वर External Advisor म्हणून डॉ. एन. एस. पद्मावत यांची नियुक्ती झाली.

७) CMI- भारत सरकार (Aurangabad Chapter) यांच्याशी MOU करण्यात आला आणि त्याअंतर्गत Commerce च्या विद्यार्थ्यांसाठी एक मार्गदर्शन शिबीर आपल्या महाविद्यालयात घेण्यात आले. तसेच एक प्रशिक्षण Programme Aurangabad ला झाला. त्यात B. Com तृतीय वर्षाच्या ३१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला व प्रा. डॉ. सवंडकर यांनी सहभाग नोंदवला.

८) Bajaj Finserv यांच्याशी MOU करण्यात आला व त्याअंतर्गत पदवी तृतीय वर्षाच्या मुलांसाठी प्रमाणपत्र कोर्स सुरू करण्यात आला.

९) के. के. एम. महाविद्यालय, मानवत, अंबेजोगाई

महाविद्यालय यांच्याशी MOU करण्यात आले.

**C FDP चे आयोजन**

संस्थेचे सहसचिव तथा महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॉ. व्ही. के. कोठेकर यांच्या अमृत महोत्सवाच्या सुरुवातीस महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासाठी Online कौशल्यावर आधारीत प्रशिक्षणाचे आयोजन २६ ते २८ मे या कालावधीत करण्यात आले. या प्रशिक्षण शिबीरात ९० सहकारी मित्रांनी सहभाग घेतला. प्रशिक्षण शिबीराचे उद्‌घाटन डॉ. व्ही. के. कोठेकर यांच्या शुभहस्ते झाले तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्था अध्यक्ष डॉ. लोयाजी होते. संस्थेचे सहसचिव श्री. जयप्रकाशजी बिहाणी व कार्यकारी मंडळाचे सभासद श्री. नंदकिशोर बाहेती यांची कार्यक्रमास उपस्थिती होती.

प्रा. धर्मापुरीकर, प्रा. तातेड व प्रा. जोशी यांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले.

**प्रश्नावलीचे आयोजन**

१) महाविद्यालयाचे कोव्हिड-१९ विषाणू वर एक प्रश्नावलीचे आयोजन केले होते. देशातील विविध भागातील २२५६ विद्यार्थी, नागरिकांनी या प्रश्नावलीमध्ये सहभाग नोंदविला.

२) शारीरिक क्षमता चाचणी प्रश्नावली तयार केली असून ५०० च्या वर विद्यार्थी, प्राध्यापक, नागरिक या प्रश्नावलीमध्ये सहभागी झाले होते.

३) महाविद्यालयाचे प्राध्यापक ऑनलाईन वर्ग घेत आहेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षाही घेतल्या जातात.

४) विद्यार्थ्यांना मुलाखतीचे तंत्र शिकविणारे तज्ज्ञाकडून ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले.

५) वाणिज्य तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या संधी यावर तज्ज्ञाकडून ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले.

६) Establishment of Incubation Cell and Roll of Industrial Academia in Higher Education यांच्याकडून व्यवसाय कौशल्य शिकविण्यात आले.

७) आय. ए. एस. अधिकारी श्री. बेले यांचे विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन व्याख्यान आयोजित करण्यात आले.

८) पदवी अंतिम वर्षाचा् विद्यार्थ्यांसाठी Human Resource Development Training एका आठवड्याचे देण्यात आले.

**सामाजिक कार्य**

१) महाविद्यालयाच्या क्रीडागंणावर दररोज सकाळी व सायंकाळी व्यायाम, खेळण्यासाठी व फिरण्यासाठी २००० च्यावर नागरिक येत असतात. मा. उपजिल्हाधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे क्रीडागंणावर सूचना लावून जनजागृती करण्यात आली. कोव्हिड-१९ पासून बचाव करण्यासाठी जनजागरण करणारे एक पत्रक काढण्यात आले.

२) वनस्पतीशास्त्र विभाग व सूक्ष्मजीवशास्त्र विभागाच्या वतीने कोव्हिड-१९ विषाणू पासून संरक्षण व्हावे यासाठी जनजागृती अभियान चालविले जात आहे.

३) महाराष्ट्रातील व महाराष्ट्राच्या बाहेरील ६५ मजूरांची निवास व्यवस्था श्रीरामजी भांगडिया वसतिगृहामध्ये करण्याचे शासनाने सुचविले. त्याप्रमाणे २८ मार्च ते ०३ मे पर्यंत वसतिगृहामध्ये त्यांची राहण्याची सुविधा करण्यात आली. दोन वेळा चहा, अल्पोपहार व दुपारचे जेवण व सायंकाळचे भोजन प्रायोजकांच्या सहकार्याने मजुरांना देण्यात आले. दोन टी. व्ही. संच सुद्धा बघण्यासाठी ठेवण्यात आले.

**वेबिनारचे आयोजन**

मोहकरे महाविद्यालय यांच्या बरोबर महाविद्यालयाने राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन १७.०४.२०२० ला केले होते. डॉ. गणेश हेगडे (नॅक) यांनी NAAC New Framework Guideline या विषयावर मार्गदर्शन केले.

Faculty Development Program अंतर्गत महाविद्यालय व वसंतराव नाईक महाविद्यालय, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने २९.०४.२०२० ते ०१.०५.२०२० या कालावधीमध्ये Opportunities and Challenges on Covide-19 : Post Lockdown आयोजित करण्यात आला.

**लघु अभ्यासक्रम**

प्राणीशास्त्र विभागाकडून १५.०५.२०२० ते २१.०५.२०२० कालावधीत लघु अभ्यासक्रम आयोजित केला आहे.

नीती आयोगासोबत संवाद : आपल्या महाविद्यालयातील IQAC समन्वयक प्रा. पद्मावत यांनी नीती आयोगाशी संवाद साधून महाविद्यालयातर्फे घेण्यात आलेल्या उपक्रमाची माहिती दिली. त्यामुळे भारतामध्ये कोरोनाशी युद्ध करणाऱ्या ९२,००० संस्थांमध्ये नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचा समावेश करण्यात आला.

वेबिनार मध्ये सहभाग :

महाविद्यालयामधील सर्वच प्राध्यापकांनी विद्यापीठ, यु. जी. सी. शासन व अन्य महाविद्यालयातर्फे आयोजित केलेल्या राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांमध्ये, कौशल्य विकास शिबीरात सहभाग नोंदवला.

विविध विषयांच्या झालेल्या वेबिनारमध्ये सुद्धा प्राध्यापकांचा सहभाग होता.

अनेक प्राध्यापकांनी शोधनिबंध प्रकाशित केले.

प्राथमिक वर्गासाठी इंग्रजी कौशल्य विकास करण्यासंदर्भात एक प्रकल्प महाविद्यालयातर्फे एन. सी. आर. टी. ला प्रा. डॉ. पद्मावत यांनी सादर केला.

महाविद्यालयातर्फे प्रा. डॉ. पद्मावत यांनी राष्ट्रीय स्तरावर वेबिनार मध्ये मार्गदर्शन केले.

# अभिनंदन



**प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी** यांना महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे यांच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ हिन्दी मराठी ग्रंथालय, सेलूच्या सचिवपदी केलेल्या कार्याबद्दल श्री. श. र. जोशी पुरस्कार देऊन सन्मानित केले.

प्रेरणा ( २०१८-१९ ) वार्षिकांकास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे उत्कृष्ट वार्षिकांक तृतीय क्रमांकाचा पुरस्कार प्राप्त.






स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या युवक महोत्सवात नीरज वैष्णव या विद्यार्थ्याने तालवाद्य या कलाप्रकारात तृतीय क्रमांक पटकावला त्याबद्दल हार्दिक अभिनंदन.

डॉ. पी. आर. घोगरे महाविद्यालय, धुळे यांनी बायोडायव्हर्सिटी कन्झर्वेशन या विषयावर घेतलेल्या भित्तीपत्रक स्पर्धेत तृतीय वर्षाची विद्यार्थिनी कु. शेख हिने तृतीय क्रमांक पटकाविल्याबद्दल हार्दिक अभिनंदन.



# सेवानिवृत्त प्राध्यापक



**डॉ. एस. एस. दंडवते**
(सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग)
रुजू दिनांक :- १५/०१/२००५
निवृत्ती दिनांक :- ३०/०६/२०१९



**प्रा. डी. बी. गायकवाड**
(उ.मा. शि. व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम)
रुजू दिनांक :- ०५/०२/१९९०
निवृत्ती दिनांक :- ३१/१०/२०१९



**डॉ. व्ही. एच. पांचाळ**
(वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख, विज्ञान विभाग)
कनिष्ठ विभाग :- ०१/०७/१९८५ ते ०५/०९/१९९९
वरिष्ठ विभाग :- ०६/०९/१९९९ ते ३१/१२/२०१९

# भावपूर्ण श्रद्धांजली



**प्रा. एल. एच. काळे**
(माजी पर्यवेक्षक, प्रा. रसायनशास्त्र विभाग)
रुजू दिनांक :- १४/०९/१९८७
पर्यवेक्षक :- २०/११/१३ ते ०८/१२/१९
नूतन महाविद्यालयात कनिष्ठ
विभागाचे पर्यवेक्षक व रसायनशास्त्र विभागात
कार्यरत असणारे
प्रा. एल.एच. काळे यांचे दि. ०८/१२/२०१९
रोजी दु:खद निधन झाले.
महाविद्यालयातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली



**प्रा. प्रकाश कामतीकर**
नूतन महाविद्यालयातील
माजी मराठी विभाग प्रमुख,
रुजू दिनांक :- ०६/०७/१९७०
निवृत्ती दिनांक :- ३१/१०/२००३
सिद्धहस्त साहित्यिक प्रा. प्रकाश कामतीकर
यांचे २२ एप्रिल २०२० रोजी दु:खद निधन
झाले. महाविद्यालय परिवारातर्फे भावपूर्ण
श्रद्धांजली



**सौ. मीरा कांबळे (गायकवाड)**
नूतन महाविद्यालयात कनिष्ठ विभागात घड्याळी तासिकेवर कार्यरत असणाऱ्या
सौ. मीरा कांबळे (गायकवाड) यांचे अकाली दु:खद निधन झाले.
महाविद्यालय परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली.
मृत्यूदिनांक ०६.०९.२०१९

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

# देशोन्नती

नांदेड

## मुद्रित माध्यमांनी चळवळीचे नेतृत्व करावे-महावीर जोंधळे

व्याख्यान ▸▸ स्वरातीम विद्यापीठ व नुतन महाविद्यालयाचा कार्यक्रम



पुरोगामी विचाराचे

# एकमत

▶ चर्चासत्र ▶ राज्यस्तरीय चर्चासत्राच्या समारोप प्रसंगी डॉ. आत्माराम लोनटे यांचे प्रतिपादन

## शोषणाला नकार हा अण्णा भाऊंच्या साहित्याचा केंद्रबिंदू



दैनिक दिलासा

गुरूवार, दि. २२ ऑगस्ट २०१९

## नुतनने स्वामी रामानंद तीर्थ यांच्या विचारांचा वारसा जपला: रोडे



रविवार दि. १५ डिसेंबर २०१९ | लोकमत

## विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषा संवाद कौशल्य आत्मसात करावे -बी.पी.पृथ्वीराज

लोकमत न्यूज नेटवर्क

**सेलू :** इंग्रजीत आपले विचार प्रभावीपणे व्यक्त करण्यासाठी शालेय जीवनापासूनच इंग्रजी बोलण्याचे कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. पी. पृथ्वीराज यांनी केले.



येथील नूतन महाविद्यालयात परभणी जिल्ह्यातील पहिल्या अत्याधुनिक इंग्रजी भाषा कौशल्य प्रयोगशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष डॉ.एस.एम. लोया तर प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सचिव डी.के. देशपांडे, डॉ.विनायकराव कोठेकर, श्रीनिवास, जयप्रकाश बिहाणी, गोविंदराव लटपटे, हेमंतराव आडळकर, प्राचार्य डॉ.शरद कुलकर्णी, उपशिक्षणाधिकारी ससाणे, गटशिक्षणाधिकारी गणराज यरमळ उपस्थित होते. पृथ्वीराज म्हणाले, मातृभाषेतून आपल्या भावना, मत व्यक्त करणे प्रत्येकाला सहज जमते; परंतु, माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात व्यक्त होण्यासाठी इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे गरजेचे आहे. यासाठी प्रयोगशाळा उपयुक्त ठरणार आहे. डॉ.निर्मला पद्मावत यांनी प्रयोगशाळेची माहिती दिली. डॉ.एम. एस.शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.सुषमा सोमाणी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा.नागेश कान्हेकर यांनी आभार मानले.

# पुण्य नगरी

नांदेड

## अर्थव्यवस्थे आधी जाणीव प्रगल्भ व्हावी



# सकाळ

सोमवार, ६ जानेवारी २०२०

## अर्थसाक्षर, डिजिटल साक्षर होणेही गरजेचे

### पोलिस निरीक्षक बोरगावकर : 'सायबर सेफ वुमन' विषयावर कार्यक्रम



# महाराष्ट्र टाइम्स

## सोशल मीडियाऐवजी वाचन वाढविण्याची गरज

### दीक्षान्त समारंभात डॉ. बोकडे यांचे प्रतिपादन



# गोदातीर समाचार

गुरुवार दि. २६ डिसेंबर २०१९



## अण्णा भाऊ साठे वैश्विक विचारांचे वारसदार- भालेराव

### राज्यस्तरीय चर्चासत्राचे उद्घाटन

लोकसत्ता
लोकमान्य लोकशक्ती
रविवार, २३ जून २०१९

## माणूस घडविणाऱ्या शिक्षणाची गरज- डॉ.अनिल काकोडकर

वार्ताहर, परभणी

प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या कुटुंबासोबतच, समाज, शिक्षण संस्था आणि मातीशी नाळ जोडणारे, माणूस घडविणारे शिक्षण देणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन भाभा अणुसंशोधन केंद्राचे संचालक डॉ. अनिल काकोडकर यांनी केले.

सेलू येथील नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचालित नूतन महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ. एस. एम. लोया होते. या वेळी ज्येष्ठ साहित्यिक डॉ.नागनाथ कोत्तापल्ले, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. उद्धव भोसले, माजी सचिव प्राचार्य द. रा. कुलकर्णी आदी उपस्थित होते.

डॉ. काकोडकर पुढे म्हणाले,की येणाऱ्या ज्ञानयुगात आणि जागतिक



सेलू येथील नूतन महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाच्या सांगता समारंभात बोलताना डॉ.अनिल काकोडकर.

पातळीवर झपाट्याने होणाऱ्या बदलांना सामोरे जाण[illegible] सक्षम पिढी व समाज [illegible] शिक्षण संस्थांनी [illegible] करण्यासाठी पुढे येणे [illegible] शिक्षणाच्या माध्यमा[illegible] परिसरातील प्रश्न स[illegible]

सोडविण्यासाठी प्रश्नांची जाण, [illegible]

गोपीनाथ लटपटे यांच्या भरीव आर्थिक सहकार्याने महाविद्यालयात उभारण्यात [illegible]

ज्वलंत हिंदुत्वाचा पुरस्कार करणारे एकमेव मराठी दैनिक
सामना
संभाजीनगर, गुरुवार, ८ ऑगस्ट २०१९ | वर्ष : दुसरे अंक : १२६ | पृष्ठे १२ | मूल्य : ४.००




सेलू : येथील नूतन महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने आयोजित साहित्यिक आपल्या भेटीला उपक्रमात बोलताना कवी जयराम खेडेकर मंचावर प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, नगराध्यक्ष विनोदराव बोराडे, प्रा.डॉ. राजाराम झोडगे, इंदर बोराडे, गिरीश लोडाया, प्रा.डॉ. महेंद्र शिंदे, सुरेश झिबाळे आदी.

पुढारी MY परभणी-हिंगोली सोमवार, २३ डिसेंबर २०१९

## यशासाठी मुलांमधील कुतूहल जागे ठेवा

### अच्युत गोडबोले : कै. श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमाला

सेलू, प्रतिनिधी : विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, संगीत, कला [illegible] कुतूहल मुलांमध्ये [illegible] ठेवा. [illegible] कुतूहलातून [illegible] प्रतिपादन प्रसिद्ध साहित्यिक अच्युत गोडबोले यांनी 'माझा लिखाण प्रवास' या विषयावर बोलताना केले.

नूतन विद्यालय शिक्षण संस्था संचलित कै. श्रीरामजी भांगडिया स्मारक व्याख्यानमालेचे '४४ वे पुष्प नूतन विद्यालयाच्या प्रांगण मैदानावर [illegible] दि. २१ रोजी झाले. [illegible] अच्युत गोडबोले [illegible] अध्यक्षस्थानी नूतन विद्यालय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. एस. एम. लोया हे होते. अच्युत गोडबोले आपल्या भाषणात म्हणाले की, [illegible]




[illegible] डॉ. शरद कुलकर्णी यांनी केले. [illegible]

# अनंत धून विशेष



प्रेरणा
२०१९-२०

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या रौप्य महोत्सवानिमित्त महाविद्यालयात मराठवाड्याचा विकास आणि मुद्रित माध्यमांची भूमिका या विषयावर मनोगत व्यक्त करीत असताना माजी संपादक व ज्येष्ठ साहित्यिक श्री. महावीर जोंधळे.





स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वतीने पदवी वितरण समारंभ महाविद्यालयात आयोजित केला होता. त्याप्रसंगी स्वा.रा.ती. म. विद्यापीठ, नांदेडचे रा.से.यो. चे समन्वयक डॉ. शिवराज बोकाडे मार्गदर्शन करीत असताना.

महाविद्यालयात आयोजित शिक्षण, सामाजिक, आर्थिक व पर्यावरण यांच्या शाश्वत विकासाकरिता जागरुकता या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेत मार्गदर्शक डॉ. दीपक वाईकर यांचा सत्कार स्वीकारताना व मार्गदर्शन करताना.





प्रो. गोविंदराव लटपटे कम्युनिकेशन अँड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट लॅबचे उद्घाटनसोहळा प्रसंगी परभणी जिल्ह्याच्या जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी श्री. पृथ्वीराज.



## अनंतराव भालेराव

हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचे अग्रणी, झुंजार पत्रकार, दैनिक मराठवाड्याचे साक्षेपी संपादक, वारकरी परंपरेचे, गांधीवादी कार्यकर्ते, नूतन विद्यालय या शाळेचे मुख्याध्यापक, समाजाशी संवाद साधणारे झुंजार पत्रकार म्हणून अनंतराव भालेराव यांचे सेलू व नूतन विद्यालय शिक्षण संस्थेशी जिव्हाळ्याचे अतूट नाते होते. सेलू या गावानेच मला खरे जग दाखवले व पुढील आयुष्यासाठी भक्कम पाया घालून दिला. हे गाव माझ्यासाठी आप्त स्वकीय एक ऋणानुबंधी बनले असा उल्लेख अनंतराव भालेराव यांनी आपल्या लेखात केला. नूतन विद्यालयातील मुलांनीच मला खूप दिले. आपण लिहू व बोलू शकतो हे मुलांनीच पटवून दिल्याचे अनंतरावांनी लिहून ठेवले. असे जडले सेलूशी, नूतनशी नाते.